मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
( जिल्हा वाचनालय )


मासिकाचे नांव — महाराष्ट्र साहित्य

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९१९ १९२०

अंक —

( महिने ) १९१९ १०





न्या. काशीनाथ त्रिंबक तेलंग.



श्री. विष्णु जनार्दन शिरोळक[र]
( [य]ांनीं गौडसारस्वत ब्राह्मण ज्ञातीच्या महाज[न]ा वाडीसाठीं
१ लाख रुपयांची देणगी देण्याचें कबूल केलें आहे. )



श्री. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष,
B. A., I. C. S.

# महाराष्ट्र सारस्वत.

वर्ष ४ थें ] अक्टोवर १९१९. [ अंक १ ला.

ग्रंथ संग्रहालय

## ऊठ हिंदवासिया ऊठ बा !

[ कवि कै. " **यशवंत** " ]

### ( फटका. )

ऊठ ! हिंद वासिया ! ऊठ ! बा, अज्ञानाला दूर करीं
आत्मोन्नतिस्तव, राष्ट्रोन्नतिस्तव, ज्ञानाचा घे दीप करीं १
परस्परांतिल लढा बाजुला पार झुगारुन टाकुन दे.
**कार्य साधिका संहती असे** तत्व हें मनीं वागूं दे. २
हिंदुस्थानाचा भेदानें नाश जहाला विसरुं नको,
यास्तव तूझीं मतवैचित्र्यें पूर्णपणें बाजू राहो. ३
**वसुधैव कुटुंम्बकं** ही असो तुझ्या मनाची रे वृत्ती,
जेणें विस्तृत तव मन होउनि, होइल आनंदोत्पत्ति. ४
कायावाचामनें समाजा अर्पी उत्साहें सेवा,
सर्व गुणांचें सार त्यामधें, तें आहे अतिप्रिय देवा. ५
अंधरूढि वा अंधश्रद्धा त्वत्कार्या न विघात करो,
संसृतिच्या फेऱ्यांत अडकुनी षड्रिपूंस बळि पडूं नको. ६
जातीभेदां विसरुनि सर्वांमाजी समदृष्टी ठेव,
थोर प्रयासें ही तनु मिळते, जी आहे सद्गुण ठेव. ७
कार्यामध्यें दक्ष राहुनी, दे सोडोनी मार्ग बुरा,
हातिं घेतलें मधें न सोडीं, पुरीव पिच्छा पुरा पुरा; ८
सहनशीलता अंगिं बाणुं दे, निंदक असती जगिं साचे,
ज्यांचा धंदा फक्त हा असे–दोष काढणें परक्याचे. ९
साधि रहाणी विचारसरणी नित्य असो परि तुझि उच्च,
राष्ट्रहिता पुढतीं बा मानीं स्वसुखाला अगदीं तुच्छ; १०
आलस्याला फांटा देउनि वरिं उद्योग–प्रियतेला
सर्व साध्य हो जगीं प्रयत्नां, ती गुरुकिल्ली कीर्तीला. ११

क्षुद्र विचारां थारा देइं न तुझ्या मानसीं थोर अशा,
भूतदया चर प्राणीमात्रीं,-तरीच उन्नतिची आशा; १२
परमेशावरि दृढ विश्वासा ठेवुनि कर तव कार्याला,
प्रयत्न करणें मनुजा हातीं पुढचि काळजी ईशाला १३
विशाल मन, समतोल बुद्धि, तव असो सर्व रे कार्यांत,
जें करणें तें झणिं करिं लवकर, पुष्कळ विघ्नें मार्गांत. १४
पळा पळानें जवळि येतसे मृत्यू हें मनिं वागीव,
'ह्यानें हें केलें कीं नाहीं' वाळगि याची क्षिति तो न; १५
मनीं वागवीं पूर्व विभूती, रामदास शिवबा वाजी,
ह्यांचीं चरितें काय शिकविती ?-जरि तुं न होसी वीर अजी. १६
बंधन सोडुनि मुक्त खगासम मार भराऱ्या उंच नभीं,
किंतु ना उरो तुझ्या मानसीं, वसो न तैसी कदा न भी. १७
आठवुनी पूर्वींचे दिन त्यां परत आणण्या यत्न करीं,
ते दिन,—जेव्हां होती प्रगती, धान्य विपुलता तशी खरी; १८
परि हा ! आतां ते दिन गेले, स्वातंत्र्याचे, सौख्याचे,
अभिमानाचे, उत्साहाचे, वीर्याचे ते ऐक्याचे; १९
वस्तुस्थिति जरि अशी असे तरि, होउं नको हृदयीं खिन्न,
प्रयत्न वादी हो, आणी लढ; टाक करुनि ही स्थिति भिन्न, २०
यत्नां पुढती तशी निराशा, जशि वायु पुढें धनपंक्ती,
पार वितळुनी दूर पळतसे, यत्न असे मनुजा हातीं; २१
उठ, आशेचे किरण फांकले, विस्करुनी अंधःकारा !
आशावादी होउनि झणिं वद, **भारतिच्या** जयजयकारा !! २२
उन्नतिचे दिन जवळि पातले, सुधारणेचे, प्रगतीचे,
कळकळिनें **यशवंत** गातसे, जागृत व्हाया सुचवितसे. २३

# सूर्यास्त.

आटोपोनि दिनक्रमा दिनमणी अस्ताचला पोंचतां,
येई पश्चिम दिग्वधू हंसत हां प्रेमें पतिस्वागता;
लज्जेनें अनुरागयुक्त झळके आस्यावरी रक्तिमा,
आनंदातिशयें फुटे न रवहीं, सौख्या उरे ना सिमा. १
संपत्कालिं तसा विपत्समयिंही राही जसा सज्जन,
तैसा हा धरि एकरूप सविता, धैर्या न कीं सोडुन.
पक्षी वासरराजया सुखवुनी गाती तयाची स्तुती,
मोदें तो धरि हास्य, पाहुनि तया आनंदली ही क्षिती. २
कंटाळोनि गृहीं रवी परततो साधोनि कार्यक्रम,
पत्नीच्या अवलोकुनी स्मितमुखा दूरी क्षणीं हो श्रम.

वा.मा.१२११५



प्रेमाच्या लहरी हृदीं उसळती, तो देत आलिंगना,
जाई तीसह गव्हरीं, करित हे पक्षी मुदें गायना. ३

लीला आरंभि प्रीतिच्या रवि तदा घेऊनि भार्ये करीं,
प्रेमानें कुरवाळि, तीस सुखवी, सौख्याब्धि स्नाना करी;
सायंकालिं असें सुरम्य विलसे दृश्य क्षितीजावरी,
पाहोनी हृदयासि पाझर फुटे, चित्त प्रमोदा वरी. ४

ऐशा गोड सुखीं निमग्न असतां एकाकिं घाला महा,
येई त्या सवितृयावरी, नच रुचे तत्सौख्य मृत्यूसि हा!
वीराचा जणुं अंत पाहुनि जगीं उद्विग्नता जाहली,
भूमी ही धरि म्लानता, कमलिनी माना तशा गाळिती!! ५

ग्रंथ संग्रहालय ठाणे
नं.........
ता.......

---

# मानवा !

लेखक–कै. यशवंत मंगेश नाडकर्णी, सिनियर बी. ए.

कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी तिचा नीट विचार कर; व तो तुझा विचार चांगला खोल असूं दे. तुला ज्या स्थितींत जगन्नियंत्यानें ठेवलें आहे तीच स्थिति सर्वोत्कृष्ट आहे असें समज. Those also serve who stand and wait. त्या स्थितीपेक्षां उच्च स्थितींत असण्याविषयीं हांव बाळगूं नको. हांव ही केव्हांही वाईटच. कारण मनांत धरलेलें कार्य सिद्धीस गेलें तर ठीकच, नाहीं तर सर्व प्रयत्न व्यर्थ जाऊन चंचल अंतःकरणास मरणप्राय दुःख होतें आणि तें चंचल अंतःकरण, जें आपल्या जवळ नाहीं, त्याची हांव धरीत सदैव अस्वस्थ राहतें.

**मानवा,** नेहमीं हे लक्षांत ठेव कीं, ईश्वर न्यायी आहे, व त्याचा न्याय सर्वव्यापक आहे. आज आपणास तो निष्ठुर दिसेल, पण एकदां दुःखाची रात्र उलटून गेल्यावर सुखाचे किरण सर्व जगांत फांकतील, व ईश्वर सकरुण असल्याची खात्री होऊन जग हांसत असलेलें दिसेल. 'चक्रनेमिक्रमानें' दुःखा मागून सुख हें आहे. दुःखाच्या रात्रींत दैवावर भार ठेवून स्तब्ध राहिलेलीं झाडें पहांटेस खसखसून हास्य करितील, लता सुमनरूपी आनंदाश्रु गाळितील व गंधवाह ईश्वराच्या अगाध महिम्याचा परिमल जगांत दुमदुमवून टाकील.

**मानवा,** ईश्वर तुला जी स्थिति प्राप्त करून देतो, ती सर्वथैव योग्य आहे. नशिबाला टाळून कदाचित् तूं ईश्वरास दोष देशील, पण ही तुझी चूक आहे. ईश्वर जर तुला अधिक चांगली स्थिति द्यावयाला गेला, तर त्याला अन्याय करावा लागेल. तुझ्या सुखांत मिळवणी करूं गेल्यास त्याला दुसऱ्या कोणातरी लेंकराच्या सुखांतून वजाबाकी करावी लागेल. तुझ्या ह्या **सुखप्राप्ती** करितां दुसऱ्याच्या **सुखव्याप्तीचा** नाश झालेला पहाणें योग्य वाटेल का ? आसपास दुःखाच्या किंकाळ्या व निराशेचे सुस्कारे निघत असतांना, तुझ्या सुखाचे भोग तुला गोड वाटतील का ? तुला ते सुख देऊं शकतील का ? हावऱ्या माणसा, विचार कर व मायावश न होतां योग्य मार्ग शोधून काढ.

**मानवा,** तूं सहृदय आहेस व दयाळु ईश्वरानें तुला बुद्धि दिलेली आहे. त्या हृदयाचा व बुद्धीचा उपयोग दुसऱ्यावर आग पाखडण्याकरितां नव्हे तर सौख्यराशी मिळवून देण्याकरितां आहे. सुखाचे ऐवजीं जर ही बुद्धि दुःख घडवून आणूं लागली, तर देवा, ती बुद्धि कां रे ? ईश्वरा ! प्रमादशील माणसाला क्षमा कर, व माणसा, तूं तुझी हांव सोडून दे.

**मानवा,** तरू व लता यांना बुद्धि आहे का ? नाहीं. पण तीं पहा, कशीं खेद न करितां, ईश्वरानें दिलेल्या स्थितीच्या परमानंदांत तल्लीन होऊन डोलत आहेत, व आपल्या कर्तव्यांत कशीं पहा तत्पर आहेत ! त्यांना हांव आहे का ? नाहीं. त्यांना भलती महत्वकांक्षा आहे का ? नाहीं. हांव व महत्वकांक्षा नसतांनां देखील तीं पहा किती सुखी आहेत ! मग **मानवा,** तूंच–बुद्धिवान असा तूंच–दुःखी, रहाण्याचें काय कारण बरें ?

---

क्षुद्र विचारां थारा देइं न तुझ्या मानसीं थोर अशा,
भूतदया चर प्राणीमात्रीं,–तरीच उन्नतिची आशा; १२
परमेशावरि दृढ विश्वासा ठेवुनि कर तव कार्याला,
प्रयत्न करणें मनुजा हातीं पुढचि काळजी ईशाला १३
विशाल मन, समतोल बुद्धि, तव असो सर्व रे कार्यांत,
जें करणें तें झणि करिं लवकर, पुष्कळ विघ्नें मार्गांत. १४
पळा पळानें जवळि येतसे मृत्यू हें मनिं वागीव,
' ह्यानें हें केलें कीं नाहीं ' वाळगि याची क्षिति तो न; १५
मनीं वागवीं पूर्व विभूती, रामदास शिवबा बाजी,
ह्यांचीं चरितें काय शिकविती ?–जरि तुं न होसी वीर अजी. १६
बंधन सोडुनि मुक्त खगासम मार भराऱ्या उंच नभीं,
किंतु ना उरो तुझ्या मानसीं, वसो न तैसी कदा न भी. १७
आठवुनी पूर्वीचे दिन त्यां परत आणण्या यत्न करीं,
ते दिन,—जेव्हां होती प्रगती, धान्य विपुलता तशी खरी; १८
परि हा ! आतां ते दिन गेले, स्वातंत्र्याचे, सौख्याचे,
अभिमानाचे, उत्साहाचे, वीर्याचे ते ऐक्याचे; १९
वस्तुस्थिति जरि अशी असे तरि, होउं नको हृदयीं खिन्न,
प्रयत्न वादी हो, आणी लढ; टाक करुनि ही स्थिति भिन्न, २०
यत्नां पुढती तशी निराशा, जशि वायु पुढें धनपंक्ती,
पार वितळुनी दूर पळतसे, यत्न असे मनुजा हातीं; २१
उठ, आशेचे किरण फांकले, विस्करुनी अंधःकारा !
आशावादी होउनि झणिं वद, **भारतिच्या** जयजयकारा !! २२
उन्नतिचे दिन जवळि पातले, सुधारणेचे, प्रगतीचे,
कळकळिनें **यशवंत** गातसे, जागृत व्हाया सुचवितसे. २३

---

# सूर्यास्त.

आटोपोनि दिनक्रमा दिनमणी अस्ताचला पोंचतां,
येई पश्चिम दिग्वधू हंसत हीं प्रेमें पतिस्वागता;
लज्जेनें अनुरागयुक्त झळके आस्यावरी रक्तिमा,
आनंदातिशयें फुटे न रवहीं, सौख्या उरे ना सिमा. १
संपत्कालिं तसा विपत्समयिंही राही जसा सज्जन,
तैसा हा धरि एकरूप सविता, धैर्या न कीं सोडुन.
पक्षी वासरराजया सुखवुनी गाती तयाची स्तुती,
मोदें तो धरि हास्य, पाहुनि तया आनंदली ही क्षिती. २
कंटाळोनि गृहीं रवी परततो साधोनि कार्यक्रम,
पत्नीच्या अवलोकुनी स्मितमुखा दूरी क्षणीं हो श्रम.

बा मा १२१६५



प्रेमाच्या लहरी हृदीं उसळती, तो देत आलिंगना,
जाई तीसह गव्हरीं, करित हे पक्षी मुदें गायना. ३
लीला आरंभि प्रीतिच्या रवि तदा घेऊनि भार्ये करीं,
प्रेमानें कुरवाळि, तीस सुखवी, सौख्याब्धि स्नाना करी;
सायंकालिं असें सुरम्य विलसे दृश्य क्षितीजावरी,
पाहोनी हृदयासि पाझर फुटे, चित्त प्रमोदा वरी. ४
ऐशा गोड सुखीं निमग्न असतां एकाकिं घाला महा,
येई त्या सवित्यावरी, नच रुचे तत्सौख्य मृत्यूसि हा!
वीराचा जणुं अंत पाहुनि जगीं उद्विग्नता जाहली,
भूमी ही धरि म्लानता, कमलिनी माना तशा गाळिती!! ५

ग्रंथ संग्रहालय ठाणे
नं.........
ता........

---

# मानवा !

लेखक-कै. यशवंत मंगेश नाडकर्णी, सिनियर बी. ए.

कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी तिचा नीट विचार कर; व तो तुझा विचार चांगला खोल असूं दे. तुला ज्या स्थितींत जगन्नियंत्यानें ठेवलें आहे तीच स्थिति सर्वोत्कृष्ट आहे असें समज. Those also serve who stand and wait. त्या स्थितीपेक्षां उच्च स्थितींत असण्याविषयीं हांव बाळगूं नको. हांव ही केव्हांही वाईटच. कारण मनांत धरलेलें कार्य सिद्धीस गेलें तर ठीकच, नाहीं तर सर्व प्रयत्न व्यर्थ जाऊन चंचल अंतःकरणास मरणप्राय दुःख होतें आणि तें चंचल अंतःकरण, जें आपल्या जवळ नाहीं, त्याची हांव धरीत सदैव अस्वस्थ राहतें.

**मानवा**, नेहमीं हे लक्षांत ठेव कीं, ईश्वर न्यायी आहे, व त्याचा न्याय सर्वव्यापक आहे. आज आपणास तो निष्ठुर दिसेल, पण एकदां दुःखाची रात्र उलटून गेल्यावर सुखाचे किरण सर्व जगांत फांकतील, व ईश्वर सकरुण असल्याची खात्री होऊन जग हांसत असलेलें दिसेल. 'चक्रनेमिक्रमानें' दुःखा मागून सुख हें आहे. दुःखाच्या रात्रींत दैवावर भार ठेवून स्तब्ध राहिलेलीं झाडें पहांटेस खसखसून हास्य करितील, लता सुमनरूपी आनंदाश्रु गाळितील व गंधवाह ईश्वराच्या अगाध महिम्याचा परिमल जगांत दुमदुमवून टाकील.

**मानवा**, ईश्वर तुला जी स्थिति प्राप्त करून देतो, ती सर्वथैव योग्य आहे. नशिबाला टाळून कदाचित् तूं ईश्वरास दोष देशील, पण ही तुझी चूक आहे. ईश्वर जर तुला अधिक चांगली स्थिति द्यावयाला गेला, तर त्याला अन्याय करावा लागेल. तुझ्या सुखांत मिळवणी करूं गेल्यास त्याला दुसऱ्या कोणातरी लेंकराच्या सुखांतून वजाबाकी करावी लागेल. तुझ्या ह्या **सुखप्राप्ती** करितां दुसऱ्याच्या **सुखव्याप्तीचा** नाश झालेला पहाणें योग्य वाटेल का ? आसपास दुःखाच्या किंकाळ्या व निराशेचे सुस्कारे निघत असतांना, तुझ्या सुखाचे भोग तुला गोड वाटतील का ? तुला ते सुख देऊं शकतील का ? हावऱ्या माणसा, विचार कर व मायावश न होतां योग्य मार्ग शोधून काढ.

**मानवा**, तूं सहृदय आहेस व दयाळु ईश्वरानें तुला बुद्धि दिलेली आहे. त्या हृदयाचा व बुद्धीचा उपयोग दुसऱ्यावर आग पाखडण्याकरितां नव्हे तर सौख्यराशी मिळवून देण्याकरितां आहे. सुखाचे ऐवजीं जर ही बुद्धि दुःख घडवून आणूं लागली, तर देवा, ती बुद्धि कां रे ? ईश्वरा ! प्रमादशील माणसाला क्षमा कर, व माणसा, तूं तुझी हांव सोडून दे.

**मानवा**, तरू व लता यांना बुद्धि आहे का ? नाहीं. पण तीं पहा, कशीं खेद न करितां, ईश्वरानें दिलेल्या स्थितीच्या परमानंदांत तल्लीन होऊन डोलत आहेत, व आपल्या कर्तव्यांत कशीं पहा तत्पर आहेत ! त्यांना हांव आहे का ? नाहीं. त्यांना भलती महत्वकांक्षा आहे का ? नाहीं. हांव व महत्वकांक्षा नसतांनां देखील तीं पहा किती सुखी आहेत ! मग **मानवा**, तूंच-बुद्धिवान असा तूंच-दुःखी, रहाण्याचें काय कारण बरें ?

---

# आम्ही चाललों आहोंत कोठें ?

लेखक—रा. रा. **बाळकृष्ण दाजी प्रभू.**

**सोन्याचा दिवस.** ज्या दिवशीं 'संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद' जन्मास आली, त्या दिवसाची आठवण झाली म्हणजे, आमच्या कांहीं वर्तमान संस्थात्मक चळवळी पाहून, वरील प्रश्न अंतःकरणाला दुःसह ताप दिल्याखेरीज रहात नाहीं. खरोखर तो आम्हां सारस्वतांच्या सुभाग्याचा—सोन्याचा दिवस होता. आमच्या ज्ञात्यात्म्याला कैक काळ वेष्टन घालून बसलेली पोटभेदशृंखला त्या दिवशीं तुटली जाऊन तो विमुक्त झाला. तो समय, तो सोहळा अपूर्व होता. जे आम्ही भेदभेदामुळें सर्वतः विभक्त झालेले होतों, अहंमन्यतेनें फुगून एकमेकांच्या वाऱ्याला रहाण्यास तयार नव्हतों, तेच आम्ही दैववशात् शुद्धीवर येऊन आपापल्या भोंवतालचे ते आत्मविनाशी, दुर्धर बंध तोडून टाकून, त्या दिवशीं **एकात्म** झालों. परिषद-देवतेच्या गाभाऱ्यामध्यें शुद्ध वातावरणांत बसून त्यावेळीं आम्ही 'ज्ञात्यैक्य' हें व्रत सत्यशीलपणें पाळूं व पोटभेदाचें वैशिष्ट्य आपल्यामध्यें उद्भवूं न देतां, तदर्थ कार्याला एकनिष्ठतेनें झटूं अशी भावना आपल्या अंतर्यामीं उद्भूत केली. असे मंगल प्रसंग—ज्या वेळीं अंतरात्मा संतोष पावून विशिष्ट कार्याशीं निगडित होतो असे—मानवी आयुःक्रमांत क्वचित् येत असतात व त्यांचें महत्वहि आत्मविकासाच्या दृष्टीनें अपरिमित असतें.

२. **नैतिक ऋण.** परिषदेमुळें आम्हांला विशिष्ट संघात्मताहि प्राप्त झाली. या परिषदेचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें जे जे आम्ही अंशभागीं झालों ते सर्व एकसमयावच्छेदेंकरून एका तत्वरज्जूनें परस्पराशीं परिबद्ध झालों. अर्थात् तदनुरूप कर्तव्यानें आह्मी (या संघांतील) सर्व व्यक्ति सम रीतीनें बांधल्या गेलों. एकात्मतेमुळें हा 'संघ' एक घटक बनून आम्ही त्याचे घटकावयव झालों. संघानें अंगीकृत केलेलें आत्मोन्नतिपर महत् कार्य जें 'एकीकरण' तें सिद्धीस नेण्याविषयीं प्रत्यक्ष कृति करण्याची जबाबदारी आम्हां प्रत्येक घटकावयवावर येऊन पडली; अर्थात् हें कर्तव्यरूपी नैतिक ऋण आमच्या माथीं बसलें.

३. **नीतिशीलता.** कर्तव्याला जागणें हेंच सत्याचरण, व सत्याचरण हीच नीति होय. अमुक एक तत्त्व सत्य ठरून तद्विहित कार्य करण्याची एकदां प्रतिज्ञा वाहिली म्हणजे ती कृतींत अवतीर्ण करणें व प्रतिज्ञेला कोणत्याहि प्रकारें चुकूनहि धक्का बसेल असें आचरण न ठेवणें हीच नीतिशीलता होय. 'ज्ञात्यैक' अथवा पोटभेद–एकीकरण याच प्रधान कार्यासाठीं आम्ही परिषदेच्या द्वारें एकात्म झालों. त्या अर्थी या कार्यावर विघात होईल असें कोणतेंहि कार्य आपण अंगिकारणें श्रेयस्कर होणार नाहीं. 'एकीकरण' हें कार्य आपल्याला कृतीनें सिद्धीस न्यावयाचें आहे. त्याकरितां आपण आपल्या ज्ञातींतील पुण्यात्म्यांशीं परिषदांगत संघशक्तीनें एकात्म झालेले आहोंत; आपल्यावर त्यांनीं विश्वास टाकलेला आहे. तो पाळणें हेंच आपलें कर्तव्य होय. जे आम्ही 'आपलाच भेद श्रेष्ठ' या तत्वावर अन्य भेदाशीं मांडीस मांडी लावून बसण्याला तयार नव्हतों त्या आम्हांमध्यें एकीकरणाची कल्पना प्रादुर्भूत होऊन, तिला हें संघटित स्वरूप यावें, ही गोष्ट म्हणजे सामान्य व्यक्तींच्या इच्छेनें घडून आलेलें कार्य नसून, 'पुष्कळांचें पुष्कळ हित' करण्याचें ज्यांच्यांत उज्ज्वल सामर्थ्य आहे, अशा पुण्यात्म्यांच्या प्रेरणेनेंच तें घडलेलें आहे. अशा महात्म्यांनीं जें हें ज्ञातिहिताचें कार्य हातीं धरलेलें आहे, ज्याकरितां ते आमच्याशीं एकात्म झालेले आहेत, ज्याविषयीं आमच्या अंतरात्म्याकडून त्याच वेळीं त्यांना अभिवचन दिलें गेलें आहे, अशा त्या कार्याशीं एकनिष्ठ राहून, कर्तव्यऋणांतून मुक्त होणें यांतच नीतिशीलता आहे.

४. असें असतां, कांहीं व्यक्तिसंघांनीं पोटजातिविशिष्ट तत्वावर ज्या निरनिराळ्या रूपानें अनेक

संस्था स्थापित करण्याचा क्रम चालविलेला आहे– [ केवळमुंबईतच अशा पंधरा वीस संस्था आढळतील ] त्यांतील इष्टचर्थ तरी काय ? एकीकडे एकीकरणाला मान्यता देऊन दुसरीकडे आपापल्या पोटजातीचे सवते सुभे निर्माण करणें

श्रमविभागणी कीं ऐक्यविभागणी?

यांतील हेतू तरी काय ? याचें उत्तर म्हणून कित्येकांकडून 'आम्ही ही श्रमविभागणी करीत आहोंत' असें विधान पुढें करण्यांत येतें. निर्विकार मनानें व निःपक्षपातपणें विचार करणाऱ्याला हें विधान सत्याला सोडून आहे असेंच म्हणावें लागेल. 'ऐकीकरण' हें आपलें तत्वप्रधान 'सत्य' आहे; पोटजातिवैशिष्टयाचा निःपात करण्याकरितां हें 'सत्य' अंगीकृत करण्यांत आलेलें आहे. असें असतां, कोणत्याही कारणास्तव कां होईना, पण पोटजातिवैशिष्टयाचें जर पुनरुज्जीवन होऊं लागलें तर तो सत्यापलाप होत आहे असेंच नव्हे काय ? सत्यापलाप झाला कीं एकीकरण–सांखळींतील दुवे निखळण्यास प्रारंभ होऊन संघात्मता ढिली नाहीं का पडणार ? पोटजातिवैशिष्टय कोणत्याहि रूपानें प्रस्थापित करणाऱ्यांच्या श्रमाचें क्षेत्र एकीकरणात्मकसंघाच्या श्रमक्षेत्रापासून तत्काल भिन्न होत नाहीं काय ? त्या वैशिष्टयाच्या उपद्यापार्थ होणारे परिश्रम हा एकीकरणात्मक संघाच्या परिश्रमाचें ओझें कमी करणारा असा भाग आहे, असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें नव्हे काय ? पोट जातिवैशिष्ठ्य संभाळून धरणें हें बेकीकरण नव्हे काय ? एकीकरण स्थितींत वैशिष्टयांचीं भिन्न भिन्न स्थित्यन्तरें होऊं लागलीं तर तीं बेकीकरणाचीं रूपें होत, असेंच नव्हे काय ?

(अ) या सहाहि प्रश्नांचीं उत्तरें अस्तिपक्षीं दिल्या विना निर्वाह लागणें शक्य नाहीं. शैक्षणिक, सहकारी वगैरे वगैरे तत्त्वें पुढें ठेवून त्यांप्रीत्यर्थ पोटजातिवैशिष्टयावर उभारलेल्या व उभारूं पहाणाऱ्या संस्था स्वौघानेंच तत्वतः बेकीकरण स्थितींत प्रविष्ट होत आहेत असें म्हणणें प्राप्त आहे. जर 'एकीकरण' हें सत्याला स्मरून कृतीनें पाळावयाचें असेल तर शैक्षणिक तत्वासाठीं काय अगर इतर तत्त्वासाठीं काय पोटजातिवैशिष्टयाला थारा मिळतां कामा नये. 'पोटजातिवैशिष्टय' पोटाशीं धरल्याशिवाय शैक्षणिक वगैरे संस्कृति होणें शक्य नाहीं असें मुळींच नव्हे. तसें असतें तर प्रथमारंभींच एकीकरणांत सर्व पोटभेद समाविष्ट होतेना.

( ब ) अतएव ही श्रमविभागणी नसून ऐक्य विभागणी किंवा बेकीकरणाचें एक स्वरूप होय.

५. कित्येक असें विधान करितात कीं 'आम्ही अमुक एक संस्कृतींत अमुक अमुक भेदांतील जनसमूहापेक्षां मागसलेले आहोंत, तेव्हां ती संस्कृति गांठून समाजांत त्यांच्या बरोबरीचें स्थान

द्विमुखी कृति

पटकवितां येई तों आमच्या कार्याचें क्षेत्र आमच्या भेदापुरतें मर्यादित करणें आम्हांला भाग आहे. आम्ही तसें न करूं तर विषम स्थितिमुळें आम्हांला एकीकरणक्षेत्रांत वावरतांना कित्येकदां खालीं पहाण्याचा प्रसंग येईल. म्हणून तूर्त आम्ही ही पोटजातिविशिष्ट तत्वावर अमुक एक संस्था उभारीत आहोंत. एरवीं आम्हांला एकीकरण मान्य आहे. आम्हांला ती संस्कृति गांठूं द्या कीं आम्हीं सर्व बंधूंच्या हातांत हात घालण्याला आलोंच म्हणून समजा. शिवाय आमची ही स्वतःपुरती संस्था संरक्षित ठेवून, एकीकरण तत्वावर उभारलेल्या संस्थांतहि आम्ही शक्त्यनुसार भाग घेत आहोंतच. अर्थात् एकीकरणपुरस्कर्त्यांना आम्हांवर रुष्ट होण्याचें कारण नाहीं-वगैरे वगैरे "—या विधानांत द्विमुखी कृतीचें आस्तिक्य दिसून येतें. कृतीचा ओघ एकमुखी असतांना त्यांत जें सत्यांशाचें तेज असतें, जें उज्ज्वल सामर्थ्य असतें तें या द्विमुखानें वाहणाऱ्या कृतींत नाहीं. या कृतींत जितकें स्वार्थपरायणतेचें आधिक्य आहे, तितकाच तींत नीतिधैर्याचा अभावहि आहे. एकीकरणांत सामील झाल्यानंतर त्या एकीकरण घटकावयवांमध्यें परस्परांविषयीं ऐक्य, समभाव, प्रेम व आदर असणें हेंच त्यांच्या आत्मिक उन्नतीला विधायक आहे. उलट पक्षीं एकानें दुसऱ्याच्या उत्कर्षाबद्दल विषाद मानणें, सम भावाऐवजीं विषम भाव धरणें, प्रेमाच्या स्थानीं दूरीभावाला थारा देणें व आदराच्या ऐवजीं स्पर्धेला वाव देणें हें केव्हांहि अनिष्ट, अहितकर व आत्मोन्नतीला विघातक आहे. कोणत्याहि कारणास्तव अनेक व्यक्तिव्यक्ति मिळून

समष्टिरूपी एक घटक बनल्यानंतर, ‘आपण विशिष्ट तत्वानें परस्पराशीं सम्बद्ध झालेले आहोंत’ अशी प्रत्येकीनें संमति दिल्यानंतर, त्या तत्त्वाचा उच्छेद करणारी–अर्थात् त्या घटकाला मेगा पाडणारी—स्पर्धा उत्पन्न होणें यासारखी खेदजनक गोष्ट ती कोणती? पोटभेदांचें वैशिष्ट्य नष्ट व्हावें म्हणून तर एकीकरण करण्यांत आलें, व सर्व भेद त्यांत समाविष्ट झाले. असें होऊन गेल्यानंतर, अमुक भेदांत अमुक संस्कृतीचें आधिक्य आहे म्हणून अमुक एका भेदाची त्यांत मानखंडणा होईल हें म्हणणेंच व्यर्थ होय. कारण जेव्हां एकीकरण झालें तेव्हांच ‘अमुक भेद आणि तमुक भेद’ हें द्वैत लयाला गेलें, तथापि किल्मिषानुगामी मनोवृत्तीच्या कांहीं माणसांत तें धुमसत असावें असें गृहीत धरलें तरी त्यांना त्या विवक्षित संस्कृतीचें आधिक्य असणाऱ्यांविषयीं मनांत द्वैत धरण्याइतकी स्पर्धा बाळगण्याचे कांहीं कारण नाहीं,ऐक्यामुळें त्या संस्कृतीचा अंशभाग आपोआप त्यांना मिळतोच. —अविभक्त कुटुम्बांत संपत्ति एकानेंच मिळविलेली असली तथापि तीवर एकट्याचाच हक्क न रहातां त्या कुटुंबांतील सर्वांचा सारखाच हक्क पोहोंचतो हा तर व्यवहारांतील ढोबळ दृष्टान्त आहे.—तात्पर्य, जसजसा विचार करावा तसतसें या पक्षाचें प्रत्येक विधान लटकें पडून पोटजातिवैशिष्ट्याची लालसा त्याच्यानें सोडवत नाहीं हेंच उघड उघड दृष्टोत्पत्तीस येतें. एकीकडे हें वैशिष्ट्य तर पूर्णपणें कवटाळून धरावयाचेंच परंतु इतरांच्या तें तितकें लक्षांत न भिनावें व जनापवाद टाळतां यावा म्हणून एकीकरणाच्या मस्तकीं दोन बोटानें अक्षता टेंकण्याच्या या दुहेरी कृतीचें तो अवलंबन करीत आहे. न्यायाच्या तराजूंत या कृतीचें खरें तें स्वरूप व्यक्त झाल्याविना रहात नाहीं.

**विभक्तीचें ‘वारें’**

६. तिसरा पक्ष, एकीकरणांत कांहीं काळ गुण्यागोविंदानें घालवून, त्याचा नावानिशीं पुरस्कार केल्याचें विधिपूर्वक अखिल ज्ञातीच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर आतां, स्वभेदस्वरूपाची-प्रक्षिप्त ऐतिहासिक ‘सत्या’ची–‘नव जागृति’ झाल्याचें दाखवून तदनुसार या एकीकरणांतून आपलें अंग सर्वथैव काढून घेण्याच्या पंथाला लागलेला आहे. या ‘जागृतीचें’ त्याला काय महत्व असेल तें असो, परंतु सारासार, सदसद्विचारापुढें तरी तें महत्व टिकणें शक्य नाहीं. पोटभेदाच्या चिखलांत रुतलेलें पाऊल वर निघावें म्हणून एकीकरणाच्या उन्नतिपथावर सर्वभेदांनीं पाऊल घातलें व परस्परांसमवेत प्रतिज्ञा वाहून त्या सुपथावर तें संनिविष्ट केलें. असें असतां पुनरपि त्या चिखलाकडे धांव ठोकण्याचा विचार अंतःकरणांत प्रादुर्भूत होणें ही ‘जागृति’ नसून दुर्बुद्धि होय. उन्नत दशेकडे ज्या प्रवृत्तीचा गतिक्रम ती ‘जागृति’ होय. पोटजातिवैशिष्ट्यामधून निघून एकीकरणाकडे जाणें ह्मणजे उन्नत दशेंत प्रविष्ट होणें होय. उलटपक्षीं एकीकरणांतून निघून पोजातिवैशिष्ट्यांत शिरणें ही अवनत दशा होय. अशा प्रकारें हा पक्ष दुर्बुद्धीनें आवृत झाल्यामुळें ‘आम्हांला अमुक अमुक मानाचा पाट घाल तर आम्ही एकीकरणांत इतःपर येऊं, नाहींपेक्षां हे पहा आम्ही चाललों’ असें तो आतां म्हणूं लागला आहे. मानापानाचे पाट घालून बसण्याची जागा ‘एकीकरणांत’ नसते हें दुर्बुद्धीच्या वेष्टनापुढें दिसावें कसें! हे मानापानाचे पाट दुभंगले जाऊन, उंच सखल स्थळें निःशेष व्हावीं ह्मणून तर ‘एकीकरण’ अस्तित्वांत आलें. मानाचे पाट धरून बसणें अवश्य होतें तर त्याचा विचार ‘एकीकरणांत’ शिरतेवेळीं या पक्षानें करायला पाहिजे होता. मागाहून विहीणपणाची आढयता मिरविण्याचें साधन एकीकरणांत—पोटभेदसंलग्नतेंत—मिळणार नाहीं हें त्याला कळावयास हवें होतें. तो वेळ जाऊन, इतर पोटभेदांशीं स्वतः विधिपूर्वक संलग्न झाल्यानंतर भलताच हट्ट घेऊन बसणें याला काय म्हणावें? ‘विभक्तीचें वारें’ हेंच त्याचें उत्तर. एखाद्या मनोवृत्तीचा क्षोभ होऊन ती जेव्हां मनुष्याला आपल्या आधीन ठेवण्याइतकी अनिवार होते तेव्हां त्या वृत्तीलाच ‘वारें’ हें नांव प्राप्त होतें. अशा वाऱ्याचे मनुष्याला तात्पुरते झटके बसले तथापि त्याचें निमिषार्धांत पतन होणें हा प्रकार सुविचारी माणसांच्या संबंधीं आढळून येतो. परंतु या वाऱ्यानें आपलें कायमचें ठाणें दिल्याचा प्रकार मात्र क्षीण मनःप्रकृतीच्या माणसांसंबंधींच आढळून येतो. वारीं विविध प्रकारचीं असतात; त्यांपैकींच ‘विभक्ति’ हें एक वारें आहे. भेदाभेदामुळें तुटून वागण्याची जडलेली दीर्घ कालची अनिष्ट संवय जाण्याला अंगीं

संस्कृतीचे तेज असणें अत्यावश्यक आहे. या तेजांत कमतरता असेल तर मनःप्रकृति क्षीण असणें संभवनीय असते. व अशा क्षीणतेंत कोणतें वारें तीवर आपलें ठाणें देईल याचा नेम नसतो. अशाच कोणत्या तरीं प्रकारें हें 'विभक्तीचें वारें' या पक्षाच्या अंगीं संचरलेलें असावें. एरवीं वर निर्दिष्ट केलेलें कर्तव्यरूपी नैतिक ऋण झुगारून देण्याचें, प्रतिज्ञेला गचांडी देऊन नीतिशीलतेला झुकांडी देण्याचें, धाष्टर्य त्याच्यानें कदापि करवतें ना.

मननीय प्रश्न.

७. याप्रमाणें एका दिशेनें आमच्या पक्षपाती बांधवांचे एकीकरण विस्कळित करण्याचे प्रयत्न चाललेले आहेत; तर दुसऱ्या दिशेनें औदासिन्य, ताटस्थ्य, निष्क्रियता यांच्या ढगांनीं आमचा एकीकरण संध व्यापला जात आहे. अशा दुःसह आपत्तीच्या प्रसंगीं आमच्या प्रवुद्ध वंधूंनीं स्वस्थ बसून कसें चालेल ? ज्या पुण्यात्म्यांनीं ज्ञात्यैक्याला स्वरूपता आणली, ज्या प्रवुद्ध विद्वानांनीं त्यांना पाठिंबा देऊन तें 'ऐक्य' स्थिर केलें, ज्या सर्वसामान्य व्यक्तींनीं प्रत्यक्षपणें हातभार लावून त्या 'ऐक्याला' वळकटी आणली, ते सर्वच जर अशा वेळीं तद्विषयीं कर्तव्य शून्यता धरून वसले तर काय स्थिति होईल ? अशा विषम प्रसंगीं स्वज्ञातींतील सामान्य जनांना आपल्या कर्तव्याचा विसर पडला तथापि त्यांना जागृत करून स्वीकृत कार्यांत उपस्तित होणाऱ्या विघ्नांचा परिहार करण्याची जवाबदारी विशेषत्वें विद्वानांकडेच आहे हें सांगणें नलगे. हातची लगाम निसटली नाहीं तों ठीक आहे; ती निसटली कीं, हा स्वकीय कार्यरथ ताब्यांत ठेवणें कठीण पडेल. या गोष्टीचा विद्वानांनीं विचार केला पाहिजे. आज जवळ जवळ तीन वर्षें 'एकीकरण' कार्यांत जीवन्तपणा ठेवून मधून मधून कोसळणारीं विघ्नें उध्वस्त करून टाकण्याचा सतत उज्ज्वल प्रयत्न जर कोणी केला असेल व करीत असेल तर तो प्रामुख्यानें—परिषदोदरीं जनन पावलेल्या—**'महाराष्ट्र सारस्वता'** नेंच होय. या कार्याविषयींची कर्तव्यनिष्ठा व सत्यशीलता यांचे किरण कृतिरंगानें अखिल ज्ञातिक्षेत्रावर प्रसरित करण्याइतकी तेजस्विता जर कोणाच्याठायीं दिसून आली असेल तर ती 'महाराष्ट्र सारस्वता' च्या ठायीं होय. 'महाराष्ट्र सारस्वत' उदयाचलावर न येता तर आज 'आम्ही आहोंत कोठें ?' याच प्रश्नांत गुरफडण्याची पाळी आमच्यावर वेतली असती. कारण कार्याची प्रत्यक्ष जागृति देऊन तिला चलन देणारी आमची 'परिषद्' रूपी शक्ति—तिचें कार्य वजावितां येण्याजोगी अन्येतर संस्थात्मक शक्ति आमच्या ज्ञातिसमाजाच्या अंगीं प्रादुर्भूत होण्यापूर्वींच—शिथिल पडली, व अशा स्थितींत आमच्या एकीकरण-संघांत घरभेदीपणानें डोळे खुपसण्याचा प्रयत्नहि केला. अशा प्रसंगीं 'महाराष्ट्र सारस्वत' नसता तर काय झालें असतें ? हें वोलून दाखविण्याची जरूरी आहे असें नाहीं. परंतु बिचारा एकटा 'महाराष्ट्र सारस्वत' कोठें कोठें म्हणून पहाणार ? किती ठिकाणीं तोंड देण्यास पुरवणार ? आमच्या हितासाठीं म्हणून आम्हीं त्याला जें साहाय्य पुरविणें अवश्य आहे तेवढें देखील आमच्याच्यानें होईनासें झालें आहे. त्या महत् कार्याचा आम्हांला विसर पडला आहे अशांतली गोष्ट नाहीं, त्या कार्यापासून रतिमात्र ढळण्याचा विचार आमच्या ज्ञातींतील पुण्यशीलांना व सुप्रवुद्धांना स्वप्नांतहि शिवणार नाहीं हें खरें आहे. व ही स्थिति आमच्या ज्या कांहीं 'एकीकरण' तत्वाला अनुसरून प्रस्थापिण्यांत आलेल्या संस्था आहेत त्यांवरून स्पष्ट निदर्शनास येत आहे. तथापि विचाराचें केंद्रस्थान दूषित करणाऱ्या प्रवाही द्रव्याच्या लहरी कोठें तरी वातावरणांत उसळत आहेत खास. आणि म्हणूनच आमच्या कार्यकर्तृत्व शक्तींतील उत्साहाचें तेज आज लोपल्यासारखें झालें आहे. एका बाजूनें आम्हीं तोंडावाटे ब्रहि न काढतां खुशालपणें घरभेदीपणाला आमच्या गोटांत शिरण्याला वाव देत चाललों आहोंत व दुसऱ्या बाजूनें एकीकरण सांवरून धरण्याच्या प्रयत्नाला लागलेले आहोंत. अशा ओढाताणीनें आम्ही स्वीकृत कार्याचा मार्ग क्रमीत आहोंत. निश्चितता, धीरोदात्तता, ध्येयतत्परता व सत्यनिष्ठा या दिव्य गुणांविषयीं आम्हांकडून हेळसांड होत आहे. म्हणूनच **'आह्मी चाललों आहोंत कोठें ?''** हा प्रश्न आपलें डोकें वर काढीतआहे.

विज्ञप्ति.

८. असो. प्रस्तुत लेखकानें हें प्रश्नात्मक गाऱ्हाणें आपल्या विद्वान् बंधूंच्या कानावर घातलें आहे; त्यावर त्यांच्याकडून विचार होईल असा त्याला भरंवसा आहे. आणखीहि कांहीं प्रश्न सुज्ञांपुढें ठेवण्याचा त्याचा विचार आहे; त्यांपैकीं **'कोणाचें अडलें आहे ?'** हा प्रश्न येत्या भेटींत दाखल करण्याची इच्छा आहे. तरी त्यांनीं आपल्या ज्ञानाचा लाभ देण्याचा त्यावर अनुग्रह करावा अशी त्यांची कृपा भाकून तो त्यांची तूर्त रजा घेत आहे.

# आमचे विवाहविधि व सोहळे.

## लेखांक १ ला.

( लेखक—"ऋग्वेदी." )

पृथ्वीतलावरील एकंदर उद्भिज व प्राणि कोटीविषयीं विचार करतां असें दिसून येईल कीं, त्याच्या विस्तारास, वृद्धीस व सुखदुःखास विवाह हा कारण आहे. प्रत्यक्ष परमेश्वराचीं जीं दोन अंगें पुरुष आणि प्रकृति यांच्या विवाहामुळें हें जग निर्माण झालें असून ईश्वरानें घालून दिलेला धडाच सर्व सजीव पदार्थमात्रांनीं गिरवून या जगाची रमणीयता व वृद्धि राखावची आहे असें आम्हां हिंदूंचें धर्मशास्त्र बजावतें. आज सुधारणेची दिवटी पाजळणारीं राष्ट्रें ज्या दृष्टीनें विवाहसंस्थेकडे पहात आहेत त्या दृष्टीनें पौर्वात्य राष्ट्रें पाहत नाहींत. त्यांतही आम्ही हिंदुस्थानदेशीय लोक आमच्या पूर्वजांनीं विवाहसंस्थेला धार्मिक स्वरूप प्राप्त करून दिलें असल्यामुळें ती पवित्र व अत्यन्त उच्च दर्जाची आहे असें लेखीत आहों. अनेक कारणांमुळें जरी हिंदी समाज निकृष्टावस्थेस पोहोंचला तरी विवाह संस्थेविषयींचा आदर अद्यापि कायम आहे ही समाधान मानण्याजोगी गोष्ट असून तो कायम टिकेल असें करणें समाजहितचिंतकांचें कर्तव्यकर्म आहे. असो.

आमच्या शास्त्रकारांच्या अनुज्ञा लक्षांत घेतां असें सिद्ध होतें कीं जरी त्यांनीं कांहीं कालपर्यंत ब्रह्मचर्यानें राहण्याचें महत्त्व गाइलें आहे तथापि स्त्रीपुरुषांनीं योग्य वय प्राप्त झाल्यावर विवाहग्रंथीनें बद्ध होऊन संसार चालविणें अत्यन्त इष्ट आहे इतकेंच नाहीं तर तसें होणें धर्मदृष्ट्या अगत्याचें आहे असेंच त्यांचें मत दिसतें. धर्मशास्त्रकार सांगतातः—

" अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपि द्विजः ।
आश्रमेण विना तिष्ठन् प्रायश्चित्तायते हि सः ॥ "

" अविप्लुतब्रह्मचर्यो लक्षण्यां स्त्रियमुद्वहेत् । "

भावार्थ—द्विजानें ब्रह्मचर्याश्रमाची मर्यादा संपल्यावर पुढील जो गृहस्थाश्रम तो अंगिकारल्याशिवाय एक दिवसही राहूं नये. आश्रमविरहित राहाणारा प्रायश्चित्तास योग्य होतो. अर्थात् ब्रह्मचर्याश्रमाची वयोमर्यादा संपतांच योग्य स्त्रीशीं विवाह करावा व गृहस्थाची जबाबदारी अंगावर घ्यावी हें उचित आहे. पुरुषांनीं अमुक वयाच्या आंत किंवा बाहेर लग्न करावें या संबंधानें शास्त्रकारांनीं जरी बंधनें घालून दिलेलीं नाहींत तथापि स्त्रियांसंबंधानें मात्र अनेक नियम व सूचना नमूद केलेल्या आढळतात. कालेंकरून या देशांतील उच्चवर्णीयांत बालविवाहाची चाल रूढ होतांच खालीं दिलेल्या स्वरूपाच्या धर्माज्ञा अमलांत आल्या.

गौरीं ददान्नाकपृष्ठम् वैकुंठम् रोहिणी ददन् ।
कन्यां ददन् ब्रह्मलोकम् रौरवंतु रजस्वलान्. ॥

म्हणजे गौरीचें ( ८ व्यां वर्षी मुलीचें ) लग्न करून दिलें असतां स्वर्ग, ९ व्या वर्षी ( तिला रोहिणी संज्ञा आहे ) वरास मुलगी दान दिली असतां वैकुंठ लोक, कन्येचा ( १० वें वर्ष प्राप्त झाल्यावर ) विवाह केल्यानें ब्रह्मलोक व रजोदर्शन झाल्यावर तिचें लग्न केल्यानें रौरव नरक यांची प्राप्ति होते अर्थात् लहान वयांत प्रत्येक मुलीचें लग्न झालेंच पाहिजे अशी आधुनिक शास्त्रकारांची तरी आज्ञा आहे. आतां कालपरत्वें लोकांच्या आचारविचारांत क्रांति होऊन आधुनिक लोक रौरवाची विशेष भीति बाळगीत नाहींत ही गोष्ट निराळी. विवाहाचे जे आठ प्रकार या देशांत पूर्वकालीं रूढ होते त्यांतील कित्येक नष्ट झाले असून सर्वांत श्रेष्ठ जी ब्राह्मविवाहपद्धति तिचाच आम्ही गौड सारस्वत ब्राम्हण अवलंब करतो. विधि पुरतें पाहूं गेल्यास जरी हा ब्राम्हविवाह आहे तरी सध्यांचा प्रकार पाहतां त्याला ब्राम्हविवाह म्हणावा कीं दुसरें एखादें नांव द्यावें याबद्दल जबरदस्त संशय येतो. कारण दोन भिन्न कुटुंबांत मुलांमुलींच्या विवाहामुळें जें नातें जुळावयाचें त्या नात्याच्या बुडाशीं केवळ

देवघेवीचा प्रकार मात्र दृष्टीस पडतो. कन्येचा पिता हा बिचारा गांजलेला व चिंताग्रस्त असा ऋणको आणि वरपिता हा केवळ द्रव्याकडे पाहणारा धनको अशी आजकालची स्थिति पाहिली म्हणजे कालेंकरून मुलींचे विवाह करून देण्यांत पुण्य आहे असें मानण्याची प्रवृत्ति सर्वथैव नष्ट होऊन लग्न न करतां आजन्म तिला अविवाहित ठेविल्यानेंच पुण्य मिळेल असें मानण्याकडेच विशेष प्रवृत्ति होईल अशीं चिन्हें आतां दिसूं लागलीं आहेत. तेव्हां वेळींच समाजानें या गोष्टीचा विचार केला पाहिजे. या संबंधानें खल व्हावा म्हणून आमच्यांतील लग्नविधि व सोहळे यांचें या लेखमालेंत विवेचन केलें आहे.

## स्थलयोजना

जुन्या पद्धतीच्या घराण्यांत मुलीस आठवें वर्ष प्राप्त होतांच व आधुनिक विचारांचा ज्यांच्यांतील कर्त्यामाणसांवर थोडाबहुत परिणाम झाला आहे अशा विशेषतः शहरांत राहणाऱ्या घराण्यांत मुलीस १० वें किंवा ११ वें वर्ष लागतांच तिच्या विवाहाविषयींची काळजी तिच्या मातापितरांस किंवा पालकांस उत्पन्न होते. सुदैवानें तिचे मातापितर किंवा ममतेनें वागविणारे पुरस्कर्ते तिच्या विवाहाच्या कामीं पुढाकार घेणारे असल्यास प्रारंभीं तरी योग्य कुलशीलसंपन्न अशा वराच्या शोधार्थ चहूंकडे यत्न करतात. आमचा वर्ग ऋग्वेदी व आश्वलायन शाखेचा असल्यामुळें वेद किंवा शाखा यांच्या भेदाची जरी अडचण येत नाहीं तरी ज्ञातींतील पोटभेद, दूरच्या पल्ल्यावर मुलीस देण्याविषयीं नाखुषी, समान गोत्रजांचा विचार या गोष्टीमुळें लग्नासाठीं वर शोधून काढण्याचें क्षेत्र फारच संकुचित झालेलें असतें. त्यांतही जन्मपत्रिकेवरून सोयरीक जमविण्याची चाल बहुतेक कुटुंबांत असल्यामुळें नवग्रहांतील कांहीं दुष्ट ग्रहांच्या पराक्रमाच्या भीतीमुळें कधीं कधीं चांगलीं ठिकाणें हातचीं जातात. आजवर पत्रिकांवर विश्वास ठेवून वधूवरांचें भावी चरित्र ठरविण्याचा मक्ता जोशीबुवांनीं घेतलेला असला तरी चालू युगांतील अनुभव तरी असा आहे कीं या पत्रिकांवरून ठरविलेलें भविष्य बहुधा खरें ठरत नाहीं. फलज्योतिष ज्यावेळीं जन्मास आलें त्यावेळचीं ग्रहाचीं स्थानें देखील बदलून गेलीं, मग त्या स्थानभ्रष्ट झालेल्या ग्रहांच्या अंगची बरें वाईट करण्याची शक्ति तरी कशी कायम राहील! त्यांतही हल्लीं लग्नाच्या बाबतींत वरिष्ठ मानल्या जाणाऱ्या वरपक्षाकडून व येनकेन प्रकारेण एकदां कन्येच्या विवाहकार्यांतून पार पडण्यासाठीं धडपड करणाऱ्या वधूपक्षाकडून असंख्य प्रमाद घडत असल्यामुळें ग्रहांनीं तरी आपलें शील टाकून लग्न ग्रंथीनें बद्ध केलेल्या दोन भिन्न गोत्रीय स्त्रीपुरुषांचा संसार सुखावह न केल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आमच्या धर्माची आज्ञा अशी आहे कीं—

**शुद्धगोत्रकुलादिभिर्गुणयुतां कांतां वरश्चोद्वहेत् ।**

अर्थात् कुलशीलादि गुणांनीं युक्त अशी स्त्री वरानें पतकरावी. कुल शीलाचा प्रश्न चांगल्या प्रकारें सुटल्यावर खरें पाहिलें असतां शनि मंगळाच्या रागरोषाचा विचार करण्याचें कारण नाहीं. आज समाजांत असणाऱ्या विधुरविधवांची संख्या लक्षांत घेतां देखील वधुवरांचें आयुष्य पत्रिकेवरून अजमावण्याची पात्रता जोशीबुवांच्या अंगीं नाहीं असेंच सिद्ध होतें. खुद्द त्यांच्याच घरीं जर त्यांचें ज्योतिष खरें ठरत नाहीं तर इतरांच्या संबंधांत तें कसें खरें ठरेल? एकंदरींत स्थल योजना करावयाची ती वराच्या किंवा वधूच्या कुलशीलादिगुणांकरून करणेंच विशेष श्रेयस्कर व धर्म्य आहे. असें न करतां केवळ पत्रिकांवर भिस्त ठेवणारे कित्येक असतात. त्यांस योग्य स्थलीं कन्या देण्याचा योग चुकतो व पुढें निराश होऊन भलतीकडे स्थलयोजना करावी लागते. संस्काररत्नमालेंत कन्या कोणास देऊं नये हें पुढील शब्दांत सांगितलें आहेः—

**दूरस्थाः कुष्टिनो मूर्खा मोक्षमार्गानुसारिणः ।**
**शूरा अवेद्या निर्वृत्ता दशदोषयुता नराः ॥**
**तथा षंढाश्च पतिताश्चक्षुश्रोत्रविवर्जिताः ।**
**वर्जनीयाः प्रयत्नेन कन्यादाने न संशयः ॥**

म्हणजे लांबच्या पल्ल्यावर राहणारे, कुष्टरोगी, मूर्ख, मोक्षमार्गास लागलेले, युद्धास जाणारे, विद्याविहीन, विवाहाविषयीं पराङ्मुख झालेले, नपुंसक, जातिभ्रष्ट झालेले व कानडोळे नसलेले अशा दहा प्रकारच्या पुरुषांस दोषी असें मानून ते कन्यादान घेण्यास अर्थात् विवाहास नालायख समजले पाहिजेत आणि प्रयत्नेंकरून त्यांस वर्ज करावें. ही शास्त्राज्ञा व्यवहारास व विचारास साजेशी जरी आहे तरी पत्रिकांच्या अडचणी, हुंड्याचा त्रास, गरीबी, उभयपक्षांचा विशेषतः

परपक्षाचा दुराग्रह यांच्यामुळें या दशदोषांपैकीं एकादुसरा दोष पदरीं असलेल्या वरास कन्यादान देण्याचें महत्पातक आमच्यांतील कित्येक अदूरदर्शी व अविचारी वडील लोक करतात. तेव्हां ही स्थिति प्राप्त होऊं नये असें कित्येक ज्ञातिबंधुभगिनींस वाटलें पाहिजे आणि कन्येचें किंवा पुत्राचें लग्न करण्याची वेळ येतांच त्यांनीं दूरवर विचार करून अनेक प्रकारच्या अटी घालून वधू पक्षास भंडावून सोडण्याचें महापातक पदरीं घेऊं नये. आपला मुलगा काळा, कुरूप व अशक्त किंवा रोगी का असेना वधू मात्र गोरी, सुन्दर व सशक्त आणि निरोगी असावी ही पहिली अट वरपक्षाकडून घालण्यांत येते. मुलीस पाहून ती आपल्या मुलाहून सर्व प्रकारें विशेष चांगली आहे अशी खात्री होतांच १ आपणास अमुक हुंडा द्यावा लागेल २ मुलीच्या अंगावर अमूक दागिने वधूपक्षानें घातलेच पाहिजेत. आपण मात्र हुंड्यांतून वधूच्या अंगावर दागीने घालण्यासाठीं कांहीं रकम खर्च करूं किंवा न करूं त्या संबंधानें तक्रार घेतां कामा नये. ४ अमुक करणी करावी लागेल. ५ इतक्या मेजवान्या द्याव्या लागतील ६ आप्तेष्टांस अमुक अहेर द्यावे लागतील, ७ लग्न खर्चाचा अमुक बोजा वधूपक्षानें उचललाच पाहिजे वगैरे कित्येक अटी घालणारे वरपक्षाकडील लोक सारासार विचारास लग्नाच्या वेळेपुरता तरी राजीनामा देत असल्यामुळें आमच्या समाजांत सध्यां अपात्रीं कन्यादान दिल्याचे प्रकार घडून येत आहेत, आणि कदाचित् सुपात्रींच कन्यार्पण झालें तरी मुलीच्या लग्नापायीं तिच्या मातापितरांस कष्टांत दिवस कंठावे लागतात. तेव्हां स्थलयोजना योग्य प्रकारें होऊन लग्न म्हणजे एक संकट नव्हे तर एक पुण्याचें कृत्य आहे, ईश्वरानें या विश्वांत लावून दिलेल्या पवित्र संसाराची उभारणी करण्याचें गोड व्रत आहे असें प्रत्येकास वाटलें पाहिजे. आमचा समाज सुशिक्षित होत चालला आहे, आमचें अज्ञान दूर पळत चाललें आहे असा आपण एकीकडे टेंभा मिरवावा व दुसरीकडे क्लेश व कष्ट यांची समाजांत भरती होईल असें आचरण करावें हें आह्मांस शोभत नाहीं. जुने लोक स्वार्थानें या गोष्टी करतात म्हणावें तर आपण विद्वान पदवीधर ह्मणून मिरविणारे वरांचे पिते व खुद्द वर देखील प्रसंग प्राप्त होतांच आपलीं वेळींअवेळीं जाहीर केलेलीं व मनोदेवतेस पटणारीं मतें पार झुगारून देऊन अज्ञानी व स्वार्थी लोकांच्या पायरीस उतरतात ही मोठी शोचनीय गोष्ट होय! लग्नाच्या बाबींत स्थलयोजना योग्य प्रकारें व्हावी असें जर उभयपक्षांस वाटत असेल तर त्यांनीं स्वार्थास बळी न पडतां आपल्या मुलांमुलींच्या भावी संसारसुखावर नजर देऊन सोयरीक जुळवून आणिली पाहिजे. हुंडा देऊं घेऊं नये असें आमचें मत नाहीं. हुंडा म्हणजे कन्येचें दान घेणाऱ्या वरास देण्याची दक्षणा. तर मग एकदां कन्येचा प्रतिग्रह करण्यास तयार झालेल्या वरानें अमुकच दक्षिणा दिल्यास कन्यादान पतकरीन असें म्हणणें योग्य होईल काय? भटजींनीं धर्मकृत्यें चालवितांना अशी अट घातल्यास समाजास कितपत रुचेल बरें! तेव्हां दान देणारानें सुपात्रीं दान द्यावें व स्वशक्त्यनुसार दक्षिणा द्यावी हेंच विहित आहे. खरी शास्त्रपद्धति अशी आहे कीं कन्यादान घेण्यासाठीं घरीं पाचारण करून आणलेल्या वरास तांब्या पंचपात्री, कांस्यपात्र, गाय, म्हैस, दासी, भूमी, शय्या, आंगठी कुंडलादि कर्णभूषणें, समई आणि घर इत्यादि संसारोपयोगी उपकरणें देऊन नंतर सुवर्णाभिषेक करावयाचा असतो. तत्पूर्वी कन्यादान झाल्यावर दानविधीच्या सांगतेसाठीं यथाशक्ति दक्षिणा द्यावयाची असते. त्याच वरदक्षिणेला सध्यां हुंड्याचें हिडिस स्वरूप प्राप्त झालें आहे. ही दक्षिणा कन्यादानानंतर वरास न देतां लग्नाची तिथि ठरण्यापूर्वींच वरपक्षीय पुढारी कन्येच्या पित्याकडून आपल्या इच्छेप्रमाणें वसूल करतात आणि त्या रकमेचा विनियोग मन मानेल तसा करतात हें गर्ह्य आहे. या रीतीनें वरास देण्याची रकम वधूच्या मालकीची असें मानून या स्त्रीधनाचा वरानें किंवा वरपक्षीयांनीं उपयोग करणें धर्मबाह्य आहे. हुंड्याची अट घालण्याची चाल गेली पाहिजे त्याप्रमाणें वरदक्षिणा म्हणून दिलेली रकम वधूच्याच मालकीची आहे असें मानण्याची रूढि प्रचलित झाली पाहिजे. आमच्या मुंबापुरस्थ बंधूंत तर हजारांची, पांचशांची व तीनशांची अशा हुंड्याच्या व तदनुरूप करणीच्या तीन चाली असून हजाराची चाल पतकरणाऱ्या वधूच्या बापाला कन्येला प्रथम अपत्य होईपर्यंत कमींतकमी ७-८ हजारांपर्यंत खर्च येतो म्हणतात. अमक्या वेळीं अमूक सामान पाठविणें, तमक्या वेळीं अमुक मोद्यांचे

दागिने घालणें अगर रोख रकम देणें इत्यादि प्रकारच्या या अटी अगर करारनामा प्रथमच ठरला जातो व या करारनाम्यावरहुकूम अम्मलबजावणी व्हावी लागते. शिवाय जेवणावळी व खुशीचीं देणीघेणीं हीं निराळींच. शास्त्रांत वरास अमुक द्यावें असें सांगितलें आहे तरी " यथाशक्ति द्यावें " हेंच शास्त्रवचनाचें सार आहे. आपलें घर बुडवून कन्येचा संसार थाटवून देण्यास शास्त्र कधींच सांगत नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

स्थलयोजना करण्याच्या कामीं दुसरा एक प्रकार आढळतो तो असा. कित्येक घराण्यांत कुलदेवतेचा कौल किंवा अनुकूल प्रसाद घेऊन सोयरीक जुळविण्याची चाल आहे. अशा रीतीनें सर्वस्वीं कुलदेवतेवर विश्वास टाकणें हा सर्वांत उत्तम मार्ग असें म्हणणारे कित्येक असून मन, धन किंवा जन्मपत्रिका यांची नड न आली तरी कुलदेवतेचा प्रसाद घेणें अत्यावश्यक मानतात. यामुळें कित्येक वेळां असें होतें कीं देवतेचा अनुकूल प्रसाद न मिळतां सोयरीक जमून येत नाहीं. ज्यांच्या कुटुंबांत ही देवताप्रसादाप्रमाणें वागण्याची चाल आहे त्यांच्या येथें प्रपंचाची घडी सर्वथैव उत्तम बसलेली आहे आणि सुखाचें साम्राज्य सदैव चाललेलें असतें असा अनुभव नाहीं. जन्ममरण, सुखदुःख यांचा आघात प्रत्याघात सतत चाललेला असतो. कुलदेवतेचा प्रसाद प्राप्त होऊन विश्वासपूर्ण अंतःकरणानें घडवून आणलेल्या सोयरिकींचा परिणाम कधीं कधीं बेसुमार दुःखमय होतो. तेव्हां आपत्तींत सांपडलेली मंडळी पूर्वसंचितास किंवा प्राक्तनास दोष देत बसते आणि कधीं कधीं कुलदेवतेसही दोष देते. प्रसाद वगैरे जे प्रकार आहेत ते मानवी कल्पनेचे आहेत. यासाठीं स्वकृतपद्धतीचा दोष जगन्नियंत्याच्या माथीं मारण्याची रीति अविचाराची आहे. तेव्हां ईश्वराची प्रार्थना करून व त्याचा आशीर्वाद मागून सारासार विचारास योग्य वाटेल त्या रीतीनें स्थलयोजनेचें काम करावें हाच सर्वांत श्रेष्ठ मार्ग. असें केल्यानें देवावरचा विश्वास कमीही होणार नाहीं आणि स्थलयोजनेच्या क्षेत्रास प्राप्त होणारा—संकुचितपणाही कमी होईल.

बरेच दिवस घासाघीस होऊन स्थलयोजना कायम झाल्यावर ऐन लग्नाचा मुहूर्त जवळ आल्यावेळीं देखील विनाकारण तक्रारी उपस्थित होऊन सोयरीक मोडणारे कांहीं लोक क्वचित् प्रसंगीं आढळतात. कधीं कधीं घरांतील वडील माणसांनीं निश्चित केलेली सोयरीक सुशिक्षित ह्मणविणाऱ्या नवऱ्या मुलाच्या विरोधामुळें मोडण्याचा दुर्धर व अपमानास्पद प्रसंग वडिलजनांवर येतो. यामुळें कित्येक घराण्यांच्या नांवाला कलंक लागतो. अशा प्रकारचीं कांहीं उदाहरणें सध्यां घडून आल्यामुळें सुशिक्षित मुलांचीं मातापितरें त्यांच्या लग्नाविषयीं वधूपक्षाकडून बोलणें निघतांच अगोदर मुलाची संमति मिळविण्याचा उपक्रम करतात आणि मुलाकडून नकारार्थी उत्तर मिळाल्यास सोयरीकीच्या भानगडींत पडत नाहींत. विवाह कार्य घडवून आणण्यांत मुलांमुलींच्या भावी संसाराची जबाबदारी गुंतलेली असल्यामुळें अशा कामीं घाई न करतां सर्वांचीं मनें एक होतील व कोणत्याही प्रकारच्या मतभेदास किंवा त्रासास स्थान मिळणार नाहीं अशा धोरणानें लहानथोरांनीं वागावें हा खरोखर उत्तम मार्ग होय.

## साखर पुडा

हुंडा करणी वगैरे बद्दलच्या अटी वधूपक्षास कळवून त्या मान्य झाल्यावर वधूस प्रत्यक्ष पाहून तिला पसंत करण्याची वेळ प्राप्त होते. तेव्हां वरपक्षीय पुढारी मंडळी वधूच्या घरीं जाऊन किंवा एखाद्या त्रयस्थाचे घरीं कांहीं निमित्तानें आणवून तिला पाहतात. उपवर कुमारिकेस सहजच ही सर्व चळवळ आपल्या विवाहासाठीं चाललेली आहे हें समजत असल्यामुळें ती भिडस्त रीतीनें वागते. तिच्यामुखावाटे चारदोन प्रश्नांचीं उत्तरें बाहेर काढण्यास आलेल्या बायकांतील एकादी अल्पवयी विवाहित स्त्री प्रयत्न करते. रूपरंगाचें निरीक्षण करून मुलगी सामान्यतः बरी आहे इतकी खात्री झाली म्हणजे तिच्या हातीं मिठाईचा पुडा देण्याची कांहीं ठिकाणीं चाल आहे. या पुड्याला साखरपुडा असें म्हणतात. मुलीला पाहण्यासाठीं वरपक्षीयांस एकदम घरीं बोलविण्याचें धाडस सर्वच वधूपक्षीय लोक करीत नाहींत. तसेंच वधूस पाहण्यासाठीं मंडळी येणार आहे ही गोष्ट देखील विशेष कोणास कळवीत नसतात. कारण सर्व गोष्टी ठरून मुलगीच नापसंत झाली ही गोष्ट जाहीर होणें वधूपक्षीयांस केव्हांही मान्य नसते. तेव्हां वधूस पाहण्यासाठीं खास वरपक्षीयांस पाचारण करण्यापूर्वीं ती त्यांच्या मित्रांच्या नजरेस पाडून तिच्या विषयीं थोडीबहुत माहिती

अगोदरच वराकडील लोकांस पोंहचेल असें करतात. शिवाय फोटोग्राफ दाखवून व मुलीच्या रूपरंगाबद्दल वगैरे यथायोग्य वर्णन देऊन मुलगी पसंत होण्याजोगी असल्यास मात्र साखरपुड्यापर्यंत मजल येते.

हल्लीं मुलांमुलींच्या लग्नाचें वय वाढलें असल्यामुळें वरांचे आईबाप मुलींस पसंत करण्याचें काम बहुधा वरांवरच सोंपवीत असतात. कारण वडील जनांस पसंत झालेली मुलगी चालू शतकांतील नवनवलकथा व नाटकें वाचणाऱ्या तरुणांस पसंत होईल किंवा नाहीं याबद्दल ते साशंक असतात. तेव्हां आपल्या विवाहास योग्य झालेल्या मुलास त्याच्या विशेष सलगीच्या मित्रामार्फत लग्नाची गोष्ट कळवून भावी वधूस त्याच्या दृष्टीस घालणें व त्याची संमति मिळविणें हीं कामें अगोदर उरकण्याची पाळी आजकाल बहुतेक वडिल माणसांवर आलेली आहे. मुलगी पसंत करण्यापुरती जबाबदारी हल्लींचे सुशिक्षित वर जरी आपल्यावर घेतात व आपल्या वडिलांच्या अनेक मतांस व विचारांस संमति देण्यास तयार नसतात तरी हुंड्याच्या बाबींत मात्र आपल्या विचाराचा किंवा मताचा कांहीं एक उपयोग न करतां सर्वथैव आपल्या वडिलांची इच्छा पूर्णत्वास जाईल असेंच धोरण ठेवतात ! असें करणें स्वार्थाच्या दृष्टीनें तरी बरें आहे इतकें ते जाणतात ! असो. मुलीच्या घरीं जाऊन तिला पसंत करण्याची वयांत आलेल्या वरास संधि प्राप्त झाल्यास तो एकदोन तरुण मित्रांस व त्यांच्या पत्नींस घेऊन नेमलेल्या वेळीं वधूच्या घरीं जातो. तेथें मुलीकडून वाचवून घेणें व अन्य रीतीनें तिच्या बुद्धिमत्तेची परीक्षा घेणें हें काम कांहीं वेळ चालतें. आजकाल मुली देखील पूर्वीपेक्षां धीट होत चालल्या असून आपली योग्यता सर्व प्रकारें प्रस्थापित करण्यास मागें पुढें पहात नाहींत, इतकेंच नव्हेतर, आपणासाठीं नियोजित वर अमुक आहे हें अगोदर समजतांच उपायानें त्यास पाहून व त्याच्या विषयीं आपल्या मैत्रिणीकडून माहिती मिळवून आपणास असा पति पसंत नसल्यास आपली नापसंती आपल्या आईच्या किंवा बंधूच्या कानावर घालण्यास कमी करीत नाहींत.नवरा मुलगा घरीं आल्यावर त्याची संमति मिळविण्यासाठीं आपल्या शिवण कामाचें व विणकामाचें प्रदर्शन करणें, हार्मोनियम वाजवून दाखविणें, कधीं कधीं एकादें गाणें म्हणून दाखविणें या गोष्टी धीट मुली मोठ्या उमेदीनें करतात. आलेल्या मंडळीपुढें फराळाचें ताट व चहाचे पेले नेऊन ठेवण्याचें कामही भावी वधूकडेच असतें. तसें केल्यानें ती आयती वराच्या नजरेस पडते. हा सर्व विधि आटोपल्यावर बिचाऱ्या मुलीला साखरपुड्याचें वक्षीस मिळतें. कित्येक ठिकाणीं बर्फीचीं ताटें परस्पर रवाना होतात. मात्र त्या वेळेपासून धाकटीं भावंडें व शेजारच्या मैत्रिणी अनेक परीनें तिची थट्टा मस्करी करून लवकर होणाऱ्या विवाहाची तिला घडोघडी आठवण देत असतात. लांबच्या पल्ल्यावर असलेल्या मुलांमुलींचीं लग्नें प्रत्यक्ष एकमेकांस पाहून न जुळवितां पत्रव्यवहारानें व तसबिरींच्या साधनानें जुळविण्याची पद्धतिही प्रचलित आहे.

## सोयरीक.

अशारीतीनें मुलांस पसंत केल्यावर सोयरीक ठरल्याप्रमाणें होते; तथापि या सोयरिकीच्या ठरावास सामाजिक किंवा सार्वजनिक स्वरूप देण्याची चाल आमच्या समाजांत रूढ आहे. या विधीला **सोयरीक, निश्चय तांबूल** अशीं देशपरत्वें नांवें आहेत. आधीं ठरविलेल्या सुमुहुर्तावर वधूपक्षाकडील मंडळी उपाध्यक्ष व निवडक इष्टमित्रांसह वराच्या घरीं जाऊन घरच्या मुख्य दिवाणखान्यांत आधींच मांडून ठेवलेल्या सत्रंजीवर बसतात. वरपक्षाकडील कांहीं मंडळीही या प्रसंगीं हजर असते. तेथें सोयरीक ठरल्याबद्दल योग्य शब्दांत उपाध्याय कळवितात. नंतर या आनंदाप्रीत्यर्थ जमलेल्या मंडळीस बरफी किंवा साखर वांटण्याचा संप्रदाय आहे.त्याचप्रमाणें वधूगृहींदेखील बरफी किंवा साखर व फुलें आणि साडी व एकादा दागिना पाठविण्याची देशपरत्वें चाल आहे. कांहीं ठिकाणीं वराच्या येथें कन्यापक्षाकडील मंडळी भोजनास राहते व गोड वडे हें त्या वेळचें विशेष पक्वान्न सोयरीक ठरल्याचें सूचक समजतात. अर्थात गोडवडे खाणें हें सोयरीक ठरल्याची खूण आहे असें मानण्यांत येतें. याप्रमाणें सोयरीक निश्चित झाल्यावर शेजाऱ्यांस दुसऱ्या पक्षाकडून आलेली बरफी किंवा साखर वांटण्याचा प्रघात आहे. सोयरिकीच्या प्रसंगीं मंगल वाद्यें वाजविण्याची चालही कांहीं ठिकाणीं आढळते.

आमच्या मुम्बापुरस्थ बंधूंनीं विवाहकार्यास विलक्षण खर्चाचें स्वरूप प्राप्त करून दिलें असल्यामुळें लग्नकार्य करण्याविषयीं तयार झालेल्या उभय तर्फेच्या

मंडळीस आपल्या पदरीं काय शिल्लक आहे याचा विचार करण्यास मुळीं अवसरच नसतो असें दिसतें. या नगरींत आम्ही सारस्वतांनीं येऊन प्रथमतः ठाणें दिल्यावर आमचें प्रभुज्ञातीशीं विशेष दळणवळण होऊं लागलें. सहजच त्यांच्यांत रूढ असलेल्या भपकेदार थाटामाटाच्या पद्धति आम्हीं उचलल्या. लग्नविधिपेक्षां सोहळ्यांस अधिक महत्व प्राप्त झालें. याचा परिणाम किती भयंकर झाला आहे हें विषद करून सांगण्याचें प्रयोजन नाहीं. कर्जबाजारी कुटुंबें, वयांत आलेले तरुण अविवाहित मुलगे व मुली, यांच्या कडे पाहतां बुद्धिमान् व दूरदर्शी असे आमचे कित्येक मुंबापुरस्थ बंधू अनुकरणाच्या पिशाचास बळी पडून त्यांनीं स्वतःच्या संसाराचें कसें मातेरें केलें याचें नवल वाटतें. फक्त सोयरीक ठरविण्याचा विधि म्हणजेच प्रत्येक पक्षास किमान पक्षीं चार पांचशें रुपयांचा खर्च करावा लागतो. वरास रेशमी पोषाख व आंगठी, मण दोन मण बर्फी, वधूस खण (आतां खणाच्या ऐवजीं भपकेदार पोलका, व जरतारी साडी, व एक तरी झोंकदार दागिना आणि बर्फी यासाठीं अनुक्रमें वधूवरपक्षास बरीच रक्कम खर्च करावी लागते. वाद्य, पानसुपारी, अत्तर गुलाब वगैरे साधे प्रकार देखील खर्चाचे झाले असून बेंडबाजा, थाटाच्या उपहाराची व्यवस्था, यांच्या मुळें विवाहाचे कार्याचा ओनामा होतांच अमूल्य वित्ताचा दुरुपयोग होऊं लागतो. आणि कित्येकांस प्रथमतः मारवाड्याच्या पेढीचा उंबरठा झिजवून जबर व्याजानें मोठमोठ्या रकमा उसणवट घ्याव्या लागतात. त्यामुळें प्रपंचाच्या शरीराला जे घाव पडल्याप्रमाणें होतात ते कितीही प्रयत्नानें मलमपट्या बसविल्या तरी लवकर कांहीं सुधारत नाहींत. ते थोडेबहुत बरे होतात न होतात इतक्यांत दुसऱ्या मुलाचें किंवा मुलीचें लग्न करण्याची वेळ प्राप्त होते व संकटाचें गाडें तसेंच चालू राहतें. गोमांतकांतही कमी अधिक प्रमाणानें हाच प्रकार चालू असून " काप गेले पण, भोकें राहिलीं " ही स्थिति झाली आहे. अनावश्यक खर्च करण्याचे किंवा दांभिकपणानें खोट्या श्रीमंतीचा आव घालण्याचे हे दिवस नाहींत. दिवसें दिवस जीवनार्थ कलहाची धडपड विशेष तीव्र होत चालली आहे अशावेळीं दूरवर विचार करून आमच्या बंधूभगिनींनीं खोटा अभिमान सोडून दिला पाहिजे आणि आवश्यक तेच विधि शक्य तितक्या सुलभ व साध्या रीतीनें पार पाडण्याचें मनोधैर्य दाखविलें पाहिजे. असें करण्यांतच कुटुंबाचें व समाजाचें कल्याण आहे हें विसरतां नये.

## तिथिनिश्चय

सोयरीक ठरल्यावर व बर्फीचीं ताटें परस्पर रवाना झाल्यावर लवकरच तिथिनिश्चय करण्यांत येतो. बाहेर गांवीं लग्नें मुद्दाम तयार केलेल्या मंडपांत लावतात या मुळें ऋतुमानाकडे लक्ष देऊन पाऊस पडण्याचा हंगाम शक्य तितका लवकर टाळण्याची खबरदारी घेण्यांत येते. मुंबईसारख्या शहराच्या ठिकाणीं विवाह कार्य उरकण्यास आवश्यक असलेल्या जागेची उणीव भासते. यासाठीं एखाद्या महाजनवाडीचें एक दोन दिवसांचें भाडें भरून अशी वाडी मिळण्याच्या दिवशींच मुहूर्त ठरवावा लागतो. उभयपक्षांचे पुरस्कर्ते आपआपल्या सोई पाहून एक मतानें एकादा अनुकूल मुहूर्त पाहून देण्यास उपाध्यायांस किंवा ज्योतिषांस सांगतात. ज्या दिवशीं वधूला गुरूची, वराला रवीची आणि उभयतांस चंद्राची अनुकूलता असेल आणि जो दिवस पंचांगांनीं शुद्ध असून विवाहाला शुभ नक्षत्र असेल असा दिवस ज्योतिषांकडून निश्चित करण्यांत येतो. साधारणपणें पंचागांत विवाह मुहूर्त दिलेले असतात. त्यांतील एकादा सोईचा असा निवडून देणें इतकेंच काम सध्या जोशी बुवांकडे राहिलें आहे. दिवसें दिवस फल ज्योतिषावरचा विश्वास कमी होत चालला आहे ही गोष्ट जरी खरी तथापि मंगल मुहूर्त ठरविण्या पुरतें तरी ज्योतिषशास्त्र महत्वाचें होऊन राहिलें आहे. याप्रमाणें मंगल मुहूर्त म्हणून ज्या कालाविषयीं आपली भावना झालेली असते त्या मुहूर्तावर लग्नकार्य उरकून घेणें मनास प्रसन्नता आणणारें कृत्य आहे ही गोष्ट निर्विवाद होय. तथापि आजकाल त्याविषयीं जी चिकित्सा होते ती मात्र बरी नाहीं. कारण त्या योगानें मनाची प्रसन्नता कमी होते व संशयग्रस्त मनास शांति न मिळतां व्यग्रचित्तानें कार्य उरकावें लागतें.

# आमचीं देवालयें.

## लेखांक ३ रा.

## श्रीनरसिंह

लेखक रा. रा. यशवंत सूर्यराव सरदेसाई

आजचा तिसरा लेखांक श्रीनरसिंह देवस्थानविषयक होय. श्रीमहालसा देवीचा निरोप घेऊन आपण निघालों म्हणजे पुढें पंधरा मिनिटांच्या रस्त्यावर आपणास हें देवस्थान आढळतें. कुंडईवरून येऊन जो रस्ता नागेशीं–कवळ्याकडे जातो, त्याच रस्त्यानें आपण यावें, म्हणजे वेलींगच्या घांटीच्या पायथ्याशीं उजव्या हाताला आपणास एक आडवा रस्ता लागतो तोच श्रीनरसिंह देवस्थानचा रस्ता होय. या जागेस ( वेलींग ) असें म्हणतात. आजच्या लेखांत या देवस्थानची माहिती देत आहों.

पण तत्पूर्वीं एका बावतींत, किंचित् विषयांतर करून खुलासा करणें भाग आहे. आमचा पहिला लेखांक प्रसिद्ध झाल्यावर दहा महिन्यांनीं दुसरा प्रसिद्ध झाला. आणि दोन वर्षांनीं आतां हा तिसरा प्रसिद्ध होत आहे; तेव्हां या लेखनशिथिलतेवरून —किंवा प्रवासांतील आळसावरून म्हणा—पहातां व सगळ्या देवस्थानची संख्या लक्षांत घेतां हें सदर लेखकाच्या जन्मासच पुरणार कीं काय अशी शंका वाचकांना येईल; आणि ती साहजिकही आहे. मंगेशींहून म्हाडदोळास जाण्यास, म्हणजे दहा मिनिटांच्या रस्त्यास दहा महिने घेतले, पुढें वेलींग जवळच असतां त्याला इतका कालावधि लागला तेव्हां म्हाडदोळची घांटी चढून दीड तासाचा रस्ता आक्रमून नागेशीं पोंचण्यास प्रवाशाला किती वर्षें लागतील ? आंकडेशास्त्रांतील कित्येक वाचकांनीं त्रैराशिक मांडून हें काम बऱ्याच वर्षांवर गेलें, असाही अंदाज बांधला असेल, प्रवाशाच्या या गोगल गाईसारख्या चालीचा प्रत्येकांना कंटाळाही आला असेल, व शंका उकरून काढण्याची संवय असलेल्या कित्येकांनीं प्रवासी मोहबद्ध होऊन महालसेच्या पायापाशीं अडकला गेला असाही तर्क केला असेल; परंतु माझे प्रेमळ वाचक हो ! दिरंगाई होण्याचें कारण यांपैकीं निराळें असून तें प्रस्तुत लेखकांचें शारिरिक व मानसिक अस्वास्थ्य हेंच होय ! देवस्थानची माहिती आमचे वाचक आस्थापूर्वक वाचीत आहेत असें कळून समाधानाबरोबर जबाबदारीही वाटते; पण ती पतकरून आम्हीं त्यांना अशी विनंती करतों कीं, त्यांनीं ती अवश्य वाचावी. ज्या गोष्टींत आपलें व आपल्या वंशजांचें कल्याण गुंतून राहिलेलें आहे त्याकडे दुर्लक्ष करून कसें चालेल ? आपल्या पूज्यतम पूर्वजांनीं नवीन प्रांतांत वसाहत करूं जातांना ज्या कुलदेवांच्या मूर्तींना दुरावूं नये म्हणून सोबत घेतलें, आपल्यांतील थोर महात्म्यांनीं त्यांचीं मंदिरें बांधून भक्तीनें पूजाअर्चा करण्यांत काळ घालविला, आपल्यांतील अनेक पुण्य पुरुषांनीं इनामें वगैरे देवून ज्या देवस्थानांला संस्थानचें स्वरूप आणलें, म्यानांतून तरवार उपसतांना व कानावरून लेखणी काढतांना ‘ शेणवी वीर व मुत्सद्दी ’ यांना ज्या कुलदेवतांचें स्मरण यशप्रद झालें, नारोरामांच्या हांकेस, रामचंद्रबावांच्या ‘पावली’स, जिवबादादांच्या नमस्कारास व बाळोबा तात्यांच्या स्मरणास ज्यांनीं उडी घातली, ज्यांच्या प्रसादानें, मराठी राज्यांत इतरांबरोबर सारस्वतांनींही आपले घोडे नाचविले, फिरंग्याच्या धामधुमींत आपल्यां सर्वस्वावर पाणी सोडून व स्थानांतर करून आमच्या पूर्वजांनीं ज्यांच्या मूर्तींचें संरक्षण केलें व त्यांची पुनर्स्थापना करून त्यांना पूर्व स्वरूप प्राप्त करून दिलें, त्या आपल्या परंपरागत कुलदेवांच्या ठिकाणीं उदासीनता धरणें म्हणजे आपल्या महत्ववृद्धीला तिलांजलीच देणें असें कोण म्हणणार नाहीं ? ज्यांना आपल्या पूर्वजांविषयीं पूज्यभाव आहे, त्यांना या त्यांच्या देवतांचा कसा अभिमान नसणार ? आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचे पोवाडे गातांना, त्यांच्या

श्रद्धेला पावणाऱ्या व म्हणूनच कागदोपत्रीं हरघडी ज्यांचा उल्लेख झालेला आढळतो त्या देवतांचें स्मरण कोणास होणार नाहीं ? आणि सगळ्यांच्या हृदयांत ही भक्तीची भावना कशी रुतून बसली आहे याचें प्रत्यंतर वार्षिक उत्सवांच्या वेळीं दिसून येतें. हिन्दुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून रहाणाऱ्या धर्माभिमानी व श्रद्धाळू लोकांत या आपल्या कुलदेवतांसंबंधानें किती निष्ठा आहे, हें दर्शनार्थ येणाऱ्या लोकसमूहावरून कळून येतें. निरनिराळ्या मतांचे 'समाज', पृथक पृथक पंथांच्या मंडळ्या व अनेक मार्गांचे गुरुदेव ठिकठिकाणीं अस्तित्वांत आले असतां आपल्या कुलदेवावरील—पूर्वजांनीं संस्थापित केलेल्या मूर्तींवरील–लोकश्रद्धा ढळलेली दिसत नाहीं, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. पूर्वजांच्या अभिमानावरोबर, कुलदेवांचाही श्रद्धाभिमान असणें हें भूषणावह तसेंच कल्याणकारकही होय यांत शंका नाहीं. असो. अशा देवतांची ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध होऊन ती सर्वांना समजावी, त्याचप्रमाणें सद्यःप्रकारही त्यांच्या नजरेसमोर यावा व त्यायोगें देवस्थानच्या इष्ट सुधारणेकडे त्यांचें लक्ष्य वेधावें याच सद्धेतूनें ही लेखमाला चालू केली असून तिचें स्वरूप वर्णनात्मक व टीकापर असें ठेवलेलें आहे; आणि यासाठीं सगळ्या गोष्टींचा साग्र विचार करून व साधार व समक्ष अशी माहिती मिळवून नंतर ती प्रसिद्ध करणेंच बरोबर असल्यानें थोडा फार उशीर झाल्यास वाचकांनीं क्षमा करावी. कच्च्या शिजवणीपेक्षां पक्क्या अन्नांतच गोडी असते, हें वाचकांना ठाऊक असल्यानें ते रागावणार नाहींत अशी आमची खात्री आहे.

श्रीनरसिंहाचें देवालय फिरंग्याच्या धर्मक्रांतीपूर्वी सासष्ट प्रांतांतील शंखावली नामक गांवीं होतें. तेथून त्याचें स्थलांतर सध्यांचे जागेवर झालें. शंखावलि अगर आतांच्या सांखवाळ—गांवांत पूर्वी श्री विजयादुर्गा व श्री सांतेरी अशा दोन देवतांचीं देवालयें होतीं व सात गोत्रांचे ब्राह्मण त्यांचे उपासक होते. श्रीनरसिंह देवता तेथें मागाहून अस्तित्वांत आली. तिची थोडक्यांत हकिगत अशी:—

कर्नाटक प्रांतांतील नायक नांवाचा एक कर्मनिष्ठ ब्राह्मण फिरत फिरत सांकवाळ येथें आला व हें ठिकाण रम्य व सुखावह वाटल्यावरून येथें कांहीं दिवस मुक्काम करावा असें त्याच्या मनानें घेतलें. त्याजवरोवर एक शालिग्राम होता व त्या शालिग्रामाची नरसिंह देवतेच्या भावनेनें तो नित्य पूजा अर्चा करी. ब्राह्मणाच्या ह्या कर्मनिष्ठेमुळें आसपासच्या गांवांत त्यांची प्रसिद्धि झाली; ती इतकी कीं, त्याच्या सत्वबुद्धीवर विश्वास ठेवून लोक आपले कज्जे योग्य निर्णय होण्याकरतां त्याकडे नेऊं लागले. याच पद्धतीस अनुसरून, सांकवाळकर व कुडथाळकर यांमध्यें गांवचे सीमेसंबंधानें कित्येक वर्षें कलागत लागली होती, ती या परकीय मध्यस्थ्याकडून दिलेला न्याय मान्य करून घेऊन मिटवून टाकावी असें योजून उभय 'ग्रामस्थांनीं' सदहू ब्राह्मण यांनां तशी विनंती केली. ब्राह्मण या गोष्टीस मान्य झाला, व त्यानें तो तंटा तोडला. पण यांत आपलें नुकसान झालें असें वाटून कुडथाळकरांना चीड आली व हा ब्राह्मण सांकवाळकरांना सामील असावा असाही त्यांना संशय आला. याचा सूड उगविण्याकरतां म्हणून ब्राह्मण झोंपीं गेला असतां त्याचें देवतार्चन तलावांत फेंकून देऊन ते चालते झाले. ब्राह्मण जागा झाल्यावर हा प्रकार त्याच्या नजरेस आला. तो पराकाष्टेचा निग्रही व तपोबली होता. देवतेच्या पूजेशिवाय अन्न ग्रहण न करण्याच्या नियमाप्रमाणें त्यानें प्रायोपवेशनाचा मार्ग स्वीकारला. त्याचा त्रागा पाहून सांकवाळकर घाबरून गेले. त्यांनीं तलावांत माणसें घातलीं व पुष्कळ खटपट करून सर्व देवतार्चनाच्या साहित्यासह तलावांतून शालिग्राम बाहेर काढला. याच समयीं सवाहात लांबीचें लिंगाकृति एक पाषाणही त्यांना सांपडलें. या पाषाणाला स्तंभाची कल्पना करून त्यावर ब्राह्मणानें शालीग्रामाची स्थापना केली. नंतर गांवच्या लोकांनीं या शालिग्रामाची स्थापना करून त्याचें देऊळ बांधलें व तें दैवत पूर्णपणें आपल्यांत मिळवून घेतलें. त्या ब्राम्हणास इतर दोन्ही देवस्थानांत महाजनकीचा अधिकार दिला आणि अशा रितीनें त्याच्याविषयींची आपली पूज्य बुद्धी व्यक्त केली. सदहू ब्राम्हण हाच पुढें 'शंखावली' कर या नांवानें प्रसिद्धीला आला व पुढें विवाह वगैरे करून घेऊन येथेंच तो स्थायिक झाला.

वरील गोष्टीवरून श्रीनरसिंहाचें देवालय शंखावलीस मागाहून अस्तित्वांत आलें व वैष्णवमताच्या कल्पनेनुसार लिंगाकृती पाषाणास स्तंभाची संज्ञा मिळून तें

नरसिंहरूपी दैवत बनलें हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. फिरंग्यांच्या धामधुमींत मूर्तींचें स्थानांतर होतांना तीन मूर्ती तीन ठिकाणीं नेण्यांत आल्या. श्रीसांतेर गोठण येथें, श्रीविजयादुर्गा केरी येथें व श्रीनरसिंह वेलींग येथें. अशा प्रकारें या दैवतांची त्रिस्थळी यात्रा झाली. केरीस असलेल्या विजयादुर्गेस वैद्य आडनावांचे पद्ये ब्राम्हणही भजतात, व त्यांपैकीं केरचें सुप्रसिद्ध भिषग्वरांचें घराणें होय.

श्रीनरसिंह देवाच्या महाजनांचा परिवार मोठा नाहीं; तथापि त्यांनीं देवस्थानास चांगलें स्वरूप आणलें आहे. चौघडा, काश्मीरी पाषाणाचा चौक, चांदीचा दरवाजा, चांदीची पालखी, सगळे प्रकार इतर देवस्थानाप्रमाणें केले आहेत. श्रीमंतांच्या डौलाबरोबर शेजारच्या गरिबाची हौस वाढून त्यालाही कसा भपका करावा लागतो याचें प्रत्यंतर या देवस्थानांत चांगलेंच मिळतें. या देवस्थानास ऊर्जितदशा येण्यास वेलींगच्या कलावंतीही बऱ्याच कारण आहेत; या देवदासींनीं मोठमोठ्या देणग्या दिल्या आहेत, आणि अशा रितीनें आपल्या दरोब्यांवर औदार्याची मखलाशी चढविली आहे. अलीकडे सरस्वती नांवाच्या एक कलांवतीनें एक मराठी शाळा ठेवली असून तिचा खर्च ती स्वतःच चालविते असें समजतें. हें खरें असेल तर सदहू बाईनें इतर देवस्थानच्या लोकांस हें उदाहरणच घालून दिलें असें ह्मटलें पाहिजे. कुठल्याही मासिकांत 'हीन जातीच्या प्रश्नाबद्दल' कळकळ दाखवून न चमकतां अगर कसलीही जाहिरात न फडकवितां हें सत्कार्य तिनें चालू केलें हें कौतुकास्पद होय. शाळेच्या अनावरण विधीच्या नांवाखालीं बड्या लोकांच्या स्वागतांत शेंकडो रुपयांचा फन्ना उडवावा व शाळेच्या बारशाला जेवून हात वाळतात न वाळतात तोंच तिचा बारावा झालेला दिसावा, या निर्लज्जस्थितीपेक्षां गाजावाजा न करतां चाललेलें हें विद्यादानाचें कार्य कोणास समाधान उत्पन्न करणार नाहीं ? वेलिंग येथें चाललेलें 'सरस्वति-कार्य' चिरकाल टिको व तेथील विद्यालयांतून सुविद्य व सदाचारपूर्ण अशा सरस्वती बाहेर पडोत असें आम्ही इच्छितों. असो,

श्रीनरसिंहाचें देवालय लहानच पण टूमदार, जागा प्रशस्त व हवाशीर, पाणी स्वच्छ व आरोग्यवर्धक असून एकंदरींत स्थल आल्हादजनक आहे. हें स्थळ लहानच खरें, पण वर्णन करावयास लागलें तर पुष्कळच सांगतां येईल, आणि आपणास तितका अवकाश नाहीं तेव्हां श्रीनरसिंहासमोर साष्टांग नमस्कार घालून त्याचा प्रसाद घेऊं व वाचकांना नागेशीं भेटण्याचें वचन देऊन त्यांचाही तात्पुरता निरोप घेऊं.

---

## विचार तरंग.

लेखक—" प्रतोद "

### तेलंगनिधनतिथि.

म्हणे यंदां नवी टूम काढली. ठरिव परिघ ओलंडला, विस्तीर्ण ध्येय ठेवलें. ४०० स्पेशल आमंत्रणें पाठविलीं, ५०० जणांना तोंडीं सांगितलें व जाहीर खबरही दिली, व " लाडांच्या म्हणण्याप्रमाणें स्वतंत्र विचाराच्या बाणेदार व विद्वान **अळतेकरांस** व्याख्यान द्यावयास लावलें, प्रसिद्ध सरस्वतीभक्त **पाध्यांस** अध्यक्ष नेमलें-होय—हें सर्व केलेंत—कबूल-पण होती का मंडळी एका शेंकड्याच्या वर ? मग ? रडा आतां मुळुमुळू. खा मनांतल्या मनांत चुरमुरे. चार हातांवरचे आम्ही आद्य–कुडाळदेशकर नव्हत हो–( आद्य वसाहतवाले. ) होता का आमच्यांतील तेथें कुणी ? आठ हातांवरचें आमच्या धाकट्या बंधूचें कुटुंब. आलें होतें का कुणी तिकडचें ? हम रस्त्यावरील मोहनाबाईजवळ व खुद्द तिच्या सान्निध्यांत राहणारे, शिक्षणार्थी ह्मणणारे, आमची प्रगति करणारे, व सहकारित्वास पाठिंबा देणारे आमचे छोटे भाई ! अनामिके पलीकडे त्यांजकडील तरी होता का कुणी ? म्हणे आमच्यांत

तीन डझन, ज्ञातीची उन्नति करणाऱ्या संस्था आहेत. मग यांतील ते ज्ञात्युन्नति व पर्यायें राष्ट्रोन्नति करणारे वीरमणी दडाले तरी कुठें त्यादिवशीं ! नव्हतें कां त्यांना माहित आज तेलंगांची पुण्यतिथि आहे म्हणून? मग ? हरएक प्रसंगीं-वेळीं अवेळीं, स्वज्ञातीच्या यशोदुंदुभीचा डंका वाजवितांना ज्या तेलंगांचें नांव हे प्रेमानें (-खरेंच का पण प्रेमानें !) उच्चारतात, त्या तेलंगांबद्दलचा यांचा आदर गेला तरी कुठें ? कुठें ते आमचे तरुण पदवीधर ! "कुठें ते वीर कुठें समशेर." वाहवारे पुण्यतिथि ! वाहवारे ज्ञात्युन्नति ! बा सारस्वत समाजा ? बघ, डोळे उघडून जरा नीट बघचारी दिशांकडे जरा लक्ष दे. मग तुझ्याकडे लक्ष दे व दोन अश्रु बिंदु गाळ !

उदयोन्मुख मित्र मंडळा ! कुणासाठीं ही तुझी धडपड ? कुणाच्या प्रगतीसाठीं, कुणाच्या सुखासाठीं ! बा बंधो ! जोंपर्यंत या बडेजावींतच कालक्रमण करणाऱ्या अमीरउमरावांत, तोंडानें तत्वें प्रतिपादन करून क्रियेच्या नांवानें शून्य असणाऱ्या पदवीधरांत आत्मोन्नतीबद्दल अंतःकरणांत खरीखुरी जाणीव उत्पन्न झाली नाहीं, गुलहौशी मंडळीचा हातांतील पानांचा व गादी लोडांचा मोह सुटला नाहीं, चहाची लज्जत जिभेवरून हलली नाहीं, तोंपर्यंत तुझे हे प्रयत्न—मग ते कितीही कळकळीचे अगर तळमळीचे असोत—व्यर्थ आहेत.

**सम्मेलन** ※ ※ ※

बा मंडळा !

सर्व बंधू गुढीपाडव्याच्या शुभदिवशीं एकत्र व्हावेत, परस्परांत विचारविनिमय व्हावा, त्यांचें मंगल मीलन व्हावें व तें ज्ञातीच्या उन्नतीस कारणीभूत व्हावें ही शुभ मनीषा मनांत धरून तूं गतसालीं सर्वांस प्रेमानें बोलावलेंस, पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्यास, त्यांस खास आमंत्रण दिलेंस, ९०० खास आमंत्रणपत्रिका रवाना केल्यास व जेमतेम ३०० मंडळी जमतांच दुभाषांनीं गाइलेल्या पूर्वजांच्या यशोदुंदुभीनें बेहोष होऊन श्रीशंकरासारखें तांडवनृत्य केलेंस, पण बेट्या, आमच्या आद्यांचा पराक्रम तुला काय माहीत ! त्यांनीं तुझा हर्षवायू एकाक्षणांत उतरविलाच. विभक्तपणाचा डंका वाजविला व आद्यांचा जरीपटका केसरींत फडकाविला. तूं जरी मेरू पर्वताप्रमाणें अढळ राहिलास, तरी पण तुला अंतर्यामीं कांहींच वेदना का झाल्या नसतील ? बेळगांव मुक्कामीं संयुक्ततेचें निशाण ज्यांनीं फडकाविलें, त्यांतील कैकजणांच्या मुखांतून उष्ण श्वास निघालेच नसतील का ? मग या बेजबाबदार कृतीस जबाबदार कोण ? त्यांतील तडीतापसी-गोसावी, दोन्ही डगरींवर हात ठेवणारे कायदेपटु पंडित, उन्नतीच्या लांबच लांब बाता झोंकणारें त्यांतील पदवीधर मंडळ, कीं एके बाजूकडेसच झुकत चाललेली त्यांच्यांतील अज्ञ व भोळी जनता ? आहे का कुणी विचारपूस करता ? देईल का कुणी याचें उत्तर ? मित्रमंडळा ? पहा बाबा हा पूर्वेतिहास ! आणि कर कांहीं उपायचिंतन !

**ज्ञातीचा इतिहास** × × ×

ज्ञातीचा पूर्वेतिहास सुसंबद्ध व साधार लिहिला जावा म्हणून तूं तुझ्या दरिद्री संसारांतील आणीबाणीच्या वेळीं म्हणून राखून ठेवलेले १०० रुपये जाहिर केलेस. इतिहासाच्या विशेष योग्यतेप्रमाणें ही रक्कम वाढविण्याची इच्छा दर्शविलीस. त्याच्याच जोडीला लाड-दुभाषांनीं एक पुरवणी जोडून या इतिहासाच्या साधनांची मागणी केली. ज्ञातिसंस्थांकडे त्यांच्या रिपोर्टांच्या प्रती मागितल्या. आला का एकादा चिटोरा तुमच्याकडे किंवा लाड दुभाषांकडे ? पाठविले का कुणी आठवणीने आपल्या संस्थांचें रिपोर्ट ? मग कसली तुमची उन्नति, कसले तुम्ही सरस्वतिभक्त नि कसलें काय ! येथून तेथून सारा दिखाऊ प्रकार !

**वाङ्मयकार्य** × × ×

बा मंडळा ! केवळ तेलंगांची निधनतिथि पाळून तुला स्वस्थ बसवलें नाहीं तर त्या थोर पुढाऱ्याचें कार्य जगापुढें यावें, एकोणीसाव्या शतकाच्या द्वितोयार्धांत राष्ट्राच्या प्रकृतीचें निदान बरोबर ठरवून त्याच्या उत्कर्षास आवश्यक व पोषक अशा अनेक चळवळींत तत्कालिन मेथा, वड्डिन बरोबर ज्यांनीं प्रामुख्यानें कार्य केलें, स्वदेशीय व परदेशीय विद्वानांनीं, प्रसिद्ध पुरुषांनीं ज्याच्या अगाध ज्ञानाबद्दल, असामान्य वक्तृत्वाबद्दल मोठ्या प्रेमानें प्रशंसापूर्ण उद्गार काढले, त्या पुरुषाबद्दल आपलाच नव्हे तर साऱ्या भरत खंडाचा आदर व्यक्त करण्याकरितां व भावी पिढीस जागृत करण्याकरितां तूं त्यांचे लेख व व्याख्यानें अल्पमोल ठेवून व पदराला खार लावून प्रसिद्ध केलींस व "क्लबाचें अस्तित्व केवळ चैनीकरितां नव्हे" हें ही

नरसिंहरूपी दैवत बनलें हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. फिरंग्यांच्या धामधुमींत मूर्तींचें स्थानांतर होतांना तीन मूर्ती तीन ठिकाणीं नेण्यांत आल्या. श्रीसांतेर गोठण येथें, श्रीविजयादुर्गा केरी येथें व श्रीनरसिंह वेलींग येथें. अशा प्रकारें या दैवतांची त्रिस्थळी यात्रा झाली. केरीस असलेल्या विजयादुर्गेस वैद्य आडनावांचे पद्ये ब्राम्हणही भजतात, व त्यांपैकीं केरचें सुप्रसिद्ध भिषग्वरांचें घराणें होय.

श्रीनरसिंह देवाच्या महाजनांचा परिवार मोठा नाहीं; तथापि त्यांनीं देवस्थानास चांगलें स्वरूप आणलें आहे. चौघडा, काश्मीरी पाषाणाचा चौक, चांदीचा दरवाजा, चांदीची पालखी, सगळे प्रकार इतर देवस्थानाप्रमाणें केले आहेत. श्रीमंतांच्या डौलाबरोबर शेजारच्या गरिबाची हौस वाढून त्यालाही कसा भपका करावा लागतो याचें प्रत्यंतर या देवस्थानांत चांगलेंच मिळतें. या देवस्थानास ऊर्जितदशा येण्यास वेलींगच्या कलावंतीही बऱ्याच कारण आहेत; या देवदासींनीं मोठमोठ्या देणग्या दिल्या आहेत, आणि अशा रितीनें आपल्या दरोब्यांवर औदार्याची मखलाशी चढविली आहे. अलीकडे सरस्वती नांवाच्या एक कलांवतीनें एक मराठी शाळा ठेवली असून तिचा खर्च ती स्वतःच चालविते असें समजतें. हें खरें असेल तर सदहू बाईनें इतर देवस्थानच्या लोकांस हें उदाहरणच घालून दिलें असें म्हटलें पाहिजे. कुठल्याही मासिकांत 'हीन जातीच्या प्रश्नाबद्दल' कळकळ दाखवून न चमकतां अगर कसलीही जाहिरात न फडकवितां हें सत्कार्य तिनें चालू केलें हें कौतुकास्पद होय. शाळेच्या अनावरण विधीच्या नांवाखालीं बड्या लोकांच्या स्वागतांत शेंकडो रुपयांचा फन्ना उडवावा व शाळेच्या बारशाला जेवून हात वाळतात न वाळतात तोंच तिचा बारावा झालेला दिसावा, या निर्लज्जस्थितीपेक्षां गाजावाजा न करतां चाललेलें हें विद्यादानाचें कार्य कोणास समाधान उत्पन्न करणार नाहीं ? वेलिंग येथें चाललेलें 'सरस्वति-कार्य' चिरकाल टिको व तेथील विद्यालयांतून सुविद्य व सदाचारपूर्ण अशा सरस्वती बाहेर पडोत असें आम्ही इच्छितों. असो,

श्रीनरसिंहाचें देवालय लहानच पण टूमदार, जागा प्रशस्त व हवाशीर, पाणी स्वच्छ व आरोग्यवर्धक असून एकंदरींत स्थल आल्हादजनक आहे. हें स्थळ लहानच खरें, पण वर्णन करावयास लागलें तर पुष्कळच सांगतां येईल, आणि आपणास तितका अवकाश नाहीं तेव्हां श्रीनरसिंहासमोर साष्टांग नमस्कार घालून त्याचा प्रसाद घेऊं व वाचकांना नागेशीं भेटण्याचें वचन देऊन त्यांचाही तात्पुरता निरोप घेऊं.

---

# विचार तरंग.

लेखक—" प्रतोद "

मासिक

### तेलंगनिधनतिथि.

म्हणे यंदां नवी टूम काढली. ठरिव परिघ ओलंडला, विस्तीर्ण ध्येय ठेवलें. ४०० स्पेशल आमंत्रणें पाठविलीं, ५०० जणांना तोंडीं सांगितलें व जाहीर खबरही दिली, व " लाडांच्या म्हणण्याप्रमाणें स्वतंत्र विचाराच्या बाणेदार व विद्वान **अळतेकरांस** व्याख्यान द्यावयास लावलें, प्रसिद्ध सरस्वतीभक्त **पाध्यांस** अध्यक्ष नेमलें-होय—हें सर्व केलेंत—कबूल-पण होती का मंडळी एका शेंकड्याच्या वर ? मग ? रडा आतां मुळुमुळू. खा मनांतल्या मनांत चुरमुरे. चार हातांवरचे आम्ही आद्य–कुडाळदेशकर नव्हत हो–( आद्य वसाहतवाले. ) होता का आमच्यांतील तेथें कुणी ? आठ हातांवरचें आमच्या धाकट्या बंधूचें कुटुंब. आलें होतें का कुणी तिकडचें ? हम रस्त्यावरील मोहनाबाईजवळ व खुद्द तिच्या सान्निध्यांत राहणारे, शिक्षणार्थ झटणारे, आमची प्रगति करणारे, व सहकारित्वास पाठिंबा देणारे आमचे छोटे भाई ! अनामिके पलीकडे त्यांजकडील तरी होता का कुणी ? म्हणे आमच्यांत

तीन डझन, ज्ञातीची उन्नति करणाऱ्या संस्था आहेत. मग यांतील ते ज्ञात्युन्नति व पर्यायें राष्ट्रोन्नति करणारे वीरमणी दडाले तरी कुठें त्यादिवशीं ! नव्हतें का त्यांना माहित आज तेलंगांची पुण्यतिथि आहे म्हणून ? मग ? हरएक प्रसंगीं–वेळीं अवेळीं, स्वज्ञातीच्या यशो दुंदुभींचा डंका वाजवितांना ज्या तेलंगांचें नांव हे प्रेमानें (–खरेंच का पण प्रेमानें ! ) उच्चारतात, त्या तेलंगांबद्दलचा यांचा आदर गेला तरी कुठें ? कुठें ते आमचे तरुण पदवीधर ! "कुठें ते वीर कुठें समशेर." वाहवारे पुण्यतिथि ! वाहवारे ज्ञात्युन्नति ! बा सारस्वत समाजा ? बघ, डोळे उघडून जरा नीट बघचारी दिशांकडे जरा लक्ष दे. मग तुझ्याकडे लक्ष दे व दोन अश्रु बिंदु गाळ !

उदयोन्मुख मित्र मंडळा ! कुणासाठीं ही तुझी धडपड ? कुणाच्या प्रगतीसाठीं, कुणाच्या सुखासाठीं ! बा बंधो ! जोंपर्यंत या बडेजावींतच कालक्रमण करणाऱ्या अमीरउमरावांत, तोंडानें तत्वें प्रतिपादन करून क्रियेच्या नांवानें शून्य असणाऱ्या पदवीधरांत आत्मोन्नतीबद्दल अंतःकरणांत खरीखुरी जाणीव उत्पन्न झाली नाहीं, गुलहौशी मंडळीचा हातांतील पानांचा व गादी लोडांचा मोह सुटला नाहीं, चहाची लज्जत जिभेवरून हलली नाहीं, तोंपर्यंत तुझे हे प्रयत्न—मग ते कितीही कळकळीचे अगर तळमळीचे असोत—व्यर्थ आहेत.

**सम्मेलन** * * *

बा मंडळा !

सर्व बंधू गुढीपाडव्याच्या शुभदिवशीं एकत्र व्हावेत, परस्परांत विचारविनिमय व्हावा, त्यांचें मंगल मीलन व्हावें व तें ज्ञातीच्या उन्नतीस कारणीभूत व्हावें ही शुभ मनीषा मनांत धरून तूं गतसालीं सर्वांस प्रेमानें बोलावलेंस, पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्यास, त्यांस खास आमंत्रण दिलेंस, ९०० खास आमंत्रणीचिठ्या रवाना केल्यास व जेमतेम ३०० मंडळी जमतांच दुभाषांनीं गाइलेल्या पूर्वजांच्या यशोदुंदुभीनें बेहोष होऊन श्रीशंकरासारखें तांडवनृत्य केलेंस, पण बेट्या, आमच्या आर्यांचा पराक्रम तुला काय माहीत ! त्यांनीं तुझा हर्षवायू एकाक्षणांत उतरविलाच. विभक्तपणाचा डंका वाजविला व आर्यांचा जरीपटका केसरींत फडकाविला. तूं जरी मेरू पर्वताप्रमाणें अढळ राहिलास, तरी पण तुला अंतर्यामीं कांहींच वेदना का झाल्या नसतील ? बेळगांव मुक्कामीं संयुक्ततेचें निशाण ज्यांनीं फडकाविलें, त्यांतील कैकजणांच्या मुखांतून उष्ण श्वास निघालेच नसतील का ? मग या बेजबाबदार कृतीस जबाबदार कोण ? त्यांतील तडीतापसी-गोसावी, दोन्ही डगरीवर हात ठेवणारे कायदेपट्टु पंडित, उन्नतीच्या लांबच लांब बाता झोंकणारें त्यांतील पदवीधर मंडळ, कीं एके बाजूकडेसच झुकत चाललेली त्यांच्यांतील अज्ञ व भोळी जनता ? आहे का कुणी विचारपूस करता ? देईल का कुणी याचें उत्तर ? मित्रमंडळा ? पहा बाबा हा पूर्वेतिहास ! आणि कर कांहीं उपायचिंतन !

**ज्ञातीचा इतिहास** × × ×

ज्ञातीचा पूर्वेतिहास सुसंबद्ध व साधार लिहिला जावा म्हणून तूं तुझ्या दरिद्री संसारांतील आणीबाणीच्या वेळीं म्हणून राखून ठेवलेले १०० रुपये जाहिर केलेस. इतिहासाच्या विशेष योग्यतेप्रमाणें ही रक्कम वाढविण्याची इच्छा दर्शविलीस. त्याच्याच जोडीला लाड–दुभाषांनीं एक पुरवणी जोडून या इतिहासाच्या साधनांची मागणी केली. ज्ञातिसंस्थांकडे त्यांच्या रिपोर्टांच्या प्रती मागितल्या. आला का एकादा चिटोरा तुमच्याकडे किंवा लाड दुभाषांकडे ? पाठविले का कुणी आठवणीने आपल्या संस्थांचें रिपोर्ट ? मग कसली तुमची उन्नति, कसले तुम्ही सरस्वतिभक्त नि कसलें काय ! येथून तेथून सारा दिखाऊ प्रकार !

**वाङ्मयकार्य** × × ×

बा मंडळा ! केवळ तेलंगांची निधनतिथि पाळून तुला स्वस्थ बसवलें नाहीं तर त्या थोर पुढाऱ्याचें कार्य जगापुढें यावें, एकोणीसाव्या शतकाच्या द्वितीयार्धांत राष्ट्राच्या प्रकृतीचें निदान बरोबर ठरवून त्याच्या उत्कर्षास आवश्यक व पोषक अशा अनेक चळवळींत तत्कालिन मेथा, बद्रुद्दिन बरोबर ज्यांनीं प्रामुख्यानें कार्य केलें, स्वदेशीय व परदेशीय विद्वानांनीं, प्रसिद्ध पुरुषांनीं ज्याच्या अगाध ज्ञानाबद्दल, असामान्य वक्तृत्वाबद्दल मोठ्या प्रेमानें प्रशंसापूर्ण उद्गार काढले, त्या पुरुषाबद्दल आपलाच नव्हे तर साऱ्या भरत खंडाचा आदर व्यक्त करण्याकरितां व भावी पिढीस जागृत करण्याकरितां तूं त्यांचे लेख व व्याख्यानें अलपमोल ठेवून व पदराला खार लावून प्रसिद्ध केलींस व "क्लबाचें अस्तित्व केवळ चैनीकरितां नव्हे" हें ही

वाङ्मयविषयक कामगिरी हातीं घेऊन आपल्या इतर बंधूंस प्रत्यक्ष उदाहरणानें सिद्ध करून दाखविलेंस. पण या तुझ्या उदार कृतीचा परिणाम काय बरें झाला ? होईल का प्रसिद्ध तुझ्या शिलकी प्रतींचा हिशोब ? मांडशील का पुढें आलेल्या अडचणी ? बाबारे ? जों-पर्यंत माझ्यासारखे अनेक नामधारी सरस्वतीपुत्र सारस्वत, या गोष्टींकडे कानाडोळा करून त्या हंसण्या-वारीं नेत आहेत, वेद विद्येचें रक्षण करून जगास ज्ञान देणें ही पूर्वजांची कृति त्यांच्या डोळयांपुढें नाचूं लागली नाहीं तोंपर्यंत आम्हीं कोरडे ते कोरडेच. "नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडें गेलें वारें."

**लाखाची देणगी** × × ×

परवांचीच गोष्ट घ्याना. मोठ्या प्रेमानें, आनंदानें बेहोष होऊन तुम्ही श्री. विष्णुपंत शिरोळकरांची सारस्वत महाजनवाडीप्रीत्यर्थ एक लाखाची देणगी, कृष्णाष्टमीच्या शुभमुहूर्तावर जाहीर केली. पण ती कोणाएका 'सारस्वता'ला अप्रासंगिक वाटली व त्यानें आपले तत्वान्वेष्टित विचार " इंदूंत " प्रगट करून धन्यता मिळविली. कोणाची काकी मामी, कुणाचें वक्तृत्व तर कुणाचे हस्ते; कैक बाबी पुढें आणल्या. इतकेंही करून त्याचा नीट अर्थ कुणास समजला असेल तर शपथ. पुन्हा आपले उत्तर देतांना हे राजश्री साव ते साव. लाखाच्या देणगीनें—मग तो सारस्वतांच्या महाजनवाडीसाठीं कां असेना—आनंदित होऊन प्रि. पाध्यांसारख्या "वसुधैव कुटुंबकं" वृत्तीच्या गृहस्थांनीं-सुद्धां टाळयांच्या गजरांत हा ठराव पास करण्याची सूचना पुढें आणिली. पण या "सारस्वतास" तत्व बिघडलें असें वाटलें. न जाणो या स्वारींचें भरींव डोकेंच बहुधा बिघडलें असावें. किंवा पुण्याच्या C. S. M च्या मताप्रमाणें हे खरे सारस्वतच नसावे. अथवा जाहिरात देऊन पुनर्विवाहास तयार झालेल्या व स्वज्ञातीशिवाय इतर कोणत्याही ज्ञातीची वधु पसंत करणाऱ्या, सुप्रसिद्ध प्रागतिक सुधारकाग्रणीचे-कुणी भाऊबंद तर नसतील ? बाकी अशीं यंत्रें एकीबेकीच्या ऐन माध्यान्ह कालीं मात्र भरपूर होतीं व ही घाण दाखविण्यासाठीं या शहरीं एक खास दिवटीही प्रज्वलित केली होती. एकदा तर पुण्याच्या उज्ज्वल 'प्रकाशां'त ज्ञातीसाठीं म्हणून प्रसिद्ध झालेल्या दोन लाखांतून "अ" नें आपल्या लाखाची 'ब'च्या-लाखाशीं—उभयतांच्या लाखाच्या एकीकरणाशीं—भ्रष्टता किंवा विटाळ होईल म्हणून फारकत केली, असा पुकारा करण्यांत आला होता. शेवटीं ज्ञातीला मिळावयाचा लाख—प्रसिद्ध झालेला पहिला लाख—ज्ञातीला मिळालाच. कायदेशीर रीतीनें ट्रस्ट वगैरे होऊन मिळाला—व ज्ञातीला म्हणून जाहिर केलेला दुसरा लाख, वसुधा हेंच कुटुंब मानून जाती बाहेर गेला. आतां त्याही लाखाच्या ट्रस्टच्या कारभारांत कुठलेंसें "मंडळ" व्यवस्था करणार आहे म्हणे ! मग जातीला मिळाली लाख कीं लाथ ?

त्या कालीं प्रकाशांतून मिरविणाऱ्यांच्या तोंडावर कधीं कालीं ही बाब पुढें आली म्हणजे जी काळोखी चढत असते ती पुसूं नका.

* * *

पण लक्षांत कोण घेतो ? तुम्ही आम्हांला गाजी म्हणा वा पाजी म्हणा, आम्ही आपले स्वस्थ. तुम्ही आमच्या बापाला शिव्या द्या कीं आजोबाला द्या आम्ही आपले स्वस्थ. तुम्ही आम्हांस त्रिकर्मि म्हणा कीं षट्कर्मी म्हणा आम्ही आपले स्वस्थ. तुम्ही आमच्या कार्यकर्त्या वीराला शिव्या द्या कीं शूराला द्या आम्ही आपले स्वस्थ ! तुम्ही कुणाचें अभिनंदन करा वा बॅंडबाजा उडवा, आम्ही आपले स्वस्थ ! बारे आमचा अभिमान ! बारे आमची भलाई ! बा सारस्वत समाजा ? जोंपर्यंत आजकाल दशदिशा दणाणून जात असलेल्या राजकीय बाबींपासून तों घरांतील लहानशा सामाजिक बाबीपर्यंत तूं स्वस्थ व उदासीन राहणार, सर नारायणरावांच्या मताप्रमाणें तुझा Idleness जाणार नाहीं, तोंपर्यंत तुझा उज्ज्वल भविष्यकाल दूरच राहणार !

# न्यायमूर्ति तेलंग.

( लेखक—रा. रा. वसंत नारायण नाईक, एम्. ए. )

न्यायमूर्ति तेलंग यांनां इहलोक सोडून आज पाव शतकावर काळ लोटला आहे. येवढ्या अवधींत आपल्या आचारविचारांत व सामाजिक, राजकीय व औद्योगिक ध्येयांत फारच मोठें अंतर पडलें आहे. त्यांच्या मनःचक्षूपुढें नाचत असलेले प्रश्न ते आपले प्रश्न नव्हत. इ. स. १८७४–१८९३ पर्यंतचा काळ म्हणजे या सर्व चळवळींच्या बाल्यावस्थेचा काळ होय. आपण सध्यां ज्या गोष्टींची सहजींच अपेक्षा करितों व त्या ओघाओघानें घडल्याच पाहिजेत असें धोरण बांधितों, त्या संबंधींचीं सुख स्वप्नेंसुद्धां त्या काळांत प्रामुख्यानें काम करणाऱ्या व्यक्तींना पडलीं नसतील. राजकीय बाबतींत त्या पिढींतील पुढाऱ्यांना प्रांतिक व वरिष्ठ कायदे कौन्सिलांत लोकमताचा थोडा तरी शिरकाव व्हावा व लोकांनीं निवडून पाठविलेले सभासद कौन्सिलांत असावेत व त्यांना बजेटावर प्रश्न विचारण्याचा हक्क मिळावा येवढें झालें म्हणजे सध्यां फार झालें असें वाटत असे. सामाजिक बाबतींत संमति वयाचा कायदा व स्त्रीशिक्षण हेच प्रश्न विशेष रीतीनें चर्चेला येत असत. स्त्रियांना शिक्षण दिलें पाहिजे हें तत्व हल्लीं कोणींही नाकबूल करीत नाहीं. व सम्मति वयाच्या कायद्याच्या पलीकडे स्त्रीपुरुषांच्या विवाहाची वयोमर्यादा जाऊन पोहोंचली आहे. मागसलेल्या जातींची उन्नति, सार्वत्रिक प्राथमिक सक्तीचें शिक्षण, धंदेशिक्षण, अस्पृश्य वर्गाची उन्नति, स्त्रियांचें वरिष्ठ व उच्च शिक्षण, पटेल व बसु बिल यांनीं उपस्थित केलेले मिश्र विवाहाचे प्रश्न, पोट जातींतील एकीकरण व जाती ( castes) या वर्णाश्रमव्यवस्थेवरच हल्ला, पतितपरावर्तन वगैरे व्यापक स्वरूपांच्या सामाजिक प्रश्नांचा, त्यावेळीं उच्चारसुद्धां झाला नव्हता. सामाजिक सुधारणेचें क्षेत्र स्त्रीशिक्षण, विधवाविवाह-विवाहाची वयोमर्यादा, परदेशगमन व इतर हिंदु समाजांतील केवळ धार्मिक प्रश्नांपलीकडे गेली नव्हती. त्याचप्रमाणें औद्योगिक बाबतींतसुद्धां खुला व्यापार व संरक्षित व्यापार, आयात मालावर जकात ठेवणें वगैरे प्रश्नांतच सर्व चर्चा स्तंभित होऊन राहिली होती. ठोकळ प्रश्नापासून त्यांच्या मुळांशीं असलेल्या तत्वांकडे लोकांचें, त्यांच्या पुढाऱ्यांचें लक्ष वेधण्याच्या काळ हा पूर्वकालीन म्हणजे इ. स. १८७३–१८९३ पर्यंत हरएक बाबतींत सार्वजनिक चळवळ केल्याचें फळ होय. इ. स. १८९३ मध्यें राष्ट्रीय सभा अष्ट वर्षांची कोमल बालिका होती. पुढें १३ वर्षांनीं म्हणजे १९०६ मध्यें ती पूर्ण वयांत आली व आपला हक्क पूर्ण शहाणपणानें मागूं लागली. त्याच वेळीं आपल्या सर्व राजकीय चळवळींचे कर्णधार व मूळ उत्पादक पितामह दादाभाई यांच्याच द्वारें या पूर्णवयांत आलेल्या आपल्या पौत्रीला त्यांनीं 'स्वराज्या' चा उपदेश केला व आज म्हणजे बरोबर आणखी १३ वर्षांनीं त्या उपदेशिलेल्या मंत्राची सांगता होण्याचा रंग दिसत आहे. म्हणजे तेलंगांच्या काळानंतर दोन तपांत राजकीय बाबतींत आपल्या चळवळींत केवढा मोठा फरक झाला आहे हें लक्षांत येईल. ज्याप्रमाणें राजकीय बाबतींत त्याचप्रमाणें सामाजिक बाबतींत सुद्धां तसाच फरक झालेला आपल्या लक्षांत येईल. सामाजिक ध्येयें सध्यांच्या काळांत केवळ आचारालाच बिलगून न रहातां विचार व ' शिष्टजन सांप्रदाय ' यांच्या तंत्रांनीं बदलत चाललेलीं सूक्ष्म दृष्टीनें विचार करणाऱ्याला आढळून येईल.

प्रथम ' सुधारक व दुर्धारक ' हे शब्द तेलंगांच्या वेळीं परस्परविरोधी पक्षांकडून ज्या अर्थानें योजिले जात असत, तो अर्थ आतां लुप्तप्राय झाला आहे. जुन्याला योग्य उजळा घालून, नव्यापैकीं योग्य तेंच उचलणारी व नीति व धर्म यांचा 'काल, स्थल व परिस्थिति' या त्रयीच्या धोरणानें योग्य परिपोष करणारी जी व्यक्ति तीच खरी सुधारक. केवळ ' जुन्याला चिकटणारा ' किंवा नवें म्हणून निर्भत्सन करणारा जो तो खरा धर्माभिमानी नसून 'स्वहित

घातकीच' आहे अशी समजूत आतां सर्वत्र रूढ झाल्या सारखीच आहे. त्याचप्रमाणें पाश्चात्यांचें अंध अनुकरण करून अभक्षाभक्ष व अपेयपान करण्यांत फुशारकी मारणारा गृहस्थ जुन्या लोकांप्रमाणेंच किंबहुना त्यांच्यापेक्षांही अधिक निंद्य असा 'नव्या' अभिमान बाळगणाऱ्याला सांप्रत वाटत असतो. म्हणजे तेलंग, रानडे, आगरकर यांनीं प्रतिपादिलेलीं 'सुधारणावादाचीं तत्वें दोन तपानंतर सर्वत्र चांगलींच पसरलेलीं आपणांला पाहावयास सांपडतात. केवळ 'पुराणमताभिमानी' किंवा 'अस्सल हिंदु' म्हणून नवें तेवढें चांगले म्हणून अंध वृत्तीनें नव्याचा अंगीकार करणारा व आपणाला तेवढयाच गोष्टीवरून सुधारक म्हणविणारा, हे दोघेही हल्लींच्या काळीं सारखेच निंद्य गणले जातात! औद्योगिक बाबतींत 'खुला व्यापार किंवा संरक्षणपद्धति' येवढा प्रश्न हल्लीं चर्चेला पुढें नसून 'पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य' या तत्वांत त्याची पूर्णता झाली आहे. हिंदुस्थान देश हा औद्योगिक व व्यापाराच्या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य उपभोगूं लागला पाहिजे असा या चळवळीचा निष्कर्ष निघतो. व अशा तऱ्हेच्या विचाराची ज्योत ज्यांनीं प्रथम लाविली त्यांत रानडे, दादाभाई, दत्त प्रभृतींत तेलंगही प्रामुख्यानें होते. त्यांचें अर्थशास्त्राचें ज्ञान त्यांच्या इतर ज्ञानाप्रमाणेंच खोल व विस्तृत असे होतें. व त्या ज्ञानाला व्यवहारांत कसें आणावयाचें हें मुद्दां त्यांना चांगलेंच समजत असे. गोखले, ग. व्यं. जोशी, दत्त, रानडे, दादाभाई यांच्या एवढे अर्थशास्त्रांत पारंगतता मिळविलेले विद्वान गृहस्थ सध्यां आपणांत नाहींत. म्हणूनच मुत्सद्दीपणांत, आपल्या प्रत्येक सार्वजनिक कार्यांत आपल्या पुढाऱ्यांचें पाऊल मागेंच पडलेलें आपणाला आढळून येतें. त्या वेळचीं 'बजेट' वगैरे प्रश्नावरील कौन्सिलांतील चर्चा व पर्वांच्या कौन्सिलांतील स्टेट बँक, चलनी नाण्याची पद्धति, व कच्च्या निर्गत मालावर बसविलेल्या जकाती, वाढत्या किमतीच्या वगैरे प्रश्नांवर झालेलीं भाषणें वाचलीं म्हणजे त्या वेळच्या व या वेळच्या काळांतील फरक आपल्या चांगलाच लक्षांत येतो. त्यावेळीं तत्वाच्या, ध्येयांच्या बाबतींत आपण फार मागे होतों व या दोन तपांत आपण फारच पुढें गेलो आहों हें निर्विवाद आहे. पण तेव्हांचे पुढारी व आतांचे पुढारी यांचें ज्ञान, कर्तृत्व, धोरण, वजन, सार्वजनिक विषयांची चर्चा करण्याची पद्धति, एका प्रकारचा आत्मविश्वास, परस्पर प्रेम, युक्तायुक्ततेच्या जाणिवेमुळें अंगांत बाणलेला समंजसपणा व तडजोडीची वृत्ति, शहाणपणा, धिम्मेपणा, व पूर्ण सचोटी व देशाविषयीं खरी कळकळ, त्याचप्रमाणें अहंमन्यता, वृथाघमेंड, दुराग्रह आत्मश्लाघा, स्वार्थपरायणता यांचा पूर्ण संन्यास वगैरे गोष्टींचा विचार केला असतांना आम्ही पुढें जात आहों कीं मागें जात आहों असा ही संशय वाटूं लागतो.

उत्तम प्रासाद आपल्या हस्तगत झाला तरी त्याची उत्तम व्यवस्था होण्यास, त्याची व्यवस्था लावणारीं मुख्य माणसें उत्तम प्रकारचीं असावीं लागतात. नाहीं तर तो प्रासाद च्छिन्नविच्छिन्न होऊन मातीमोल होतो. 'देश सुधारला आहे' याचें अनुमान बांधतांना देशांत जीं माणसें पुढारी म्हणून वावरतात तीं कशीं आहेत हें मुख्य पाहिलें पाहिजे. तेव्हां तेलंग, रानडयांचा काळ गतगोष्टींप्रमाणें जरी आजच्या व्यवहारापासून निराळा असला तरी त्यांच्या गुणांचें चिंतन म्हणजे हल्लींच्या काळीं आपणांला माणसें कशीं पाहिजेत याचेंच पर्यायानें निरीक्षण करण्यासारखें आहे. 'तेलंग, रानडे, हे कांहीं देवकोटींतले पुरुष नव्हते. त्यांची गणना कोणीही बुद्ध, खिस्त किंवा ल्यूथर यांच्या मालिकेंत करीत नाहींत. तेव्हां त्यांच्या अंगचे गुण सांगितल्याने त्यांच्यांत दोष मुळींच नव्हते असा अर्थ निघत नाही. परंतु पर्वतराजीकडे ज्याप्रमाणें दुरून पाहिलें म्हणजेच त्याचें वैशिष्टय चांगलें लक्षांत येतें, तसेच खऱ्या थोर पुरुषाचें आहे. त्यांच्यातील दोष त्यांच्या कालाबरोबर लोपून जातात व तेवढयाच प्रमाणानें त्यांचे गुण दैदिप्यमान होऊन लोकांच्या ज्यास्त उपयोगी पडतात. तसेंच तेलंग, रानडे, आगरकर, चिपळुणकर वगैरे व्यक्तींचें आहे. सामान्य व्यक्तींच्या गुणांचा व दोषांचा लय त्यांच्या देहपतनाबरोबरच होतो. थोर पुरुषांचें यांच्या उलट आहे. त्यांचे दोष हे काल, स्थल, परिस्थितिमुळें त्यांच्यांत येतात व त्यांचे गुण हे त्यांनीं स्वप्रयत्नानें आपल्या परिस्थितीवर विजय मिळविल्याचें द्योतक होतात. व प्रत्येक पुढील व्यक्तीला आपल्या परिस्थितीशीं टक्कर देण्याची असल्यामुळें आपल्या राष्ट्रांतील थोर व्यक्तींच्या अंगच्या गुणचिंतनानेंच आपल्या

पुढील मार्ग स्पष्ट दिसूं लागतो, दृष्टी व्यापक होते, कार्यजागृति तीव्र होते व कितीही वेळां पडलों, घसरलों तर प्रयत्न करणें, उभें राहणें, तग मारणें हेंच माझें आद्य कर्तव्य आहे असें व्यक्तीच्या हृदयांत बाणूं लागतें, तिचा धीर खचत नाहीं व ती कार्यक्षम होऊन तिच्यामुळें सर्वांचा फायदा होऊन जातो. समाज, राष्ट्र हीं दिवसेंदिवस उन्नतावस्थेस जाऊं लागतात.

वाशिंगटन, लिंकन यांचा काळ व युनायटेड-स्टेटस मधील सांप्रतचा काळ यांत किती तरी फरक झाला आहे. तरी वाशिंगटन व लिंकन यांची पुण्यतिथि अमेरिकेचें राष्ट्र अजून साजरी करितें, व प्रत्येक वर्षी या विभूतींचीं नवीं नवीं लिहिलेलीं चरित्रें बाहेर पडतात आलफ्रेड, क्रॉमवेल, यांचा काळ व हल्लींचा इंग्लंडाचा काळ याच्यांत महदंतर आहे तरी ऑलफ्रेड क्रामवेल यांचा दिवस योग्य तऱ्हेनें साजरा करून त्याच्या चारित्र्यावर अजून प्रवचनें व व्याख्यानें प्रतिवर्षी होत असतात. आपण शिवजयंति जी अजून पर्यन्त करितों ती शिवप्रभूच्या गुणांचे मनन व चिन्तन करण्याकरितांच करतों. नाहींतर शिवकालिन परिस्थिति व हल्लींची सर्व जगाची परिस्थिति यांत एवढें अंतर पडलें आहे कीं त्या काळाचा विचार करून आपणाला वास्तविक राष्ट्रीय व्यवहारांत फायदा काडीचाही नाहीं. समाज किंवा राष्ट्र व त्याच्या खालोखाल निरनिराळे जातिवाचक संघ यांचा जोम त्याच्यांतील विशिष्ट व्यक्तींच्या थोरपणावर असतो. तेव्हां हिंदुस्थान देशांत आधुनिक कालांत ज्या व्यक्तींनीं निरलस वृत्तीनें, निःस्वार्थबुद्धीनें, पूर्ण सावधान राहून आजपर्यन्त कार्य केलें त्यांत जे आपल्या अंगच्या गुणांनीं थोर म्हणून गणलेले त्यांची आठवण आपण आपल्या समाजांत नेहमीं जिवंत व जागृत ठेविली पाहिजे. या गोष्टीची हेळसांड करणें म्हणजे आपणांतील 'शीलसंचयाला' पारखें होण्यासारखें आहे. या एकाच बाजूनें विचार केला तरी न्यायमूर्ति तेलंगांच्या चारित्र्याची वारंवार उजळणी करणें हें आपलें एक कर्तव्य होऊन बसतें. म्हणून 'पाहिलें तें पहावें' 'सांगितलें तें सांगावें' या न्यायानें नुकत्याच होऊन गेलेल्या तेलंगांच्या २६ व्या पुण्यतिथीच्या निमित्तानें पुन्हां तेलंगांविषयीं दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

प्रस्तुत लेखकानें आपल्या अल्पमतीला जेवढें शक्य झालें,तेवढ्यानें तेलंगांच्या चरित्राची ओळख यापूर्वीच आपल्या समाजाला करून दिली आहे. त्या चरित्राची पुनरुक्ति आतां नको आहे. पण त्यांच्यांतील ठळक गुण कोणचे हेंच तो आतां सांगणार आहे. त्यांच्यांतील अत्यंत थोर व सध्यां दुर्मिळ असा जो एक गुण प्रस्तुत लेखकाला वाटतो तो त्यांची ज्ञानलालसा हा होय. आमरण विद्यार्जन करणें व आपल्या 'अंतरींचा ज्ञानदिवा सदैव प्रज्वलित ठेवणें' हा त्यांच्यांतील विशेष आपणांला 'सारस्वत' म्हणविण्यांत भूषण मानणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें—व त्यांतल्यात्यांत विश्वविद्यालयाची कोणतीही पदवी धारण करणाऱ्यानें—आपलासा केला पाहिजे. थोडेसें जरी आपण आत्मपरीक्षण केलें तरी आपणाला अशी खात्री पटेल कीं आपण या गुणाला सर्वथैव पारखे झालों आहों. कित्येक म्हणतील कीं जीवनसंग्रामाच्या चक्रांत आम्ही येवढे पिळून निघतों कीं आम्हांला कोणत्याही प्रकारचा अभ्यास करावयास फुरुसतच राहात नाहीं. साधारण पेशाच्या प्रत्येक व्यक्तीला जेवढी फुरसत मिळते त्याच्या एक चतुर्थांश फुरसत सुद्धां सार्वजनिक कामांत व आपल्या धंद्यांत पडलेल्या तेलंगांसारख्या व्यवसायनिमग्न माणसाला मिळत नसे. तरी पण त्यांनीं आपलें वाचन कायम ठेवले होतें. त्याचें कारण त्यांना फुरसत फार हें नसून त्याचें जीवन नियमबद्ध व शिस्तवार होतें. ग्लॅडस्टन साहेबांची अशी आख्यायिका सांगतात कीं पार्लमेंटांतून काम आटोपून रात्रीं परत घरीं आल्यावर अत्यंत थकलेल्या मनाच्या स्थितींतच ते एकाद्या नव्या कादंबरीचीं थोडीं पानें वाचल्याशिवाय रहात नसत. त्याचप्रमाणें तेलंग हे हायकोर्टाला दोन प्रहरीं सुटी असे त्या वेळांत ट्रोलोप वगैरे कादंबरीकारांच्या कादंबऱ्या वाचत असत. व सकाळीं घरून लवकर निघून कोर्टांत काम सुरु होण्याच्या पूर्वी लायब्ररींत जाऊन वर्तमान पत्रें चाळीत असत. म्हणजे त्यांनीं आपणांला 'फुरसत नाहीं' ही सबब पुढें आणून आपल्या ज्ञानांत भर घालून बुद्धी कायमची तरतरीत, खोल व व्यापक ठेवण्याचें टाळलें नाहीं. हा त्यांच्या चारित्र्यांतील धडा आपणांतील सुशिक्षित म्हणविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें गिरविण्यासारखा आहे. वृथा सबब आणून या अत्यंत आवश्यक बाबतींची हेळसांड केल्यानेंच आपणांत ज्ञानवंत माणसाचें दुर्भिक्ष झालें आहे. व आपण ज्या ज्ञातींचे आहोंत म्हणून मिरवितों, त्यांना तर ही गोष्ट अत्यंत लांछनास्पद आहे.

घातकीच' आहे अशी समजूत आतां सर्वत्र रूढ झाल्या सारखीच आहे. त्याचप्रमाणें पाश्चात्यांचें अंध अनुकरण करून अभक्षाभक्ष व अपेयपान करण्यांत फुशारकी मारणारा गृहस्थ जुन्या लोकांप्रमाणेंच किंबहुना त्यांच्यापेक्षांही अधिक निंद्य असा 'नव्या' अभिमान बाळगणाऱ्याला सांप्रत वाटत असतो. म्हणजे तेलंग, रानडे, आगरकर यांनीं प्रतिपादिलेलीं 'सुधारणावादाचीं तत्वें दोन तपांनंतर सर्वत्र चांगलींच पसरलेलीं आपणांला पाहावयास सांपडतात. केवळ 'पुराणमताभिमानी' किंवा 'अस्सल हिंदु' म्हणून नवें तेवढें चांगले म्हणून अंध वृत्तीनें नव्याचा अंगीकार करणारा व आपणाला तेवढ्याच गोष्टीवरून सुधारक म्हणविणारा, हे दोघेही हल्लींच्या काळीं सारखेच निंद्य गणले जातात! औद्योगिक बाबतींत 'खुला व्यापार किंवा संरक्षणपद्धति' येवढा प्रश्न हल्लीं चर्चेला पुढें नसून 'पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य' या तत्वांत त्याची पूर्णता झाली आहे. हिंदुस्थान देश हा औद्योगिक व व्यापाराच्या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य उपभोगूं लागला पाहिजे असा या चळवळीचा निष्कर्ष निघतो. व अशा तऱ्हेच्या विचाराची ज्योत ज्यांनीं प्रथम लाविली त्यांत रानडे, दादाभाई, दत्त प्रभृतींत तेलंगही प्रामुख्यानें होते. त्यांचें अर्थशास्त्राचें ज्ञान त्यांच्या इतर ज्ञानाप्रमाणेंच खोल व विस्तृत असे होतें. व त्या ज्ञानाला व्यवहारांत कसें आणावयाचें हें सुद्धां त्यांना चांगलेंच समजत असे. गोखले, ग. व्यं. जोशी, दत्त, रानडे, दादाभाई यांच्या एवढे अर्थशास्त्रांत पारंगतता मिळविलेले विद्वान गृहस्थ सध्यां आपणांत नाहींत. म्हणूनच मुत्सद्दीपणांत, आपल्या प्रत्येक सार्वजनिक कार्यांत आपल्या पुढाऱ्यांचें पाऊल मागेंच पडलेलें आपणाला आढळून येतें. त्या वेळचीं 'बजेट' वगैरे प्रश्नावरील कौन्सिलांतील चर्चा व पर्वांच्या कौन्सिलांतील स्टेट बँक, चलनी नाण्याची पद्धति, व कच्च्या निर्गत मालावर बसविलेल्या जकाती, वाढत्या किमतीच्या वगैरे प्रश्नांवर झालेलीं भाषणें वाचलीं म्हणजे त्या वेळच्या व या वेळच्या काळांतील फरक आपल्या चांगलाच लक्षांत येतो. त्यावेळीं तत्वाच्या, ध्येयांच्या बाबतींत आपण फार मागें होतों व या दोन तपांत आपण फारच पुढें गेलो आहों हें निर्विवाद आहे. पण तेव्हांचे पुढारी व आतांचे पुढारी यांचें ज्ञान, कर्तृत्व, धोरण, वजन, सार्वजनिक विषयांची चर्चा करण्याची पद्धति, एका प्रकारचा आत्मविश्वास, परस्पर प्रेम, युक्तायुक्ततेच्या जाणिवेमुळें अंगांत बाणिलेला समंजसपणा व तडजोडीची वृत्ति, शहाणपणा, धिम्मेपणा, व पूर्ण सचोटी व देशाविषयीं खरी कळकळ, त्याचप्रमाणें अहंमन्यता, वृथाघमेंड, दुराग्रह आत्मश्लाघा, स्वार्थपरायणता यांचा पूर्ण संन्यास वगैरे गोष्टींचा विचार केला असतांना आम्ही पुढें जात आहों कीं मागें जात आहों असा ही संशय वाटूं लागतो.

उत्तम प्रासाद आपल्या हस्तगत झाला तरी त्याची उत्तम व्यवस्था होण्यास, त्याची व्यवस्था लावणारीं मुख्य माणसें उत्तम प्रकारचीं असावीं लागतात. नाहीं तर तो प्रासाद च्छिन्नविच्छिन्न होऊन मातीमोल होतो. 'देश सुधारला आहे' याचें अनुमान बांधतांना देशांत जीं माणसें पुढारी म्हणून वावरतात तीं कशीं आहेत हें मुख्य पाहिलें पाहिजे. तेव्हां तेलंग, रानड्यांचा काळ गतगोष्टींप्रमाणें जरी आजच्या व्यवहारापासून निराळा असला तरी त्यांच्या गुणांचें चिंतन म्हणजे हल्लींच्या काळीं आपणांला माणसें कशीं पाहिजेत याचेंच पर्यायानें निरीक्षण करण्यासारखें आहे. 'तेलंग, रानडे, हे कांहीं देवकोटींतले पुरुष नव्हते. त्यांची गणना कोणीही बुद्ध, ख्रिस्त किंवा ल्यूथर यांच्या मालिकेंत करीत नाहींत. तेव्हां त्यांच्या अंगचे गुण सांगितल्याने त्यांच्यांत दोष मुळींच नव्हते असा अर्थ निघत नाही. परंतु पर्वतराजीकडे ज्याप्रमाणें दुरून पाहिलें म्हणजेच त्याचें वैशिष्ट्य चांगलें लक्षांत येतें, तसेंच खऱ्या थोर पुरुषाचें आहे. त्यांच्यातील दोष त्यांच्या कालाबरोबर लोपून जातात व तेवढ्याच प्रमाणानें त्यांचे गुण दैदिप्यमान होऊन लोकांच्या ज्यास्त उपयोगी पडतात. तसेंच तेलंग, रानडे, आगरकर, चिपळुणकर वगैरे व्यक्तींचें आहे. सामान्य व्यक्तींच्या गुणांचा व दोषांचा लय त्यांच्या देहपतनाबरोबरच होतो. थोर पुरुषांचें यांच्या उलट आहे. त्यांचे दोष हे काल, स्थल, परिस्थितिमुळें त्यांच्यांत येतात व त्यांचे गुण हे त्यांनीं स्वप्रयत्नानें आपल्या परिस्थितीवर विजय मिळविल्याचें द्योतक होतात. व प्रत्येक पुढील व्यक्तीला आपल्या परिस्थितीशीं टक्कर देण्याची असल्यामुळें आपल्या राष्ट्रांतील थोर व्यक्तींच्या अंगच्या गुणचिंतनानेंच आपल्या

पुढील मार्ग स्पष्ट दिसूं लागतो, दृष्टी व्यापक होते, कार्यजागृति तीव्र होते व कितीही वेळां पडलों, घसरलों तर प्रयत्न करणें, उभें राहणें, तग मारणें हेंच माझें आद्य कर्तव्य आहे असें व्यक्तीच्या हृदयांत बाणूं लागतें, तिचा धीर खचत नाहीं व ती कार्यक्षम होऊन तिच्यामुळें सर्वांचा फायदा होऊन जातो. समाज, राष्ट्र हीं दिवसेंदिवस उन्नतावस्थेस जाऊं लागतात.

वाशिंगटन, लिंकन यांचा काळ व युनायटेड-स्टेटस मधील सांप्रतचा काळ यांत किती तरी फरक झाला आहे. तरी वाशिंगटन व लिंकन यांची पुण्यतिथि अमेरिकेचें राष्ट्र अजून साजरी करितें, व प्रत्येक वर्षी या विभूतींचीं नवीं नवीं लिहिलेलीं चरित्रें बाहेर पडतात. आलफ्रेड, क्रॉमवेल, यांचा काळ व हल्लींचा इंग्लडाचा काळ याच्यांत महदंतर आहे तरी ऑलफ्रेड क्रामवेल यांचा दिवस योग्य तऱ्हेनें साजरा करून त्याच्या चारित्र्यावर अजून प्रवचनें व व्याख्यानें प्रतिवर्षी होत असतात. आपण शिवजयंति जी अजून पर्यन्त करितों ती शिवप्रभूच्या गुणांचे मनन व चिन्तन करण्याकरितांच करतों. नाहींतर शिवकालिन परिस्थिति व हल्लींची सर्व जगाची परिस्थिति यांत एवढें अंतर पडलें आहे कीं त्या काळाचा विचार करून आपणाला वास्तविक राष्ट्रीय व्यवहारांत फायदा काडीचाही नाहीं. समाज किंवा राष्ट्र व त्याच्या खालोखाल निरनिराळे जातिवाचक संघ यांचा जोम त्याच्यांतील विशिष्ट व्यक्तींच्या थोरपणावर असतो. तेव्हां हिंदुस्थान देशांत आधुनिक कालांत ज्या व्यक्तींनीं निरलस वृत्तीनें, निःस्वार्थबुद्धीनें, पूर्ण सावधान राहून आजपर्यन्त कार्य केलें त्यांत जे आपल्या अंगच्या गुणांनीं थोर म्हणून गणलेले त्यांची आठवण आपण आपल्या समाजांत नेहमीं जिवंत व जागृत ठेविली पाहिजे. या गोष्टीची हेळसांड करणें म्हणजे आपणांतील 'शीलसंचयाला' पारखें होण्यासारखें आहे. या एकाच बाजूनें विचार केला तरी न्यायमूर्ति तेलंगांच्या चारित्र्याची वारंवार उजळणी करणें हें आपलें एक कर्तव्य होऊन बसतें. म्हणून 'पाहिलें तें पहावें' 'सांगितलें तें सांगावें' या न्यायानें नुकत्याच होऊन गेलेल्या तेलंगांच्या २६ व्या पुण्यतिथीच्या निमित्तानें पुन्हां तेलंगांविषयीं दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

प्रस्तुत लेखकानें आपल्या अल्पमतीला जेवढें शक्य झालें, तेवढ्यानें तेलंगांच्या चरित्राची ओळख यापूर्वीच आपल्या समाजाला करून दिली आहे. त्या चरित्राची पुनरुक्ति आतां नको आहे. पण त्यांच्यांतील ठळक गुण कोणचे हेंच तो आतां सांगणार आहे. त्यांच्यांतील अत्यंत थोर व सध्यां दुर्मिळ असा जो एक गुण प्रस्तुत लेखकाला वाटतो तो त्यांची ज्ञानलालसा हा होय. आमरण विद्यार्जन करणें व आपल्या 'अंतरींचा ज्ञानदिवा सदैव प्रज्वलित ठेवणें' हा त्यांच्यांतील विशेष आपणांला 'सारस्वत' म्हणविण्यांत भूषण मानणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें—व त्यांतल्यात्यांत विश्वविद्यालयाची कोणतीही पदवी धारण करणाऱ्यानें—आपलासा केला पाहिजे. थोडेसें जरी आपण आत्मपरीक्षण केलें तरी आपणाला अशी खात्री पटेल कीं आपण या गुणाला सर्वथैव पारखे झालों आहों. कित्येक म्हणतील कीं जीवनसंग्रामाच्या चक्रांत आम्ही येवढे पिळून निघतों कीं आम्हांला कोणत्याही प्रकारचा अभ्यास करावयास फुरसतच राहात नाहीं. साधारण पेशाच्या प्रत्येक व्यक्तीला जेवढी फुरसत मिळते त्याच्या एक चतुर्थांश फुरसत सुद्धां सार्वजनिक कामांत व आपल्या धंद्यांत पडलेल्या तेलंगांसारख्या व्यवसायनिमग्न माणसाला मिळत नसे. तरी पण त्यांनीं आपलें वाचन कायम ठेवले होतें. त्याचें कारण त्यांना फुरसत फार हें नसून त्याचें जीवन नियमबद्ध व शिस्तवार होतें. ग्लॅडस्टन साहेबांची अशी आख्यायिका सांगतात कीं पार्लमेंटांतून काम आटोपून रात्रीं परत घरीं आल्यावर अत्यंत थकलेल्या मनाच्या स्थितींतच ते एकाद्या नव्या कादंबरीचीं थोडीं पानें वाचल्याशिवाय रहात नसत. त्याचप्रमाणें तेलंग हे हायकोर्टाला दोन प्रहरीं सुटी असे त्या वेळांत ट्रोलोप वगैरे कादंबरीकारांच्या कादंबऱ्या वाचत असत. व सकाळीं घरून लवकर निघून कोर्टांत काम सुरु होण्याच्या पूर्वी लायब्ररींत जाऊन वर्तमान पत्रें चाळीत असत. म्हणजे त्यांनीं आपणांला 'फुरसत नाहीं' ही सबब पुढें आणून आपल्या ज्ञानांत भर घालून बुद्धी कायमची तरतरीत, खोल व व्यापक ठेवण्याचें टाळलें नाहीं. हा त्यांच्या चारित्र्यांतील धडा आपणांतील सुशिक्षित म्हणविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें गिरविण्यासारखा आहे. वृथा सबब आणून या अत्यंत आवश्यक बाबतींची हेळसांड केल्यानेंच आपणांत ज्ञानवंत माणसाचें दुर्भिक्ष झालें आहे. व आपण ज्या ज्ञातींचे आहोंत म्हणून मिरवितों, त्यांना तर ही गोष्ट अत्यंत लांछनास्पद आहे.

'जगांत काय चाललें आहे' 'आपण कुठे झुकतों आहों' यांची उत्तम जाणीव केवळ शिळोप्याच्या गप्पा मारून किंवा आपला धंदा केला म्हणजे झालें असें म्हणून केव्हांही व्हावयाची नाहीं. व तशी तीव्र जाणीव जोंपर्यंत आपणांतील सुशिक्षित म्हणविणाऱ्यांत नाहीं, तोंपर्यंत आपली केव्हांही प्रगती होणार नाहीं. आजच्या काळीं आपल्या धंद्यांत सुद्धां कार्यक्षम होऊन उत्तम यश मिळविण्यास अभ्यास व एकतानता (concentration) हीं अवश्य आहेत. त्यांतल्या त्यांत ज्यांला (Higher Professions) म्हणतात त्यांत तर ज्ञान व तडफ यांची अत्यंत जरूरी आहे. तेव्हां केवळ ऐहिक दृष्ट्या विचार केला तरी ज्ञान—उत्तम ज्ञान—व त्यांत सदैव भर घालण्याची व ज्याला razoredge अशी उपमा दिली आहे तशी कुशाग्रबुद्धी प्रयत्नानें आपणांत आणणें यांची वाण आपणांला फार आहे. सुबत्तेच्या काळापेक्षांही चढाओढीच्या काळांत या गुणाचा परिपोष आपणांत सर्वत्र झाला पाहिजे. तरच इतर ज्ञातींशी आपण टक्कर देऊं शकूं व आपल्या राष्ट्रीय व्यवस्थेंत आपलें नांव कायम टिकेल. सध्यां वाङ्मय घ्या, व्यापार घ्या, कायदा घ्या, सार्वजनिक कार्य घ्या, कोणत्याही दिशेनें आपणांतील व्यक्ती प्रामुख्यानें काम करून वाहव व वजन मिळविलेली आपणांला पाहावयास सांपडत नाहीं. याचें कारण काय? तर आपणांमधील व्यक्तींत 'अंतरींची उत्कट दैविक तळमळ' व शिरावर काम घेऊन तें तडीस पोहोंचविण्याची हौस याचा उगमच नाहीं.

तेलंगांच्या चारित्र्यांतून दुसरी गोष्ट शिकावयाची म्हटली म्हणजे त्यांच्या अंगची सार्वजनिक काम करण्याची हौस व तें काम उत्तमपणें पार पाडण्याकरितां आपणांत पात्रता आणण्याची तयारी. आपण काय करणार याचें ध्येय त्यांनीं लहानपणींच ठरविलें होतें. तें शिकवायास त्यांना कोणी शिक्षक नको होता. आपल्या वयाची विशी न उलटते तोंच त्यांनी हा आत्मयज्ञ आरंभिला. आपली विद्या वीर्यवती व्हावी म्हणून त्यांनीं बी. ए. झाल्याबरोबर आपल्या ज्ञानाला उजळा घालून तें व्यवस्थित, खोल व व्यापक होईल अशी स्वयंस्फूर्तीनें योजना केली. त्यावेळीं असलेल्या निरनिराळ्या राजकीय व सामाजिक संस्थांचे ते सभासद झाले. व सार्वजनिक काम कोणत्या धोरणांने केलें असतां फलदायी होतें हें ते प्रत्यक्ष अनुभवानें, अंगमेहनतीनें शिकूं लागले. केवळ भाषणा दाखल भाषण करावयाचें व टाळ्या मिळवाव्या हें त्यांना मान्य नव्हतें. भाषणाआधीं कार्य योजना व प्रश्न चर्चा, व भाषणानंतर कार्य निष्पत्ति हीं जर होत असलीं व या सर्व संक्रमणावस्थेंत जर आपणांला कार्य करतां येईल अशी त्यांना खात्री पटली तरच ते भाषण करण्यास पुढें येत. संमतीवयाच्या कायद्याच्या वेळची त्यांनीं केलेली चळवळ, इलबर्ट बिलाची व लिटनशाहीविरुद्ध चळवळ व मुंबई म्युनिसिपालिटीचा प्रस्तुतचा अॅक्ट पास करण्या संबंधींची चळवळ, त्याचप्रमाणे राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून तों थेट ते हयात असेपर्यंतच्या तिच्या प्रत्येक अंतस्थ व्यवस्थेच्या जबाबदारी वगैरेची खटोटाप, ह्या सर्व गोष्टी त्यांनीं अशाच बाण्यानें पार पाडिल्या. ते जिवंत होते तेव्हां त्यांचा ज्या ज्या संस्थेशीं संबंध असे ती संस्था विस्कळीत झालेली किंवा कर्तव्यमुढ होऊन शिथिल पडली असें झालें नाहीं. हा गुण अत्यंत थोर आहे व तो अंगांत आणणें म्हणजेच आपल्या संस्था जिवंत होऊन कार्यक्षम करणें होय. आपण पुष्कळ संस्थांचे सभासद असतों, कित्येकांमधील कार्यकारी मंडळांतही आपलें नांव असतें. पण आपण आपली जबाबदारी ओळखत नाहीं. प्रश्नाची पूर्ण माहिती व पूर्ण तयारी करीत नाहीं, सतत हजर रहाण्याची दक्षता बाळगीत नाहीं व संस्थेचें कार्य वाहील तसें वाहत जाऊं देतों; यामुळें संस्था एकतर डबघईस जातात किंवा असल्या तरी त्यांच्या द्वारें जेवढें कार्य व लोकजागृति हीं व्हावींत तेवढीं होत नाहींत.

तेलंग, भाऊदाजी, वगैरे मागें होऊन गेलेले आपणांतील थोर गृहस्थ आपल्या देशाच्या सार्वजनिक चळवळींत शिरावर जबाबदारी घेऊन काम करीत. आतां आपणांतील सुशिक्षितांत अशा संस्थांशीं आपला संबंध जोडून आपण थोडें तरी काम माहिती मिळवून करणें ही भावनाच नाहींशी झाल्यासारखी दिसते. ही स्थिति बदलली पाहिजे. तेलंगांना सार्वजनिक कामाची ज्याप्रमाणें हौस होती त्याचप्रमाणें कोणत्याही प्रश्नावर बोलण्याच्या किंवा लिहिण्याच्या आधीं त्या विषयाशीं सर्व बाजूंनीं यथास्थित परिचय करून, स्वतः निर्णय ठरविणें हा त्यांचा विशेष होता.

ह्या गुणाचा हल्लीं सार्वजनिक कामांत पुढें सरसावलेल्या पुढाऱ्यांत पूर्ण अभाव दिसून येतो. म्हणून त्याचा उत्कर्ष तात्कालिक व त्यांचें वजन तात्पुरतेंच असें वाटतें. मागील पिढीच्या प्रत्येक पुढाऱ्यांत हा गुण प्रामुख्यानें होता. दादाभाई, मेहेता, रानडे, तेलंग, गोखले, ग. व्यं. जोशी, बिशन नारायण धार वगैरे दिवंगत झालेल्या पुढाऱ्यांच्या भाषणांतून किंवा लेखनांतून अशा प्रकारची धरसोड, विस्कळितपणा, वृथा पाल्हाळ, केवळ शब्दच्छळ, कोट्या किंवा व्यक्तिविषयक मर्मभेदक टीका आपणांला मुळींच आढळत नाहींत. त्यांचे लेख व भाषणें पुनः पुनः वाचून मनन करण्यास योग्य व विषयाच्या माहितीनें पूर्ण भरलेलीं अशीं आहेत. केवळ जनसमाजा कडून टाळ्यांचा कडकडाट मिळविला म्हणजे झालें असें त्यांना वाटत नसे. ते आपली जबाबदारी पूर्ण ओळखीत. बहुजन समाज अशा बाबतींत अज्ञ आहे, त्यांची दिशाभूल करणें केव्हांही रास्त होणार नाहीं, त्याचे आपण पुढारी म्हणजे केवळ फोनोग्राफ नाहीं तर जनतेचे नेत्र आहोंत हें जाणून ते वागत. म्हणून त्याचें वजन पडे व ते कायमचें टिके. आपणांतील प्रत्येक व्यक्तीनें हा मागील पिढींतल्या पुढाऱ्यांचा गुण घेतला पाहिजे. ज्या प्रमाणानें ज्ञान अधिक, धोरण अधिक, समंजसपणा अधिक, दृष्टी व्यापक, मागचा पुढचा संबंध ओळखण्याची व त्याचे परिणाम अजमावण्याचें बुद्धिवैभव अधिक, त्याच प्रमाणानें कोणत्याही व्यक्तींच्या भाषणांत व लेखांत ज्याला इंग्रजींत Sweet reasonableness म्हणतात तो गुण अधिक.

आपल्यांतील आधुनिक काळच्या पुढाऱ्यांपैकीं हा गुण तेलंग, रानडे व गोखले यांच्या प्रत्येक कृतींत, विचारांत व उच्चारांत विशेषेंकरून दिसून येतो. आपल्या प्रतिस्पर्ध्यावर वादविवादांत विजय मिळवावयाला ज्याप्रमाणें लेखकांत व वक्त्यांत एका प्रकारची तडफ, निस्पृहपणा व तेज असावें लागते त्याचप्रमाणें त्याचा Sweet reasonbleness हा गुणही असावा लागतो. याच्या अभावीं इतर गुणांना हट्ट दुराग्रह, किंवा उद्दामपणाचें स्वरूप येतें. या उद्दाम वृत्तीनें तात्पुरतें कार्य जरी जास्त झालेसें भासतें तरी तें अंतीं फसल्यासारखेंच होतें असा सार्वजनिक कार्याचा एक नियमच ठरल्यासारखा दिसतो. म्हणूनच इतर सर्व गुणाबरोबर Sweet Reasonableness हा गुण कोणत्याही जनहितदक्ष पुढाऱ्यांत अवश्य असला पाहिजे. या गुणाचें रहस्य प्रसिद्ध इंग्रजी लेखक व राजकारण विशारद तत्ववेत्ता बर्क यानें खालील शब्दांत सांगितलें आहे. बर्कनें म्हटलें आहे कीं, सार्वजनिक कार्यांत पडणाऱ्या प्रत्येक माणसानें आपण जरी कट्टे देशभक्त असलों तरी आपण प्रथम सभ्य गृहस्थ आहों ' हें विसरतां कामा नये. सभ्यपणा व उत्कट देशभक्ती यांची केव्हांही फारकत होतां कामा नये. तशी झाली तर देशकार्य चांगलें न होतां उलट बिघडतें. प्रसिद्ध देशभक्त गांधी ह्यांच्या देशभक्तीला व स्वार्थत्यागाला सीमाच नाहीं. तरी त्यांच्या लेखांत किंवा भाषणांत ' सभ्यपणा ' पूर्ण आहे. म्हणूनच त्यांचें वजन हयात असलेल्या इतर पुढाऱ्यांपेक्षां सर्वांवर जास्त पडतें. आणि सरकार व जनता या दोघांनाही त्यांचें मत वजनदार वाटतें. हा सभ्यपणा असला म्हणजेच Sweet Reasonableness हा गुण येतो. यांचा अभाव असला म्हणजे कित्येक वेळां डॉ जॉनसन यांनी देशभक्तीची जी व्याख्या केली आहे तिची सत्यता मनाला पटते. असो.

तेलंगांच्या अंगचा चौथा गुण म्हणजे त्यांचा वडीलजनां विषयीं आदर. आपल्या मतस्वातंत्र्याची फुशारकी आपल्या वृद्ध मातापितरांसमोर मिरविणे याला फारसें धैर्य लागत नाही. 'घरांत वाघोबा' अशा वृत्तीचींच माणसें जगांत फार. पण आपल्या मतांचें कृतींत पर्यवसान होत असतानां वडील जनांचें विनाकारण मन न दुखेल अशी खबरदारी घेणें व विनम्रपणानें वागणें यालाच मनोधैर्य ज्यास्त लागतें. व यानेंच कोणाही व्यक्तीच्या थोर किंवा उथळ व उच्छृंखल स्वभावाची परिक्षा होते. 'लोण्याहून मृदु व वज्राहून कठीण' असे आम्ही विष्णुदास आहोंत असें संतांस उद्देशून तुकाराम बोवांनीं म्हटलें आहे. त्याची कसोटी गृहस्थाश्रमाचें कार्य यथास्थित व दक्षतेनें चालविणाऱ्या माणसाच्या वर्तनक्रमांत ज्यास्त होतें. तेलंगांचें या बाबतींतील आचरण अत्यंत स्पृहणीय, उदारचरित व मनोरम असेंच होतें. या त्यांच्या वृत्तीमुळें त्यांना स्वतःलाच फार मानसिक कष्ट सोसावे लागले, व सार्वजनिक कार्यांत त्यांचें चारित्र्य जेवढें सतेज व्हावें तेवढें झालें नाहीं. तरी 'सुपुत्र' कसा असतो याचें त्यांनीं आपल्या अंगच्या

विनयानें, आज्ञाधारकत्वानें व सौजन्यानें चांगलेंच उदाहरण घालून दिलें 'शशिमाजी लांछनाची वहुशोभा दिसते.' या न्यायानें त्यांचें चारित्र्य या त्यांच्या प्रेमळपणानें फारच खुलून दिसतें. ज्या आईबापांनीं अत्यंत कष्ट सोसून आपणाला उत्तम दशेला आणिलें त्यांचा सदैव मान राखणें, त्यांना दुःख होईल असे वर्तन केव्हांही न करणें, त्यांना परम सुख देणें व जुन्या नव्याच्या संग्रामांत ते केवळ जुन्या तऱ्हेचे आहेत म्हणून पाणउतारा चुकूनसुद्धां न होईल अशी खबरदारी घेणें, व स्वतःच्या जिवाच्या बाबतींत त्यांच्या अज्ञानाला बळी पडून आत्मयज्ञ करणें हे गुण विरळा नाहींत असें म्हणणें म्हणजे म्हणणाऱ्याच्या अंतःकरणाला ओलावाच नाहीं असें कबूल करणें होय. तेलंगांना आपल्या वडिलांना बाजूला सारून कांहीं गोष्टी करणें फार कठीण नव्हतें, व तशा करण्यानें त्यांची जगांत वाहवाही झाली असती. आणि एकाअर्थी तसें करणें इष्टही होतें. पण एवढा कमकुवतपणा कबूल करून त्यांच्या वर्तनाचें रहस्य ओळखावयाचा जर आपण प्रयत्न केला तर त्यांच्या हरएक प्रासादिक कृतीविषयीं आपणांला त्यांचें कौतुकच करावेंसें वाटेल. साधारण व्यवसायांत पडणाऱ्या माणसाला त्यांचें वैयक्तिक आचरण आदर्शवत असें आहे. त्यांचें आचरण अत्यंत पवित्र, शुद्ध व सात्त्विक, सरळ व साधें असें होतें. पाश्चात्य संस्कृतीची खडानखडा माहिती त्यांना होती. आपल्या प्राचीन काळाचीही माहिती त्यांना उत्तम होती. त्यांचें दळणवळण नेहमीं युरोपीय, पारशी, मुसलमान यांच्यांत असे. तरी त्यांनीं आपली 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' सोडली नाहीं. तेलंग हे सौम्यवृत्तीचे, विचारवंत साधुतुल्य ज्ञानयुक्त उत्तम हिंदु गृहस्थ होते. सुधारणा म्हणजे अंध अनुकरण असा त्यांचा दृष्टिकोण नव्हता. या बाबतींत त्यांच्याच वृत्तीच्या दुसऱ्या तीन पूज्य व्यक्ती म्हणजे दादाभाई नवरोजी, रानडे व डॉ. भांडारकर या होत. शुद्ध, पवित्र, सरळ, शीलवंत, साधी राहणी ही या चौघांत विशेष दिसून येते. तेलंगांच्या अशा प्रकारच्या रहाणीला उद्देशूनच सर रेमन्ड वेस्ट यांनीं "His life was that of a meditative saint" असा त्यांच्याबद्दल उल्लेख केला असावा. विद्यार्थी दशेंत असल्यापासून तों पुढें ऐन उमेदींत व ऐश्वर्याच्या शिखरावर चढले असतांनासुद्धां त्यांच्या पोषाखांत, वागणुकींत किंवा चालण्याबोलण्यांत थाटमाट, दिमाख किंवा दिखाऊपणा बिलकुल शिरला नाहीं. याचे कारण त्यांचें मन खरें सुसंस्कृत झालें होतें. ज्याला सावधानवृत्ति म्हणतात ती त्यांच्या अंगीं पूर्ण बाणली होती. 'विवेकयुक्त वैराग्य' त्यांच्या हृदयांत पूर्ण बाणलें होतें. बाहेरचें ऐश्वर्य हें केवळ उत्तम कार्य करण्याचें एक साधन आहे. मनुष्यांत जर कांही राम नसेल तर हें ऐश्वर्य फोल होय. ज्याच्यांत राम आहे त्याला हें मिळालें न मिळालें सारखेंच; अशा प्रकारचा परिणाम त्यांच्या मनावर त्यांनीं अभ्यासिलेल्या मार्गांमुळें झाला होता. म्हणूनच लहानाबरोबर लहान, थोरांबरोबर थोर होऊन ते कोणाच्याही अंतःकरणाला विनाकारण न दुखवितां आपलें काम चोख करीत असत. न्या. रानडे यांनीं त्यांच्या स्वभावाची एक खुण अशी सांगितली आहे. ते म्हणतात "Never out of temper himself, he put others in the best of temper" म्हणजे स्वतः कधींही रागवायाचें नाहीं व दुसऱ्याचा राग नाहींसा करावयाचा एवढेंच नाहीं तर त्याला चांगला ताळ्यावर आणावयाचा अशी त्यांची वागणूक असे. तेलंग फक्त बुद्धीनें सतेज होते असें नाहीं तर अंतःकरणाचे थोर होते. मेहतांनीं त्यांचें वर्णन large of heart and brain असें केलें आहे. अंतःकरणाचा थोरपणा हें उत्तम शीलाचें लक्षण आहे. सुसंस्कृतीचें मुख्य लक्षण मेथ्युआर्नोल्ड यानें 'Sweetness and Light' असें केलें आहे. मृदुपणा, मनमिळाऊपणा, शांत व सहनशील वृत्ति व अहर्निश आपले विचार प्रगमनशील व्हावेत असा प्रयत्न करणे हे दोन गुण या लक्षणानें व्यक्त होतात. ते दोन्ही गुण तेलंगांत ओतप्रोत होते. त्यांचें वक्तृत्व म्हणजे ज्ञानसत्र होतें. वाणी रसाळ, भाषा सरळ, साधी, सुबोध, प्रमेयें स्पष्ट व विषयाची मांडणी पद्धतशीर असें त्यांचें वक्तृत्व होतें. त्यांत जेवढा मोहकपणा होता तेवढीच न्यायाची कदर होती. केव्हांही कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करावयाचा नाहीं हें त्यांतील मर्म होतें. ग्लॅडस्टन साहेबांनीं उत्तम वक्तृत्वाचें रहस्य measure या शब्दांत केलें आहे. ज्याच्या भाषणांत measure म्हणजे समतोलपणा नाहीं तें भाषण परिणामकारी

व्हावयाचें नाहीं. तेलंगांच्या प्रत्येक लेखांत व भाषणांत measure हाच गुण विशेष आहे. तोच गुण गोखल्यांत होता. रानड्यांनीं तेलंगांच्या वक्तृत्वाविषयीं there was more of light than heat in it असें म्हटलें आहे. सुसंस्कृत व परिपक्व विचारांशिवाय light किंवा measure ' विचार, उच्चार व आचार ' यांत कधींच येऊं शकत नाहींत.

तेलंग आपल्या वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षीं इहलोक सोडून गेले. येवढ्या लहान वयांत त्यांनीं अत्यंत यश मिळविलें. विद्वत्ता, राजकारणांतील भारदस्तपणा, कर्तृत्व, सार्वजनिक कार्यांतील त्यांचें वजन व वोज, देशांतील हरएक प्रगमनशील चळवळीशीं त्यांची तादात्म्यवृत्ति, उत्तम शील, शुद्ध व साधें आचरण, मनाचा मोहकपणा, सर्व जातींच्या व सर्व दर्जाच्या लोकांवर सारखीच छाप व सर्वांचें त्यांच्या वरील प्रेम व त्यांच्या बद्दलचा आदर यांचा विचार केला असतां आपल्यांत असा एक थोर पुरुष होऊन गेला ह्मणून मन आनंदानें उचंबळून जातें. त्याचप्रमाणें अशी विभूति अल्पायुषी होऊन देशास फार वेळ लाभली नाहीं ह्मणून मन दुःखानें खिन्न होतें. तेलंग आज हयात असते तर ६९ वर्षांचे असते. हल्लीं जगांत चाललेल्या घडामोडींत प्रामुख्यानें पुढाकार घेणाऱ्या थोर व्यक्ति जवळजवळ याच वयाच्या आहेत. हिंदुस्थानाच्या दुर्दैवानें त्याचे तीन सुपुत्र रानडे, तेलंग व गोखले हे लवकरच निजधामास गेले, त्यामुळें हिंदुस्थानाचें अपरिमित नुकसान झालें आहे. रानड्यांसारखे विशाल व खोल बुद्धीचे गृहस्थ आणखी दहा पधरा वर्षें जगते तर १९००-१९१७ पर्यंतच्या विशेष खळबळीच्या व घडामोडीच्या काळांत त्यांच्या परिपक्व बुद्धीचा व दूरदर्शी सल्ल्याचा आपल्या राष्ट्राला बिनमोल फायदा झाला असता. त्याचप्रमाणें मेहतांच्या बरोबर, तेलंग व तय्यबजी हे जास्त जगले असते तर या तिघांनीं आपल्या राजकीय चळवळीला निराळेंच व परिणत स्वरूप दिलें असतें. व राजकीय चळवळ म्हणजे केवळ बोलघेवड्यांचा व पोरांचा खेळ अशी स्थिति आली नसती. गोखल्यांच्या मृत्यूमुळें आपली केवढी हानी झाली आहे हें सांगावयास नको. कारण त्यांचा कर्तृत्वाची यादगिरी लोकांत अजून ताजी आहे. या पुढें आपणांतील ज्या कोणाला देशकार्य करावयाचें असेल किंवा आपलें जीवित खरोखरीं कोणत्याही मार्गानें पुण्यमय व प्रगमनशील करावयाचें असेल त्या प्रत्येकाला मागील पिढींत होऊन गेलेल्या तेलंग, रानडे मेहेता, दादाभाई, गोखले यांच्या चरित्राची आठवण आदर्शवत म्हणून कायम ठेविली पाहिजे. कारण मागील पिढींत होऊन गेलेल्या थोर व्यक्तींचें स्मरण व गुणचिंतन हे नवीन पिढींत उत्साह, जोम व शहाणपणा येण्याचें एक बिनमोल साधन आहे, व अशी स्मृति आपल्यांत पुन्हां एकदां जागृत करावी म्हणूनच 'लिहिलें तेंच पुनरपि लिहून' महाराष्ट्र सारस्वताच्या वाचकांना तसदी देण्याचें धाडस केलें, त्याबद्दल त्यांची क्षमा मागून हे दोन शब्द पुरे करितो.

---

# न्या. तेलंगांची थोरवी.

( न्या. तेलंगांच्या २६ व्या पुण्यतिथिप्रसंगींचें रा. रा. **माधव दामोदर [illegible]** एम. ए. यांचें भाषण. )

तेलंगांच्या विषयीं प्रत्यक्ष माहिती मला असणें शक्य नाहीं. तथापि त्यांचे लेख व त्यांचे चरित्र व त्यांच्या समकालीन माणसांचे—म्हणजे रानडे, मेहेता वगैरेंचे—इतिहास वाचून त्यांच्या काळाविषयीं ज्या एक दोन गोष्टी प्रमुखपणानें नजरेस येतात त्या मी सांगणार आहें. त्यांचा काळ व आतांचा काळ यांत फार फरक पडला आहे हें निर्विवाद आहे. दादाभाई वगैरे अगदीं पहिल्या पिढीचीं माणसें सोडल्यानंतर आपल्या बाजूला मेहता, तेलंग, रानडे यांचा काळ म्हणजे दुसऱ्या पिढीचा काळ असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांच्या नंतरचा काळ म्हणजे गोखले, टिळक, आगरकर यांचा काळ व अगदीं सरते शेवटचा म्हणजे आपण ज्यांत वावरतों तो काळ, त्याला कोणत्याही व्यक्तीच्या नावानें उल्लेखिण्याचा योग अजून आला

विनयानें, आज्ञाधारकत्वानें व सौजन्यानें चांगलेंच उदाहरण घालून दिलें 'शशिमाजी लांछनाची बहुशोभा दिसते.' या न्यायानें त्यांचें चारित्र्य या त्यांच्या प्रेमळपणानें फारच खुलून दिसतें. ज्या आईबापांनीं अत्यंत कष्ट सोसून आपणाला उत्तम दशेला आणिलें त्यांचा सदैव मान राखणें, त्यांना दुःख होईल असे वर्तन केव्हांही न करणें, त्यांना परम सुख देणें व जुन्या नव्याच्या संग्रामांत ते केवळ जुन्या तऱ्हेचे आहेत म्हणून पाणउतारा चुकूनसुद्धां न होईल अशी खबरदारी घेणें, व स्वतःच्या जिवाच्या बाबतींत त्यांच्या अज्ञानाला बळी पडून आत्मयज्ञ करणें हे गुण विरळा नाहींत असें म्हणणें म्हणजे म्हणणाऱ्याच्या अंतःकरणाला ओलावाच नाहीं असें कबूल करणें होय. तेलंगांना आपल्या वडिलांना बाजूला सारून कांहीं गोष्टी करणें फार कठीण नव्हतें, व तशा करण्यानें त्यांची जगांत वाहवाही झाली असती. आणि एकाअर्थी तसें करणें इष्टही होतें. पण एवढा कमकुवतपणा कबूल करून त्यांच्या वर्तनाचें रहस्य ओळखावयाचा जर आपण प्रयत्न केला तर त्यांच्या हरएक प्रासादिक कृतीविषयीं आपणांला त्यांचें कौतुकच करावेंसें वाटेल. साधारण व्यवसायांत पडणाऱ्या माणसाला त्यांचें वैयक्तिक आचरण आदर्शवत असें आहे. त्यांचें आचरण अत्यंत पवित्र, शुद्ध व सात्त्विक, सरळ व साधें असें होतें. पाश्चात्य संस्कृतीची खडानखडा माहिती त्यांना होती. आपल्या प्राचीन काळाचीही माहिती त्यांना उत्तम होती. त्यांचें दळणवळण नेहमीं युरोपीय, पारशी, मुसलमान यांच्यांत असे. तरी त्यांनीं आपली 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' सोडली नाहीं. तेलंग हे सौम्यवृत्तीचे, विचारवंत साधुतुल्य ज्ञानयुक्त उत्तम हिंदु गृहस्थ होते. सुधारणा म्हणजे अंध अनुकरण असा त्यांचा दृष्टिकोण नव्हता. या बाबतींत त्यांच्याच वृत्तीच्या दुसऱ्या तीन पूज्य व्यक्ती म्हणजे दादाभाई नवरोजी, रानडे व डॉ. भांडारकर या होत. शुद्ध, पवित्र, सरळ, शीलवंत, साधी राहणी ही या चौघांत विशेष दिसून येते. तेलंगांच्या अशा प्रकारच्या रहाणीला उद्देशूनच सर रेमन्ड वेस्ट यांनीं "His life was that of a meditative saint" असा त्यांच्याबद्दल उल्लेख केला असावा. विद्यार्थी दशेंत असल्यापासून तों पुढें ऐन उमेदींत व ऐश्वर्याच्या शिखरावर चढले असतांनासुद्धां त्यांच्या पोषाखांत, वागणुकींत किंवा चालण्याबोलण्यांत थाटमाट, दिमाख किंवा दिखाऊपणा बिलकुल शिरला नाहीं. याचें कारण त्यांचें मन खरें सुसंस्कृत झालें होतें. ज्याला सावधानवृत्ति म्हणतात ती त्यांच्या अंगीं पूर्ण बाणली होती. 'विवेकयुक्त वैराग्य' त्यांच्या हृदयांत पूर्ण बाणलें होतें. बाहेरचें ऐश्वर्य हें केवळ उत्तम कार्य करण्याचें एक साधन आहे. मनुष्यांत जर कांही राम नसेल तर हें ऐश्वर्य फोल होय. ज्याच्यांत राम आहे त्याला हें मिळालें न मिळालें सारखेंच; अशा प्रकारचा परिणाम त्यांच्या मनावर त्यांनीं अभ्यासिलेल्या मार्गांमुळें झाला होता. म्हणूनच लहानाबरोबर लहान, थोरांबरोबर थोर होऊन ते कोणाच्याही अंतःकरणाला विनाकारण न दुखवितां आपलें काम चोख करीत असत. न्या. रानडे यांनीं त्यांच्या स्वभावाची एक खुण अशी सांगितली आहे. ते म्हणतात "Never out of temper himself, he put others in the best of temper" म्हणजे स्वतः कधींही रागवायाचें नाहीं व दुसऱ्याचा राग नाहींसा करावयाचा एवढेंच नाहीं तर त्याला चांगला ताळ्यावर आणावयाचा अशी त्यांची वागणूक असे. तेलंग फक्त बुद्धीनें सतेज होते असें नाहीं तर अंतःकरणाचे थोर होते. मेहतांनीं त्यांचें वर्णन large of heart and brain असें केलें आहे. अंतःकरणाचा थोरपणा हें उत्तम शीलाचें लक्षण आहे. सुसंस्कृतीचें मुख्य लक्षण मेथ्युआर्नोल्ड यानें 'Sweetness and Light' असें केलें आहे. मृदुपणा, मनमिळाऊपणा, शांत व सहनशील वृत्ति व अहर्निश आपले विचार प्रगमनशील व्हावेत असा प्रयत्न करणे हे दोन गुण या लक्षणानें व्यक्त होतात. ते दोन्ही गुण तेलंगांत ओतप्रोत होते. त्यांचें वक्तृत्व म्हणजे ज्ञानसत्र होतें. वाणी रसाळ, भाषा सरळ, साधी, सुबोध, प्रमेयें स्पष्ट व विषयाची मांडणी पद्धतशीर असें त्यांचें वक्तृत्व होतें. त्यांत जेवढा मोहकपणा होता तेवढीच न्यायाची कदर होती. केव्हांही कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करावयाचा नाहीं हें त्यांतील मर्म होतें. ग्लॅडस्टन साहेबांनीं उत्तम वक्तृत्वाचें रहस्य measure या शब्दांत केलें आहे. ज्याच्या भाषणांत measure म्हणजे समतोलपणा नाहीं तें भाषण परिणामकारी

व्हावयाचें नाहीं. तेलंगांच्या प्रत्येक लेखांत व भाषणांत measure हाच गुण विशेष आहे. तोच गुण गोखल्यांत होता. रानड्यांनीं तेलंगांच्या वक्तृत्वाविषयीं there was more of light than heat in it असें म्हटलें आहे. सुसंस्कृत व परिपक्व विचारांशिवाय light किंवा measure ‘ विचार, उच्चार व आचार ’ यांत कधींच येऊं शकत नाहींत.

तेलंग आपल्या वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षी इहलोक सोडून गेले. येवढ्या लहान वयांत त्यांनीं अत्यंत यश मिळविलें. विद्वत्ता, राजकारणांतील भारदस्तपणा, कर्तृत्व, सार्वजनिक कार्यांतील त्यांचें वजन व वोज, देशांतील हरएक प्रगमनशील चळवळीशीं त्यांची तादात्म्यवृत्ति, उत्तम शील, शुद्ध व साधें आचरण, मनाचा मोहकपणा, सर्व जातींच्या व सर्व दर्जाच्या लोकांवर सारखीच छाप व सर्वांचें त्यांच्या वरील प्रेम व त्यांच्या बद्दलचा आदर यांचा विचार केला असतां आपल्यांत असा एक थोर पुरुष होऊन गेला ह्मणून मन आनंदानें उचंबळून जातें. त्याचप्रमाणें अशी विभूति अल्पायुषी होऊन देशास फार वेळ लाभली नाहीं ह्मणून मन दुःखानें खिन्न होतें. तेलंग आज हयात असते तर ६९ वर्षांचे असते. हल्लीं जगांत चाललेल्या घडामोडींत प्रामुख्यानें पुढाकार घेणाऱ्या थोर व्यक्ति जवळजवळ याच वयाच्या आहेत. हिंदुस्थानाच्या दुर्दैवानें त्याचे तीन सुपुत्र रानडे, तेलंग व गोखले हे लवकरच निजधामास गेले, त्यामुळें हिंदुस्थानाचें अपरिमित नुकसान झालें आहे. रानड्यांसारखे विशाल व खोल बुद्धीचे गृहस्थ आणखी दहा पधरा वर्षें जगते तर १९००–१९१७ पर्यंतच्या विशेष खळबळीच्या व घडामोडीच्या काळांत त्यांच्या परिपक्व बुद्धीचा व दूरदर्शी सल्ल्याचा आपल्या राष्ट्राला बिनमोल फायदा झाला असता. त्याचप्रमाणें मेहतांच्या बरोबर, तेलंग व तय्यबजी हे जास्त जगले असते तर या तिघांनीं आपल्या राजकीय चळवळीला निराळेंच व परिणत स्वरूप दिलें असतें. व राजकीय चळवळ म्हणजे केवळ बोलघेवड्यांचा व पोरांचा खेळ अशी स्थिति आली नसती. गोखल्यांच्या मृत्यूमुळें आपली केवढी हानी झाली आहे हें सांगावयास नको. कारण त्यांचा कर्तृत्वाची यादगिरी लोकांत अजून ताजी आहे. या पुढें आपणांतील ज्या कोणाला देशकार्य करावयाचें असेल किंवा आपलें जीवित खरोखरीं कोणत्याही मार्गानें पुण्यमय व प्रगमनशील करावयाचें असेल त्या प्रत्येकाला मागील पिढींत होऊन गेलेल्या तेलंग, रानडे मेहेता, दादाभाई, गोखले यांच्या चरित्राची आठवण आदर्शवत म्हणून कायम ठेविली पाहिजे. कारण मागील पिढींत होऊन गेलेल्या थोर व्यक्तींचें स्मरण व गुणचिंतन हे नवीन पिढींत उत्साह, जोम व शहाणपणा येण्याचें एक बिनमोल साधन आहे, व अशी स्मृति आपल्यांत पुन्हां एकदां जागृत करावी म्हणूनच ‘लिहिलें तेंच पुनरपि लिहून’ महाराष्ट्र सारस्वताच्या वाचकांना तसदी देण्याचें धाडस केलें, त्याबद्दल त्यांची क्षमा मागून हे दोन शब्द पुरे करितो.

---

# न्या. तेलंगांची थोरवी.

( न्या. तेलंगांच्या २६ व्या पुण्यतिथिप्रसंगींचें रा. रा. माधव दामोदर अळतेकर, एम. ए. यांचें भाषण. )

तेलंगांच्या विषयीं प्रत्यक्ष माहिती मला असणें शक्य नाहीं. तथापि त्यांचे लेख व त्यांचे चरित्र व त्यांच्या समकालीन माणसांचे—म्हणजे रानडे, मेहेता वगैरेंचे—इतिहास वाचून त्यांच्या काळाविषयीं ज्या एक दोन गोष्टी प्रमुखपणानें नजरेस येतात त्या मी सांगणार आहें. त्यांचा काळ व आतांचा काळ यांत फार फरक पडला आहे हें निर्विवाद आहे. दादाभाई वगैरे अगदीं पहिल्या पिढीचीं माणसें सोडल्यानंतर आपल्या बाजूला मेहता, तेलंग, रानडे यांचा काळ म्हणजे दुसऱ्या पिढीचा काळ असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांच्या नंतरचा काळ म्हणजे गोखले, टिळक, आगरकर यांचा काळ व अगदीं सरते शेवटचा म्हणजे आपण ज्यांत वावरतों तो काळ, त्याला कोणत्याही व्यक्तीच्या नावानें उल्लेखिण्याचा योग अजून आला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नं........
ता........

[illegible] चळवळीला [illegible] व्यक्ति हल्लींच्या कालांत अजून [illegible] स्पष्टपणें दिसूं लागली नाहीं. तेलंग, रानडे, मेहता, तय्यबजी, वाच्छा, यांच्या काळाला उद्देशून रानड्यांनींच आपल्या तेलंगांवरील व्याख्यानांत Telang school of thought and action असा नामनिर्णय केला आहे. या काळाचा एक मोठा विशेष जो कोणाही वर वर पाहाणाऱ्याच्यासुद्धां लक्षांत आल्याशिवाय रहात नाहीं तो हा कीं त्यावेळच्या प्रमुख मंडळीच्या ऐक्यांत हें पक्कें बसून गेलें होतें कीं राष्ट्राची वाढ जेव्हां होते तेव्हां ती सर्व बाजूंनीं सारखीच होते. व तशी सर्वांगीण वाढ करण्याला पूर्ण मदत करणें, निदान तशी वाढ होण्याला जे प्रयत्न करीत असतील त्यांच्या मार्गांत धोंडा न टाकणें हें विचारवंत पुढाऱ्यांचें पहिलें कर्तव्य होय.

दादाभाई, रानडे, मेहता, तेलंग हे अमुक आधीं कीं तमुक आधीं या वितंडवादांत पडले नाहींत. तेलंगांचें 'Should social reform precede political reform' हें व्याख्यान अँग्लो इंडियनाच्या पूर्वपक्षास उत्तर म्हणून दिलें गेलें. त्यांत सरतेशेवटीं सर्व तऱ्हेने चळवळ सारखीच चालली पाहिजे, शिक्षणाची व नवविचाराची ज्योत एकदा देशांत पेटली म्हणजे तिचा प्रकाश याच भागावर पडेल व दुसरीकडे पडणार नाहीं, असें म्हणणें म्हणजे बुद्धीचा कोतेपणा व्यक्त करणें होय. दुसरा या मंडळीचा विशेष म्हणजे ते सर्व जण आपापल्या विषयांत पूर्ण ज्ञानयुक्त व विचारी असे होते. लोकक्षोभ करण्याकरितां उगाच कांहीं तरी लिहिणें किंवा बरळणें हें त्यांना बिलकुल खपत नसे. 'शहाणपणा, नेमस्तपणा व दिशाभूल न होईल या बद्दल पूर्ण दक्षता बाळगणें' हें या काळांतील पुढाऱ्यांचें ब्रीद होतें. राजकीय बाबतींत तेलंग, मेहता व तैयबजी ही त्रिमूर्ति म्हणजे त्यावेळीं मुंबई शहराचें सारसर्वस्व होते. त्यांचें जसें लोकांत वजन त्याचप्रमाणें सरकारालाही दरारा असे. पार्शी, हिंदु व मुसलमान या तिन्ही वर्गांच्या एकीकरणाचें प्रत्यक्ष स्वरूप या मंडळींत दिसे आणि मुंबई शहरांत नागरिकत्वाला महत्व आणण्यास या मंडळीचे परिश्रम व उदाहरण हीं कारणीभूत झालीं हें सर्वांना माहीत आहे. हरएक महत्वाच्या सार्वजनिक प्रश्नावर मेहता, तेलंग, रानडे यांचें मत काय आहे हें समजण्याला ज्याप्रमाणें जनता त्याचप्रमाणें सरकार अत्यंत उत्सुक असे व ते जें कांहीं लिहितील व बोलतील त्यांत कांहीतरी खोल विचार व व्यवहार्य उपाय सुचविल्याशिवाय ते रहाणार नाहींत अशी जनता व सरकार या दोघांचीही पक्की खात्री असे. उगाच शब्दच्छळ किंवा पाल्हाळ, किंवा शिव्या शाप देऊन तोंडसुख घेणें किंवा टीकेचा भडिमार उडवून देणें हें त्यांच्या हातून चुकूनही होणार नाहीं असा त्यांच्याबद्दल पूर्ण विश्वास होता. व हेंच त्यांच्या कर्तबगारीचें खरें रहस्य होय. त्यामुळें कोणत्याही महत्वाच्या चर्चेंत इतरांना खेळखंडोबा करून, गोंगाट व कोलाहल यांच्या जोरावर, गोंधळ माजविण्यास सोपें जात नसे. लोकमत कसें बनवावें, लोकांना योग्य तें वेळींच सांगून शहाणे कसे करावें, व अशा लोकमताचा दुजोरा मिळवून त्याच्या साह्यानें सार्वजनिक कार्य तडीस कसें न्यावें हें त्यांना उत्तम कळत असे. तेलंग मेहता, रानडे हे केवळ अजगर वृत्तीचे कांही न करणारे व काळावर भरंवसा टाकून स्वस्थबसणारे नव्हते, तरी उगाच उतावीळपणा करून सर्वस्व गमावून अंगीकृत कार्याची हानी करणारे नव्हते. या दोन्ही मधला जो golden mean तो त्यांच्या अंतःकरणांत व कृतींत पूर्ण उतरला होता. म्हणून हल्लींच्या राजकीय परिस्थितींत कोणाही थोर व्यक्तीला जेवढा कार्यभाग करतां येणें शक्य आहे तेवढा त्यांनीं उत्तमपणें केला, येवढेंच नाहीं तर त्यांच्या शहाणपणानेंच लोकमताचा–लोकांच्या पुढाऱ्यांचा–दर्जा वाढून आणखी व्यापक कार्य करणें शक्य झालें.

या सर्व थोर पुरुषांत तिसरा विशेष म्हणजे त्यांचा बौद्धिक मोठेपणा. खुद्द तेलंगांच्या लेखांकडे पाहिलें असतां यथार्थ कोटिक्रम, सुन्दर भाषा सरणी, आणि निर्दोष विचार पद्धति व या सर्वांची इमारत दृढ अभ्यासाच्या पायावर उभारलेली असा प्रकार आढळून येतो. त्यांचा ' Free Trade and protection ' हा लेख वाचला म्हणजे त्यांच्या अर्थशास्त्राच्या खोल ज्ञानाचें कौतुक वाटतें. गोखले, तेलंग व रानडे यांच्यामध्यें हा विशेष आहे. कॉबडन साहेबांना उद्देशून मोर्ले म्हणतात कीं, ज्याचें अर्थ शास्त्राचे ज्ञान पूर्ण नाहीं त्याला आधुनिक काळांत मुत्सद्दि होतांच यावयाचें नाहीं. हल्लींचे राजकीय प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे आहेत. त्यांतील निरनिराळे धागे दोरे, सामाजिक

धार्मिक, आर्थिक व नैतिक प्रश्नांकडे जाऊन भिडतात. राजकारण दिवसेंदिवस inter national होऊं पहातें. तरी अर्थशास्त्राचें पूर्ण व व्यवहार्य ज्ञान असल्याशिवाय कोणताही राजकीय प्रश्न उत्तम सोडविणें हें अधिकाधिक कठीण होऊन बसलें आहे. रानडे, गोखले तेलंग यांना ज्या तऱ्हेनें हे आर्थिक प्रश्न अवगत होते तसे ते हल्लींच्या काळीं एकातरी राजकीय पुढाऱ्याला अवगत असतील किंवा नाहीं याचा मला संशय वाटतो. परवां नुकताच होऊं घातलेल्या Imperial preferenceच्या प्रश्नाची वाटाघाट चालली असतां हें आमच्यांतील गाढ अज्ञान एका थोर म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांच्या खाजगी बैठकींत चांगलेंच लक्ष्यांत आलें. असो. तेलंग, रानडे, गोखले, दादाभाई किंवा त्यावेळीं नांवारूपास आलेल्या कोणत्याही पुढाऱ्यांत अशा प्रकारचा उथळपणा दिसत नव्हता. समाजाचा मोठेपणा त्यांतील चांगल्या व मोठ्या माणसांवर अवलंबून आहे. सध्यां वाटेल त्या टारगट माणसानें पुढारीपणाचें सोंग आणावें असा जो प्रकार माजला आहे त्याचें अस्तित्व तेलंगांच्या काळीं शक्य नव्हतें. त्यांच्यासारखीं शीलवंत, ज्ञानवंत, विचारी मोठीं माणसें समाजांत होतीं. त्यामुळें अर्धवट आणि टारगट्या माणसांना वर तोंड काढण्याला संधीच मिळत नसे. गोखले व मेहता यांच्या मृत्यूपासून वरिष्ठ प्रतीच्या माणसांचा आपणाकडे जो दुष्काळ झाला आहे व त्यामुळें 'रंगबेगडी'च्या पुढारीपणाला जो ऊत आला आहे, त्याकडे पाहिलें म्हणजे तेलंगांच्या काळाबद्दल विशेष कौतुक वाटतें आणि त्यांचा कित्ता गिरविण्याची आज किती जरूरी आहे हें लक्षांत येतें, त्यांची पुण्यतिथि साजरी करून हाचधडा तरुण पिढीच्या मनावर बिंबविण्याची संधी मिळते. थोरांचें गुणवर्णन केव्हांही लाभप्रद व पुण्यदाई आहे. पण आपत्तीच्या काळांत त्या गुणचिन्तनाचा उपयोग आत्मजागृतीकडे होतो. तशी जागृति सर्व देशांत होऊन खरें नाणें कोणतें हें ओळखण्याची पात्रता लोकांत येऊन आपण सर्वजण खऱ्याचे भोक्ते होऊंया, सत्य तेंच आचरणांत आणण्यास शिकूं या.

# न्या. तेलंगांचें कार्य.

[ प्रि. दामोदर गणेश पाध्ये, एम. ए. यांनीं न्या. तेलंगांच्या २६ व्या पुण्यतिथि प्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण. ]

न्या. तेलंगांचा काळ व आजचा काळ यांची तुलना करितां व त्यावेळीं जी त्रयी मुंबई शहरांत सर्व सार्वजनिक कारभारांत पुढाकार घेत होती, त्या त्रयीची कर्तबगारी, तडफ, तिचें ज्ञान, शहाणपण व धोरण व हल्लीं वावरत असलेल्या पुढाऱ्यांचे वर्तन यांची तुलना केली असतां आपण पुढें गेलों किंवा मागें पडत आहों याचाच राहूनराहून संशय येतो. या त्रयी पैकीं तय्यबजींचा मला विशेष परिचय नव्हता. पण तेलंग व मेथा यांची व माझी ओळख दाट होती. ज्यांना ज्यांना मेहेतांच्या चेंबरमध्यें तेथें जाऊन चालत असलेल्या हरएक सार्वजनिक चर्चेचें प्रत्यक्ष ज्ञान असेल, त्या प्रत्येकाला तेथील वातावरण किती उच्च दर्जाचें होतें हें कळल्याशिवाय राहिलें नसतें. फेरोजशहा मेथा, यांची थोडीशी ओळख झाल्यावर पहिली भीति नाहींशी होऊन, त्या ज्ञानसत्राचा पूर्णफायदा तेथें येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला पूर्ण मिळत असे. तेथें व्यक्तिविषयक टीकेला बिलकुल थारा नसे. जें काम करावयाचें असेल तें उत्तम व लोकहिताला संवर्धक कसें करावयाचें, त्याच्या पूर्वयोजनेचा खल मेहेतांच्या चेंबरमध्यें रोजच्या रोज तासांचे तास होत असे. व तेव्हांच मेहतांचे वजन सर्व हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांवर येवढें कां पडत असे हें लक्षांत येई. नुसतें प्लॅटफार्मवर सरस भाषण करून सर्व कांहीं भागत नसतें. याचा प्रत्यक्ष अनुभव, या ज्या खाजगी सभा होत असत व त्यांच्या द्वारा दूरदूरच्या ठिकाणचीं व निरनिराळ्या तऱ्हांनीं जीं सूत्रें हालत, त्यामुळें येत असे. या सर्व व्यवहारांत तेलंग, तय्यबजी व मेहता यांची एकवाक्यता व एक जीव असे. एक पारसी, एक मुस-

ल्मान व एक हिंदु.व तिन्ही जण अव्वल प्रतीचीं माणसें असल्यामुळें त्यावेळचा मुंबईचा सार्वजनिक कारभार सर्व हिंदुस्थानास नमुनेदार होऊन राहिला होता. याचें एकच उदाहरण मुंबईतील 'इलवर्ट बिला'ची चळवळ.बंगाल्यांत व मद्रासेस या बिलानें युरोपियन व इंडियन यांच्यांत अत्यंत कटु वैमनस्य माजविलें होतें. तेथील वर्तमानपत्रांतून एकमेकांची नालस्ती व एकमेकांना शिवीगाळ होईपर्यंत स्थिति आली होती. फक्त मुंबई शहरांत गोष्ट एवढ्या निकराला पोहोंचली नव्हती. तरी येथील टाऊन हॉलमधील सभा व त्यांत झालेलीं भाषणें प्रत्यक्ष ऐकणाऱ्यांच्या व पहाणाऱ्यांच्या स्मृतिपटलावरून केव्हांही नाहींशीं होणार नाहींत अशीं होतीं. त्या सभेंत तेलंगांचें भाषण जवळ जवळ शेवटास झालें. लोक कंटाळून गेले होते. तेलंगांनी आपल्या रसाळ वक्तृत्वास सुरुवात करतांच सभा शांत व तटस्थ होऊन लोक एकाग्रचित्त झाले. तेलंगांच्या भाषणांत मुद्यावर मुद्दे—जसा शत्रुसैन्यावर हल्यावर हल्ला एकापाठून एक चढवितात तसे मांडण्यांत आले होते. त्यांनीं स्टीफन साहेबांच्या कोटीक्रमाला समर्पक उत्तर देऊन 'इलवर्ट बिला'चें समर्थन केलें. तें एवढें परिणामकारक झालें कीं, अँग्लो इंडियन पत्रकारांनांही माघार घ्यावी लागली. व सर्वत्र त्यांची वहावा होऊन सभा परम यशस्वी झाली. याच सभेला उद्देशून कोवर साहेबांनीं मुंबईच्या राजकीय वातावरणाची व चळवळीची अत्यंत प्रशंसा केली. तेलंग आपल्या सौजन्यानें व प्रेमळपणानें सर्व आबालवृद्धांना अत्यंत प्रिय होते. त्यांच्या वर्तनांत कोणचाही दोष असेल तर त्यांचा मृदुपणा हा होय. 'हिंदु युनियन क्लब' त्यांनीं सर्व हिंदूंत ऐक्य वाढून, जातीमत्सराचें भूत गाडण्याकरितां काढिला. त्यांना कितीही काम असलें तरी संध्याकाळच्या दोन घटका या क्लबांत घालविल्याशिवाय व आपल्या ज्ञानानें लोकांना पूनित केल्याशिवाय एक दिवस त्यांनीं जाऊं दिला नाहीं. त्यावेळीं बसल्या बसल्या गप्पांच्या रूपानें जो अनेक विषयांची व पुस्तकांची भारदस्त, मार्मिक व विनोदप्रचुर चर्चा होत असे त्यामुळें अनेकांच्या मनाला उत्तम वळण लागलें. ते दिवस कोणीही विसरणार नाहीं. व ज्यांनी ते अनुभविले असतील त्यांना हल्लींचा काळ किती क्षुल्लक व पोंचट आहे हें वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

ग्रंथ संग्रहालय ठाणे. नं.......... ता.......... नाशिक

# न्या. तेलंगांच्या पुण्यतिथीची आवश्यकता.

लेखक;—रा. रा. यशवंत नारायण भेंडे.

"The bowl may be broken, the cord may snap, but that which is precious remains." I mean the example of a noble life.

LORD HARRIS.

गेल्या आगष्ट महिन्याचे १९ तारखेस गौ. सा. ब्रा. मित्र मंडळानें न्या. तेलंगांची पुण्यतिथि साजरी केल्यानंतर कितीएक मित्र प्रश्न करूं लागले कीं, तेलंग जाऊन आज दोन तपांवर काळ गेला व इतक्या अवधींत आमच्या राजकीय व सामाजिक ध्येयांत व व्यवहारांत किती तरी बदल झाला, असें असतां मित्र मंडळानें ही पुण्यतिथि, आज सहा सात वर्षें दरसाल नियमानें साजरी करावी असें तेलंगांमध्यें विशेष लक्षण तें काय होतें? हा त्यांचा प्रश्न प्रांजल बुद्धीनें व शुद्ध हेतूनें केला असल्यामुळें त्याचें यथामति निराकरण करणें युक्त वाटतें.

न्या० तेलंगांमध्यें असें विशेष तें काय होतें हें एकाच शब्दांत सांगावयाचें, म्हणजे ते "स्थिरधि" होते. त्यांची जिज्ञासाबुद्धी इतकी प्रबळ व उज्वल होती कीं ते आमरणान्त छात्रवृत्तींत राहिले व आपणास छात्र म्हणवून घेण्यांत त्यांस एका प्रकारें गौरवच वाटत असे. ह्या प्रवृत्तीचा अंकुर त्यांच्यांत अगदीं बालपणापासूनच दिसत होता, म्हणूनच आपल्या

अगदीं तारुण्यदशेंत युरोपीय पंडितांवर आपलें लेखनास्त्र टाकण्यास ते सज्ज झाले, व हिंदूंचें रामायण प्रसिद्ध होमर कवीच्या काव्याची नक्कल असल्याबद्दलच्या सिद्धांताचें व भगवद्गीतेचा बायबलाशीं बादरायण संबंध जोडण्याच्या क्लप्तीचें त्यांनीं मुद्देसूद खंडण करून त्यांस हतवीर्य केलें. एवंच, जें गीतारहस्य आपणामधील कितीएक विद्वज्जनांनीं आपल्या आयुष्याच्या पांच तपांनंतर आपणांपुढें ठेविलें तें त्यांनीं आपल्या आयुष्यास दोन तपें उलटतात न उलटतात तोंच जगांतील सर्व विद्वन्मंडळापुढें परकीय भाषेंत त्रोटक रीतीनें सादर करून आपलें त्या भाषेवरील प्रभुत्व व दांडगा विद्याव्यासंग त्यांचे निदर्शनास आणिला व त्यांजकडून वाहवा मिळविली. हा त्यांचा विद्याव्यासंग पुढें एवढा बलवत्तर झाला कीं ते पूर्व तयारी न करतां कोणत्याही विषयाचें विवेचन मार्मिक रीतीनें सहज करूं शकत व ही त्यांची पद्धत एवढी उदात्त व मनोहर असे कीं त्यांचें भाषण ऐकत असतां श्रोतृगण एकनाथ महाराजांच्या

> **सप्रेम भावार्थें मीनला श्रोता ।**
> **मुक्तही उल्हासे सांगे कथा ॥**
> **तेथील सुखाची सुखस्वादुता ।**
> **जाणे जाणता सवर्म ॥**

या ऊक्तीप्रमाणें उल्हसित होई.

सन १८८९ सालीं ते न्यायासनावर अधिष्ठित झाल्यानंतर एल्फिन्स्टन कॉलेजांतील विद्यार्थ्यांचें एक सम्मेलन भरलें होतें. ते दिवशीं कै० ले० कीर्तीकर हे " विचारस्वातंत्र्य " या विषयावर एक निबंध वाचणार होते, व मि० वर्डस्वर्थ अध्यक्षस्थान मंडित करणार होते. परंतु आदले दिवशीं रात्रीं प्रकृतीचे अस्वास्थ्यामुळें मला उद्यां समारंभास येववणार नाहीं असें पत्र वर्डस्वर्थ साहेबांनीं सम्मेलनाच्या चिटणीसांस पाठविलें, तेव्हां दुसरे दिवशीं, म्हणजे समारंभाचे दिवशीं सकाळीं सम्मेलनाचे चिटणीस व व्यवस्थापक मंडळापैकीं दुसरे दोन गृहस्थ तेलंगांकडे, ते आपलें काम संपवून स्नानास जाण्याचे तयारींत असतां गेले व त्यांना वर्डस्वर्थ साहेबांचें पत्र दाखवून आपण आज अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी विनंती केली. ती त्यांनीं आपल्या नेहमींच्या सौजन्यानुरूप स्वीकारून ते आपलें कोर्टांतील काम आटोपून संध्याकाळीं संमेलनास आले. कितींकरांचा निबंध त्यांच्या विद्वत्तेस साजेसा पूर्ण माहितीनें भरलेला होता. तो त्यांनीं सुमारें एक तासपर्यंत वाचून दाखविल्यानंतर तेलंग हे बोलावयास उठले व कांहीं एक पूर्व तयारी नसतां, ( कारण तसें करण्यास त्यांस चिटणीसांनीं व पर्यायानें वर्डस्वर्थ साहेबांनीं अवसरच दिला नव्हता )त्यांनीं कितींकरांच्या निबंधांतील वादग्रस्त मुद्द्यांचा असा खरपूस समाचार घेतला कीं सर्व विद्यार्थीसमूह आनंदानें डोलूं लागला. वेळ फार झाल्यामुळें ते आपलें भाषण संक्षेपांत आणूं लागले, तेव्हां चोहोंकडून " चालूं द्या चालूं द्या " असा एक रवानें गजर होऊन, 'आम्हांस अशा बौद्धिक मेजवानीपुढें नेहमीच्या उपहाराची कांहीं एक किंमत वाटत नाहीं' असे उद्गार निघूं लागले.

अहाहा काय तो प्रसंग ! किती मृदुवचनी ती त्यांची जिव्हा व किती आल्हाददायक तो त्यांच्या वाणीमधून स्त्रवणारा अमृतासारखा शब्दरूप रस ! अझून सुद्धां त्या महान विभूतीच्या आयुष्यांतील अशा केवढ्या तरी प्रसंगाचें स्मरण होऊन दुःखाश्रूंला पूर येतो व काय आम्ही हतभागी कीं अशी ती विभूती आम्हास फार काळपर्यंत लाभली नाहीं असें वाटून मन खिन्न होतें !

अलाहाबाद कांग्रेस मधील लॉर्ड डफरीनचे भाषणावरील त्यांचें टिकात्मक भाषण सुद्धां याच मासल्याचें ( म्हणजे पूर्वतयारी नसतां केलेलें ) होतें असें म्हणतात. तें ज्यांनीं ऐकलें किंवा वाचलें असेल त्यांना त्यांची समयसूचकता व समर्पक दृष्टांत देण्याची पद्धत किती थोर दर्जाची होती हें दिसून आल्याशिवाय राहिलें नसेल.

त्यांचें अंतःकरण अत्यंत शुद्ध व प्रेमळ असे. ते आपल्या प्रतिपक्षावर कधीही तोंडसुख घेत नसत, व उगीच एखाद्या क्षुल्लक विषयाला महत्व देऊन वितंडवाद करणें त्यांस आवडत नसे. एके प्रसंगीं केसरीकारांनीं त्यांचे एका भाषणावर ओंगळ टीका केली असतां त्यांस प्रत्युत्तर देण्याचें त्यांनीं नाकारलें. परंतु कै० आगरकरांना हा केसरीकारांचा उद्दामपणा सहन झाला नाहीं व त्यांनीं आपल्या सुधारक पत्रांत एक लेख लिहून तेलंगांच्या भाषणांतील सयुक्तिकता जनतेपुढें ठेविली. त्यांचा स्वभाव अगदीं निगर्वी असे, ते

ज्याप्रमाणें थोर माणसांत त्याचप्रमाणें अगदीं लहान मुलांत मिळून मिसळून वागत. ते " हिंदु युनियन क्लब " चे अध्वर्यु असून तेथील मंडळीस ते आपल्या अध्ययनाचा व विद्वत्तेचा लाभ अहर्निश देत. त्यांना इंग्रजी शब्दमिश्रित मराठी भाषेचा अत्यंत तिटकारा असे. त्याजबद्दल त्यांनीं आपल्या क्लबांत कडक नियम करून एक प्रकारची शिस्त घातली होती.

त्यांचा वडील, शिष्टजनांविषयींचा आदर अतिस्पृहणीय होता. कै. रानड्यांसारखी त्यांची पितृभक्ति अगदीं जाज्वल्य असे. एखाद्या क्षुल्लक गोष्टीनें सुद्धां आपल्या पित्याचें मन दुखवूं नये अशी ते खबरदारी घेत. याबद्दलची एक गोष्ट येथें विदित केल्यास वावगें होणार नाहीं. ते युनिव्हर्सिटीचे सिंडिक असल्यामुळें त्यांस नेहमीं सेनेटचे सभेस जावें लागे. व या सभा जुलै, आगस्ट किंवा हिंदुंचे आषाढ, श्रावण मासीं भरत. अशी एखादी सभा श्रावणमासाचे सोमवारीं असली म्हणजे आमच्या तेलंगांस फारच अडचण पडे. कारण त्यांचे वडील पुराणमताभिमानी असल्यामुळें त्यांचे येथें श्रावण मासांत दर सोमवारीं प्रदोषकाळीं शंकराची षोडशोपचारें पूजा करून ब्राह्मण सुवासिनीस पंक्तीस घेऊन कुटुंबांतील सर्व मंडळीं एकत्र भोजनास बसण्याचा प्रघात असे. तेलंगांस घरीं येण्यास उशीर झाला म्हणजे अर्थातच मंडळीचा खोळंबा होई. अशा वेळीं ते घरीं आले असतां त्यांची मुद्रा एखाद्या लहान अपराधी मुलाप्रमाणें दिसे. ते त्वरित स्नान करून सोंवळें नेसून मंडळींत येत व आपले पात्रावर बसून मुकाट्यानें भोजन करीत. व भोजन झाल्यानंतर घरांतील एखाद्या समंजस मुलास जवळ घेऊन मला उशीर झाल्याबद्दल तात्या ( हें त्यांच्या वडिलांचें घरगुती नांव होतें ) रागावले होते काय, ह्मणून विचारीत.

वाग्देवीचा जणूं काय त्यांजवर वरदहस्तच होता. ते इंग्रजींत किंवा मराठींत अस्खलित भाषण करीतच परंतु सन १८८२ सालीं 'एज्युकेशन कमिशन' मधील काम आटोपून कलकत्त्याहून परत येत असतां वाटेंत ते जेव्हां आपल्या प्राचीन विद्यापिठीं म्हणजे काशी क्षेत्रीं गेले, तेव्हां तेथील पंडितांचे विनंतीवरून त्यांनीं त्यांचे सभेंत संस्कृत भाषेत बराच वेळ भाषण करून त्यांजकडून प्रशंसापत्र मिळविलें.तसेंच सन१८८६सालीं सम्मतिवयाचे कायद्याविरुद्ध कै० रा. सा. मंडलिकांचे अध्यक्षतेखालीं माधवबागेंत भरलेल्या प्रचंड सभेंत आपल्या समोरील श्रोत्यांमध्यें गुर्जर बंधूंचा विशेष भरणा आहे असें पाहिल्यावरोबर त्यांनीं त्या सभेंत आपलें भाषण गुजराथींत केलें.

प्रथमतः ते आपला समाज सदसद्विवेकशक्तीच्या अनुरोधानें सुधारावा अशा मताचे होते. परंतु पुढें पुढें विवेक बाजूस राहून विकार जोरावतो व उन्नत विचारांवर काजळी धरून 'तूर्त दान महा पुण्य' अशी आमच्या समाजाची स्थिति होते हें जेव्हां त्यांच्या लक्षांत आलें, तेव्हां समाजावर विवेकग्राह्य गोष्टींचा अंम्मल बाह्य शक्तीच्या जोरावर लादला पाहिजे असें त्यांचें मत बनलें. त्यांच्या लेखांमध्यें किंवा भाषणांमध्यें कुत्सित कल्पनांचा, किंवा व्यर्थी आणि विषतुल्य कटु शब्दांचा ( म्हणजे जेणेंकरून आपल्या सामनेवाल्याचें काळीज करपुन जाऊन त्याचा आपला संबंध तुटावा ) पूर्ण अभाव असे; म्हणूनच ते एका थोर संस्कृत कवीनें म्हटल्याप्रमाणें नृपति व जनपदांमधील एक दुर्लभ कार्यकर्ते होऊन गेले. असें सांगतात कीं, लार्ड रेसाहेब मुंबईचे गव्हर्नर असतांना प्रत्येक कामांत यांचा सल्ला घेत व याची साक्ष त्यांच्या भाषणांत दिसून येई, कारण त्यांचें असें एकहि भाषण नसे कीं ज्यांत तेलंगांचा उल्लेख नाहीं.

ते येथील 'स्टुडंटस लिटररी आणि सायंटिफिक सोसायटी'चे पुष्कळ वर्षेपर्यंत चिटणीस व पुढें अध्यक्ष होते. आमच्या हिंदू ज्ञातींतील दुही मोडून आपणामध्यें ऐक्य वाढावें या हेतूनें त्यांनीं 'हिंदु युनीयन क्लबा'ची स्थापना करून कांहीं वर्षांनीं तेथें हेमंतोत्सव व्याख्यान माला सुरू केली व त्यांतील पहिलें पुष्प आपण स्वतः गुंफिलें. प्रेसिडेन्सी ॲसोसिएशनच्या व कांग्रेसच्या उत्पादकांपैकीं ते एक होते. रॉयल एशिआटिक सोसायटीच्या मुंबईतील शाखेचे पहिले एतद्देशीय अध्यक्ष तेच होत. व ही सर्व कामगिरी त्यांनीं आपल्या अवघ्या ४३ वर्षांच्या आयुष्यांत बजाविली. तेव्हां शिरोभागीं म्हटल्याप्रमाणें किंवा ज्ञानेश्वरांनीं सांगितल्याप्रमाणें—

देखैं भूतजात निदैलें । तेथेंचि जया पाहलें ।
आणि जीव जेथ चेइले । तेथनिद्रित जो ॥

तोचि तो निरुपाधि । अर्जुना जो स्थिरबुद्धि ।
तोचि जाणे निरवधि । मुनीश्वर ॥

ते "स्थिरधि" "मुनीश्वर" नव्हते असें कोण म्हणेल? त्यांचे अकालीं मृत्यूमुळें आमची केवढी हानी झाली हें पहाणें असल्यास त्यांच्या मृत्यूनंतर सतत एक महिनाभर जे लेख येथील इंग्रजी दैनिकांत येत असत ते वाचले असतां खात्री होईल.

येथपर्यंत स्थूल मानानें तेलंगांतील विशेष कोणचा, हें दाखविण्याचा प्रयत्न केला. आपणांतील थोर पुरुषांचें स्मरण आपणांला जेवढें जास्त होईल तेवढी आपल्या उन्नतीला अधिक मदत होईल. तेव्हां तेलंगांची पुण्यतिथि आज कां करण्यांत येते, हा प्रश्नच मुळांतच चुकीचा आहे. शील, विचार व वाणी ह्यांनीं जो थोर, ज्यानें आपल्या अल्पवयांत देशाच्या प्रत्येक चळवळींत पुढाकार घेऊन, आपल्या अंगच्या सौजन्यानें, बुद्धीच्या प्रखर तेजानें, विद्वत्तेनें व दूरदर्शी समंजस अशा वाक्चातुर्यानें, लेखनशैलीनें व युक्तायुक्त कार्यक्षमतेनें आपलें नांव सर्वतोमुखीं केलें, त्या विभूतीची पूजा आपण करूं नये, तिचें वारंवार स्मरण करूं नये असें प्रतिपादणें ह्मणजे आपल्यांतील पुढील पिढीचा मोठा अपराध करण्यासारखें आहे.

---

# ज्ञातिसमाचार.

## सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी.

या संस्थेची १८ वी वार्षिक सभा रविवार, ता. ३१ ऑगस्ट १९१९ रोजीं सायंकाळीं स्टँ. वे. ४ वाजतां सँढर्स्ट रोडवरील मराठा हायस्कूलच्या दिवाणखान्यांत भरली होती. डॉ. **जनार्दनपंत नेरूरकर** यांच्या सूचनेनुरूप अध्यक्षस्थानीं श्रीयुत **शिवाजी कृष्ण परूळकर**, यांची योजना करण्यांत आली होती. १९१८ सालचा वार्षिक रिपोर्ट मंजूर करण्यांत आल्यावर नवीन सालाकरितां निवडून आलेल्या व्यवस्थापक मंडळाच्या सभासदांचीं नांवें मतमत्रकान्वयें पुढीलप्रमाणें जाहीर करण्यांत आलीं:—श्रीयुत यशवंत हणमंत सुखठणकर, रा. ब. आनंदराव सदाशिव दळवी, एम्. ए., डॉ. जनार्दन शंकर नेरूरकर, बी. एससी., एल. एम्. ॲन्ड एस., डी. पी. एच., श्रीयुत अनंतराव वासुदेव सवनीस, बी. ए., श्रीयुत नरसिंह भाऊ ठाकूर, श्रीयुत शिवराम नारायण कानविंदे, बी. ए., श्रीयुत रघुनाथ नारायण देसाई, श्रीयुत नारायण विनायक पालेकर, श्रीयुत रामराव सांताप्पा पडबिद्री, एम्. ए., एस. टी. सी., श्रीयुत श्रीपाद व्यंकटेश भरणे, श्रीयुत नारायण रामकृष्ण किनरे, बी. ए,, एलएल. बी., व श्रीयुत वामन पुण्डलिक वर्दे, बी. कॉम्., नवीन सालासाठीं श्रीयुत श्रीपाद यशवंत करंडे व श्रीयुत जयवंत पांडुरंग वेलिंगकर यांस हिशोब तपासनीस निवडण्यांत आलें. डॉ. विठ्ठल भा. सुखठणकर व रा. श्रीपाद भरणे यांच्या प्रश्नास प्रमुखत्वें रा. अनंतराव सवनीस व रा. कापडी यांजकडून पद्धतशीर उत्तर मिळाल्यावर नंतर अध्यक्षांचें भाषण झालें. त्यांत संस्थेच्या आश्रयदात्यांचें व व्यवस्थापक मंडळाच्या अविश्रांत श्रमाबद्दल त्यांचें त्यांनीं अभिनन्दन करून संस्थेच्या १७ वर्षांच्या कारकीर्दींत तिच्या हातून झालेल्या कामगिरीबद्दल संतोष व्यक्त केला. संस्थेचा विद्यार्थी–मदतीचा व इतर खर्च सभासदांकडून सालोसाल मिळणाऱ्या वर्गणीवर हल्लींप्रमाणें अंशतःसुद्धां अवलंबून न ठेवितां तो सर्व खर्च व्याजांतून भागेल इतका मोठा रिझर्व्ह फंड जमवून संस्थेस कायमची बळकटी आणण्याची खटपट सर्वांनीं करावी असें सांगून असा सुयोग, संस्थेच्या रौप्य जुबिलीच्या वेळीं, आलेला पाहण्यास मिळो अशी त्यांनीं आशा प्रदर्शित केली. ज्ञातींत शिक्षणप्रसाराचें काम, सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी, दाभोळकर स्कॉलर्शिप बोर्ड व राजाध्यक्ष स्कॉलरशिप बोर्ड या संस्थांनीं मोठ्या प्रमाणावर सुरू केल्याबद्दल त्यांनीं आनन्द प्रदर्शित करून कोऑपरेटिव्ह बँकिंग व कोऑपरेटिव्ह हाऊसिंग हे प्रश्न सोडविण्याकडे ज्ञातींतील लहान थोर माणसांचें लक्ष लागणें हल्लींच्या काळीं अत्यंत जरुरीचें आहे,

असें आपलें मत दिलें. व स्थापन झालेल्या सारस्वत बँकिंग सोसायटीला व हाऊसिंग योजनेला मनःपूर्वक हातभार लावण्यावद्दल त्यांनीं सर्वांस विनंति केली. ज्ञातीची खानेसुमारी होणें अत्यंत आवश्यक असल्यामुळें व यापूर्वी रा. गणपतराव लाड व त्यांचे मित्र मंडळ यांनीं हातीं घेतलेलें हें काम त्यांनीं व त्यांच्या मित्रमंडळोनें पूर्ण करून डायरेक्टरी तयार करण्यावद्दल त्यांनीं सूचना केली, " सारस्वत महाजन वाडीप्रीत्यर्थ श्री. शिरोळकरांच्या एक लाख रुपयांच्या उदार देणगीवद्दलचा त्यांनीं साभिमान आनंद व्यक्त करतांच मंडळींनीं टाळ्यांचा गजर केला. नंतर मुंबई युनिव्हर्सिटीच्या गेल्या मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या ज्ञातींतील विद्यार्थिनींत कुमारी मनोरमाबाई रामराव नाडकर्णी पहिल्या आल्यामुळें त्यांना संस्थेची "विठ्ठल बाळकृष्ण कोरगांवकर" स्कॉलर्शिप द्यावयाची असल्याचें त्यांनीं जाहीर करून, संस्थेस पुढील नवीन 'तहाहयात' सभासद मिळाल्याचे कळविलें:- ( १ ) श्रीमती रखमाबाई आनंदराव दळवी ( शिंव ), ( २ ) श्रीमती सौ० लक्ष्मीबाई नरसिंह ठाकूर ( वांद्रें ) ( ३ ) श्रीमती सौ० लक्ष्मीबाई विष्णुपंत परूळकर ( मुंबई ), ( ४ ) श्री. माधवराव विठ्ठल सामत ( वांद्रे ), ( ५ ) श्री. माधवराव चिंतामण देशपांडे ( कोल्हापूर ), ( ६ ) श्री. मंगेश नीळकंठ नाडगोंडा, एल. सी. ई. ( बेळगांव ), ( ७ ) डॉ. भगवंतराव सखाराम पाटकर, एल. आर. सी. पी. ( वांद्रें ), ( ८ ) श्री. गणपतराव नारायण महाजन ( हुबळी ), व ( ९ ) श्री. जिवाजी कृष्ण परूळकर ( मुंबई ) तसेंच रा. ब. सखाराम विश्वनाथ राजाध्यक्ष, एल. सी. ई., जे. पी. यांनीं आपली पत्नी कै. सौ. " जानकीबाई सखाराम राजाध्यक्ष " यांच्या नांवें स्कॉलर्शिपफंड स्थापन करण्याकरितां ५००० रु. मूळ किंमतीच्या ३॥ टक्के दराच्या ग. प्रा. नोटी, श्रीयुत गोविंद मल्लिनाथ ठेंगे, बी. ए. यांनीं आपले मामेभाऊ कै. श्री. "नानुजी सूर्याजी महात्मे " यांच्या नांवें स्कॉलरशिपफंड स्थापन करण्याकरितां २४०० रु. मूळ किंमतीचे ५ टक्के दराचे गव्हर्मेंट लोन व श्रीयुत विष्णुपंत जनार्दन शिरोळकर यांनीं, त्यांनीं स्थापन केलेल्या " विष्णु व भगवान " स्कॉलरशिपफंडांत भर घालण्याकरितां ७०० रु. मूळ किंमतीचे ५॥ टक्के दराचे वॉर बान्ड, या देणग्या संस्थेकडे सभेच्या आठवड्यांत पाठविल्याचें अध्यक्षांनीं टाळ्यांच्या गजरांत जाहीर केलें.

नंतर चिकित्सक समूह, मराठा हायस्कूल वगैरे संस्थांनीं वेळोवेळीं जागा देऊन साहाय्य केल्यावद्दल त्यांचे, तसेंच क्रॉनिकल, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, जगद्वृत्त, महाराष्ट्रसारस्वत वगैरे वर्तमानपत्रकारांचे आभार मानण्यांत आल्यावर श्रीयुत **गणपतराव विश्वनाथ लाड** यांनीं अध्यक्षांचे आभार मानले व त्यास श्री. **नरसिंह भाऊ ठाकूर** यांनीं अनुमोदन दिल्यावर सभा विसर्जन झाली.

या संस्थेच्या १० व्या नियमान्वयें व्यस्थापक मंडळाच्या या १२ सभासदांनीं आपल्यामधून पुढील कामगार निवडले आहेत:—**अध्यक्ष**—रा. ब. आ. स. दळवी, **उपाध्यक्ष**—श्रीयुत ना.वि. पालेकर **ऑ. सेक्रेटरीज**—श्रीयुत शि ना. कानविंदे व रा. य. ह. सुखठणकर, **ऑ. ट्रेझरर**—रा.र. ना. देसाई व रा. श्री. व्यं. भरणे.

**कॅप्टन दाभोळकर**—महायुद्धाच्यावेळीं सालोनिका येथें गुर्खा सैन्याच्या तुकडीवरोवर डॉक्टरचें काम ज्यांनीं अत्यंत व्यवस्थितपणें व समाधानकारक रीतीनें केलें ते डॉक्टर अनंत यशवंत दाभोळकर, बी.एस. सी., एम. बी. बी. एस., आय. एम. एस. यांची नेमणूक इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें कायम करण्यांत आली असून त्यांस कॅप्टनचा बहुमानाचा दर्जा प्राप्त झाला आहे हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. कॅ० दाभोळकर हे १९१५ सालीं मेसेपोटेमिया येथें गेले व आज पावेतों रणांगणांतच त्यांनीं काम केलें आहे. मेसेपोटेमियांत असतांना त्यांना दोन वेळां शत्रुची गोळी लागली. परंतु ईश्वरानें त्यांचा बचाव केला. त्यांची कर्तबगारी लक्षांत आणून बादशहांकडून त्यांस " मिलिटरी क्रॉस " देण्यांत आला. जनरल मार्शल यांनीं त्यांची आपल्या रिपोर्टांत फार प्रशंसा केली आहे. सध्यां हे काकेसस पर्वताच्या जवळच्या प्रदेशांत काम करीत आहेत. उत्तरोत्तर यांची कीर्ति वृद्धिंगत होवो.

**मद्रास युनिव्हर्सिटी** एम. ए. या परीक्षेंत पसार झालेल्या आमच्या बंधूंचीं नांवें खालीं दिलीं आहेत. त्यांचा पुढील जीवनक्रम यशस्वी होवो असें आम्ही अंतःकरणपूर्वक इच्छितों.

व्ही. एन्. कुडव, गोपाळकृष्णराव, एस. भवानीं शंकरराव, के. शेषगिरीराव, एस. रामराव. आणि व्ही. के. लक्ष्मणराव.

**केंब्रिज येथील ' स्मिथ्स प्राइजमन**—दक्षिण कानड्यांतील रा. आर. यू. सवूर नांवाचे विद्यार्थि विलायतेस विद्याभ्यासासाठीं गेले होते. विख्यात खगोल शास्त्रवेत्ता सर आयझॅक न्यूटन यांच्या नांवाचें विद्यावेतन रा. सवूर यांस मिळालें होतें. केंब्रिज येथील विद्यालयांत त्यांनीं गणित शास्त्राचा अभ्यास चालवून तेथील युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत ते उत्तीर्ण झाले. हल्लींच त्यांस डॉक्टर ऑफ सायन्स ( D. Sc. ) ही पदवी प्राप्त झाली आणि गणीत शास्त्रांतील प्राविण्याबद्दल " स्मिथ्स प्राइज " हें बहुमानाचें पारितोषक मिळालें. हा मान मिळविणारे हे पहिलेच हिंदु विद्यार्थि असून त्यांतही सारस्वत ब्राह्मण आहेत, याबद्दल आम्हांस अभिमान वाटतो. यांच्या ज्ञानापासून या देशाचा फायदा होवो हीच आमची इच्छा.

## योग्य स्मारक

"**नानूज ब्रास वर्क्स** नांवाच्या लोखंडी व पितळीच्या कारखान्याचे उत्पादक व चालक रा. नानुजी सूर्याजी महात्मे यांचें अकालिक निधन झाल्यास जवळ जवळ वर्ष झालें. त्यांच्या कुटुंबावर दुष्ट काळानें घाला घातला व अल्पकालांत त्यांची एकुलती एक कन्या, त्यांची पत्नी व ते इहलोक सोडून गेल्यामुळें त्यांच्या वयोवृद्ध मातेवर जो प्रसंग गुदरला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे ! अशा रीतीनें कालवश झालेल्या या कुटुंबाच्या मालमत्तेची व्यवस्था पाहण्याचें काम कै. नानुजींचे निकट आप्त रा. गोविंद मल्लिनाथ ठेंगे यांनीं पतकरून त्यांच्या स्मरणार्थ दरसाल विद्यार्थ्यांस बक्षिस किंवा विद्यावेतन देण्यासाठीं सारस्वत विद्यार्थि सहाय्यक मंडळीकडे (धंदेशिक्षण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यास स्कॉलरशिप देण्यासाठीं) रु. २४०० व पुणे येथें कर्मवीर रा. धोंडो केशव कर्वे यांनीं स्थापन केलेल्या हिंदी स्त्रियांच्या विश्वविद्यालयास विद्यार्थिनीस विद्यावेतन देण्याकरितां रु २४०० दिले. या प्रमाणें अत्यंत श्रेष्ठ अशा विद्याप्रसाराच्या कार्याशीं कै. नानुजी यांचें नांव चिरकाल संलग्न राहील अशी योजना रा. ठेंगे यांनीं केली, याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. परधनाचा अभिलाष न धरतां त्याचा योग्य विनियोग करणें हें देखील पुण्यकृत्यच होय.

* * *

श्रीक्षेत्र नाशिक येथील **श्रीमत् गौडपादाचार्यांच्या मठाच्या** अंतर्बाह्य शोचनीय स्थितीबद्दल नाशिक येथील ज्ञातिगृहस्थांकडून आमचेकडे टीकात्मक विस्तृत असा एक लेख आला असून चौकशीअंतीं त्यांत बराच तथ्यांश आहे असें आम्हांस आढळून येत आहे. या स्थितीसंबंधानें स्वामीकडे तिकडील सारस्वत ब्रह्मवृंदाकडून विनंति पत्र गेलें असतांही त्याचा मुळींच विचार झाला नाहीं व त्याची पोंचही देण्यांत आली नाहीं, ही स्थिति शोचनीय होय ! आलेला लेख निराशेच्या तीव्र भरांत लिहिला आहे, तथापि श्रीस्वामीकडून अद्यापिही या बाबींचा विचार होईल अशी आम्हांस आशा आहे. लेख उशीरां हातीं आल्या कारणानें स्थलाभावामुळें या खेपेस आम्हांस प्रसिद्ध करतां आला नाहीं याबद्दल दिलगीर आहों. पुढील अंकीं त्यास स्थल देण्यांत येईल, व श्रीस्वामीच्या खुलाशास योग्य अवसर देऊन तदनंतर आम्हांस त्या बाबतींत काय लिहावयाचें तें लिहूं.

* * *

**तेलंगांची पुण्यतिथि**—सालाबादप्रमाणें येथील गौडसा. ब्रा. मित्रमंडळातर्फे न्या. तेलंगांची पुण्यतिथि ता. १९ ऑगष्ट १९१९ रोजीं हिराबागेच्या दिवाणखान्यांत साजरी करण्यांत आली. प्रारंभीं संस्थेचे चिटणीस रा. सदानंद लक्ष्मण कापडी, B. A. B. Sc. यांनीं सभेची आमंत्रणपत्रिका वाचून दाखविल्यावर रा. गणपत विश्वनाथ लाड यांनीं प्रिन्सिपॉल दामोदर गणेश पाध्ये यांस अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति केली. विनंति करतांना त्यांनीं प्रि. पाध्ये यांची राजकीय व सामाजिक कामगिरी, प्रमुखत्वें मराठी भाषेची त्यांनीं निरनिराळ्या द्वारें केलेली सेवा, यांचा उल्लेख करून आजच्या स्वतंत्र विचारांच्या विद्वान व बाणेदार व्याख्यात्यांच्या व्याख्यानास सर्वतोपरी योग्य अध्यक्ष मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. या विनंतीस रा. नारायण बळवंत देशपांडे यांनीं योग्य शब्दांत अनुमोदन दिल्यावर प्रि. पाध्ये हे स्वस्थानापन्न झाले व त्यांनीं व्याख्याते रा. माधव दामोदर अळतेकर एम. ए. यांस भाषण करण्यास विनंति केली. तेलंगांविषयीं प्रत्यक्ष माहिती नसतांही त्यांचे लेख, चरित्र व त्यांच्या समकालीन माणसांचे इतिहास वाचून त्यांच्या कालाविषयीं प्रामुख्यानें नजरेपुढें येणाऱ्या दोनचार गोष्टींचा त्यांनीं उल्लेख केला. फेरोजशहा, बद्रुद्दीन तैयबजी व तेलंग या

त्रिमूर्तींच्या तत्कालीन कामगिरीचें मूर्तिमंत शब्दचित्र त्यांनीं अत्यंत प्रेमानें, आदरानें व हास्यमुखानें श्रोतृवृंदापुढें उभें केलें. (त्याचा सारांश स्वतंत्र लेखरूपानें याच अंकांत दुसरीकडे दिला आहे ) व त्या थोर पुरुषाविषयीं आदर व्यक्त करण्याची संधि दिल्याबद्दल मित्रमंडळाचे आभार मानून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. यानंतर अध्यक्ष प्रि. पाध्ये यांचें भाषण झालें. मुंबई शहराचें सारसर्वस्व असे मेथा, तेलंग, बद्रुद्दिन यांच्या कालाचा–त्यावेळच्या सामाजिक, राजकीय वातावरणाचा–त्रोटक इतिहास सांगून हिंदु, मुसलमान, पार्शी या तिन्ही वर्गांच्या एकीकरणांत तेलंगांचें अंग किती प्रामुख्यानें होतें हें प्रेमभरांत त्यांनीं निवेदन केलें. ( हें भाषण आज दुसरीकडे संक्षेपानें दिलें आहे. )

यानंतर गौड सा. ब्रा. मित्रमंडळाचे अध्यक्ष रा. व्यंकटेश अनंत मैजरकर यांनीं ज्ञातिगृहस्थ रा. रा. **विष्णु जनार्दन शिरोळकर** यांनीं सारस्वत महाजनवाडीसाठीं एक लाखाची उदार देणगी देण्याचा संकल्प केल्याचें जाहिर केलें. गौड सा. ब्रा. ज्ञातीच्या इतिहासांत केवळ ज्ञातिहितार्थ एक लाखाची उदार देणगी देण्याच्या या दुसऱ्या सुयोगाबद्दल मंडळींनीं टाळ्यांच्या गजरांत आनंद व्यक्त केला. या सात्विक दानाचें महत्व रा. दुभाषी यांनीं मोजक्या शब्दांत सांगितल्यावर अध्यक्षांच्या सूचनेवरून रा. शिरोळकर यांचे आभार टाळ्यांच्या गजरांत मानले. अध्यक्षांचे व व्याख्यात्यांचे आभार रा. रा. शिवराम ना. कानविंदे, बी ए. यांनीं मानले व सभेचें काम संपलें.

## अभिनंदन.

### श्री. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष, B. A., I. C. S.

रा. ब. सखाराम विश्वनाथ. राजाध्यक्ष, L. C. E. J. P. Executive Engineer, यांचे ज्येष्ठ चिरंजीव व वॉलेस कंपनींतील श्री. मंगेशराव विश्वनाथ राजाध्यक्ष यांचे पुतणे, श्रीयुत गणपतराव हे या वर्षी सिव्हिल सर्व्हीसची परीक्षा पास होऊन त्यांत त्यांचा नंबर दुसरा आला हें वर्तमान कळविण्यास आम्हांस फार आनंद वाटतो.

रा. गणपतराव हे मुंबई विश्वविद्यालयाची म्याट्रिक्युलेशन परीक्षा इ.स. १९०२ सालीं म्हणजे आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी पास झाले. त्यानंतर २॥ वर्षें त्यांचा अभ्यास येथील Elphinstone College मध्यें झाला. इ.स. १९१३ सालीं हे प्रिव्हियस परिक्षा १ ल्या वर्गांत व १९१४ त इन्टरमिजिएट परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास झालें. बी. ए. च्या वर्गांतही यांना शिष्यवृत्ती मिळत होती. बी. ए. च्या वर्गांत असतांनाच १९१५ सालीं ते आपला पुढील अभ्यास केंब्रिज विश्वविद्यालयांत करण्याकरितां इंग्लंडला गेले. १९१८ सालीं त्यांची Cambridge Natural Science Tripos (B. A. degree ) परीक्षा होऊन तींत त्यांनीं फर्स्ट क्लास ऑनर्स मिळविले. त्या परिक्षेंत त्यांना कांहीं पारितोषिकेंही मिळालीं.

I. C. S. परिक्षेंत विद्यार्थ्यांच्या वयोमर्यादेंत किंवा अभ्यासक्रमांत युरोपियन किंवा हिंदी असा भेद केला जात नाहीं. यामुळें हिंदी विद्यार्थ्यांना युरोपियन विद्यार्थ्यांपेक्षां परिक्षेंत जास्त अडचणी असतात. हिंदी विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेचा अभ्यास करण्यांत कांहीं वर्षें घालवावीं लागतात. तेव्हां ही वयाची तूट भरून काढून परदेशांत जाऊन सारख्याच अटींवर आपल्या युरोपीयन बांधवांबरोबर चढाओढी करणें व त्यांतून यशस्वी रीतीनें पार पडणें हें एक दिव्यच असतें. तेव्हां श्री. गणपतरावजी हे या दिव्यांतून पहिल्याच खेपेला पार पडले, एवढेंच नव्हे, तर एकंदर विद्यार्थ्यांत त्यांनीं दुसरा नंबर पटकाविला हें त्यांस भूषणास्पद होय.

मुंबई इलाख्यांत असलेल्या गौड सारस्वत समाजांत I. C. S. ची परीक्षा पास झाल्याचें हें दुसरें उदाहरण होय. श्री. जी. डी. माडगांवकर, डिस्ट्रिक्ट जज्ज, धुळें, हे १८९१ तील पहिले सारस्वत I.C.S होत.

श्री. गणपतराव यांच्या पूर्वअभ्यासक्रमाविषयीं थोडीशी माहिती येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं. त्यांचें मराठी व इंग्रजी प्राथमिक शिक्षण त्यावेळीं त्यांचे वडील बेळगांव व विजापूर येथें असल्यामुळें त्या शहरीं झालें. १९०९ सालीं हे इंग्रजी ४ थ्या इयत्तेंत असतांना " बेळगांव डिस्ट्रिक्ट स्कॉलरशिप " परीक्षेला बसले होते. (१३ वर्षांच्या आंतील मुलांनाच या परीक्षेला बसतां येतें ) या परीक्षेंत यांचा पहिला नंबर आल्यामुळें यांना ४ वर्षें सरकारी शिष्यवृत्ति मिळाली. १९०९ सालीं त्यांच्या वडिलांनीं त्यांना

मुंबई येथें Elphinstone H. school मध्यें अभ्यास करण्यासाठीं आपले बंधु मंगेशराव यांजकडे पाठविलें. तेथें तीन वर्षेंपर्यन्त म्हणजे १९१२ सालीं म्याट्रिक परीक्षा होईतों त्यांचा अभ्यास झाला. नंतर त्यांनीं एल्फिन्स्टन कालेजांत २॥ वर्षें, म्हणजे मे १९१५ त इग्लंडला जाईपर्यंत, अभ्यास केला.

रा. गणपतराव यांचें कालेजचें शिक्षण रा. लागू यांच्या नेतृत्वाखालीं झालें हेंही येथें सांगितलें पाहिजे. लागू हे एक प्रसिद्ध विद्याव्य'संगी शिक्षक आहेत. हे त्यावेळीं E. हायस्कूलमध्यें असिस्टंट मास्तर व कॉलेजमध्यें कांहीं वेळ असिस्टंट प्रोफेसर होते. रा. गणपतराव यांनीं मिळविलेल्या विजयाचें बरेंचसें श्रेय रा. लागू यांनीं त्यांच्या शिक्षणाच्या व शील बनविण्याच्या बाबतींत दाखविलेल्या वात्सल्यालाच आहे. तसेंच रा. देशमूख—हेही रा. लागू यांचेच एक विद्यार्थी असून रा. गणपतराव यांचे सहाध्यायी होते—यांच्या बरोबर वयाच्या १८ व्या वर्षी गणपतरावजींना इंग्लंडला पाठविण्यास अनुमोदन देण्यास रा. लागू यांचें प्रोत्साहन थोडेंसें कारणीभूत झालें. रा. देशमुख हे १९१८ सालीं I C S परीक्षेंत पहिले आले व रा. गणपतराव हे या वर्षी दुसरे आले. आपण एवढ्या कळकळीनें तयार केलेल्या आपल्या दोन शिष्यवरांनीं इंग्लंडमध्यें हा जो मान मिळविला त्यामुळें रा. लागू यांना कितीतरी समाधान व आनंद झाला असेल.

इंग्लडमध्यें असतांना १९१७ च्या जूलैमध्यें गणपतरावांवर अकालिक मातृवियोगाचें दुर्धर संकट कोसळलें. आपल्यापासून आपल्या प्रिय मुलाला बराच काळ दूर पाठविण्याच्या विचारानें त्यांच्या मातेच्या हृदयाला जरी बरेंच दुःख झालें तरी तिनें रा. गणपतरावांना विलायतेला जाण्याला आनंदानें संमती दिली. आपला अभ्यासक्रम संपवून व यश मिळवून योग्य वेळीं ते परत केव्हां येतील म्हणून त्या मार्गप्रतिक्षा करीत होत्या. परंतु मनीषा पूर्ण होण्याच्या अगोदरच त्या साध्वीनें हें जग सोडून जावें अशी ईश्वराची इच्छा होती !

श्री. गणपतराव यांचें घराणें मुंबईंतील सन्मान्य गौड सारस्वत ब्राह्मण घराण्यांत मोडतें. त्यांचे वडील राव बहादूर सखाराम विश्वनाथ राजध्यक्ष हे संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचे आद्य पुरस्कर्ते होत. तसेंच त्यांचे चुलते रा. मंगेशराव येथील प्रख्यात वॉलेस कंपनींत मोठ्या जागेवर असून ज्ञातींतील होतकरू मुलांच्या शिक्षणार्थ वगैरे त्यांनीं ५० हजार रुपये दिले आहेत.

सिव्हीलियन श्री. गणपतराव यांना दीर्घायुष्य प्राप्त होवो व त्यांच्या व्यवसायांत त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो असें आम्ही अंतःकरणपूर्वक इच्छितों.

**आमचे क्रिकेटपटु**—आपल्या ज्ञातिबंधूंनीं बऱ्याच गोष्टींत कीर्ति संपादन केली आहे त्यांपैकीं क्रिकेटचा खेळ ही एक बाब होय. या खेळांत आपल्या ज्ञातिबंधूंनीं बरेंच नैपुण्य मिळविलें आहे ही गोष्ट दरवर्षी हिंदूंच्या वतीनें चौरंगी सामन्यांत(Quadrangular Tournament) खेळण्याकरितां अकरा असामी जे घेतले जातात त्यांपैकीं निदान आपल्या तिघांतरी ज्ञातिबंधूंची निवड होते यावरून सिद्ध होतें. आपल्या ज्ञातींतील क्रिकेटपटूंचें अग्रेसरत्व—हिंदू क्रिकेटपटूंचें अग्रेसरत्व म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं—**रा० मुकुंदराव पै** यांनीं पटकावलें आहे व त्यांचेकडेसच हिंदु टीमचें धुरीणत्व (captaincy) बरीच वर्षें अव्याहत चालू आहे. यांनीं केलेली हिंदु क्रिकेटची सेवा सर्वविश्रुत आहे. यंदाचे हंगामांत (season)रा. पै यांचें बॅटिंग फार बहारीचें झालें. कित्येक सामन्यांत नाणावलेल्या पारशी व मुसलमान गोलंदाजांना (Bowlers) यांनीं अगदीं जेरीस आणिलें. ता. १७ सप्टेंबर रोजीं इस्लाम जिमखान्याबरोबर झालेल्या सामन्यांत तर रा. पैनीं कमाल करून सोडली. हिंदु जिमखान्याच्या वतीनें खेळण्यांत पहिले जाऊन १८३ धांवांचा प्रचंड स्कोअर केला व शेवटपर्यंत अजिंक्य राहिले. यापूर्वी त्यांनीं बऱ्याच centuries केल्या आहेत. पण त्या दिवशींच्या खेळांत त्यांनीं चारांचे व सहांचे फटके मारून आपलें अजब कौशल्य चांगलेंच लोकनिदर्शनास आणलें. त्यांच्या या अजब बॅटिंगपुढें महमदी बोलींगची कशी विल्हेवाट लागली याचें यथार्थ वर्णन 'बॉम्बे क्रॉनिकल' पत्रानें केलें आहे. तें येणेंप्रमाणें:—

If the Islam Gymkhana are not a particularly strong batting side they are no amateurs in bowling and yet M. D. Pai

त्रिमूर्तींच्या तत्कालीन कामगिरीचें मूर्तिमंत शब्दचित्र त्यांनीं अत्यंत प्रेमानें, आदरानें व हास्यमुखानें श्रोतृवृंदा पुढें उभें केलें. (त्याचा सारांश स्वतंत्र लेखरूपानें याच अंकांत दुसरीकडे दिला आहे ) व त्या थोर पुरुषाविषयीं आदर व्यक्त करण्याची संधि दिल्याबद्दल मित्रमंडळाचे आभार मानून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. यानंतर अध्यक्ष प्रि. पाध्ये यांचें भाषण झालें. मुंबई शहराचें सारसर्वस्व असे मेथा, तेलंग, बद्रुद्दिन यांच्या कालाचा–त्यावेळच्या सामाजिक, राजकीय वातावरणाचा–त्रोटक इतिहास सांगून हिंदु, मुसलमान, पार्शी या तिन्ही वर्गांच्या एकीकरणांत तेलंगांचें अंग किती प्रामुख्यानें होतें हें प्रेमभरांत त्यांनीं निवेदन केलें. ( हें भाषण आज दुसरीकडे संक्षेपानें दिलें आहे. )

यानंतर गौड सा. ब्रा. मित्रमंडळाचे अध्यक्ष रा. व्यंकटेश अनंत मैजरकर यांनीं ज्ञातिगृहस्थ रा. रा. **विष्णु जनार्दन शिरोळकर** यांनीं सारस्वत महाजनवाडीसाठीं एक लाखाची उदार देणगी देण्याचा संकल्प केल्याचें जाहिर केलें. गौड सा. ब्रा. ज्ञातीच्या इतिहासांत केवळ ज्ञातिहितार्थ एक लाखाची उदार देणगी देण्याच्या या दुसऱ्या सुयोगाबद्दल मंडळींनीं टाळ्यांच्या गजरांत आनंद व्यक्त केला. या सात्विक दानाचें महत्व रा. दुभाषी यांनीं मोजक्या शब्दांत सांगितल्यावर अध्यक्षांच्या सूचनेवरून रा. शिरोळकर यांचे आभार टाळ्यांच्या गजरांत मानले. अध्यक्षांचे व व्याख्यात्यांचे आभार रा. रा. शिवराम ना. कानविंदे, बी ए. यांनीं मानले व सभेचें काम संपलें.

## अभिनंदन.

### श्री. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष, B. A., I. C. S.

रा. ब. सखाराम विश्वनाथ. राजाध्यक्ष, L. C. E. J. P. Executive Engineer, यांचे ज्येष्ठ चिरंजीव व वॉलेस कंपनींतील श्री. मंगेशराव विश्वनाथ राजाध्यक्ष यांचे पुतणे, श्रीयुत गणपतराव हे या वर्षीं सिव्हिल सर्व्हीसची परीक्षा पास होऊन त्यांत त्यांचा नंबर दुसरा आला हें वर्तमान कळविण्यास आम्हांस फार आनंद वाटतो.

रा. गणपतराव हे मुंबई विश्वविद्यालयाची म्याट्रिक्युलेशन परीक्षा इ.स. १९०२ सालीं म्हणजे आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षीं पास झाले. त्यानंतर २॥ वर्षें त्यांचा अभ्यास येथील Elphinstone College मध्यें झाला. इ.स. १९१३ सालीं हे प्रिव्हियस परिक्षा १ ल्या वर्गांत व १९१४ त इन्टरमिजिएट परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास झाले. बी. ए. च्या वर्गांतही यांना शिष्यवृत्ती मिळत होती. बी. ए. च्या वर्गांत असतांनाच १९१५ सालीं ते आपला पुढील अभ्यास केंब्रिज विश्वविद्यालयांत करण्याकरितां इंग्लंडला गेले. १९१८ सालीं त्यांची Cambridge Natural Science Tripos (B. A. degree ) परीक्षा होऊन तींत त्यांनीं फर्स्ट क्लास ऑनर्स मिळविले. त्या परिक्षेंत त्यांना कांहीं पारितोषिकेंही मिळालीं.

I. C. S. परिक्षेंत विद्यार्थ्यांच्या वयोमर्यादेंत किंवा अभ्यासक्रमांत युरोपियन किंवा हिंदी असा भेद केला जात नाहीं. यामुळें हिंदी विद्यार्थ्यांना युरोपियन विद्यार्थ्यांपेक्षां परिक्षेंत जास्त अडचणी असतात. हिंदी विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेचा अभ्यास करण्यांत कांहीं वर्षें घालवावीं लागतात. तेव्हां ही वयाची तूट भरून काढून परदेशांत जाऊन सारख्याच अटींवर आपल्या युरोपीयन बांधवांबरोबर चढाओढी करणें व त्यांतून यशस्वी रीतीनें पार पडणें हें एक दिव्यच असतें. तेव्हां श्री. गणपतरावजी हे या दिव्यांतून पहिल्याच खेपेला पार पडले, एवढेंच नव्हे, तर एकंदर विद्यार्थ्यांत त्यांनीं दुसरा नंबर पटकाविला हें त्यांस भूषणास्पद होय.

मुंबई इलाख्यांत असलेल्या गौड सारस्वत समाजांत I. C. S. ची परीक्षा पास झाल्याचें हें दुसरें उदाहरण होय. श्री. जी. डी. माडगांवकर, डिस्ट्रिक्ट जज्ज, धुळें, हे १८९१ तील पहिले सारस्वत I. C. S होत.

श्री. गणपतराव यांच्या पूर्वअभ्यासक्रमाविषयीं थोडीशी माहिती येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं. त्यांचें मराठी व इंग्रजी प्राथमिक शिक्षण त्यावेळीं त्यांचे वडील बेळगांव व विजापूर येथें असल्यामुळें त्या शहरीं झालें. १९०९ सालीं हे इंग्रजी ४ थ्या इयत्तेंत असतांना "बेळगांव डिस्ट्रिक्ट स्कॉलरशिप" परीक्षेला बसले होते. (१३ वर्षांच्या आंतील मुलांनाच या परीक्षेला बसतां येतें ) या परीक्षेंत यांचा पहिला नंबर आल्यामुळें यांना ४ वर्षें सरकारी शिष्यवृत्ति मिळाली. १९०९ सालीं त्यांच्या वडिलांनीं त्यांना

मुंबई येथें Elphinstone H. school मध्यें अभ्यास करण्यासाठीं आपले बंधु मंगेशराव यांजकडे पाठविलें. तेथें तीन वर्षेपर्यन्त म्हणजे १९१२ सालीं म्याट्रिक परीक्षा होईतों त्यांचा अभ्यास झाला. नंतर त्यांनीं एलिफन्स्टन कालेजांत २॥ वर्षे, म्हणजे मे १९१५ त इग्लंडला जाईपर्यंत, अभ्यास केला.

रा. गणपतराव यांचें कालेजचें शिक्षण रा. लागू यांच्या नेतृत्वाखालीं झालें हेंही येथें सांगितलें पाहिजे. लागू हे एक प्रसिद्ध विद्याव्यासंगी शिक्षक आहेत. हे त्यावेळीं E. हायस्कूलमध्यें असिस्टंट मास्तर व कॉलेजमध्यें कांहीं वेळ असिस्टंट प्रोफेसर होते. रा. गणपतराव यांनीं मिळविलेल्या विजयाचें बरेंचसें श्रेय रा. लागू यांनीं त्यांच्या शिक्षणाच्या व शील बनविण्याच्या बाबतींत दाखविलेल्या वात्सल्यालाच आहे. तसेंच रा. देशमूख—हेही रा. लागू यांचेच एक विद्यार्थी असून रा. गणपतराव यांचे सहाध्यायी होते—यांच्या बरोबर वयाच्या १८ व्या वर्षीं गणपतरावजींना इंग्लंडला पाठविण्यास अनुमोदन देण्यास रा. लागू यांचें प्रोत्साहन थोडेंसें कारणीभूत झालें. रा. देशमुख हे १९१८ सालीं I C S परीक्षेंत पहिले आले व रा. गणपतराव हे या वर्षी दुसरे आले. आपण एवढ्या कळकळीनें तयार केलेल्या आपल्या दोन शिष्यवरांनीं इंग्लंडमध्यें हा जो मान मिळविला त्यामुळें रा. लागू यांना कितीतरी समाधान व आनंद झाला असेल.

इंग्लडमध्यें असतांना १९१७ च्या जूलैमध्यें गणपतरावांवर अकालिक मातृवियोगाचें दुर्धर संकट कोसळलें. आपल्यापासून आपल्या प्रिय मुलाला बराच काळ दूर पाठविण्याच्या विचारानें त्यांच्या मातेच्या हृदयाला जरी बरेंच दुःख झालें तरी तिनें रा. गणपतरावांना विलायतेला जाण्याला आनंदानें संमती दिली. आपला अभ्यासक्रम संपवून व यश मिळवून योग्य वेळीं ते परत केव्हां येतील म्हणून त्या मार्गप्रतिक्षा करीत होत्या. परंतु मनीषा पूर्ण होण्याच्या अगोदरच त्या साध्वीनें हें जग सोडून जावें अशी ईश्वराची इच्छा होती !

श्री. गणपतराव यांचें घराणें मुंबईतील सन्मान्य गौड सारस्वत ब्राह्मण घराण्यांत मोडतें. त्यांचे वडील राव बहादूर सखाराम विश्वनाथ राजाध्यक्ष हे संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचे आद्य पुरस्कर्ते होत. तसेंच त्यांचे चुलते रा. मंगेशराव येथील प्रख्यात वॉलेस कंपनींत मोठ्या जागेवर असून ज्ञातींतील होतकरू मुलांच्या शिक्षणार्थ वगैरे त्यांनीं ५० हजार रुपये दिले आहेत.

सिव्हीलियन श्री. गणपतराव यांना दीर्घायुष्य प्राप्त होवो व त्यांच्या व्यवसायांत त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो असें आम्ही अंतःकरणपूर्वक इच्छितों.

**आमचे क्रिकेटपटु**—आपल्या ज्ञातिबंधूंनीं बऱ्याच गोष्टींत कीर्ति संपादन केली आहे त्यांपैकीं क्रिकेटचा खेळ ही एक बाब होय. या खेळांत आपल्या ज्ञातिबंधूंनीं बरेंच नैपुण्य मिळविलें आहे ही गोष्ट दरवर्षी हिंदूंच्या वतीनें चौरंगी सामन्यांत (Quadrangular Tournament) खेळण्याकरितां अकरा असामी जे घेतले जातात त्यांपैकीं निदान आपल्या तिघांतरी ज्ञातिबंधूंची निवड होते यावरून सिद्ध होतें. आपल्या ज्ञातींतील क्रिकेटपटूंचें अग्रेसरत्व—हिंदू क्रिकेटपटूंचें अग्रेसरत्व म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं—**रा० मुकुंदराव पै** यांनीं पटकावलें आहे व त्यांचेकडेसच हिंदु टीमचें धुरीणत्व (captaincy) बरीच वर्षे अव्याहत चालू आहे. यांनीं केलेली हिंदु क्रिकेटची सेवा सर्वविश्रुत आहे. यंदाचे हंगामांत (season) रा. पै यांचें बॅटिंग फार बहारीचें झालें. कित्येक सामन्यांत नाणावलेल्या पारशी व मुसलमान गोलंदाजांना (Bowlers) यांनीं अगदीं जेरीस आणिलें. ता. १७ सप्टेंबर रोजीं इस्लाम जिमखान्याबरोवर झालेल्या सामन्यांत तर रा. पैनीं कमाल करून सोडली. हिंदु जिमखान्याच्या वतीनें खेळण्यांत पहिले जाऊन १८३ धांवांचा प्रचंड स्कोअर केला व शेवटपर्यंत अजिंक्य राहिले. यापूर्वी त्यांनीं बऱ्याच centuries केल्या आहेत. पण त्या दिवशींच्या खेळांत त्यांनीं चारांचे व सहांचे फटके मारून आपलें अजब कौशल्य चांगलेंच लोकनिदर्शनास आणलें. त्यांच्या या अजब बॅटिंगपुढें महमदी बोलींगची कशी विल्हेवाट लागली याचें यथार्थ वर्णन 'बॉम्बे क्रॉनिकल' पत्रानें केलें आहे. तें येणेंप्रमाणेः—

If the Islam Gymkhana are not a particularly strong batting side they are no amateurs in bowling and yet M. D. Pai

made the Islam bowling as simple as A. B. C."

आपल्या सारस्वत ज्ञातीस भूषणभूत झालेल्या या ज्ञातिबंधूच्या कर्तबगारीबद्दल आमचा सारस्वतवर्ग त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करील अशी आमची खात्री आहे. यांच्या बॅटिंगप्रमाणें यांचे फील्डींग—क्रिकेटमधील दुसरी महत्त्वाची शाखा—प्रशंसनीय आहे व या शाखेंत पालवणकर बंधू (विठ्ठल, गणपत व शिवराम) शिवाय यांचे तोडीचा हिंदु खेळाडूंत कोणीही नाहीं. नेमस्त संवयीमुळें झालेली निकोप प्रकृति व या खेळास आवश्यक असा धिमेपणा या दोन गोष्टी आमच्या ज्ञातिबंधूंच्या यशास कारणीभूत झाल्या आहेत. यंदांही हिंदु टीमचें आधिपत्य यांचेकडेसच येईल व चौरंगी सामन्यांत विजयश्री यांना माळ घालील अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

टेनिस खेळण्यांत प्राविण्य संपादन केलेले रा. **रामराव आत्माराम** ऊर्फ **मोतीरामभाई वागळे** हे निष्णात गोलंदाज आहेत. यांनीं उपरिनिर्दिष्ट मुसलमानांशीं झालेल्या सामन्यांत प्रतिपक्षीयांचा धुव्वा कसा उडविला व त्यांच्या बॅटिंगची तिरपिट कशी उडाली हें त्यांनीं २२ धांवा देऊन ७ गडी out केले यावरून चांगलें व्यक्त होतें. यांची बॅटिंग पाहण्यालायक असते. यंदा हिंदूच्या वतीनें 'बोलर' या नात्यानें यांची निवड होईल असा संभव आहे.

'हिंदु जेसप' या नांवानें प्रसिद्धि पावलेले व सांप्रत राजकारणांत गुंग असलेले आपले आवडते क्रिकेटीयर प्रो. पंढरिनाथ तेलंग यांचे चुलत बंधू दिनानाथ ऊर्फ **कमळनाथ तेलंग** यांनीं पारशी जिमखान्याविरुद्ध १२० धांवा केल्या. विरुद्ध बाजूस वजीफदार, एलाव्हिया, दारुवाला असे पारशांचे नामांकित गोलंदाज होते पण त्या सर्वांनीं रा. तेलंग यांच्या बॅटिंगपुढे हात टेकले. हिंदुंच्या वतीनें तिरंगी सामन्यांत हे एकदां खेळले पण त्यानंतर यांचा मोठ्या सामन्यांत कधींही समावेश झाला नाहीं. रा. **कंटक**, रा. **सदानंद दळवी** यांनीं आपापल्यापरीनें यंदा चांगलीच सेवा बजावली आहे. रा. कंटक एकदां चिकटले कीं प्रतिपक्षीयांना ते कंटकाप्रमाणें वाटूं लागतात व यांना कधीं एकदां निखळून टाकूं असें त्यांना होऊन जातें. मध्यंतरीं क्रिकेटची प्रॅक्टिस करीत असतां रा. दळवी यांस अपघात झाला व यामुळें त्यांचे प्राणांवरच बेतलें होतें पण त्यांतून तें बचावले ही जगदीशाची कृपाच म्हणावयाची. यांची निर्धास्त बॅट्समन व स्लिपमध्यें उत्तमोत्तम फील्डर म्हणून गणना केली जाते. यांची बोलिंग सुद्धां यांच्या बाजूस मधूनमधून चांगली उपयोगी पडते. रा. **विनायक आनंदराव दळवी** हेही स्वज्ञातीय क्रिकेटर तरुण असून धिमे बॅट्समन असल्याबद्दल यांची बरीच ख्याति आहे. पुण्याच्या हिंदुजिमखान्याविरुद्ध यंदा यांनीं १०३ धांवा केल्या. हे यंदा बहुतांशीं निवडून येतील असा रंग दिसतो. यष्टिरक्षक ( wicket keeper ) या नात्यानें रा. **शंकरराव दिवेकर** हे यंदाचे सामन्यांत खेळतील असें वाटतें.

गौड सारस्वत क्रिकेटक्लब—यंदाचे मोसमांत या क्लबानें पहिल्या दर्जाच्या पारशी क्लबाशीं व सर्व जिमखान्याशीं टक्कर देऊन प्रत्येक सामान्यांत पूर्णपणें यश संपादन केलें ही गोष्ट अभिनंदनीय होय. वेळेच्या अभावामुळें एकच सामान्याचा निकाल लागला नाहीं.

क्रिकेटच्या खेळांत नांव कमावणाऱ्या, व दिवसें दिवस उत्साहानें पुढें येणाऱ्या या ज्ञातिबंधूंचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करितों.

---

आमचे सुशिक्षित बंधु, रा. **दत्ताराम गणपत दळवी**, एम्. ए., एल. एल. बी. हायकोर्ट वकील, यांस मुंबई सरकारनें येथील विश्वविद्यालयाच्या सेनेट मंडळांत एक सभासद नेमिलें असल्याचें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. न्यायमूर्ति मि० प्रेट यांच्या रिकाम्या झालेल्या जागीं ही नेमणूक झाली आहे. रा. दळवी कांहीं वर्षांमागें येथील एलफिन्स्टन कॉलेजांत संस्कृत भाषेचे प्रोफेसर होते. पुढें त्यांनीं जुनागड येथील बहाउद्दिन कालेजांत प्रोफेसरचें काम केलें. रा. दळवी यांनीं आज तागायत राजकीय, सामाजिक व विद्याविषयक क्षेत्रांत थोडें बहुत काम करून व थोरांच्या सहवासांत अनेक विषयांवर ज्ञान मिळवून जो अनुभव प्राप्त करून घेतला आहे त्याचा उपयोग ते विश्वविद्यालयाच्या महामंडळापुढें येणाऱ्या प्रश्नांच्या चर्चेच्या वेळीं निर्भीड रीतीनें करून भावी पिढीच्या अभ्युदयास मदत करतील अशी आम्हांस आशा आहे.

## सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी अभिनंदनसमारंभ

या संस्थेचे विद्यार्थी श्रीयुत **वा. मु. गायतोंडे** श्री. **स.वा. पंडित** व श्री. **वि. पां. सराफ** यांस मुंबई विश्वविद्यालयाच्या गेल्या एम. ए. च्या परिक्षेंत अनुक्रमें "चॅन्सलर्स गोल्ड मेडल," "तेलंग गोल्ड मेडल व प्राइझ " व सरलॅरेन्स जेंकिन्स स्कॉलर्शिप मिळाल्याबद्दल, तसेंच श्री. **स. ना. कामत**, व श्री. **म. ल. राजाध्यक्ष** हे अनुक्रमें बी. ए.च्या व सॅनिटरी इंजिनियरिंगच्या परिक्षेंत पहिल्या वर्गांत पास झाल्याबद्दल त्यांचें जाहीररीत्या अभिनंदन करण्यासाठीं मंडळीचे सभासद व विद्यार्थी यांचें एक सम्मेलन **सर नारायणराव चंदावरकर** यांच्या अध्यक्षतेखालीं रविवार ता. १८ सपटंबर १९१९ रोजीं दुपारीं ४ वाजतां वुइलसन हायस्कूलच्या दिवाणखान्यांत भरलें होतें. सम्मेलनास संस्थेचे वहुतेक मुंबईंतील सभासद व कुलीन स्त्रिया हजर होत्या. प्रारंभीं सेक्रेटरी श्री. य. ह. सुखठणकर यांनीं आमंत्रणपत्रिका वाचून दाखविल्यावर संस्थेचे अध्यक्ष रावबहादूर आनंदराव सदाशिव दळवी यांनीं संस्थेची स्थापनेपासूनची त्रोटक हकीगत सभासदांस निवेदन केली. ते म्हणाले:—

"ह्या संस्थेकडून आजपर्यंत ( सन १९०२ पासून १९१८ अखेरपर्यंत ) एकंदर २१६ विद्यार्थ्यांना मदत देण्यांत आली असून त्यांपैकीं २१ विद्यार्थिनी आहेत. या १९५ विद्यार्थ्यांमधून ६ एम्. ए.; २ बी. ए., बी. एससी.; १ बी. ए., एलएल. बी ; १ बी. ए, बी. ई.; १९ बी. ए.; १ एल. सी. ई.; १ बी ई.; २ बी. एससी., १ बी. कॉम.; १ एल. एम्. ॲन्ड एस.; २ एम; बी. बी. एस; १ सॅनिटरी इंजिनिअरिंग; २ मेकॅनिकल इन्जिनिअरिंग; १ ड्राफ्टसमन; २ पेंटिंग व २ सब असिस्टंट सर्जनच्या परिक्षा पास झाले असून ते सर्व उद्योगधंद्यांस लागले आहेत; सुमारें ८३ विद्यार्थि अद्याप शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

मदत करण्यांत आलेल्या विद्यार्थ्यांची स्थलवारी—रत्नागिरी ५९, कॅनरा ५८, सावंतवाडी ४२, सदर्न मराठा कंट्री २३, गोवें १९, बडोदें, ग्वालेर, इंदूर ९, व इतर ठिकाणचे ६ याप्रमाणें आहे.

**सभासद**—या संस्थेच्या पटावर पहिल्या वर्षी ६५ सधारण सभासद होते; आतां १७ व्या सालअखेर ( म्हणजे सन १९१८ अखेर ) ५ पेट्रन, १०३ तहाहयात सभासद व १००३ साधारण सभासद मिळून एकंदर ११११ सभासद संस्थेच्या पटावर आहेत.

**सांपत्तिक स्थिति—वर्गणी, देणगी व मदतफेड**—या संस्थेच्या पहिल्या वर्षाचें वर्गणी व देणग्या मिळून एकंदर उत्पन्न १६० रुपये होतें तें सालोसाल वाढत जाऊन आजमितीस ( वर्गणी, देणगी, व्याज व मदतफेड मिळून ) सालिना ६००० रु. झालें आहे. संस्थेच्या विद्यार्थ्यांनीं उद्योगधंद्यास लागल्यावर म्हणजे संस्थेच्या ६ व्या वर्षापासून मदतफेडीस सुरवात केली असून ती त्या सालीं २५ रुपये होती परंतु आतां १९१८ सालीं १०१३ रुपयेपर्यंत वाढली आहे. आजपर्यंत सर्व विद्यार्थ्यांनीं केलेली एकंदर मदतफेड ४४७५ रु. आहे.

**स्मारकफंड**—संस्थेस १९१८ सालअखेरपावेतों स्मारकफंडाकरितां ८५०० रुपये जमा झालेले होते व त्यानंतर आगस्ट १९१९ पर्यंत त्या सदराखालीं आणखी ८३७० रुपयांच्या देणग्या संस्थेकडे आल्या आहेत. मिळून स्मारकफंडाची एकंदर ठेव १६,६०० रुपये झाली आहे.

**खर्च**—सन १९०२ पासून १९१८ अखेरपर्यंत संस्थेच्या आश्रयाखालील २१६ विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठीं सुमारें ४२,०५८ रुपये एकंदर खर्च झाले.

**रिझर्व्ह फंड**—१९१८ सालअखेर या संस्थेची कायम शिल्लक २१,६६६ रु. होती.

जुन्या, वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध मंडळींचा पाठिंबा, होतकरू तरुणांची कार्यतत्परता व सधनांचा उदार हस्त या संस्थेस मिळून ती उत्तरोत्तर जास्त भरभराटीस येवो अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून व सर नारायणरावांच्या राजकीय सामाजिक व शिक्षणविषयक कामगिरीचा अभिमानपूर्वक उल्लेख करून त्यांस अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल रा. ब. दळवी यांनीं विनंती केली. त्यांच्या सूचनेस रा. ब. सदानंद त्रिंबक भांडारे जे. पी. यांनीं अनुमोदन दिल्यावर सर नारायणराव चंदावरकर हे टाळ्यांच्या प्रचंड गजरांत भाषण करण्यास उभे राहिले. दिलेल्या मानाबद्दल आभार प्रदर्शित करून ते म्हणाले:—

## सरनारायणराव यांचें भाषण

गेल्या पन्नास वर्षांत,इ० स० १८६९ पासून—ज्या सालांत ते प्रथम मुंबईस आले–१९१९ पर्यन्त, एकंदर स्थिति कितीतरी पालटली आहे. बहुतेक सर्व ज्ञाती प्रगतिपथानें सारख्या पुढें सरसावत चालल्या आहेत व त्यापैकींच सारस्वत-ज्ञात ही एक असून ती कोणत्याही प्रकारें मागें राहिलेली नाहीं, इतकेंच नव्हे, तर ती पुढें आहे असा अभिमान बाळगण्यास तिला जागा आहे. कोणत्याही ज्ञातीला अनुकरणीय अशी प्रस्तुत संस्थेची ( सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळीची ) प्रत्यक्ष कृति आपल्या दृष्टीपुढें आहे. सहकारित्वाच्या तत्त्वावर घरें बांधण्याच्या कृतीचा ओनामा सारस्वतांनींच घालून दिला आहे ही अभिमानास्पद गोष्ट नाहीं काय ? पन्नास वर्षांपूर्वी स्त्रीशिक्षणाची पुरस्कर्त्री मिस् मेरी कार्पेन्टर ही जेव्हां हिंदुस्थानांत आली, त्या वेळीं तिनें हिंदू समाजांत दोन मोठे दोष असलेले व्यक्त केले होते; एक दोष, हिंदू सुशिक्षितांची आपल्या समाजघटकावयवामध्यें शिक्षणाचा प्रसार करण्याविषयीं अनास्था व दुसरा स्त्रीशिक्षणाचा अभाव. आज या दोन्ही दोषांचें उच्चाटण झालेलें असून, गोरगरीबांकडे विशेष लक्ष पुरवून त्यांना शिक्षण देण्यापर्यन्त समाजाची मजल गेलेली आहे. ज्ञातिज्ञातींची ही संस्कृति पाहून असंख्य ज्ञातींनीं व्यापिलेला हिंदुस्थान भावी काळच्या गरजांविषयीं जागृत होत असल्याचीं सुचिन्हें दिसत आहेत. विद्यार्थी दशेंतील तरुण पिढीला उपदेशाचे शब्द सांगतांना ते ह्मणाले, आमच्या तरुणांमध्यें अनास्था, औदासिन्य व कार्यशीलतेचा अभाव असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. त्यांच्या विचारांत उथळपणाचा भाव व बुद्धींत संशोधकपणाचा अभाव असल्याचें उदाहरणानें दाखवून ही आपत्ती टाळण्याकरितां कसकसें झटलें पाहिजे याचें त्यांनीं उद्घाटण केलें. तो उल्लेख करतांना स्त्रियांच्या कर्तव्यनिष्ठेचें उदाहरण त्यांनीं श्रोतृवृंदाच्या मनावर मोठ्या मार्मिकपणें प्रतिबिंबित केलें. ते म्हणाले, उद्योगशीलता, कर्तव्यनिष्ठा व कार्यदक्षता या गुणांचा प्रकर्ष स्त्रीच्या ठायीं विशेषत्वें आढळून येतो. कार्यदक्षतेंत तर ती केव्हांहि पुरुषाला मागें टाकील, याची सत्यता पटविण्याकरितां त्यांनीं श्रोतृवृंदापुढें सर्वमान्य असें स्वयंपाकाचें उदाहरण ठेवून ते म्हणाले, हें कार्य त्यांत कोठेंहि अधिक उणेपणाचा लवलेश उरूं न देतां, कोणत्याहि प्रकारची अडचण उपस्थित होऊं न देतां, केव्हां केव्हांतर स्वतःच्या अस्वास्थ्यालाहि न जुमानतां स्त्रिया किती दक्षतेनें व तत्परतेनें पार पाडीत असतात हें प्रत्येकानें मनन करण्यासारखें आहे. दक्षता व तत्परता हे दोन गुण त्यांच्याप्रमाणें आम्ही आपलेसे करूं तरच आमच्या कार्यकर्तृत्वाचा प्रकाश पडेल. कार्यतत्परता ही निरंतर अखंड राहिली पाहिजे आणि म्हणून आपण 'अभ्यास योग' अंगभूत केला पाहिजे. सर्व योगामध्यें 'अभ्यास योगा'चें महत्व विशेष आहे. आमच्या तरुणांचा अभ्यास हा 'योग' होऊन राहिला पाहिजे. युनिवार्सिटीच्या ( विश्वविद्यालयाच्या ) उंबरठ्यांवरून बाहेर पडतांच अभ्यासाला खीळ घालणें हें 'अभ्यास योगा'चें लक्षण नव्हे. आजन्म अभ्यास व्यासंग हाच 'अभ्यास योग.' अशा 'योगानें' आत्मविकास होऊन परिस्थितीला कसें तोंड द्यावयाचें व कार्यकर्तृत्वशक्तीचें तेज कसें वृद्धिंगत करावयाचें हें कळूं लागतें. असमाधानाच्या भोंवऱ्यांत मनास जडणारी किमूकर्तव्यमूढतेची उपाधि या 'योगानें' नाहींशी होते.हल्लींचा काळ कर्तृत्वाचा आहे, उद्यमशीलतेचा आहे, कार्यतत्परतेचा आहे. उद्यमशीलतेनेंच जपान आज सर्व राष्ट्रांत पुढें आलेला आहे. आमच्या तरुण पिढीनें आपली आलस्य व निष्क्रिय वृत्ति टाकून देऊन या उद्यमशीलतेची कास धरली पाहिजे. स्वस्थ बसण्याचा काळ गेला. झगडलें पाहिजे,प्रत्येक बाबतींत पुढें आलें पाहिजे. झगडल्याशिवाय आपल्या पदरांत कांहींच पडावयाचें नाहीं. भूतकाळच्या आठवणी काढून हातपाय आंखडण्यांत हंशील नाहीं. कै० भाऊ दाजी, तेलंग, दाभोळकर, यांच्यासारखे थोर पुरुष हल्लींच्या पिढींत नाहींत म्हणून हळहळ वाटत असल्याचे उद्गार ऐकूं येतात. परंतु ते उद्गार निरर्थक होत. भाऊ दाजी,तेलंग, दाभोळकर यांच्या सारखे पुरुष हल्लींच्या पिढींत नाहींत असें नाहीं. परंतु त्यांच्या वेळीं जी कालमान–परिस्थिति होती ती आज नाहीं, म्हणून ते कर्तृत्वरूपानें प्रकाशतांना दिसत नाहींत. आजची कालमान–परिस्थिति अतिशयित गुंतागुंतीची, विलक्षण खळबळीची, व जीविताच्या नानाविध प्रश्नांनीं अभूतपूर्व परिव्याप्त झालेली अशी आहे. आजच्या स्थितींत सर्व जगच अस्थिर होऊन

गेलेलें आहे कसाहि थोर पुरुष असो त्याला आपल्या विचारसामर्थ्याचें केंद्रीभवन करणें या स्थितींत दुरापास्त झालेलें आहे. परिस्थितिनिर्मित असंख्य प्रश्नांच्यामागें त्याला आपलें सामर्थ्य वेंचावें लागत आहे. अर्थात् तें विचारतेज निरनिराळ्या प्रकारें फांकलें गेल्यामुळें त्याची उज्ज्वलता सकृत् दर्शनीं दिसणें अशक्य आहे. तें अजमावितांना एकंदर परिस्थितीचें मोजमाप घेतलें पाहिजे. भूतकाळाची आठवण काढून हळहळण्याचा हा क्रम परंपरेनें चालत आलेला व पुढेंहि चालू राहणारा असा हा एक चिरंजीव क्रम आहे येवढें आपण लक्ष्यांत घेतलें कीं पुरे. भाऊ दाजी, तेलंग यांसारखे पुरुष ज्या काळीं निपजले, तेव्हांहि त्या काळाविषयीं निराशा व्यक्त करून भूतकाळची टिमकी वाजविण्याचा क्रम होताच. तात्पर्य, खिन्नता, औदासिन्य टाकून द्या आणि कर्तव्याला तत्पर व्हा व सरस्वती पुत्र सारस्वत या नांवाला अनुरूप अशी कृति करा.

अशा प्रकारें अंतःकरणावर खोदून ठेवण्यालायक गोड सदुपदेश करून त्यांनीं वरील विद्यार्थ्यांचें अभिनंदन केलें. कै. रा. ब. घनश्यामपंत नाडकर्णी यांची नात कुमारी **मनोरमाबाई रामराव नाडकर्णी** या गेल्या मॅट्रिकच्या परिक्षेंत गौड सा. ब्रा. ज्ञातींतील विद्यार्थिनींत पहिल्या नंबरास पास झाल्याबद्दल त्यांस मंडळीची विठ्ठल बाळकृष्ण कोरगांवकर स्कॉलरशिप व श्रीयुत **सदानंद विठ्ठल महाजन** यांस त्यांच्या स्पृहणीय परोपकारतत्पर साहसाबद्दल मंडळीचें नोबल कॉन्डक्ट मेडल देण्यांत आलें. या प्रसंगीं अध्यक्षांनीं आय सी. एस. च्या परिक्षेंत पास झालेल्या श्रीयुत गणपतराव सखाराम राजाध्यक्षांचा अभिमानपुरस्सर उल्लेख केला.

यानंतर उत्तरादाखल आभारप्रदर्शक अशीं विद्यार्थ्यांचीं व विद्यार्थिनी नाडकर्णी इचें भाषण झालें. रा. रा. बाजी विष्णु नेरूरकर यांनीं अध्यक्षांचे योग्य शब्दांत आभार मानून या शिक्षणसंस्थेस नेहमीं आपल्या शिक्षणविषयक अनुभवाचा वगैरे लाभ देण्याबद्दल त्यांस विनंति केली. रा. रा. जिवाजी कृष्ण परुळकर यांनीं "विल्सन हाय स्कूल"च्या चालकांचे जागा दिल्याबद्दल आभार मानले. रा. ब. सदानंद त्रिंबक भांडारे यांनीं सर नारायणराव संस्थेचे पेट्रन झाल्याचें व श्रीमती सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर तहाहयात सभासद झाल्याचें त्यांच्या गजरांत जाहीर केल्यावर उपाहार होऊन हा अत्यंत उल्हासवर्धक व परिणामकारक समारंभ आटोपला.

या प्रसंगीं जाहिर केलेल्या देणग्या येणेंप्रमाणें आहेत.

### देणग्या.

रा. रा. जयवंत नारायण दळवी (सिंव) यांनीं आपल्या कै० मातीश्रीच्या इच्छेनुरूप वडील "कै० नारायण विष्णु दळवी" यांच्या नावें स्मारक फंड स्थापण्या करितां. २५०० रु.

रा. रा. गणेश बळवंत वागळे(वांद्रें) १००० ,,

"कै. श्री. पार्वतीबाई दिनानाथ धुमे" स्मारक फंड. १००० ,,

या दोन देणग्या रा. रा. बाजी विष्णु नेरूरकर B. A. LL. B. यांजमार्फत आल्या आहेत.

### पेट्रन

१ सर नारायण गणेश चंदावरकर नाईट ५०० रु.

२ श्री. सौ. यशोदाबाई शंकरराव प्रभावळकर ५०० ,,

### लाईफ मेम्बर्स

१ श्री. सौ. लक्ष्मीबाई नारायणराव चंदावरकर १०० ,,

२ श्री. सौ. सरस्वतीबाई गजानन खानोलकर १०० ,,

---

**जस्टीस ऑफ धि पीस.** रा. रा. काशिनाथ. दि. खोटे, सर नारायण गणेश चंदावरकर, डॉ, राघवेंद्र राव, रा. ब. सदानंद त्रिंबक भांडारे, रा. ब. सखाराम विश्वनाथ राजाध्यक्ष, डॉ. शांताराम विठ्ठल संझगिरी, रा. रा. शिवराम विठ्ठल भांडारकर, रा. रा. सीताराम सुंदरराव पाटकर, रा. रा. वसंतराव आनंदराव दाभोळकर यांस मुम्बई सरकारानें J. P. नेमिल्याबद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करतों.

**प्रगतिपर गोमांतक**

श्रीयुत **लक्ष्मण सदाशिव लाड,** आरोबा, गोवा, हे पणजीच्या मेडिकल कॉलेजांतून डॉक्टरच्या परिक्षेत उत्तीर्ण झाले असून श्रीयुत **श्रीपाद जयवंत** कारापूरकर हे वकील झाले आहेत हें कळविण्यास आम्हांस फार आनंद वाटतो. आलस्य, औदासिन्य, व ऐषाराम यांच्या तडाक्यांत कैकवर्षें सांपडलेले गोमां-

तकांतील स्वसमाज बंधु विशेषतः तेथील तरूणपिढी आतां खडबडून जागी झाली असून, अलिकडे चाल लेल्या हरएक चळवळीकडे लक्ष दिल्यास, ती आपलें योग्य तें स्थान मिळविण्याच्या मार्गास लागली आहे असें दिसतें. डॉक्टर ख्रिस्ती, वकील ख्रिस्ती, सरकारी हरएक खात्यांत सारेंच ख्रिस्तीमय, व कैक बाबतींत त्यांच्याच ओंजळीनें पाणी पिणारा स्वसमाज आज जागा होत आहे. आपला पूर्वेतिहास पाहण्याकडे व तदनुरूप हरएक बाबतींत स्वतःचा योग्य दर्जा प्रस्थापीत करण्याकडे तरूणाची प्रवृत्ति होऊ लागली आहे. हा स्वसमाजाच्या भावी अभ्युदयाच उषःकाल होय. गेल्या मडगांव सा. ब्रा. समाजाच्य वार्षिक समारंभास आमंत्रण देण्यास चालक गेल्याप्रसंगं गोमांतकांतील प्रसिद्ध विद्वान, लोक प्रतिनिधी म्हणून पोर्तुगलास गेलेले सिंयोर कोस्तांस रोकदे कोस्ता हे समाजाच्या प्रगतिपर कार्याबद्दल आनंदप्रदर्शित करून म्हणाले कीं, गेल्या तपदीडतपानंतर माझ्या मायभूमींत जर कोणतीही गोष्ट प्रमुखत्वानें माझ्या नजरेसमोर आली असेल तर गोमांतकांतील हिंदूंची प्रगति ही होय. नुकतीच मुंबईत स्थापन झालेली "गोवा हिंदु असोसिएशन " ही याच गोष्टीची साक्ष पटविते.

सर्वांशीं प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून डॉक्टर सखाराम पंत लाड यांनीं हिंदूंत 'डॉक्टर' होण्याचा अग्रमान पटकाविला. त्यांच्या मागून स्वसमाजांतील सात आठ तरुण वैद्यक शाखेंत पुढें आले आहेत. म्हापशांस डॉक्टर विठ्ठलराव सिनारी यांनीं व पणजीस डॉ. बोरकर यांनीं आपला योग्य दर्जा प्रस्थापित केलाच आहे व आपली शिक्षण विषयक जबाबदारी सांभाळून केवळ धनाशेच्या मोहासच बळी न पडतां आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा फायदा डॉ. सिनारी हे गोरगरिबांस सारखा देत आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट होय.

डॉ. लक्ष्मण सदाशिव लाड हे सुखवस्तु गृहस्थ असून "पोटापाण्याची काळजी नसलेल्या श्रीमंतांस शिक्षण विषयक भानगडीची जरूर नाहीं" अशा विचाराच्या वातावरणांतून धैर्यानें वर आले आहेत आणि वैद्यकीय शाखेंत त्यांनीं यश मिळविलें आहे. या ज्ञानाचा फायदा ते ज्या स्थानीं वास्तव्य करितील तेथल्या समाजाला भरपूर देऊन आपल्या ऐतिहासिक घराण्याचें नांव राखतील अशी आम्हांस आशा आहे.

वैद्यक शाखेंत नांव कमावणाऱ्या डॉ. सिनारी, बोरकरांप्रमाणें श्री. कारापूरकर हेही वकीलीच्या शाखेंत पुढे येऊन सदोदित भांडणांतच सर्वस्व गमावून बसणाऱ्या आपल्या मंडळीस वेळीं योग्य सल्ला देतील व सांप्रतच्या गोमांतकाच्या परिस्थितींत या धंद्यास योग्यतें वळण लावून स्वसमाजाचें नांव पुढें आणतील अशी आम्हांस आशा आहे.

प्राप्त यशाबद्दल वरील दोघांही गृहस्थांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करितों.

**सारस्वत दीनवत्सल संघ**—गतवर्षीं इन्फ्लुएंझा तापाच्या सांथीनें मुंबईंत व इतर ठिकाणीं सर्व कुटुंबवत्सलांचें मनस्थैर्य बिघडल्यामुळें बलिप्रतिपदेच्या दिवशीं संघासाठीं घरोघर फिरून देणग्या जमविण्याचें काम बंद ठेवण्यांत आलें होतें. ईश्वरकृपेनें या वर्षी मेघराजाची कृपा होऊन जनतेची आरोग्य व सांपत्तिक दृष्ट्या स्थिति समाधानकारक असल्यामुळें येत्या बलिप्रतिपदेस संघाचे स्वयंसेवक देणग्या मिळविण्यासाठीं स्वकीय बंधुभगिनींकडे जाणार असल्याचें चिटणिसांकडून कळतें. आपल्या दीन, अनाथ व विपद्ग्रस्त बांधवांस मदत देण्याच्या कामीं सदा तत्पर असणारे आमचे सर्व समाजबंधु स्वयंसेवकांच्या विनंतीस मान देऊन शक्त्यनुसार द्रव्यसाहाय्य देतील व गतसालची तूट भरून निघेल इतकें औदार्य दाखविण्यास कमी करणार नाहींत अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. (चिटणीसांचा पत्ता—रा. शिवराम नारायण रेगे, बनाम हॉल कॉसलेन, गिरगांव, मुंबई. )

**मंगेश विश्वनाथ राजाध्यक्ष स्कॉलरशिप आणि चॅरिटी फंडः**—या फंडांतून ता. ३१ मे १९१९ रोजीं पुऱ्या होणाऱ्या सालाकरितां पुढील प्रमाणें स्कॉलर्शिपा देण्यांत आल्या आहेतः—

१० कॉलेजचे विद्यार्थी, दरमहा रु. ६८.
९ हायस्कूलचे विद्यार्थी, दरमहा रु. ३६.
३ आर्टस्कूलचे विद्यार्थी दरमहा रु. १४.
३ स्त्री विद्यार्थिनी दरमहा रु. १२.
गरीब विधवा आणि निराधार मुलें यांस रु. २५मिळून दरमहा रु. १५५.

**कोल्हापुरचे ॲक्टिंग दिवाण**—राव बहादूर शिरगांवकर यांनीं आजवर त्या संस्थानची इमानें इतबारें सेवा करून पेनशन घेतली असें कळतें.

**कोआपरेटीव्ह हौसींग सोसायटी**— विजया दशमीच्या शुभदिवशीं रा. ब. सदानंद त्रिंबक भांडारे जे. पी. यांच्या अध्यक्षत्वाखालीं शेअरचीं वचनें दिलेल्या ज्ञातिगृहस्थांची येथील लक्ष्मीबागेंत सभा होऊन या संस्थेचे नियम पसार करण्यांत आले व या कार्याकरितां ज्ञातींतील प्रमुख गृहस्थांची एक कमेटीही नेमण्यांत आली. या कार्याप्रीत्यर्थ ज्ञातींतील उदार धनिक **श्री. शांताराम नारायण दाभोळकर यांची २५००० पंचवीस हजारांची देणगी** जाहीर करण्यांत आली.

यासंबंधींची विस्तारें हकीगत पुढील अंकीं देण्यांत येईल. आजकालची स्वसमाजाची जागेची अडचण व अशारीतीच्या योजनेची आवश्यकता लक्षांत घेऊन स्वज्ञातींतील प्रत्येक इसम या कार्यास तनुमनधनें मदत करील अशी आम्हांस आशा आहे

**चिकित्सकसमूह.** जवळ जवळ साडेतीन वर्षांनीं या संस्थेची वार्षिक सभा श्रीयुत **वसंतराव आनंदराव दाभोळकर** जे पी. यांच्या अध्यक्ष त्वाखालीं भरून वार्षिक रिपोर्ट व हिशोबाचा तक्ता मंजूर करण्यांत आला. चाललेल्या "महाले" प्रकरणाचा अथवा "हिशोब प्रकरणांचा" निकाल होऊन ६०० रुपये समूहाच्या पदरांत पडणार असल्याचें जाहीर झालें. श्री. विष्णुपंत शिरोळकराची ५००० रुपयांची इमारत फंडा प्रीत्यर्थ देणगी जाहिर करण्यांत आली. छापील रिपोर्ट प्रसिद्ध करण्यासंबंधींची रा. लाड यांची सूचना सांपत्तिक स्थितीच्या अभावीं सुशक्य नसल्याचें अध्यक्षांनी सांगितलें.

अधक्षांचे, कार्यकारी मंडळाचे, दात्यांचे वगैरे आभार मानण्यांत आल्यावर सभा बरखास्त झाली.

## धारवाड हायस्कूल हॉस्टेल मधील द्राविड व सारस्वत विद्यार्थी

'महाराष्ट्र सारस्वत' हें जरी एका दाक्षिणात्य ब्राह्मण वर्गाच्या हितास्तव चालविलेलें नियत कालिक आहे, तरी त्याचें ध्येय अन्य ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्याशीं प्रेमानें वागणें हेंच असल्यामुळें या त्रैमासिकांतून परस्परांत वितुष्ट उत्पन्न होईल अशा ज्ञाति विषयक प्रश्नांची शक्य तितकी टाळाटाळी केली जाते. परंतु वर्तमानपत्रांतून त्यांची चर्चा झाल्यावर महाराष्ट्र सारस्वतानें मुग्ध वृत्ति पतकरणें योग्य नाहीं हें जाणून आम्ही कर्नाटकांतील एका मुख्य शहरीं चाललेल्या प्रकारासंबंधानें थोडी माहिती येथें देत आहों. धारवाड येथील चंद्रोदय पत्राच्या २८ एप्रिलच्या अंकांत तेथील हायस्कूलचे हेडमास्तर श्रीयुत पद्मनाभराव चंदावरकर यांच्या सहीनें एक इंग्रजी पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून असें दिसतें कीं त्या महिन्याच्या १२ व्या तारखेस सरकारी हायस्कूलच्या वसतिगृहांत सुपरिंटेंडेंट नसल्यावेळीं द्राविड ब्राह्मण विद्यार्थ्यांनीं भोजनगृहांत भोजनसमयीं सारस्वत ब्राह्मण विद्यार्थ्यांशीं भांडण उकरून काढलें. द्राविडांनीं असा हट्ट धरला कीं नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें सारस्वत विद्यार्थ्यांनीं धरलेली पंगत सोडावी व भोजनाच्या खोलींत एका बाजूस त्यांनीं बसावें. द्राविड विद्यार्थी बहुसमुदायी असल्यामुळें अल्पसंख्याक सारस्वतांचा त्यांच्यापुढें कांहीं इलाज चालेना. सारस्वत विद्यार्थी जेव्हां आपली नेहमींची जागा सोडीनात तेव्हां द्राविडांनीं स्वकीय स्वयंपाक्यास त्यांस जेवूं घालण्याची मनाई केली. सारस्वत विद्यार्थी निघून गेले आणि त्यांनीं उपवास पतकरला. पुढें दुसऱ्या दिवशीं हेडमास्तर रा. चंदावरकर यांनीं या प्रकरणाची चौकशी केली व आजवर चालत आलेल्या वहिवाटींत फरक करण्याचें कारण नाहीं असें त्यांस दिसून आलें. द्राविडांनीं हेडमास्तरांचें मत मान्य केल्याप्रमाणें दाखविलें परंतु त्यांनीं हें प्रकरण एज्युकेशनल इन्स्पेक्टर रा. हुनर्गुंद यांजकडे नेलें. पुनः रा. चंदावरकर यांनीं तडजोडीचें धोरण पतकरून एक स्वतंत्र पंगत होईल अशी जागा सारस्वत विद्यार्थ्यांस आंखून दिली. तरी देखील द्राविडांचें समाधान होईना. त्यांनीं गडबड चालविली व शिस्त राखण्यासाठीं योग्य ते उपाय योजण्याची पाळी हेडमास्तरांवर आली. असो.

या छोट्या प्रकरणावरून देखील वारा कोणत्या दिशेनें वहात आहे हें दिसतें. जुनीं नवीं ग्रामण्यें उकरून काढणारांचा आह्मांस तिटकारा आहे आणि अशा प्रकारचे प्रसंग उद्भवले म्हणजे आमचें मन उदास होत असून आमच्या राष्ट्रीयत्वाच्या बाता सर्व कुचकामी आहेत असें दिसूं लागतें. विद्यादेवीच्या आराधनेसाठीं एकत्र जमलेल्या दोन भिन्न ब्राह्मण वर्गातील लहान वयाच्या मुलांत जर ही चुरस दृष्टीस पडते तर जीवनार्थ कलहाच्या झटापटींत एकत्र आलेल्या अशा भिन्न

तकांतील स्वसमाज बंधु विशेषतः तेथील तरूणपिढी आतां खडबडून जागी झाली असून, अलिकडे चाललेल्या हरएक चळवळीकडे लक्ष दिल्यास, ती आपलें योग्य तें स्थान मिळविण्याच्या मार्गास लागली आहे असें दिसतें. डॉक्टर ख्रिस्ती, वकील ख्रिस्ती, सरकारी हरएक खात्यांत सारेंच ख्रिस्तीमय, व कैक बाबतींत त्यांच्याच ओंजळीनें पाणी पिणारा स्वसमाज आज जागा होत आहे. आपला पूर्वेतिहास पाहण्याकडे व तदनुरूप हरएक बाबतींत स्वतःचा योग्य दर्जा प्रस्थापीत करण्याकडे तरूणाची प्रवृत्ति होऊं लागली आहे. हा स्वसमाजाच्या भावी अभ्युदयाचा उषःकाल होय. गेल्या मडगांव सा. ब्रा. समाजाच्या वार्षिक समारंभास आमंत्रण देण्यास चालक गेल्याप्रसंगीं गोमांतकांतील प्रसिद्ध विद्वान, लोक प्रतिनिधी म्हणून पोर्तुगलास गेलेले सिंयोर कोस्तांस रोकदे कोस्ता हे समाजाच्या प्रगतिपर कार्याबद्दल आनंदप्रदर्शित करून म्हणाले कीं, गेल्या तपदीडतपानंतर माझ्या माय भूमींत जर कोणतीही गोष्ट प्रमुखत्वानें माझ्या नजरेसमोर आली असेल तर गोमांतकांतील हिंदूंची प्रगति ही होय. नुकतीच मुंबईंत स्थापन झालेली "गोवा हिंदु असोसिएशन" ही याच गोष्टीची साक्ष पटविते.

सर्वांशीं प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून डॉक्टर सखाराम पंत लाड यांनीं हिंदूंत 'डॉक्टर' होण्याचा अग्रमान पटकाविला. त्यांच्या मागून स्वसमाजांतील सात आठ तरुण वैद्यक शाखेंत पुढें आले आहेत. म्हापशांस डॉक्टर विठ्ठलराव सिनारी यांनीं व पणजीस डॉ. बोरकर यांनीं आपला योग्य दर्जा प्रस्थापित केलाच आहे व आपली शिक्षण विषयक जबाबदारी सांभाळून केवळ धनाशेच्या मोहासच बळी न पडतां आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा फायदा डॉ. सिनारी हे गोरगरिबांस सारखा देत आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट होय.

डॉ. लक्ष्मण सदाशिव लाड हे सुखवस्तु गृहस्थ असून "पोटापाण्याची काळजी नसलेल्या श्रीमंतांस शिक्षण विषयक भानगडीची जरूर नाहीं" अशा विचाराच्या वातावरणांतून धैर्यानें वर आले आहेत आणि वैद्यकीय शाखेंत त्यांनीं यश मिळविलें आहे. या ज्ञानाचा फायदा ते ज्या स्थानीं वास्तव्य करितील तेथल्या समाजाला भरपूर देऊन आपल्या ऐतिहासिक घराण्याचें नांव राखतील अशी आम्हांस आशा आहे.

वैद्यक शाखेंत नांव कमावणाऱ्या डॉ. सिनारी, बोरकरांप्रमाणें श्री. कारापूरकर हेही वकीलीच्या शाखेंत पुढे येऊन सदोदित भांडणांतच सर्वस्व गमावून बसणाऱ्या आपल्या मंडळीस वेळीं योग्य सल्ला देतील व सांप्रतच्या गोमांतकाच्या परिस्थितींत या धंद्यास योग्य तें वळण लावून स्वसमाजाचें नांव पुढें आणतील अशी आम्हांस आशा आहे.

प्राप्त यशाबद्दल वरील दोघांही गृहस्थांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करितों.

**सारस्वत दीनवत्सल संघ**—गतवर्षीं इन्फ्लुएंझा तापाच्या सांथीनें मुंबईंत व इतर ठिकाणीं सर्व कुटुंबवत्सलांचें मनस्थैर्य बिघडल्यामुळें बलिप्रतिपदेच्या दिवशीं संघासाठीं घरोघर फिरून देणग्या जमविण्याचें काम बंद ठेवण्यांत आलें होतें. ईश्वरकृपेनें या वर्षी मेघराजाची कृपा होऊन जनतेची आरोग्य व सांपत्तिक दृष्ट्या स्थिति समाधानकारक असल्यामुळें येत्या बलिप्रतिपदेस संघाचे स्वयंसेवक देणग्या मिळविण्यासाठीं स्वकीय बंधुभगिनींकडे जाणार असल्याचें चिटणिसांकडून कळतें. आपल्या दीन, अनाथ व विपद्ग्रस्त बांधवांस मदत देण्याच्या कामीं सदा तत्पर असणारे आमचे सर्व समाजबंधु स्वयंसेवकांच्या विनंतीस मान देऊन शक्त्यनुसार द्रव्यसाहाय्य देतील व गतसालची तूट भरून निघेल इतकें औदार्य दाखविण्यास कमी करणार नाहींत अशी आम्हांस पूर्ण आशा आहे.(चिटणीसांचा पत्ता—रा. शिवराम नारायण रेगे, बनाम हॉल कॉसलेन, गिरगांव, मुंबई. )

**मंगेश विश्वनाथ राजाध्यक्ष स्कॉलरशिप आणि चॅरिटी फंडः**—या फंडांतून ता. ३१ मे १९१९ रोजीं पुऱ्या होणाऱ्या सालाकरितां पुढील प्रमाणें स्कॉलर्शिपा देण्यांत आल्या आहेतः—

१० कॉलेजचे विद्यार्थी, दरमहा रु. ६८.
९ हायस्कूलचे विद्यार्थी, दरमहा रु. ३६.
३ आर्टस्कूलचे विद्यार्थी दरमहा रु. १४.
३ स्त्री विद्यार्थिनी दरमहा रु. १२.

गरीब विधवा आणि निराधार मुलें यांस रु. २५मिळून दरमहा रु. १५५

**कोल्हापुरचे ॲक्टिंग दिवाण**—राव बहादूर शिरगांवकर यांनीं आजवर त्या संस्थानची इमानें इतबारें सेवा करून पेनशन घेतली असें कळतें.

**कोआपरेटीव्ह हौसींग सोसायटी**— विजया दशमीच्या शुभदिवशीं रा. ब. सदानंद त्रिंवक भांडारे जे. पी. यांच्या अध्यक्षत्वाखालीं शेअरचीं वचनें दिलेल्या ज्ञातिगृहस्थांची येथील लक्ष्मीवागेंत सभा होऊन या संस्थेचे नियम पसार करण्यांत आले व या कार्याकरितां ज्ञातींतील प्रमुख गृहस्थांची एक कमेटीही नेमण्यांत आली. या कार्याप्रीत्यर्थ ज्ञातींतील उदार धनिक **श्री. शांताराम नारायण दाभोळकर यांची २५००० पंचवीस हजारांची देणगी** जाहीर करण्यांत आली.

यासंबंधींची विस्तारें हकीगत पुढील अंकीं देण्यांत येईल. आजकालची स्वसमाजाची जागेची अडचण व अशारीतीच्या योजनेची आवश्यकता लक्षांत घेऊन स्वज्ञातींतील प्रत्येक इसम या कार्यास तनुमनधनें मदत करील अशी आम्हांस आशा आहे.

**चिकित्सकसमूह.** जवळ जवळ साडेतीन वर्षांनीं या संस्थेची वार्षिक सभा श्रीयुत **वसंतराव आनंदराव दाभोळकर** जे. पी. यांच्या अध्यक्ष त्वाखालीं भरून वार्षिक रिपोर्ट व हिशोबाचा तक्ता मंजूर करण्यांत आला. चाललेल्या " महाले " प्रकरणाचा अथवा "हिशोब प्रकरणांचा" निकाल होऊन ६०० रुपये समूहाच्या पदरांत पडणार असल्याचें जाहीर झालें. श्री. विष्णुपंत शिरोळकराची ५००० रुपयांची इमारत फंडा प्रीत्यर्थ देणगी जाहिर करण्यांत आली. छापील रिपोर्ट प्रसिद्ध करण्यासंबंधींची रा. लाड यांची सूचना सांपत्तिक स्थितीच्या अभावीं सुशक्य नसल्याचें अध्यक्षांनी सांगितलें.

अधक्षांचे, कार्यकारी मंडळाचे, दात्यांचे वगैरे आभार मानण्यांत आल्यावर सभा बरखास्त झाली.

## धारवाड हायस्कूल हॉस्टेल मधील द्राविड व सारस्वत विद्यार्थी

'महाराष्ट्र सारस्वत' हें जरी एका दाक्षिणात्य ब्राह्मण वर्गाच्या हितास्तव चालविलेलें नियत कालिक आहे, तरी त्याचें ध्येय अन्य ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्याशीं प्रेमानें वागणें हेंच असल्यामुळें या त्रैमासिकांतून परस्परांत वितुष्ट उत्पन्न होईल अशा ज्ञाति विषयक प्रश्नांची शक्य तितकी टाळाटाळी केली जाते. परंतु वर्तमानपत्रांतून त्यांची चर्चा झाल्यावर महाराष्ट्र सारस्वतानें मुग्ध वृत्ति पतकरणें योग्य नाहीं हें जाणून आम्ही कर्नाटकांतील एका मुख्य शहरीं चाललेल्या प्रकारासंबंधानें थोडी माहिती येथें देत आहों. धारवाड येथील चंद्रोदय पत्राच्या २८ एप्रिलच्या अंकांत तेथील हायस्कूलचे हेडमास्तर श्रीयुत पद्मनाभराव चंदावरकर यांच्या सहीनें एक इंग्रजी पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून असें दिसतें कीं त्या महिन्याच्या १२ व्या तारखेस सरकारी हायस्कूलच्या वसतिगृहांत सुपरिंटेंडेंट नसल्यावेळीं द्राविड ब्राह्मण विद्यार्थ्यांनीं भोजनगृहांत भोजनसमयीं सारस्वत ब्राह्मण विद्यार्थ्यांशीं भांडण उकरून काढलें. द्राविडांनीं असा हट्ट धरला कीं नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें सारस्वत विद्यार्थ्यांनीं धरलेली पंगत सोडावी व भोजनाच्या खोलींत एका बाजूस त्यांनीं बसावें. द्राविड विद्यार्थी बहुसमुदायी असल्यामुळें अल्पसंख्याक सारस्वतांचा त्यांच्यापुढें कांहीं इलाज चालेना. सारस्वत विद्यार्थी जेव्हां आपली नेहमींची जागा सोडीनात तेव्हां द्राविडांनीं स्वकीय स्वयंपाक्यास त्यांस जेवूं घालण्याची मनाई केली. सारस्वत विद्यार्थी निघून गेले आणि त्यांनीं उपवास पतकरला. पुढें दुसऱ्या दिवशीं हेडमास्तर रा. चंदावरकर यांनीं या प्रकरणाची चौकशी केली व आजवर चालत आलेल्या वहिवाटींत फरक करण्याचें कारण नाहीं असें त्यांस दिसून आलें. द्राविडांनीं हेडमास्तरांचें मत मान्य केल्याप्रमाणें दाखविलें परंतु त्यांनीं हें प्रकरण एज्युकेशनल इन्स्पेक्टर रा. हुनगुंद यांजकडे नेलें. पुनः रा. चंदावरकर यांनीं तडजोडीचें धोरण पतकरून एक स्वतंत्र पंगत होईल अशी जागा सारस्वत विद्यार्थ्यांस आंखून दिली. तरी देखील द्राविडांचें समाधान होईना. त्यांनीं गडबड चालविली व शिस्त राखण्यासाठीं योग्य ते उपाय योजण्याची पाळी हेडमास्तरांवर आली. असो.

या छोट्या प्रकरणावरून देखील वारा कोणत्या दिशेनें वहात आहे हें दिसतें. जुनीं नवीं ग्रामण्यें उकरून काढणारांचा आह्मांस तिटकारा आहे आणि अशा प्रकारचे प्रसंग उद्भवले म्हणजे आमचें मन उदास होत असून आमच्या राष्ट्रीयत्वाच्या वाता सर्व कुचकामी आहेत असें दिसूं लागतें. विद्यादेवीच्या आराधनेसाठीं एकत्र जमलेल्या दोन भिन्न ब्राह्मण वर्गांतील लहान वयाच्या मुलांत जर ही चुरस दृष्टीस पडते तर जीवनार्थ कलहाच्या झटापटींत एकत्र आलेल्या अशा भिन्न

वर्गीयांची अवस्था काय होईल याची कल्पनाच करण्या जोगी आहे. धारवाड येथें हायस्कूलच्या बाहेर ट्रेनिंग कॉलेज व आर्ट्स कॉलेज अशीं दोन महाविद्यालयें आहेत. तेव्हां अशा प्रकारचें वितुष्ट वाढत गेल्यास सामाजिक किंवा इतर दृष्ट्याही कोणाचें हित होईल असें दिसत नाहीं. हल्लींचे प्रागतिक कालांत एकीकडे प्रिन्सिपॉल परांजपे, नामदार बेळवी, ना. खापर्डे वगैरे ब्राह्मण, कायदे कौन्सिलांत महारांसारख्या अस्पृश्य मानलेल्या वर्गाची हीन दशा सुधारण्यासाठीं त्यांस सध्यां उच्च मानलेल्या ज्ञातींच्या बरोबर आणून समान हक्क प्राप्त करून देण्यास धडपड करीत आहेत, तर दुसरीकडे धारवाड हायस्कूलच्या हॉस्टेल मधील प्रकारासारखे उद्वेगजनक प्रकार चालून लहान वयांत भावी नागरिकांच्या अंतःकरणांत ज्ञातिमत्सराच्या बीजाची पेरणी होत आहे हें देशाचें व महाराष्ट्राचें दुर्भाग्य तर खरेंच! अलीकडे सार्वजनिक गणपतीची स्थापना येथील आंबेवाडींत करण्यांत आली, त्यावेळीं ब्राह्मण ब्राह्मणांत जो चुरशीचा प्रकार दिसून आला, त्यावरून देखील अशा उत्सवांचे उत्पादक जे श्रीयुत बाळ गंगाधर टिळक त्यांची खरीं मतें त्यांच्या ज्ञातिबंधूच्या अंतःकरणावर बिंबलीं नाहींत असें ह्मणावें लागतें. सपटंबर ता. ११ च्या इंदुप्रकाशांत या संबंधाची हकीकत प्रसिद्ध झाली असून या पुढें असल्या खोट्या सार्वजनिक उत्सवांत पडूं नये हाच धडा सारस्वतांनीं शिकला पाहिजे.

शेवटीं, धारवाड येथील व मुंबापुरींत किंवा इतरत्र राहणाऱ्या आमच्या सारस्वत बंधूंस आमचें सांगणें इतकेंच आहे कीं, त्यांनीं शक्य त्या प्रयत्नानें इतरब्राह्मण वर्गाशीं विरोध टाळावा. तसा दुर्धर प्रसंग अंगावर येऊन पडलाच तर अपमान सोसण्यापेक्षां स्वाभिमानपूर्वक आपणास हितावह होईल अशी स्वतंत्र सोय करून घेऊन आपला बाणा कायम राहील अशी व्यवस्था करावी. या दिवसांत अन्यायापुढें मान वांकविण्याचें कोणास कारण नाहीं.

---

## शोचनीय निधन.

**श्री० नारायणराव सिरूर**—हुबळी येथील सुप्रसिद्ध व्यापारी (सर नारायणराव चंदावरकर यांचे व्याही) श्री० नारायणराव सिरूर यांचें ता. २३ सपटंबर रोजीं त्यांच्या वयाच्या ७१ व्या वर्षी देहावसान झाल्याचें दुःखकारक वर्तमान कळविण्यास आम्हांस वाईट वाटतें. श्री. नारायणराव हे अवघे १४ वर्षाचें असतांना येथील पी. क्रिस्टल कंपनीच्या कारवार येथील कचेरींत नोकरींत शिरले. पुढें १८८१ सालीं ते हुबळी येथें गेले व तेथील गिरणीची व्यवस्था त्यांच्या हातीं आली. आपल्या नेकीनें, धोरणानें व सद्दैवाच्या जोरावर व्यापारांत त्यांनीं चांगलेंच यश संपादन केलें. वार्धक्यामुळें १९०४ सालीं त्यांनीं सर्व प्रकारच्या कारभारांतून आपलें अंग काढून घेतलें. तत्पूर्वी बेंगळूर येथील महाराजा स्पिनिंग अँड वीव्हिंग मिलची व्यवस्था आपल्या हातीं घेऊन त्यांनीं या डबघाईस आलेल्या गिरणीची स्थिति अत्यंत स्पृहणीय केली. रा. सिरूर यांचा स्वभाव शांत, मनमिळाऊ व गोड होता. यामुळें लहानथोरांस ते प्रिय झाले होते, व त्यांचा सल्ला सरकारी अधिकारी व खासगी लोक बहुमोल मानीत. साधी राहणी व धार्मिक शुद्धवर्तन यांच्यामुळें त्यांनी दीर्घकालपर्यंत या प्रपंचांत चांगल्या प्रकारें कीर्ति संपादन करून आपलें नांव सर्वतोमुखीं राहील असें केलें. यांच्या पश्चात् त्यांचे चिरंजीव रा. रा. दत्तात्रयराव हे एकंदर व्यवहार चालविणार असून ते आपल्या वडिलांच्या कीर्तींत विशेष भर घालतील अशी आम्हांस उमेद आहे. सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर यांस भ्रातृवियोगाबद्दल दुःख होणें साहजिक आहे. परंतु जगाच्या राहाटीकडे लक्ष देऊन दुःखितांनीं समाधान वृत्ति पत्करली पाहिजे. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो!

आपले ज्ञातिबंधु रा. रा. जयवंतराव दीनानाथ माडगांवकर यांच्या अकालिक निधनाची दुःखद वार्ता कळविण्यास आम्हांस अत्यंत वाईट वाटतें. रा. जयवंतराव हे आपल्या ज्ञातींतील सुप्रसिद्ध गृहस्थ रामचंद्र विष्णु माडगांवकर यांचे पुतणे व रा. दिनानाथपंत माडगांवकर यांचे पुत्र होत. रा. माडगांवकरांचें घराणें मुंबई शहरांत सर्वांना चांगलें माहितीचें आहे. रा. जयवंतरावांचे वडील बंधु गोविंदराव हे आपल्या ज्ञातींतील पहिले सिव्हीलियन होत. रा. जयवंतराव हेही सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेकरितां गेले होते, पण तींत ते उत्तीर्ण न झाल्यामुळें त्यांनीं बॅरिस्टरीची परीक्षा दिली. हिंदुस्थानांत परत आल्यानंतर त्यांनीं कांहीं वर्षें बडोदें सरकारची नोकरी केली. पण सेवावृत्तीचा मनापासून

कंटाळा असल्यामुळें ती सोडून देऊन आपल्या कनिष्ठ बंधुसमवेत त्यांनीं त्यांच्या कुटुंबाच्या हाडीं खिळलेल्या व्यापाराच्या स्वतंत्र धंद्याकडे आपलें लक्ष वळविलें. गेलीं कांहीं वर्षें ते मुंबई व कलकत्ता येथें जाऊन येऊन असत. गेल्या कांहीं महिन्या मागें ते वांद्रें येथें स्थाईक होऊन राहिले होते. नुकतेंच दोन चार वर्षां मागें त्यांनीं द्वितीय विवाह केला. व त्यांना दोन अपत्यें—एक मुलगी व एक मुलगा अशीं झालीं होतीं. त्यांचे दुसरें अपत्य त्यांच्या मृत्युसमयीं फक्त चार दिवसांचें होतें. पोटांत कांहीं व्याधी झाल्यावरून तीवर शस्त्रक्रिया करण्याकरितां ते भाजेकरांच्या इस्पितळांत गेले. शस्त्रक्रिया झाल्यानंतर अवघ्या चोवीस तासांच्या आंतच त्यांचें देहावसान झालें. मृत्युसमयीं त्यांचे वय अवघें ४४–४५ वर्षांचें होतें. आम्हीं त्यांच्या कुटुंबांचें कोणत्या रीतीनें सांत्वन करावें हेंच आम्हांस कळत नाहीं. तरी पण ईश्वरानें त्यांनां बळकट धैर्य देऊन मागें राहिलेल्या कोमळ अर्भकांचें त्यांच्या हांतून योग्य संगोपन होईल अशा प्रकारचें आत्मिक बल ईश्वर त्यांच्या कुटुंबाला व इतर लगतच्या माणसांस देवो अशी त्या जगंनियंत्या प्रभूकडे आमची अंतःकरणपूर्वक प्रार्थना आहे. रा. जयवंतराव यांचा ज्यांना ज्यांना प्रत्यक्ष परिचय असेल त्यांना त्यांच्या प्रेमळ, निगर्वी स्वभावाची, दयार्द्र अंतःकरणाची व साध्या रहाणीची आठवण पडल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांची बुद्धि तीव्र होती, त्यांची मनोवृत्ति उदार होती, त्यांची देहयष्टी नाजुक व सडपातळ होती. पण तोंडावर एक प्रकारचें गांभीर्य व चपलता पहाणाऱ्याच्या चटकन लक्षांत येत असे. संसारांत ते जवळ जवळ संन्यस्त वृत्तीनेंच वावरत असत. लहानापासून थोरापर्यंत मोकळ्या मनानें व आनंदानें बोलत. आपण विद्वान आहोंत, विलायतेंत जाऊन दहापांच वर्षें घालवून आलों आहोंत, गर्भश्रीमंत कुटुंबांतले आहोंत म्हणून इतरांना तुच्छ लेखणें हें त्यांच्या स्वप्नींही नव्हतें. त्यांचा स्वभाव किंचित् विनोदी असे. त्यांच्या चेहऱ्यावर असा विनोद करीत असतां जें एक हास्य चमकत असे तेंच त्यांच्या प्रांजळ वर्तनाचें द्योतक होतें. असा अत्यंत कुलीन, विनयसंपन्न, शांत गृहस्थ आपल्या ज्ञातींतून गेला याबद्दल प्रत्येकाला खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं ! पण ईश्वरेच्छेपुढें इलाज नाहीं. ईश्वर रा. जयवंतरावांच्या आत्म्याला शांती देवो ! व त्यांच्या मागें राहिलेल्या दोन कोमल बालकांना उदंड आयुष्य व यश देऊन तीं नांवारूपास चढोत हीच आमची इच्छा आहे.

रा. रा. मंगेश कमलाकर नाडकर्णी, बडोदें, यांचे ज्येष्ठ चिरंजीव रा. **यशवंत मंगेश नाडकर्णी** हे गेल्या जुलै महिन्यांत बडोदें मुक्कामीं कैलासवासी झाले हें कळविण्यास आम्हांस अत्यंत वाईट वाटतें ! रा. नाडकर्णी हे अगदीं तरुण, बुद्धिमान् व सुस्वभावी असून बडोदें कॉलेजांत सिनियर बी. ए. च्या क्लासांत होते. त्यांचा ज्या ज्या मंडळीशीं परिचय होता त्यांस रा. नाडकर्णी यांच्या शांत व सात्त्विक वृत्तीची, सुस्वभावाची व अल्पवयांत दिसून येणाऱ्या विद्वत्तेची साक्ष पटून ते मागेंपुढें चांगले नांवारूपास चढतील अशी त्यांची अटकळ होती. महाराष्ट्र सारस्वतांत "मुंबई इलख्यांतील उद्योग धंदे" हा त्यांचा पहिला उत्कृष्ट लेख जून १९१७ त प्रसिद्ध झाला व लिहून ठेविलेले दुसरे लेख व कविता प्रसिद्ध होण्यापूर्वींच मातापितरांस व आप्तजनांस शोकांत लोटून ते दिवंगत व्हावे हा ईश्वरी नेमानेम अतर्क्य होय ! आजच्या अंकांत त्यांच्या दोन कविता व "बा मानवा !" हा काव्यमय छोटा लेख प्रसिद्ध झाला आहे. "समाज व व्यक्ति" हा सामाजिक लेख व इतर कविता पुढील अंकांत प्रसिद्ध होतील.

बुद्धिवादानें त्यांच्या मातापितरांचें दुःख कमी होणें शक्य नाहीं, तरीपण जगाच्या रहाटीकडे लक्ष देऊन ते त्यास आळा घालतील अशी आम्हांस आशा आहे. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो !

---

ग्रंथालय
ता......

# पोंच व अभिप्राय.

## साभार स्वीकार.

**ऑल इंडिया सारस्वत** .या देशांतील अखिल सारस्वतांच्या सामाजिक व इतर उन्नतीस चालना देण्यासाठीं प्रसिद्ध होत असलेल्या "ऑल इंडिया सारस्वत" या त्रैमासिकाचा दुसरा अंक आमच्याकडे आला आहे. त्यांत बरेच वाचनीय लेख असून याच प्रमाणें प्रत्यही माहिती प्रसिद्ध होत गेल्यास दाक्षिणात्य सारस्वतांच्या प्राचीन इतिहासावर कालेंकरून चांगलाच प्रकाश पडल्यावांचून राहणार नाहीं. पंजाबचे सारस्वत, क्षत्रियवृत्तीचे मुद्याळ सारस्वत, ( ज्यांनीं अरबस्तानापर्यंत आपल्या समशेरीची कीर्ति पोहोंचविली ते ) दाक्षिणात्य सारस्वत वगैरे लेख विचारास चालना देणारे व दुराग्रहास पळविणारे आहेत. एकंदरींत हें त्रैमासिक सर्व सारस्वतांच्या आदरास व मदतीस सर्वथैव पात्र आहे.

## ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास

रा. राजवाडे यांनीं गतसालीं कायस्थप्रभूंविषयीं एक लेख पुणें येथील भारतेतिहास संशोधक मंडळापुढें सादर केला त्यावरून प्रभुज्ञात चवताळून जाऊन रा. राजवाडे यांस उत्तरादाखल व टीकात्मक म्हणून दोन तीन पुस्तकें या ज्ञातीकडून प्रसिद्ध करण्यांत आलीं, त्यांच्याच पुढचें पुस्तक "**ग्रामण्यांचा इतिहास**" हें रा. केशव सीताराम ठाकरे यांनीं महाराष्ट्रीयांपुढें ठेविलें आहे. मराठेशाहीचा नाश होण्याचीं कारणें एतद्देशीय व युरोपस्थ इतिहास कारांनीं अनेक दिलेलीं असलीं, तरी रा. ठाकरे यांच्या मतें पेशवाईतील जातिमत्सर या एकच कारणामुळें मराठ्यांचें राज्य लयास गेलें. हें सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं ग्रामण्यांचा इतिहास पुढें केला आहे. पेशवाईत व ग्रामण्यें उपस्थित झालीं ही गोष्ट आम्हांस कबूल आहे, परंतु राजकारणापर्यंत या ग्रामण्यांचा संबंध पोंचत असून केवळ जातिद्वेष किंवा मत्सर यांच्याच पायीं मराठेशाही बुडाली असें म्हणण्यास आमची लेखणी धजत नाहीं. हा जातिमत्सर प्रामुख्यानें सर्व संघटित कार्याला व्यत्यय आणीत होता असें मानणारांनीं हीं ग्रामण्यें उकरून काढणारे राजकार्यधुरंधर व प्रत्यक्ष राज्यकारभारांत अंग घालून राज्यशकट चालविणारे पुरुष होते असें सिद्ध करी पर्यंत तरी जातिमत्सरास मराठेशाही बळी पडली असें म्हणणें सत्यप्रियतेच्या दृष्टीनें न्याय्य नव्हे. तेव्हां पेशवाईच्या वेळीं ज्या प्रकारची जनतेची सामाजिक व धार्मिक मनोभावना होती त्या मनोभावनेपासूनच सर्व ग्रामण्यांचा उद्भव झालेला आहे असें आम्हांस वाटतें. आजच्या दृष्टीनें गतकालाकडे पाहून चालणार नाहीं. तेव्हां प्रस्तुत कालाचा संदेश असा आहे कीं, राष्ट्रीयत्वाची भावना दिवसेंदिवस विकसित होत असल्यानें सांप्रतच्या परिस्थितीस व भविष्य कालास अनुरूप असें कर्तव्यकर्म यांचाच विचार करून पुढें पाऊल टाकणें सर्व ज्ञातींस श्रेयस्कर आहे. यासाठीं रा. ठाकरे यांनीं आपल्या लेखनकौशल्याचा उपयोग अन्यतऱ्हेनें करून जातिभिन्नतेची नांगी मोडून टाकण्याचें पुण्यकर्म हातीं घ्यावें असें आमचें त्यांस बंधुत्वाचें सांगणें आहे. कारण ही नांगी अद्यापि आहे ही गोष्ट कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. आणि ती मोडून टाकण्याचें सामर्थ्य कोणांत असेल तर 'कोदंडाचे टणत्कार' करण्याचें सामर्थ्य ज्यांच्यांत आहे, अशा रा. ठाकरेसारख्या निर्भीड व सणसणीत लेखकांत होय. जुन्या दप्तरांतील अनुपलब्ध लेख या दृष्टीनें हा ग्रामण्यांचा इतिहास संग्राह्य असून तो आमच्याकडे पाठविल्याबद्दल आम्ही प्रकाशकांचे आभार मानतों.

**चुकीची दुरुस्ती**—महाराष्ट्र सारस्वताच्या तिसऱ्या वर्षाच्या शेवटच्या अंकांत म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत पसार झालेल्या विद्यार्थिनींचीं नांवें प्रसिद्ध केलीं आहेत त्यांतील कुमारी सावित्री सदाशिव बिडीकर या पसार झाल्या नाहींत हें कळविण्यास वाईट वाटतें. यांस सर्व विषयांत भरपूर गुण मिळाले होते. परंतु एका विषयांत एक गुण कमी पडल्यामुळें त्यांना यश आलें नाहीं. तूर्त त्यांची जी निराशा झाली आहे तिचा मोबदला यशांत विशेष भर पडून मिळेल अशी आशा आहे. दुसरी यशस्वी विद्यार्थिनी कु० प्रेमा हणमंतराव बोरकर ही सारस्वत ज्ञातीची नाहीं. आडनांवावरून आम्ही तिचा स्वज्ञातीय म्हणून नामनिर्देश केला याबद्दल दिलगीर आहों.

८३ २/२
ता. २८/१/२०


# महाराष्ट्र सारस्वत.

वर्ष ४ थें ] जानेवारी १९२०. [ अंक २ रा.


## रा. ब. राघवेंद्र रामचंद्र गंगोळी.

**नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके । जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥**
**इति महति विरोधे विद्यमाने समाने । नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥**

भर्तृहरि.

केवळ राजाचा ह्मणजे सत्ताधिकाऱ्यांचा पक्ष धरून राजहित तेवढे पाहणारा जो पुरुष आहे त्याचा जनपद द्वेष करतें. परंतु जनतेच्या हितासाठींच खपणारे जे लोकमान्य पुढारी असतात त्यांस राजमान्यता मिळत नाहीं व अधिकारी वर्गास ते अप्रिय होतात. अशी या जगाची स्थिति असून नृपति व जनपद किंवा राजा व प्रजा या उभयतांची मर्जी संपादन करणारा कार्यकर्ता पुरुष देशास लाभणें फार कठिण आहे. अशा आशयाचे वर दिलेल्या संस्कृत श्लोकांतील कवि भर्तृहरीचे विचार आजमितीसही अनुभवास येतात. तेव्हां जे लोकमान्यही असून राजमान्यही होतात अशांचें जीवनचरित्र स्फूर्तिदायक व मार्गदर्शक असावयाचें. आमच्या सारस्वत समाजास अशा प्रकारच्या गुणामुळें ज्यानीं भूषविलें त्या सुशील व परोपकारी गृहस्थांचें, रा. ब. राघवेंद्रराव रामचंद्र गंगोळी यांचें, अल्प चरित्र येथें सादर करितों.

रा. ब. राघवेंद्रराव यांचा जन्म ता. ९ जुलई १८४८ रोजीं मंगळूर तालुक्यांतील बंटवाल या खेड्यांत त्यांच्या आजोळीं झाला. तीनचारशें वर्षामागें गोमंतकांतून जे सारस्वत दक्षिणेंत वसाहतीसाठीं गेले त्यानीं नवीन प्रांतांतील पद्धतीप्रमाणें गांवावरून आडनांव वापरण्याची वहिवाट चालू केली. यामुळें मुळचीं वागळे, बोरकर वगैरे आडनांवें जाऊन चंदावरकर, बळवळी अशीं कित्येक खेड्यांचीं नावें आम्हां सारस्वतांत आडनावें होऊन बसलीं आहेत. याच कारणानें रावबहादूरांचें आडनांव गंगोळी हें मंगळूर तालुक्यांतील कुंदापूरजवळ असलेल्या ग्रामावरून आलें आहे. गंगोळी हेंच त्यांच्या वाडवडिलांच्या वसाहतीच्या गांवाचें नांव होय.

रा. ब. राघवेंद्रराव यांच्या घरची स्थिति विशेष चांगली नव्हती. तशांत त्यांच्या वयाच्या आठव्याच वर्षी त्यांचे तीर्थरूप निवर्तल्यानें त्यांचें पालनपोषण त्यांचे चुलते, वायनाडचे मामलेदार शेषगिरीराव, यांनीं करण्याचें पतकरलें. हे गृहस्थ फार ममताळू होते. त्यांनीं आपल्या पुतण्यास फार लाडानें वागविल्यामुळें सहजच रा. ब. राघवेंद्रराव यांची शिक्षणाची बाजू किंचित् लंगडी पडली. मुळीं ११ व्या वर्षी त्यांनीं शिक्षणालयांत प्रवेश केला. आणि त्या काळच्या पद्धतीप्रमाणें इतक्या लहान वयांत त्यांस विवाह ग्रंथीनें बद्ध करण्यांत आलें ! अवघीं पांचच वर्षें कायतो त्यांनीं विद्याभ्यास केला आणि त्यांच्या सोळाव्या वर्षी शेषगिरीराव निवर्तल्यामुळें पुढील अभ्यासक्रम बंद करून प्रपंच चालविण्याची जबाबदारी पार पाडण्याकरितां त्यांना सरकारी नोकरी पतकरावी लागली.

# पोंच व अभिप्राय.

## साभार स्वीकार.

**ऑल इंडिया सारस्वत** .या देशांतील अखिल सारस्वतांच्या सामाजिक व इतर उन्नतीस चालना देण्यासाठीं प्रसिद्ध होत असलेल्या "ऑल इंडिया सारस्वत" या त्रैमासिकाचा दुसरा अंक आमच्याकडे आला आहे. त्यांत बरेच वाचनीय लेख असून याच प्रमाणें प्रत्यही माहिती प्रसिद्ध होत गेल्यास दाक्षिणात्य सारस्वतांच्या प्राचीन इतिहासावर कालेंकरून चांगलाच प्रकाश पडल्यावांचून राहणार नाहीं. पंजाबचे सारस्वत, क्षत्रियवृत्तीचे मुह्याळ सारस्वत, ( ज्यांनीं अरबस्ताना-पर्यंत आपल्या समशेरीची कीर्ति पोहोंचविली ते ) दाक्षिणात्य सारस्वत वगैरे लेख विचारास चालना देणारे व दुराग्रहास पळविणारे आहेत. एकंदरींत हें त्रैमासिक सर्व सारस्वतांच्या आदरास व मदतीस सर्वथैव पात्र आहे.

## ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास

रा. राजवाडे यांनीं गतसालीं कायस्थप्रभूंविषयीं एक लेख पुणें येथील भारतेतिहास संशोधक मंडळापुढें सादर केला त्यावरून प्रभुज्ञात चवताळून जाऊन रा. राजवाडे यांस उत्तरादाखल व टीकात्मक म्हणून दोन तीन पुस्तकें या ज्ञातीकडून प्रसिद्ध करण्यांत आलीं, त्यांच्याच पुढचें पुस्तक "**ग्रामण्यांचा इतिहास**" हें रा. केशव सीताराम ठाकरे यांनीं महाराष्ट्रीयांपुढें ठेविलें आहे. मराठेशाहीचा नाश होण्याचीं कारणें एतद्देशीय व युरोपस्थ इतिहासकारांनीं अनेक दिलेलीं असलीं, तरी रा. ठाकरे यांच्या मतें पेशवाईंतील जातिमत्सर या एकच कारणामुळें मराठ्यांचें राज्य लयास गेलें. हें सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं ग्रामण्यांचा इतिहास पुढें केला आहे. पेशवाईंत व ग्रामण्यें उपस्थित झालीं ही गोष्ट आम्हांस कबूल आहे परंतु राजकारणापर्यंत या ग्रामण्यांचा संबंध पोंचून असून केवळ जातिद्वेष किंवा मत्सर यांच्याच पायीं मराठेशाही बुडाली असें म्हणण्यास आमची लेखणी धजत नाहीं. हा जातिमत्सर प्रामुख्यानें सर्व संघटित कार्याला व्यत्यय आणीत होता असें मानणारांनीं हीं ग्रामण्यें उकरून काढणारे राजकार्यधुरंधर व प्रत्यक्ष राज्यकारभारांत अंग घालून राज्यशकट चालविणारे पुरुष होते असें सिद्ध करी पर्यंत तरी जातिमत्सरास मराठेशाही बळी पडली असें म्हणणें सत्यप्रियतेच्या दृष्टीनें न्याय्य नव्हे. तेव्हां पेशवाईच्या वेळीं ज्या प्रकारची जनतेची सामाजिक व धार्मिक मनोभावना होती त्या मनोभावनेपासूनच सर्व ग्रामण्यांचा उद्भव झालेला आहे असें आम्हांस वाटतें. आजच्या दृष्टीनें गतकालाकडे पाहून चालणार नाहीं. तेव्हां प्रस्तुत कालाचा संदेश असा आहे कीं, राष्ट्रीयत्वाची भावना दिवसेंदिवस विकसित होत असल्यानें सांप्रतच्या परिस्थितीस व भविष्य कालास अनुरूप असें कर्तव्यकर्म यांचाच विचार करून पुढें पाऊल टाकणें सर्व ज्ञातींस श्रेयस्कर आहे. यासाठीं रा. ठाकरे यांनीं आपल्या लेखनकौशल्याचा उपयोग अन्यतऱ्हेनें करून जातिभिन्नतेची नांगी मोडून टाकण्याचें पुण्यकर्म हातीं घ्यावें असें आमचें त्यांस बंधुत्वाचें सांगणें आहे. कारण ही नांगी अद्यापि आहे ही गोष्ट कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. आणि ती मोडून टाकण्याचें सामर्थ्य कोणांत असेल तर 'कोदंडाचे टणत्कार' करण्याचें सामर्थ्य ज्यांच्यांत आहे, अशा रा. ठाकरेसारख्या निर्भीड व सणसणीत लेखकांत होय. जुन्या दप्तरांतील अनुपलब्ध लेख या दृष्टीनें हा ग्रामण्यांचा इतिहास संग्राह्य असून तो आमच्याकडे पाठविल्याबद्दल आम्ही प्रकाशकांचे आभार मानतों.

**चुकीची दुरुस्ती**—महाराष्ट्र सारस्वताच्या तिसऱ्या वर्षाच्या शेवटच्या अंकांत म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत पसार झालेल्या विद्यार्थिनींचीं नांवें प्रसिद्ध केलीं आहेत त्यांतील कुमारी सावित्री सदाशिव बिडीकर या पसार झाल्या नाहींत हें कळविण्यास वाईट वाटतें. यांस सर्व विषयांत भरपूर गुण मिळाले होते. परंतु एका विषयांत एक गुण कमी पडल्यामुळें त्यांना यश आलें नाहीं. तूर्त त्यांची जी निराशा झाली आहे तिचा मोबदला यशांत विशेष भर पडून मिळेल अशी आशा आहे. दुसरी यशस्वी विद्यार्थिनी कु० प्रेमा हणमंतराव बोरकर ही सारस्वत ज्ञातीची नाहीं. आडनांवावरून आम्ही तिचा स्वज्ञातीय म्हणून नामनिर्देश केला याबद्दल दिलगीर आहों.

# महाराष्ट्र सारस्वत.

वर्ष ४ थें ] जानेवारी १९२०. [ अंक २ रा.


## रा. ब. राघवेंद्र रामचंद्र गंगोळी.

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके । जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥
इति महति विरोधे विद्यमाने समाने । नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥

भर्तृहरि.

केवळ राजाचा ह्मणजे सत्ताधिकाऱ्यांचा पक्ष धरून राजहित तेवढे पाहणारा जो पुरुष आहे त्याचा जनपद द्वेष करतें. परंतु जनतेच्या हितासाठींच खपणारे जे लोकमान्य पुढारी असतात त्यांस राजमान्यता मिळत नाहीं व अधिकारी वर्गास ते अप्रिय होतात. अशी या जगाची स्थिति असून नृपति व जनपद किंवा राजा व प्रजा या उभयतांची मर्जी संपादन करणारा कार्यकर्ता पुरुष देशास लाभणें फार कठिण आहे. अशा आशयाचे वर दिलेल्या संस्कृत श्लोकांतील कवि भर्तृहरीचे विचार आजमितीसही अनुभवास येतात. तेव्हां जे लोकमान्यही असून राजमान्यही होतात अशांचें जीवनचरित्र स्फूर्तिदायक व मार्गदर्शक असावयाचें. आमच्या सारस्वत समाजास अशा प्रकारच्या गुणामुळें ज्यानीं भूषविलें त्या सुशील व परोपकारी गृहस्थांचें, रा. ब. राघवेंद्रराव रामचंद्र गंगोळी यांचें, अल्प चरित्र येथें सादर करितों.

रा. ब. राघवेंद्रराव यांचा जन्म ता. ९ जुलई १८४८ रोजीं मंगळूर तालुक्यांतील बंटवाल या खेड्यांत त्यांच्या आजोळीं झाला. तीनचारशें वर्षांमागें गोमंतकांतून जे सारस्वत दक्षिणेंत वसाहतीसाठीं गेले त्यानीं नवीन प्रांतांतील पद्धतीप्रमाणें गांवावरून आडनांव वापरण्याची वहिवाट चालू केली. यामुळें मुळचीं वागळे, बोरकर वगैरे आडनांवें जाऊन चंदावरकर, बळवळी अशीं कित्येक खेड्यांचीं नावें आम्हां सारस्वतांत आडनावें होऊन बसलीं आहेत. याच कारणानें रावबहादूराचें आडनांव गंगोळी हें मंगळूर तालुक्यांतील कुंदापूरजवळ असलेल्या ग्रामावरून आलें आहे. गंगोळी हेंच त्यांच्या वाडवडिलांच्या वसाहतीच्या गांवाचें नांव होय.

रा. ब. राघवेंद्रराव यांच्या घरची स्थिति विशेष चांगली नव्हती. तशांत त्यांच्या वयाच्या आठव्याच वर्षी त्यांचे तीर्थरूप निवर्तल्यानें त्यांचें पालनपोषण त्यांचे चुलते, वायनाडचे मामलेदार शेषगिरीराव, यांनीं करण्याचें पतकरलें. हे गृहस्थ फार ममताळू होते. त्यांनीं आपल्या पुतण्यास फार लाडानें वागविल्यामुळें सहजच रा. ब. राघवेंद्रराव यांची शिक्षणाची बाजू किंचित् लंगडी पडली. मुळीं ११ व्या वर्षी त्यांनीं शिक्षणालयांत प्रवेश केला. आणि त्या काळच्या पद्धतीप्रमाणें इतक्या लहान वयांत त्यांस विवाह ग्रंथीनें बद्ध करण्यांत आलें ! अवघीं पांचच वर्षें कायतो त्यांनीं विद्याभ्यास केला आणि त्यांच्या सोळाव्या वर्षी शेषगिरीराव निवर्तल्यामुळें पुढील अभ्यासक्रम बंद करून प्रपंच चालविण्याची जबाबदारी पार पाडण्याकरितां त्यांना सरकारी नोकरी पतकरावी लागली.

इंग्रजी तीन इयत्तांपलीकडे ज्यांचें शिक्षण पोंहचलें नव्हतें त्यांस मोठ्या हुद्याची जागा त्याकाळीं देखील मिळणें अशक्य होतें. प्रथमतः त्यांचो कस्टम खात्यांत १२ रुपये पगाराच्या जागेवर नेमणूक झाली. अडीच वर्षांनंतर रेव्हिन्यू खात्यांत शिरून तेथें त्यांनीं साडेतीन वर्षें काम केलें. या मुदतींत त्यांनीं मराठी, इंग्रजी व कानडी या भाषांचा रात्रंदिवस अभ्यास चालू ठेवून सरकारी काम आटपून राहील ती वेळ ज्ञानार्जन करण्याकडे लाविली. याचा परिणाम असा झाला कीं या तीन्ही भाषा त्यांना उत्तम येऊं लागल्या. त्यांना लहान वयांत जो विद्याव्यासंग जडला तो त्यांच्या ७२ व्या वषा त्यांचें निधन होईपर्यंत अव्याहत टिकून राहिला. सर्वमान्य असे धार्मिक, सामाजिक व राजकीय ग्रंथ जे जे त्यांच्या अवलोकनांत आले ते त्यांनीं वाचले. कित्येक इंग्रजी नियतकालिकें व दैनिक पत्रें वाचल्याशिवाय त्यांचा एक दिवसही गेलेला नाहीं. इंग्रजी भाषेवर त्यांचें स्वामित्व इतकें होतें कीं ते एक अक्षरही खोडल्याशिवाय कित्येक तासपर्यंत तावाचे ताव लिहीत. त्यांची विचारसरणी निर्मळ, भाषाशैली सुंदर, विषय मांडण्याची पद्धति गोड अशी होती. हें सर्व अभ्यासयोगाचें फल. कित्येक ग्रंथांतील मननीय उतारे त्यांना मुखोद्गत असल्यामुळें अस्खलित रीतीनें व्याख्यान देतेवेळों ते असे उतारे म्हणून दाखवीत. या प्रकारची विलक्षण स्मरणशक्ति असलेलीं माणसें क्वचितच आढळून येतात.

रा. ब. राघवेंद्रराव यानीं सतत सहासात वर्षें इंग्रजीचा व इतर भाषांचा अभ्यास चालविल्याचा फायदा त्यांना मिळाला. यावेळीं मुंबई हायकोर्टांत ट्रान्स्लेटरची ( दुभाष्याची ) जागा रिकामी होती. त्या जागेसाठीं इंग्रजी, कानडी व मराठी या भाषांचें उत्तम ज्ञान असलेल्या इसमाची निवड करण्यासाठीं कानडा, धारवाड, विजापूर व बेळगांव या चारही जिल्ह्यांतून आलेल्या उमेदवारांची परीक्षा घेण्यांत आली. तींत रा. ब. राघवेंद्रराव सर्वांत श्रेष्ठ ठरले व पुढें दोन वर्षांनीं त्यांची ट्रान्स्लेटरच्या ऑफिसांत नेमणूक झाली. मुंबईस आल्यावर त्यांनीं हायकोर्ट वकील किंवा मुनसफीच्या परीक्षेचा अभ्यास चालू केला व ते त्या परीक्षेंत यशस्वी होऊन १८७७ सालाच्या सुमारास म्हणजे त्यांच्या २९ व्या वर्षीं त्यांस सबजज्ज नेमण्यांत आलें. न्यायाधीश या नात्यानें त्यानीं सुमारें तीस वर्षें फार उत्कृष्ट असें काम केलें. नीति व न्याय यांचा उपमर्द आपणाकडून होऊं नये म्हणून ते फार जपत. खऱ्याखोट्याची निवड करण्यांत ते फार पटाईत असल्यामुळें त्यांची योग्यता लक्षांत आणून सरकारानें त्यांस वेळोवेळीं वरच्या दर्जास चढविलें व पेनशन् घेते वेळीं ते कारवार येथें फर्स्टक्लास फर्स्ट ग्रेड सदर अमीन असून त्यांस दरमहा पगार रु. ८०० मिळत होता. त्यांची राजसेवा व लोकसेवा लक्षांत आणून सरकारानें त्यांस रावबहादूर असा किताबही दिला.

जे सरकारची चाकरी पतकरतात त्यांच्यांतील लहान थोरांपैकी जे कित्येक कर्तृत्ववान् पुरुष असतात त्यांची देखील अशी समजूत झालेली असते कीं आपणास सरकारच्या नोकरीबाहेर कोणतेंही सार्वजनिक कृत्य करतां येत नाहीं व तसें करणें योग्य ही होणार नाहीं. कै. न्या. मु. रानडे, रा. ब. जोशी, यांसारखीं क्वचित् उदाहरणें आक्षेपादाखल दिसतात. राजकीय बाबींत पडणें त्यांच्या सेवाधर्मास उचित नाहीं हें आम्ही कबूल करतों. परंतु इतर सामाजिक, औद्योगिक, बौद्धिक वगैरे ज्या अनेक सार्वजनिक हिताच्या बाबी असतात त्यांत मन घालून शक्य त्या उपायानें आपल्या बांधवांचें कल्याण करणें सेवाधर्माच्या आड येण्याचा संभव नाहीं, इतकेंच नव्हे तर, अशा प्रकारची जनसेवा करणें म्हणजेच जन्मसाफल्य करणें आहे हें सत्य रा. ब. राघवेंद्रराव यांच्या उदार चारित्र्यावरून लक्षांत येतें. न्यायाधीशाच्या जागेवर नेमणूक झाल्यापासून पेनशन घेईपर्यंत सुमारें ३० वर्षांच्या मुदतींत ते ज्या ज्या ठिकाणीं नोकरीच्या निमित्तानें गेले तेथें तेथें त्यांनीं अत्यंत उपयुक्त अशीं कामें हातीं घेऊन लोकांकडून धन्य धन्य म्हणवून घेतलें. दीन दुबळ्यांस आधार देणें, देवालयें, बगीचे, धर्मशाळा, तलाव, सडका, पूल इत्यादि लोकसमुदायास जवळ करून त्यांच्या मदतीनें व स्वतः कष्ट सोसून बांधणें व दुरुस्त करणें, आरोग्यविषयक सुधारणा घडवून आणून निर्जन प्रदेश हवाशीर ठिकाण बनविणें, म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्ड यांच्यांतील अव्यवस्था मोडून त्या सुव्यवस्थित व लोकहितकारक

करणें, जात, धर्म, पंथ यांची नांगी व त्यांमुळें उत्पन्न होणारा द्विधाभाव मोडून टाकण्यासाठीं निरनिराळ्या दर्जाच्या व मतभेदाच्या लोकांस एकत्र आणण्याच्या हेतूनें सामाजिक क्लब ( मित्रसमाज ) व वाचनालयें स्थापन करणें, इत्यादि कामांत त्यांच्या वयाचीं शेवटचीं ४०।४१ वर्षें गेलीं. नोकरीवर असतांना कोर्टकामाच्या बाहेरील बहुतेक वेळ ते याच कामांत गुंतलेले असत. पेनशन घेतल्यावर तर दहा वर्षें संपूर्णपणें त्यांनीं लोकसेवेस वाहिलीं. सौंदत्ती येथील येल्लम्मा देवीचें भव्य देवालय, मुद्देबिहाळ येथील शहर, धारवाड येथील एडवर्ड पार्क, लायब्रेरी व मित्रसमाज आणि कारवार येथील मित्रसमाज, धर्मशाळा व वाचनालय हीं सर्व रा. ब. राघवेंद्रराव यांचीं स्मारकेंच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. हीं सर्व कामें करतांना त्यांनीं जे कायिक, मानसिक व आर्थिक कष्ट सोसले त्याचें वर्णन या लहानशा लेखांत पूर्णपणें करणें शक्य नाहीं.

पेनशन घेतल्यावर ते धारवाड येथें जाऊन त्यांच्या स्वतः करतां बांधून ठेविलेल्या घरीं राहाणार होते. परंतु पेनशन घेतल्याक्षणीं कारवार येथील स्टूडंटस ब्रदरहुड ( विद्यार्थिबंधुसमूह ) संस्थेनें त्यांस मानपत्र देऊन तेथेंच राहण्याविषयीं विनंति केली. तेव्हां गर्हिवरून त्यांनीं कारवार मुक्कामींच आपला वृद्धापकाल घालविण्याचा निश्चय केला व गेल्या दहावर्षांत म्युनिसिपालिटीचे प्रेसिडेंट व हरएक कार्यांचे उत्पादक, पुढारी व कर्ते या नात्यानें जी त्यांनीं प्रशंसनीय कामगिरी केली तिचें विस्मरण कारवारकरांस कधीं होणें शक्य नाहीं. भोजन व शयन यांच्या साठीं लागणारी नियमित वेळ खेरीज करून इतर वेळीं ते सार्वजनिक कार्यांत चूर असत व सरकाराकडून ज्या ज्या वेळीं लोकहिताचीं कामें करून घेण्याचा प्रसंग येई तेव्हां तेव्हां आपल्या सौजन्यानें, वजनानें व निस्पृहतेनें तीं कामें यशस्वी होतील असें करीत. हा गुण असामान्य आहे. त्यांची देहयष्टी सुदृढ व धिप्पाड होती. मुद्रा गंभीर व अंतःकरण कोमल व सदा शांत असे. या प्रकारचा पुरुष ब्राम्हण-ब्राम्हणेतर, हिंदुमुसलमान, हिंदी व युरोपियन या सर्वांस सारखाच आदरणीय वाटत होता यांत आश्चर्य नाहीं. हुबळी येथें १८८६ सालीं असतां मोहरम व दसरा हे सण एकाच दिवशीं आल्यानें हिंदुमुसलमानांत मिरवणुकीच्या पायीं भयंकर दंगा होण्याचा संभव होता. तो रा. ब. राघवेंद्रराव यांच्या तेजामुळें व समेट करण्याच्या सात्विक प्रकारामुळें टळला याची आठवण अद्यापि तेथील लोक करतात. साधी राहणी, निगर्वी स्वभाव, उच्चविचारसरणी, मनमिळाऊ व प्रसंगोचित वर्तन यांच्या योगानें लहानांथोरांस ते आपल्या निकट आप्ताप्रमाणें प्रिय वाटत. अशा सच्छील पुरुषाचें वयाच्या ७२ व्या वर्षीं ता. २ नवंबर रोजीं निधन झालें तेव्हां शहरांतील सर्व जातींची व धर्मांची पुढारी मंडळी त्यांच्या स्मशान यात्रेस ईश्वरभजनाचा गजर करीत गेली व बेंड वाद्याचा मान देऊन त्यांचें दहन केलें यांत काय आश्चर्य ?

रा. ब. राघवेंद्रराव हे गौडसारस्वतांतर्गत चित्रापुर मठानुयायी सारस्वत होते. त्यांचीं सामाजिक मतें उदार होतीं. आमच्यांतील पोटभाग जावे व सर्व जात एकजीव व्हावी असें त्यांस अंतःकरणपूर्वक वाटे. संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेच्या द्वितीय संमेलनांत म्हापसें ( गोवें ) येथें त्यांची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत आली होती. त्यावेळीं त्यांचें भाषण, वर्तन व विचार यांचा ज्या कित्येकांस लाभ झाला त्यांस या भव्य मूर्तीची आठवण असेल. भाषणप्रसंगीं त्यांनीं ज्ञातेबंधूस उपदेश करतांना असें म्हटलें कीं—

> "बांधवहो ! आपल्या समाजाच्या उन्नतीसंबधाचा जो कर्तव्यभाग आपल्या शिरावर आहे, त्याची जाणीव मनांत बाळगा. आपल्या दुःस्थितीवर नजर फेंकून आणि त्या स्थितींतून आपलें व समाजाचें डोकें वर काढण्याची आकांक्षा धरून, प्रयत्नास लागा; राष्ट्रकार्यांच्या बाबतींतील आपल्या समाजाचा योग्य भाग उचलण्याची ताकद त्याच्या अंगीं आणण्याची हांव धरा आणि **सारस्वत** हें आपलें नांव अन्वर्थक आहे, व एका कालीं संपूर्ण ब्राह्मणवर्गास वेदविद्या देऊन त्यांच्या गुरुस्थानीं विराजणाऱ्या पूज्य पूर्वजांचे आपण योग्य

वंशज आहों हें कृतीनें दाखविण्यास तयार व्हा. स्वार्थत्याग करा. स्वार्थत्याग म्हणजे कांहीं आत्मघात नव्हे, तर **सार्वजनिक हित साधण्यांत आपलें व्यक्तित्व विसरणें, सार्वजनिक स्वरूपांत व्यक्तीचा लय करणें, तादात्म्य करणें, व्यक्तिरूप सोडून समाजरूप बनणें, अतएव आपल्या स्वरूपाचा विस्तार मोठा करणें, वृद्धि पावणें यालाच स्वार्थत्याग ह्मणतात. हें कार्य जो करितो तो सर्वांस पूज्य होतो, देवत्व पावतो, यांत संशय नाहीं.** ''

राव बहादुरांचे हे उद्गार स्वानुभवाच्या व आत्मविश्वासाच्या कसास उतरलेले, त्यांच्या स्वतःच्या वर्तनाचेच द्योतक असे आहेत हें त्यांच्या परिचितांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. प्रापंचिक सुखाच्या अभावीं स्वतःला सर्वस्वीं जनपदास वाहून घेऊन आत्मयज्ञ करणाऱ्या व्यक्ति सर्वांस पूज्य होतात व देवत्व पावतात असेंच आमचा धर्म सांगतो. त्याअर्थीं आमचे परमपूज्य समाजबंधु रा. ब. राघवेंद्रराव यांस परलोकीं सद्गतीच मिळेल. त्यांचा उज्ज्वल धडा सारस्वत ज्ञातीनें गिरविण्याचा प्रयत्न करावा व परिषदेच्या ध्येयानुरूप ऐक्याचें निशाण फडकावून रावबहादुरांच्या प्रेमळ उद्गारांत दर्शविलेल्या योग्यतेचीं रत्नें आमच्या समाजांत निपजतील अशा प्रकारची योजना अमलांत आणावी इतकें सुचवून हें अत्यंत पवित्र व स्फूर्तिदायक चरित्र संपवितों. या प्रसंगीं आंग्लकवी शेक्सपियर यांच्या खालीं दिलेल्या काव्योद्गारांची आठवण होते. हे शब्द कै. रावबहादुरांस पूर्णपणें लागू पडत नाहींत काय ?

*His life was gentle, and the elements so mixep*
*In him, that Nature might stand up,*
*And say to all the world,*
*'THIS WAS A MAN.*

---

# स्त्रीशिक्षणाची दिशा.

( लेखक रा. **वसंत नारायण नाईक**, एम्. ए. )

आपल्या मुलींना मुलांप्रमाणेंच शिक्षण मिळावयास पाहिजे याबद्दल आतां कोठेंही दुमत असेल असें मला वाटत नाहीं. प्रत्येक स्त्रीपुरुषाला चांगलें लिहितां वाचतां आलेंच पाहिजे असें चालू युगाचें ध्येय आहे. परंतु ज्याप्रमाणें मुलांच्या शिक्षणाबद्दल—तें कसें असावें याबद्दल—नेहमीं चर्चा चालू रहाणार, त्याच प्रमाणें किंबहुना त्याहूनही अधिक प्रमाणावर स्त्रीशिक्षणाची चर्चा आपणांमध्यें व्हावयास पाहिजे. कारण स्त्रीशिक्षण ज्या तऱ्हेचें असेल, त्या वळणावर गृहशिक्षा अवलंबून रहाणार. व आपल्या गृहशिक्षणावरच आपल्या भावी पिढीच्या मनाची, बुद्धीची व इतर सर्व संस्कारांची वाढ अवलंबून असणें अपरिहार्य आहे. हें ओळखून प्रत्येक विचारी पुढाऱ्यानें तें शिक्षण कसें असावें हें ठरविण्याच्या कार्याला लागलें पाहिजे. व तशा प्रकारची योजना आपल्या देशांत अमलांत येईल अशी चळवळ केली पाहिजे.

ज्याप्रमाणें मुलगा मॅट्रिक किंवा बी. ए. झाला म्हणजे तो खरा सुशिक्षित झाला असें म्हणतां यावयाचें नाहीं, त्याचप्रमाणें मुलगी ही तेवढी शिकली म्हणजे ती विद्येनें युक्त झाली असें होत नाहीं. वयाचें अमुक कालांत अमुक एका प्रकारच्या शिक्षणक्रमांतून बाहेर पडणें म्हणजे एकाद्या देशांत प्रवास करण्यापूर्वी त्या देशाचा नकाशा बारकाईनें पहाण्यासारखें आहे. नुसतेंच नकाशा पाहून स्वस्थ घरीं बसल्यानें प्रवासाचें पुण्य ज्याप्रमाणें कोणाच्याही पदरीं पडल्यासारखें होत नाहीं, तसेंच केवळ चार, पांच, दहा, वीस पुस्तकांचा अभ्यास करून परीक्षा दिल्यानें विद्येची सांगता होत नाहीं. आम्ही पुरुष जेव्हां पहिल्यानेंच

अगदीं अल्प प्रमाणावर विश्वविद्यालयाच्या पदव्या घेऊन बाहेर पडत असूं, त्यावेळीं कदाचित पदवीधर म्हणून आम्हांपैकीं कित्येकांना घमेंड वाटली असेल. पण जसजसे जास्त विद्यार्थी याच चरकांतून एका मागून एक सारखे बाहेर पडूं लागले आणि जगांतील प्रखर अनुभवानें त्यांची दृष्टि निवळूं लागली तसतसें हें पारडें फिरलें. आमची खरी योग्यता काय हें आम्हांस कळूं लागलें. हाच प्रकार कांहीं कालावधीनंतर आमच्या भगिनीवर्गाचा होईल. असें झाल्यानंतरच वरच्या दिखाऊपणांत किंवा केवळ विश्वविद्यालयाचे पदवीधर होण्यांतच सर्व शिक्षण नाहीं हें आपणांला कळूं लागेल. आणि तेव्हांच स्त्रीशिक्षणाचा प्रश्न चांगला सुटूं लागेल. ज्याप्रमाणें मुलगा बी. ए. झाला म्हणजे तो सुशिक्षित असें म्हणतां यावयाचें नाहीं, तसेंच त्यानें कोणत्याही प्रकारचें धंदेशिक्षण घेतलें तर तो अधिक सुज्ञ, अधिक शहाणा झाला असें म्हणणें योग्य होणार नाहीं. ज्याप्रमाणें मुलाला कोणत्याही धंद्याचें शिक्षण अत्यंत आवश्यक आहे, त्याचप्रमाणें मुलीला गृह कृत्याचें शिक्षण व्यवस्थित मिळणें आवश्यक आहे. मुलगा नुसता मॅट्रिक होऊन रोजगार शोधावयास निघाला म्हणजे त्याला कारकूनी पेशाचें शिक्षण घ्यावें लागतें. तो बी. ए. झाला व त्याला शाळेंत शिक्षक किंवा कॉलेजांत अध्यापक व्हावयाचें असल्यास त्याला हल्लीं M. A. व्हावें लागतें किंवा शिक्षणाला लागणारा डिप्लोमा मिळवावा लागतो. हें जसें मुलाविषयीं झालें तसेंच मुलींपैकीं शेकडा नव्याणव किंवा हजारांपैकीं नवशें नव्याणवांना संसार थाटून आपलें गृह सुशोभित करावयाचें असतें. हल्लींचा काळ स्वातंत्र्याचा आहे. तरी कोणतीही नोकरी किंवा धंदा पतकरण्यांत ज्याप्रमाणें कोणाही पुरुषाला लाज वाटत नाहीं त्याचप्रमाणें आपल्या घरांतलें प्रत्येक काम चोख, व्यवस्थित, टापटिपीनें, वक्तशीर, सावकाश व आनंदानें करण्यांत कोणाही सुशिक्षित म्हणविणाऱ्या स्त्रीला लाज वाटतां कामा नये. उलट अशी व्यवस्था ठेवणें अशा स्त्रीला अत्यंत भूषणावह आहे. हा उच्च किंवा कमी दर्जाचा प्रश्न नाही. हा केवळ श्रमविभागाचा प्रश्न आहे. सुशिक्षित असून जो पुरुष आपलें आयुष्य केवळ आळसांत किंवा कोणताही धंदा न करितां कंठील त्याला आपण नांवें ठेविल्याशिवाय राहत नाहीं. त्याचप्रमाणें स्त्री सुशिक्षित असून जर ती आपल्या गृहकृत्याची हेळसांड करील तर तिच्याबद्दल कोणाही समंजस माणसाला आदर वाटणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें पुरुष किंवा स्त्री यांपैकीं अमुक उच्च व अमुक नीच असें समजणें आपण रानटीपणाचें लक्षण मानितों, त्याचप्रमाणें गृहकृत्य करणें किंवा धंदा करून पैसा मिळविणें या संबंधाचें आहे. कांहीं अलौकिक पुरुष संसाराचा पूर्ण संन्यास करून कोणत्याही महत्कृत्याला आपलें सर्वस्व वहातात, तसेंच कांहीं असामान्य स्त्रियांनीं स्वतः अविवाहित राहून कोणतेंही परोपकाराचें कार्य शिरावर घेतलें तर पुरुषांप्रमाणें त्या स्त्रिया देखील सर्वांना वंद्यच होतील हें निर्विवाद आहे. पण ह्या असामान्य व्यक्तींचा मार्ग स्त्रीशिक्षणाची सामान्य चर्चा करितांना दृष्टीपुढें ठेवण्यासारखा नाहीं. जसें संन्यासाचा पाया गृहस्थाश्रमच आहे, तसें खऱ्या स्त्रीशिक्षणाचें मंदीर सुगृहिणीपदाच्या पायावरच उभारलें गेलें पाहिजे. तेव्हां कोणत्याही मॅट्रिक किंवा बी.ए. झालेल्या मुलीला आपल्यावरची संसाराची जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडतां येईल असें शिक्षण मिळावयास हवें.

ग्रॅज्युएट झाले म्हणजे सर्वच मुलगे ज्याप्रमाणें थोर हुद्यावर चढत नाहींत किंवा संपन्नावस्थेस पोहोंचत नाहींत, तसेंच प्रत्येक मॅट्रिक किंवा बी. ए. पास झालेल्या मुलीला श्रीमंत पती मिळेलच असें होणार नाहीं. व तशा प्रकारच्या डौलानें रहाणें एवढीच जर तिची महत्वाकांक्षा असेल तर तिच्या मनावर शिक्षणाचा खरा परिणाम झालाच नाहीं असें म्हणणें भाग पडतें. विद्या व लक्ष्मी या दोघींचें नेहमीं वांकडें असतें असें आपण पूर्वापार ऐकत आलों आहों. निदान या दोघींचा नेहमींच संयोग होतो असा जगाचा अनुभव खास नाहीं. ही परिस्थिति लक्षांत ठेवून आपण प्रत्येकानें वागावयास शिकलें पाहिजे. मुलींपैकीं ज्यांना पैशाची व बुद्धीची अनुकूलता असेल त्यानीं पुरुषांसारखेंच धंदेशिक्षण घ्यावें हें मला कबूल आहे. पण आमच्या समाजांत ज्याप्रमाणें पुरुषांपैकीं अगदीं थोडक्यांनाच कोणताही धंदा केल्याशिवाय केवळ सुखवस्तु माणसाप्रमाणें काळ कंठणे शक्य असतें, त्याचप्रमाणें स्त्रीवर्गांपैकीं अगदीं थोडक्यानांच केवळ हौस म्हणून किंवा

वंशज आहों हें कृतीनें दाखविण्यास तयार व्हा. स्वार्थत्याग करा. स्वार्थत्याग म्हणजे कांहीं आत्मघात नव्हे, तर **सार्वजनिक हित साधण्यांत आपलें व्यक्तित्व विसरणें, सार्वजनिक स्वरूपांत व्यक्तीचा लय करणें, तादात्म्य करणें, व्यक्तिरूप सोडून समाजरूप बनणें, अतएव आपल्या स्वरूपाचा विस्तार मोठा करणें, वृद्धि पावणें यालाच स्वार्थत्याग ह्मणतात. हें कार्य जो करितो तो सर्वांस पूज्य होतो, देवत्व पावतो, यांत संशय नाहीं.** "

राव बहादुरांचे हे उद्गार स्वानुभवाच्या व आत्मविश्वासाच्या कसास उतरलेले, त्यांच्या स्वतःच्या वर्तनाचेच द्योतक असे आहेत हें त्यांच्या परिचितांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. प्रापंचिक सुखाच्या अभावीं स्वतःला सर्वस्वीं जनपदास वाहून घेऊन आत्मयज्ञ करणाऱ्या व्यक्ति सर्वांस पूज्य होतात व देवत्व पावतात असेंच आमचा धर्म सांगतो. त्याअर्थी आमचे परमपूज्य समाजबंधु रा. ब. राघवेंद्रराव यांस परलोकीं सद्गतीच मिळेल. त्यांचा उज्ज्वल धडा सारस्वत ज्ञातीनें गिरविण्याचा प्रयत्न करावा व परिषदेच्या ध्येयानुरूप ऐक्याचें निशाण फडकावून रावबहादुरांच्या प्रेमळ उद्गारांत दर्शविलेल्या योग्यतेचीं रत्नें आमच्या समाजांत निपजतील अशा प्रकारची योजना अमलांत आणावी इतकें सुचवून हें अत्यंत पवित्र व स्फूर्तिदायक चरित्र संपवितों. या प्रसंगीं आंग्लकवी शेक्सपियर यांच्या खालीं दिलेल्या काव्योद्गारांची आठवण होते. हे शब्द कै. रावबहादुरांस पूर्णपणें लागू पडत नाहींत काय ?

*His life was gentle, and the elements*
*so mixep*
*In him, that Nature might stand up,*
*And say to all the world,*
*'THIS WAS A MAN.*

---

# स्त्रीशिक्षणाची दिशा.

( लेखक रा. **वसंत नारायण नाईक**, एम्. ए. )

आपल्या मुलींना मुलांप्रमाणेंच शिक्षण मिळावयास पाहिजे याबद्दल आतां कोठेंही दुमत असेल असें मला वाटत नाहीं. प्रत्येक स्त्रीपुरुषाला चांगलें लिहितां वाचतां आलेंच पाहिजे असें चालू युगाचें ध्येय आहे. परंतु ज्याप्रमाणें मुलांच्या शिक्षणाबद्दल—तें कसें असावें याबद्दल—नेहमीं चर्चा चालू रहाणार, त्याच प्रमाणें किंबहुना त्याहूनही अधिक प्रमाणावर स्त्रीशिक्षणाची चर्चा आपणांमध्यें व्हावयास पाहिजे. कारण स्त्रीशिक्षण ज्या तऱ्हेचें असेल, त्या वळणावर गृहशिक्षा अवलंबून रहाणार. व आपल्या गृहशिक्षणावरच आपल्या भावी पिढीच्या मनाची, बुद्धीची व इतर सर्व संस्कारांची वाढ अवलंबून असणें अपरिहार्य आहे. हें ओळखून प्रत्येक विचारी पुढाऱ्यानें तें शिक्षण कसें असावें हें ठरविण्याच्या कार्याला लागलें पाहिजे. व तशा प्रकारची योजना आपल्या देशांत अमलांत येईल अशी चळवळ केली पाहिजे.

ज्याप्रमाणें मुलगा मॅट्रिक किंवा बी. ए. झाला म्हणजे तो खरा सुशिक्षित झाला असें म्हणतां यावयाचें नाहीं, त्याचप्रमाणें मुलगी ही तेवढी शिकली म्हणजे ती विद्येनें युक्त झाली असें होत नाहीं. वयाचें अमुक कालांत अमुक एका प्रकारच्या शिक्षणक्रमांतून बाहेर पडणें म्हणजे एखाद्या देशांत प्रवास करण्यापूर्वी त्या देशाचा नकाशा बारकाईनें पहाण्यासारखें आहे. नुसतेंच नकाशा पाहून स्वस्थ घरीं बसल्यानें प्रवासाचें पुण्य ज्याप्रमाणें कोणाच्याही पदरीं पडल्यासारखें होत नाहीं, तसेंच केवळ चार, पांच, दहा, वीस पुस्तकांचा अभ्यास करून परीक्षा दिल्यानें विद्येची सांगता होत नाहीं. आम्ही पुरुष जेव्हां पहिल्यानेंच

अगदीं अल्प प्रमाणावर विश्वविद्यालयाच्या पदव्या घेऊन बाहेर पडत असूं, त्यावेळीं कदाचित पदवीधर म्हणून आम्हांपैकीं कित्येकांना घमेंड वाटली असेल. पण जसजसे जास्त विद्यार्थी याच चरकांतून एकामागून एक सारखे बाहेर पडूं लागले आणि जगांतील प्रखर अनुभवानें त्यांची दृष्टि निवळूं लागली तसतसें हें पारडें फिरलें. आमची खरी योग्यता काय हें आम्हांस कळूं लागलें. हाच प्रकार कांहीं कालावधीनंतर आमच्या भगिनीवर्गाचा होईल. असें झाल्यानंतरच वरच्या दिखाऊपणांत किंवा केवळ विश्वविद्यालयाचे पदवीधर होण्यांतच सर्व शिक्षण नाहीं हें आपणांला कळूं लागेल. आणि तेव्हांच स्त्रीशिक्षणाचा प्रश्न चांगला सुटूं लागेल. ज्याप्रमाणें मुलगा बी. ए. झाला म्हणजे तो सुशिक्षित असें म्हणतां यावयाचें नाहीं, तसेंच त्यानें कोणत्याही प्रकारचें धंदेशिक्षण घेतलें तर तो अधिक सुज्ञ, अधिक शहाणा झाला असें म्हणणें योग्य होणार नाहीं. ज्याप्रमाणें मुलाला कोणत्याही धंद्याचें शिक्षण अत्यंत आवश्यक आहे, त्याचप्रमाणें मुलीला गृह कृत्याचें शिक्षण व्यवस्थित मिळणें आवश्यक आहे. मुलगा नुसता मॅट्रिक होऊन रोजगार शोधावयास निघाला म्हणजे त्याला कारकुनी पेशाचें शिक्षण घ्यावें लागतें. तो बी. ए. झाला व त्याला शाळेंत शिक्षक किंवा कॉलेजांत अध्यापक व्हावयाचें असल्यास त्याला हल्लीं M. A. व्हावें लागतें किंवा शिक्षणाला लागणारा डिप्लोमा मिळवावा लागतो. हें जसें मुलाविषयीं झालें तसेंच मुलींपैकीं शेकडा नव्याणव किंवा हजारांपैकीं नवशें नव्याणवांना संसार थाटून आपलें गृह सुशोभित करावयाचें असतें. हल्लींचा काळ स्वातंत्र्याचा आहे. तरी कोणतीही नोकरी किंवा धंदा पतकरण्यांत ज्याप्रमाणें कोणाही पुरुषाला लाज वाटत नाहीं त्याचप्रमाणें आपल्या घरांतलें प्रत्येक काम चोख, व्यवस्थित, टापटिपीनें, वक्तशीर, सावकाश व आनंदानें करण्यांत कोणाही सुशिक्षित म्हणविणाऱ्या स्त्रीला लाज वाटतां कामा नये. उलट अशी व्यवस्था ठेवणें अशा स्त्रीला अत्यंत भूषणावह आहे. हा उच्च किंवा कमी दर्जाचा प्रश्न नाही. हा केवळ श्रमविभागाचा प्रश्न आहे. सुशिक्षित असून जो पुरुष आपलें आयुष्य केवळ आळसांत किंवा कोणताही धंदा न करितां कंठील त्याला आपण नांवें ठेविल्याशिवाय राहत नाहीं. त्याचप्रमाणें स्त्री सुशिक्षित असून जर ती आपल्या गृहकृत्याची हेळसांड करील तर तिच्याबद्दल कोणाही समंजस माणसाला आदर वाटणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें पुरुष किंवा स्त्री यांपैकीं अमुक उच्च व अमुक नीच असें समजणें आपण रानटीपणाचें लक्षण मानितों, त्याचप्रमाणें गृहकृत्य करणें किंवा धंदा करून पैसा मिळविणें या संबंधाचें आहे. कांहीं अलौकिक पुरुष संसाराचा पूर्ण संन्यास करून कोणत्याही महत्कृत्याला आपलें सर्वस्व वहातात, तसेंच कांहीं असामान्य स्त्रियांनीं स्वतः अविवाहित राहून कोणतेंही परोपकाराचें कार्य शिरावर घेतलें तर पुरुषांप्रमाणें त्या स्त्रिया देखील सर्वांना वंद्यच होतील हें निर्विवाद आहे. पण ह्या असामान्य व्यक्तींचा मार्ग स्त्रीशिक्षणाची सामान्य चर्चा करितांना दृष्टीपुढें ठेवण्यासारखा नाहीं. जसें संन्यासाचा पाया गृहस्थाश्रमच आहे, तसें खऱ्या स्त्रीशिक्षणाचें मंदीर सुगृहिणीपदाच्या पायावरच उभारलें गेलें पाहिजे. तेव्हां कोणत्याही मॅट्रिक किंवा बी.ए. झालेल्या मुलीला आपल्यावरची संसाराची जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडतां येईल असें शिक्षण मिळावयास हवें.

ग्रॅज्युएट झाले म्हणजे सर्वच मुलगे ज्याप्रमाणें थोर हुद्यावर चढत नाहींत किंवा संपन्नावस्थेस पोहोंचत नाहींत, तसेंच प्रत्येक मॅट्रिक किंवा बी. ए. पास झालेल्या मुलीला श्रीमंत पती मिळेलच असें होणार नाहीं. व तशा प्रकारच्या डौलानें रहाणें एवढीच जर तिची महत्वाकांक्षा असेल तर तिच्या मनावर शिक्षणाचा खरा परिणाम झालाच नाहीं असें म्हणणें भाग पडतें. विद्या व लक्ष्मी या दोघींचें नेहमीं वांकडें असतें असें आपण पूर्वापार ऐकत आलों आहों. निदान या दोघींचा नेहमींच संयोग होतो असा जगाचा अनुभव खास नाहीं. ही परिस्थिति लक्षांत ठेवून आपण प्रत्येकानें वागावयास शिकलें पाहिजे. मुलींपैकीं ज्यांना पैशाची व बुद्धीची अनुकूलता असेल त्यानीं पुरुषांसारखेंच धंदेशिक्षण घ्यावें हें मला कबूल आहे. पण आमच्या समाजांत ज्याप्रमाणें पुरुषांपैकीं अगदीं थोडक्यांनाच कोणताही धंदा केल्याशिवाय केवळ सुखवस्तु माणसाप्रमाणें काळ कंठणे शक्य असतें, त्याचप्रमाणें स्त्रीवर्गापैकीं अगदीं थोडक्यानांच केवळ हौस म्हणून किंवा

आपद् धर्म म्हणून धंद्यांत पडावें लागतें. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें पुरुषांहून स्त्रियांचें शिक्षण अधिक व्यापक व साहित्य, संगीत वगैरे कलांनीं सुशोभित असें बनवितां येणें शक्य आहे. पण ही स्त्रियांच्या शाळेंतील व कॉलेजांतील शिक्षणाची गोष्ट झाली.

पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाही संसारांत पडण्याच्या आधीं त्यांचें शरीर सुदृढ व निरोगी होईल अशा प्रकारचे मोकळ्या हवेंत खेळ खेळावयास मिळाले पाहिजेत. म्हणजे मुलींच्या शाळा आतां बांधल्या जातात त्यापेक्षां निराळ्या तऱ्हेनें बांधल्या पाहिजेत. त्याशाळा मोकळ्या हवेंत असून त्यांच्या भोंवतालीं जागा ऐसपैस असावयास पाहिजे. तेथील सर्व व्यवस्था स्त्रियांच्याच हातीं असावयास पाहिजे.त्याशिवाय शिकणाऱ्या मुलींना मोकळेपणा वाटावयाचा नाहीं. मुलींच्या शाळांप्रमाणें मुलींचीं कॉलेजेंही स्वतंत्र पाहिजेत. या शाळांतून व कॉलेजांतून मध्यम स्थितींतील मुलींनां त्यांच्या भावांप्रमाणेंच वयाच्या सोळा किंवा वीस वर्षांपर्यंत प्राथमिक शिक्षणापासून तों थेट विश्वविद्यालयाच्या पदवीपर्यंतचें सर्वशिक्षण व्यवस्थित मिळालें पाहिजे. या शाळांतून व कालेजांतून नेमला जाणारा शिक्षक वर्ग व्यवस्थित, सच्छील,प्रेमळ,विद्वान,विनम्र, साध्या रहाणीचा, व ज्याला आपल्या हिंदी संस्कृतीची चांगलीच माहिती आहे व तींतील उच्च व सत्य भावनांविषयीं आदर व प्रेम वाटत आहे, असा असला पाहिजे. माझ्यामतें मुलांपेक्षां मुलींच्या शिक्षणाला सुरवात लवकर करण्यांत आली पाहिजे. कारण मुलांपेक्षां मुलींच्या शरीराची, मनाची व बुद्धीची वाढ अधिक जलद होत असते. म्हणून व्यावहारिक दृष्टया पूर्ण होणारें शिक्षण मुलापेक्षां मुलीला लवकर मिळालें तर अधिक बरें.

मुलींच्या शाळांतून मराठी व संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास ज्यास्त प्रमाणावर व्हावयाय पाहिजे. त्यांना इंग्रजीचें ज्ञानही उत्तम असावें. पण तें मुलांप्रमाणें रुक्ष पद्धतीवर देण्यांत येऊं नये. प्रत्येक शाळेंतून मराठी, संस्कृत व इंग्रजी उत्तमोत्तम ग्रंथांचा संग्रह प्रत्येक इयत्तेच्या जरूरीप्रमाणें त्या वर्गांत ठेवण्यांत यावा. या उत्तम पुस्तकांचें व्यवस्थित वाचन मुलींकडून सुजाण शिक्षकिणीनें करून घेऊन मुलींत वाचनाची गोडी उत्पन्न केली पाहिजे. मुलांपेक्षांही मुलींना Hygiene चें ज्ञान सप्रयोग दिलें गेलें पाहिजे. आपलें आरोग्य कसें राखावें, घरांत स्वच्छता कशी ठेवावी, कोणचे पदार्थ उत्तम व कोणचे वाईट, बालकांची व रोग्यांची सुश्रूषा साधरणपणें कशी ठेवावी, वगैरे हरएक प्रकारचें तिच्या पुढील आयुष्याला हरघडी उपयोगी पडणारें ज्ञान व त्याचीं मूलतत्वें सप्रयोग कळतील अशी व्यवस्था शाळांतून होणे अत्यंत जरूरीचें आहे. वयाच्या सातव्या वर्षांपासून तों सोळाव्या वर्षांपर्यंत, नऊ वर्षांच्या अवधींत जर सर्व शिक्षण क्रम योग्य प्रकारें आंखण्यात आला तर असें ज्ञान सुलभ रीतीनें मुलींना देणें अशक्य होणार नाहीं. Hygiene प्रमाणेंच मुलींना आपल्या देशाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास मातृभाषेंतून उत्तम समजावून दिला पाहिजे. मुलांपेक्षां मुलींची पुढील अवस्था कूपमंडुकाप्रमाणें होण्याचा संभव अधिक. म्हणून लहानपणींच त्यांची दृष्टी विशेष फांकेल, आपलें गृह, आपलें कुटुंब, आपलीं सोयरीधायरीं यांच्या पलीकडे कांही जरा आहे ही जाणीव त्यांच्यांत आधींपासूनच उत्पन्न झाली पाहिजे. आपला देश प्राचीनकाळीं किती थोर होता, त्या देशांत ज्याप्रमाणें उत्तम नररत्नें त्याचप्रमाणें उत्तम स्त्रीरत्नें कशीं निर्माण झालीं, त्या देशास सांप्रतची अवनत स्थिति कां प्राप्त झाली, या गोष्टींचें ज्ञान त्यांना अवश्य मिळालें पाहिजे.

ज्याप्रमाणें आपल्यांतील मुलगे त्याच प्रमाणें आपल्यांतील मुली पाश्चात्यांची हीन नक्कल न होतील अशी खबरदारी मुलगा व मुलगी शाळेंत व कालेजांत शिकत असतानांच घ्यावयास हवी. तसें न झालें तर हिंदुस्थान देशाचें भावी चित्र भेसूर स्वरूपाचें रंगल्या शिवाय राहणार नाही. आपल्या उत्तम वाङ्मयाचा अभ्यास आपणांकडून अवश्य व्हावयास हवा. महाभारत, रामायण वगैरे राष्ट्रीय ग्रंथाचें मननपूर्वक अध्ययन आपण करावयास हवें. ज्या प्रमाणें आपणाला फ्लारेन्स नाइटींगेल, इलिसाबेथ फ्राय वगैरे लोकसेवेला वाहिलेल्या पाश्चात्य स्त्रियांची चरित्रें अवश्य समजलीं पाहिजेत त्याचप्रमाणें आपणांतील पद्मिनी, चांदबिबी, मिराबाई, अहल्याबाई, सावित्री, सीता, अनसूया, गांधारी वगैरे थोर स्त्रियांविषयीं माहिती असावयास पाहिजे. आपलें वाङ्मय म्हणजे आपल्या

देशाच्या उत्तम विचाराचें व ध्येयांचें भांडार आहे. तें आपणांस जेवढें लुटतां येईल तेवढें लुटण्यास आपण सदैव तत्पर असलें पाहिजे. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, एकनाथ, मोरोपंत, तुकाराम वगैरे मराठी कवी, त्याचप्रमाणें मराठींतील आधुनिक कालचे ऐतिहासिक चरित्रात्मक, व निबंध ग्रंथ व विशुद्ध अव्वल प्रतीच्या आपटयासारख्यांच्या कादंबऱ्या, यांचें वाचन प्रत्येक विदूषीनें मननपूर्वक व चिकित्सक बुद्धीनें आपल्या फुरसुतीच्या वेळांत करावयास हवें. तरच आमच्या स्त्रीवर्गाची बुद्धि परिपक्क व जोमदार होऊन, मन स्थिर, गंभीर व पवित्र होईल. अशा विदुषी स्त्रिया पुरुषांना राष्ट्रकार्याच्या हरएक बाबतींत उत्तम सहाय करून संसारही सुखमय करूं शकतील.

राष्ट्रकार्यांत 'समाजसुधारणा' हें काम विशेषें करून स्त्रीवर्गाचें आहे. पण तें पार पाडण्याकरितां स्त्रीवर्गाची बुद्धि व मन ज्ञानयुक्त व गंभीर अशीं व्हावयास हवींत. त्यांच्या मागचें गतानुगतिकत्वाचें लोढणें सुटलें पाहिजे. पुरुषांनी स्त्रीयांची स्थिति सुधारण्याच्या आधींच स्त्रियांना ही स्थिति सुधारण्याची अवश्यकता वाटूं लागली पाहिजे. म्हणजे पुरुष व स्त्री हीं सहकारितेनें आपली व आपल्या देशाची उन्नति करण्याला पात्र अशीं होतील. आपल्या शिक्षणानें जसे आपल्या प्राचीन संस्कृतींतील व आचारविचारांतील दोष आपल्याला उत्तम कळावयास हवेत तसेंच आपल्या समाजांत व राष्ट्रांत जें नव्याचें बीज पेरलें जात आहे त्यांत खरें हिताचें कोणचें व हानीकारक कोणचें हें ही ओळखण्याचा शहाणपणा आपणांत आला पाहिजे. सध्यां स्त्रिया घ्या किंवा पुरुष घ्या त्यांना जुनें तेवढें नको असतें किंवा नवें तें सर्व घ्यावेंसें वाटतें. यामुळें सुशिक्षित व सुधारलेला स्त्री पुरुषवर्ग म्हणजे केवळ पोषाखी, डौली व खर्चिक असा प्रकार सर्वत्र होऊं पहात आहे. हा शिक्षणाचा दोष नसून आपल्या उथळ वृत्तीचा व अपरिपक्क बुद्धीचा दोष आहे.

आपल्या घरांत धार्मिक बाबतींत जुन्याचें पारडें सारखें कमी होत चाललें आहे. हें माझ्यामतें अनिष्ट नाहीं. परंतु हें जुनें सुटलें तर त्याच्या जागीं नव्याची स्थापना होत नाहीं. आणि आपलीं मुलें कोणत्याही प्रकारच्या धार्मिक वळणाशिवाय वाढतात. हें अत्यंत हानिकारक आहे.. व्रतेंवैकल्यें गेलीं किंवा त्यांपासून मनावर होणारे संस्कार नष्ट झाले. व त्यामुळें तीं केवळ कवाईत होऊन राहिली आहेत. परंतु तीं जाऊन त्यांच्या जागीं आपल्या व्यावहारिक व नैतिक जीवनाला पोषक असा कोणता ना कोणता तरी उत्तम, शुद्ध, ज्ञानयुक्त, बुद्धीला व सदसद्विवेकाला पटणारा आणि अतःकरणाला शांती व धैर्य देणारा असा धर्मजीवनाचा संस्कार व्हावयास हवा. स्त्रिया अज्ञान आणि पुरुष आपल्या ऐहिक व्यवसायांत, धंद्यांत आणि फुरसुतीच्या काळीं क्लबांसारख्या संस्थांत गुरफटलेले असल्यामुळें मुलांच्या व मुलींच्या मनाची व बुद्धीची इतर बाबतीप्रमाणें धार्मिक बाबतींत ही हेळसांड झाल्याशिवाय कशी रहाणार ? म्हणून स्त्री ही हरएक प्रकारें पुरुषापेक्षांही अधिक सुसंकृत, दक्ष, प्रांजळ, सरळ, नमुनेदार व साध्या रहाणीची आणि वळणाची असावयास पाहिजे. तरच जीवंत धर्माचें बीज घरांत रुजेल. आणि सर्व व्यवहार चोख रहातील. पुरुषापेक्षां स्त्रीच्या अंगीं श्रद्धावंत भाव, देवावर निष्ठा व पवित्र आचरण हीं उत्तम बाणलीं पाहिजेत. अशा प्रकारची स्त्री गृहाची अधिष्ठात्रि असली ह्मणजे पुरुषही वचकून वागतो व सरळ वर्तनी बनतो. आणि गृह म्हणजे गोंधळ होत नाहीं. रस्किन या पाश्चात्यग्रंथकारायें या संबधानें जे उद्गार काढले आहेत ते आपण लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणतो "जोंपर्यंत स्त्री नीतिमान आणि दक्ष असेल तोंपर्यंत पुरुष दुर्गुणि असला तरी मानवी कुटुंब स्थिर राहूं शकेल. पण तेंच जर कुटुंबांतील स्त्रीचें पाऊल चुकलें तर सर्वच डोलारा कोंसळून संसार व गृह मातीमोल होण्याला निमिष मात्रही अवधी लागणार नाही." दुर्गुणी पित्याचीं दुर्दैवी बालकें सच्छील मातेनें आपल्या काबाड कष्टांनीं उत्तम वाढीला लाऊन नांवारूपाला आणलेल्याचीं अनेक उदाहरणें इतिहासांतून व हल्लीं समाजांत दाखवितां येतील. पण दुर्गुणी मातेच्या मुलाचे हाल व दुःस्थिति पित्यानें सांवरून नेलेली आपणाला क्वचितच आढळेल. म्हणूनच समाजाचें स्थैर्य, त्याची प्रगती, व्यवस्था व उन्नति त्या समाजांतील स्त्रीवर्गाच्या आत्मिक व नैतिक बलावर आहे असें म्हणण्यांत येतें. स्त्रियांनीं उत्तम चरित्रें, सरस धर्मग्रंथ, उदात्त ध्येयांनीं युक्त अशीं

रसभरीत काव्यें, व ज्यांच्या योगानें त्यांच्या मनोभूमीवर देशभक्तीचें उत्तम चित्र वठेल असे निरनिराळ्या देशांचे स्वभाषेंत लिहीलेले इतिहास, यांचें पारायण आपल्या दोनप्रहरच्या फुरसुतीच्या काळांत नियमानें, सावकाश, मननयुक्त असें अवश्य करावें. त्यांतील विषयांचा त्यांनीं आपल्या भगिनींशीं खल करावा, त्यांनीं प्रगल्भ विचार व स्फूर्तिदायक अवतरणें टिपून ठेवावींत. या सर्व ज्ञानानें आपलें मन व चारित्र्य बदलून वृत्ति तत्पर, शांत, विनम्र, सावधान व कर्तव्य दक्ष होईल असें करावें. आपण जें शिकलों तें त्यांनी इतरांस सांगावें. आपल्या साध्या व धीरोदात्त वर्तनानें आपल्या मुलांबाळांना त्यांनीं आदर्शवत् व्हावें. अशा रीतीनें स्वतःलाच नव्हे तर त्यांच्या संसर्गांत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मग ती व्यक्ति पति असो, बंधु असो किंवा मित्र असो, सर्वांना त्यांनीं पावन करावें. अशा प्रकारचें शिक्षण, अशा प्रकारचें वळण, अशा उन्नत व नैतिक, धार्मिक व सामाजिक कल्पना आपल्या स्त्रीवर्गांत रुजावयास पाहिजेत. व त्यांचें बी लहानपणींच मुलांमुलींच्या कोंवळ्या मनोभूमींत पेरलें गेलें पाहिजे.

हल्लीं आपणांत जेथें शिक्षण आहे म्हणून वाटतें तेथें बहुधा शिक्षणाचें वरपांगी स्वरूपच असतें. वरून भपकेबाज व आंतून पोकळ असा सर्वत्र प्रकार आढळून येतो. ही स्थिति स्त्रीयांच्या शिक्षणाचीच आहे असें नाहीं तर पुरुषांच्या शिक्षणाची सुद्धां तीच स्थिति आहे. आणि जेथें शिक्षण नाहीं तेथें सर्वत्र अंधार व गतानुगतिकत्वाचें वर्चस्व. आपल्यांत नीति आहे. आपलें हृदय मृदु व चांगल्या कल्पनांनीं युक्त असें आहे. पण यांतील कोणतीही गोष्ट ज्ञानवंत बुद्धीनें होत नाहीं. आमचें शरीर सुदृढ असेल पण तें आमच्या दैवानें. आम्ही सद्गुणीं असूं पण तेंही आमचें सुदैवच. आमच्यांत धर्माचें वास्तव्य असेल, पण तेंही पिढीजाद संस्कारांनीं चालत आलेलें. आम्ही लिहावयास शिकलों पण तोही कालाचाच महिमा. अशा घालघसर वर्तनानें आमच्या पूर्वसंचिताचा झपाट्यानें ऱ्हास होत चालला आहे. ही स्थिति बदलली पाहिजे. ही आंधळ्याची व दैववाद्याची वृत्ति सोडली पाहिजे. त्याच्या जागीं आत्मप्रयत्न व आत्मजागृति यांची स्थापना व्हावयास पाहिजे. तरच आपणांतील मुलगे व मुली, पुरुष व स्त्रिया हरएक बाबतींत धैर्यशील, जोमदार व शुद्ध वर्तनाचीं, शरीरानें, मनानें व बुद्धीनें परिपक्व व कसदार अशीं होतील. आणि आपला वैयक्तिक व राष्ट्रीय संसार सर्वथैव फलदायी होईल.

स्त्रीशिक्षणाची महति पुरुषांच्या शिक्षणापेक्षांही अधिक आहे. स्त्रियांना पुरुषांपेक्षां कमी तर नव्हेच पण कांकणभर सरसच शिक्षण मिळावयास हवें. पुरुष आपल्या नित्याच्या व्यवहारांत व सार्वजनिक कामांत बाणेदार किंवा भ्याड व कमकुवत ठरणें हें, सर्वथैव जरी नव्हे तरी बहुतांशी, स्त्रियांच्या हातीं आहे. येवढी जबाबदारी जिच्या शिरावर आहे तिचें मन, आत्मा, बुद्धि व शरीर हीं पुरुषांपेक्षां कमी सुसंस्कृत व जोमदार असावींत असें म्हणून कसें चालेल ? स्त्री ही संसार रथाची सारथी आहे. पण सारथी जर कुशल नसेल तर रथ उत्तम चालेल काय ! सारथी जर सुज्ञ व चतुर नसेल तर तो आंतल्या रथीचें शरसंधान निष्फल नाहीं कां करणार ? सारथी जर नेहमीं उत्साहभंग करणारा असला तर वीराला हतबल झाल्यासारखें वाटणार नाहीं काय ? महाभारतांत शल्यानें कर्णाचें शौर्य कसें मातीमोल केलें हें दाखविलें आहे. शल्य हा अत्यंत कुशल सारथी होता पण त्यानें कर्णाचा उत्साहभंग करण्याचें कंकणच हातीं बांधलें होतें. त्यामुळें तो वेळोवेळीं कर्णाचा पाणउतारा करून त्याला हतबल करी. उलट कृष्णाच्या सारथ्यानें अर्जुनाच्या शौर्याचें चीज झालें. कृष्णार्जुनांत ज्याप्रमाणे श्रेष्ठ कोण व कमी कोण हा प्रश्नच उरत नाहीं, त्याच प्रमाणें संसारांतील स्त्रीपुरुषांचें आहे. उलट तसा प्रश्न जर निघालाच तर कृष्णच श्रेष्ठ ठरेल. तोच न्याय येथेंही लागू होईल. जिच्या कुसवेंतून सर्व राष्ट्राला व अखिल जगाला ललामभूत होणारीं नररत्नें निपजतात ती स्त्रीजात अज्ञानांत ठेवणें, तिला क्षुल्लक किंवा हीन लेखणें, अशानें कोणत्याही देशाचा व त्यांतील संस्कृतीचा ऱ्हास होऊन तो विलयास जातो अशी साक्ष इतिहास, त्याचप्रमाणें मनुष्यजातीचा अनुभव, देत आहे. म्हणून आपल्या मुलींच्या व स्वतःच्या नैतिक, बौद्धिक व धार्मिक शिक्षणाची दिशा अशी ठरवावी कीं ज्यामुळें आपलें सर्व राष्ट्र जुन्यांतलें जेवढें उत्तम, त्यांचें

रक्षण करून, त्याला उजळा घालून नव्या मार्गांचें योग्य अवलंबन करूं शकेल व उत्कर्षाप्रत पोहोंचण्यास सर्वथैव समर्थ होईल.

स्त्रीशिक्षणाचा प्रश्न म्हणजे सर्व सुधारणेच्या प्रश्नांच्या बुडाशीं आहे. तो प्रश्न उत्तम रीतीनें न सुटल्यास आपण इतर केवढीही सुधारणा केली तरी लंगडे व पंगु असेच राहूं. पाश्चात्य देशांत हा प्रश्न ज्या तऱ्हेनें सोडविला गेला आहे तसाच तो येथें सुटला पाहिजे असें माझें म्हणणें नाही. केवळ अंध अनुकरण जुन्याचें असो किंवा नव्याचें असो, परंतु आपण जर **हिंदवासी** व **आर्य** म्हणविण्यांत भूषण मानितों तर 'आर्यांचें' मुख्य ध्येय जें पवित्र व उच्च जीवन आणि धर्मविचाराची जागृति व जोपासना त्याला आपण पारखें होतां कामा नये. या चढाओढीच्या काळांत आम्हां हिंदूंना साध्या, परंतु जोमदार व परिणत राहणीचा विसर पडतां कामा नये. विनाकारण नव्या संवयींची हौस मनाला शिवूं देतां कामा नये. आपली दैविक संपत्ति जेवढी वाढेल व आपल्या रोजच्या व्यवहारांत उद्योग, सचोटी, शहाणपणा मनमिळाऊपणा, व्यवस्था, व ज्ञानवंत स्वाभिमान हीं जेवढीं चमकूं लागतील तेवढें अधिक श्रेयस्कर. हें सर्व प्रयत्नसाध्य आहे. याला विश्वविद्यालयांत जावयास नको. याला संपत्तीची जरूरी नाहीं. उलट हे गुण अंगांत नसले तर संपत्तीमुळें स्वतःच्या व इतरांच्या अधःपातालाच आपण कारणीभूत होऊं. अशा प्रकारच्या प्रयत्नांत मन रंगलें म्हणजे तें निरलस होतें. त्याला फुरसतीचा काळ वायफळ बडबडींत किंवा लोकांच्या उठाठेवींत घालण्याला उरावयाचाच नाहीं. आमच्या भगिनींचा सकाळचा व संध्याकाळचा काळ बहुतेक गृहकृत्यांत जातो. त्यांना दोन प्रहरीं फुरसत मिळते. या वेळांत त्यांनीं आपलें जीवन अशा प्रकारच्या संवयींनीं युक्त कसें होईल याचा शांतपणें विचार करावा व कार्यास लागावें. आपल्या बंधूच्या किंवा इतर थोर माणसांच्या सल्ल्यानें त्यांनीं मराठी वाङ्मयाच्या अभ्यासास सुरुवात करावी. त्यांतील उत्तम ग्रंथांचा दिवसें दिवस संग्रह करावा. एक पुस्तक वाचल्यावर दुसरें, दुसऱ्यानंतर तिसरें, अशीं सर्व प्रकारचीं निर्मल, शुद्ध व अव्वल पुस्तकें त्यांनीं वाचावीत. तीं पुनःपुनः वाचावींत, त्यांतील उत्तम विचारांचें मनन करावें, त्यांची सत्यता आपल्या मनाला पटते किंवा नाही हें वारंवार अनुभवानें व आचरणानें ताडून पहावें. आपल्या ज्ञानाला, विचाराला, अंतःकरणांतील शुद्ध भावनांना निरंतर उजळा घालून तें ज्ञान, ते विचार, त्या कल्पना पक्क्या दृढ होतील असें करावें. म्हणजे त्यांचें आत्मिक बल झपाट्यानें वाढेल. त्यांच्यांत स्थैर्य, धैर्य वगैरे गुण प्रगट होतील. नेहमीं ईश्वरचिंतन, उत्तम पुस्तकांचें वाचन, सुहृदांशीं परिचय व संभाषण, आनंदी परन्तु गंभीर वृत्ति, शहाणपणा, मृदुता, विनय, सावेपणा, मनाचा प्रांजळपणा, आदरयुक्त पण करारी वर्तन, हल्लीं काय चाललें आहे व आपण काय केलें पाहिजे याचें ज्ञान, वगैरे गुणांनीं आमचा भगिनी वर्ग युक्त झाल्यावर आपल्या बंधूंना तशाच वृत्तीचे केल्याशिवाय राहणार नाहीं. आणि न्या. रानडे यांनीं वर्णन केलेली 'दुटप्पी व दुभंग' अशी हिंदूसमाजाची स्थिति नाहींशी होण्याचा सुदिन लवकरच येईल.

हें ध्येय फार उच्च आहे. हें आम्हांला सांगून काय उपयोग असें म्हणून चालावयाचें नाहीं. स्त्रीशिक्षणाची दिशा व ध्येय काय असावें याची फक्त रूपरेखा मीं काढिली आहे. स्त्रीशिक्षण सरकारी व खासगी शाळांतून व कॉलेजांतून कसें घ्यावें हें सांगण्याचा अधिकार माझा नाहीं. परंतु शाळांतून व कालेजांतून मिळणारें शिक्षण आपल्या आयुष्यक्रमाला सुरुवात होण्याच्या आधींच संपतें. त्याच्यापुढें स्वप्रयत्नानें, स्वानुभवानें आपण जी आपल्या ज्ञानांत, सद्गुणांत व कर्तृत्वांत भर घालितों तीच आपल्या संस्कृतीच्या खरी कामीं येते. असा प्रयत्न जर आपल्या हातून आपल्या पुढल्या आयुष्यांत झाला नाहीं तर जें कांहीं पूर्वीं मिळविलें असेल तेंही आपण गमावून बसतों. मीं जी स्त्रियांच्या शिक्षणाची रूपरेखा काढिली आहे ती त्यांच्या पुढील शिक्षणाची आहे. या वर्णनांत गृहकृत्यांविषयींच्या सर्व ज्ञानाची माहिती प्रत्येकीला असली पाहिजे असें मीं गृहित धरलें आहे. त्याचप्रमाणें hygiene चें ज्ञान सुद्धां प्रत्येक विदुषीला असलें पाहिजे. या गोष्टी एकदां कळल्या व संवयीच्या केल्या म्हणजे त्या सहजींच होतात. मनुष्याला 'संवय' ही देणगी ईश्वरानें याच करितां दिली आहे. 'संवय' व 'इच्छाशक्ति' यांच्या

जोरावरच मनुष्याला 'नराचा नारायण' होतो येथें. आरोग्य, टापटीप, खर्चाची योग्य वांटणी व काटकसर, स्वच्छता, नियमितपणा, आहारविहाराची व्यवस्था, वगैरे गोष्टी आपणाला संवयीनें आंगवळणी पाडतां येतात. त्याचप्रमाणें करमणुकींच्या साधनांचें आहे. तीं विशुद्ध असावींत. त्यांपासून मनाचा व शरीराचा थकवा नाहींसा होऊन मन प्रफुल्लित, शरीर ताजेंतवानें, व बुद्धि वाढविण्यास खर्चावी. करमणूक व नित्य व्यवसाय हे सोडलीं म्हणजे राहिलेला काळ कांहीं तरी आत्मसाधनांत घालवावा. त्यांत उत्तम मित्रांशीं संभाषण, उत्तम पुस्तकांचें पठण, व कोणत्याही प्रकारची जनसेवा यांचा समावेश होतो. हें सतत करीत राहिल्यानेंच आपल्या शिक्षणाची दिशा आपणाला दिसूं लागते किंवा हीच शिक्षणाची खरी दिशा आहे.

---

# आमचे लग्नविधि आणि सोहळे.

**लेखांक २ रा.**

( लेखक—**ऋग्वेदी.** )

विवाहकार्याची तिथि निश्चित झाली म्हणजे दोन तीन आठवडे लग्नसाहित्याची जुळवाजुळव करण्यांत सहज निघून जातात. वरपक्षापेक्षां वधूपक्षाकडे यासंबंधाची विशेष तयारी चालते. वरास द्यावयाच्या हुंड्याची रकम कन्यादानाच्या विधीच्या वेळीं देणें जरी शास्त्रोक्त आहे तरी हल्लीं ती वरपक्षीयांच्या पदरीं लग्नतिथीच्या आठ पंधरा दिवसांपूर्वींच घालावी लागते. कारण या रकमेंत स्वतःची कांहीं भर घालून किंवा तिच्यांत कधीं कधीं थोडी शिल्लक पाडून अनुकूलते-प्रमाणें वधूस सुवर्णालंकार करण्यासाठीं वराकडील मंडळी या रकमेचा उपयोग करिते. लग्नसाहित्याचा अंदाज बांधण्याचें काम कुटुंबांतील किंवा जवळपास राहणाऱ्या वयोवृद्ध व अनुभवी अशा स्त्रियांकडे असतें. यांची सल्ला घेऊन उभय पक्षाकडील पुढारी मंडळी सर्व प्रकारची व्यवस्था करितात. वृद्ध गृहिणींचा अंदाज बहुधा चुकत नसतो. व खर्चाविषयीं त्या सावध असल्यामुळें सामाजिक व्यवहाराच्या व शक्तीच्या बाहेर खर्चाचीं खातीं उत्पन्न करणें त्यांस कधीं रुचत नाहीं. हल्लीं वृद्धावस्थेस पोंहोंचलेल्या वडील जनांचा लाभ बहुतेक कुटुंबांस अनेक कारणांमुळें होत नाहीं. कांहीं ठिकाणीं हा लाभ करून घेण्याजोगा असतो तरी नव्या विचाराच्या मंडळीस सर्व कांहीं नवीन सुधारलेल्या पद्धतीवर करावें असें वाटत असल्यामुळें अनुभवी माणसांच्या सल्ल्याची किंमत नाहींशी झाली आहे. दिवसें दिवस लग्नकार्य म्हणजे चार दोन तासांत उरकून घेण्याचा एक विधि होणार असून जुन्या रीतिभाती व विधि देखील नामशेष होतील अशींच चिन्हें दिसत आहेत. कोणी म्हणतील असें होण्यापासून कालाचा अपव्यय व निरर्थक होणारा खर्च यांची बचत होईल. परंतु खर्च करण्याच्या सुधारलेल्या पद्धति दिवसेंदिवस निर्माण होत असून निदान द्रव्याच्या दृष्टीनें तरी पुढील कालांत होणारीं लग्नकार्यें फायदेशीर होतील असें आम्हांस वाटत नाहीं. असो.

## लग्न साहित्याची यादी

अनुभवी माणसांकडून तयार करून घेतांच बाजारांतून जिन्नस मागवितांना हळकुंडें, कुंकुं वगैरे मंगल सूचक जिन्नस यांची प्रथमतः खरेदी केली जाते. कोणताही पदार्थ तयार करण्यापूर्वीं पांच पुत्रवती सुवासिनींस बोलावून आणून त्यांच्या हस्तें हळकुंडें कुटवून दळण्याची काहीं ठिकाणीं चाल आहे. उडीद व तांदूळ यांचें पीठ तयार ठेवण्यासाठीं मोलकरिणींस चार सहा दिवस तरी कामावर ठेवून घ्यावें लागतें. व त्या मंगल

गीतें गात दळत असतांना पाहून लहान थोरांस मोठी मौज वाटते व या वेळेपासून भावी लग्नसभारंभाची गडबड घरांत व बाहेर चालू होते. शेजारच्या लहान थोर बायकांच्या मदतीनें मेतकूट, भाजणी, पापड, सांडगे वगैरे पदार्थ सोवळ्यानें तयार करून ठेवतात. लग्नतिथि जवळ येऊं लागते तसतसे गहुले, शेवया, फणोले वगैरे खिरीचे वळवट वळून ठेवतात. त्यानंतर मेवा मिठाईचे जिन्नस तयार करण्याची धामधूम चालते. देशपरत्वें पक्वान्नाच्या पद्धति निराळ्या आहेत तरी करंजा, चिरोटे, गुरवळ्या, काजूच्या गरांचे, बुंदीचे लाडू, गुळपापडी ( साखरलाडू ),चाकोल्या, अनारसे, चिवडा वगैरे जिन्नस आपआपल्या ऐपतीप्रमाणें दोन्ही-कडे तयार करतात. हल्लीं लग्नसमारंभ चालत असतांना जी मित्रमंडळी येत जात असते त्यांस चहा व उपाहार देण्याची चाल पडल्यामुळें पक्वान्नाचा सांठा मुबलक ठेवावा लागतो. वरपक्षाकडे भेटीदाखल मेवा मिठाई पाठवावयाची असते यासाठीं काहीं जिन्नस विशेष चांगल्या प्रकारें व भपकेदार असे बनविण्यांत येतात. शिवाय अलीकडची वरपक्षीय मंडळी आपणास लाग-णारे मेवाजिन्नस पुरविण्याची जबाबदारी वधूपक्षावर लादण्यांत पटाईत होत चालली आहे. त्यामुळें ते जिन्नस देखोल त्यांच्या किंवा स्वतःच्या खर्चानें वेळींच तयार करून ठेवावे लागतात.

मुंबईंत असे जिन्नस तयार करण्यास स्त्रियांस तरी विशेष त्रास घ्यावा लागत नाहीं. आवश्यक असलेलीं सर्व प्रकारचीं पिठें आयतीं तयार मिळतात किंवा धान्य दळण्याच्या गिरणींतून गड्यास पाठवून तीं चार-दोन तासांत तयार करून आणतां येतात. विद्युच्छ-क्तीनें जातें फिरत असतांना निघणारा ध्वनी हाच मंगलगीताची जागा भरून काढतो. वाकबगार ब्राह्म-णांच्या मदतीनें मोठ्या समारंभास लागणारे सर्व मिठा-ईचे जिन्नस ठरीव भाव देऊन एका दिवसांत तयार करून घेतां येतात.

## गृहमंडण, मंडप वगैरे.

घर सांगितल्याप्रमाणें स्त्रिया लग्नाचें साहित्य तयार करीत असतां पुरुषमंडळी इतर व्यवस्थेसाठीं रात्रंदि-वस कामांत चूर असते. घराच्या भिंती सारवून किंवा त्यांवर सफेता व रंग देऊन तें सुशोभित केलें जातें. लग्नमंडपासाठीं जागा तयार करणें, वाजंत्रीं, स्वयंपाकी व इतर नोकरांची व्यवस्था करणें अहेरासाठीं व लग्नप्रसंगीं वधुवरांस लागणारा कापडलत्ता, लुगडीं चोळखण वगैरे आणून स्त्रियांच्या पसंतीनें त्यांची खरेदी करणें, बिछायत, रोषनाई, चौरी, अबदा-गिरी, नक्षत्रमाळा, विड्याचीं पानें, फुलांचे हारतुरे मुंडावळी, दारूकाम, हिलाल, मजूर इत्यादि लग्नप्रसंगीं लागणाऱ्या सर्व वस्तूंची व माणसांची आयत्या वेळीं अडचण भासून धांदल न व्हावी म्हणून अनुभवी कुटुंबनायक त्यांची आगाऊच तजवीज करून ठेवितात.

लग्नाच्यावेळीं मंडप उभारण्याची चाल पूर्वकाला-पासून या देशांत प्रचलित आहे. दळणें कांडणें, तेल लावणें, पक्वान्नें तयार करणें, वधूवरांस बसण्यासाठीं सुशोभित मंडप तयार करणें, हळद कुटणें, बहुलें घालणें वगैरे कृत्यें विवाहांगभूत मानिलीं आहेत. म्हणूनच प्रत्येक कृत्य करतेवेळीं तें शुभ मुहूर्तावर करण्यांत येतें. वसिष्ठस्मृतींत मंडप कसा घालावा व तो किती विस्तृत घालावा याबद्दलचा पुढील उल्लेख सांपडतो.

**षोडशारत्निकं कुर्याच्चतुर्द्वारोपशोभितम् ।**
**मंडपं तोरणैर्युक्तं तत्र वेदिं प्रकल्पयेत् ॥**

म्हणजे मंडप औरस चौरस १६ अरत्नी ( हात ) असावा, त्याला चारही बाजूस चार सुशोभित कमानी असलेले दरवाजे असावे. तोरणांनीं हा मंडप शृंगा-रून त्यांत वेदी किंवा बहुलें घालावें. बाहेरगांवीं जागेची विशेष अडचण भासत नसल्यामुळें व मंडपास लागणारे बांबु व इतर जिन्नस बहुधा उसणवट किंवा भाड्यानें मिळत असल्यानें सोळा हातांहून मोठा मंडपही घालण्यांत येतो. कारण त्यांतच भोजन समारंभ उरकून घ्यावयाचे असतात. मांडव घालण्या-साठीं प्रारंभ करतांना योग्य मुहूर्तावर स्तंभ पुरण्याचा विधि होतो. या विधीला **स्तंभरोपण** व स्तंभाला **मुहूर्तमेढ** असें म्हणतात. मुंबईसारख्या ठिकाणीं जेथें मंडप घालण्याची सोय नसेल तेथें एका वांशाला पिंवळ्या फडक्याच्या चिंधीनें आंब्याची डाहाळी बांधतात व त्या चिंधींत सुपारी व हळकुंड बांधून तो वांसा घराच्या समोरील खांबास बांधून ठेवतात.

वधूवरांस बसण्यासाठीं जी जागा तयार करण्यांत येते तिला

## वेदिका किंवा बहुलें

अशी संज्ञा आहे. पूर्वकाळीं प्रत्येक द्विजाच्या घरीं होमहवनादिक कृत्यें वरचेवर होत. त्यावेळीं गृहपतीस पत्नीसह बसून धर्मकृत्य चालविण्यासाठीं घराच्या अंगणांत एक बैठक कायमची तयार करून ठेवावी लागे. हिला **वितर्दि** किंवा **वेदिका** असे म्हणत. सध्यां लग्न मुंजीच्या वेळीं अशा प्रकारची वेदिका तयार करतात. लग्नाच्या वेळीं वेदिकेवर वधुवरांनीं बसून तेथेंच अग्नीची स्थापना व पूजा करावयाची असते. अग्नीला संस्कृतांत **बहुल** अशी संज्ञा आहे. त्यावरून बहुल युक्त जी वेदिका तिला **बहुलें** किंवा बोहलें असें म्हणण्याची पद्धति रूढ झाली असावी. वेदिकेचें वर्णन नारद स्मृतींत पुढील प्रमाणें सांपडतें:—

**हस्तोच्छ्रितां चतुर्हस्तैश्चतुरस्रां समंततः ।**
**स्तंभैश्चतुर्भिः सुश्लक्ष्णां वामभागे तु सद्मनी॥**
**समां तथा चतुर्दिक्षु सोपानैरुपशोभिताम् ।**
**प्रागुदक् प्रवणां रंभास्तंभहंसशुकादिभिः ॥**
**विचित्रामंकितां कुंभैर्विहितैस्तोरणांकुरैः ।**
**भ्रंगारपुष्पनिकरैर्वर्णकैः समलंकृताम् ॥**
**विप्राशीर्वचनैः पुण्यैः स्त्रीभिर्दीपैर्मनोरमां ।**
**वादित्रनृत्यगीताद्यैर्हृदयानंदिनीं शुभाम् ॥**
**एवं विधामारुरुक्षेन्मिथुनं साग्निवेदिकाम् ।**
**हस्तोत्र बध्वाः ॥**

म्हणजे वेदिका घराच्या बाहेर डाव्या बाजूस रचावी. तिची उंची एक हात व लांबी रुंदी चार चार हात असावी. ही लांबी रुंदी वराच्या किंवा वधूच्या हातानें ठरवावी. वेदिकेचा पृष्ठभाग सपाट ठेवून चोहोंबाजूस पायऱ्या कराव्या ( बहुधा पश्चिम दिशेला एकाच अंगास या पायऱ्या करतात.) वेदिकेच्या चारही कोनांस चार सुशोभित खांब उभे करून त्यांस केळी बांधाव्या व नानाप्रकारच्या लतापुष्पपल्लवांनीं ते सुशोभित करावे. खांबाजवळ रंगविलेले हंसशुकादिकांचीं चित्रें काढलेले मातीचे कुंभ वेदिकेवर रचावे. पाण्यानें भरलेला पुष्पगंधादि सुगंधी द्रव्यानें युक्त असा सुवर्ण कलश बहुल्यावर असावा. त्यासभोंवतीं मंगलवाद्यें वाजत असतां, नृत्यगीत चालत असतां, ब्राम्हणांचे आशीर्वाद चालले असतां, सुवासिनींच्या दीपांनीं मनोहरत्व प्राप्त झाल्यावेळीं त्या अग्नियुक्त वेदिकेवर वधूवरांनीं आरोहण करावें.

या वर्णनावरून दिसून येईल कीं वेदिका ही लग्नकार्यांत अवश्य पाहिजे. गोमंतकांत व त्याच्या दक्षिण प्रदेशीं राहणाऱ्या सारस्वत ब्राह्मणांत वेदिका रचण्याची पद्धति पाळली जात असून ती सुशोभित करण्यासाठीं मात्र जो पैशाचा दुरुपयोग केला जातो त्यावद्दल आम्हांस वाईट वाटतें. वेदिकेवर मंडप उभारण्यासाठीं कुशल कारागिरांस दोनतीन आठवडेपर्यंत दिवसभर खपावें लागतें व वधूवरांस बसविण्याचा लहानसा मंडप तयार होईपर्यंत जवळ जवळ दोनशें रुपये खर्च येतो. मध्यमस्थितीतील लोक या कामीं ५० ।।७५ रुपयांचा विनाकारण खर्च करतात व गरीबांकडून होणारा दहा पंधरा रुपयांचा व्यय देखील अनाठायींच आहे हें निर्विवाद होय. प्राचीन पद्धतीप्रमाणें वेदिकेस केळी व वृक्षलतांच्या पल्लवांनीं व फुलानीं शोभा आणिली पाहिजे आणि या कामीं एक दोन रुपये खर्च होऊनही वेदिकेस जी शोभा प्राप्त होईल ती कागदी व बेगडी मंडपानें येणें शक्य नाहीं. सध्यांच्या महर्गतेच्या दिवसांत क्षणभर मनोहर वाटणाऱ्या मंडपांसाठीं केवळ हौसेखातर किंवा बडेजावीसाठीं द्रव्याचा दुरुपयोग न करतां अशा विवाहप्रसंगीं दीन दुबळ्यांस धर्मार्थ देणग्या देऊन, स्वकीय व इतर विद्यार्थ्यांस साहाय्य देण्यास उभारलेल्या द्रव्यनिधीस ( फंडांस ) हातभार लावून, किंवा अनाथ पंगू लोकांस प्रेमानें मदत करून त्यांचा कृतज्ञतापूर्वक मिळणारा आशीर्वाद घेतल्यास वधूवराचें कल्याणच होणार आहे.

मुंबापुरीसारख्या मोहमय नगरींत येऊन राहिलेल्या आमच्या सारस्वत बंधूंना शास्त्रास किंवा प्राचीन आर्य पद्धतीस अनेक अडचणींमुळें झुगारून यावें लागत आहे हें दुर्दैव होय. विवाहप्रसंगीं मंडप घालणें खर्चाचें व जागेच्या अभावामुळें बहुतेक अशक्य असल्यामुळें वेदिका रचणें वगैरे दिवसेंदिवस असाध्य होत गेलें. महाजनवाडीसारखी जागा भाड्यानें घेतली तर सभागृहांत अग्नि स्थापन करण्याची ( होम करण्याची ) घरधन्यांकडून मनाई केली जाते. यासाठीं कालेंकरून **स्टोव्ह** पेटवून होमकृत्य चालविण्याची पद्धति अमलांत

येईल कीं काय अशी भीति वाटते. घराच्या एका लहानशा खोलींत वधूवरांस कल्पनामय किंवा चित्रित वेदिकेवर बसवून लग्नविधि उरकून घ्यावा लागतो. सभोंवती स्त्रियांचा समूह व वैदिकांचा घोळका जमलेला असून लग्नास निमंत्रित म्हणून आलेल्या मंडळीस वधूवरांचें दर्शन देखील होत नाहीं. जवळच्या आप्तेष्टांस त्यांच्या जवळ जाऊन मंत्राक्षता त्यांच्या शिरावर टाकाव्या लागतात त्या बहुतेक भटजींच्या किंवा जवळ असणाऱ्या स्त्रियांच्या मस्तकावर पडतात. खरें पाहिलें असतां लग्नविधि निमंत्रित स्त्रीपुरुषांसमोर खास दिवाणखान्यांत तरी झाला पाहिजे. आलेल्या मंडळीस, अग्नीस व इतर देवतांस साक्ष ठेवून करावयाचा विधि त्यांच्या नजरेसमोर होणें इष्ट असून तशा प्रकारें तो झाल्यास विशेष आनंददायक होईल. सर्वांस वधूवरांचें अवलोकन करण्याची संधि मिळणें योग्य नाहीं काय ? या विधीस लागणारी जागा विस्तृत असावी लागते असें नाहीं. जे विधि चालविणारे असतील तेवढ्याच मंडळीची सोय होईल इतकी जागा राखून ठेवून इतरांचा घोळका तेथें गोंधळ घालणार नाहीं असें केल्यास लहानशा दिवाणखान्यांत सभाजनांसमोर लग्नविधि उरकून घेणें शक्य आहे.

मुंबापुरींत लग्न कार्य करणारास बाहेर गांवच्या प्रमाणें मंडपाचा जरी विशेष खर्च नाहीं तरी रात्रीच्या वेळीं दिव्यांची रोषणाई, आरास व इतर शोभादायक प्रकार यांच्या पायीं शेंकड्यांनीं रुपये खर्च करावे लागतात. ही पद्धति कितपत आवश्यक आहे याचा पुढें विचार करूं.

लग्नाची तिथी प्राप्त होण्यास आठ पंधरा दिवस असतांना दूरच्या पल्ल्यावर राहणाऱ्या आप्तेष्टांस विवाह प्रसंगीं सहकुटुंब सहपरिवार येऊन कार्यसिद्धि करण्याविषयीं उभयतर्फेच्या कुटुंबांतील वयोवृद्ध यजमानांच्या सहीच्या

## कुंकुमपत्रिका

किंवा आमंत्रण चिठ्या जातात. मुंबईत लग्नकार्यांत पुढाकार घेणारा गृहस्थ व त्याची पत्नी यांच्या सहीनें निमंत्रणें पाठविण्याची वहिवाट आहे. इंग्रजी पद्धतीच्या अनुकरणामुळें ही वहिवाट पडली असावी. जुनी पद्धति अशी होती कीं एकाद्याच्या घरीं लग्न किंवा उपनयन कार्य असलें म्हणजे कार्यकर्त्याकडून अन्य ठिकाणीं राहणाऱ्या जवळच्या व दूरच्या आप्तांना पत्रांनीं निमंत्रण केलें जातें. त्यांस कार्यापूर्वी चार दिवस अगोदर येऊन समारंभ यशस्वी करण्याविषयीं आग्रहाची विनंती केली जाई. या हातानें लिहिलेल्या पत्रिकेस मांगल्यसूचक कुंकुं लावीत यावरून तिला कुंकुमपत्रिका असें नांव पडलें. गांवांत राहणाऱ्या आप्तेष्टांस कार्यकर्त्या दंपतीकडून खास आमंत्रण स्वमुखानें दिलें जातें व त्या प्रसंगीं जाणाऱ्या स्त्रीस ओटी भरण्याची चाल आहे. या बाहेर लग्नाच्या पूर्व दिवशीं वाद्य वाजवीत आपल्या इष्टमित्रांस निमन्त्रणसूचक कुंकुममिश्रित अक्षता देण्याची चाल पूर्वापार चालू आहे.

हल्लीं निमंत्रण करण्याच्या पद्धतींत फार अंतर पडलें आहे. हस्त लिखित निमंत्रण चिठ्ठ्या क्वचितच दृष्टीस पडतात. छापखान्यांची सोय जिकडे तिकडे झाली असून आपआपल्या शक्तीपेक्षां हौशीकडे विशेष लक्ष देऊन साध्या किंवा भपकेदार अशा **कार्डावर** किंवा **नोटपेपर** वर शेकडों निमंत्रणें छापून घेण्यांत येतात. स्वभाषेंत किंवा इंग्रजींत छापलेल्या या पत्रिका बहुधा लाल किंवा निळसर, कधीं कधीं सुवर्णांप्रमाणें चकाकणाऱ्या शाईनें छापून जाहीरातीप्रमाणें ओळखीच्या व बिन ओळखीच्या माणसांकडे ही पाठविण्याची चाल दिवसें दिवस प्रचलित होऊं लागली आहे. लाल शाईनें कुंकुमाची जागा भरून काढिली आणि सवंग अशा पोस्ट खात्याच्या व्यवस्थेमुळें खास आमंत्रण देण्यासाठीं जाण्याचा त्रास ही वांचला. हें जरी खरें आहे तरी पूर्वीच्या पद्धतींतील प्रेमळपणा व अगत्य यांचा लोप झाला. अशा प्रकारच्या आमंत्रणास मान देऊन येणारांपैकीं कित्येक अपरिचित असल्यामुळें कधीं कधीं त्यांस "या, बसा" असें म्हणणारे ही लग्न मंडपांत दिसत नाहींत. ज्यानें त्यानें यावें व पानसुपारी वेळीं मिळाल्यास ती व नारळ घेऊन चालतें व्हावें ही पद्धति विलक्षण दिसते. तेव्हां आमच्या बंधूंनीं ही खर्चाची व अपमानकारक अव्यवस्थेस कारणीभूत होणारी निमंत्रण देण्याची पद्धति बंद करून आपले परिचित, आप्त व इष्टमित्र अशांसच निमंत्रणें

पाठविल्यास लग्नकार्य आटोपशीर व विशेष सुंदर होईल असें वाटतें. शिवाय लग्नाच्या दिवशीं, कधींकधीं त्यानंतर ही पोहोंचणारीं निमंत्रणें पोष्टखात्याच्या हवालीं करून बसण्यापासून काय फायदा ? मुलीचें किंवा मुलाचें लग्न झालें इतकीच जाहीरात द्यावयाची असेल तर ती गृह्य संस्कार या सदराखालीं एक दोन वर्तमान पत्रांतून कमी खर्चानें देण्याची सध्यांच्या काळीं सोय आहे. मग अशी जाहीर खबर तरी कां देऊं नये ? गांवांतील निकट संबंधी, विशेष परिचित व मित्रत्वाचें नातें असलेल्या लोकांत

### कुंकुममिश्रित अक्षत

फिरविण्याची चाल सर्व ठिकाणीं दृष्टीस पडते. (मुंबई शहर अफाट असून येथें तरी अक्षत फिरविणें फार अडचणीचें असल्यामुळें ती फक्त देवास व जवळच्या पांच घरांत देण्यांत येते. ) **अक्षत** हा पूर्णत्व दर्शक शब्द असून सोयरीक पूर्णपणें ठरल्याची दर्शक आहे असें म्हणतां येईल.

ही अक्षत लग्नाच्या पूर्वदिवशीं किंवा उभयपक्ष श्रीमंत असून इष्टमित्रांचा समुदाय मोठा असल्यास चार दोन दिवस अगोदर ही देण्यांत येते. मात्र ती देण्यास प्रारंभ केल्यापासून लग्नमुहूर्त विषम दिवशीं येऊं नये अशी खबरदारी घेण्यांत येते. कुलदेवतेस प्रथमतः अक्षत समर्पण करून नंतर उभयपक्षाची मंडळी मोठ्या थाटानें ग्रामदेवतेच्या देवालयांत जाऊन तेथील देवास नारळ व दक्षिणा समर्पण करिते व अमुक मुलामुलीचें लग्न अमुक मुहूर्तावर आहे तेथें येऊन कार्यसिद्धि करावी अशी प्रार्थना करून त्यांतर्फे उपाध्याय अक्षत देवापुढें ठेवतो. देवदर्शनानंतर ज्या त्या पक्षाचे पुरस्कर्ते स्वकीय इष्टमित्रांच्या घरीं अक्षत देण्याची व्यवस्था करितात. सोबत जाणाऱ्या भटजींकडून अक्षत देवविली जाते. कांहीं ठिकाणीं पुरुषांस पुरुषांनीं व बायकांस बायकांनीं अक्षता देण्याची चाल आहे. अशारीतीनें निमंत्रण देण्यास आलेल्या मंडळीस आसन देऊन नंतर अक्षत घेण्याची वहिवाट आहे. स्त्रियांनीं निमंत्रण देतांना निमंत्रित सौभाग्यवतींच्या कपाळास कुंकु लावण्यांत येतें. स्त्रिया आमंत्रण देतेवेळीं तें व्यावहारिक व तपशीलवार बद्धतीनें देत असून निरनिराळ्या सोहळ्यांची नांवें घेऊन ते पाहण्यास अवश्य या असें हंसतमुखानें सांगत असतात. प्रत्येक पक्षाची अक्षतीची मिरवणूक कधीं स्वतंत्र तर कधीं उभयतर्फेची मंडळी एकत्र होऊन निघते. मुहूर्ताची अनुकूलता, मदतगार मंडळीची सोय वगैरे गोष्टींवर ही मिरवणूक अवलंबून असते. लग्नमंडपाची मुहूर्त मेढ रोंविल्यापासून अक्षता वांटण्यास प्रारंभ होईपर्यंत सुमारें आठ दहादिवस

### वधूवरांस मेजवान्या

देण्याची सारस्वतांत चाल आहे. या पद्धतीस "**केळवण**" असें म्हणतात. उपनयनापूर्वी बटूस याचप्रमाणें आप्तेष्टांकडे बोलवून नेऊन उपाहार किंवा मिष्टान्नभोजन देण्यांत येतें व आरती दाखवून शक्त्यनुसार द्रव्यभेट देतात. जुन्या पद्धतीप्रमाणें मौंजींबंधन व्हावयाचा मुलगा विद्याभ्यासाकरितां गुरूच्या आश्रमीं जाणार त्यास कांहीं द्रव्य द्यावें या समजुनीवर ही चाल पडली असावी. **केळवणी** हा शब्द गुजराथी भाषेंतील असून त्याचा अर्थ **शिक्षण** असा आहे. परंतु केळवणीचें रूपांतर कोंकणांत खेळवण या शब्दांत झालें आहे. देशावर या पद्धतीस गडगनेर असें म्हणतात.मुलांप्रमाणें वधूस व वरास त्यांच्या त्यांच्या निकट संबंधीयांकडून केळवणीच्या द्रव्याचा लाभ होतो.मुलीस मिळालेला पैसा तिचीं मातापितरें तिच्या दागिन्यासाठीं खर्च करतात. लग्नांच्या पूर्व दिवशीं कुलदेवतेप्रीत्यर्थ ब्राह्मण सुवासिनींस मिष्टान्न भोजन देण्यांत येतें. त्यावेळीं लग्नमंडपांत बाहेर गांवाहून व जवळपासच्या खेड्यांतून आलेली बरीच आप्तमंडळी असते शिवाय शेजाऱ्या पाजाऱ्यांस निमंत्रण देण्याची ही चाल आहे. हें **देवकार्य** आटोपल्यावर खऱ्या लग्नकार्यास दुसऱ्या दिवशींच प्रारंभ होतो. त्याचा पुढील लेखांत विचार करूं.

# कुडाळदेशकर.

## लेखांक ४ था

(लेखक–कै. वा. महादेव आत्माराम राजाध्यक्ष)

[ '**इतिहास भक्त**' यांनीं महाराष्ट्रसारस्वताच्या गेल्या सालच्या दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या अंकांत रा. परूळेकर यांच्या **कुडाळदेशकर** या पुस्तकांतील दोन मुद्यांचें परीक्षण केल्यावर "**कुडाळदेशकरांची राजसत्ता**" या मुद्याचें परीक्षण करण्याचें काम आपले मित्र रा. महादेवराव यांजकडे सोंपविलें. याचें कारण 'इतिहास भक्त' यांची माहिती केवळ पुस्तकांवरून मिळविलेली असून त्यांस कुडाळ प्रांताचें प्रत्यक्ष ज्ञान नाहीं. रा. महादेवराव यांस तो प्रांत पूर्णपणें माहित असल्यामुळें त्यांजकडून वरील महत्वाच्या मुद्याचें परीक्षण होणें विशेष बरें असें इतिहासभक्तास वाटलें. मोठ्या दुर्दैवाची गोष्ट हीकीं हा अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला लेख प्रसिद्ध होण्यापूर्वींच रा. महादेवराव यांवर दुष्ट काळाचा घाला पडला. याबद्दल आमच्या मनास फार दुःख होत आहे—संपादक]

महाराष्ट्र सारस्वताच्या गेल्या सालच्या तीन अंकांत रा. रा. गणेश मुकुंद परूळेकर यांनीं लिहिलेल्या **कुडाळदेशकर** किंवा **दक्षिणेंतील आद्य गौड ब्राह्मण** या पुस्तकांतील दोन मुद्यांचें माझे मित्र इतिहासभक्त यांनीं परीक्षण केलें. त्यांवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं रा. परूळेकरांचा स्वज्ञातीस आद्यत्वाचा मान मिळवून देण्याचा प्रयत्न जितका हास्यास्पद तितकाच वस्तुस्थितीस विपरीत असा आहे सांप्रतच्या लेखांत कुडाळदेशकर ज्ञातीचा ऐतिहासिक दर्जा कोणता होता हें आपणास ठरवावयाचें आहे. कारण रा. परूळेकरानीं आपल्या पुस्तकांत असें एक विधान ठोकून दिले आहे कीं प्राचीन कालीं कुडाळदेशकरानीं कोंकणांतील कांही प्रदेशावर हजार अकराशें वर्षें, कधीं सार्वभौम तर कधीं मांडलीक या नात्यानें, सत्ता गाजविली असून त्यांच्या कारकीर्दींत मोठी धार्मिक क्रांतिही घडून आली आहे. रा. परूळेकर कांही म्हणोत, इतकी गोष्ट निर्विवाद आहे कीं कुडाळदेशकर हे सध्यां गौड सारस्वत ब्राह्मण या नावानें दक्षिणेंत ओळखल्या जाणाऱ्या ज्ञातिसमूहाचे एक भाग आहेत. तेंव्हां या शाखेनें कांहीं काल कोकणांतील काहीं भागावर राजकीय सत्ता खरोखरच चालविली असें इतिहासावरून सिद्ध झाल्यास अखिल ज्ञातिसमूहास आनंद व अभिमान वाटल्या वांचून राहणार नाहीं. परंतु दुरभिमानास बळी पडून दांभिकपणानें सर्वथैव खोटें महत्व स्वतःवर लादून घेण्यापासून कोणत्याही प्रकारचा फायदा नसून उलट आपला उपहास होण्याचा मात्र संभव आहे. इतिहास म्हणजे एखादा पक्ष धरून त्याची बाजू सजविणें नव्हे. तर आपल्यास प्रतिकूल किंवा अनुकूल वस्तुस्थिति जशास तशी वर्णन करणें यालाच इतिहास अशी संज्ञा आहे. या कामीं केवळ सत्याचीच पर्वा धरणें इष्ट व न्याय्य असल्यामुळें जो इतिहासावरून निष्कर्ष निघाला तो जसा मला रुचला नाहीं तसा रा. परूळेकरांस किंवा त्यांच्या अनुयायांस रुचणार नाहीं त्यास उपाय काय ?

रा. परूळेकर आपल्या इतिहासांत नमूद करतात कीं

**१ कुडाळ प्रांतांत कधीं स्वतंत्र तर कधीं मांडलिक ह्मणून ७ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत कुडाळदेशकरांनीं राज्य केलें.**

**२ जैनधर्मास गचांडी देऊन ब्राह्मणी धर्माचा ध्वज फडकावला.**

**३ गोमंतकांतील धर्म समीक्षणाचे वेळीं कुडाळदेशकर ऐश्वर्यसंपन्न असून त्यांनीं आपल्या राज्यांत शेणव्यांस आश्रय दिला.**

**४ शेणव्यांनीं कृतघ्नपणानें कुडाळदेशकरांचा छळ केला.**

रा, परूळेकरांस इसवी सनाच्या सहाव्या शतकानंतरचा कुडाळप्रांताचा इतिहास अवगत झाला आहे तो असाः —

"चालुक्यवंशीय सत्याश्रय पुलकेशीच्या ज्येष्ठ सुनेनें कोचरें गांवांतील एक खाजन दान दिल्याची मिति सांपडली आहे. ती मयत झाल्यावर चालुक्यांनीं कुडाळ प्रांतावर राज्य केलें नाहीं कारण तसा दाखला सांपडत नाहीं. त्याकाळीं कुडाळदेशकर हे लेखणीचे व तरवारीचे अधिकारी असल्यामुळें हें कुडाळचें बेवारसी राज्य आयतेंच त्यांच्या हातीं लागलें. अर्थात् त्यांचे मूळभुंकेचे गांव राजसत्तेचे किंवा देशसत्तेचे बनले. या देशसत्तेच्या गांवांत वालावली, पाट, परूळें, नेरूर व धामापूर हे पांच गांव मुख्य सत्तेचे मानिले जात व तेथील अधिकाऱ्यांस प्रभु, सामंत व नायक अशीं प्रमुखत्वदर्शक नांवें होतीं. देशसत्तेच्या इतर अधिकाऱ्यांस मतकरी व महाजन असें ह्मणत. याप्रमाणें सामंत, प्रभु, नायक, मतकरी व महाजन या नांवाच्या एकूण १८ अधिकाऱ्यांचें हें कुडाळ देशकरांचें प्राचीन राजमंडळ बनलें होतें. या मंडळांत इसवीसनाच्या बाराव्या शतकापर्यंत कधीं सामंत तर कधीं प्रभु व कधीं नायक असे गादीचे मालक असत. मात्र इसवीसनाच्या बाराव्या शतकापासून, इ० स० १६९६ पर्यंत सुमारें ६०० वर्षे वालावलीचे प्रभु राजे हेच त्या गादीचे मालक होते. देमसामंतभूपाल, राजे गोमजी, सूर्यभान-चन्द्रभान वगैरे कुडाळदेशकर राजांचीं नांवें कुडाळप्रान्तीं आबालवृद्धांच्या तोंडीं आहेत. वाडकरांच्या व शिंद्यांच्या दौलतींत जसे शेणवी अलीकडे नांवाजले त्याच्या कित्येक पटीनें अधिक कुडाळदेशकर हे इसवीसनाच्या सातव्या शतकापासून हजार अकराशें वर्षे आपल्या स्वतःच्या दौलतींत नांवाजले."

वरील आशयाचें साधें व सरळ वर्णन देऊन रा. परूळेकरानीं आपल्या ज्ञातिबंधूंचा अभिमान जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे आणि ऐतिहासिक महत्त्व सांगत असतां आपलें ज्ञाति भिन्नत्वही प्रस्थापित करून दाक्षिणात्य गौडांतर्गत इतर कोणत्याही वर्गास देशसत्तेचा किंवा राजसत्तेचा मान सतराव्या शतकापर्यंत मिळाला नव्हता असें ध्वनित केलें आहे. आजवर दक्षिण हिंदुस्थानचा इतिहास लिहिण्यास कांहीं विद्वान संशोधकानीं प्रयत्न केला असून त्यांस ताम्रपट व शिला लेख यां वरून उपलब्ध झालेली माहिति कोंकणांतील कुडाळदेशकरांच्या सत्तेचे अस्तित्व प्रस्थापित करण्यास समर्थ झाली नाहीं. आद्यगौड ब्राह्मणांनीं "पेशवाईच्या तोलाचें राज्य" फार प्राचीन काळीं करून दाखविलें असें रा. परूळेकर सांगत असून जुन्या इतिहासावर नवा प्रकाश पाडल्याबद्दल इतिहासज्ञात्यांचें कौतुकच करतील. परंतु आजवर प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून रा. परूळेकरांचीं विधानें सत्याच्या कसास कितपत उतरतात याचा विचार करूं.

## कुडाळ प्रांताचा भूगोल.

मुसलमानी अमलांत कोंकण सुभ्याच्या पोटीं कुडाळ व भीमगड या नांवाचे दोन परगणे होते. कुडाळ परगण्यांत १२ तर्फा, दोन कर्याती व एक बंदर होतें, दोन्ही परगण्यांत मिळून एकंदर ४२७ गांव होते. मुसलमानांचा प्रवेश या प्रांतांत होण्यापूर्वी हा प्रदेश कांहीं काल गोमंतकांतच मोडत असे. निरनिराळ्या राज्यक्रांतींत या मुलुखाचे हद्दींत फरक पडत गेल्यामुळें राजकीय दृष्ट्या भूगोलिक स्थानें वारंवार बदललीं. वालावलीची नदी समुद्रास मिळाली आहे तिच्या दक्षिणेकडील हल्लींचें मालवण व वेंगुलें तालुके व गोमंतक मिळून सह्याद्रि व समुद्र यांमधील प्रदेशास पूर्वी **कोंकण ९००** असें म्हणत. वालावली नदीच्या उत्तरेकडील प्रदेश म्हणजे कुडाळ परगण्यांतील व रत्नागिरी जिल्ह्यांतील कांहीं गांव यांस **इरिदिगे विषय** असें नांव होतें. रा परूळेकर

## कुडाळदेशकर लोकशाही

कुडाळ प्रांतावर चालत होती असें प्रतिपादन करतांना कळवितात कीं, राणी विजयभट्टारिका मेल्यावर पाट,

परूळें, नेरूर, धामापूर, वालावली या गांवांतील कुडाळदेशकरांकडे राजसत्ता आली व इ. स. ६०० पासून पुढें ५०० वर्षें लोकशाहीकडे ही सत्ता राहिली. कारण त्यांच्या मतें या मुदतींत निरनिराळया घराण्याकडे मुख्य सत्ता असे. हें जर खरें मानावयाचें तर मग कुडाळदेशकरांनीं कुडाळचें राज्य आक्रमिल्यावर शंभर वर्षांनीं खुद्द त्यांचाच मूळभुंकेचा गांव नेरूर हा विजयादित्यानें इ. स. ७०० मध्यें आषाढ प्रतिपदेच्या दिवशीं एका ब्राह्मणास दान कसा दिला ? याचें कारण साधें असून त्यावरून कुडाळदेशकरांची स्वातंत्र सत्ता त्या कालीं नव्हती असें सिद्ध होतें. नेरूर व इतर गांव चालुक्यांचे असून त्यांनीं तो दान दिला यांत आश्चर्य नाहीं. एऱ्हवीं परकीय सत्तेंतील गांव कोणाही राजास दान करून देतां येणें शक्य नाहीं.

इ. स. ७०० नंतर कोकणावर चालुक्यांचे ऐवजीं राष्ट्रकूट वंशाचा अम्मल चालूं लागला. त्यांच्या कारकिर्दींत कोकणांत शिलाहार राजांचा उदय झाला. हे राष्ट्रकूटांचे मांडलिक होते. या घराण्याचा मूळ पुरुष शणफुल्ल यास समुद्रकिनारा व सह्याद्रि यांमधील पट्टी शुभतुंग यानें दिली असें खारेपाटण येथील ताम्रपटावरून दिसतें. हा दाता इ. स. ७७५ त निवर्तल्यावर तिसरा गोविंद राष्ट्रकूट हा इ. स ८०३ च्या सुमारास गादीवर असून यानें विंध्याचलापासून तुंगभद्रेपर्यंतचा उतरदक्षिण व पूर्वपश्चिम प्रदेश आक्रमिला होता. याचा मुलगा शर्व किंवा अमोघवर्ष हा गादीवर बसल्यानंतर त्यानें आपला कोंकण शिलाहार वंशाचा मांडलिक दुसरा कदर्पि यास सर्व कोकण सन ८७७–७८ त दिल्याबद्दल कान्हेरी येथील लेण्यांत लेख कोरून ठेविला आहे. रा. परूळेकरांच्या मतें कुडाळदेशकरांच्या राज्याची अशारीतीनें मन मानेल तशी विल्हेवाट लावणारे हे सत्ताधारी कोठून आले ? दक्षिण कोकणचे शिलाहार राजे कोकण ९०० वर व इरिदिगे विषयावर राज्य करीत याबद्दल भक्कम पुरावा आहे. शिलाहारांच्या दुसऱ्या शाखेच्या अरिकेसरीनें त्यांची सत्ता नष्ट करून आपलें प्रभुत्व स्थापन केलें. ही गोष्ट इ. स. १००८ च्या सुमारास घडली असावी असें इतिहासज्ञ म्हणतात. यानंतर या उत्तर देशीय शिलाहारांच्या ताब्यांतून हा प्रदेश गोव्यांच्या कदंबवंशानें काबीज केला. ही गोष्ट अकराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास घडली.

कोंकण ९००वर गोव्यांचा कदंब दुसरा जयकेशी हा इ. स. ११२८–२९ सालीं व जयकेशीचा पुत्र परमादि अथवा विजयादित्य हा सन ११४७ सालीं सत्ता चालवीत होता याबद्दल प्राचीन लेख सांपडतात. गोव्यांच्या कदंबांचें राज्य शिलाहारानीं नष्ट केलें. व शिलाहारांची सत्ता वीरश्रेष्ठ सिंघण यादवानें १२१९।२० त संपुष्टांत आणिली. अर्थात् या वेळेपासून यादव कोकणचे राजे झाले. पुढें अल्लाउद्दिन खिलजीनें या प्रदेशाचें स्वामित्व संपादन केलें. या मुसलमानाच्या स्वारींत गोमंतकांतील श्री सप्तकोटेश्वराच्या देवळाचा विध्वंस झाला. पुढें विजयानगरचें हिंदुराज्य प्रबल होऊन दाभोळपर्यंतचा मुलुख विजयानगरकरांच्या ताब्यांत गेला. माधवमंत्री नांवाचा एक सारस्वत ब्राम्हण विजयानगरचा सरसुभेदार १३८० च्या सुमारास गोमंतकांत आला. त्यानेंच मुसलमानांच्या हातून हा प्रदेश सोडविला. अर्थात् सातव्या शतकापासून चौदाव्या शतकापर्यंत कुडाळ प्रांतावर कुडाळदेशकर प्रभुराजे किंवा मतकरी महाजनादिकांची लोकशाही राज्यसत्ता चालवीत नव्हती हें इतिहासावरून सिद्ध होत आहे. माधवमंत्री विजयानगरकरांचा अधिकारी होता. जर कुडाळदेशकर मांडलिकत्वानें किंवा स्वतंत्रपणें कुडाळचें राज्य चालवीत होते तर त्यांचें जोडभुंकेचें कोचरें ग्राम, जें केवळ त्यांच्या राजधानीपासून पांचसहा कोशांपलीकडे नाहीं तें, त्यास **माधवपूर** असें नाम कां प्राप्त होतें व त्या गांवांतील एक खाजन २५ ब्राह्मणांस अग्रहार करून देण्यास माधवमंत्री कसा धजला असता ? यावरून असेंच म्हणावें लागतें कीं कुडाळांत मांडलिक किंवा स्वतंत्र राजा असता तर त्याच्या राजधानी नजीकच्या गांवावर माधवानें सत्ता चालवून त्याचें नांव बदललें नसतें. परंतु नांवही बदललें व तेथील जमीनही दान दिली यावरून रा. परूळेकरांचें इतिहासकथन सत्यास धरून नाहीं असाच निष्कर्ष निघतो.

**देम सामंत भूपाळ, राजे गोमजी** व **चंद्रभान, सूर्यभान** राजे कुडाळांत होऊन गेले असें रा. परूळेकर सांगतात. त्यांच्या मोठेपणाच्या गोष्टी

कोणत्याही जुन्या इतिहासांत जरी सांपडत नाहींत तरी त्या कित्येक वृद्धांच्या तोंडून ऐकण्याची सुसंधी रा. परूळेकरांनीं प्राप्त करून घेतली. प्रस्तुत लेखक त्या प्रांतांत सुमारें ८ वर्षें होता. या मुदतींत चंद्रभान सूर्यभानाशिवाय इतर भूपाळांचीं नावें त्यांच्या कानावर आलीं नव्हतीं. त्यांचें जन्म, त्यांची कारकीर्द, त्यांचे मातापितर किंवा पुढील वेलविस्तार यांची माहिती रा. परूळेकरांनीं वृद्धांकडून मिळवून आपल्या अजव इतिहासाच्या पुढील भागासाठीं राखून ठेविली असल्यास नकळे.

देमजी सामंत भूपाळ, राजे गोमजी आणि चंद्रभान सूर्यभान हे कुडाळदेशकर राजे असून प्रभू देसायांचे पूर्वज असते आणि त्यांच्या पराक्रमासंबंधानें विश्वसनीय माहिती उपलब्ध असती तर तिचा संग्रह प्रभु देसायांचे वंशज कै० अनंतराव सीताराम देसाई यांनीं आपल्या पूर्वजासंबंधानें लिहिलेल्या लेखांत ग्रथित केलीच असती. रा. पिंगुळकरांपाशीं हा लेख असून त्यांतील माहिती त्यांनीं आपल्या सावंतवाडी संस्थानाच्या इतिहासांत समाविष्ट केली आहे. कै. देसाई यांनीं जबाबदारी ओळखून लिहिलेल्या या लेखावरून असें दिसतें कीं कुडाळांतील प्रभु हे केवळ देसाई किंवा देशमुख होते. व त्यांच्या घराण्याची माहिती फक्त सोळाव्या शतकापासून थोडथोडी मिळते. कै. देसाई यांस प्राचीन माहिती उपलब्ध झाली नव्हती असें गृहीत धरण्यास आम्ही तयार आहों. तरी सोळाव्या शतकापूर्वींच्या सूर्यभान चंद्रभान राजांच्या रा. परूळेकरांस मिळालेल्या शेंकडो दानपत्रांच्या नकला, निदान चार दोन तरी, त्यांनीं प्रसिद्ध करावयास पाहिजे होत्या. अद्यापि त्यांनीं त्या प्रसिद्ध कराव्या असें त्यांस आमचें सांगणें आहे. रा. नरहर व्यंकटेश राजाध्यक्ष यांनीं जिवबादादा बक्षी यांच्या चरित्रांत व करंडे शास्त्री यांनीं कवळे मठाच्या इतिहासांत चन्द्रभान सूर्यभान राजांच्या सनदांचा उल्लेख केला आहे. परंतु त्यांच्या विधानाचें समर्थन त्यांनीं योग्य दाखले देऊन केलें नसल्यामुळें या उभयतां लेखकांनीं विश्वसनीय माहिती प्रसिद्ध केली आहे असें म्हणतां येत नाहीं. कोंकणासंबंधानें प्राचीन ऐतिहासिक माहिती देणारीं बरींच जुनीं व नवीं पुस्तकें वाचून पाहिल्यावर प्रस्तुत लेखकाची खात्री झाली कीं,

## कुडाळदेशकर राजे

कधींच झाले नाहींत. सूर्यभान व चंद्रभान हे कदाचित् चंद्रादित्य व आदित्यवर्मा या नांवाचे चालुक्य कुलोत्पन्न राजपुरुष व बंधु जे कुडाळ प्रदेशांत सहाव्या शतकांत होऊन गेले व ज्यांच्या कारकीर्दींत इनामें वगैरे देण्यांत आल्याचा पुरावा मिळतो त्यांसच पुढें कुडाळदेशकर देसायांच्या पूर्वजांत अजाण किंवा मतलबी लोकांकडून स्थान देण्यांत आलें असल्यास नकळे. रा. परूळेकर यांस देखील या उभयतां राजबंधूंची त्यांच्या नांवापलीकडे माहिती देतां आली नाहीं. मात्र ते असें सांगतात कीं शके १२५७ त या राजबंधूंनीं कुडाळदेशकरांच्या स्वामीस प्रत्येक गांवांतून उत्पन्न लावून दिलें. ही अचूक माहिती करंडे शास्त्र्यांवर मात करण्यासाठींच त्यांनीं आपल्या इतिहासांत दिली असल्यास आमचें कांहीं म्हणणें नाहीं. परंतु या प्रत्येक गांवचें इनाम दाखविणारी सनद आज मितीस उपलब्ध नाहीं ही गोष्ट सत्य आहे. ज्या अर्थीं कुडाळप्रांतांत कुडाळदेशकर राजसत्ता गाजवीत नव्हते त्या अर्थीं त्यांच्यांतील

## सर देसाई किंवा देसाई

यांचा ऐतिहासिक दर्जा काय होता हें पाहूं. विजयानगरच्या हिंदू राज्यांत सारस्वत ब्राह्मणांची चलती व्हावयास सुरुवात झाली. तेव्हांपासून दलवाई, दलपति, दणाईत, नाडीग, नाडगौड, प्रभु, पै ( अप्पय्या ) देसाई, सरदेसाई, नाडकर्णी, नायक, कामत, भांडारी, महाले ( म्हाले ), मंत्री, महाजन, कुडव ( कूटप ) वगैरे हुद्यांवर सारस्वत लोक कामें करूं लागले. कानडा जिल्ह्यांत कडवाड ( कारवार ) येथें व होंडदकल्लु ( कुमठा ) येथें अठरा तिवाशांचे देसाई शेणवी ब्राह्मण अधिकारी होते. गोमंतकांत बोकडबागकर सरदेसाई देखील तसेच नामांकित अठरा तिवाशांचे धनी होते. हेही शेणवीच होत. आराबा, पारशें, पेडणें येथील देसाई सारस्वतच. तसेंच कानडा प्रांतापासून तहत रत्नागिरी जिल्ह्याच्या देवगड तालुक्यापर्यंत नजर फेंकिली व तर्फानिहाय नाडकर्णी यांची नेमणूक पाहिली तर सारस्वत ब्राह्मणांनीं विजयानगरकरांच्या कारकीर्दींत चांगली योग्यता संपादन केली होती असें दिसतें.

नाडकरणी हा शब्द नाडु व करणी या दोन कानडी शब्दांपासून साधला आहे. नाडु म्हणजे तालुका यांत कित्येक ग्रामांचा समावेश होई. ग्रामाधिकाऱ्यांवरील मुलकी अधिकारी हे नाडकरणी होत. देशमूख व देशपांडे यांचें जें अधिकाराचें नातें तेंच देसाई व नाडकरणी यांचें नातें.कर्नाटकांत देशमूख या ऐवजीं देसाई हा शब्द प्रचलित आहे. अर्थात् नाडकर्णी शेणवी ब्राह्मण असून त्यांस ज्यांनीं नाडकर्ण दिलें ते कानडी मुलखांतले असले पाहिजेत. ज्यांनीं नाडकर्णी उत्पन्न केले त्यांनींच देसाई किंवा सरदेसाई निर्मिले. यावरून कळून येईल कीं देसाई, सरदेसाई हे स्वतंत्र किंवा मांड लिक राजे नसून खास सत्ताधाऱ्यांनीं नेमिलेले अधिकारी होते. **प्रभूदेसाई** यांतील प्रभू या शब्दावर जोर देऊन देसायांस राजेपणा देणाऱ्या रा. परूळेकरांस एवढेंच सांगावयाचें कीं प्रभु ( परब, परोब ) हा हुद्दा एकट्या कुडाळ देशकरांसच प्राप्त झाला होता असें नसून द्राविड ब्राह्मणांत व सारस्वतांतील शेणवी ( स्मार्त व वैष्णव ) व पेडणेकर यांस ही लाभला होता. देसाईपणाचे अधिकार कालेंकरून बहुतेकांचे गेले तरी देसाई, सरदेसाई हीं आडनांवें मात्र जशाचीं तशीं राहिलीं. अशा प्रकारच्या महत्व सूचक शब्दांवरून इतिहास रचावयाचा असेल तर प्रभूंस देवपद ही देतां येईल. शेणवी शाखेंत **राजाध्यक्ष** हें उपनांव आहे. हेंच जर कुडाळदेशकरांत असतें तर रा. परूळेकरांनीं मतकरी, नायक, सामंत, देसाई व प्रभु यांस मांडलिकत्व देऊन या राजांचे राजाध्यक्ष हे अध्यक्ष होते असें खात्रीनें प्रतिपादन केलें असतें. सर्व दाक्षिणात्य सारस्वतांचो मूळची वसाहत बहुतेक समुद्रकांठच्या गांवीं होती. कुडाळदेशकर झाले तरी कुडाळप्रांतांतील १२ तर्फांपैकीं तर्फ पाट, हवेली, मालंड व मसुरें यांत मुख्यत्वें रहात असत. रा. परूळेकर सांगतात कीं गांवकरांवरील अधिकारी मतकरी हे असून त्यांकडे २० पासून ३० गांव अहोत. हा हिशेब कुडाळ परगण्याच्या गांवावरून वकील साहेबांनीं ठरविला असला पाहिजे. कारण मतकरी व महाजन हे अशाप्रकारचे अधिकारी होते असा ऐतिहासिक दाखला मिळत नाहीं. गांवकीत व गांवच्या देवस्कींत ज्यांस मत आहे ते मतकरी. मतकरी उपनाम धारण करणारे कुडाळदेशकर म्हापण, वेतोरें, खानोली, दाभोली, आजगांव, गोळवण व माळगांव या सात गांवांत दिसल्याबरोबर त्यांस गांवकऱ्यांवरचे अधिकारी बनवून टाकणाऱ्या रा. परूळेकरांस कुडाळप्रांतांतील सांतडें येथें असलेलें पेडणेकर मतकरी घराणें माहित नसावेंसें वाटतें. महाजन ह्या शब्दावरून गांवांतील प्रमुख गृहस्थ इतकाच अर्थ निघतो. असे महाजन ( म्हाजन ) प्रत्येक गांवांत व जातींत आहेत.

प्रभू, सामंत, नायक या शब्दांनीं राजकीय महत्व व्यक्त होतें असें सांगणाऱ्या रा. परूळेकरांस असा सवाल आहे कीं कुडाळ प्रांतांत मराठ्यांची मोठी वस्ती कदीमकाळापासून आहे, ते काय फक्त जमीनदारीचा पेशा पत्करून होते ? तर्फा निहायचे मराठे नाईक व देसाई, ज्यांपैकीं कांहींजण विजयानगरकर व विजापूरकर यांसही भारी होत, ते काय फक्त नांगरावरच संतुष्ट होते ? कुडाळदेशकर देसायांची देसाईगिरी गेली तरी मराठ्यांनीं मनगटाच्या जोरावर ती विशेष सत्तेसह संपादिली यावरून देखील दिसून येईल कीं मराठ्यांनीं मुळापासून राजकीय महत्व संपादन करण्याच्या कामीं मन घातलें होतें. गांवची सर्व सत्ता कुडाळदेशकरांकडे सोंपवून प्रजाधर्मानें वागण्यांतच ते संतुष्ट नव्हते.

कडवाडचे देसाई आणि बोकडबागचे सरदेसाई हे शेणवी असून ते कुडाळच्या सरदेसायांस कधींच खंडणी देत नसत. गोमंतक व कोंकण ९०० वर गोव्यांच्या कदंब राजांचा प्रत्यक्ष अम्मल असल्याबद्दल लेखी पुरावा आढळतो. त्यांच्यावेळीं गोमंतकांत देसाई, दणाईत, दळवी, नायक वगैरे उपनांवाचे शेणवी होते व त्यांचे वंशज अद्यापि आहेत. हीं नांवेंच शेणवी लोक हातांत समशेर धरीत इतकेंच नव्हे तर कमी अधिक प्रमाणांत सेनाधिपतीचें काम करीत असें दर्शवितात. गोमंतकांत लेखणीचे अधिकारी तर शेणवीच होते हें रा. परूळेकरांसही मान्य आहे. परंतु "शेणवी वाडीच्या किंवा शिंद्याच्या दौलतींत अलीकडे नांवाजले, त्याच्या कित्येक पटींनं अधिक कुडाळदेशकर हे इसवी सनाच्या सातव्या शतकापासून हजार अकराशें वर्षे आपल्या स्वतःच्या दौलतींत नांवाजले" असें विधान रा. परूळेकर यांनीं

आपल्या इतिहासांत मोठ्या दिमाखानें केलें आहे. कुडाळदेशकरांचें राज्य होतें, हें विधान ज्याप्रमाणें खोटें ठरलें तसेच शेणव्यांच्या पुरातन दीन स्थितीविषयींचें त्यांचें विधान फोल आहे हें पुढील लेखांत दाखवूं. त्याचप्रमाणें कुडाळच्या देसायांचा खरा ऐतिहासिक दर्जा कोणता होता, कुडाळदेशकरांच्या कलम व समशेर बहाद्दरी संबंधाच्या गोष्टी कशा निराधार आहेत, बामणदंड, देवराईंतील पाषाण वगैरे विषयांवर रा. परूळेकरांनीं विकारवश होऊन केलेली टीका किती अयोग्य आहे याचा विचार पुढील लेखांत करूं.

---

# गोमंतकी कोंकणी भाषा.

( लेखक—रा. **वामन मंगेश दुभाषी.** )

श्रीक्षेत्र गोकर्णाजवळील गंगावळी नदीपासून उत्तरेस ठाण्यापर्यंतच्या समुद्रकांठच्या प्रदेशास **कोंकण** हें नांव असून त्यांतही गोमंतकाच्या दक्षिणेकडील सीमेपासून रत्नागिरीपर्यंतचा भाग खास कोंकण असा व्यावहारिक पद्धतीनें मानला जातो. या भागांतून बाहेरच्या प्रदेशांत जे लोक जातात ते आपणास **कोंकणस्थ, कोंकणे** किंवा **कोंकणांतले** असें म्हणवितात. सामान्यत्वें पाहूं गेल्यास या खास कोंकणांतील सर्व लोकांची भाषा मूळची कोंकणी आहे. परंतु सामान्यत्वें १८।२० मैलांच्या अंतरानें शब्दोच्चारांत फरक पडत गेल्यामुळें गोमंतकाहून उत्तरेस १००–१२५ मैलांच्या टापूंत कोंकणी भाषेंत फरक पडत गेला असून ती मराठीच्या वळणावर गेली आहे असें आढळून येतें. उलट दक्षिणेकडे व घाटमाथ्यावरील कर्नाटक प्रांतांत पाहिलें तर तिला कानडीचो झांक मारते. तेव्हां कोंकणीचें खरें स्वरूप गोमंतकांतील खेड्यापाड्यांत व कारवार तालुक्याच्या उत्तरेकडील लहान ग्रामांत तेवढें ओळखतां येतें. गोमंतकावर पोर्च्युगीझ अम्मल चालू झाल्या कारणानें त्यांतील शहरांच्या ठिकाणीं कोंकणीवर देखील पोर्च्युगीझ भाषेचा थोडा बहुत अम्मल बसल्याप्रमाणें होऊन त्या भाषेंतील उच्चारपद्धति व शब्द कोंकणींत शिरले आहेत.

गोमंतकीय ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांनीं सरकार दरबारापुरती कांहीं काल मराठी, तर कांहीं काल कानडी व मुसलमानी व सध्यां पोर्च्युगीझ भाषा पतकरली तरी पूर्वकालापासून त्यांचे सार्वजनिक व्यवहार व पत्रलेखन हीं मराठीच्या द्वारेंच होत. यामुळें कोंकणी ही घरांत बोलण्याची भाषा व व्यवहारापुरती मराठी, अशी स्थिति चालत आली आहे. राज्यक्रांत्यांस कंटाळून व अन्यकारणांसाठीं कित्येक सारस्वत ब्राम्हणांनीं व ब्राम्हणेतरांनीं गोमंतकाचा त्याग केला व ते इंदूर माळव्यापासून कोचीपर्यंत पसरले. तरी ज्याप्रमाणें मूळ वसाहतींतील कुलदेवतांचा त्यांनीं त्याग केला नाहीं. त्याप्रमाणें आपली मूल भाषाही अजीबात टाकून दिली नाहीं. प्राप्त परिस्थितीमुळें मूळच्या कोंकणींत फरक पडून ती किंचित् रूपांतर पावली आहे. यासाठीं प्रस्तुतलेखांत गोमंतकाच्या खेड्यापाड्यांत स्त्रियांच्या तोंडीं असलेल्या कोंकणी भाषेचा विचार केला आहे.

आरंभीं एक गोष्ट सांगणें आवश्यक आहे ती ही कीं, ही भाषा लेखनाच्या कामीं विशेष उपयोगांत आणलेली भाषा नसून ती फक्त बोलण्याच्या कामीं मात्र वापरण्यांत येते. इंग्रजींत सांगावयाचें म्हणजे ही Language नसून dialect आहे. कोंकणीच्या द्वारें ख्रिस्ती धर्मज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं मिशनरी लोकांनीं कानडी, इंग्रजी किंवा मराठी लिपीचा उपयोग

करून कोंकणींतून अनेक लहान पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं आहेत. तसेंच गोमंतकीय खिस्ती लोक पोर्च्युगीझ भाषेच्या ज्ञानाच्या अभावीं इंग्रजी लिपीचा उपयोग करून कोंकणींत पत्रव्यवहार करीत असतात. इतकेंच नव्हे तर कांहीं वर्तमानपत्रें ते कोकणींत चालवून राजकीय व सामाजिक विषयांची सांगोपांग चर्चा करीत असतांना पाहिलें म्हणजे ही भाषा लेखनाच्या उपयोगी आणण्यालायख आहे असेंच दिसतें. कांहीं हिंदुलेखकही कोंकणीचे अभिमानी असून आमचे बंधु रा. वामनराव वालावलकर यांनीं लिहिलेलीं कांहीं पुस्तकें ( गोंयकाराचो मुंबइकार, मोगाचें लग्न, वगैरे ) फार मनोरंजक आहेत.

जी भाषा लेखनाच्या कामीं वापरली जात नाहीं, तिची प्रगति होणें म्हणजे तिचें शब्दभांडार वाढून ती सर्व प्रकारचे विचार प्रगट करण्यास समर्थ होणें शक्य नाहीं. तथापि अशा भाषेचा जवळपासच्या भाषांवर परिणाम झाल्यावांचून राहत नाहीं. लेखनोपयोगी भाषांच्या त्या पोषक होतात व त्यांच्यांतील अनेक शब्द नकळत सर्वमान्य ग्रंथांत शिरतात. सुप्रसिद्ध संस्कृत पंडित मॅक्समूलर यांनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं:—

Dialects, according to some,are the descendents of one uniform language; according to others they are the feeders of the classical languages and exist not only before a common language can be framed, but continue to influence its later development by constant inter-communication.

म्हणजे कांहींच्या मतें बोलण्याच्या कामीं मात्र उपयोगांत असलेल्या भाषा एकाच मुख्य भाषेपासून निघालेल्या आहेत. कांहीं म्हणतात कीं या सुसंस्कृत भाषांच्या पोषक असून लेखनोपयोगी भाषा प्रचलित होण्यापूर्वींच त्या प्रचारांत आलेल्या असतात आणि पुढें सतत दळणवळणामुळें लेखन-योग्य भाषेवर देखील त्या आपला पगडा बसवितात. कोंकणीसंबंधानें विचार करतां ही असेंच दिसतें. अत्यंत प्राचीन कालची वैदिक भाषा मागें पडून सुगम व नियमबद्ध संस्कृत भाषा प्रचलित झाली. या संस्कृतामधून पाली, गौडी, शौरसेनी वगैरे भाषा उत्पन्न झाल्या. बंगाली, गुजराथी, मैथिली या सर्व गौडी भाषेपासून निघाल्या असून त्यांच्याच पोटीं जुनी महाराष्ट्री व कोंकणी या भाषा उत्पन्न झाल्याचें दिसतें. सध्यांची मराठी ही जुन्या महाराष्ट्री भाषेची दुहिता असून जुन्या महाराष्ट्रीशीं कोंकणीचें नातें बहिणीचें दिसतें. कांहीं सारस्वत लेखकांनीं येथील दक्षिणात्य सारस्वतांची मातृभूमि बंगालदेश असावा या समजुतीवर आपल्या कल्पनेस दुजोरा देण्यासाठीं कित्येक बंगाली शब्द कोंकणींत व बंगालींत समान आहेत अतएव त्याच हिंदुस्थानच्या पूर्वेकडील भागांतून सारस्वत ब्राह्मण दक्षिणापथीं आले असावे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. बंगालींतील ऑकारांत उच्चार पद्धति कोंकणींत रूढ आहे यावरून देखील आपल्या कल्पनेस पुष्टी मिळते असें त्यांचें मत आहे. परंतु ऑकारांत उच्चार पद्धति गौडीभाषेपासून निघालेल्या गुजराथींतही प्रचलित आहे. इतकेंच नव्हे तर मराठी भाषेस सध्यांचें रूप प्राप्त होण्यापूर्वीं मराठी कवी ग्रंथरचनेंत ओ या स्वरांत शब्दांची योजना करीत. जुन्या पोथ्या व अभंग पाहिले असतां ही गोष्ट ध्यानांत येण्याजोगी आहे. तेव्हां आद्य सारस्वत वसाहतवाल्यानीं गोमंतकांत बंगाली भाषेतील उच्चार पद्धति किंवा शब्द रूढ केले असें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. बंगालींतील ऑकारांत उच्चार पद्धति सारस्वतांच्या कोंकणी भाषेत आहे इतक्यावरूनच ते मूलतः बंगाल्याकडून आले असावे असें म्हणणारे इतर बंगाली उच्चार पद्धतीकडे लक्ष देत नाहींत असें दिसतें. बंगालींत मृदुव्यंजनांतील हकाराचा उच्चार करतेवेळीं बहुतेक लोप होतो. उदाहरणार्थ घर, अघोर, बाघ, बोझा, धूति, भावना, अभय अशा मृदुव्यंजन युक्त शब्दांतील हकाराचा लोपकरून बंगाली लोक गर, बाग ( बाघ ) बोजा, दुति, बावना ( बावना ) अबय अशा प्रकारें शब्दोच्चार करतात. सारस्वतांच्या कोंकणींत हा प्रकार नाहीं. बंगालींत जे संस्कृत शब्द शिरले आहेत त्यांतील हकाराचा देखील अशाच रीतीनें लोप करण्यांत येतो. काश्मीर व वायव्यप्रांतांत प्रचलित असलेल्या पैशाच भाषा-पद्धतीस ही बंगाली पद्धति

जुळती आहे असें तज्ञाचें मत आहे. याच प्रमाणें बंगालींत व काराचा ब कार व सकाराच हकार होतो. जसें विश्वनाथ, वन यावरून बिश्वनाथ, बन. श्वशुर, साप, सकल यांच्या ऐवजीं हशुर, हाप, हगल असे शब्द बोलण्याच्या वेळीं ऐकूं येतात. दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याची ही कीं बंगाली भाषेंतील शब्दांत श, ष, स हीं अक्षरें आहेत. परंतु उच्चार करतेवेळीं तिन्ही अक्षरांच्या जागीं एकच श हें तालव्य अक्षर वापरण्यांत येतें. सारस्वतांच्या कोंकणींत हा दोष नाही. यासाठीं केवळ ऑकार पद्धतीवर भिस्त ठेवून सारस्वत बंगाल्यांतून दक्षिणेंत आले किंवा तेथील भाषा त्यांनीं येथें प्रचलित केली असें म्हणणें चुकीचें आहे. आपली भाषा बहुजन समाजावर लादण्याचें सामर्थ्य मूठभर परकीय वसाहतवाल्यांत नसावयाचें. त्यांतही सारस्वत दक्षिणेंत वसाहतीसाठीं आले ते सत्ताधारी या नात्यानें न येतां केवळ लेखक, व्यापारी किंवा कृषिविषयक व्यवसाय करणारे म्हणून या प्रांतीं आले. अर्थात् त्यांना येथील भाषा, पेहेराव, राहणी वगैरे पतकरणें भागच होतें व त्या प्रमाणें ते वागले. कोंकणी भाषा जुन्या महाराष्ट्रीच्या जवळची उत्तरेकडील गौडी भाषेशीं अनेक प्रकारें संबंध असलेली भाषा असल्यामुळें या वसाहतवाल्यांनीं अल्पकालांत तिचा अवलंब केला यांत आश्चर्य नाहीं. **सरस्वती मंडळ** या पुस्तकांत कै. रामभाऊ गुंजीकर यांनीं व **'कुडाळदेशकर'** या पुस्तकांत वसईचे रा. गणेश मुकुंद परूळेकर यांनीं कोंकणी भाषेचा बंगालीशीं संबंध दाखविण्यासाठीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. यांहून अधिक उदाहरणें आम्ही खालीं देत आहों. परंतु त्यांच्या वरून कोंकणी भाषा सारस्वतांनीं बंगाल्याहून आणली हें कसें सिद्ध होतें हें आम्हांस समजत नाहीं. यांपैकीं कित्येक शब्दांचा उगम मूळ संस्कृतापासून झालेला आहे व अनेक शब्द कोंकणी शिवाय इतर भाषांत ही आढळतात, हें पुढील उदाहरणावरून दिसून येणार आहे.

| कोंकणी | बंगाली | मराठी अर्थ | अन्यभाषीय- |
|---|---|---|---|
| अनाज | अनाज | धान्य | अनाज (गु.) |
| अडनाडी | अनाडी | मूर्ख | अन्नाडी (गु) |
| अस्तावेस्त | अस्तव्यस्त | व्याकुळ | अस्तव्यस्त.गु |
| आयंदा | आइन्दा | भविष्यकाळीं | आयन्दा(हिं) |
| आंगारो | आंगरा | विस्तव | अंगार ( हिं ) |
| आंगुळ | आंगुल | बोट | अंगुलि ( सं ) |
| अनामत् | अनामत् | होतेंतसें | अनामत्(हिं.गु) |
| इंदूर (विंदूर) | इन्दुर | उंदीर | ऊंदर ( गु ) |
| इरसाल | इरसाल | सरकारी भरणा | इरसाल(फा) |
| उदाक | उदक | पाणी | उदकम् (सं) |
| इतबार | एतबार | विश्वास | इतबार (फा) |
| कदर | कदर | आदर | कदर ( गु ) |
| कांडण | कांडन | मुसळ | खांडणियो(गु) |
| कांबार | कामार | लोहार | कम्मार (का) |
| किस्त | किस्ति | हप्ता | किस्त ( फा ) |
| खून | खून | रक्त | खून ( हिं ) |
| गुलजार | गुल्जार | सुंदर | गुलजार(फा) |
| गोबर | गोबर | शेण (राख) | गॉब्बर (का) |
| चंग (चांग) | चंग | सुंदर | चंग(जु. म.) |
| चांद | चांद | चंद्र | चंद्र ( सं ) |
| चिकणाई | चिकनाई | चिकणपणा | चिकणाई(गु) |
| चुडो | चुडी, चूड | बांगडी | चुडा ( हिं ) |
| जबर | जबर | शक्तिमान् | जबर ( फा ) |
| जिद्द | जिद् | विरोध | जिद्द ( गु ) |
| जोतें | जुता | पायतण | जुता ( हिं ) |
| जोर | जोर | बळ | जोर ( हिं ) |
| तांत | तांत | तंतु | तंतु ( सं ) |
| तेरीज | तेरीज | बेरीज | तेरिज ( गु ) |
| थरथरो | थरथर | कंप | थरथरणें (म) |
| दरकार | दरकार | गरज | दरकार ( हिं ) |
| दाग | दाग | दाग | डाग ( गु ) |
| दुबार | दुबार | दोनदां | दोबार ( हिं ) |
| दुस्मान् | दश्मन् | शत्रु | दुश्मन् (हिं) |
| देड | देड | दीड | दोड ( गु ) |
| धान | धान | तांदूळ | धान्य ( सं ) |
| नई ( नवी ) | नइ | नवीन | नवं ( सं ) |
| नकसो | नक्सा | चित्र | नकशो ( गु ) |

* ( गु )=गुजराथी. ( हिं )=हिंदी. ( फा )=फारशी. ( जु. म )=जुनी मराठी. ( सं )=संस्कृत. ( का )=कानडी.

| कोंकणी | बंगाली | मराठी अर्थ | अन्यभाषीय- |
|---|---|---|---|
| नणद | ननद | नणंद | ननांद ( सं ) |
| नाराज | नाराज | असंतुष्ट | नाराज ( गु ) |
| नाहक | नाहक | उगाच | नाहक ( गु ) |
| नीद | निद | झोंप | निद्रा ( सं ) |
| पीक | पिक | थुंकी | पीकदानी(गु) |
| पूत | पुत् | मुलगा | पुत्र ( सं ) |

सांप्रतची मराठी भाषा अस्तित्वांत येण्यापूर्वी या प्रदेशांत महाराष्ट्री नांवाची भाषा प्रचलित होती व तिच्यांतूनच हल्लींची मराठी भाषा निघाली. महाराष्ट्राची समकालिन कोंकणी आहे असें आम्ही वर म्हटलें आहे. जुन्या ग्रंथांत जे कित्येक शब्द सांपडतात ते महाराष्ट्रींतील असून सध्यां त्यांचा विशेष कोणी ग्रंथलेखनाच्याकामीं किंवा बोलण्यांत ही उपयोग करीत नाहीं. कित्येक शब्दांचा अर्थ लावण्यास कठीण पडतें. परंतु हे शब्द जशाचे तसे कोंकणींत राहिले असून ते नित्यशः उपयोगांत आणिले जात असल्यामुळें ते कोंकणी जाणणारांस दुर्बोध होत नाहींत. इ. स. १२९० च्या सुमारास लिहिलेल्या ज्ञानेश्वरीसारख्या सर्वमान्य ग्रंथांत असे कित्येक शब्द सांपडत असून ते सध्यांच्या मराठीभाषा बोलणारांस दुर्बोध व अपरिचित वाटतात. काहीं शब्द उदाहरणार्थ खालीं देतों. ( पहिला शब्द कोंकणी, दुसरा कौंसांतील ज्ञानेश्वरींतला व तिसरा प्रचलित मराठी जाणवा. )

अकसाळी ( आंकसळा ) कसास लावणारा सोनार; इंगाळो ( इंगळ ) निखारा; कितुलें ( केतुलें ) किती; जरंगणी ( जरंगा ) दीर्घ-कालापर्यंत खितपत पडणे; जोय्शी ( जोइसी ) ज्योतिषी; तीक ( तिख ) तिखट; तितुलें (तेतुलें ) तेवढें; दुणो ( दुणे ) दुप्पट; देकी ( देखी ) अनुकरण; दोग ( दोध ) दोघे; निगूत ( निघुत ) योग्य रीतीनें; परगुणाय ( परगुण ) सत्कार; पाणद ( पाणधी ) बारीक बोळ; फालें ( पाहलें ) प्रातःकाळ, बेंबूळ ( बेंबळ ) निःशक्त; भोंवचें ( भंवणें ) फिरणें; भोंवर ( भंवर ) भुंगा; मोवणी ( मवणी ) धान्याचें माप; ह्मारग ( महार्घ ) महाग; मेजचें ( मेचणें ) मोजणें; राजु ( रज्जु ) दोर लूत ( लुती ) त्वचारोग; लंव ( लोंव ) लोंकर; होड ( वाड ) मोठा; वोकद ( वोखद ) औषध; व्हाण ( वहाण ) जुतें; व्हाळ (वाहळ) ओढा; विंजणो ( विंजणा ) पंखा; होयरी ( वोवरी ) खोली; होट ( वोह ) आंचळ; वळक ( वोळख ) ओळख; सकल ( सखोल ) खालीं; सर ( सरी ) सारखेपणा; सानकुचें ( सांदुकणें ) विस्तु पेटविणें.

याच प्रमाणें ज्ञानेश्वरींत व कोकणींत समान असलेले शब्द अर्थासह पुढें देत आहों. ज्ञानेश्वरींतील शब्द सात आठशें वर्षांमागें मराठींत रूढ होते हें निर्विवाद आहे. सध्यां ते कोकणींत मात्र प्रचलित आहेत.

अंतराळ ( आकाश ) अदृष्ट ( नशीब ) अहोरात्र ( रात्रंदिवस ) आंगवण ( नवस ) आंगी ( अंगरखा ) आदील ( पूर्वीचें ) आसकड ( अडचण ) आसुड ( पाखडणें ) उजू ( सरळ ) उंडी ( ग्रास ) उबग ( कंटाळा ) उल्लाळ ( फाजील उडी ) कळासणें ( विव्हल होणें ) कवळ ( परदा ) काती ( कोयता ) कांबुर ( पांघुरणें ) कीड ( हिणकस सोनें ) कूस ( गर्भाशय ) खांड ( तोडणें ) खेव ( क्षय ) खोंप ( खोंपटी ) गोमटें ( सुंदर ) चाम ( कातडें ) चीप ( पातळ तुकडा ) दोण ( होडी ) तण ( गवत ) तिंबणें ( भिजणें ) दीस ( दिवस ) धग ( उष्णता ) निबर ( कडक ) पांग ( गरज ) पालव ( पदर ) पुनव ( पौर्णिमा ) पैस ( दूर ) पौळो ( घरापुढील भाग ) भीतर ( आंत ) भिंग ( कांच ) भें ( भय ) मालें ( मधाची पोळी ) मुदी ( आंगठी ) मोटकें ( ठेंगणें ) इतुलें ( इतुकें ) वरचिल ( बाकी ) विदळ ( धान्यरहित कणसें ) वच ( जा ) शाक ( भाजीपाला ) साद ( शब्द ) शेज ( आंथरूण ) सराव ( अभ्यास ) सवता ( स्वतः ) सवास ( सहवास ) सांडशी ( चिमटा ) सांत ( बाजार ) हार ( पराजय ) हरळ ( खडा )

यांतील कित्येक शब्द जुन्या व हल्लींच्या गुजराथींत सांपडतात ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

वर दिलेल्या शब्दांपैकीं कित्येक आज ग्रंथलेखनाच्या कामीं उपयोगी आणिले जात नाहींत ह्मणून ते दुर्बोध वाटतात. कोंकणी भाषा लेखनाच्या कामीं न वापरल्यामुळें तिचें मूळचें स्वरूप कायम राहिलें. फक्त परिस्थित्यनुरूप कानडी व मुसलमानी भाषा बोलणाऱ्या लोकांशीं दळणवळण झाल्याकारणानें त्या परकीय भाषांतील कित्येक शब्दांची कोंकणींत भर पडली. उदाहरणार्थ—

| कोंकणी | कानडी | अर्थ |
|---|---|---|
| दुड्ड | दुड्डू | पैसा |
| चिके | चिक्क | जरा (लहान) |
| कोवु | कब्बु | ऊस |
| वरप | बरह | लिहिणें |
| मेर | मेरे | मर्यादा |
| कलमडकी | कल्लुमडिके | दगडी भांडें |
| वरय | बरे | लिही |
| वरकल | वरकल्लु | कस लावण्याचा दगड |

याप्रमाणें मुसलमानी शब्दांतून बंदोबस्त, फातर ( फत्तर ), फरमाव ( फर्मावणें ) वगैरे शब्द कोंकणींत शिरले आहेत. वरकलसारखे कित्येक कानडी व इतर भाषांतील शब्द ज्ञानेश्वरींत सांपडतात. यावरून परस्पर दळणवळणामुळें एक भाषा दुसरीस कशी पुष्ट करिते हें कळून येणार आहे.

महाराष्ट्री किंवा जुनी मराठी या भाषांचा व कोंकणीचा इतका जर निकट संबन्ध असल्याप्रमाणें दिसतें तर कोंकणी ही स्वतंत्र अशी एक भाषा आहे असें मानण्यापेक्षां ती जुन्या मराठींतून निघालेली आहे असें कां म्हणूं नये, हा प्रश्न उद्भवतो. या सम्बन्धानें विचार करतां असें सिद्ध होत आहे कीं कोंकणी भाषा कांहीं बाबींत जुन्या नव्या मराठीहून भिन्न साधनांपासून उत्पन्न झाली आहे. आमच्यामतें कोंकणी भाषा संस्कृतापासून निघालेल्या बालभाषेनंतरची व महाराष्ट्रीच्याही पूर्वीची आहे म्हणून तिचा कित्येक बाबींत संस्कृताशीं मराठीहूनही अधिक सबंध आहे. उदाहरणार्थ—

| संस्कृत | बालभाषारूप | कोंकणी | प्रचलित मराठी |
|---|---|---|---|
| दुहिता | धीया | धूव | मुलगी |
| विद्युत् | बिज्जू | उजो | विस्तू |
| पुत्रक | पुत्तक | पूत | मुलगा. |
| ग्रीष्म | गिह्म | गीम | उन्हाळा |
| देवरः | देवरो | देर | दीर |
| बहु | बहु | भोव | पुष्कळ |
| सुरा | सुरा | सोरो | माडी (मद्य) |
| वृद्धः | वुड्ढो | व्हडलो, होड. | मोठा |
| सन्मुखः | संमुखो | सामको | समोर |
| वधूवरौ | बहुवर | होर | दंपत्य |
| वापीं | बावी | बांय | विहीर |
| वृक्षः | रुक्खो | रूक | झाड |
| पिशाचः | पिसाओ | पिसो | वेडा |
| अहम् | हम् | हांव | मी |
| न | न | ना | नाहीं |
| आव्हय | आबय | आपय | बोलाव |
| व्रज | वच्च | वच | जा |
| पश्य | पुळअ | पळय | पहा |

याच प्रमाणें थेट संस्कृतापासून किंचित् विकृति पावून तयार झालेल्या शब्दांचा भरणा मराठी पेक्षांही कोंकणींत विशेष आहे. जसं

| संस्कृत | कोंकणी | मराठी |
|---|---|---|
| आयतन | आयदन | भांडें |
| ज्वर | जोर | ताप |
| मानव | मानाय | नोकर |
| छिका | शीक | शिंक |
| गुर्वीणी | गुर्वीण | गरवार |
| भृंगार | भांगर | सोनें |
| उदकम् | उदाक | पाणी |
| कवाट | कवड | दार |
| पायसम् | पाय्स | खीर |
| कुलागार | कुळार | माहेर |
| तृण | तण | गवत |
| कर्पट | कापड | लुगडें |
| महर्घ | म्हारग | महाग |
| कुक्कुट | कुकड | कोंबडा |
| अंबा | बा, आमा | आई |
| लू | लु ( वचें ) | कापणें ) |
| दर्वी | दाय | पळी |

| संस्कृत | कोंकणी | मराठी |
|---|---|---|
| चेटः | चेडो | वेश्यापुत्र |
| चेटी | चेडी | वेश्या |
| ब्रह्महत्या | ब्रम्हत | लचांड |
| कपोलः | पोलो | गाल |
| कार्पाट | कापड | लुगडें |
| सुग्राहः | सुग्रवो | सुचिन्ह |
| शुनक | सुणें | कुत्रें |
| शकुनि | सवणें | पक्षी |
| रज्जू | राजू | दोर |
| भ्रष्टा | भर्ष्टा | शिवूंनयेशी |
| दीपः | दिवली | समई |
| कच्छः | काष्टी | लंगोटी |
| महातालः | माड | नारळाचें झाड |
| मार्ग | मागो | भांग(केंसाचा) |
| धर | दवर | ठेव |
| निटिल | निडळ | कपाळ |
| हर | व्हर | ने |
| आहर | हाड | आणणें |
| उज्ज्वलन | उज्वाडचें | उजेडणें |
| जायते | जाता | होतें |
| अस्ति | आसा | आहे |

व्याकरणदृष्ट्या पाहतां कोंकणींतील लिंगभेद बहुतेक संस्कृताप्रमाणें आहे. ही भाषा व्याकरण नियमांनीं बांधलेली असून तिचें व्याकरणही प्रसिद्ध झालें आहे. या भाषेचा शोधपूर्वक अभ्यास करणारे डॉ. मॅकग्लिन् व मि. मर्फे या युरोपियन् गृहस्थांचें मत असें आहे कीं कोंकणी ही संस्कृताशीं निकट संबंध असलेली भाषा असून तिची उत्पत्ति व तिचा प्रसार होण्यास संस्कृत भाषा जाणणारा जुना ब्राम्हण वर्गच कारण झाला असावा. खरें आहे. कारण संस्कृताचा परिचय ज्यांस नाहीं त्यांकडून अशा प्रकारची भाषा निर्मिली जाणें शक्य नाहीं. जे आर्यब्राह्मण वसाहतवाले उत्तरेकडून दक्षिणदेशीं उतरतां उतरतां सबंध कोकण प्रदेशांत वसाहत करून राहिले त्यांनीं ही भाषा रूढ केली व एकाकालीं कोंकणची भाषा हीच होती. पुढें मराठीच्या प्राबल्यामुळें ती मागें पडली व गोमंतकापुरती मात्र ती कायम राहिली.

व्याकरणदृष्ट्या पाहतां कोंकणींत बहुतांशीं संस्कृत व व मराठी व्याकरण पद्धतीप्रमाणें लिंगवचनानुसार विशेषण, नाम व क्रियापद यांचीं रूपें बदल पावतात. फक्त वर्तमानकाळीं संस्कृताप्रमाणेंच तिन्ही लिंगांत क्रियापदाचीं रूपें समान असतात.

| संस्कृत | कोंकणी | मराठी |
|---|---|---|
| अहम् करोमि | हांव करतां | मी करितों<br>,, करित्यें<br>,, करितें |
| त्वम् करोशि | तूं करता | तूं करितोस<br>,, करितेस<br>,, करितेंस |
| सः करोति | तो करता | तो करितो |
| सा करोति | ती करता | ती करिते |
| तत् करोति | तें करता | तें करितें |

वरील एकंदर विवेचनावरून दिसून येईल कीं कोंकणी ही संस्कृतापासून निघालेली एक भाषा असून तिचा संबंध मातृभाषेशीं मराठीहून कांहीं बाबींत अधिक आहे. या भाषेनें जुन्या महाराष्ट्रीस आपले शब्द दिले तसेच तिच्यांतूनही घेतले. दळणवळण वाढत गेलें तसे अन्य भाषांतील शब्द या भाषेंत मिसळले. तेव्हां सध्यांच्या कोंकणींत संस्कृत, प्राकृत, स्थानिक, अन्यदेशीय व ग्राम्य अशा पांच प्रकारचे शब्द सांपडतात. जसें

| संस्कृत | प्राकृत | स्थानिक |
|---|---|---|
| देव | जाता (जायते) | हॉरण (वऱ्हाडी मंडळ) |
| धर्म | बोदी (वीथि) | बोतर (फाटकें) |
| विचार | सपूत (शपथ) | निशें (पेज) |
| बुद्धि | सत्री (छत्र) | आव्स (आई) |
| ज्ञान | बेगीं (वेगम्) | शिरपूट(बारीक लांकूड) |

| अन्यदेशीय | ग्राम्य |
|---|---|
| बन्दूक (हिं) | बका (अंमळ) |
| बन्दोबस्त (फा) | फट (गप्प) |
| इस्कूल (इं) | वांय्स (जरा) |
| चिके (का) | भगल (थट्टा) |
| चोय (गु. जो) | निस्तें (आमटी). |

कोंकणी भाषा बोलण्याच्या कामीं मात्र विशेषतः उपयोगांत आणिली जात असल्यामुळें तिची वाढ

जरी झाली नाहीं तरी तिचा आद्य आर्यभाषेशीं संबंध कायमचा राहून ती ब्राह्मण व ब्राह्मणेतर वर्गास अवगत करून घेण्यास सुगम अशी भाषा झाली. या भाषेंत जोडाक्षरें विशेष वापरींत नसल्यामुळें बालकांस ही लवकर समजूं लागते. देवादिकांवर रचलेलीं कोंकणीं पदें कर्णमधुर असून जुन्या स्त्रियांच्या तोंडीं तीं असतात. बंगाल देशांत प्रचलित असलेल्या कहाण्या कोंकणींत सांगतांना ऐकिलें म्हणजे या उत्तरदेशीय गोष्टी येथें कशा आल्या याचें नवल वाटतें. Bengal folk tales या पुस्तकांतील कहाण्या व गोमंतकांत रूढ असलेल्या कहाण्या सारख्याच आहेत. कोंकणी भाषेंत कांहीं मार्मिक म्हणी असून त्यांचा मासला खालीं देत आहों. स्त्रियांच्या बोलण्यांत या म्हणींची रेलचेल असल्यामुळें थोडक्या शब्दांत एकादा विषय प्रतिपादन करण्याची त्यांची शैली फार परिणामकारक असते.

१ **विंदूर मलकाक वचून आयला.** उंदीर मलक्काला जाऊन आला. ( एखाद्या क्षुद्र मनुष्याला लांबचा प्रवास करण्याची संधि अनायासें मिळाली म्हणून त्याला महत्व प्राप्त होत नाहीं. उंदीर देखील मालाच्या गलबतांतून मोलक्कासारख्या ठिकाणीं जाऊन येऊं शकतो. गोमंतकीय लोक व्यापारी पेशाचे असल्यामुळें. मोलक्कासारखें बेट त्यांना ठाऊक होतें. )

२ **घाटार गेल्या तरी फळसाक् तीन पाना.** कोंकणांतील पळसाचें झाड घाट प्रदेशांत नेऊन लावलें तरी त्याला तीनच पानें दृष्टीस पडतात. अर्थात् केवळ स्थानांतर केलें म्हणून विशेष फायदा होतो अशांतली गोष्ट नाहीं.

३ **चड पाळत्याक् चड वाळतीं.** जास्त काळजी घेतली म्हणजे जास्त वाळवी लागते. अर्थात् फाजील काळजी उलट नुकसानकारक आहे.

४ **भरिल्ल्या बामणाक् धंय करकरी.** पोटभर जेवलेल्या ब्राह्मणाला दहीं कुरकुरीत लागतें म्हणजे इच्छा तृप्त झाल्यावर चांगल्या रुचकर पदार्थांची देखील गोडी वाटत नाहीं.

५ **अति अति तोंडांत माति.** अति तेथें माति.

६ **आळशाक् दुणो वात्र कृपणाक् दुणो खर्च.** आळशाला दुप्पट श्रम पडतात व कृपणाला दुप्पट खर्च करावा लागतो.

७ **होकलेलीं चिन्हा सव्यार कळतात.** वधूचीं लक्षणें बोहल्यावर समजतात. म्हणजे अल्प अवलोकनानें एकाद्याचा गुण लक्षांत येतो.

८ **कोवु गोड म्हण मुळबरोबर खावनये.** ऊस गोड म्हणून मुळासकट खाऊं नये. तसें केल्यानें तोंडांत माती पडते. अर्थात् एकाद्याच्या सौजन्याचा किंवा परोपकार बुद्धीचा फाजिल फायदा घेऊं गेल्यास आपलें नुकसान होतें.

सारस्वतांनीं दक्षिणेंत येऊन वसाहत केल्यावर येथील कोंकणी भाषा पतकरली. त्यांनीं आपले कांहीं मूळ भाषेंतील शब्द येथें प्रचलित केले असावे. परंतु ते नक्की अमुक शब्द आहेत असें सांगणें धाडसाचें होईल कारण आज त्यांचा उपयोग सर्वच कोंकणी बोलणारे करतात. तरी

**शेणय, बाब, चलो, चली**

हे शब्द मात्र सारस्वतांच्या खास उपयोगांतील असून ते अद्यापि त्यांच्यांत मात्र रूढ आहेत. **श्रेणयः** या शब्दावरून आलेला **शेणय** हा प्राकृत शब्द त्यांच्यांत जातिवाचक नसून मानार्थी आहे असें समजतात. नोकर चाकर किंवा इतर कमी योग्यतेच्या अथवा लहान वयाच्या लोकांनीं हा **शेणय** शब्द आपणाहून श्रेष्ठ असलेल्या सारस्वत गृहस्थाच्या नांवापुढें जोडलाच पाहिजे असा या ज्ञातीचा कटाक्ष दिसतो. उदाहरणार्थ एकाद्याचें नांव राम असें असलें तर जुन्या पद्धतीप्रमाणें राम शणय असेंच म्हणावें लागे, इतकेंच नव्हे तर नोकरचाकर व खालच्या दर्जाचे लोक प्रत्यक्ष नामोच्चार न करतां **अहो शणय** या अर्थी **शणयनो** असा शब्दप्रयोग करतात. हल्लीं शेणय याच्या ऐवजीं **राव** असा शब्द वापरतात. इंग्रजींतील **मिस्टर** आणि **शणय** हे समानार्थी आहेत असें म्हणण्यास हरकत नाही. दुसरा शब्द गोमंतकीय सारस्वतांत जो प्रचलित आहे तो **बाब** हा होय. बंगाल्यांत नांवाच्या पूर्वीं **बाबू** असा शब्दप्रयोग होतो तर येथें नांवाच्या पुढें बाब होतो. बाबु केशवचंद्र असा प्रयोग बंगाल्यांत आहे तर गोमंतकांत केशव बाब असें म्हणतात. हिंदुस्थानी

लोक बाबु किंवा बाबु जी हा शब्द मानार्थी विशेषतः लेखक वर्गांतील लोकांसंबंधानें वापरतांना आढळतें. तेव्हां सारस्वतांत रूढ असलेल्या बाबू शब्दाचा उगम त्यांच्या उत्तर देशीय मूल वसाहतीमुळें झाला असावा. आणखी एका बाबींत सारस्वतांनीं उत्तरेकडील दोन शब्द नेहमींच्या उपयोगांत आणिले आहेत. ते **चलो** आणि **चली** हे होत. बंगालींत व हिंदींत **चेला** व **चेली** हे शब्द **शिष्य** व **शिष्यीण** या अर्थी वापरतात. सारस्वतांत **चलो** व **चली** यांचा अर्थ अनुक्रमें **मुलगा** व **मुलगी** असा होतो. थोरल्या मुलास व मुलीस तर आईबापें त्यांच्या नांवानें हाक न मारतां चलो व चली याच शब्दांनीं संबोधितात. मुलास उपनयनकाळीं त्याचा बाप गुरुमंत्रोपदेश करीत असून प्राचीन पद्धतींप्रमाणें तोच त्याचा शिक्षकही असे. त्यावरून शिष्य या अर्थी चलो हा शब्द प्रचलित झाला असल्यास नकळे. चली हा चलो याचा स्त्रीवाचक शब्द आहे इतकेंच. यांत शिष्यत्वाचा संबंध दिसत नाहीं. सारस्वत ब्राम्हणांत मात्र सर्व ब्राह्मणांच्या मुलांमुलींविषयीं चलो आणि चली हे शब्द वापरतात. ब्राह्मणेतरांसंबंधानें चेडो व चेडूं हे शब्द वापरले जातात. कोंकणांतील इतर कोणत्याहीं ब्राह्मण वर्णांत चलो, चली हे शब्द रूढ नसून उलट चेटी यापासून निघालेला चेडूं हा शब्द मुलगी याअर्थी योजलेला दृष्टीस पडतो. याचा खरा अर्थ दासी असा आहे कारण त्या शब्दाची उत्पत्तीच मुळीं **चेटी** या शब्दावरून झालेली आहे.

याशिवाय आणखी कांहीं शब्द सारस्वतांच्या कोंकणींत असून त्यांचा उगम कसा झाला याचा थांग लावल्यास आमच्या जुन्या इतिहासावर किंचित् प्रकाश पडण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ आई या अर्थी सारस्वतांच्या कोंकणींत **बा** व **आमा** हे शब्द आहेत. संस्कृत **अंबा** याच शब्दाचे हे दोन्ही शब्द रूपांतर होत. तसेंच नवरा या अर्थी **बाम्मण** असा शब्द प्रचलित आहे आणि बाम्मण हें ब्राह्मण या शब्दाचें प्राकृतरूप होय. प्राचीन कालीं नवऱ्यास आर्य या शब्दानें संबोधीत. परंतु ब्राह्मण असा शब्द वापरण्यांत येई किंवा काय याचा थांग लावणें अवश्य आहे. सध्यां ब्राह्मण हा शब्द मराठी भाषा बोलणाऱ्या ब्राह्मणांनींच इतक्या खालच्या दर्जास नेऊन पोंहोंचविला आहे कीं तो शब्द स्वयंपाकी या अर्थानें वापरण्यांत येतो ! वधू या अर्थी कोंकणींत **हॉकल** हा शब्द आहे. हा कानडी **वकल** या शब्दावरून आला असावा काय ? वकल म्हणजे दासी असा अर्थ होतो. बंगाल्यांत नवीन वधू घरांत येतांच वरानें आपल्या आईस 'तुझ्या साठीं मी एक दासी घेऊन आलों आहें' असें सांगण्याचा एक लहान विधि आहे. तशाच अर्थी दासी अर्थसूचक होकल हा शब्द प्रचलित झाला असेल काय ? जुन्या सामाजिक पद्धतीचा विचार करतां वधू ही नवीन घरीं बहुतेक दासीप्रमाणेंच कांहीं काल तरी कामकाजांत गुंतून असे असें दिसतें. मोठा चुलता या अर्थी **म्हांत** हा शब्द प्रचलित आहे. हा महान् यावरून आलेल्या महान्तः याचें विकृत रूप असावें. किंवा महान् तातः (म्हणजे बापापेक्षां वडील) याचेंच म्हांत हें रूप असावें. याच अर्थी 'व्हडलो-बाप्पा' असाही प्रयोग प्रचलित आहे. बाप्पा हा शब्द बाप या अर्थी वापरतात व व्हडलो याचा अर्थ मोठा असा होतो. बाम्मण याच अर्थी घोव हा शब्दही कोंकणींत प्रचलित असून चिपळूणाकडील सारस्वतेतर ब्राह्मण जुन्या काळीं हाच शब्द वापरीत. हल्लीं कोंकणी बोलणाऱ्या ब्राह्मणेतरांत देखील बाम्मण हा शब्द नवरा या अर्थी वापरण्यांत येतो ! लग्न या अर्थी व्हारडिक किंवा होरडीक हे शब्द कोंकणींत आहेत. यांचा **वऱ्हाडीक** या शब्दांशीं संबंध लावतां येईल काय ? कोंकणींत विवाहविषयक सर्व शब्दांचा हकाराने आरंभ होतो. हें पाहून मौज वाटते. जसें होरेत ( वर ) होकल ( वधू ) होर ( वधूवर ) होरण ( वऱ्हाडी मंडळी ) होवळीक ( अक्षता फिरविणें ) होरडीक ( लग्न ) होट ( ओटी ).

गोमंतकांतून सारस्वत बाहेरगांवीं वसाहतीसाठीं गेल्यावर प्राप्त परिस्थित्यनुरूप नवीन भाषेच्या अभ्यासामुळें मूळच्या भाषेच्या उच्चारांत व क्वचित् प्रसंगीं व्याकरणपद्धतींतही फरक पडला. गोमंतकांत शब्दांच्या शेवटीं येणाऱ्या स्वराचा दीर्घोच्चार होतो. कानडी प्रांतांत तोच उच्चार ह्रस्व करतात. द्राविडी भाषेचा ज्या ज्या ठिकाणीं विशेष अम्मल आहे त्या ठिकाणीं कोंकणी भाषेच्या शब्दांत स्वराघाताची पद्धति रूढ

झाली आहे. व स्वर किंवा मृदुव्यंजनाजवळचीं अक्षरें विशेष जोर देऊन उच्चारण्यांत येतात. गोमंतकी ऍ या स्वराचा उच्चार तेथें फार लांबट व सानुनासिक होतो तोच मालवण वेंगुर्ल्यांच्या भागांत ऑं, मुंबई व घाट माथ्यावर आनुनासिक रहित नुसता लांबट अ असा होतो. कोंकणीभाषेंत ए व ओ हे स्वर बहुतेक ह्रस्व वापरतात. शुद्ध संस्कृत शब्दांतील या स्वरांचा उच्चार दीर्घ होतो. अशा प्रकारचे फरक फार महत्वाचे नसून कोंकणी भाषा बोलणारे भिन्न प्रांतीय असले तरी भाषेंतील शब्दरचना व प्रयोग सारखेच असल्यामुळें ती एकमेकांस समजण्यास विशेष जड जात नाहीं. निरनिराळ्या भाषापद्धतीचे नमूने खालीं दिले आहेत.

### मराठी.

द्वारकेचें लग्न मोठ्या थाटांत झालें. तिचें लग्न झालें त्यावेळीं कृष्णरावांची घरची स्थिति बरी होती. म्हणून त्यांनीं पाण्यासारखा पैसा खर्च केला. तिचा सासरा श्रीमंत होता. पण फार चिक्कू. त्यानें सुनेला दागीने कांहीं जास्त आणले नाहींत. पुढें नवरा वाटेल तितके दागीने आपल्या बायकोला घालील असें तिची आई म्हणत असे. लग्न झाल्यावर कांहीं दिवस द्वारकी माहेरीं राहिली. पुढें सासूचें बोलावणें आलें व ती सासरीं गेली.

### मालवणी कोंकणी.

द्वारक्याचां लगीन मोठ्या डबाज्यान झालां. तेचां लगीन झालां तेवां कृष्णरावांचां बरां होतां. म्हणून तेणीं पाण्यासारखो पैसो खर्च केलो. तेचो मावो श्रीमंत होतो. पण फार चिक्कू होतो. म्हणून तेणीं सुनेक दागीने काय जास्त हाडूंक नाय. पुढें घोव होये तितके दागीने आपल्या बायकोक घालीत असां तेची आव्स म्हणा. लगीन झाल्या उपरांत थोडे दिवस द्वारकां माहेराक रवलां. मगे सास्वेचां बोलावणां आयलां. तेवां तां घराक गेलां.

### कारवारी कोंकणी.

द्वारक्यालें लग्न भारी कडाक्यान जालें. तागेलें लग्न जालें तेन्ना कृष्णरावाली घरची स्थिति बेस आशिल्ली. म्हण तानें उदका म्हणकी पैसो खर्च केलो. द्वारक्यालो मांव श्रीमंत आशिल्लो. पुण भोव चिक्कू. त्या खातिर तानें सुनेक जास्त भांगर हाड्लें ना. फुडे तागेलो घोव जाय तित्लें भांगर ताका करीत अशें तागेली आवय म्हणताली. लग्न जाल्या नंतर द्वारकें थोडे दिस कुळारा रावलें. मागीर माय्न आपौंच्याक धाड्लें. तेन्ना घोवागेर गेलें.

### मंगळूरी कोंकणी.

द्वारकेगेली होरडीक चांग थाटानें जाली. तिगेली होरडीक जाली ताव्वळी कृष्णरावाली घरची स्थिति चांग आशिल्ली. त्यानिमित्तीं तानें उदकागादि दुडू खर्च केलो. तिग्गेलो मांवु श्रीमंत आशिल्लो. जाल्यारी भोवु चिक्कु. तान्नें सुनेक भांगार जास्त हाण्णी. तिग्गेलो बाम्मोणु जाय तितुलें भांगार करीत अशी तिग्गेली आव्स म्हणताली. होरडिक जाल्या उपरांत द्वारकी थोडे दिवस कुळारा राव्ली. कडेरी माम्म आपौंच्याक पेटयूलें. ताव्वळी ती बामणागेरी गेली.

### मुंबई कोंकणी.

द्वारकुच लग्न व्हडल्या थाटान झाल. तिच लग्न झाल तेन्ना कृष्णरावाची घरची स्थिति बरी अस्सल्ली. म्हणून त्यानें पाण्या सारखो पैसो खर्च केलो. तिचो सासरो श्रीमंत अस्सल्लो. पण चिक्कट. त्यानें सुनेक दागिने ज्यास्त केलेना. तिचो घो तिका जाय तितके दागिने घालीत अशी तिची आवय म्हणताल्ली. लग्न झाल्यार थोडे दिवस द्वारकु आपल्या आवयच्या घरा रवली. मागीर तिका सासून आपवुक धाडली. तेन्ना ती आपल्या घोवाच्या घरा गेली.

### खिस्ती कोंकणी.

दुवारक्याची व्होरडीक दोबाजान् जाली. ताचें काजार जालें तेदनां कुष्टबाबाची घोरची व्होडविकाय बोरी आहल्ली. त्यापासोन तानें उदकाभाशेन दुडु काबार केलो. ताचो मांव सोभ्रुत आहल्लो. पुन चोड कंजूस. तानें सुनेक वांगार चोड हाडोंक ना. दुवारक्याची आवोय म्हुंटाली ताचो गोव जायतें बांगोर फुड्डारा कोरीत. काजार जाल्या उपरांत थोडे दीस दुवारकें आवोयच्या बोगलेन रावलें. मागेर ताच्या सासू माय्न आपोक धाडलें. तेदना तें गोवाच्या घोरा गेलें.

हे सर्व भाषेचे प्रकार जवळ जवळ आहेत हें वाचकांस कळून येईल.

सध्यांच्या कालीं या देशांत हिंदी ही राष्ट्रीय भाषा व्हावी एतदर्थ पुढाऱ्यांचे प्रयत्न चालले असून एक धर्म व एक भाषा यांच्या द्वारें राष्ट्रीय ऐक्याची भावना हिंदवासियांच्या अंतःकरणांत उत्पन्न होईल असें ते प्रतिपादन करतात. अशा वेळीं कोंकणी सारखी लहानशा देशभागांत असलेली भाषा पूर्णावस्थेस आणून ती लेखनोपयोगी करावी असें सांगणें उपहासास्पद होईल. परंतु कोंकणी बोलणारांस विशेषतः आमच्या सारस्वत बंधूंस आमची एक विनंति आहे ती ही कीं त्यांनीं मराठी भाषेचा अभ्यास लहान थोर स्त्रीपुरुषांकडून होईल अशी योजना जरूर करावी. कोंकणी बोलणारास जसें मराठीचें सुलभरीतीनें ज्ञान होतें तसें कानडी किंवा इतर द्राविडी भाषांचें होत नाहीं. गोमंतकांत मराठी शिक्षण देण्याच्या संस्था नसतांही तेथील कित्येक सारस्वत मराठी लेखक पुढें आलेले आहेत. कांहीं कवीही त्याच प्रांतीं निर्माण झाले. गोमंतकांतील जुन्या लोकांनीं मराठीच्या मदतीनें मराठे शाहींत कलमबहाद्दर म्हणवून घेतलें. आजकाल दिसून येणारी स्थिति शोचनीय आहे. सारस्वतांत जुन्याकालीं हिशेब ठिशेब व पत्रव्यवहार मराठींतून चाले. आज इंग्रजी पहिल्या इयत्तेचें ज्ञान होतांच मुलाचा पित्याशीं पत्रव्यवहार My dear papa या शब्दांनीं सुरू होतो. मराठी लेखक व वक्ते आमच्यांत दिवसें दिवस कमी होत चालले आहेत. त्या मानानें इंग्रजींत लेख लिहिणारे किंवा भाषण करणारे यांचा ही विशेष भरणा दिसत नाहीं. जुनी परंपरा राखून स्वतःची योग्यता प्रस्थापित करावयाची असेल, प्राकृत भाषेच्या द्वारें प्राचीन गोष्टींविषयीं माहिती करून घ्यावयाची असेल किंवा आपल्या दूरवर महाराष्ट्रांत व इतर ठिकाणीं पसरलेल्या ज्ञातिबंधूंशीं दळणवळण ठेवावयाचें असेल तर सारस्वतांनीं मुलांमुलींस मराठी भाषेंत निष्णात केलें पाहिजे. हिंदुस्थानच्या भावी भाग्योदयास महाराष्ट्र अनेक परीनें कारणीभूत होणार आहे. महाराष्ट्राच्या भाग्योदयाच्या कार्यास इतरांबरोबर सारस्वतही हात भार लावणार नाहींत काय ? त्यांना सर्व प्रकारच्या प्रागतिक चळवळींत पडावयाचें असेल तर जनतेची जी खरी भाषा—म्हणजे मराठी, हिचा अभ्यास चांगल्या प्रकारें करण्यास त्यांनीं पुढें आलें पाहिजे. मराठी भाषेशीं निकट संबंध ठेवून वाङ्मयांत त्यानीं भर घातली पाहिजे. केवळ भाषाभिन्नतेमुळें कोंकणांतील सारस्वत प्रागतिक कार्यांत पुढाकार घेण्यास असमर्थ झाले तर त्यांच्या लौकिकास कलंक लागेल. जीवनार्थ कलहांत ते मागें पडतील व उदरंभरणासाठीं नोकरी पेशा पतकरून त्यांना कायमचें दास्यांत रहावें लागेल.

---

# ज्ञातिसमाचार.

### श्रीमद्गौडपादाचार्य मठ, नाशीक.

नाशीक क्षेत्राच्या मध्यभागीं सरकारवाड्याच्या शेजारीं कैवल्यपुर मठाधिपतींचा मठ असून त्यांत ब्रम्हीभूत लीलानंदस्वामी यांची समाधि आहे. या मठाची अंतर्बाह्य स्थिति अत्यंत असमाधानकारक आहे असें दर्शविणारें एक पत्र प्रसिद्धीसाठीं आमच्याकडे आलें आहे असें आम्ही गेल्या अंकीं लिहिलें होतें. हें पत्र प्रसिद्ध करण्यापूर्वी **चक्षुर्वैसत्यम्** या न्यायानें मठाची स्थिति प्रत्यक्ष पहावी या हेतूनें आम्ही कांहीं मित्रमंडळीसह नाशिकास जाऊन आलों. तेथें चार दिवस मुक्काम करून एकंदर गोष्टींविषयीं बारीक चौकशी करता आम्हांस असें आढळून आलें कीं जुन्या कारभाऱ्यानें राजीनामा दिल्यानंतर कायमचा नोकर अद्यापि नेमिलेला नाहीं. योग्य इसमाची शिफारस करण्याविषयीं मठाधिपतींचा आज्ञारायस तीनचार ठिकाणच्या गृहस्थांस पाठविण्यांत आला आहे. व

तसा लायक इसम मिळतांच योग्य पगारावर त्याची नेमणूक करण्यांत येईल. तूर्त फक्त भाडें वसूल करण्याचें काम ठरीव कमिशन्‌वर तेथील सराफ (बँकर) रा. पेठे आणि कंपनी यांजकडे सोंपविण्यांत आलें असून तें अत्यंत समाधानकारक रीतीनें चाललें आहे. या मठाचें उत्पन्न व त्याप्रीत्यर्थ होणारा खर्च लक्ष्यांत घेतां या इमारतीसाठीं खर्च झालेल्या भांडवलावर शेंकडा दीड टक्क्याहून अधिक मोबदला संस्थानास लाभत नाहीं ! अर्थात भाड्याचें मान फारच माफक असून कालांतरानें याच मठाच्या जीर्णोद्धारास मात्र पुरण्याइतकें हें उत्पन्न आणखी कमी होईल अशी भाड्याची पद्धति अमलांत आणणें शक्य दिसत नाहीं. या मठाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर एकंदर सात खोल्या स्वकीय यात्रेकरूंसाठीं कायमच्या राखून ठेविल्या आहेत व गरजूनीं मठांतील एका दिवाणखान्यांत असणाऱ्या रा. पेठे कंपनीस किंवा गौड सारब्रह्मवृंदाचे क्षेत्रस्थ उपाध्ये वे. शा. सं. वासुदेव केशव भानोशे ( मठाजवळ धर नं० ८८७ ) यांस आगाऊ कळविलें असतां यात्रेकरूंची हंगामी वस्तीची सोय होण्याजोगी आहे. नाशिक येथें नोकरीनिमित्त राहणाऱ्या या संस्थानच्या शिष्यवृन्दाची व इतर ( चित्रापूर व दाभोली ) मठांस भजत असतांही या संस्थानाविषयीं आत्यंतिक प्रेम व अभिमान बाळगणाऱ्या इतर बंधूंची एक सभा ता. २७ डिसेंबर १९१९ रोजीं समाजांत भरविण्यांत आली. या सभेस रा.बाळकृष्ण गंगाधर वर्दे, बी. ए., हायस्कूल मास्तर, रा. अनंत भिकाजो सामंत, वकील, रा. कृष्णराव रामचंद्र हेबळे, रा. महादेव भिकाजी रेगे वगैरे मंडळी हजर होती. या व इतर १५ गृहस्थांच्या सहीनें मठाच्या जुन्या कारभाऱ्यांनीं नोकरी सोडून जाण्याच्या सुमारें सहा महिन्यांपूर्वी श्रींस सादर केलेल्या विनंतिपत्रांतील सुधारणाविषयक सूचनांचा या सभेंत विचार करण्यांत आला. यांपैकीं कांहीं सूचना सुलभ रीतीनें अमलांत आणतां येण्याजोग्या असून त्या स्वतंत्र व पद्धतशीर विनंतिपत्राच्या द्वारें नाशिकास जाऊन आलेली मंडळी श्रीचरणीं सादर करणार आहे; आणि त्यांचा अनुकूल विचार श्रींकडून होईल अशी आम्हांस उमेद आहे. उपरिनिर्दिष्ट विनंतिपत्रांत व आमच्याकडे प्रसिद्धीसाठीं आलेल्या लेखांत कांहीं बाबींसंबंधानें बराच गैर समज असल्याचें आम्हांस दिसून आल्यावरून आम्ही खरी वस्तुस्थिति समाजबंधूपुढें मांडून तो दूर करण्यासाठीं केलेला प्रयत्न सिद्धीस जावो असें इच्छितों. संयुक्त तत्वावर उभारलेल्या नाशीक येथील गौड सारस्वत ब्राह्मण समाज या संस्थेचे सर्व ( अजमासें ३० ) सभासद वस्तुतः एकाच शाखेच्या या मठ-संस्थेविषयीं पराकाष्ठेचा अभिमान व प्रेम बाळगतात, हें पाहून आम्हांस कौतुक वाटतें. हा अभिमान व हें प्रेम दिवसेंदिवस वृद्धिंगत होवो हीच आमची इच्छा. आमच्याकडे प्रसिद्धीसाठीं आलेलें पत्र छापण्याचें आतां प्रयोजन उरलेलें नाहीं. गेल्या अंकीं ऐकीव माहितीवर भिस्त ठेवून या मठाची अंतर्बाह्य स्थिति शोचनीय आहे असें चुकीचें मत दिलें याबद्दल आम्ही दिलगीर आहों.

## क्रिकेटचा चौरंगी सामना.

यंदाचे सामन्यांत विजयी झालेल्या हिंदू टीममध्यें आपले चौघे क्रिकेटपटु होते. रा. मुकुंदराव पै यांजकडे नेहमीप्रमाणें या टीमचें आधिपत्य होतें. पारशी टीमशीं झालेल्या सामन्यांत सुप्रसिद्ध पारशी बॅट्समन् डॉली कापडिया यांचा जोराचा बौंडरीचा फटका अडवितांना रा. पै यांच्या उजव्या हातास बराच मार बसला. त्यामुळें त्यांची बॅटिंग फारशी समाधानकारक झाली नाहीं. पण ही उणीव त्यांनीं आपल्या कॅप्टन् या नात्यानें बजावलेल्या अप्रतिम कामगिरीनें भरून काढली. त्यांच्या धोरणी व्यवस्थेमुळें हिंदू टीम विजयी झाली व पारशी खेळाडूंचा पूर्णपणें पराजय झाला. शेवटच्या सामन्यांत युरोपियन जिमखान्यास चित करून हिंदूशीं खेळण्यास पुढें सरसावलेल्या मुसलमान टीमचा सबंध एका डावानें पराजय करून हिंदूस 'चँपियनशिप्' मिळवून देणाऱ्या रा. पै यांचें व त्यांच्या सहकारी मित्रांचें आम्ही अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों. रा. पै हे १९१३ सालीं हिंदूंचे कॅप्टन झाले. त्यावेळेपासून हिंदुक्रिकेट उर्जितावस्थेस येऊं लागला व पारशी व युरोपियन् प्रतिपक्षीयांस हिंदु खेळाडूंची धास्ती वाटूं लागली. रा. पै या पुढें विश्रांति घेऊन इतर तरुण मंडळीस पुढें येण्याची संधि देणार असल्याचें समजतें. तरी प्रसंगविशेषीं आपल्या पक्षास ते

मदत करून हिंदु क्रिकेटचा लौकिक वाढवितील अशी आम्हांस आशा आहे.

रा. विश्वनाथ कंटक यांचा कंटकपणा पारशांबरोबर झालेल्या सामन्यांत पूर्णपणें दिसून आला. रा. सदानंद दळवी यांची बोलिंग व 'स्लिप्स' मधील फिल्डिंग चांगली झाली. रा. विनायकराव दळवी यांचा या सामन्यांत खेळण्याचा पहिलाच प्रसंग. त्यांची फील्डिंग बरी झाली, परंतु धांवासंबंधाची त्यांच्या सामर्थ्याची अटकळ दुर्दैवानें फोल ठरली. तरी पुढें मागें हे या खेळांत चांगली कीर्ति मिळवितील यांत संदेह नाहीं. या चौघांही ज्ञातिबंधूंचें आम्ही प्रेमपूर्वक अभिनंदन करतों.

सिलोन मध्यें नाणावलेल्या खेळाडूंची एक क्रिकेट टीम गेल्या डिसेंबर महिन्याच्या अखेरीस याशहरीं दाखल होऊन तिनें युरोपियन व पारशी जिमखान्यांस चित केलें. या टीमला देखील हिंदुटीमनें चांगला हात दाखविला. आमचे रा. पै, रा. कंटक व रा. विनायकराव दळवी यानीं अनुक्रमें ३५, ८७ व ५६ धांवा. केल्या याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. पुढील साला करितां रा. सदानंद माधवराव दळवी यांना हिंदु जिमखान्याचे कॅप्टन निवडण्यांत आलें. रा. पै यांच्याप्रमाणें रा. दळवी हिंदुक्रिकेटचें नांव राखतील व त्याच्या कीर्तींत विशेष भर घालतील अशी आशा आहे.

रा कंटक यांस येथें हल्लींच स्थापन झालेल्या कॅनरा गौड सारस्वत क्लबनें त्यांच्या क्रिकेठ पटुत्वाबद्दल एक सोन्याची आंगठी व चांदीचा पेला बशी बक्षीस दिलीं. समारंभास सुमारें दोन अडीचशें कारवारी मंडळी हजर होती. रा. मंगेश रुद्रप्पा नाडकर्णी यानी रा. कंटकांविषयीं अभिनंदनपर भाषण केलें. व रा. कंटक कालेंकरून इंग्लंडास जाऊन तेथें आपलें क्रिकेट पटुत्व दाखवितील अशी आशा प्रदर्शित केली. उपाहारसमारंभ थाटाचा झाला. या समारंभाचा एकंदर खर्च क्लबचे सभासद रा. कृष्णराव यशवंत वागळे यानीं केल्याबद्दल त्यांचे व सर्व कारवारकर बंधूंचे रा. कंटक यांनीं योग्य शब्दांत आभार मानले.

## ऑल इंडिया सारस्वत सभा

अखिल हिंदुस्थान देशांतील सारस्वत ब्राह्मण ज्ञातिसमूह एकत्र करावा या महत्वाकांक्षेनें संस्थापित करण्यांत आलेल्या ऑल इंडिया सारस्वत सभेचें संमेलन नुकतेंच या शहरीं भरलें होतें. त्याची हकीकत आमच्या बातमीदाराकडून आली ती दुसरीकडे दिली आहे. १९०८ सालीं मंगळूर येथें गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेची पहिली मोठी बैठक भरली. त्यावेळीं कित्येक प्रागतिक विचाराच्या पुढाऱ्यांकडून या परिषदेची रचना गौडसारस्वतांर्गत कित्येक भेदांच्या एकीकरणाच्या तत्वावर अधिष्ठित कां न करावी असा प्रश्न येतांच या पहिल्या अधिवेशनांच्या चालकांतील पुराणमताभिमान्यानीं या सामाजिक कार्यांतून अंग काढून घेतलें. पुढें दुसऱ्याच वर्षी संयुक्त तत्वावर रा. ब. सदानंद भाई भांडारे यांच्या अध्यक्षतेखालीं बेळगांव मुक्कामीं पहिलें अधिवेशन भरलें. तेथून म्हापसें, सावंतवाडी, वसई, कारवार, मालवण, इंदूर व अलीबाग येथें अधिवेशनें भरून संयुक्त तत्वाचा प्रसार करण्याचें महत्कार्य चालू ठेवण्यांत आलें. या ८ वर्षांच्या मुदतींत एकीबेकीचा झगडा कमी जास्त जोरानें चाललाच होता. तथापि परिषदेच्या पुढाऱ्यानीं धीरानें आपलें कार्य चालविलें व पुढें पुढें या पुढाऱ्यांतील कित्येकांचें केवळ एकी घडवून आणण्यांतच समाधान न होतां त्यानीं सामाजिक सुधारणेच्या कांहीं वादविषयक बाबी परिषदेच्या कार्यक्रमांत गुंतविण्याचा प्रयत्न केला. अलीबागच्या अधिवेशनानंतर पुनः ही परिषद भरली नाहीं म्हणून बरें. नाहींतर राष्ट्रीय सभेंत ज्या प्रमाणे आज मितीला दोन पक्ष उत्पन्न झाले आहेत तसे परिषदेच्या पुढाऱ्यांतही कदाचित् झाले असते. यास उदाहरण हल्लींच आमच्या कांहीं दक्षिणात्य सारस्वत बंधूंच्या प्रयत्नानें अस्तित्वांत आलेली अखिल भारतीय सारस्वत सभा ही होय. अल्पकालांत तिला बऱ्याच ठिकाणाहून व परिषदेच्या भक्तांकडून सहानुभूति मिळाली आहे असें वरवर पाहणारांस तरी दिसेल. परंतु कार्यभार शिरावर घेणारांचे ध्येय रा. ठेंगे यांच्या प्रमाणें असल्यास या सभेची सुद्धां कालें करून काय वाट होईल हें सागणें अवघड आहे. संयुक्त परिषदेच्या बैठकी संपतात न संपतात इतक्यांत ऐक्यास सर्व परीनें संमति दिलेल्या निरनिराळ्या ज्ञातिशकलांतील अध्वर्यूनीं उत्साहानें स्वतंत्र क्षेत्रांत स्वकीय वर्गांपुरतें काम चालविलें आहे. पुनः हेच पुढारी सर्व

हिंदुस्थानांतील सारस्वतांचें एकीकरण करण्याच्या कामीं ही कंबर कसून तयार ! अशा स्थितींत मनुष्य प्राणी हा उत्सव प्रिय आहे म्हणून या चळवळी उत्पन्न होतात, किंवा खरोखर ईश्वरी प्रेरणेनें व अंतःकरणाच्या औदार्यामुळें त्या उद्भवतात हें सांगणें फार बिकट झालें आहे. अशा संस्थांच्या ध्येयाविषयीं रा. ठेंगे सारख्या विद्वान् पुढाऱ्यांत जर निश्चितपणा नाही तर उत्सवप्रसंगीं जमलेल्या प्रचंड स्त्रीपुरुष समाजांतही त्यासंबन्धानें अज्ञान वसत आहे असें कोणी मानल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. शुद्ध, सात्विक व प्रेमळ अंतःकरणाचा हा उमाळा असेल तर अशा संस्थेचा अभ्युदय झालेला पाहण्यास आम्हांस आनंद वाटेल. कर्मारंभाबरोबर मनारंभ झाला पाहिजे असा भगवंतांनीं अर्जुनास उपदेश केला आहे. यांतील मर्म सर्व कार्यभार उचलणारांनीं जाणणें अगत्याचें आहे.

## रा. रा. पद्मनाभराव शंकर चंदावरकर यांचा सन्मान.

धारवाड हायस्कूलचे हेडमास्तर रा. पद्मनाभराव यांची बदली बेळगांव हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागीं झाल्यानें त्यांस धारवाड हायस्कूल व हास्टेलच्या विद्यार्थ्यांकडून पानसुपारी देण्याचा समारंभ गेल्या डिसेंबर ता. २ रोजीं झाला. त्यावेळीं त्यांच्यांत वसणाऱ्या प्रेम, समता, देशाभिमान वगैरे गुणांबद्दल त्यांची तारीफ करण्यांत आली. गणीत विषयांतील प्राविण्याबद्दल त्यांची ख्याति असून हा व इतर विषय विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवून देण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे याबद्दल विद्यार्थ्यांनीं त्यांचे गुणानुवाद गाइले. होस्टेलमध्यें अस्पृश्य वर्गाच्या विद्यार्थ्यांस व हायस्कूलमध्यें विद्यार्थिनींस दाखल करविण्याची सोय यांच्याच परिश्रमामुळें झाली. अशा उदार मनस्क गुरूस द्राविड सारस्वतांतील मतभेद रुचला नाहीं व शाळेंत शिस्त बिघडूं नये म्हणून त्यांना कडक उपाय योजावे लागले यांत आश्चर्य नाहीं. ( यासंबन्धाची हकीकत गेल्या अंकीं दिली आहे ) इतकें असूनही ते सर्व विद्यार्थ्यांस प्रिय होते यांतील मर्म हेंच कीं त्यांचें वर्तन सरळ, पथ्यकर व कल्याण कारक आहे. रा. चन्दावरकर यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो !

## सारस्वत दीनवत्सल संघ.

गेल्या दिवाळींत संघातर्फे स्वकीयांकडून दीनदुबळ्यांसाठी देणग्या जमविण्याचें काम चालून सुमारें ८०० रुपये गोळा झाले. श्रमविभागाचें तत्व लक्षांत आणून विशेष व्यवस्थित रीतीनें हें कार्य चालविल्यास, व शक्य असल्यास दिवाळीचा दिवस बदलून दूसरा एकादा शुभ दिवस या कामीं ठरविल्यास भरपूर आश्रय मिळण्याचा संभव आहे. कारण दिवाळीच्या दिवशीं देणग्या गोळाकरणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे. या संबंधानें विशेष पुढें लिहूं.

## कै. बॅरिस्टर पंडित यांचें स्मारक—

राजकोट येथें तेथील सुप्रसिद्ध दानशूर नागरिक बॅरिस्टर सिताराम नारायण पंडित यांचें निधन झाल्यावर तेथील कांहीं गृहस्थांनीं त्याचें स्मरक करण्याचा विचार केला. स्मारक फंडास ६०८४ ८८ ८४ इतकी रकम गोळा झाली. हल्लींच बॅरिस्टर शुक्ल यांच्या अध्यक्षतेखालीं या स्मारक फंडास हातभार लावलेल्या वर्गणीदारांची सभा भरून असें ठरविण्यांत आलें कीं १००० रुपये खर्च करून कै. पंडित यांची तसबीर तयार करावी व ती एका सार्वजनिक संस्थेच्या दिवाणखान्यांत ठेवावी. राहिलेली रक्कम कै. पंडित यांचें नांव फंडास देण्याच्या अटीवर हालरप्रांत वनरुपी फंड कमिटीकडे दुष्काळ विमा-फंडाप्रीत्यर्थ द्यावी. दीन दुबळ्यांच्या मदतीला धांवत जाणाऱ्या सावंतवाडीकडील सारस्वताचें स्मारक काठेवाडांत व्हावें ही अभिमानाची गोष्ट.

## श्रीयुत काशिनाथपंत खोटे यांचा सन्मान.

श्रीयुत काशीनाथ दीनानाथ खोटे यांस सरकारनें "**जस्टीस ऑफ धी पीस**" नेमिल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं ता. १ नव्हेंबर रोजीं त्यांच्या मित्रांनीं जो समारंभ केला त्यावेळीं त्यांस एक मानपत्र देण्यांत आलें. या मानपत्रांत रा. खोटे यांच्या व्यापारनैपुण्याबद्दल व त्यांच्या विनयशील व उदार वर्तनाबद्दल त्यांची तारीफ केली असून त्यांच्या घराण्याचा इतिहास थोडक्यांत दिला आहे तो असा—

श्रीयुत काशिनाथपंतांचे पितामह रघुनाथ नारायण हे प्रथम मुंबईस आले तेव्हां त्यांचें वय अवघें तीन वर्षांचें होतें. मोठे झाल्यावर यांनीं व्यापारी पेशा

पतकरला व हिंदी आणि युरोपियन् व्यापारी लोकांत हे फार प्रसिद्धीस आले. येथील म्युनिसिपालिटींत स्टँडिंग कमिटीचे सभासद या नात्यानें त्यांनीं प्रशंसनीय कामगिरी केली. १८८३ सालीं सरकारनें त्यांची कामगिरी लक्षांत आणून त्यांस शेरिफ नेमिलें आणि त्याच वर्षी महाराणी व्हिक्टोरिया यांनीं त्यांस सी. आयू. ई. ( C. I. E ) हा किताब दिला. काशिनाथ पंतांचे चुलते एकनाथ पंत व बंधु सुरेंद्रनाथ हे देखील चांगल्या योग्यतेचे नागरिक असल्याचें सरकारच्या निदर्शनास येऊन त्यांसही जस्टीस ऑफ धी पीस नेमण्यांत आलें होतें. कै. सुरेंद्रनाथ यानीं आपल्या हयातींत या शहरीं अनेक सार्वजनिक कार्यांत भाग घेऊन चांगलीच कीर्ति संपादिली. यांच्या अकालिक निधनानें या नगरींतील एक धुरीण नाहींसा झाला. श्रीयुत काशीनाथपंत यांच्या पेढीचें नांव के. डी. खोटे आणि कंपनि असें असून ती युरोप व आशिया खंडांत प्रसिद्ध आहे.

अशाप्रकारें थोर घराण्यांत जन्म पावलेल्या काशीनाथपंतानीं आपलें शील उज्ज्वल राखिलें असून त्यास औदार्याची जोड दिली असल्यामुळें ते विशेष आदरणीय झाले आहेत. हल्लींच त्यांनीं संयुक्त गौड सारस्वत परिषदेनें मालवण येथें स्थापन केलेल्या विधवांच्या विद्याविषयक फंडास ५०० रुपयांची उदार देणगी दिली आहे. उत्तरोत्तर श्रीयुत काशीनाथपंतांच्या कीर्तींत भर पडत जावो असें आम्ही इच्छितों.

### मडगांव येथील श्री सरस्वत्युत्सव.

मडगांव येथील "श्रीदामोदर वाचनमंदिर" या स्वकीयांनीं चालविलेल्या संस्थेचा वाढदिवससमारंभ विशेष उत्साहानें गेल्या आश्विन मासीं साजरा करण्यांत आला. या उत्सवासाठीं पुण्याचे रा. रा. शिवराम महादेव परांजपे, एम्. ए, रा. सीताराम केशव दामले, बी. ए, एल.एल. बी., रा. कृष्णराव सखाराम मसूरेकर व खानापूरचे रा. दत्तात्रय गोविंद सडेकर, रा. रघुनाथ दुर्गाराम जोशी वगैरे मंडळी निमंत्रितांपैकीं हजर होती. रा. शिवरामपंत यांची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत आली होती. हा सरस्वत्युत्सव चार दिवस चालला. पाहुणे मंडळीचें स्वागत मोठ्या थाटानें करण्यांत आलें. प्रथम दिवशीं रा. दत्तात्रय पांडुरंग नाईक यांचें स्वागतपर भाषण झालें. त्यांत त्यांनीं गोव्यांतील लोकांच्या गरजा काय आहेत व ऐतिहासिक दृष्ट्या गोमंतकीयांनीं आजवर कोणत्या राज्यक्रांत्या पाहिल्या याचें दिग्दर्शन केलें. अध्यक्ष रा. शिवरायपंत यांनीं आपल्या नेहमीच्या रसाळ पद्धतीनें जें प्रास्ताविक भाषण केलें त्यांत सारस्वत ज्ञातींतील थोर पुरुष व विद्वद्रत्नें यांच्याबद्दल आदर व्यक्त करून गुरुवर्य डॉ. भांडारकर यांच्या ठायीं शिष्यवत् आदरभाव व्यक्त केला. सारस्वत व इतर ब्राह्मण यांच्यांत प्रेम व सलोखा असणें व वाढणें किती अगत्याचें आहे हें त्यांनीं उत्तम रीतीनें सांगितलें. रात्रौ भोजनोत्तर रा. परांजपे यांचें "द्रौपदी वस्त्रहरण व श्रीकृष्ण भक्तीचें महत्त्व" या विषयावर सुमारें दीड तास प्रवचन झालें. यावेळीं श्रोतृवृंदाची वृत्ति तल्लीन झाली. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या दिवशीं रा. दामले, रा. मसूरेकर, गोमंतकीय कांहीं गृहस्थ व विद्यार्थी यांचीं निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर कोंकणी, मराठी व पोर्च्युगीझमध्यें भाषणें होऊन श्रोतृवृंदास बराच ज्ञानलाभ झाला. तिसऱ्या दिवशीं रा. मसूरेकर व रा. दामले यांचीं "मराठी वाङ्मय व ग्रंथलेखन" या विषयांवर व्याख्यानें झालीं. यांचा परिणाम श्रोतृवृंदावर होऊन मंदिराच्या विद्यमानें ग्रंथमाला चालू करण्याविषयींचा ठराव एकमतानें पसार झाला. शेवटीं रा. परांजपे यांनीं केलेल्या भाषणांत व्याख्यानमालेचा समारोप करून चालकांचे आभार मानिले व गोमंतकीयांस प्रेमपूर्वक व उत्साहानें राष्ट्रीय प्रगतीच्या कार्यास हातभार लावण्याबद्दल कळकळीचा उपदेश केला. एकंदरींत समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. मडगांव येथील सारस्वत ब्राह्मण समाज व दामोदर वाचनमंदिर या उभय संस्थांच्या चालकांनीं हातांत हात घालून उन्नति कार्य चालविल्यास अल्प कालांत आमचा गोमंतकीय समाज विशेष नांवारूपास चढेल यांत संशय नाहीं. कलियुगांत सहकारिता ही एक दिव्यशक्ति आहे हें सांगणें नको.

### श्रीमद्गौडपादाचार्य मठ, गोकर्ण.

महाराष्ट्रसारस्वताच्या गेल्या सालच्या तिसऱ्या अंकांत चक्रवर्ति शिवलिंगाची व तें ज्या मठांत स्थापन करण्यांत येणार आहे त्या गोकर्ण येथें तयार होत

असलेल्या मठाची माहिती दिली आहे. या इमारतीचें सामान वेळेवर न मिळाल्यामुळें अटकळीप्रमाणें गेल्या वैशाख मासीं ती पूर्ण करतां आली नाहीं. आतां तें काम बहुतेक पूर्ण होत आलें असून शिवरात्रीनंतर लवकरच, बहुधा फाल्गुन शुक्ल पक्षाच्या पहिल्याच आठवड्यांत या मठांत लिंगस्थापना करण्याचा समारंभ होणार असल्याचें कळतें. हा मठ भव्य प्रमाणावर बांधला असून एकंदर काम प्रेक्षणीय झालें आहे. लिंगस्थापनेच्या उत्सवास हजर राहण्याविषयीं शिष्यवृंदास श्री पूर्णानंद सरस्वती स्वामींकडून आज्ञापत्रें येतीलच. तरी शक्य ती सवड करून आमच्या बंधुभगिनींनीं श्रीस्वामींचा, चक्रवर्ति शिवलिंगाचा व गोकर्ण क्षेत्राचा दर्शन-लाभ घ्यावा अशी आमची सूचना आहे. शिवाय याच संधीस शिवरात्रीचा प्रेक्षणीय महोत्सव गोकर्णक्षेत्रीं होत असून तो पाहण्याची संधि भाविकांस आयती प्राप्त होईल.

## श्रीमन्मार्तंड माणिकप्रभु यांस मानपत्र.

श्री माणिकप्रभूच्याठायीं प्रेमादर व भक्तिभाव असलेल्या गौड सारस्वत ब्रह्मवृंदांतील मंडळीतर्फे हल्लीं संस्थानाधिपति असलेले श्रीमन्मार्तंड माणिक प्रभु महाराज यांस गेल्या ता. १२ अक्टोबर रोजीं रा. ब. आनंदराव दळवी यांच्या हस्तें एक मानपत्र रौप्य करंडकांतून देण्याचा समारंभ येथील लक्ष्मीबागेंत मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. भक्तमंडळाच्या वतीनें वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध रा. रा. रामभाऊ आचार्य यांच्या करवी श्रींची पाद्यपूजा करण्यांत येऊन गायनवादन वगैरे कार्यक्रमामुळें समारंभ सुमारें ४ तास चालला. स्त्रीपुरुषांचा समाज बराच मोठा जमला होता. श्रींनीं केलेल्या उपदेशपर भाषणांत सारस्वत ब्रम्हवृंदाची वर्णदृष्ट्या महती श्रेष्ठप्रकारची असल्याचें सांगून त्यांच्यांत आर्यत्वाचे आनुवंशिक संस्कार उच्चपरीचे असल्यामुळेंच त्यांचे धार्मिक व नैतिक व्यवहार शुद्ध असतात व ते तसेच राखणें यांतच समाजाचें कल्याण आहे अशा आशयाचा उपदेश केला.

## बाल कवयत्री कु. शांताबाई.

गोमंतकांतील हरिभक्तपरायण सखाराम बुवा करंडे यांची कन्या कुमारी शांताबाई या बालकवयित्री असून गेल्या नवंबर महिन्यांत बेळगांव येथें त्यांचें सुश्राव्य कीर्तन झालें. कीर्तनसंस्था निर्मल व परिणामकारक करण्यास हल्लींच्या कालीं पुरुषांपेक्षां स्त्रियांनींच हरिभक्तिप्रसाराचें काम पतकरणें विशेष उपयुक्त होईल.

## श्रीमन्मध्वाचार्य महोत्सव.

गेल्या नंवबर महिन्यांत श्रीमन्मध्वाचार्यांचा जन्मोत्सव हिंदुस्थान देशाच्या बऱ्याच भागांत मध्वमतानुयायांनीं साजरा केला. कानडा जिल्हा व इतर ठिकाणीं असणाऱ्या वैष्णव मतानुयायी सारस्वतांनींही हा दिवस उत्साहपूर्वक पाळल्याचें कळतें. अशाच पद्धतीवर श्रीमद्गौडपादाचार्यांचा जयंत्युत्सव पाळावा अशी सूचना आमच्या एका गोमंतकीय बंधूनें छापील सूचना पत्राच्या द्वारें केली आहे. परंतु केवळ उत्सव दिनांचा उपक्रम करण्यापेक्षां त्या महात्म्यांनीं निवेदिलेलें तत्वज्ञान आपलेंसें करून वर्तनांत तें दिसेल असें करणें विशेष श्रेयस्कर नाहीं काय ?

## सत्पात्रीं दानधर्म-

कै. वा. जयवंतराव माडगांवकर यांच्या प्रथम श्राद्धाच्या दिवशीं त्यांच्या कुटुंबीयांकडून अनाथांस व दीनांस मदत करणाऱ्या दहा संस्थांस एकंदर १००० रुपये धर्मार्थ देण्यांत आले. त्याच प्रमाणें रा. काशीनाथ रघुनाथ मित्र यांनीं आपल्या हल्लींच परलोकवासी झालेल्या पत्नीच्या आद्यश्राद्धानिमित्त बरीच रक्कम निरनिराळ्या अनाथ फंडांस व दीनदुबळ्यांस मदती दाखल खर्च केली असें कळतें. दानधर्म करण्याच्या पद्धतींतील ही सुधारणा बरी आहे.

## श्रीमत्सुब्रह्मण्यानंदतीर्थ यांची पुण्यतिथि.

मडगांव येथें ता. १९ डिसेंबर रोजीं सालाबादप्रमाणें ब्रम्हीभूत श्रीमत्सुब्रह्मण्यानंदतीर्थ ( म्हणजे पूर्वाश्रमींचे सुब्राय नायक ) यांचा पुण्यतिथ्युत्सव मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. प्रमुखस्थानीं आनन्दतीर्थ नांवाचे एक संन्यासी होते. मुख्य भाषण वे. शा. सं. रामचंद्र वामन शास्त्री करंडे यांचें ' कर्ममार्ग व संन्यास' या विषयावर झालें. व एकंदर समारंभ परिणामकारक रीतीनें पार पडला. अशाप्रकारच्या समारंभांच्या योगानें गत सत्पुरुषांबद्दलची स्मृति कायम राहते म्हणून तो घडवून आणणारांचें आह्मी अभिनंदन करतों.

—कारवार कडील कैवल्यपूर मठानुयायी सारस्वतांनीं हल्लींच स्थापन केलेल्या "गौडसारस्वत निराश्रित सेवा फंड" नांवाच्या दीनस्थितींतील स्वकीयांच्या मदतीसाठीं निर्माण केलेल्या संस्थेस मदतीदाखल रा. शांताराम सर्वोत्तम कंटक यांच्या चालकत्वाखालीं असलेल्या तरुण मंडळीनें मानापमान हा खेळ करून दाखविला. त्या योगें या फंडास सुमारें ८०० रुपये मिळाले. रा. कंटक यांच्या अभिनयकौशल्याबद्दल त्यांस सुवर्णपदक देण्यांत आलें.

—प्रो. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांची कलकत्ता युनिव्हर्सिटींत कार्मायकेल प्रोफेसरच्या जागीं नेमणूक झाली आहे.

—म्हापसें येथील सारस्वत विद्यालयास गोवा सरकारनें १५०० रुपयांची देणगी दिली. देशी भाषा शिकविणाऱ्या संस्थेस तेथील सरकाराकडून मदत मिळाल्याचें हें पहिलेंच उदाहरण.

—येथील आमचे बंधु रा. नागरमठ रामराव यांनीं श्रीक्षेत्र गोकर्ण येथें आपली गत पत्नी सौ. सीताबाई हिच्या नांवें दवाखान्याची इमारत बांधण्यासाठीं ५००० रुपये दिले. स्तुत्य देणगी.

—गौडसारस्वत हौसिंग स्कीम सरकारांत रजिस्टर होणार असून शेअर जमविण्याचें काम झपाट्यानें चाललें आहे. दादर व माटुंगा येथें इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या जागाही ९९ वर्षांच्या करारावर चालकांनीं घेतल्या व भांडवल सुमारें पाऊण लाख जमेल असें कळतें.

—**दुखवट्याची सभा.** कै. रा. ब. गंगोळी यांच्या निधनाप्रीत्यर्थ दुःख प्रदर्शित करण्यासाठीं म्हापसें येथील ज्ञातिबंधूंची तेथील सारस्वत विद्यालयांत डॉ. शिनारी यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून दुखवट्याचें पत्र कै. राव बहादुरांचे जामात रा. कावाड यांजकडे पाठविण्यांत आलें. त्याच प्रमाणें कुमट्यासही सभा भरून दुख व्यक्त करण्यांत आलें. कारवारांत व कारवारी मंडळी ज्या ज्या ठिकाणीं आहे तेथें अशाप्रकारच्या सभा भरल्या काय ?

—नूतन वर्षारंभाच्या दिवशीं सरकारानें रा. रा. शेषगिरी रामचंद्र कोप्पिकर सब जज्ज यांस **रावबहादूर** या पदवीनें भूषविलें. मद्रास इलाख्यांत रा. कार्नाड नारायणराव, इन्स्पेक्टर ऑफ पोलिस, दक्षिण कानडा व रा. शिवराव मंजुनाथ त्रासी, सिव्हिल अ. सर्जन, विजागपट्टन, यांस **रावसाहेब** असा किताब मिळाला. मुंबईंतील रा. वसंतराव आनंदराव दाभोळकर व डॉ. राव यांस युद्धोपयोगी कामगिरीबद्दल O. B. E. व रा. गणपत लक्ष्मण गजेंद्रगडकर यांस M B. E. या पदव्या प्राप्त झाल्या. या सर्व बंधूंचें महाराष्ट्र सारस्वत अभिनंदन करीत आहे.

# शोचनीय निधन.

## रावबहादूर राघवेंद्रराव रामचन्द्र गंगोळी.

आमच्या ज्ञातींतील वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व परोपकारतत्पर असे पुढारी रा. ब. गंगोळी यांचें निधन गेल्या ता. २ नव्हेंबर रोजीं कारवार येथें त्यांच्या वयाच्या ७२ व्या वर्षीं झालें हें कळविण्यास आम्हांस दुःख वाटतें. संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेच्या म्हापसें येथील अधिवेशनाचे अध्यक्ष व कारवार येथें भरलेल्या परिषदेचे स्वागत कमेटीचे अध्वर्यु या नात्यानें त्यांचा दूरदूरच्या ठिकाणच्या स्वज्ञातीय बंधूंस परिचय झाला असेलच. ज्यांस अल्पकाल किंवा दीर्घकाल या सत्वशील पुरुषाचा समागम घडला असेल त्यांस त्यांच्या धीरोदात्त गुणांची वारंवार आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं, आपल्या दीर्घ आयुष्यक्रमांत अनेक सार्वजनिक हिताचीं कृत्यें करून रावबहादूरांनीं चिरस्थायी कीर्ति मिळविली. त्यांचें अल्प चरित्र या अंकांत दिलें असून तें लहानथोरांस आदर्शवत् होवो असें आम्ही इच्छितों. ईश्वर मृताच्या आत्म्यास सद्गति देवो.

## श्रीयुत महादेव आत्माराम राजाध्यक्ष.

महाराष्ट्र सारस्वताचे एक अत्यंत आस्थेवाईक मदतगार रा. महादेवराव यांचें नऊ दिवसांच्या इन्फ्लुएन्झा तापानें गेल्या ११ नवंबर रोजीं मुंबई येथें निधन झालें हें कळविण्यास आम्हांस फार दुःख होत आहे. मरणसमयीं त्यांचें वय अवघें ३५ वर्षांचें होतें. यांनीं कारवार येथें हायस्कूलचा अभ्यास पूर्ण केला. त्या मुदतींत अगदीं अल्पवयी असतांना देखील अनेक सार्वजनिक हिताच्या कार्यांत पुढाऱ्यांस अनेक परीनें मदत करून वाहवा मिळविली. स्टुडंटस ब्रदरहुड, धार्मिक व इतर व्याख्यानें, खेळ, मिरवणुकी वगैरे चळवळींकडे मुलांचें लक्ष वेधेल असें करून त्यांच्यांत भावी नागरिकत्वाची कल्पना रुजेल असें करण्यास यानीं आपला अभ्यास सांभाळून जिवापाड मेहेनत केली. यामुळें इ. स. १९०५ सालापासून १९०९ सालापर्यंत तेथील विद्यार्थ्यांच्या ठायीं परस्पर प्रेमाचा व उत्साही वृत्तीचा विकास झाला. घरच्या गरीबीमुळें त्यांस सरकारी नोकरी अगदीं थोड्या पगारावर पतकरावी लागली. तरी सदा तृप्त स्थितींत राहून त्यानीं आपल्या ज्ञानांत भर घालण्याचें सुव्रत सोडलें नाहीं. पुढें गेलीं चार वर्षें सरकारी नोकरी सोडून त्यानीं येथील एका जपानी कंपनींत नोकरी पतकरली. व आपल्या व्यवस्थेशीर काम करण्याच्या शैलीमुळें त्यांनीं आपल्या वरिष्ठांची मर्जी चांगलीच संपादन केली. त्यांस लेखनवाचनाचा विशेषतः इतिहासाचा अभ्यास करण्याचा दांडगा व्यासंग होता. मुख्यत्वें महाराष्ट्राचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास त्यांस मुखोद्गत होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचे लेख महाराष्ट्र सारस्वतांत यापूर्वी प्रसिद्ध झाले असून **'कुडाळदेशकर'** या लेखमालेंतील तीन लेख या अंकापासून प्रसिद्ध होत आहेत. कै. महादेवरावांचा स्वभाव निगर्वी, मनमिळाऊ, परोपकारी व निष्कपटी होता. उचनीचपणाची कल्पनाच त्यांच्या ठायीं नव्हता. सत्यवचनी व पराकाष्ठेचे धीट म्हणून त्यांस जाणणाऱ्या इंकडो लोकांत त्यांची ख्याति होती. त्यांच्या अकालिक निधनानें त्यांचे वृद्ध पिता, तरुण पत्नी व एक अल्पवयी ( ७ वर्षांची ) मुलगी यांच्यावर जो दुःखाचा प्रसंग कोसळला आहे त्याचें वर्णन आमच्यानें करवत नाहीं. त्यांचे तीर्थरूप, वैद्य आत्माराम पंत हवालदार, यांनीं आपल्या मुलाची महाराष्ट्र सारस्वतावरील भक्ति जाणून त्यांची इतिहास व वाङ्मयविषयक बरेच महत्वाचे ग्रंथ असलेली 'लायब्रेरी' महाराष्ट्र सारस्वतास अर्पण केली याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो व दुःखितांचें सांत्वन करो.

## श्रीयुत नारायण विष्णु सुखठणकर.

आपल्या ज्ञातींतील तरुण व होतकरू एंजिनियर रा. नारायणराव सुखठणकर यांचें ता. २ डिसेंबर रोजीं विषमतापानें निधन झालें हें दुःखकारक वर्तमान कळविण्यास वाईट वाटतें. रा. नारायणराव यांचे वडील रा. विष्णु घनश्याम हे स्वकष्टानें गरीब स्थितींतून वर येऊन येथील हायकोर्टांचे जुन्या पिढींतील वकीलांत नामांकित झाले. ते वरींच वर्षें लॉ रिपोर्टर ( Law reporter ) होते. रा. नारायणरावांस आपल्या पित्याचा वियोग बालपणीं घडला त्यामुळें त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांचे वडील बंधु रा. सितारामपंत, एंजिनियर, यांवर पडली. ती त्यांनीं प्रेमपूर्वक पार पाडून आपले बंधु रा. नारायणराव यांस B.A.L.C.E. केलें. याप्रमाणें एंजिनियरिंगची परीक्षा पसार झाल्यावर रा नारायणराव यांनीं नोकरी पेशा न पतकरतां आपला धंदा स्वतंत्र रीतीनें चालवून त्यांत चांगलेंच यश संपादन केलें. ते स्वभावानें निगर्वी व प्रेमळ होते. व्यवहाराच्या कामीं चोख, सरळ व वाणेदार असल्याबद्दल त्यांची ख्याति होती. ते धर्मशील असून त्यांचे आचारविचार जुन्या पद्धतीचे होते. त्यांना गायन कलेचा नाद असल्यामुळें ती अवगत करून घेण्यास त्यांनीं बरेच परिश्रम केले. निधनसमयीं त्यांचें वय ४६ वर्षांचें होतें. त्यांच्या पश्चात् त्यांची पत्नी, दोन सुशिक्षित मुली व एक मुलगा असून त्यांचा मित्र-परिवारही मोठा आहे. त्यांचे चिरंजीव येथील युनिव्हर्सिटीच्या बी. ए. परीक्षेत पसार होऊन हल्लींच आय. सी. एस. च्या अभ्यासासाठीं विलायतेस गेले आहेत. पितृवियोगामुळें धीर न सोडतां ते आपला अभ्यास पुढें चालवून योग्य समयीं त्या बहुमानाच्या परीक्षेंत विजयी होऊन येतील अशी आम्हांस आशा आहे. दुःखितांचें परमेश्वर सांत्वन करो.

# पत्रव्यवहार.

## 'कुडाळदेशकर' लेखमाला.

रा. रा. "महाराष्ट्र सारस्वत" कर्ते—यांस.

वि. वि. आपल्या त्रैमासिकांत अलीकडे कुडाळदेशकर वर्गासंबंधानें प्रसिद्ध होत असलेला मजकूर वाचून सुचलेले विचार प्रसिद्धीसाठीं पाठवीत आहें. नूतन निर्मित संस्था ! ! परुळेकर निर्मित इतिहास, त्याच प्रमाणें "ब्रम्हगौड." "आद्यगौड," "मध्यगौड" व "अंत्यगौड" इत्यादि नवीन क्लृप्तींच्या भेदांकडे, आपण इतके दिवस दुर्लक्ष्य केलेत, हेंच माझ्या मतें योग्य होतें. वास्तवीक पहातां अशा अप्रत्यक्ष रितीनें सुद्धां, नूतन निर्मीत अजब कामगिरीस इतकें नसतें महत्व देण्याचें प्रयोजन नव्हतें.

प्राणी मात्राची योग्यता, त्याच्या कृतीनें ठरते; संस्थांचीही गत तीच; पैसे भरून जाहिराती प्रसिद्ध करणें व एनकेन प्रकारेण नांवाची प्रसिद्धि करणें, हीच इति कर्तव्यता ज्या ठिकाणीं आहे, त्या ठिकाणीं अजब ~~कृतींचा~~ नुसता उल्लेख सुद्धां न करणें बरें.

आपल्या संयुक्त गौड सारस्वत ब्राम्हण परिषदेचें कार्य व अंतिम ध्येय, जो सदसद्विवेक वुद्धिनें विचार करील त्यासच कळणारें आहे. त्यांत वैषम्याचा किंवा उच्चनीचत्वाचा भागच येत नाहीं. जे आपण निरनिराळ्या कित्येक कारणांनीं एकमेकांशीं अलिप्त होतों, ते सद्य:स्थितिमानानें, जुना अलिप्तपणा विसरून एकत्र व सलोख्यानें वागावयाचें—हाच "**एकी**" शब्दाचा संदेश आहे. परिषदेंत, ज्या कोणास ज्या रितीनें एकी प्रिय असेल, त्यांनीं त्यांत येऊन भाग घ्यावा; आपलें प्रांजळ मत चौघांपुढें प्रतिपादन करावें; व इच्छित कार्यास मदत करावी. जेथें कार्यच करावयाची इच्छा नाहीं, कार्य मोडेल कसें, ह्याबद्दलची इच्छा प्रबल— तेथें अन्य तऱ्हेचा आविर्भाव दृग्गोचर व्हावयाचाच. "दुसऱ्याची कुचेष्टा केल्याशिवाय आपली प्रतिष्टा वाढण्यास दुसरें साधनच नाहीं" अशी म्हण आहे. तीच म्हण, नूतन अजब कामगिरीची साक्ष देत आहे.

एका बाजूनें, प्रगतीस पूर्णपणें आधारस्तंभ म्हणून घेण्यासाठीं एकीकरणास आम्हीं "आद्यगौड" ह्या पदवी धारणानें तयार आहों असें म्हणणारांवर "आद्य" प्रतिपादन करितांना, मध्य व अंत्य ठरविण्याची जबाबदारी आपोआप येते. हातीं घ्यावयाचें कार्य— जर तें सत्कार्य असेल, प्रयत्न करावयाचे ते जर कळकळीचे व सत्कार्यासाठींच असतील; तर त्या सत्कार्याची उपयुक्तता—स्वतः कार्य करणाऱ्यापेक्षां, तें कार्य पहाणाऱ्या मंडळीस आपोआप दिसून आली पाहिजे. तरच तें कार्य. स्वोन्नतीचे प्रयत्न प्रत्येकानें आपापल्यापरी करावे. त्याबद्दल कोणासही वैषम्य वाटणार नाहीं. परंतु ते प्रयत्न द्वेषरहित, कळकळीचे व वृथाभिमानास ठाव न देणारे असे जर असतील, तरच स्वोन्नतीची आशा दिसेल. जाहिरातीच्या द्वारें उन्नति होणें शक्य नाहीं. जेथें स्वोन्नतीच नाहीं, तेथें "एकी" हा व्यापक शब्द स्वप्नांतसुद्धां येण्याची, अशा कित्येक मंडळींत आशा करावयास नको ! ! कोरे ते कोरेच.

"सभा आहे" असें दाखविण्याकरितां, व आपल्या पुढील पिढीस कागदोपत्रीं उल्लेखाचें दप्तर तयार करण्यासाठीं, कार्डें व जाहिरातीचे कपटे छापविणें, ( २ ) कंपूंतील निवडक मंडळी-समानशील व्यवसाय बंधु-एकत्र जमले म्हणजे "ज्ञातीच्या जाहीर सभेंतील ठराव" म्हणून मनास वाटेल तें लिहीणें. ( ३ ) त्या ज्ञातींतील सुशिक्षित, सुविचारी व कळकळीनें काम करणारी मंडळी, नवीन विविध लीलांस अनुकूल होत नाहीं, म्हणून जाहिरातीद्वारा, अंतर्यामीं पडलेली कुचंबणी दूर करणें, हे २० व्या शतकांतील जादूचे नवे खेळ आहेत, व असे जादूचे खेळ करणाऱ्या पुढारी व्यक्तीचें सामाजिक वर्तन 'रानडे' यांच्या सुप्रसिद्ध

मोडी कित्याप्रमाणें नमुनेदार व वळणशीर आहे!! तेव्हां अशाबद्दलचें वर्णन निदान सुप्रसिद्ध सारस्वत त्रैमासिकांत तरी न व्हावें असें मी इच्छितों.

ज्या अर्थी १९१२ सालीं खुद्द कुडाळदेशकरांनीं वसई येथें परिषद भरवून ऐक्याचें निशाण रोविलें त्या अर्थी **कुडाळदेशकरांतील सुशिक्षित व सुविचारी मंडळी प्रागतिक व उपयुक्त सुधारणेपासून, अलग रहाणें मुळींच शक्य नाहीं.**

१९१२ नंतरच्या ह्या नूतन निर्मित संस्था!! आणि ही इतिहासपरंपरा!!! " आद्यत्व " राखण्याकरितां तळमळ करणारी मंडळी कुडाळदेशकरांत तरी एकीनें आहे काय? त्यांतल्या त्यांत कितीतरी शकलें झालीं आहेत, होत आहेत; सध्यांच्या त्यांच्या लीला कांहीं दिवस टिकल्यास आणखी जास्त शकलें होतील. त्यांत **सुशिक्षित व सुविचारी वर्ग निराळा ठेवून**—बाकीच्या मंडळींत धंद्याच्या दर्जाप्रमाणें निरनिराळे वर्ग ठरवावे लागणारच. त्यां तच त्यांस आद्यत्वाचें भूषण!! तेव्हां अशा गौडबंगालाकडे कुडाळदेशकरांतील विचारी व दक्ष माणसें— **ढुंकूनसुद्धां पहाण्यास तयार नाहींत**, हें उघड आहे.

" आद्यत्व " प्रतिपादन करण्यास हल्लीं उद्युक्त झालेल्या सज्जन लोकांचीं नांवें, कृती व त्यांच्या मनाचा थोरपणा, सुवर्णाक्षरांनीं नोंदून ठेवण्यास, एका अजब इतिहासाचा दुसरा भाग, कलियुग संपल्यानंतर जेव्हां प्रसिद्ध होईल, तेव्हा त्यांच्या मनोहर कर्तबगारीबद्दल, साक्षात् परमेश्वरास त्यांचे आभार मानावे लागतील, ह्यांत शंका नाहीं.

वसई, ता. ३-१२-१९१९. आपला,

**कुडाळदेशकर.**

### पत्र २ रें.

प्रेमादरपूर्वक साष्टांग नमस्कार विनंति विशेष. खालील मजकुरास आपल्या येत्या अंकीं स्थळ देण्याची कृपा करावी.

रा॰ परूळेकर वकील ( वसई ) यांनीं प्रसिद्ध केलेलें पुस्तक व तत्संबंधीं आपण आपल्या त्रैमासिकाच्या गेल्या तीन अंकांत केलेली टिका, माझ्या पहाण्यांत आली. रा॰ परूळेकर यांचें लिहिणें व त्यावर आपलें म्हणणें योग्य किंवा अयोग्य ह्या वादांत मी पडूं इच्छीत नाहीं. संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेच्या ध्येयानुरूप आपण सर्वजण एकाच समसमान दर्जाचे घटक असून, परस्परांत संघटण प्रेमानें वृद्धिंगत व्हावें—एवढी महत्वाची आवश्यकता लक्ष्यांत घेतली म्हणजे, ऐतिहासिक सत्यास रंग देण्याचें किंवा तें सत्य बेरंगी म्हणून चवाठ्यावर आणण्याचें माझ्या मतें कांहींच प्रयोजन रहात नाहीं. कोणतीही ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध करितांना लेखकानें योग्य अशा ऐतिहासिक साधनांचा उपयोग करावा. इतरांची निंदा करण्याचा त्याला अधिकार नाहीं. जेथें इतिहासाचा उपहास होतो तेथें विशेष लक्ष घालून काळाचा अपव्यय करण्यापासून फायदा कोणता?

आपणास तसदी देण्याचें मुख्य कारण एवढेंच कीं, आपल्या त्रैमासिकांत रा॰ परूळेकर यांच्या मूळवस्तीचा संबंध-कोयना, तुंगभद्रा व सातारा-प्रदेशाशीं असल्याचें इतिहासभक्त लिहितात; परंतु माझ्या मतें खरी वस्तुस्थिति तशी नसावी. रत्नागिरी व सावंतवाडी ग्याझेटिअर ( पृष्ठें ४३८ च्या पुढें ), त्याचप्रमाणें जिवबा दादांचें चरित्र व इतर कागद पत्र जे माझ्या पहाण्यांत आले, त्यावरून कुडाळ प्रांत किंवा कुडाळदेश हा १४३६ पासून १६४० पर्यंत ~~विजया~~नगर व विजापूरच्या अमलाखालीं असून त्यांनीं आपल्या राज्यव्यवस्थेकरितां जे विभाग केले त्या विभागांतच "कुडाळदेशकरांची" मूळ वस्ती झाली असें आढळतें. घाटमाथ्यावर असलेल्या सातारा प्रांताशीं त्यांचा कांहींच संबंध नसून, तसा संबंध असल्याचें आजपर्यंत कोणाच्याही आख्याइकेंत किंवा ऐकिवांतही नाहीं. सावंतवाडी संस्थानांपैकीं, "कुडाळ" हा एक पेटा आहे. तो देश नव्हे—ही गोष्ट सद्यःस्थितीची आहे खरी. त्याचप्रमाणें कुडाळ देशाचा त्या वेळच्या बंदर किनाऱ्याचें सध्यां, कुडाळ पेठ्यांतील " भंगसाळ " ह्या नांवानें, परिस्थितीनें रूपांतर झालें आहे, हेंही मला कबूल आहे. तथापि वर दर्शविलेला " कुडाळदेश " वाडीसंस्थानांतील भागांतच मोडत असून, त्याचाच संबंध " कुडाळदेशकर " मूळ वस्तीशीं सरळरीतीनें पोंहचतो.

वरील माहिती—आजपर्यंत कागदोपत्रीं माझ्या पहाण्यांत आलेल्या उल्लेखांवरून दिली आहे. दुसरा माझा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे—आमच्या पणजाच्या कारकीर्दीपासून " देसाई " ह्या सदराखालीं म्हणा किंवा त्या वेळची जी कांहीं परिस्थिती असेल तदनुरूप म्हणा; परंतु वाडी संस्थानांतून आम्हांस " इनाम देणगी " रोख द्रव्याच्या रूपानें दरसाल भोगत आली आहे. व त्या देणगीचें क्रमाक्रमानें रूपांतर झालें तरी, त्याचा अल्पांश दरसाल मला सध्यांही मिळतो. ह्याकरून, आमच्या पूर्वजांचा संबंध बऱ्याच मागील कालापासून, वाडीसंस्थानांतील—" कुडाळ प्रांत " किंवा " कुडाळ देश " ह्याच्याशींच असला पाहिजे, अशी माझी दृढ समजूत आहे. व ह्या गोष्टी मुद्देसूद व विशेष सकारण असाव्या असें, माझ्या पहाण्यांत आलेल्या उल्लेखांवरून तरी मला स्पष्ट दिसतें.

मुंबई–काळबादेवी } आपला,
**दिगंबर वासुदेव देसाई.**

[वरील पत्रें आम्ही इतिहास भक्त यांजकडे पाठविलीं. त्यांजकडून आलेलें उत्तर येणें प्रमाणें आहे:—सं. ]

सा. न. वि. वि. आपण मजकडे पाठविलेल्या पत्रांतील मजकूर ध्यानीं घेतां असें दिसून आलें कीं महाराष्ट्र सारस्वतांतून जी लेखमाला प्रसिद्ध होत आहे ती अगत्याची आहे असें आमच्या बंधूंस वाटत नाहीं. मीतरी रा. परूळेकरांच्या पुस्तकावर टीका करण्यासाठीं फार कष्टित अंतःकरणानें लेखणी हातीं घेतली. याचें कारण हेंच कीं रा. परूळेकरानीं इतिहास या नांवाखाली १९१५ सालीं इतर सारस्वतांविषयीं निंदाप्रचूर विधानें करून एक पुस्तक प्रसिद्ध केलें. कुडाळदेशकर बंधूंनीं या विधनांचा जाहीर रीत्या निषेध करण्याचें एकीकडेच राहिलें. उलट ऐतिहासिक सत्य उघडकीस आणिलें म्हणून ग्रंथकारावर स्तुतिस्तोत्रांचा वर्षाव होऊं लागला व ज्ञातितर्फे त्यांस सुवर्ण पदक ही अर्पण करून त्यानीं केलेल्या विधानांस कूडाळदेशकर समाजांतील पुढारी म्हणविणारांनीं मान्यता दिली. पुढें या ऐतिहासिक सत्याचा फैलाव करून संयुक्त परिषदेच्या व सुविचारी व प्रगमनशील गौडसारस्वत ब्राम्हणांच्या ध्येयास काळीमा लावण्याचें महत्कार्य करण्याच्या हेतूनें एक आद्यगौड ब्रह्ममंळ ही निर्माण झालें. या मंडळाच्या चळवळीस विरोध करण्याचें किंवा त्यांची कान उघाडणीकरून त्यास ताळ्यावर आणण्याचें मनोधैर्य कुडाळदेशकरांतील विद्वान, समंजस, व परिषदेचें तत्व मान्य असलेल्या लोकांनीं दाखविलें नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं या मंडळांतील चळवळ्यांस मनमानेल तसें वावरण्यास फावलें व रा. परूळेकरांचीं विधानें विशेष रंग चढवून परिणामकारक करण्याचें व्रत या मंडळानें पतकरलें. ज्ञानकोश नांवाच्या महाराष्ट्रीय ग्रंथांत आपली ज्ञात सारस्वतांपासून निराळी व स्वतंत्र आहे असें नमूद करण्याविषयीं या मंडळाचे प्रयत्न चालले. या संबंधानें ज्ञानप्रकाशांत कोशकारांकडून सूचना आली तरी कुडाळदेशकरांतील ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध लोकांनीं निषेध दर्शविला नाहीं. आद्य गौड मंडळाचा पहिला वार्षिक अहवाल म्हणजे रा. परूळेकरांच्या इतिहासाची पुरवणी असून त्यांत सत्याची पर्वा न धरतां आणखी दोन विधानें सारस्वतांविरुद्ध केलीं आहेत. अशा स्थितींत प्रस्तुत लेखकास वाटलें कीं कुडाळदेशकरांस अशाप्रकारें सर्वमान्य झालेल्या रा. परूळेकरांच्या ग्रंथावर योग्य ती टीका न केल्यास कालेंकरून हा ग्रंथ आधारभूत होऊन बसेल. सत्याच्या दृष्टीनें म्हणा किंवा ऐक्याच्या दृष्टीनें म्हणा, असें होणें कदापि इष्ट नाहीं. या साठींच ही लेखमाला प्रसिद्ध करणें भाग पडलें. टीका करते वेळीं रा. परूळेकरांस किंवा त्यांच्या मताच्या लोकांस जागे करण्यासाठीं कधीं कधीं कडक प्रकारची शब्द योजना निरुपाय म्हणून करावी लागली आहे. याबद्दल त्यांस जितकें वाईट वाटण्याचा संभव आहे त्याहून अधिक प्रस्तुत लेखकाला वाईट वाटत आहे.

आमचे मित्र रा. दिगंबरराव देसाई यांच्या प्रश्नाचें उत्तर मी आधींच दिलेलें आहे. दुसऱ्या लेखांकांतील कुडाळाविषयींचें विवेचन व तिसऱ्या लेखांकांतील पृष्ठ १२० या वरील मजकूर यांत हें उत्तर सांपडण्यासारखें आहे. शिवाय रा. परूळेकर यांच्या इतिहासांतील ' कुडाळदेशकरांचे कऱ्हाड्यांशीं मर्यादित ऐक्य ' या विषयींचें विवेचन ही रा. देसाई यानीं वाचून पाहिल्यास त्यांस कुडाळदेशकर हे वारघाटी असावे असें दिसून येईल. कुडाळ प्रांतांत जो गौडसार-

स्वतसमाज आहे त्यांत फक्त दाभोली मठाचे अनुयायी मात्र आपणास कां कुडाळदेशकर म्हणवितातां ? कुडाळासारख्या लहान गांवास देश अशी संज्ञा प्राप्त झाली होती याबद्दल दाखला सांपडतो काय ? खुद्द कुडाळांत त्याच ठिकाणीं कुडाळदेशकर हें नांव प्राप्त होणें शक्य आहे काय ? अशाप्रकारचीं नांवें ज्ञातीस प्राप्त व्हावयास त्या स्थानाचा त्याग करावा लागतो असाच अनुभव नाहीं काय ? वगैरे प्रश्नांचें समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत मीं केलेलें विधान मागें घेणें शक्य नाहीं. देसाई हे अगदीं अलीकडचे. आमचा वाद आहे आद्य वसाहतीविषयीं व वसाहतीच्या कालाविषयीं. तेंव्हां रा. दिगंबर रावांचा जो अनुभव आहे तो जुन्या इतिहासावर प्रकाश पाडण्यास समर्थ नाहीं असें मला वाटतें. कळावें-

आपला


इतिहासभक्त

**सं. गौ. सा. परिषद, कारवार.** "१९१३ सालीं कारवार येथें भरलेल्या संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेच्या अधिवेशनाच्या खर्चासाठीं वर्गणी गोळा करण्यांत आली होती. या रकमेचा विनयोग कसा करण्यांत आला, शिल्लक काय राहिली, ती कोणापाशीं आहे व पुढें तिचा कोणत्या रीतीनें उपयोग करणार वगैरे संबंधानें रीतसर जमाखर्चाचा अहवाल अद्यापि वर्गणी दिलेल्या गृहस्थांस सादर करण्यांत आलेला नाहीं. ज्यांच्यावर या कार्याची जबाबदारी लादण्यांत आली होती त्यानीं आतांतरी अहवाल प्रसिद्ध करावा व तसें करण्यास सहावर्षांचा अवधि भरपूर झाला" अशा आशयाचें एक पत्र प्रसिद्धीसाठीं आमच्याकडे आलें आहे. तक्रार खरी असल्यास चुकीची दुरुस्ती लवकर होणें व्यावहारिक व समाज दृष्टयाहि बरें नव्हे काय ?

## अखिल भारतीय सारस्वत सभा.

रविवार ता. १४ डिसेंबर रोजीं येथील मुझफराबाद वाडींतील भव्य दिवाणखान्यांत "ऑल् इंडिया सारस्वत सभा" या संस्थेचा द्वितीय वार्षिक समारंभ मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. सभेचे सभासद नसलेल्या मंडळीसही सेक्रेटरींकडून निमंत्रण गेल्या कारणानें स्त्रीपुरुषांचा जमाव दिवाणखान्यांत सोईनें मावला नाहीं. सुमारें पांचशें पुरुष व दोनशें स्त्रिया या समारंभास हजर असून यांपैकीं गुजराथी सारस्वत पुरुष अजमासें १०० व स्त्रिया ४० असाव्या. विशेषतः चित्रापूर मठानुयायी सारस्वत स्त्री पुरुषांची संख्या सर्वांत अधिक होती. रा. ब. सदानंद त्रिंबक भांडारे, रा. ब. आनंदराव सदाशिव दळवी, रा. ब. अनंत कृष्ण पै, रा. ब. श्रीपाद सुब्राव ताळमकी, रा. मंगेशराव विश्वनाथ राजाध्यक्ष, रा. अनंत विश्वंभर साखरदांडे, रा. कृष्णराव माडगांवकर, रा. गोविंद मल्लीनाथ ठेंगे, रा. नरसिंगराव कौशिक रा. दत्तात्रय अनंत तेलंग, रा. कृष्णराव नारायण महाले, रा. श्रीकंठ सोहिरोबा वागळे, रा. आनंदराव बापुभाई पाखाडे व येथील सारस्वत ब्राह्मण समाज, गौ. सा. ब्रा. मित्र मंडळ, न्यू सारस्वत यूनियन् वगैरे संस्थांचे बरेच सभासद या समारंभास हजर होते.

कार्यक्रमास ३ वाजतां प्रारंभ झाला. प्रथमतः सारस्वत बाल चमूची ( Boy scouts ) प्रेक्षणीय कवाईत झाली व अल्प उपाहार घेतल्यावर मंडळी ३॥ वाजतां दिवाणखान्यांत दाखल झाली. तेव्हां ५ अल्पवयी मुलींनीं सुस्वर गीत गाऊन सभाजनांचें स्वागत केलें. प्रमुखस्थान या संस्थेचे अध्यक्ष रा. ब. सदानंद भाई भांडारे यानीं मंडित केल्यावर गत सालच्या कार्याचा अहवाल सेक्रेटरी रा. गणेश पद्मनाभ मुर्डेश्वर यांनीं सादर केला. हा अहवाल मंजूर करण्याविषयीं भाषण करतांना रा. कौशिक म्हणाले अल्पकालांत ऑलइंडिया सारस्वत सभेनें आस्थापूर्वक काम केलें असून या देशांतील निरनिराळ्या प्रांतांत असणाऱ्या सारस्वतांना सुमारें १५०० पत्रें पाठविलीं. त्यांपैकीं कित्येकांस अत्यंत सहानुभूतिपर व उत्तेजनकारक अशीं उत्तरें आलीं आहेत. यावरून सर्व भारतीय सारस्वतांच्या आचारविचारांविषयीं एकमेकांस ओळख करून देऊन त्यांच्यांत प्रेमभाव जागृत करण्याचा या सभेचा हेतु अल्पकालांत तडीस जाईल अशीं सुचिन्हें दिसतात. गेल्या सहा महिन्यांत सभासदांची संख्या झपाट्यानें वाढली असून सध्यां ती २५५ आहे. या संस्थेचे हेतु दूरवर पसरलेल्या सारस्वत बंधूंना समजावे म्हणून सभा स्थापन झाल्यापासून सहा महिन्यानंतर एक त्रैमासिक प्रसिद्ध करण्याचें धाडस या सभेनें केलें. अखिल सारस्वत ज्ञातीचें हें त्रैमासिक (वृत्तपत्र)




श्रीमत् पूर्णानन्द सरस्वती स्वामी.

श्रीमठ कैवल्यपूर.



ब्रह्मीभूत श्रीमत् आत्मानंद सरस्वती स्वामी,
श्रीमठ कैवल्यपूर.



श्री चक्रवर्तीश्वर शिवलिंग.
( श्रीक्षेत्र गोकर्ण मठ )

नं. ११ / २
ता. ९.९.२०


# महाराष्ट्र सारस्वत.

वर्ष ४ थें ] मे १९२०. [ अंक ३ रा.

## कोणाचें अडलें आहे?

[ लेखक—बाळकृष्ण दाजी प्रभू. ]

सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म ॥
सत्यापाशीं पुरुषोत्तम सर्वकाळ तिष्ठत ॥ १ ॥
'मुक्तेश्वर.'

ही प्रश्नात्मक मनोवृत्तीची अडी कोणाच्या परिचयाची नाहीं असें नाहीं. जेव्हां जेव्हां म्हणून आमच्या ज्ञातींतील पोटभेदांनीं एकमेकांशीं समत्वानें, स्नेहानें, बंधुप्रेमानें वागण्याची वेळ आली, आपापसांत पडलेल्या मिथ्या भेदभावाचा त्याग करून ऐक्यभाव जागृत करण्याविषयींच्या संवेदना पाश्चिमात्य संस्कृती संसर्गानें अखिल ज्ञातिक्षेत्रांत मधून मधून उमटूं लागल्या, तेव्हां तेव्हां जो तो भेद 'कोणाचें अडलें आहे?' ही आत्मघातकी गर्विष्ठ अडीच धरून आपापल्या ठाईं स्वस्थ राहिला. पोन पाउलें कोणी पुढें सरावें? बंधुत्वाचा मिठा आपण होऊन कोणी घालावा? तसा उपक्रम आपण प्रथम आरंभिल्यास 'आमचेंच अडलें आहे' असा सर्वत्र ध्वनि उमटून आपला मानखंडणा होईल. असा बालिश अभिमान अडी धरून बसलेल्या प्रत्येकाच्या मनोवृत्तींत भिनून गेलेला होता. अशा स्वरूपाची, सहसा सुटत नसलेली व बहुशः सर्वांच्या परिचयांतली अशी ही अडी आहे.

### परिषदेचा आघात.

परंतु या अडीवर मनोवृत्तीवर जोराचा प्रहार करून तिला एकसमयावच्छेदेंकरून निर्जीव करून सोडण्याचें श्रेय जर कोणीं संपादिलें असेल तर तें 'संयुक्त' परिषदेनेंच होय. बोकाळलेला दुरभिमान तिनें छिन्नविच्छिन्न करून 'कोणाचें अडलें आहे' तें सर्वांना स्पष्टपणें दाखवून दिलें. तिच्या अद्वितीय तेजानें प्रत्येक भेदाची दृष्टि निवळली जाऊन आपापल्या अंतरंगांतील दोष त्यांना दिसूं लागले. व त्या सर्वांनीं मिळून, एकीकरण वांचून आपल्याला तरणोपाय नाहीं अशी एकमुखानें कबुली दिली.

एवढें जिनें केलें त्या परिषदेला क्षुद्र लेखून तिला विरोध करण्याच्या ध्येयानें जे अलीकडे कांहीं व्यक्तिसंघ निर्मित झाले त्यांच्या अंतःकरणांत 'परिषद एवढी कोण?' हा प्रश्न आज घुमत आहे. त्यांनीं बुद्धिपुरःसर विचार करण्याचा जर कांहीं प्रयत्न केला असता तर, 'जिनें, ज्ञातीच्या शरीराला विळखे घालून बसलेल्या वैरभावाचा विध्वंस करून दुभंगले गेलेले अवयव एकजीव केले, तिचें दूषित झालेलें आत्मतेज विशुद्ध करून तें प्रेमप्रवाही व सुप्रकाशित केलें, तिचें निःसत्व व क्षीण झालेलें शक्तिसामर्थ्य उज्ज्वल व वृद्धिंगत केलें ती ही महान् संघात्म्यांतून निर्मित झालेली परिषद होय' हें त्यांना कळून आलें

असतें. परिषदेचा संभव विशिष्ट तत्त्वासाठीं झाला. तें तत्त्व ' एकीकरण ' हें होय. या तत्त्वांत तिनें प्रथमतःच प्रत्येक पोटभेदाचा शिरोभाग गोविला. शारीरिक अवयवांमध्यें शिरोभागालाच प्राधान्य दिलें जातें. सामाजिक शरीराचीहि गोष्ट अशीच आहे. व्यक्ति याच समाज शरीराचे अवयव होत व त्यांमध्यें प्रबुद्ध अशा ज्या व्यक्ति त्या समाजाचा शिरोभाग होय. कोणतीहि गोष्ट, कोणतेंहि तत्व शिरोभागाला मानवलें कीं तें इतर अवयवांनीं अविरोधपणें पत्करलें पाहिजे; त्यांतच त्यांचें हित असतें. कारण हिताहिताचें मर्मस्थान गांठण्याचें सामर्थ्य त्यांच्यापेक्षां शिरोभागींच प्रशांतपणें खेळत असतें. शिरोभाग म्हणजे काहीं एकच इंद्रिय अथवा एकच अवयव नव्हे; पंच ज्ञानेंद्रियांना शिरोभाग म्हणतां येईल, किंवा मन, बुद्धि व अंतःकरण मिळून शिरोभाग होऊं शकेल. एतदर्थ शिरोभाग म्हटला कीं त्यांत एकापेक्षां अधिक अवयवांचा किंवा इंद्रियांचा भाव आहे एवढें निश्चित. म्हणून एखादें तत्व शिरोभागाला जेव्हां मानवतें तेव्हां तें या शिरोभागांतर्गत प्रत्येक अवयवाला किंवा इंद्रियाला सदैव सर्वतः सुसंमत असतेंच असें कांहीं प्रमाण नाहीं. किंवा उलटपक्षीं शिरोभागाला तें मानवत नाहीं त्या वेळीं तें त्याच्या सर्वच अवयवांना किंवा इंद्रियांना असंमत असतें असेंहि नाहीं. एखादें दुसरें इंद्रिय या बाजूला किंवा त्या बाजूला विरुद्ध भावाचा आश्रय करून असणें संभवनीय असतें. अशा वेळीं तें विवक्षित तत्व शिरोभागाला संमत किंवा असंमत आहे याचा निर्णय लावितांना त्या ( शिरोभागाच्या ) स्थानीं असणाऱ्या प्रधान इंद्रियांच्या मतानुसार लावणें प्राप्त आहे. हीच प्रमाणपद्धति समाजालाहि यथान्याय लागू पडते. एकाद्या विवक्षित तत्वावर समाजांतील सर्वच प्रबुद्ध व्यक्तींचें ऐकमत्य होईल असा कांहीं नियम नाहीं. तेव्हां ज्या बाजूला प्रबुद्ध व्यक्तींचें मताधिक्य त्याच बाजूला समाजाचा शिरोभाग आहे असेंच मानावें लागतें. या दृष्टीनें विचार केल्यास व परिषदेचा अधिवेशनपरिघ सांगोपांग लक्षांत आणिल्यास, तिच्या तत्त्वाविरुद्ध काहीं बुद्धिमान् व्यक्तिही प्रारंभापासून असल्या तथापि ज्ञातिसमाजाचा शिरोभाग तिच्यांत समाविष्ट झाला याविषयीं संदेह रहात नाहीं.

## समाजानें परिषदेचें तत्व ग्रहण केलें.

ज्ञातिसमाजाचा शिरोभाग परिषदेंत समाविष्ट झाला, हेंच अधिक विशद करून सांगावयाचें म्हणजे ज्ञातिसमाजानें परिषदेचें तत्व ग्रहण केलें. सूक्ष्म विचार केल्यास परिषदेचा संभव हें ज्ञातिसमाजाच्याच पुण्याईचें दृश्यफल होय. अथात् त्या फळाचा त्यानें स्वीकार करावा हेंच न्याय्य होय. परंतु दृश्याला मूर्तस्वरूपाप्रत आणणारा जो अदृश्य कार्यकारणभाव त्याचें ज्ञानदृष्टीनें संशोधन करण्याचे परिश्रम घेण्याइतकी बहुतेकांची तयारी नसल्यामुळें हा न्याय स्वीकारण्यास ते खुषी नसतात. म्हणून तो त्यांना स्वीकारावयास लाविण्याकरितां विशिष्ट प्रयत्नांनींच त्यांचीं मनें आकर्षित करावीं लागतात. परिषदेनें असेहि प्रयत्न करून अखिल ज्ञातीकडून आपल्या ' एकीकरण ' तत्वाचा पुरस्कार करून घेतला. तिला जें काय प्रधान कार्य करावयाचें होतें तें एवढेंच, व तें तिनें सिद्धीला नेलें. पुण्याईनें फळ लाभलें तरी त्याचा उपभोग घेण्याला ज्याची त्याची विशिष्ट तयारी असावी लागते. तें तोंडात पडेपर्यंत असंख्य कल्पना येतील व एखाद्या कल्पनेबरोबर त्याचा विध्वंस होण्याची पाळी येईल, किंवा कुत्र्याला चारलें जाण्याचा समय येईल. अशा वेळीं लाभेच्छूची नीतिमत्ता जर शुद्ध असेल तरच कुकल्पना निरस्त होऊन तें त्याच्या घशाखालीं उतरण्याला जड पडणार नाहीं. व ही जबाबदारी आपल्याकडे सांभाळण्याला पुण्याई केव्हांहि तयार नसते. तें जबाबदारीचें ओझें, तिला त्या व्यक्तीच्या नीतिमत्तेकडेच सोंपवावें लागतें याच विचारानें, परिषदेनें, आपलें ' एकीकरण ' तत्व सुरक्षितपणें ज्ञातिसमाजाच्या हवालीं करून तद्विषयक पुढील कर्तव्याचा बोजा त्याच्यावर सोंपवून,—ज्या यदृच्छेनें ती निर्मित झाली होती त्याच यदृच्छेनें,—स्वविश्रांतिस्थानीं प्रयाण केलें.

## तत्व पराङ्मुखतेला सुरुवात.

परिषदेची पाठ फिरली व एकदां निश्चेष्ट झालेल्या अढीचें कोठें कोठें पुनरुत्थान होऊं लागलें; मात्र, तींतील पूर्वीचा बालिश दुरभिमान नाहींसा होऊन त्याचें स्थान अनास्था व निष्काळजीपणा यांनीं पटकाविलें. या संधीचा फायदा घेऊन कांहीं स्वयंमन्य शहाण्या व्यक्ति परिषदेच्या ' तत्त्वापासून पराङ्मुख होण्याला सिद्ध झाल्या. व निरनिराळ्या रूपांनीं त्यांनीं आपले संघ स्थापन करण्यास सुरुवात केली. असें करण्याची बुद्धि त्यांना कां सुचावी, व प्रत्यक्ष संघ स्थापण्यापर्यंत त्यांची मजल कां जावी ? हा एक मह-

त्वाचा प्रश्न आहे. तरीपण प्रकृत स्थलीं तो विचाराबाहेर टाकणें हेंच इष्ट. एवढें खरें की अशा रीतीनें तत्वपराङ्मुख होण्यांत त्यांनीं आपलें स्वतःचें अहित करण्याचें व त्याबरोबर समाजहितावर विघात करण्याचें अश्रेय संपादिलें आहे.

### तत्वांतरानें होणारा अधःपात.

या विरोधी संघांतील बहुतेक प्रमुख व्यक्तींनीं प्रत्यक्षपणें व बाकीच्यांनीं अप्रत्यक्षपणें परिषदेच्या तत्वाचा अंगिकार केलेला होता. ( प्रत्यक्ष अंगिकार करणारे म्हणजे जे परिषदेच्या कार्यवाहक मालिकेंत होते असे, अप्रत्यक्ष अंगिकार करणारे म्हणजे समाजशिरोभागाच्या संबंधान्वयें त्यानें मान्य केलेल्या तत्वाशीं जे आपोआप संबद्ध झाले असे. )—असें असतां मागाहून त्यांनीं तद्विरुद्ध आचरण करणें हें दोषास्पद नव्हे असें कसें ह्मणता येईल ? हें 'तत्व' सामाजिक होतें, समाजानें तें ग्रहण केलेलें होतें; याहि गोष्टीचा त्यांनीं अवश्य विचार करावयास पाहिजे होता. सामाजिक तत्वाला न जुमानणें किंवा त्यापासून परावृत्त होणें म्हणजे समाजाविरुद्ध आचरण करणें होय. राष्ट्राच्या विरुद्ध आचरण करणें म्हणजे जसा राष्ट्रद्रोह, तद्वत समाजाविरुद्ध आचरण करणें हा समाजद्रोह होय. 'पुष्कळांचें पुष्कळ हित' जेणेंकरून साधेल अशीं तत्वें—नियम—निर्बंध समाजाला अवश्यमेव प्रस्थापित करावे लागतात व ते प्रत्येक व्यक्तीला सर्वतः बंधनकारक असतात. कालमानानें परिस्थित्यनुसार व जगाच्या उत्क्रान्त्यनुरूप प्रगति, उन्नति व अभ्युदय यांकडे लक्ष देऊन समाजाला प्रचलित नियमनिर्बंधांत फेरबदल करून नूतन तत्वेंही अंमलांत आणावीं लागतात. [ समाज म्हणजे त्यांतील बुद्धिमान् सुशिक्षित जनता अर्थात् समाजाचा शिरोभाग, हें विसरतां कामा नये. ] व तीहि सर्वतः पाळणें हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य होय; हेंच तिला श्रेयस्कर होय; ती ज्या घटकाचा अवयव त्या घटकाशीं साधर्म्य राखून, त्याशीं सर्वथा सत्यशील रहाणें हा तिचा धर्म होय. वैयक्तिक कारणास्तव अंगिकारलेलें तत्व व्यक्तीनें आपल्या इच्छानुरोधानें हवेंतसें लवचिक बनविलें तरी त्याबद्दल ता अधिकारी आहे. परंतु सामाजिक तत्व आपल्या वैय्यक्तिक धारणानुरूप वाटेल तेव्हां बहिष्कृत करून, तद्विरुद्ध तत्व प्रस्थापित करण्याचा अधिकार मात्र कोणाहि व्यक्तीला घेतां येणार नाहीं. असें असतांहि जेव्हां सामान्य व्यक्ति प्रबुद्ध जनसंमत सामाजिक तत्वाला बहिष्कृत करून स्वयंमन्य तत्व समाजावर लादण्याकरितां संघ स्थापण्याचा उपक्रम करतात तेव्हां तें त्यांचा अवनतीचें लक्षण समजलें पाहिजे. कारण अशा उपक्रमापासून समाजामध्यें घरभेदीपणाला अवसर मिळून क्रान्ति उपस्थित होते. कोणाला कोणी जुमानीनासें होऊन व्यक्तिस्वातंत्र्याला सीमा रहात नाहीं. प्रबुद्ध कोण, अप्रबुद्ध कोण हें जाणतां येईनासें होऊन जिकडे तिकडे खळबळ माजते. नाना पंथ, नाना तत्वें, नाना संघ या उपाधि समाजाच्या अंगाला विलगून त्याखालींच तो बेजार होऊन जातो. अभ्युदय, प्रगति व उन्नति यांकडे लक्ष देण्याला त्याला स्थैर्यच लाभेनासें होतें. अवयव धड नसल्यामुळें, मतभेदाच्या व्याधीनें ते दुभंगले गेल्यामुळें, समाजाचें आत्मिक बल क्षीण होऊन तो परिस्थितिवश होतो. तिच्या जसजशा लाटा उसळतील व जिकडे जिकडे त्या आंदोलन खात जातील तिकडे तिकडे त्यांच्याबरोबर वहात जाण्याला तो तयार असतो. एवढी ही अनिष्ट आपत्ति तत्वांतर करण्याची प्रवृत्ति व्यक्तिव्यक्तींमधून फैलावत गेल्यानें समाजाच्या बोकांडीं बसते. ही प्रवृत्तिपर उपाधी मनाला एकदां चिकटली कीं ती निरस्त होणें दुष्कर आहे. हिच्या प्राधान्यापुढें मनुष्याची बौद्धिक व आत्मिक शक्ति सुविकास पावूं शकत नाहीं. ह्या शक्ति सुविकसित, संवर्धित व उज्ज्वल होण्याला त्यांना परिपोषक असा सत्यशीलता हा एकच गुण आहे. व हा गुण तत्वांतराच्या उपाधीमुळें विचलित होऊन त्याच्या स्थानीं असत्याचा प्रकर्ष होऊं लागतो. शेवटीं तोच प्रकर्ष मनुष्याच्या अधःपाताला कारणीभूत होतो. मातापितरांच्या ठायीं तत्वनिष्ठा-अर्थात सत्यनिष्ठा असेल तरच त्यांच्या पोटीं जन्म घेणारी प्रजा कर्तव्यनिष्ठ-कर्मवीर निपजेल.

### विरोधमंडळांतील नक्षत्रें.

परिषदेच्या तत्वापासून पराङ्मुख झालेल्या या व्यक्तिसंघांमध्यें प्रमुखतः भिन्न भिन्न तीन वर्ग दिसून येतातः—

(१). **तत्व अग्राह्य मानणारा**—आधुनिक शिक्षण व संस्कृति यांचा कोणत्या नव अंगांनीं विकास होत आहे व तदनुरोधानें विद्यार्थीजनांवर काय काय संस्कार

होत आहेत; कालमान परिस्थिति बदलली जाऊन सामाजिक आचारविचार स्वाभाविकपणें कोणतें नवीन वळण घेऊं पहात आहे; राष्ट्राच्या प्रगतीचा रोख विशेषतः कोणत्या दिशेला आहे; या व अशाच इतर महत्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष करून आपल्या जुन्यापुराण्या मतांचें व्यर्थ स्तोम माजविणारा असा हा वर्ग आहे. व आपल्या दुराग्रही व हटवादी स्वभावाला अनुरूपच त्यानें हा मार्ग पत्करलेला आहे.

( २ ). **तत्वाचा उच्छेद करणारा**—याच्या अंगीं कोठें परार्थ गिळंकृत करणारा स्वार्थ, तर कोठें विघ्नसंतोष; कोठें दुटप्पी वर्तनखोर मानभावीपणा, तर कोठें दांभिक आढयता, अशीं लक्षणें दृष्टोत्पत्तीस येतात. या वर्गांतील कांहीं समुदायांना ‘ एकीकरण तत्व ” मान्य आहे. परंतु परिषदेनें जितकें त्याला विस्तृत स्वरूप दिलें तितकें तें त्यांना नको आहे; त्याच्या अर्ध्या हिश्श्याइतकें असेल तर तें त्यांना रुचणारें आहे. कित्येकांना तें विशिष्ट बाबीपुरतें—मर्यादित—असेल तरच हवें आहे. कांहींना जोंपर्यंत गतकालीन चुकांचें यथायोग्य परिमार्जन झालेलें नाहीं, किंवा त्यांबद्दल दोषास्पदजनांनीं अवश्य तो जाब दिला नाहीं तोंपर्यंत तें अंमलांत येऊं नये असें वाटत आहे. कांहींनीं त्यांना परिषदेनें एकीकरणांत गोंवितांना विशेष रीतीनें अलंकृत केलें नाहीं याच हट्टानें त्यावर बहिष्कार घातला आहे. कित्येकांना आपला परिषदेच्या अधिवेशनांत कांहीं बाबतींत उपहास झाल्यासारखें वाटून त्याचा मोबदला म्हणून त्यांनीं तिला अशा रीतीनें विरोध करण्याचें मनावर घेतलें. दुसऱ्यांची संस्कृति व त्यांचें विद्यावैभव पाहून कित्येकांना विषाद वाटल्यामुळें, त्यांनीं, एकीकडे त्या ‘ तत्वा ’चा अंगिकार केल्यासारखें दाखवून दुसरीकडे लपूनछपून तद्विरुद्ध कृति करण्याला प्रारंभ केला. अशा रीतीनें आपलीं वैय्यक्तिक कारणें, क्षुद्र भावना व मतभेद यांच्या परिपूर्तिस्तव ह्या भिन्न भिन्न विचाराच्या व्यक्ति आपमतलबानें सदहू एकाच वर्गांत प्रविष्ट होऊन, निरनिराळ्या प्रकारें आज बेकीकरणांचे अनेक स्तंभ उभारीत आहेत.

( ३ ). **तत्वातिक्रम** किंवा **तत्वान्तर करणारा**—याच्या ठायां अहंमन्यता व क्रान्तिप्रियता हे दोन गुण विशेषत्वें दिसून येतात. त्याचप्रमाणें अदूरदर्शित्व, परमतासहिष्णुता व सत्यद्रोह यांचाहि भाव कोठें कोठें आढळून येतो. जे एके वेळीं परिषदेच्या अधिवेशनप्रसंगीं अध्यक्षस्थानीं अधिष्ठित झालेले होते असे जबाबदार पुरुषहि या वर्गात समाविष्ट झाले आहेत, हें ध्यानीं घेतलें म्हणजे या दुसऱ्या विधानाविषयीं कोणालाहि शंकित होण्याचें कारण रहाणार नाहीं. या वर्गांतील कांहीं व्यक्ति, ज्यांनीं एकेवेळीं परिषदेच्या तत्वाचा प्रत्यक्षपणें स्वीकार केला अशाच असून, त्या मागाहून यांत समाविष्ट झालेल्या आहेत. परिषदेनें एकीकरण तत्व समाजाच्या हवालीं करून पाठ फिरविली तोंच या कांहीं व्यक्तींना कोणी विचारणारें नाहींसें होऊन चारहि दिशा मोकळ्या झाल्या. अल्पावधींत त्यांनीं परिषदेचें तत्व धुडकावून दिलें व स्वयंमन्य नूतन ‘ तत्व प्रस्थापित करून त्यांत समाज गोंविण्याचा त्यानें उपद्व्याप आरंभिला. हा वर्ग पहिल्या दोन्ही वर्गांपेक्षां धूर्त आहे यांत शंका नाहीं; व याची महत्वाकांक्षाहि दारुण आहे. परिषदेच्या आधीन झालेला सर्व ज्ञातिसमाज तर आपल्या ‘ तत्वाला ’ वश व्हावाच, एतत्सिद्ध्यर्थ त्यानें आपल्या कार्यात्मक प्रयत्नांत कित्येक अति मोहक-मधुर-गोड अशा अप्रतिम उपकरणांची योजना केलेली आहे. परंतु ही त्याची धडपड आणि हा त्याचा उपद्व्याप व्यर्थ आहे असें त्याच्या फळास आल्यावांचून रहाणार नाहीं. तत्वनिष्ठा म्हणजे प्रगमनशीलतची चेष्टा हें ज्यांचें शील होऊन बसलें त्यांच्याकडून शब्दात्मक सरपटण्याच्या क्रियेहून, अथवा, जनतेचा तात्पुरता घोळका आपल्या भोंवतीं गोळा करण्याच्या कृतीहून महत् कार्यनिष्पत्ति होणें शक्य नाहीं. परिषदेचें ‘ तत्व ’ ग्रहण करूनहि तद्विहित कर्तव्यांगणांत ज्यानें कच खाल्ली, ‘ तत्वाशा ’ ज्यानें द्रोह केला, सत्यापासून जो चळला, तो कोठेंहि गेला तरी अखेरपर्यंत तसाच रहाणार. सत्कार्ययशःसिद्धि सत्यशीलतेंत आहे. अर्थात् ती सदैव अभंग राहिली पाहिजे. सत्यभ्रष्टतेचें वारें एकदां अंगीं संचरल्यास तें पुनः पुनः शेंकडों प्रसंगीं कोणकोणत्या ठिकाणीं अडवील, त्याचा नेम नाहीं. अशा वाऱ्याखालीं आज पन्नासपन्नास साठसाठ वर्षें, स्वयंमन्य तत्वांचा घोष करणाऱ्या व्यक्तिंच्या संस्था, यत्किंचितहि उन्नति न होतां कशा हेलकावे खात राहिल्या आहेत, हें केवळ महाराष्ट्रापुरती जरी चौफेर नजर फिरविली तरी दिसून येईल.

### प्रश्न असा सुटतो.

याप्रमाणें गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीचा कांहीं भाग आज विरोधी मंडळाच्या कक्षेंत गेला असून तें अधिकाधिक ग्रस्त करण्याकडे त्या मंडळाचा रोख आहे अशा वेळीं ज्ञातिसमाज काय करतो कसें आचरण ठेवितो—कोणत्या कार्याला उद्युक्त होतो, हाच आज जनतेपुढें अति महत्वाचा प्रश्न आहे. संचित कर्मांच्या दोषजन्यग्रहणापासून या आपल्या ज्ञातीची सुटका होऊन, पुण्योदयात्मक व अभ्युदयपर नवजीवनांत तिचा संचार झालेला जनतेनें पाहिला. परंतु आतां असा समय सन्निध येऊन ठेपला आहे कीं जेथून पुण्योदय झालेला दिसला त्याच क्षितिजावर अनिष्ट ढगांचें जाळें प्रसरित होत असल्याचीं चिन्हें दृग्गोचर होत असून, त्या जीवनापासून ज्ञातीचें पतन होऊन ती अन्य नव जीवनांत प्रविष्ट होते किंवा कसें, अशी शंका मधून मधून उपस्थित होऊं लागली आहे. आणि अशा समयीं ' कोणाचें अडलें आहे ?' ही अढी जर का समाजावर आपला शह बसवूं लागेल, तर विरोधी संघांचें अंतिम ध्येय जरी सिद्धीला गेलें नाहीं तरी, समाजाच्या कपाळीं झळकत असलेलें ' तत्त्वसौभाग्य' पुसलें जाऊन तो आपल्याप्रमाणें तत्त्वहीन व्हावा ही जी त्याची मनीषा आहे ती मात्र परिपूर्ण होण्याला कसलांहि आडकाठी रहाणार नाहीं; व तसें झालें तर मग त्याच्या कपाळीं सत्यभ्रष्टतेच्या काजळाचा टिळा लाविण्याला इतिहास मागें पुढें पहाणार नाहीं, अशीहि भाति कोठें कोठें उद्भवूं लागली आहे ग्रहण केलेल्या तत्वानुरूप कर्तव्याला जागणें यानेंच समाजाचें शील राहील.—व्यक्ति काय, किंवा समाज काय, आपल्या संचित, प्रारब्धादि कर्मांतील विशिष्ट दोषात्मक भोग्य भोगून झाल्यानंतर पुण्यपथ क्रमीत असतां अल्पाक्रमणांत अशा ठिकाणीं येऊन पोहोंचतो कीं जेथून दोन भिन्न भिन्न मार्ग श्रेय व प्रय अशा भिन्न भिन्न दिशेकडे वळतात. ही वेळा अत्यंत कसोटीची असते. व्यक्तीच्या एकंदर आयुःक्रमगाची, समाजाच्या एकंदर प्रगमनशील जीवनक्रमाची निश्चित दिशा या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका दिशेंत असते. अशा कसोटीच्या वेळीं कोणत्या दिशेकडे जाणाऱ्या मार्गाचा अवलंब करावा या विचारांत शहाणे, बुद्धिमान् व थोर विद्वान् देखील घुटमळल्या खेरीज रहात नाहींत. कारण पुढच्यामध्यें हे दोन मार्ग अशा रीतीनें येऊन पडलेले असतात कीं एकदां एकाचा अवलंब केला कीं मग दुसऱ्याचें दर्शनहि व्हायचें नाहीं, मग केवढीहि धडपड केली तरीफेर बदल करण्याची संधि कोठली मिळायाला ? इतके ते परस्परापासून विरुद्ध दिशेकडे वळलेले असतात. पुन्हा जेव्हां कधीं संचितकर्मगोल आक्रमून पुरा होईल व तसाच पुण्यात्मक सुदिन उगवेल तेव्हां कोठें जेथें हे दोन मार्ग एकत्र येऊन मिळतात अशा स्थळाची गांठ पडेल. एतदर्थ व्यक्तीच्या आयुःक्रमामध्यें किंवा समाजाच्या विशिष्ट प्रकारच्या जीवनक्रमामध्यें अशी संधि एकदांच लाभत असते असें म्हटलें तरी चालेल, कोणीहि प्रेयाचाच मोठ्या तत्परतेनें स्वीकार करावा हें स्वाभाविक आहे. परंतु श्रेयाचा जो स्वीकार करील तोच नीतिमान्—तोच शहाणा—तोच प्रबुद्ध—तोच प्रगमनशील होय. वैर, मत्सर, वैमनस्य, भेदभाव व असंस्कृति इत्याद्यनेक दुश्चरितांच्या द्वारें संचित झालेलें भोग्य भोगून, **पुण्यात्मक असा परिवर्त्तनपथ** आक्रमात असतां, गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातिसमाज **प्रेय व श्रेय** ज्यें विभागित होतात अशा स्थळीं आतां येऊन पोहोंचला आहे. प्रेयाला श्रेय समजून त्याचा तो स्वीकार करतो, किंवा श्रेयालाच प्रेय मानून त्याचा तो आश्रय करतो हें आतां पहावयाचें आहे. ही त्याच्या कसोटीची वेळ आहे. प्रेयाचा मार्ग त्याच्या दृष्टींत भरावा म्हणून कांहीं नक्षत्रें उदयाला येऊन आपापल्या शक्त्यनुसार प्रकाश पाडीत आहेत. व तिकडेच समाज वळतो किंवा कसें असा संशय बऱ्याच ठिकाणीं डोकावूं लागला आहे. पण हा, संशय, शंका, तर्कवितर्क, कल्पना, भीति वगैरेनीं माजविलेला पसारा निरर्थक आहे. समाजाला सत्यशीलतेचें महत्त्व अवगत आहे. या नक्षत्रांनीं आपल्याकडून आणखी कितीहि रंगीबेरंगी किरणांचा प्रकाश पाडला तरी समाजाची दृष्टि श्रेयाकडेच वळल्यावांचून रहाणार नाहीं समाजाच्या आत्मिक शक्तींत सोज्ज्वल नैतिक तेज वावरत आहे. त्यावर सत्यभ्रष्टतेचा काळिमा चढणें कालत्रयीं शक्य नाहीं समाजाला आपल्या कक्षेंत चाललेल्या चळवळी कळत नाहींत असें नाहीं. पण त्याविषयीं इतक्यांतच चिंतातुर होण्याचें कांहींहि कारण त्याला दिसत नाहीं. म्हणून तो गंभीर दृष्टीनें सर्व गोष्टींचें निरीक्षण करीत राहिला आहे. आणि त्याच्या या गंभीर-

तेंतच त्याचें जें उज्ज्वल आत्मिक तेज आहे त्याचें अप्रतिम लावण्य स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेलें आहे. जगाच्या व्यवहाराचा सांसर्गिक संस्कार एकमेकांवर व्हायाला चुकत नाहीं; सज्जनांचा संसर्ग उपकारक तर दुर्जनांचा संसर्ग अपकारक हा व्हायचाच, हें समाज जाणत आहे. बोल्शेविझमूच्या विचाराची लाट एकट्या रशियालाच व्यापून न बसतां, निरनिराळ्या रूपांनीं ती सर्व जगभर प्रसारित झाल्यावांचून राहिली नाहीं; जेथें जेथें चळवळ्या वृत्तीचीं, अहंमन्यतेला लाडावलेलीं व क्षीणमनःप्रकृतीचीं माणसें अथवा त्यांच्या संघात्मक संस्था वास करत होत्या त्यांना, कोठें शैक्षणिक तर कोठें नैतिक, कोठें राजकीय तर कोठें राष्ट्रीय, कोठें धार्मिक तर कोठें सामाजिक वगैरे बाबतींत त्या लाटेचा उपसर्ग बाधलाच; आणि समाजाच्या अंगणांत तरी 'विरोधी' मंडळानें जो उपद्व्याप मांडला तोहि असाच. उपसर्गान्वित होता हें जाणूनच समाज त्याकडे गंभीरपणानें पहात राहिला. गंभीरवृत्ति ही सदैव सत्यशीलतेचीच एक छटा असते. अजूनपर्यंतच्या इतिहासांत समाज सर्वतः सत्यनिष्ठ राहिलेला आहे. अर्थात अशा नीतिमग्न समाजाच्या प्रशांत कर्तव्यनिष्ठेपुढें, 'कोणाचें, अडलें आहे?' ही क्वचित् भागीं उसळूं पहाणारी मनोवृत्तीची लहर व 'विरोधा' मंडळाच्या अव्यापारेषु व्यापाराची उचंबळणारी लाट, बुद्बुदवत् निमाल्या जातील, अशी खात्री वाळगण्याला आज मुबलक जागा आहे.

### विज्ञप्ति.

जें दिसतें तें असें आहे, व तें येथें आपल्य सुज्ञ बंधूंपुढें अत्यंत स्वच्छपणें ठेवितांना प्रस्तुत लेखकाला आपल्या विनम्र भावाचा क्षणभर अव्हेर करावा लागला हेंहि खरें आहे. परंतु ही वेळच अशी होती कीं लेखणीला मान देणें हेंच अधिक इष्ट होतें. हें लक्ष्यांत घेऊन सुज्ञांनीं निर्विकार बुद्धीनें या लेखाचा विचार करावा.

---

## कुडाळदेशकर.

लेखांक ५.

( लेखक- कै. महादेव आत्माराम राजाध्यक्ष. )

गेल्या लेखांत कुडाळदेशकरांचें राज्य कधींकाळीं कोंकणांत होतें किंवा काय या मुद्याचा विचार केला. प्राचीन इतिहासविषयक उपलब्ध साधनांवरून दिसून आलें कीं रा. पाळेकरांचीं स्वज्ञातीय राजसत्तेविषयींचीं विधानें ऐतिहासिक दृष्ट्या चुकीचीं आहेत. या लेखांत देसाई हे कोण होते, शेणव्यांच्या कृतघ्नतेमुळें त्यांची सत्ता नष्ट झाली किंवा कस वगैरे प्रश्नांचा विचार केला आहे.

### देसाई किंवा देसाय

हा शब्द तालुक्यानिहाय, खेड्यानिहाय वगैरे शब्दांप्रमाणें देशानिहाय या अर्थी वापरण्यांत येतो. देशानिहाय याचें जें संक्षिप्त रूप देहाय त्याचेंच दुसरें रूप देसाय हा शब्द होय. गांवचें उत्पन्न जमा करून तें सरकारांत भरणारे जे अधिकारी तेच देसाई होत. सध्यां ज्यांस आपण कलेक्टर या संज्ञेनें ओळखतों ते हल्लींचे देसाई आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. देसाईगिरीच्या नोकरीबद्दल देसायांस साधारणपणें त्यांच्या अधिकारक्षेत्रांतील उत्पन्नांत धान्यावर शेकडा ३ टक्के व रोख नाण्याच्या वसुलावर ७ टक्के असें उत्पन्न मिळे. मुसलमानी अमलांत कित्येक ग्राम मिळून एक तर्फ, कित्येक तर्फांचा एक महाल, कित्येक महालांचा एक परगणा, कित्येक परगण्यांचा एक सरकार, कित्येक सरकार मिळून एक सुभा व कांहीं सुभे मिळून एक राज्य अशी व्यवस्था होती. देसायांच्या वरचे सरदे-

साई.यांच्या ताब्यांत एक किंवा अधिक महाल असत. म्हणजे देसाई किंवा सरदेसाई यांचा राज्यकारभारांतील दर्जा राजा, वजीर, सुभेदार, नबाब यांच्या खालच्या पायरीवर असल्यामुळें यांस राजेपणाचा कोणताच अधिकार पोहोंचत नव्हता. मुसलमानी अमलांत कुडाळदेशकर देसाई होते त्यांस त्यांच्या कर्तबगारीबद्दल राजा, रावरंभा, चंद्रराव, बहाद्दर अशी एकादी किताबतही मिळाल्याचें इतिहासावरून दिसून येत नाहीं.

## सरदेसाईचे हक्क

म्हणजे राजेपणाचे हक्क नव्हेत यास अनेक उदाहरणें देतां येतील. इ. स. १७६४ सालीं थोरल्या माधवराव पेशव्यांनीं एक सनद वेंकटराव वैद्य यांस परगणे हरीहरचे सरदेसाईपणाचे वतनाबद्दल दिली आहे. ही सनद येणेंप्रमाणें आहेः—

"तुम्ही एकनिष्ठपणें कष्ट मेहनत करून स्वामिसेवा उत्तम प्रकारें केली. कुटुंब वत्सल आहां. यास्तव तुमचें चालवणें जरूर जाणोन तुम्हांवरी कृपाळू होऊन परगणे मजकूरचें सरदेसाईपणाचें वतन मुसलमानांचें हातें त्याचें नक्कल जाहलेपासून वतन सरकारांत जप्त होतें तें हल्लीं तुम्हांस करार करून दिलें असे वतन संबंधानें हक्क वगैरे—सुदामतप्रमाणें कलमें. १ गांव गन्ना होन नाणें तीनशें. १ सायेरावरी दर गोणीस रुके ८३ तीन. १ गांव गन्ना सव्वादहा होनांची जमीन. १ बाजाराचे दिवशीं दुकानास फसकी. १ परीटा जवळची पडद. १ घर ठाणें.

पेशजीं वतनी गांव परगणे मजकूर पैकीं होते ते गांव १ मौजे ककर गोल १ मौजे डोंगर हळी १ मौजे वडर हळी १ मौजे पानान हळी. चार गांव पेशजी होते ते सरकारांत ठेवून त्यांचे मुबदला मौजे केंचन हळी परगणे मजकूर हा गांव करार.

सहा कलमें पेशजीप्रमाणें करार तैयील तनखा होन नाणें २० सर देसाईपणाचें वतन तुम्हांस करार करून दिल्हें सबब वतन संबंधीं तुम्हांकडे नजर रुपये ४००१ करार केले असत " वगैरे.

वरील सनदेवरून सर देसाईपणाची सनद कोणत्या प्रकारची असे व तिच्यामुळें सरदेसाई हा सार्वभौम प्रभु किंवा भूपाळ कसा होऊं शकत नाहीं हें रा. परूळेकरांच्या ध्यानीं येईल. कुडाळच्या देशमुखीविषयीं शोध करतां असें दिसतें कीं जोगण प्रभू जीवंत असतां कुडाळची देशमुखी जोगण प्रभू व नारायण प्रभू यांजकडे होती. त्यांनीं त्या देशमुखीचे तीन विभाग करून दोन स्वतःसाठीं ठेविले व तिसरा भाग कान्होजी आंग्रे यांस ५००१ बादशाही होनांस विकला. या देशमुखीच्या भागाच्या विक्रीच्या खतांत "वृत्तीचे इनाम गांव, हक्क, पट्टी व वोंबळ तैनाती व मनसी व बागसेन व धरठावा व सेवा फसकी व पानमाण व बाजे लाजिमा माल व जकाती व बाजेबाबी देखील पान तिठाई विभाग करून दिल्याचें दाखल आहे. वरील राजीनाम्यांत " **परगणे मजकूरची देशमुखी आपली व जोगणप्रभू बिन नारायणप्रभूची पुरातन पिढी दरपिढी दुरोबस्त चालत आली आहे** " असा त्यांचा लेख आहे. यावरून उघड होतें कीं कुडाळदेशकर प्रभू देसायांच्या सर देशमुखीचें मोल, किंवा रा. परूळेकरांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, भूपाळप्रभु राजे देसायांच्या राज्याची किंमत, एक तृतीयांशास ५००१ या हिशेबानें, १५००३ बादशाही होन भरते ! ( होन म्हणजे ३॥ रुपये ) परंतु इतिहासज्ञ रा. परूळेकरांनीं य प्रभूंच्या घराण्यांत पिढी दरपिढी चालत आलेल्या या लक्षांनशा वतनाचें व तें भोगणारांचें वैभव पुढील शब्दांत वर्णिलें आहे

"वरील कालच्या कुडाळ देशाच्या ऐश्वर्या विषयीं थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अर्वाचीन काळीं पेशवाईंत पुणें येथें जें ऐश्वर्य दिसून येई तितकेंच या प्राचीन ब्राह्मणी राज्याचें ऐश्वर्य कुडाळांत दिसत होतें. असें सांगतात ( ! ) कीं यांच्या राजवाड्याच्या आसपास सुमारें ५०० कुडाळदेशकरांचीं घरें होतीं. तात्पर्य या ज्ञातीच्याच नव्हे तर सबंध पंचमहाल कुडाळाच्या मौलिस्थानीं कुडाळदेशकरांचीं राजसत्ता, धार्मिकसत्ता व देवस्थान व्यवस्था असे तीन हिरे झळकूं लागले. ही स्थिति इ स. १९ व्या शतकाच्या तृतीय पादापर्यंत चालू होती."

याचप्रमाणें कुडाळदेशकरांच्या कलम व तरवार बहाद्दरीचेंही रा. परूळेकरानीं मनसोक्त वर्णन करून आप-

[illegible] टाकलें आहे. इतिहासावरून इतकेंच दिसतें कीं विजयानगरच्या राज्यांत किंवा मुसलमानां अमलांत कुडळ परगण्यावर एका कुडाळदेशकर घराण्याची देसगत असावी. १६ व्या शतकाच्या तृतीय पादापर्यंत लेखणी व तरवार जर कुडाळदेशकरांच्या हातीं होती तर बांदें येथें इ. स. १५१० त मुसलमान प्रबळ होते त्यांस पोर्तुगीझांनीं कुडाळच्या बाजूस पळवून लाविलें तें कां? विजापुराहून मलिक आय हा कुडाळ व बांदें या बाजूस आला तो कां? कुडाळदेशकर स्वतंत्र राजे असते तर त्यांच्या बरोबर पोर्तुगीझांच्या लढाया किंवा तह झाले असते. कुडाळदेशकर लढवय्यांच्या मदतीस मुसलमान धावून आले असें मानवें तर कुडाळदेशकरांच्या समशेरीची प्रौढी ती कसली? परंतु वस्तुस्थिति भिन्न होती. दाभोळपासून उत्तर कानडा जिल्ह्यांतील सोंदेकरांच्या मुलुखापर्यंतचा सर्व प्रदेश १५६५ पर्यंत विजापुराच्या सुलतानाच्या ताब्यांत होता. तालीकोटच्या लढाईमुळें विजयानगरचें राज्य नष्ट झालें, तेव्हां बेदनूर सोंदें वगैरे ठिकाणचे सत्ताधारी विजापूरचे मांडलिक बनले. म्हणजे फोंडा, कुडाळ, दाभोळ वगैरे सर्व प्रदेश विजापूर सुलतानाच्या अमलाखालीं होता. त्याचा एक प्रतिनिधि मिरज येथें व दुसरा दाभोळ येथें राहत असे. सन १५०५ सालच्या सुमारास ज्या अदिलशाही सरदारांसमवेत पोर्तुगीझांच्या चकमकी झडल्या त्यांत कुडाळदेशकरांच्या समशेरीनें कोणताही पराक्रम केलेला आढळून येत नाहीं परंतु भोंसल्याच्या तरवारीचें पाणी चांगलेंच दिसून आल्यामुळें त्यास मात्र अदिलशहानें सावंत बहाद्दर हा किताब दिल्याचा इतिहासांत दाखला आहे. इ. स. १५०० पासून १६७५ सालापर्यंत अर्थात रा. परुळकरांच्या मतें कुडाळदेशकरशाही वैभवसंपन्न होती त्या मुदतींत ज्या लढाया व तहनामे झाले त्यांत एकाही कुडाळदेशकर वीर पुरुषाचें नांव राजे, सरदार, मुत्सद्दी किंवा वकील या नात्यानें कां बरें झळकूं नये? ज्यांचा पेशाच लेखनांचा व युद्धकलेचा त्या कुडाळदेशकर नरपुंगवांचीं ५०० घरें एका कुडाळांत असतां खऱ्या लेखणीचें म्हणजे चिटणिसीचें काम शेणव्यांकडे व तलवारीचें म्हणजे सेनारक्षाचें काम हळवी या मराठ्या घराण्याकडे वंशपरंपरेनें सोपविण्यास कुडाळच्या सरदेसायांस काय बरें कारण झालें असावें? मराठ्या सेनानीच्या हाताखालीं कुडाळदेशकर तरवार गाजवीत असत काय? 'बामण करतील तें प्रमाण व बांधतील तें धोरण' याचें हें उदाहरण काय? कुडाळदेशकर सरदेसाई हे जर राजे होते तर कुडाळच्या नजीक २० मैलांच्या आंत बांद्यास अदिलशहाचा मुसलमान अधिकारी कशासाठीं राहत होता? या बांद्याला अदिलबाद हें नांव कां प्राप्त झालें? कुडाळदेशकरांच्या सत्तेखालील पेडणें महालांतील एका गांवास त्यांच्या वैभवकालांत इब्रामपूर असें नांव कां बरें प्राप्त झालें? देसाई घराण्यांतील कोणाही पुरुषाचें इब्राम असें नांव असण्याचा संभव नाहीं. युसफ अदिलशहानंतर जो विजापूरचा इब्राहीम अदिलशहा गादीवर आला त्याच्याच नांवानें हा गांव अलंकृत झाला असावा. इ. स. १५१४ त बांदें हें व्यापाराचें मोठें ठिकाण होतें. तेथें मुसलमानांची सत्ता होती. १५४० त बांद्याच्या व्यापारास मोठा धक्का बसला. पोर्तुगीझांनीं विजयानगरकरांबरोबर तह करून बांद्याच्या एवजीं कानडा जिल्ह्यांतील अंकोला व होनावर हीं बंदरें कांहीं शर्तीवर आपल्या व्यापारास खुलीं करून घेतलीं. या सर्व धामधुमींत कुडाळच्या सरदेसायांचा इतिहासांत कोठें नामनिर्देशदेखील नाहीं. कुडाळ प्रांतात एक हजार वर्षांवर कुडाळदेशकरांचें राज्य होतें असें सांगणाऱ्या रा. परुळेकरांनीं त्यांस कोणतीं राजचिन्हें होतीं हें आम्हांस कळवावें. त्यांस राजचिन्हें असतीं तर स्वभाविकपणें तीं भोसले सरदेसायांस त्यांच्या मागून अनायासें प्राप्त झालीं असतीं. मग १७८३।४ सालीं दिल्लीच्या बादशहाकडून मोर्चेलें व राजे बहाद्दर हा किताब मिळवून भोसल्यांस राजेपणा प्राप्त करून देण्याचें शिंद्यांस किंवा शिंद्यांच्या कारभाऱ्यांस प्रयोजनही न उरतें. रा. परुळेकर यांस

## देवराईतील एक पाषाण


दृष्टीस पडतांच त्यांच्या कल्पनातरंगांच्या लहरी उसळल्या. त्यांच्या मतें हा पाषाण कुडाळदेशकरांची राजसत्ता दर्शविणारा आहे तें सांगतात:—

> "जैन धर्म मोडून व कुडाळ प्रांतींच्या देवळांत ब्राह्मणी धर्माच्या मूर्तींची स्थापना करून ज्यांनीं धर्मक्रांति घडवून आणिली त्याच प्रतापी



श्रीयुत वसंतराव आनंदराव दाभोळकर, जे. पी.

मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशन्‌चे अध्यक्ष.



नामदार बाळकृष्ण सीताराम कामत, बी. ए.

व भाग्यशाली देसायानें स्थापिलेले राजसत्तेच्या स्थलाकडील हे पाषाण आहेत. मात्र येथें असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं हा कुडाळदेशकरांचा राजसत्तेचा पाषाण उपटून कोणी टाकला ? या प्रश्नाचें उत्तर देणें आम्हांस योग्य वाटत नाहीं. ज्या कोणास या प्रश्नाचें उत्तर हवेंच असेल त्यानें कोणाही कुडाळदेशकरास विचारल्यास तो तें सहज देऊं शकेल.'

रा. परूळेकरांच्या मतें सांवतांच्या राज्या पूर्वी राजसत्तेचे अधिकारी कुडाळदेशकर होते. अर्थात देवराईतील पाषाण ज्यांवर ( पालखी, त्या पालखींत एक राज पुरुष बसलेला, पालखीचे भोई व मागें पुढें शिपाई, त्याच्या खालील ओळीवर घोडेस्वार हातांत ढाल तलवार घेतलेले, त्याच्या खालच्या ओळीवर ढाल तलवार हातीं घेतलेलें पायदळ वगैरे राजचिन्हें ) दृग्गोचर होत आहेत ते कुडाळदेशकर प्रभुदेसायांच्या सत्तेचे द्योतक आहेत. सावंत भोंसल्यानीं किंवा कुडाळदेशकरद्रोही शेणव्यांनीं ते देवळांतून उपटून टाकिले असले पाहिजेत असाच ध्वनि रा. परूळेकरांच्या प्रश्नोत्तरांतून निघतो. इतिहासकार ह्मणून पुढें येणारांनीं अशा प्रकारच्या निंद्य कल्पनांच्या जाळ्यांत स्वतःस गुंतवून घेणें इष्ट नाहीं.

इतिहास असें सांगत आहे कीं कुडाळ हें चालुक्य वंशीय एका शाखेचें मुख्य ठिकाण ( किंवा राजधानीचें) शहर होतें. १२ व्या शतकांत एका मराठा पाळेगाराचें तें स्थान झालें आणि इ.स. १५०० त मुसलमानांच्या हातांत जाईपर्यंत तेथें मराठ्यांची राज सत्ता होती. हें जव्हींस या इतिहासकाराचें मत जमेस धरल्यास असेंच कबूल करावें लागेल कीं देसायांकडे कुडाळची राजसत्ता नव्हती. मग राजसत्तेचे पाषाण कोठून येणार ?

रा. परूळेकरानीं आपल्या ज्ञातिबंधूस प्रश्न विचारून त्यांच्या उत्तरावरच समाधान न पावतां प्राचीन इतिहासाचें परिशीलन केलें असतें तर त्यांस कळून आलें असतें कीं जुन्याकाळीं धारातीर्थी जे देह ठेवीत त्यांचीं स्मारकें अशाच प्रकारच्या पाषाणांच्या रूपानें करून ते पाषाण देवालयांत ठेवीत व कांहीं प्रसंगीं स्मारकाप्रीत्यर्थ मुद्दाम देवालयेंही बांधीत.

Historical Sketches of ancient Dekhan या ग्रंथांत पान ३८४ वर ग्रंथकार सुब्रह्मण्य अय्यर, बी. ए. यांनीं या प्रकारच्या पाषाणांचा उल्लेख केला असून त्यांचे शब्द पुढें देतों. "The country abounds in hero stones planted with inscriptions to celebrate the fame of military men, who have given their lives in fighting to the last with the enemy even when the whole army was put to flight thinking it better to die in battle field than brook the ignominy attending a flight"

अशा प्रकारचे पाषाण ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकापासून मिळाल्याचें वरील पुस्तकांत नमूद आहे.

### कुडाळचें वैभव.

इ. स १५०० पूर्वी कुडाळदेशकर ब्राम्हण क्षत्रिय तेजानें युक्त असून राजे असते तर त्यांची वंशावळ, त्यांनीं दिलेलीं दानपात्रें इनामपत्रें वतनें वगैरे उपलब्ध असतीं. त्यांचे राजवाडे, त्यांच्या आश्रितांचे वाडे, निदान अवशिष्ट स्वरूपांत दिसते. कुडाळ शहरांत फक्त कुडाळदेशकरांचीं ५०० घरें होतीं असें रा. परूळेकर सांगतात. हें खरें मानल्यास या घरांतील पुरुष व स्त्रिया, मुलें वगैरे, त्यांचे नोकरचाकर राजेसाहेबांचे कारखाने, सैन्य व्यापार उद्योग, पालख्यांतून फिरण्यासाठीं रुंद रस्ते वगैरे वैभवास योग्य अशा सोयींसाठी कुडाळ हें लांबी रुंदीनें तीन मैलांपेक्षां मोठें तरी असावयास हवें होतें. कुडाळच्या किल्ल्याचें वैभव पहावें तर तो इतका भव्य आहे कीं लांबीनें व रुंदीनें तो सुमारें ३२० हात इतका भरतो ! आणि जैन धर्माचें उच्चाटण करून ब्राह्मणी धर्माची ध्वजा पुनरपी फडकावणाऱ्या या धर्मशील ब्राह्मणशाहीच्या राजधनीच्या किल्ल्यांत एक मशीद आढळते ! हें कां ?

### जैन धर्माचें उच्चाटण

कुडाळदेशकर देसाई राजसत्ताधिकाऱ्यांनीं करून या प्रांतांत अत्यंत श्रेष्ठ प्रकारची देवस्थान व्यवस्था त्यांनीं चालू केली याविषयींचें गोड वर्णन रा. परूळेकरानीं प्रसन्न चित्तानें पुढील प्रकारें केलें आहे.

"इ.स. १२ वें शतक हा काळ कुडाळदेशकरांच्या इतिहासांत अत्यंत महत्वाचा आहे. या शतकांत कुडाळचे देसाई यानीं सर्व कोंकणांत

विशेषतः कुडाळ प्रांतांत धर्मक्रांति घडवून आणिली. पूर्व कालीन चालुक्यांच्या कारकीर्दींत ह्मणजे इ. स. च्या ६ व्या शतकापासून इ.स. च्या ८ व्या शतकाच्या द्वितीय पादापर्यंतच्या काळांत जैन धर्म बराच जोरावला होता. या धर्मास तत्कालीन सार्वभौम राजसत्तेचा आसरा असल्यामुळें कुडाळ प्रांतांतील सर्व देवळांत जैन मूर्ति दिसूं लागल्या होत्या. कुडाळचे देसाई यांनीं सर्व कोंकणावर स्वाऱ्या करून बराच मुलुख काबीज केला व जिंकलेल्या प्रदेशांतील जैन धर्माचें प्राबल्य कमी करून प्रत्येक देवळांत ब्राह्मणी धर्माच्या देवांच्या मूर्तींची स्थापना केली. जैन मूर्ती देवळांतून काढून राईत ठेवण्यांत आल्या. कुडाळप्रांतांत गांव देवस्कीचीं जीं १२ स्थळें आहेत त्यांपैकीं एक प्रायः सातवें जैनांस दिलें आहे. ( इतके देसाई उदारमनस्क होते ! ) या नवीन देवस्थानव्यवस्थेंत जसें कुडाळदेशकरांचें एक स्थळ होतें व आहे ( ? ) तसें महारांचेंही आहे. ही देवस्थानव्यवस्था कुडाळ प्रांताशिवाय इतरत्र कोठेंही पहावयास मिळत नाहीं."

इतिहास लिहिणें या पेक्षां इतिहास रचणें हें काम विशेष दुर्घट व धाडसाचें आहे. परंतु वकील रा. परूळेकर यानीं वरील प्रकारचा स्वकपोलकल्पित इतिहास बेधडक प्रसिद्ध केला या एकाच धाडसाच्या पराक्रमाबद्दल त्यांस मान पत्र देणें योग्य होईल. इंग्रजींत She नांवाची एक प्रवासविषयक कादंबरी आहे. या कादंबरींतील एकंदर विषय केवळ कल्पनाबळावर उत्पन्न केला आहे. परंतु तो सर्वथैव खरा आहे असा वाचकांचा भास होतो. रा. परूळेकर अशाच रीतीनें काल्पनिक कादंबरीप्रमाणें काल्पनिक इतिहास लिहिण्याच्या कामीं कलम बहादूर दिसतात. कारण देसायांस केवळ कुडाळचे राजे बनवून त्यांचें समाधान होईना तेव्हां त्यांनीं त्यांस कोंकणाधिपति व धर्मोद्धारक बनविण्यासाठीं त्यांच्या स्वाऱ्यांची कहाणी सांगितली.

जैन धर्माच्या प्रसाराचा व विलयाचा इतिहास थोडक्यांत असा आहे. नवव्या व दहाव्या शतकांत कोंकण किनाऱ्यावर किंबहुना सर्व दक्षिण हिंदुस्थानांत जैन धर्म जोरावला. राष्ट्रकूट वंशीय सम्राट अमोघवर्षानें जैन धर्माचा स्वीकार केला. त्याची कारकीर्द इ.स ८१५–८७७ पर्यंत चालून त्याच्या मागून दहाव्या शतकांत जिनसेन व गुणभद्र या जैन धर्मीयांनीं स्वधर्माची प्रतिष्ठा वाढविली. या सुमारास राष्ट्रकूट राजे जैन धर्माचे इतके कट्टे अनुयायी झाले कीं राष्ट्रकूट तिसऱ्या कृष्णानें वैदिक धर्मानुयायी राजादित्य चोळास धार्मिक अमहमिकेंत सन ९४९ सालीं चिरडून टाकिलें.. राष्ट्रकूट सम्राट व त्यांचे आश्रित कोंकण शिलाहर हे देखील जैन झाल्यामुळें कुडाळ प्रांतांत त्या धर्माचा प्रसार होणें साहजिक होतें ब्राह्मणी धर्माचें संगोपन करणाऱ्या कुडाळदेशकर ब्राह्मणांचें राज्य सातव्या शतकापासून चालू होतें असें सांगणारे रा. परूळेकर जैन धर्म मुळीं त्यांच्या प्रांतांत रुजला व पुढें बोकाळला कसा हें सांगतील काय ? कुडाळ प्रांतांतील जैन धर्मीय देवालयांस जमिनी कशा मिळाल्या हें त्यांस ठाऊक आहे काय ? जैन धर्माचें उच्चाटण केल्याचें श्रेय देसायांस देऊन पौरस्त्य व पाश्चात्य संशोधकांच्या लेखांस कुच कामी ठरवूं पाहणाऱ्या रा. परुळेकरांची आम्हांस कींव येते.

इतिहासाचें निर्विकार मनानें परिशीलन करणारांस जैन धर्माच्या ऱ्हासास देसाई कारण झाले नाहींत हें तेव्हांच कळून येईल. राष्ट्रकूट व कोंकण शिलाहार यांचा संबंध असे तोंवर कोंकणांत राजाश्रित जैन धर्माचा बोलबाला होता. सिंघण ( इ.स.१२१० १–२४७ ) ह्या पराक्रमी यादव राजानें १२१९ त कोंकण शिलाहारांचा नाश केला. याच सिंघणाच्या बीचण्णा नांवाच्या प्रतिनिधीनें गोव्यांच्या कदंबाचाही पाडाव केला. हे वैदिक धर्मानुयायी राजे कोकणावर प्रत्यक्ष सत्ता चालवूं लागल्याबरोबर जैन धर्मही राजाश्रयामुळें आला तसाच त्याच्या अभावीं गेला. सिंघणाचा पणतु कृष्णदेव यानें पुष्कळ यज्ञयाग केले व त्या योगानें ज्या वैदिक कर्ममार्गावर कालगतीनें लोकांची भक्ति नाहींशी झाली होती त्याला वळकटी आली. अर्थात जैन धर्म खालावला व पुनः वैदिक किंवा ब्राह्मणी धर्मानें डोकें वर केलें.

जैन धर्माच्या प्राबल्याच्या वेळीं कुडाळ प्रांतांत मोठा नामांकित विद्वान जैन राजा राज्य करीत होता अशाबद्दल दंतकथा असल्याचें ग्याझेटीयरमध्यें नमूद

आहे. कुडाळप्रांतांत जैनधर्म सुस्थापित होऊन त्याची जोपासना चांगल्या प्रकारें झाली त्या कालीं देशसत्तेचे व राजसत्तेचे अधिकारी ब्राम्हण असणें अशक्य आहे. अर्थात १२ व्या शतकांत देसायांनीं स्वाऱ्या करण्याची तयारी केली तेव्हां कुडाळप्रांतास जैन धर्मानें व्यापून टाकिलें असल्यामुळें त्यांच्या स्वाऱ्यांस प्रारंभ होई पर्यंत तरी ते राचसत्ताधारी नव्हते हें सिद्ध होतें. मग ही सत्ता एकदम त्यांना प्राप्त झाली कशी व केव्हां ? कुडाळदेशकर राजांनीं कुडाळप्रांत व कोंकणचा बराच भाग यांत ब्राम्हणी धर्माची ध्वजा उभारली आणि जैन धर्मास पळविलें हें जर खरें तर बाराव्या शतकानंतर कोल्हापुरच्या बाजूस असलेला जैनधर्म कोणीं बरें नष्ट केला ? कोकणांत काय किंवा वरघाटीं काय जैन धर्मास पळविणारे एकच. ज्या महापुरुषांकडून शिलाहारांचा नाश झाला त्यांसच जैन धर्माचें उच्चाटण केल्याबद्दल श्रेय देणें योग्य व ऐतिहासिक दृष्ट्या बिनचूक होईल. बाराव्या तेराव्या शतकांत कुडाळदेशकरांतील एकाद्या घराण्याकडे देसाई-गिरीची नोकरी होती कीं काय हाच मुळीं प्रश्न असून त्याकाळी कोणत्याही परीनें त्यांची स्थिति ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाची होती असें मानण्यास रा. परूळेकरांच्या साक्षीशिवाय दुसरा पुरावा नाहीं. कुडाळ प्रांतांतील इतर व्यवस्थांप्रमाणें

### देवस्थान व्यवस्था

ही अत्यंत रमणीय व उदात्त तत्वांवर अधिष्ठित होती व अशा प्रकारची व्यवस्था अन्यत्र कोठेंही आढळून येत नाहीं असें रा. परूळेकर कंठरवानें सांगतात. जुन्या काळीं अशी व्यवस्था सर्व दक्षिण हिंदुस्थानांत प्रचलित होती हें रा.परूळेकरांस माहीत नसावें. देवालयांची स्थापना, देवाचा सेवकवर्ग, उत्सवप्रसंगीं मानपान वगैरे गोष्टी कुडाळ प्रांतांतील पद्धतीप्रमाणेंच इतरत्रही चालू होत्या व अद्यापि बहुतांशीं आहेत. रा. परूळेकर यांस आह्मी विनंति करतों कीं त्यांनीं Historical Sketches of Ancient Dekhan या पुस्तकांतील ३२८ ते ३३९ पानें जरूर वाचून आपली खात्री करून घ्यावी.

रा. परूळेकरांनीं आपल्या इतिहासांत शेणव्यांविषयीं जीं निंद्य विधानें केलीं आहेत त्यांचा विचार पुढील लेखांत करूं. स्थलाभावामुळें या लेखांत त्यांचा विचार करणें अशक्य आहे.

---

# आमचे लग्नविधि व सोहळे.

**लेखांक ३ रा.**

लेखक—रा. ऋग्वेदी.

सारस्वत ब्राम्हणांचे कुलदेव श्री मंगेश, श्री शांतादुर्गा व इतर अनेक देवदेवता आहेत. लग्नकार्यास प्रारंभ होण्याच्या पूर्वदिवशीं कुलदेवतेप्रीत्यर्थ देवकार्य किंवा ब्राम्हण सुवासिनींस मिष्ठान्न भोजन देण्यांत येत असून भोजनारंभीं त्यांची पूजा केली जाते. कुलदेवतेचा प्रसाद मागण्याची व मंगलकार्य निर्विघ्नपणें पार पाडण्यासाठीं श्रीसन्निध प्रार्थना करण्याची ही पद्धति पूर्वापार चालू आहे. देवकार्याच्या समारंभास शेजारच्या लहानमोठ्या मंडळीस निमंत्रण देण्याची चाल सर्वत्र दृष्टीस पडते. दुसऱ्या दिवशीं लग्नसमारंभास प्रारंभ व्हावयाचा असतो. तत्पूर्वीं कित्येक मंगलकृत्यें आटपावयाचीं असतात. त्यांपैकीं पहिलें कृत्य

### उष्टी हळद व उडीदमुहूर्त

या नांवानें प्रसिद्ध आहे. तीन पाट एकाशीं एक लावून ओळीनें मांडल्यावर त्यांवर बनात आंथरून चहूं बाजूंस रांगोळी घालण्यांत येते. नंतर या आसनावर

विशेषतः कुडाळ प्रांतांत धर्मक्रांति घडवून आणिली. पूर्व कालीन चालुक्यांच्या कारकीर्दींत ह्मणजे इ. स. च्या ६ व्या शतकापासून इ.स. च्या ८ व्या शतकाच्या द्वितीय पादापर्यंतच्या काळांत जैन धर्म बराच जोरावला होता. या धर्मास तत्कालीन सार्वभौम राजसत्तेचा आसरा असल्यामुळें कुडाळ प्रांतांतील सर्व देवळांत जैन मूर्ति दिसूं लागल्या होत्या. कुडाळचे देसाई यांनीं सर्व कोंकणावर स्वाऱ्या करून बराच मुलुख काबीज केला व जिंकलेल्या प्रदेशांतील जैन धर्माचें प्राबल्य कमी करून प्रत्येक देवळांत ब्रह्माणी धर्माच्या देवांच्या मूर्तींची स्थापना केली. जैन मूर्ती देवळांतून काढून राईंत ठेवण्यांत आल्या. कुडाळप्रांतांत गांव देवस्कीचीं जीं १२ स्थळें आहेत त्यांपैकीं एक प्रायः सातवें जैनांस दिलें आहे. ( इतके देसाई उदारमनस्क होते ! ) या नवीन देवस्थानव्यवस्थेंत जसें कुडाळदेशकरांचें एक स्थळ होतें व आहे ( ? ) तसें महारांचेंही आहे. ही देवस्थानव्यवस्था कुडाळ प्रांताशिवाय इतरत्र कोठेंही पहावयास मिळत नाहीं.''

इतिहास लिहिणें या पेक्षां इतिहास रचणें हें काम विशेष दुर्घट व धाडसाचें आहे. परंतु वकील रा. परूळेकर यानीं वरील प्रकारचा स्वकपोलकल्पित इतिहास वेधडक प्रसिद्ध केला या एकाच धाडसाच्या पराक्रमाबद्दल त्यांस मान पत्र देणें योग्य होईल. इंग्रजींत She नांवाची एक प्रवासविषयक कादंबरी आहे. या कादंबरींतील एकंदर विषय केवळ कल्पनाबळावर उत्पन्न केला आहे. परंतु तो सर्वथैव खरा आहे असा वाचकांचा भास होतो. रा. परूळेकर अशाच रीतीनें काल्पनिक कादंबरीप्रमाणें काल्पनिक इतिहास लिहिण्याच्या कामीं कलम बहाद्दर दिसतात. कारण देसायांस केवळ कुडाळचे राजे बनवून त्यांचें समाधान होईना तेव्हां त्यांनीं त्यांस कोंकणाधिपति व धर्मोद्धारक बनविण्यासाठीं त्यांच्या स्वाऱ्यांची कहाणी सांगितली.

जैन धर्माच्या प्रसाराचा व विलयाचा इतिहास थोडक्यांत असा आहे. नवव्या व दहाव्या शतकांत कोंकण किनाऱ्यावर किंबहुना सर्व दक्षिण हिंदुस्थानांत जैन धर्म जोरावला. राष्ट्रकूट वंशीय सम्राट अमोघ वर्षानें जैन धर्माचा स्वीकार केला. त्याची कारकीर्द इ.स ८१५–८७७ पर्यंत चालून त्याच्या मागून दहाव्या शतकांत जिनसेन व गुणभद्र या जैन धर्मीयांनीं स्वधर्माची प्रतिष्ठा वाढविली. या सुमारास राष्ट्रकूट राजे जैन धर्माचे इतके कट्टे अनुयायी झाले कीं राष्ट्रकूट तिसऱ्या कृष्णानें वैदिक धर्मानुयायी राजादित्य चोळास धार्मिक अमहमिकेंत सन ९४९ सालीं चिरडून टाकिलें.. राष्ट्रकूट सम्राट व त्यांचे आश्रित कोंकण शिलाहर हे देखील जैन झाल्यामुळें कुडाळ प्रांतांत त्या धर्माचा प्रसार होणें साहजिक होतें ब्राह्मणी धर्माचें संगोपन करणाऱ्या कुडाळदेशकर ब्राह्मणांचें राज्य सातव्या शतकापासून चालू होतें असें सांगणारे रा. परूळेकर जैन धर्म मुळीं त्यांच्या प्रांतांत रुजला व पुढें बोकाळला कसा हें सांगतील काय ? कुडाळ प्रांतांतील जैन धर्मीय देवालयांस जमिनी कशा मिळाल्या हें त्यांस ठाऊक आहे काय ? जैन धर्माचें उच्चाटण केल्याचें श्रेय देसायांस देऊन पौरस्त्य व पाश्चात्य संशोधकांच्या लेखांस कुच कामी ठरवूं पाहणाऱ्या रा. परुळेकरांची आम्हांस कींव येते.

इतिहासाचें निर्विकार मनानें परिशीलन करणारांस जैन धर्माच्या ऱ्हासास देसाई कारण झाले नाहींत हें तेव्हांच कळून येईल. राष्ट्रकूट व कोंकण शिलाहार यांचा संबंध असे तोंवर कोंकणांत राजाश्रित जैन धर्माचा बोलबाला होता. सिंघण ( इ.स.१२१०१–२४७ ) ह्या पराक्रमी यादव राजानें १२१५ त कोंकण शिलाहारांचा नाश केला. याच सिंघणाच्या बीचण्णा नांवाच्या प्रतिनिधीनें गोव्यांच्या कदंबाचाही पाडाव केला. हे वैदिक धर्मानुयायी राजे कोकणावर प्रत्यक्ष सत्ता चालवूं लागल्याबरोबर जैन धर्मही राजाश्रयामुळें आला तसाच त्याच्या अभावीं गेला. सिंघणाचा पणतु कृष्णदेव यानें पुष्कळ यज्ञयाग केले व त्या योगानें ज्या वैदिक कर्ममार्गावर कालगतीनें लोकांची भक्ति नाहींशी झाली होती त्याला वळकटी आली. अर्थात जैन धर्म खालावला व पुनः वैदिक किंवा ब्राह्मणी धर्मानें डोकें वर केलें.

जैन धर्माच्या प्राबल्याच्या वेळीं कुडाळ प्रांतांत मोठा नामांकित विद्वान जैन राजा राज्य करीत होता अशाबद्दल दंतकथा असल्याचें ग्याझेटीयरमध्यें नमूद

आहे. कुडाळप्रांतांत जैनधर्म सुस्थापित होऊन त्याची जोपासना चांगल्या प्रकारें झाली त्या काळीं देशसत्तेचे व राजसत्तेचे अधिकारी ब्राम्हण असणें अशक्य आहे. अर्थात १२ व्या शतकांत देसायांनीं स्वाऱ्या करण्याची तयारी केली तेव्हां कुडाळप्रांतास जैन धर्मानें व्यापून टाकिलें असल्यामुळें त्यांच्या स्वाऱ्यांस प्रारंभ होई पर्यंत तरी ते राचसत्ताधारी नव्हते हें सिद्ध होतें. मग ही सत्ता एकदम त्यांना प्राप्त झाली कशी व केव्हां ? कुडाळदेशकर राजांनीं कुडाळप्रांत व कोंकणचा बराच भाग यांत ब्राम्हणी धर्माची ध्वजा उभारली आणि जैन धर्मास पळविलें हें जर खरें तर बाराव्या शतकानंतर कोल्हापुरच्या बाजूस असलेला जैनधर्म कोणीं बरें नष्ट केला ? कोकणांत काय किंवा वरघाटीं काय जैन धर्मास पळविणारे एकच. ज्या महापुरुषांकडून शिलाहारांचा नाश झाला त्यांसच जैन धर्माचें उच्चाटण केल्याबद्दल श्रेय देणें योग्य व ऐतिहासिक दृष्ट्या बिनचूक होईल. बाराव्या तेराव्या शतकांत कुडाळदेशकरांतील एकाद्या घराण्याकडे देसाईगिरीची नोकरी होती कीं काय हाच मुळीं प्रश्न असून त्याकाळी कोणत्याही परीनें त्यांची स्थिति ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाची होती असें मानण्यास रा. परूळेकरांच्या साक्षीशिवाय दुसरा पुरावा नाहीं. कुडाळ प्रांतांतील इतर व्यवस्थांप्रमाणें

### देवस्थान व्यवस्था

ही अत्यंत रमणीय व उदात्त तत्वांवर अधिष्ठित होती व अशा प्रकारची व्यवस्था अन्यत्र कोठेंही आढळून येत नाहीं असें रा. परूळेकर कंठरवानें सांगतात. जुन्या काळीं अशी व्यवस्था सर्व दक्षिण हिंदुस्थानांत प्रचलित होती हें रा.परूळेकरांस माहीत नसावें. देवालयांची स्थापना, देवाचा सेवकवर्ग, उत्सवप्रसंगीं मानपान वगैरे गोष्टी कुडाळ प्रांतांतील पद्धतीप्रमाणेंच इतरत्रही चालू होत्या व अद्यापि बहुतांशीं आहेत. रा. परूळेकर यांस आम्ही विनंति करतों कीं त्यांनीं Historical Sketches of Ancient Dekhan या पुस्तकांतील ३२८ ते ३३९ पानें जरूर वाचून आपली खात्री करून घ्यावी.

रा. परूळेकरांनीं आपल्या इतिहासांत शेणव्यांविषयीं जीं निंद्य विधानें केलीं आहेत त्यांचा विचार पुढील लेखांत करूं. स्थलाभावामुळें या लेखांत त्यांचा विचार करणें अशक्य आहे.

---

## आमचे लग्नविधि व सोहळे.

**लेखांक ३ रा.**

लेखक—**रा. ऋग्वेदी.**

सारस्वत ब्राम्हणांचे कुलदेव श्री मंगेश, श्री शांतादुर्गा व इतर अनेक देवदेवता आहेत. लग्नकार्यास प्रारंभ होण्याच्या पूर्वदिवशीं कुलदेवतेप्रीत्यर्थ देवकार्य किंवा ब्राम्हण सुवासिनींस मिष्टान्न भोजन देण्यांत येत असून भोजनारंभीं त्यांची पूजा केली जाते. कुलदेवतेचा प्रसाद मागण्याची व मंगलकार्य निर्विघ्नपणें पार पाडण्यासाठीं श्रीसन्निध प्रार्थना करण्याची ही पद्धति पूर्वापार चालू आहे. देवकार्याच्या समारंभास शेजारच्या लहानमोठ्या मंडळीस निमंत्रण देण्याची चाल सर्वत्र दृष्टीस पडते. दुसऱ्या दिवशीं लग्नसमारंभास प्रारंभ व्हावयाचा असतो. तत्पूर्वीं कित्येक मंगलकृत्यें आटपावयाचीं असतात. त्यांपैकीं पहिलें कृत्य

### उष्टी हळद व उडीदमुहूर्त

या नांवानें प्रसिद्ध आहे. तान पाट एकाशीं एक लावून ओळीनें मांडल्यावर त्यांवर बनात आंथरून चहूं बाजूंस रांगोळी घालण्यांत येते. नंतर या आसनावर

वधूसह कन्यादान करणारें दंपत्य बसतें. मंगलवाद्यें वाजत असतां पांच सुवासिनी स्त्रिया आंब्याच्या पानाच्या टोंकानें हरिद्रामिश्रित तेल त्यांच्या अंगास ( कपाळास, भुजांस, हातांस व पायांस ) लावतात. त्यानंतर वधूच्या संपूर्ण अंगास हळद व तें तेल लावून त्रिवर्गांस मंगलस्नान घालण्यांत येतें. या स्नानानंतर कन्यादान करणारें दंपत्य रेशमी वस्त्रें व अलंकार परिधान करून व कपाळास कुंकुमतिलक लावून मंडपांत पुण्याहवाचन वगैरे विधि करण्यास बसतें. यांच्या उजव्या बाजूस वधूलाही आणून बसवितात. यावेळीं वधूचा पोषाख साधा परंतु अत्यंत निर्मल व नयन मनोहर असतो. तेल, हळद व उटणीं लावून अभ्यंगस्नान केल्याच्या योगानें तिच्या अंगावर विशेष मनोहर अशा सुवर्णरंगाची छटा चढते. तिला पिंवळें वस्त्र ( कासोटा न घालतां ) नेसवितात. याला पटवस्त्र किंवा अष्टपुत्री असें नांव आहे. अंगांत पिंवळ्या खणाची चोळी गांठ न देतां उलटी घातलेली असते. केशपाश पाठीवर मोकळा सोडलेला असतो व कपाळीं कुंकवाचा तिलक शोभत असून डोकीस फुलांचो वेणी लटकलेली असते. हातांत त्याच दिवशीं भरलेल्या एकरंगी हिरव्या बांगड्या असतात. या बहुधा जुन्या पद्धतीच्या व स्वदेशी असतात. या बांगड्यांस लग्नचुडा असें नांव आहे. आणि तो भरणारास वधू आपल्या मुठींत मावतील इतके पैसे देत असते. सुमारें रुपया सव्वा रुपया या कामीं खर्च होतो. गळ्यांत हिरव्या रंगाचे गळेसर, सोन्याचे मणि व पुतळ्या ओंवून, घातलेले असतात. पायांत आंगठ्या जवळच्या बोटांत चांदीचीं जोडवीं ( लहान लहान वेढीं ) आणि करंगळी जवळच्या बोटांत विरूद्या नांवाचीं भूषणें घातलेलीं असतात. याप्रमाणें वधूचा वेष असतो व त्या वेषामुळें लग्नमंडपांत वधूस चटकन् ओळखतां येतें.

सध्यां मुलींची लग्नवयाची मर्यादा वाढली असल्यामुळें त्यांना पोषाख द्यावयाचा तो विशेष सुबक द्यावा लागतो. याचें कारण जुन्या पद्धतीचीं ओबडधोबड वस्त्रप्रावरणें, जुन्या शतकांतील बांगड्या व इतर आभरणें वापरण्यास या तरुण सुशिक्षित किंवा अर्धशिक्षित मुली तयार नसतात. इतकी गोष्ट खरी आहे कीं त्या अशा प्रसंगीं आपण होऊन उघड रीतीनें अप्रिय वस्तूंबद्दल नाखुषी दर्शवीत नाहींत. तथापि त्यांच्या वर्तनावरून मातापितरांस किंवा त्यांच्या आप्तमंडळीस त्यांची आवडनिवड समजलेली असल्यामुळें व मुलीही अनेक प्रकारें आधींच ती कळवीत असल्याकारणानें अलंकार व वस्त्रप्रावरणें त्यांच्या पसंतीप्रमाणेंच तयार करतात. शहरवासी मातापितर स्वतःच सुधारलेल्या मताचे असून त्यांची व मुलींची आवडनिवड सारखीच असते असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

पुण्याहवाचनाच्या कामीं वधू व इतर मंडळी गुंतलेली असत त्यावेळीं वधूस लावून राहिलेली **उष्टी हळद** व सुवासिक तेलें व मंगल द्रव्यें तबकांत घेऊन वधूपक्षीय कित्येक सुवासिनी स्त्रिया वरगृहीं जातात. तेथें पूर्वोक्त पद्धतीवर तयार केलेल्या आसनावर बसविलेल्या वरास उष्टी हळद, तेल वगैरे लावून मंगलस्नान घालतात. यावेळीं मंगलवाद्यें वाजत असतात. याप्रमाणें स्नान घालण्यासाठीं उभयतांच्या गृहाबाहेर एक चौफेर आंब्याचीं पानें लावून तयार केलेल्या तोरणांचें लहान आवार असतें. वरगृहीं आलेल्या मंडळीस हळदकुंकुं, पानसुपारी व फराळ देण्याची चाल आहे. कोंकणांत या फराळाचें महत्व फार मानीत असून जवळ पासच्या मंडळीस आमंत्रण दिलेलें असतें. नारळाच्या रसांत गूळ घालून त्यांत पोहे भिजवितात. ते व लाडू करंज्या वगैरे पदार्थ यावेळीं सर्व मंडळीस भोजनाच्या पंक्तीप्रमाणें पानें व पाट मांडून वाढतात. कांहीं ठिकाणीं या प्रसंगीं शंभर दोनशें नारळ, मणभर गूळ व दोन चार फरे पोहे इतक्यांचा चुराडा उडतो. शिवाय करंज्या लाडूनें भरलेले एक दोन पेटारेही रिकामे होतात. शहरवासीयांस ही पद्धति पसंत नाहीं. मुंबईसारख्या ठिकाणीं स्त्रियांची कॉफी, फुलांच्या वेण्या व हळदकुंकुं इतक्यांवरच तृप्ति होते. व कार्याचा आटोपशीरपणा या दृष्टीनें पाहतां कोंकणांतील मंडळीनें सुदामदेवाचें बंड कमी केल्यास बरें होईल. त्या योगें वेळेची व मेहनतीची बचत होऊन शिवाय आरोग्य दृष्टयाही फायदा होण्याचा संभव आहे. तेल लावण्यासाठीं स्त्रिया येतात तेव्हां वराकडून गणपतीची पूजा करवितात व जात्यांत उडीद घालून पांच सुवासिनी स्त्रियांच्या मदतीनें ते चार पांच वेळां भरडण्याचा एक मनोरंजक विधि होतो. यावरून या सर्व कृत्यास उडीद मुहूर्त म्हणण्याचा प्रघात आहे. संसार-

चक्रांत सांपडणाऱ्या वधुवरांस प्रपंचाचा ओनामा ह्मणून या प्रमाणें सर्वांसमक्ष उडीद दळण्यास लावतात किंवा कार्यप्रसंगीं लागणाऱ्या धान्याचें दळण करण्याचा हा औपचारिक विधि आहे हें सांगणें कठीण आहे. वधू व वर यांकडून हळद लावून स्नान घालण्यापूर्वी तेल लावलेले मूठभर उडीद जात्यावर भरडण्यास लावण्याचा प्रघात सर्वत्र दृष्टीस पडतो. जात्याभोंवतीं रांगोळ घालून त्याच्या खुंटीस आंब्याचें पान बांधलेलें असतें. याप्रमाणें विधि झाल्यावर सुवासिनी स्त्रिया वधूगृहीं परत येतात. त्यानंतर वराचें स्नान आटोपल्यावर पुण्याहवाचनाचें वगैरे काम सुरू होतें. नंतर वरपक्षाकडील स्त्रिया वधूगृहीं वाजत गाजत येतात व तेथें वधूस उष्टी हळद लावणें, फराळाचा आस्वाद घेणें, उडीद दळणें वगैरे सर्व प्रकारांची पुनरावृत्ति होते. वर सांगितलेलीं कृत्यें व स्वस्तिवाचन वगैरे विधि सुमुहूर्ताच्या अनुकूलतेप्रमाणें विवाहसमारंभाच्या दिवशीं किंवा पूर्व दिवशीं करण्यांत येतात. या विधींचें वर्णन क्रमशः खालीं देत आहों.

### स्वस्तिवाचन किंवा पुण्याहवाचन.

मंगलकार्याला प्रारंभ करण्यापूर्वी ज्याप्रमाणें कुलदेवतेचा आशीर्वाद घेणें अगत्याचें मानिलें आहे त्याप्रमाणें स्वस्तिवाचन नांवाचा विधि करून ब्राह्मणांचा आशीर्वाद घेणें आवश्यक मानिलें जातें. विघ्नहर्ता गणपतीची प्रारंभीं पूजा केल्यावर दोन कलश मांडून त्यांपैकीं एकांत वरुण देवतेचें व दुसऱ्यांत अनेक देवता व तीर्थें यांचें मंत्रोच्चारपूर्वक आवाहन करून त्यांची पूजा करतात. नंतर ब्राह्मणांकडून

**शान्तिरस्तु । पुष्टिरस्तु । तुष्टिरस्तु । अविघ्नमस्तु । ॐ पुण्याहम् । ॐ आयुष्मते स्वस्ति । ॐ ऋध्यताम् । ॐ अस्तु श्रीः ।**

इत्यादि आशीर्वाद दिले जातात. या आशीर्वादांचा अर्थ असा आहे:—शांति असो, समृद्धि असो, संतुष्टता प्राप्त होवो, विघ्नरहित कार्य होवो. हा दिवस पुण्यकारक होवो, आयुष्यवानाचें कल्याण असो, समृद्धि असो, लक्ष्मी प्राप्त होवो. या अर्थाचीं वचनें त्रिवार झटल्यावर कलशांतील उदक, दूर्वा व आंब्याचीं पानें हातांत धरून त्यांनीं यजमान, त्याची पत्नी व वधू किंवा वर यांच्या शिरावर कलशोदकाचें समंत्रक सिंचन (अभिषेक) करितात. या विधीला पुण्याहवाचन किंवा स्वस्तिवाचन असें नांव आहे.

पूर्वकालीं ब्राह्मणवर्गानें नश्वर अशा विषयोपभोगांपासून आपलें मन काढलें व स्वाध्याय व ईश्वरचिंतन यांत मग्न होऊन जनतेच्या प्रापंचिक व पारमार्थिक उन्नतीच्या कार्यास आपल्या सात्विक वर्तनानें शुद्ध वळण लाविलें. यामुळें ब्राह्मणवर्गासंबंधानें सर्व वर्णांच्या लोकांच्या अंतःकरणांत आदरभाव उत्पन्न झाला. तो आदर आजमितीला दिसून येत नाहीं. मंगलकार्यें व इतर प्रसंग प्राप्त झाल्या वेळीं ब्राह्मणांकडून (म्हणजे भटजींकडून) आशीर्वाद घेण्याची पद्धति अद्यापि चालू आहे तरी त्यांचें अज्ञान, आचार व विचारमालिन्य, स्वार्थपरायणता यांच्यापायीं त्यांच्या कृत्यांवर किंवा मंत्रोक्त आशीर्वचनांवर इतकी कोणी मदार ठेवीत नाहीं. म्हणून दिवसेंदिवस या प्रकारचे विधि अनावश्यक वाटूं लागले आहेत. व कालेंकरून त्यांचा लोप होईल कीं काय अशीं चिन्हें आज दिसूं लागलीं आहेत. असो. याप्रमाणें पुण्याहवाचन झाल्यावर

### मातृकापूजन

हा विधि होतो. **मातृदेवोभव** म्हणजे मातेला देवाप्रमाणें मानावें ही भावना आह्मां आर्यांच्या अंतःकरणांत भिनली असल्यामुळें विवाहासारख्या मंगल प्रसंगीं मातृ-पूजन करण्याचा हा विधि प्रचारांत आला आहे. याला मातृकापूजन असें ह्मणतात. मनुष्यांतील व देवांतील अशा दोन्ही प्रकारच्या मातांचें हें पूजन असतें. या माता धर्मशास्त्रकारांनीं २३ मानिल्या असून त्यांची स्थापना एका सुपांत वस्त्र आंथरून त्यावर केली जाते. तेवीस ठिकाणीं मूठमूठ तांदुळांचे लहान ढीग घालून त्यांच्या ठायीं मातृदेवतेचें आवाहन करण्यांत येतें. व पंचोपचार पूजा झाल्यावर हा विधि आटोपतो.

### नांदी श्राद्ध.

हा विधि करण्याचा उद्देश इहलोक सोडून गेलेल्या आपल्या वाडवडिलांचें स्मरण करणें व त्यांचा आशीर्वाद मागणें हा असतो. अशा रीतीनें पितृस्वरूप झालेल्या आपल्या पूर्वजांचें स्मरण केल्याच्या योगानें विवाहग्रंथीनें बद्ध होणाऱ्या वधूवरांचा वंश वाढतो असा समज आहे. यासाठीं या श्राद्धास **अभ्युदयिक** किंवा **वृद्धिश्राद्ध** असें म्हणण्याचा प्रघात आहे. श्राद्धांत नऊ पितर असतात ते–

माता, पितामही, प्रपितामही, पिता, पितामह, प्रपितामह, मातामह, प्रमातामह आणि वृद्धमातामह ( म्हणजे आई, पित्याची आई, पित्याची आजी, बाप, पित्याचा पिता व पित्याचा आजा, आईचा बाप, आईचा आजा व आईचा पणजा. ) पितृश्राद्धांतील पितरांच्या नामोच्चाराचा किंवा सव्यापसव्याचा प्रकार नांदी श्राद्धांत नाहीं. तिळांच्याऐवजीं यवाचा उपयोग होतो व इतर शब्दप्रयोगही भिन्न असतात.

### ग्रहमख किंवा नवग्रह होम.

हिंदु लोक फलज्योतिषावर विश्वास ठेवणारे असल्यामुळें ही नवग्रह पूजा मंगलकार्याच्या अंगभूत मानिली गेली आहे. ग्रहांची कृपादृष्टि असल्यावांचून वधूवरांचें कल्याण होणार नाहीं अशी समजूत असल्यामुळें त्यांचीं जन्मवेळेचीं टिपणें पाहण्याची व नवग्रहशांती प्रीत्यर्थ होम करण्याची रूढि प्रचलित झाली. एका पाटावर नवग्रहांप्रीत्यर्थ तांदुळाचे नऊ लहान ढीग मांडून त्यांवर एकेक सुपारी ठेवण्यांत येते. नंतर त्यांची यथाविधि पूजा करून होमही करण्यांत येतो. बहुधा हा विधि मंगलकार्यापूर्वीं व अगदींच कालाची अनुकूलता नसल्यास कार्यानंतर करण्यांत येतो.

### मंडप देवता प्रतिष्ठा.

विवाहकार्याच्या दिवशीं किंवा तत्पूर्वी मंडपदेवतेची प्रतिष्ठा करण्यांत येते. मंडपदेवतेची प्रतिष्ठा झाल्यानंतर कुटुंबांत मृत्यु किंवा जन्म झाल्यास त्यामुळें लग्नकार्य थांबवावें लागत नाहीं. यासाठीं मुहूर्त साधण्यासाठीं निरुपाय असेल तेव्हां चार दिवस आधींच मंडपदेवतेची स्थापना केली जाते. शिवाय ही देवता एकदां मंडपांत बसली म्हणजे सोवळ्या ओवळ्याचा विशेष निर्बंध पाळण्याचें कारण नाहीं असा समज आहे; तरीमंडप देवतेची स्थापना झाल्यानंतर ठरीव दिवसांत तिचें विसर्जन झालेंच पाहिजे असा शास्त्र नियम आहे. मंडप देवता व अविघ्न गणपति यांची प्रतिष्ठा करण्याची पद्धति पुढील प्रमाणें आहे:—

"दुर्वा, शमी वगैरेंचे पल्लव घेऊन ते एका आंब्याच्या पानांत गुंडाळतात व त्यास कच्च्या सुताचे वेढे देतात. अशा सहा गुंडाळ्या करितात. यांस शाखा ही संज्ञा आहे. त्यांच्या पैकीं एका गुंडाळींत मुसळाच्या ऐवजीं एक समिध बांधतात, व एका व गुंडाळींत सुरी वगैरे शस्त्राच्या ऐवजीं एक दर्भ घालतात. या सहाही गुंडाळ्या अथवा शाखा एका नव्या सुपांत दक्षिणेकडून उत्तरेकडे अशा ठेवतात. त्यांत प्रथम साध्या चार, त्यांच्या उत्तरेस मुसलगर्भा ( ह्मणजे समिध घातलेली शाखा ) व तिच्या उत्तरेस शस्त्र गर्भा ( ह्मणजे दर्भ असलेली गुंडाळी ) अशा क्रमानें मांडतात. एक लहान मृत्तिका पात्र घेऊन तें सफेत्यानें रंगवून त्यांत अक्षता, हळकुंड व सुपाऱ्या घालून व त्यावर एक मृत्तिकेचें झांकण पालथें ठेवून वरून सूत गुंडाळतात आणि तें सुपांत ठेवतात, त्यास अविघ्न कलश असें नांव आहे. वरील सहा गुंडाळ्यांच्या ठायीं दक्षिणेकडून उत्तरेकडे अनुक्रमें नंदिनी, नलिनी, मैत्रा, उमा, पशुवर्धिनी व भगवती, या देवतांचें आणि त्या कलशाच्या ठिकाणीं अविघ्न संज्ञक गणपतीचें आवाहन करून त्यांची पूजा करितात. नंतर त्यांतील पहिल्या पांच देवतांपैकीं चार देवता मंडपाच्या चार कोपऱ्यांतील खांबावर व पांचवी मध्य भागाच्या खांबावर स्थापन कराव्या असा जरी विधि आहे तरी मंडपस्तंभावर न बांधतां सुपांतच ठेवतात व त्यांची पूजा करतात. सुपांत भगवती असते. तिच्यासह तें सूप व मातृकापूजन ज्या सुपांत केलें आहे तें मातृकांसह सूप अशीं दोन्ही पात्रें यजमान हातांत घेतो. व पत्नीच्या हातीं अविघ्न कलश देतो. नंतर तीं घराच्या ईशान्य कोनांत, त्यांच्या स्थापनेकरितां सफेती व कुंकवाचे टिपके लावून तयार केलेल्या जागीं, तांदुळांच्या तीन राशीवर तिन्ही ठेवतात. मंडपदेवतांसाठीं व मातृकांसाठीं अशीं दोन निरनिराळीं सुपें न घेतां ज्या सुपांत मातृकापूजन केलें असतें, त्यांतच शाखारूपी मंडपदेवतांची प्रतिष्ठा करण्याचा विशेष प्रघात आहे. निरनिराळ्या मंत्रांनीं हा सर्व विधि होतो. हे सर्व विधि होत असतां मंगल वाद्यें वाजत असतात हें सांगणें नको.

### सीमांतपूजन.

कन्येसाठीं निश्चित केलेला वर परगांवचा असला तर चालू पद्धतीप्रमाणें तत्पक्षीय लोकांना वधूच्या गांवीं यावें लागतें. वर असलेल्या गांवीं जाऊन तेथें मुलगी देण्याची पद्धति अत्यंत गौण मानिली जाते. वरपक्षीय मंडळी लग्नकार्याला एकदोन दिवस असतानाच वधूच्या गांवीं येते. या गांवाच्या सीमेजवळ वऱ्हाडी मंडळी आल्याची वर्दी मिळतांच कन्येचा पिता

आपल्या इष्टमित्रांस घेऊन त्यांना सामोरा येतो. नंतर त्या ठिकाणीं वराचें पादप्रक्षालन करून वस्त्रादिकांनीं त्याचें पूजन करावयाचें अशी प्राचीन पद्धति आहे. यावरून या पूजेला सीमांत पूजन असें नांव पडलें आहे. परंतु हल्लीं वर वधूच्या गांवांत राहणारा असो किंवा बाहेरगांवचा असो सीमांतपूजनाचा एक स्वतंत्र समारंभ होतो. सवडीप्रमाणें विवाहाच्या पूर्व दिवशीं किंवा विवाहाच्याच दिवशीं गावांतील उघड्या व प्रशस्त जागेवर असलेल्या देवालयांत किंवा घरांत चटयांची बिछायत घालून ठेविलेली असते तेथें वरपक्षीय मंडळी वाजतगाजत येऊन बसते. वधूपक्षाकडील मंडळी नेमलेल्या वेळीं तेथें मिरवीत येते. यावेळीं वराची पूजा करण्यांत येऊन त्याला वस्त्रपात्रादिक अर्पण करण्यांत येतात. नृत्यगानादिकांत व दारूसामान उडविण्यांत एकदोन तास सहज निघून जातात.अत्तर गुलाब, पानसुपारी वगैरे सर्वजणांस देण्यांत आल्यावर सर्व मंडळी वराच्या घरीं जाते व तेथें पानसुपारी घेतल्यावर वधूपक्षीय लोक आपल्या मंडपीं येतात. सीमांत पूजनाच्या पायीं पंचवीसपासून एक हजार रुपयांपर्यंत खर्च करणारे गुलहौसी लोक दृष्टीस पडतात. खरें पाहिलें असतां हा विधि इतक्या थाटमाटानें उरकला पाहिजे असा कांहीं शास्त्र-नियम नाहीं. परंतु लग्नकार्य करण्यासाठीं पुढें आलेली मंडळी आवश्यक गोष्टींकडे लक्ष देण्यापेक्षां आपल्या कार्याची तारीफ कांहीं काल तरी गांवकरी लोकांत होईल याकडे अधिक लक्ष देणारी असल्यामुळें विपुल द्रव्याचा अनाठायीं व्यय होतो यांत संदेह नाहीं. सध्यां पैशाची टंचाई दिवसें दिवस अधिक भासूं लागली आहे त्यामुळें सीमांत पूजनासारखे विधि औपचारिक रीत्या लग्नमंडपांत वरानें प्रवेश करण्यापूर्वी अर्ध्या घटिकेंत आटपून घेतात. दारुसामान, नृत्य-गान यांच्यापायीं द्रव्याचा नाश करून कर्जबाजारी होण्यास सुशिक्षित व समंजस मंडळी तयार नसते हें सुचिन्ह होय. **सीमांतपूजन** या शब्दाचा अपभ्रंश होऊन **श्रीमंत पूजन** असा प्रचारांत शब्द आला आहे ह्मणून कीं काय वधू व वरपक्षीय लोक या विधीच्या वेळीं श्रीमंतीचा आविर्भाव आणून पैशाचा चुराडा करतात. हा प्रकार बंद होणें अत्यंत इष्ट आहे.

### वर प्रस्थान

लग्नमुहूर्त तीन प्रकारचे असतात. दिवा ( दिवसा ), गोधूल किंवा गोरज ( गुरें घरीं येतात ती सूर्यास्ताची वेळ ) आणि रात्रौ. यांपैकीं दिवामुहूर्त हा ब्राह्मणवर्गानें विवाह करण्याला फारच उत्तम मानला आहे. कारण ब्राह्मणांचें मुख्य आराध्य दैवत जो सूर्य त्याच्या समक्ष लग्न लागतें व नंतर वधूवरांस सूर्याचें दर्शन घेतां येतें. यासाठीं शक्य असेल तोंवर दिवसा मुहूर्त साधावा असें जरी शास्त्रकारांचें मत आहे तरी अनेक कारणांमुळें हा मुहूर्त निमंत्रितांस किंवा उभय पक्षीयांस सोईचा वाटत नाहीं. यासाठीं फार करून गोरज किंवा रात्रौ मुहूर्तावर लग्नें लागतात. एऱ्हवीं दिवाबत्तीचा व इतर खर्च लक्षात घेतां देखील दिवसा लग्न मुहूर्त धरणें फार फायदेशीर आहे यांत संदेह नाहीं.

मुहूर्तापूर्वी सुमारें एक तास वराकडील मंडळी चांगला पोषाख करून वराला वधूगृहीं मोठ्या मिरवणुकीच्या थाटानें घेऊन जातात. घरांतून निघण्यापूर्वी नवरा मुलगा घरामध्यें देवास आणि वडीलजनांस नमस्कार करतो. वराच्या हातांत एक श्रीफल दिलेलें असतें. रस्त्यांत वारांगनांचें नृत्यगान होत होत मंडळी मुंगीच्या पावलांनीं चाललेली असते. अग्रभागीं तासे वाजंत्र्यांचे ताफे वाजवीत जातात. मधून मधून दारू सामानाचे बार कानीं पडतात. मशालीच्या योगानें उजेडाची सोय करण्यांत येतें. वरास श्रृंगारलेल्या घोड्यावर, किंवा उघड्या गाडींत ( एक दोन मुलांसह ) बसवून किंवा कधीं कधीं पायानें चालत, नेण्याचा परिपाठ आहे. या प्रसंगीं वरानें रेशमी किनारी कोरें धोतर परिधान केलेलें असतें. अंगांत उंची कापडाचा ( रेशमी ) लाल, पिंवळा किंवा पांढऱ्या शुभ्र रंगाचा अंगरखा घातलेला असतो. उजव्या गालावर मध्यभागीं काजळाचें गालबोट लावलेलें असतें. कपाळास भला मोठा कुंकवाचा टिळा लावलेला असतो व डोक्यास तांबड्या रंगाचें पागोटें किंवा फेटा बांधून त्यावर बेगडाच्या लहान मोठ्या मुंडावळी बांधलेल्या असतात. या मुंडावळीला बाशिंग ह्मणतात. वराच्या समोर सुवासिनी स्त्रिया असतात, त्यापैकीं वरमातेच्या किंवा जवळच्या आप्तस्त्रीच्या हातीं पांच वातीचा दिवा असतो. हा रस्त्यांत विजूं नये ह्मणून एका रवळींत ठेवून त्यावर

माता, पितामही, प्रपितामही, पिता, पितामह, प्रपितामह, मातामह, प्रमातामह आणि वृद्धमातामह ( म्हणजे आई, पित्याची आई, पित्याची आजी, बाप, पित्याचा पिता व पित्याचा आजा, आईचा बाप, आईचा आजा व आईचा पणजा. ) पितृश्राद्धांतील पितरांच्या नामोच्चाराचा किंवा सव्यापसव्याचा प्रकार नांदी श्राद्धांत नाहीं. तिळांच्याऐवजीं यवाचा उपयोग होतो व इतर शब्दप्रयोगही भिन्न असतात.

### ग्रहमख किंवा नवग्रह होम.

हिंदु लोक फलज्योतिषावर विश्वास ठेवणारे असल्यामुळें ही नवग्रह पूजा मंगलकार्यांच्या अंगभूत मानिली गेली आहे. ग्रहांची कृपादृष्टि असल्यावांचून वधूवरांचें कल्याण होणार नाहीं अशी समजूत असल्यामुळें त्यांचीं जन्मवेळेचीं टिपणें पाहण्याची व नवग्रहशांती प्रीत्यर्थ होम करण्याची रूढि प्रचलित झाली. एका पाटावर नवग्रहांप्रीत्यर्थ तांदुळाचे नऊ लहान ढीग मांडून त्यांवर एकेक सुपारी ठेवण्यांत येते. नंतर त्यांची यथाविधि पूजा करून होमही करण्यांत येतो. बहुधा हा विधि मंगलकार्यापूर्वीं व अगदींच कालाची अनुकूलता नसल्यास कार्यानंतर करण्यांत येतो.

### मंडप देवता प्रतिष्ठा.

विवाहकार्याच्या दिवशीं किंवा तत्पूर्वीं मंडपदेवतेची प्रतिष्ठा करण्यांत येते. मंडपदेवतेची प्रतिष्ठा झाल्यानंतर कुटुंबांत मृत्यु किंवा जन्म झाल्यास त्यामुळें लग्नकार्य थांबवावें लागत नाहीं. यासाठीं मुहूर्त साधण्यासाठीं निरुपाय असेल तेव्हां चार दिवस आधींच मंडपदेवतेची स्थापना केली जाते. शिवाय ही देवता एकदां मंडपांत बसली म्हणजे सोवळ्या ओवळ्याचा विशेष निर्बंध पाळण्याचें कारण नाहीं असा समज आहे; तरीमंडप देवतेची स्थापना झाल्यानंतर ठरीव दिवसांत तिचें विसर्जन झालेंच पाहिजे असा शास्त्र नियम आहे. मंडप देवता व अविघ्न गणपति यांची प्रतिष्ठा करण्याची पद्धति पुढील प्रमाणें आहे:—

"दुर्वा शमी वगैरेंचे पल्लव घेऊन ते एका आंब्याच्या पानांत गुंडाळतात व त्यास कच्च्या सुताचे वेढे देतात. अशा सहा गुंडाळ्या करितात. यांस शाखा ही संज्ञा आहे. त्यांच्या पैकीं एका गुंडाळींत मुसळाच्या ऐवजीं एक समिध बांधतात, व एका व गुंडाळींत सुरी वगैरे शस्त्राच्या ऐवजीं एक दर्भ घालतात. या सहाही गुंडाळ्या अथवा शाखा एका नव्या सुपांत दक्षिणेकडून उत्तरेकडे अशा ठेवतात. त्यांत प्रथम साध्या चार, त्यांच्या उत्तरेस मुसलगर्भा ( ह्मणजे समिध घातलेली शाखा ) व तिच्या उत्तरेस शस्त्र गर्भा ( ह्मणजे दर्भ असलेली गुंडाळी ) अशा क्रमानें मांडतात. एक लहान मृत्तिका पात्र घेऊन तें सफेत्यानें रंगवून त्यांत अक्षता, हळकुंड व सुपाऱ्या घालून व त्यावर एक मृत्तिकेचें झांकण पालथें ठेवून वरून सूत गुंडाळतात आणि तें सुपांत ठेवतात, त्यास अविघ्न कलश असें नांव आहे. वरील सहा गुंडाळ्यांच्या ठायीं दक्षिणेकडून उत्तरेकडे अनुक्रमें नंदिनी, नलिनी, मैत्रा, उमा, पशुवर्धिनी व भगवती, या देवतांचें आणि त्या कलशाच्या ठिकाणीं अविघ्न संज्ञक गणपतीचें आवाहन करून त्यांची पूजा करितात. नंतर त्यांतील पहिल्या पांच देवतांपैकीं चार देवता मंडपाच्या चार कोपऱ्यांतील खांबावर व पांचवी मध्य भागाच्या खांबावर स्थापन कराव्या असा जरी विधि आहे तरी मंडपस्तंभावर न बांधतां सुपांतच ठेवतात व त्यांची पूजा करतात. सुपांत भगवती असते. तिच्यासह तें सूप व मातृकापूजन ज्या सुपांत केलें आहे तें मातृकांसह सूप अशीं दोन्ही पात्रें यजमान हातांत घेतो. व पत्नीच्या हातीं अविघ्न कलश देतो. नंतर तीं घराच्या ईशान्य कोनांत, त्यांच्या स्थापनेकरितां सफेती व कुंकवाचे टिपके लावून तयार केलेल्या जागीं, तांदुळांच्या तीन राशीवर तिन्ही ठेवतात. मंडपदेवतांसाठीं व मातृकांसाठीं अशीं दोन निरनिराळीं सुपें न घेतां ज्या सुपांत मातृकापूजन केलें असतें, त्यांतच शाखारूपी मंडपदेवतांची प्रतिष्ठा करण्याचा विशेष प्रघात आहे. निरनिराळ्या मंत्रांनीं हा सर्व विधि होतो. हे सर्व विधि होत असतां मंगल वाद्यें वाजत असतात हें सांगणें नको.

### सीमांतपूजन.

कन्येसाठीं निश्चित केलेला वर परगांवचा असला तर चालू पद्धतीप्रमाणें तत्पक्षीय लोकांना वधूच्या गांवीं यावें लागतें. वर असलेल्या गांवीं जाऊन तेथें मुलगी देण्याची पद्धति अत्यंत गौण मानिली जाते. वरपक्षीय मंडळी लग्नकार्याला एकदोन दिवस असतानाच वधूच्या गावीं येते. या गांवाच्या सीमेजवळ वऱ्हाडी मंडळी आल्याची वर्दी मिळतांच कन्येचा पिता

आपल्या इष्टमित्रांस घेऊन त्यांना सामोरा येतो. नंतर त्या ठिकाणीं वराचें पादप्रक्षालन करून वस्त्रादिकांनीं त्याचें पूजन करावयाचें अशी प्राचीन पद्धति आहे. यावरून या पूजेला सीमांत पूजन असें नांव पडलें आहे. परंतु हल्लीं वर वधूच्या गांवांत राहणारा असो किंवा बाहेरगांवचा असो सीमांतपूजनाचा एक स्वतंत्र समारंभ होतो. सवडीप्रमाणें विवाहाच्या पूर्व दिवशीं किंवा विवाहाच्याच दिवशीं गावांतील उघड्या व प्रशस्त जागेवर असलेल्या देवालयांत किंवा घरांत चटयांची बिछायत घालून ठेविलेली असते तेथें वरपक्षीय मंडळी वाजतगाजत येऊन बसते. वधूपक्षाकडील मंडळी नेमलेल्या वेळीं तेथें मिरवीत येते. यावेळीं वराची पूजा करण्यांत येऊन त्याला वस्त्रपात्रादिक अर्पण करण्यांत येतात. नृत्यगानादिकांत व दारूसामान उडविण्यांत एकदोन तास सहज निघून जातात. अत्तर गुलाब, पान-सुपारी वगैरे सर्वजणांस देण्यांत आल्यावर सर्व मंडळी वराच्या घरीं जाते व तेथें पानसुपारी घेतल्यावर वधूपक्षीय लोक आपल्या मंडपीं येतात. सीमांत पूजनाच्या पायीं पंचवीसपासून एक हजार रुपयांपर्यंत खर्च करणारे गुलहौसी लोक दृष्टीस पडतात. खरें पाहिलें असतां हा विधि इतक्या थाटमाटानें उरकला पाहिजे असा कांहीं शास्त्र-नियम नाहीं. परंतु लग्नकार्य करण्यासाठीं पुढें आलेली मंडळी आवश्यक गोष्टींकडे लक्ष देण्यापेक्षां आपल्या कार्याची तारीफ कांहीं काल तरी गांवकरी लोकांत होईल याकडे अधिक लक्ष देणारी असल्यामुळें विपुल द्रव्याचा अनाठायीं व्यय होतो यांत संदेह नाहीं. सध्यां पैशाची टंचाई दिवसें दिवस अधिक भासूं लागली आहे त्यामुळें सीमांत पूजनासारखे विधि औपचारिक रीत्या लग्नमंडपांत वरानें प्रवेश करण्यापूर्वीं अर्ध्या घटिकेंत आटपून घेतात. दारुसामान, नृत्य-गान यांच्यापायीं द्रव्याचा नाश करून कर्जबाजारी होण्यास सुशिक्षित व समंजस मंडळी तयार नसते हें सुचिन्ह होय. **सीमांतपूजन** या शब्दाचा अपभ्रंश होऊन **श्रीमंत पूजन** असा प्रचारांत शब्द आला आहे ह्मणून कीं काय वधू व वरपक्षीय लोक या विधीच्या वेळीं श्रीमंतीचा आविर्भाव आणून पैशाचा चुराडा करतात. हा प्रकार बंद होणें अत्यंत इष्ट आहे.

### वर प्रस्थान

लग्नमुहूर्त तीन प्रकारचे असतात. दिवा ( दिवसा ), गोधूल किंवा गोरज ( गुरें घरीं येतात ती सूर्यास्ताची वेळ ) आणि रात्रौ. यांपैकीं दिवामुहूर्त हा ब्राह्मणवर्गानें विवाह करण्याला फारच उत्तम मानला आहे. कारण ब्राह्मणांचें मुख्य आराध्य दैवत जो सूर्य त्याच्या समक्ष लग्न लागतें व नंतर वधूवरांस सूर्याचें दर्शन घेतां येतें. यासाठीं शक्य असेल तोंवर दिवसा मुहूर्त साधावा असें जरी शास्त्रकारांचें मत आहे तरी अनेक कारणांमुळें हा मुहूर्त निमंत्रितांस किंवा उभय पक्षीयांस सोईचा वाटत नाहीं. यासाठीं फार करून गोरज किंवा रात्रौ मुहूर्तावर लग्नें लागतात. एऱ्हवीं दिवावत्तीचा व इतर खर्च लक्षात घेतां देखील दिवसा लग्न मुहूर्त धरणें फार फायदेशीर आहे यांत संदेह नाहीं.

मुहूर्तापूर्वीं सुमारें एक तास वराकडील मंडळी चांगला पोषाख करून वराला वधूगृहीं मोठ्या मिरवणुकीच्या थाटानें घेऊन जातात. घरांतून निघण्यापूर्वीं नवरा मुलगा घरामध्यें देवास आणि वडीलजनांस नमस्कार करतो. वराच्या हातांत एक श्रीफल दिलेलें असतें. रस्त्यांत वारांगनांचें नृत्यगान होत होत मंडळी मुंगीच्या पावलांनीं चाललेली असते. अग्रभागीं तासे वाजंत्र्यांचे ताफे वाजवीत जातात. मधून मधून दारू सामानाचे बार कानीं पडतात. मशालीच्या योगानें उजेडाची सोय करण्यांत येतें. वरास शृंगारलेल्या घोड्यावर, किंवा उघड्या गाडींत ( एक दोन मुलांसह ) बसवून किंवा कधीं कधीं पायानें चालत, नेण्याचा परिपाठ आहे. या प्रसंगीं वरानें रेशमी किनारी कोरें धोतर परिधान केलेलें असतें. अंगांत उंची कापडाचा ( रेशमी ) लाल, पिंवळा किंवा पांढऱ्या शुभ्र रंगाचा अंगरखा घातलेला असतो. उजव्या गालावर मध्यभागीं काजळाचें गालबोट लावलेलें असतें. कपाळास भला मोठा कुंकवाचा टिळा लावलेला असतो व डोक्यास तांबड्या रंगाचें पागोटें किंवा फेटा बांधून त्यावर बेगडाच्या लहान मोठ्या मुंडावळी बांधलेल्या असतात. या मुंडावळीला बाशिंग ह्मणतात. वराच्या समोर सुवासिनी स्त्रिया असतात, त्यांपैकीं वरमातेच्या किंवा जवळच्या आप्तस्त्रीच्या हातीं पांच वातीचा दिवा असतो. हा रस्त्यांत विझूं नये ह्मणून एका रवळींत ठेवून त्यावर

झांकण घातलेलें असतें. याशिवाय असेच दिवे सुवासिनींकडे दिलेले असतात. या दिव्याला शकुन दिवा ह्मणतात. ही पंचारती देवक बसविल्यापासून त्याचें विसर्जन होईपर्यंत जळत ठेविलेली असते. या स्त्रीसमुदायांत नवऱ्यामुलाची लग्न न झालेली किंवा सुवासिनी असलेली वहीण किंवा दुसरी कोणी आप्त तरुणी हातांत एक पाण्यानें भरलेला कलश घेऊन जाते. हिला **करवली** असें म्हणतात. रस्त्यांत कांहीं ठिकाणीं भूत बाधेचा परिहार व्हावा ह्मणून वरावरून नारळ ओंवाळून ते फोडून टाकून देतात. लग्नाच्या या मिरवणुकींत देवाच्या पालखीजवळ वापरावयाची छत्री, अवदागीर, तोरणें व चौरी यांचा उपयोग केला जातो.

मुंबईतील मिरवणुकीचा थाट विशेष प्रेक्षणीय असतो. मिरवणुकीच्या दोन्ही बाजूस विशेषतः वराच्या जवळ कारवाइडच्या दिव्यांची रांग, पुढें शृंगारलेले चार दोन घोडे, लहान मुलांमुलींनीं भरलेल्या मोटार गाड्या व घोड्यांच्या गाड्या, रमणीय पोषाख केलेल्या कनकाभरणभूषित लहानमोठ्या सुवासिनी स्त्रिया, मंद पावलानें चालत जाणारा व उंची कपडे घातल्यामुळें प्रसन्नवदन दिसणारा पुरुषसमुदाय, बँड वाद्य वाजवीत जाणारे व इतर वाजंत्री, सर्वांमागें जाणाऱ्या मोटार व इतर गाड्यांतील सुखवस्तु मंडळी यांच्यामुळें मिरवणुकीचा थाट फार प्रेक्षणीय दिसतो. केवळ मिरवणुकीच्या व्यवस्थेसाठीं दोन अडीचशेंपासून पांचसहाशें रुपये इतक्या द्रव्याचा एका तासांत खर्च होतो. याप्रमाणें मिरवीत मिरवीत वरपक्षीय मंडळी वधूमंडपाजवळ येऊन पोंहचली ह्मणजे वधूमाता व पिता सामोरा येऊन वराचें स्वागत करतात. सीमांत पूजनाच्या वेळीं करण्याची पूजा याच वेळीं उरकली जाते. ही स्वागतपर

## वरपूजा

करण्याचा प्रकार असा आहे. नवरामुलगा दरवाजापाशीं येतांच त्याजवरून कन्येची माता कुंकुममिश्रित पाणी उतरून टाकिते. व त्याला आरती ओंवाळते कन्येचा पिता वराचे पाय धुतो. मग आसनावर वसवून त्याची कन्यादान करणारें दंपत्य पूजा करितें. यजमानाच्या शक्तीप्रमाणें धोतरजोडा, शेला,गोटें, समई, तांब्या पंचपात्रीपळी, ताट वगैरे जिन्नस वरास देण्यांत येतात. नंतर यजमान वराच्या उजव्या हातास धरून त्याला लग्नमंडपांत नेऊन बसवितो. वराची मधुपर्क पूजा करण्यापूर्वी ज्येष्ठ जामात असल्यास त्यास अहेर करण्यांत येतो. नंतर विवाहकार्यांगभूत मंडपांतील प्रथम कार्य जें मधुपर्क पूजा यास आरंभ होतो.

# श्री चक्रवर्तीश्वर शिवलिंग

## स्थापना समारंभ.

( आमच्या खास बातमीदाराकडून. )

श्रीक्षेत्र गोकर्ण येथें कैवल्यपुर मठाधिपति श्रीमत्पुर्णानन्द सरस्वती स्वामी यांनीं उभारलेल्या गौडपादाचार्य मठांत श्री चक्रवर्तीश्वर लिंग स्थापना-समारंभ गेल्या फाल्गुन शु. १० मी रविवारीं ( ता. २९ फेब्रुआरी १९२० ) मोठ्या थाटानें पार पडला. या समारंभासाठीं गोमंतक, खानापुर, मुंबई, नाशीक, मंगळूर, कोर्चा वगैरे ठिकाणाहून सुमारें ५०० गृहस्थ आले होते. शिवाय कारवा रजिल्ह्याच्या निरनिराळ्या भागांतून सुमारें एक हजार शिष्यशाखेंतील मंडळी हजर होती. सर्वांच्या सोईकडे लक्ष पुरविण्यासाठीं एक स्वयंसेवकांचें पथक समारंभाच्या मुदतींत हजर असल्यामुळें एकंदर व्यवस्था समाधानकारक रीतीनें पार पडली.

प्रतिष्ठांगकर्माला फाल्गुन शु. ६ ष्ठी पासून प्रारंभ झाला. या कामीं कोची, कर्नाटक, गोवा, वरघाट व नाशिक वगैरे प्रांतांतील विद्वान् वैदिकांची योज

करण्यांत आली होती. स्मार्त, वैष्णव, गौड व द्राविड वैदिक मतभेद लक्षांत न घेतां यज्ञकंकण हातांत बांधून वैदिककर्म चालवीत असलेले पाहून मोठें कौतुक वाटलें. होमहवनादिक कृत्यासाठीं मठाच्या उत्तर बाजूस भव्य असा यज्ञमंडप उभारण्यांत आला होता. हा मंडप चारपांच दिवस चाललेल्या या कृत्याच्या वेळीं मंत्र-घोषानें दुमदुमून गेल्यामुळें एकंदर वातावरण अत्यंत पवित्र, धार्मिक व आनंदयुक्त असल्याचा मनावर परिणाम होत होता.

मठाची रचना फारच सुंदर झाली आहे. अशा प्रकारची भव्य व नयनमनोहर इमारत पाहतां जुन्या काळच्या लहानशा राजवाड्याची कल्पना येते. पश्चिमेकडील दिवाणखान्यास. 'पूर्णानन्द हॉल' असें नांव देण्यांत आलें असून यांत सहा सातशें मंडळी सहजरीतीनें बसूं शकते. या दिवाणखान्यांत अनेक सुंदर चित्रें टांगण्यांत आलीं होतीं. त्यांतही अल्पवयी चित्रकार व संस्थानचे शिष्य रा. मंगेश वामन दुभाषी यानीं समारंभासाठीं मुद्दाम तयार करून पाठविलेल्या ब्रह्मीभूत श्री आत्मानंद सरस्वतीस्वामी व विद्यमान श्री पूर्णानंद सरस्वतीस्वामी यांच्या सुबक रंगीत तसबिरींमुळें या दिवाणखान्यास विशेष शोभा आली.

कवळे मठाधिपतींचे मठ अनेक ठिकाणीं असून निरनिराळ्या ठिकाणीं असलेले कागदपत्र, दानपत्रें, वगैरे या गोकर्ण मठांत व्यवस्थित रीतीनें ठेविल्यास बरें होईल. तसेंच धर्मपुस्तकांचा संग्रह करून या मठांत एक कायमचें वाचनमंदिर ठेविल्यास फार उपयुक्त होईल. जुन्या परंपरेस न सोडतां चालू कालास अनुरूप असें कार्य करण्याकडे धर्माध्यक्ष व त्यांचे शिष्य यांची प्रवृत्ति असली पाहिजे, हें सांगणें नको.

प्रतिष्ठा-कर्म चाललेल्या मुदतींत बाहेरगांवाहून आलेल्या मंडळीची वेळ गीताप्रवचनें, हरिकीर्तनें व रा. मंगेशराव तेलंग यांचे वीणावाद्य ऐकण्यांत मोठ्या आनंदांत गेली. श्रींच्या दर्शनलाभानें व प्रेमपूर्ण संभाषणानें देखील शिष्यवृंद मुदित झाला. समारंभाचा शेवटचा दिवस तर विशेष उत्साहाचा होता. फाल्गुन शु. १० मी रविवारीं दिवसा वृषभ लग्नाच्या शुभ मुहूर्तावर ( ११ वाजून ४ मिनिटें ) श्रीचक्रवर्तीश्वर लिंगाची यज्ञमंडपांतून थाटाची मिरवणूक निघून मठांत नियोजित जागीं स्थापना करण्यांत आली. यावेळीं स्त्रीपुरुषांचा समुदाय सुमारें पांच हजार होता. उत्साह, धर्मशीलवृत्ति व आनंद यांहीं अलंकृत व प्रसन्नचित्त ज्ञातिबंधुभगिनींचा समाज अशा रीतीनें एकत्र पाहण्याचा सुयोग लाभणें महद्भाग्य आहे असे उद्गार चहूंकडे ऐकूं येत होते. हा उल्हासप्रद देखावा हजर असलेल्या स्त्रीपुरुषांच्या स्मृतिपटलावरून जाणें शक्य नाहीं. लिंगप्रतिष्ठा झाल्यावर दुसऱ्या दिवशीं उत्सवार्थ जमलेल्या श्रींच्या शिष्यमंडळीनें स्वामी महाराजांच्या चरणीं कांहीं पूजाद्रव्य व वस्त्रादिकांचा नजराणा चांदीच्या ताटांतून भक्तिपूर्वक अर्पण करून श्रींस

### मानपत्र समर्पण

केलें. मानपत्र शिष्यवृंदाच्या तर्फे रा. रा. वेंकटराव वैकुंठ वाघ ( बी. ए. एल. एल. बी. फर्स्टक्लास सर्बॉर्डिनेट जज्ज, कारवार ) यानीं वाचलें. त्यांतील मजकूर पुढीलप्रमाणें होताः—

**श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य पदवाक्य प्रमाण पारावार पारीण यमनियमासन प्राणायाम प्रत्याहार ध्यानधारणासमाध्यष्टांग योगानुष्ठानगरिष्ठ निष्ठानादि गुरुपरंपराप्राप्त निगमागमसार श्रुतिमार्गप्रकाशक सर्वतंत्र स्वतंत्र श्रीमज्जामदग्नितनुजतपस्स्वाध्यायार्थ विनिर्मित शूर्पारक महाक्षेत्र गोमंताचल गोमतीतीर सन्निहित कुशस्थलीनगर महामठादिप्रतिष्ठापनाचार्य सकलसुरमुकुटमणिनीराजित दिव्य श्री भवानीशंकरपादारविंदाराधक श्रीमच्छिवानंद सरस्वती करकमलसंजात श्रीमदात्मानंदसरस्वत्यनुगृहीत श्रीमत्पूर्णानंदसरस्वती श्रीपादेषु ॥**

श्रीगोकर्णक्षेत्रांत नूतन बांधलेल्या श्रीगौडपादाचार्य मठांत श्री चक्रवर्तीश्वर लिंग स्थापनोत्सव प्रसंगीं जमलेल्या शिष्य वर्गाची सविनय विज्ञप्ति ऐशीजे.

परमपूज्य ब्रह्मीभूत श्रीगुरु आत्मानंद सरस्वती स्वामी महाराजांचे सन्निध श्रींनीं बाल्यावस्थेपासून विद्यार्जन करून सद्वर्तनानें श्रीगुरूच्या कृपेस व अनुग्रहास पात्र करून घेतलें व वयाच्या सतराव्या वर्षीं श्रींस कैवल्य मठाच्या गौडपादाचार्यपरंपरेंत चतुर्थाश्रमद्वारा शिष्यत्व प्राप्त झालें.

नंतर श्रींनीं श्रीगुरु स्वामी महाराजांच्या नेतृत्वाखालीं संन्यासाश्रमास उचित असें जपतप विद्यानुष्ठानाचें

[illegible] व श्रीगुरुस्वामींस आपल्या सदाचारानें व बुद्धिमत्तेनें प्रसन्न केलें. परंतु कालगतीनें श्रीगुरुस्वामी लवकरच समाधिस्थ झाल्यामुळें श्रींस सत्शिष्यास प्रिय असा गुरुसेवेचा लाभ बहुकाल झाला नाहीं. व संस्थान चालविण्याचा भार श्रींवर अल्प वयांतच आला.

तथापि श्रीगुरुप्रसादानें व श्रींच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेच्या प्रभावानें संस्थानाची व्यवस्था उत्तम प्रकारें राखून व अनेक आवश्यक सुधारणा करून श्रींनीं बरेंच यश संपादिलें. त्याचें संक्षिप्त कथन करितों.

जुन्या काळापासून चालत आलेलें परंतु अलीकडे कित्येक वर्षांपासून इंदूर संस्थानांत अमानत म्हणून राहिलेलें आमच्या संस्थानचे इनामी उत्पन्न पुनः प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न श्रीगुरु स्वामीनीं चालविला होता. तो त्यांच्या पश्चात् श्रींनीं योग्य प्रकारें पुढें चालू ठेवून सदर इनामी उत्पन्न मिळविलें. त्याच प्रमाणें नाशिक जिल्ह्यांत पेशवाईचे वेळेपासून चालत आलेल्या इनामी उत्पन्नाच्या वसूलीस होणारा प्रतिबंध श्रींनीं योग्य प्रयत्नानें दूर करवून सदर उत्पन्न सरकार मार्फत सुरळीत मिळण्याची व्यवस्था केली.

तसेंच उत्तर हिंदुस्थानांत ब्रह्मावर्त येथील आपल्या संस्थानाच्या मठाचा जीर्णोद्धार केला. व काशीक्षेत्रांतील मठाचाही जीर्णोद्धार स्वतः राहून करवून तिकडील उत्पन्न सुमारें दोनतीनशे रुपये येत होतें, तें हल्लीं योग्य व्यवस्था करून दरसाल बाराशें रुपये येण्याजोगें केलें.

श्रीक्षेत्र नाशीक येथें श्रीमंत पेशव्यांकडून इनाम मिळालेल्या जागेंत असलेल्या मठाचा जीर्णोद्धार करून नाशीक शहरांत संस्थानचे इभ्रतीस व शेजारीं असलेल्या श्रीमंत पेशव्यांच्या वाड्यास शोभेल अशी उत्तम इमारत उठविली. परंतु दैवगतीनें तिचा बराच भाग अग्निनारायणास अर्पण झाला, तथापि श्रींनीं आपलें चित्तस्थैर्य कायम राखून तो मठ पुनः उत्तम प्रकारें बांधविला. नाशीक शहरांतील या मठासंबंधानें वगैरे कामें करविण्याकरितां श्रींची स्वारी तिकडे ४–५ वर्षें राहिली. स्वकीय शिष्यवर्गाची अल्प वस्ती असणाऱ्या नाशिक क्षेत्रीं याप्रकारें श्रींनीं स्वतः राहून हें सर्व काम करून घेतलें. याबद्दल शिष्यवर्ग श्रींचा ऋणी आहे.

या पवित्र गोकर्णक्षेत्रांत श्रीपद्गौडपादाचार्य संस्थानचा मठ असावा अशी श्रीगुरु श्रीमदात्मानंद सरस्वती स्वामी महाराजांची उत्कट इच्छा होती, व तदर्थ त्यांनीं प्रयत्नही चालविले होते. परंतु त्यांच्या कारकीर्दींत तो योग जमून आला नाहीं. श्रींनीं नाशिकमठाचें काम पूर्ण झाल्यावर तीन वर्षांमागें इकडे येऊन मुक्काम करून अल्पावधींत मोठ्या कल्पकबुद्धीनें या विशाल, भव्य, आणि सुंदर इमारतीची उभारणी केली याबद्दल सर्व शिष्यवृंद अंतःकरणपूर्वक श्रींचे उपकार मानीत आहे.

विशेष अपूर्व व आनंदाची गोष्ट ह्मटली म्हणजे या नूतन मठांत श्रीचक्रवर्तीश्वर लिंगाची स्थापना झाली ही होय. हें शिवलिंग हिंदुस्थानांतील उत्तम कारागिरांनीं तयार केलें असून तें प्रसिद्ध फिलाडेल्फिया प्रदर्शनाकरितां अमेरिकेपर्यंत जाऊन तिकडून इंग्लंडांत आलें. तेथें तें हिंदुस्थानच्या आर्यधर्माविषयीं सादर अभिमान बाळगणारे प. सर जॉर्ज बर्डवुडसाहेब यांचे हातीं आलें. तें त्यांनीं कै. रा. ब. घनश्याम नीळकंठ नाडकर्णी यांच्याद्वारें श्रीगुरुमहाराज श्रीमदात्मानंद सरस्वतीस्वामींकडे योग्य ठिकाणीं स्थापन करण्याकरितां आदरपूर्वक पाठविलें. अमेरिका वगैरे ठिकाणीं फिरून पुनः आपल्या जन्मभूमीस येतांना चक्रवर्तीश्वर हें नांव प. सर जॉर्ज बर्डवुडसाहेबांच्या कल्पनेनेंच या शिवलिंगास प्राप्त झालें. हें शिवलिंग आपल्या जन्मभूमींत ( हिंदुस्थानांत ) स्थापिलें जावें अशी त्यांची इच्छा होती. तदनुसार गोकर्णक्षेत्रासारिख्या परम पवित्र स्थानीं भव्य असा नवीन मठ उभारण्यांत येऊन तेथें त्याची स्थापना होणें हा अपूर्व योग आहे.

या चक्रवर्तीश्वर लिंगाची प्रतिष्ठा सिद्धार्थी संवत्सर फाल्गुन शु० १० मी रविवार ( ता० २९।२।२० अकरा वाजून चार मिनीटें ) या सुमुहूर्तावर या नूतन मठांत करून ब्रह्मीभूत श्रीमदात्मानंदस्वामी महाराजांची इच्छा श्रींनीं पूर्ण केली. व तसेंच या प्रतिष्ठेनें प० सर जॉर्ज बर्डवुड व रा ब. घनश्याम नीळकंठ नाडकर्णी यांची इच्छा देखील पूर्ण झाली. याबद्दल सर्व शिष्यवृंदास साभिमान आनंद वाटत आहे.

हीं सर्व महत्कृत्यें करण्यांत श्रींचें लक्ष फार वेधून राहिलें असल्यामुळें देहास व मनास श्रमझाले व त्यामुळें श्रींची प्रकृती क्षीण झालेली पाहून आम्हां शिष्य-

वृंदास खेद होत आहे. याकरितां श्रीनीं कांहीं काळ गोकर्ण मठांत रहावें व विश्रांती घेऊन प्रकृति सुधरून घ्यावी अशी आमची सविनय प्रार्थना आहे.

या पुढें ही श्रींच्या मनांत कवळें, मुंबई वगैरे ठिकाणच्या जीर्णमठांचा उद्धार करण्याचें आहे हें जाणून आम्हांस आनंद वाटत आहे.

हीं सर्व संस्थानासंबंधीं व्यावहारिक कामें यथायोग्य करूनसुद्धां श्रीनीं आपल्या आश्रमास व गौडपादाचार्यपरंपरेस उचित अशी जपतपादि नेमनिष्ठा उत्तम प्रकारें चालविली आहे. हें पाहून आम्हां शिष्यांस तर अतिशयच अभिमान व आनंद वाटत आहे.

वरील एकंदर कृत्यांबद्दल कृतज्ञता दर्शविण्याची भावना श्रींच्या शिष्यवृंदाच्या अंतःकरणांत बहुत कालापासून होती. ती आजच्या अपूर्व शुभ प्रसंगीं व्यक्त करून हें विज्ञप्तिपत्र श्रीचरणीं अर्पण करीत आहों. तरी तें श्रीनीं प्रेमपूर्वक स्वीकारावें व आशीर्वादाचा अनुग्रह करावा अशी श्रीचरणीं आम्हां सर्वांची सविनय प्रार्थना आहे.

श्रीक्षेत्र गोकर्ण गौडपादाचार्य मठ,
मिति फाल्गुण शु० ११ शी इंदुवासर
तारीख १ मार्च १९२०
} श्रींचे अज्ञांकित शिष्य.

या प्रमाणें कित्येक शिष्यांच्या सह्या असलेलें मानपत्र अर्पण करण्यांत आल्यावर रा. दत्तात्रय भास्कर नाडकर्णी, करवार, रा. शंकर आनंदराव नाडकर्णी, अंकोला, वे. रामचंद्र वामन शास्त्री करंडे, गोवा व सदाशिव रंगराव मुखठणकर, बेळगांव, यांचीं समोचित सुश्राव्य भाषणें होऊन अत्तर गुलाब व प्रसाद वाटल्यावर त्या दिवसाचा समारंभ पूर्ण झाला.

त्यानंतर दुसऱ्या दिवशीं म्हणजे फाल्गुन शु १२ शी मंगळवार रोजीं श्रींच्या शिष्यवृंदाची महासभा भरली. अध्यक्षस्थानीं श्रींची स्वारी विराजमान झाल्यावर संस्थानच्या हिताविषयींच्या काहीं प्रश्नांचा विचार करण्यांत आला. श्रींस सादर करण्यांत आलेल्या मानपत्रास खालील आशयाचें श्रींकडून उत्तर देण्यांत आलें.

“ शिष्य वृंदानें जें भक्तिपूर्वक मानपत्र दिलें तें प्रेमाचें द्योतक म्हणून त्याचा स्वीकार करण्यांत येत आहे. संस्थानचें उत्पन्न मिळविण्याच्या व वाढविण्याच्या तसेंच कित्येक मठांचा जीर्णोद्धार करण्याच्या कामीं अनेक शिष्यांकडून संस्थानास मदत झाली आहे. इंदूर येथील उत्पन्न हातीं येण्यास कै. रावबहादूर बळवंत रावजी वागळे यांचे परिश्रम कारण झाले. श्रीक्षेत्र नाशीक येथील मठास श्रीमंत दाभाडे व छत्रपति शाहू महाराज यांनीं इनामें दिलीं व तीं श्री. पेशव्यांनीं चालू केलीं. तेथील मठाची जागा बादशहाचें राज्य असतांना दादा पाटिल वल्द वेंकाजी पाटील गुलशानाबाद यांनीं ता० ३ सफर सन २५ ला इनाम करून दिलेली आहे. ज्यांनीं सांकळीला मठ बांधून तेथेंच समाधी घेतली ते पूज्यपाद श्रीमत्पूर्णानन्दसरस्वती स्वामी यांनीं नाशीक येथील आद्यमठ बांधला. या मठाच्या जीर्णोद्धाराचें काम कै. विष्णु बाळकृष्ण पंडित यांच्या मदतीनें झालें. व मठ जळल्यावर रा. आप्पाजी भास्कर तेलंग यांनीं श्रम करून काम संपविलें. ब्रह्मावर्तें येथें मठाची दुरुस्ती कै. रा. ब. बळवंतराव वागळे यांच्या मदतीनें झाली. श्रीक्षेत्र काशी येथें चातुर्मासांत श्रीसंस्थानचा मुक्काम होता त्या मुदतींत रा. दत्तोबाराव तिनैकर यांची मदत मिळाल्यामुळें तेथील मठाच्या जीर्णोद्धाराचें काम संपूर्ण करितां आलें. गोकर्ण क्षेत्रांतील मठाची जागा चेंडियें ( कारवार ) येथील रहिवासी शाबाजी बाब शेणवी यांची पत्नी अन्नपूर्णाबाई यांजकडून शके १७५३ त देण्यांत आली. त्यावेळीं खानापूर मठांत समाधिस्थ झालेले श्री आत्मानंद सरस्वती स्वामी संस्थानच्या गादीवर होते. पुढें परमपूज्य गुरु श्रीआत्मानन्द सरस्वती स्वामी यांनीं मठ उभारण्याचें योजून शिष्य वृंदाची सभा भरविली. आणि त्या सभेच्या विनंतीवरून वर्गणी गोळा करण्यास शके १८०८ सालीं आरंभ केला. आजवर वर्गणी रु. ३०९१८५, वसूल झाली. या रकमेपैकीं ५६० रुपये व्याजीं ठेविलेले सव्याज बुडाले. पुढें श्रीगुरुस्वामींनीं कांहीं शिष्यवर्गातील गृहस्थांच्या विनंतीवरून येथें एक घर असलेली जागा मठासाठीं रु. ७००० स खरेदी केली व त्यांपैकीं २००० रुपये मात्र मालकास दिले. त्यानंतर ५००० रुपये इकडून देण्यांत आले. असा हा मठाप्रीत्यर्थ संस्थानास शिष्यवृंदाकडून लाभलेल्या पैशाचा जमाखर्च आहे. ज्यांनीं वर्गणी देण्याचें अभिवचन दिलें होतें त्यांजकडून ती वसूल करणें व इतर शिष्यांवर वर्गणीचा आकार बसवून ती गोळा करणें अनेक परीनें दुःसाध्य व इष्ट न वाटल्यामुळें संस्थानच्याच पैशानें

हा मठ बांधण्यांत आला. मठाचा पाया शके १८३९ आश्वीन शु. १० मीला घातला व शके १८४१ फाल्गुन शु. १० मीस श्रीचक्रवर्तीश्वर लिंगाची प्रतिष्ठा करण्यांत आली. अर्थात् २८ महिन्यांत मठाचें काम संपूर्ण झालें. या कामीं अनेक शिष्यांची मदत झाली. त्यांपैकी रा. रामचंद्र विठ्ठल नाडकर्णी यांची मदत सर्व बाजूंनीं उपयोगी पडली. कारवार जिल्ह्यांतील कामकाजाचा बोजा रा. वेंकटराव गणपत शेटगिरी यांनीं पतकरल्यामुळें तिकडील कामासंबंधानें काळजी करावी लागली नाहीं. रा. शिवराव पांडुरंग तेलंग व रा. विनायकराव मोरजकर यांच्या साह्यानें मठ उभारण्याचें काम सुलभ झालें. त्याचप्रमाणें रा. भास्कर श्रीनिवास मुझुमदार व रा. गोपाळराव शंकर वागळे यांच्याकडूनही अनेक प्रकारें मदत झाली आहे. मध्यंतरी मठाची जागा पोलीस लाइनसाठीं घेण्याचा सरकारचा विचार होता. हा प्रसंग चुकविण्यासाठीं रा. दत्तात्रय भास्कर नाडकर्णी, रा. मुकुंद वासुदेव कुळकर्णी ( खार्गेकर ) व रा. शंकर आनंदराव नाडकर्णी यांचें एक डेप्युटेशन् जिल्हाधिकारी कलेक्टरसाहेब यांकडे पाठवावें लागलें. या डेप्युटेशनच्या प्रयत्नाला यश आल्यामुळें आज हा मठ या जागीं दिसत आहे. प्रस्तुतचा समारंभ पाहण्यास रा. मुकुंदराव हयात राहिले नाहींत याबद्दल वाईट वाटतें. याप्रमाणें ज्या गृहस्थांनीं अभिमानपूर्वक मदत करून निरनिराळ्या प्रकारें संस्थानचीं कामें पार पाडलीं त्यां सर्वांचें कल्याण होण्याविषयीं श्रीभवानीशंकराकडे प्रार्थना आहे. चक्रवर्तीश्वर प्रतिष्ठेच्या कामीं सर्व वैदिक ऋत्विजांनीं अभिमानपूर्वक यथासांग काम केलें आणि स्वयंसेवकांनीं अत्यंत परिश्रम घेऊन अभ्यागतांचीं उत्तम व्यवस्था ठेविली. तसेंच शिष्यवर्गानें व इतर मंडळीनेंही आपल्या उपाधी बाजूस सारून प्रेमपूर्वक येथवर येण्याचे श्रम घेतले व प्रतिष्ठामहोत्सवास अपूर्व शोभा आणिली. याबद्दल ही सर्व मंडळी श्री संस्थानच्या कृपाप्रसादास पात्र असून त्यांचें कल्याण होण्याविषयीं आशीर्वाद आहे."

याप्रमाणें श्रींचें पूर्व दिवशीं अर्पण केलेल्या मानपत्रास उत्तर देण्यांत आलें. तें ऐकून सभाजनांस आनंद झाला. संस्थानच्या देखरेखीखालीं एक वेदपाठशाळा ठेवून विद्वान वैदिक तयार होतील अशी व्यवस्था व्हावी अशा अर्थाचा वादविवादाअंतीं शिष्यमंडळींचा ठराव लक्षांत घेऊन श्रींनीं आज्ञापिलें कीं

"वेद पाठशाळा"

स्थापन करून वेद व शास्त्र यांत पारंगत असे वैदिक तयार करणें अगत्याचें आहे ही गोष्ट मान्य आहे. या विषयीं ब्रह्मीभूत गुरुवर्यांच्या पूर्वपरंपरेपासून प्रयत्न चालू आहे. परंतु हें महत्वाचें काम जितक्या नेटानें व तत्परतेनें हातीं घेतलें पाहिजे तितक्या नेटानें तें हातीं घेण्यांत आलेलें नाहीं. मुख्यत्वें अशा कार्यास मोठा द्रव्य निधि लागतो. आणि तो उभारल्या शिवाय हें कार्य साध्य होणार नाहीं. या प्रश्ना संबंधानें शिष्य वृंदाची उत्कट इच्छा दिसून येते. हें पाहून संतोष वाटतो. शिष्यवृंदाची सदिच्छा शक्य तितकी पूर्ण करणें संस्थानचें श्रेष्ठ कर्तव्य कर्म आहे. तरी हा द्रव्य निधि जमविण्यास आरंभ व्हावा म्हणून संस्थानांतून तीसहजार रुपयांची मदत देण्यांत येईल. मात्र या रकमेंत शिष्यवृंदानें एक लक्ष रुपयांची तरी भर घातली पाहिजे. म्हणजे वेदपाठशाळेची योग्यप्रकारें स्थापना करून ती यशस्वी रीतीनें चालवितां येईल. प्रत्येक स्त्रीपुरुषाकडून एक रुपयाहून कमी नाहीं इतकी वर्गणी गोळा केल्यास सहज रीतीनें एक लक्ष रुपये जमा होतील. या कामीं 'रुपया फंडा' ची योजना अमलांत आणण्यासारखी आहे. आणि तसें केल्यास अल्पकालांत आवश्यक तितका द्रव्यनिधि मिळण्यास अडचण पडेल असें दिसत नाहीं. वर्गणी जमविण्याचें कार्य शिष्यवृंदानें अंगावर घेऊन आवश्यक तितकी रकम गोळा करावी म्हणजे पाठशाळा उघडण्यांस ठीक पडेल."

श्रींच्या भाषणानें सर्वांस परमानंद झाला. फंड उभारण्यासंबंधानें महासभेचा ठराव होऊन गोमंतक, कारवार, बेळगांव वगैरे ठिकाणच्या हजर असलेल्या शिष्यवृंदांतून त्या त्या प्रांतापुरत्या कमिट्या नेमून फंड जमविण्याच्या कामास प्रारंभ करण्यांत आला. या प्रीत्यर्थ माहितीपत्रकें व पावतीपुस्तकें वगैरे छापण्यासाठी लागणारी रकम तत्काल जमा झाली.

सभेचें काम आटोपल्यावर होमहवनादि कामासाठीं बाहेरगांवाहून आलेल्या सर्व ऋत्विज ब्राह्मणांस त्यांच्या योग्यतेनुसार दक्षिणा व येण्याजाण्याचा खर्च देण्यांत आल्यावर इतर ब्राह्मणांस दक्षिणा वांटण्यांत आली.

स्वयंसेवकांस मुद्दाम तयार करून आणलेलीं चांदीचीं चक्रवर्तीश्वर व श्रींच्या नांवाचीं पदकें प्रसादासह देण्यांत आलीं. चित्रकार रा. दुभाषी यांच्या चित्रकौशल्याची तारीफ करून त्यांस मौल्यवान् जरीचा शालू फलमंत्राक्षतासह आशीर्वादपूर्वक रवाना करण्यांत आला.

शिष्यशाखेतील अजमासें दीडहजार स्त्रीपुरुषांना तीर्थप्रसाद देण्यांत आला. त्याच दिवशीं चित्रापूर मठाचे गुरु गोकर्णांत त्यांच्या मठांत होते त्यांजकडे पांचशें पात्रांस भोजन देण्यासाठीं शिधासामग्री पाठविण्यांत आली. उभय मठांतील सलोख्याचें व प्रेमाचें द्योतक असा तीर्थप्रसाद ग्रहणाचा समारंभ चित्रापुर स्वामींच्या मठांत योग्य रीतीनें साजरा करण्यांत आला.

याप्रमाणें हा समारंभ पूर्णपणें यशस्वी झाला. संस्थानच्या तीन परंपरांपासून गोकर्णक्षेत्रीं गौडपादाचार्य मठ उभारण्याचा हेतु श्रींनीं स्वतेजाच्या बलावर तडीस नेला. परंतु या मठाची व्यवस्था नीट रहावी व लिंगाच्या अर्चेबद्दल आवश्यक कायमचें उत्पन्न मिळावें यासांठीं महासभेच्या विचारानें कांहीं तरी योजना व्हावयास पाहिजे होती. तसेंच कोटितीर्थावर खास गौडसारस्वत ब्रह्मवृंदासाठीं एक धर्मशाळा बांधण्यासाठीं श्रींनीं जागा मिळविली आहे. ती धर्मशाळा आपल्या खर्चानें बांधण्यासाठीं आमचे गृहस्थ पुढें आले असते, तर या प्रसंगास उचितच झालें असतें, असें कित्येकांचें मत आहे. महासभेनें या गोष्टींचा मुळींच विचार केला नाहीं याबद्दल वाईट वाटतें.

---

## श्रीक्षेत्र गोकर्ण येथील मठाची जागा.

# दानपत्राची नक्कल.

**श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य पदवाक्य प्रमाण पारावार पारीण यमनियमासन प्राणायाम प्रत्याहार ध्यानधारणासमाध्यष्टांग योगसाधनसंपन्न सकलसुरनिकरस्पूरमुकुट विराजित दिव्य श्रीभवानीशंकरपादारविंदाराधक श्रीमत्पूर्णानंद सरस्वती करकमल संजात श्रीमच्छिवानंद सरस्वत्यनुग्रहीत श्रीमदात्मानंद सरस्वती श्रीपादैः................**

स्वस्ती श्रीनृपशाहलीवाहन शके १७५३ वरुष खर नाम संवत्सर आशाड शुक्ल ७ मी स्थिरवासर श्रीमठ संस्थानासीं अंकोला ताल्लूक कडवाड मागणी मौजा चेंडिये कुळकर्णी बाव शेणवी सुत शाबाजी शेणवीचे बायकू अन्नपूर्णा बाईनें लिहून दिला दानपट्टा ऐसाजें. ताल्लूक मजकूर गोकर्ण मागणीं कसबा मौजेंत श्री महाबळेश्वर देव उतार जमीन धारेवर मठचे स्थळ बहुतेक दिवस मूलगार नाहीं ते बंजर पडले वरून ते जमीन देवस्थान मणेगार सुब्बैया व शानभोग अनंतैया मारीफत माझे यजमान शाबाजी शेणवी याणीं सांगून घेवून श्रीमहाबळेश्वर देवाचे भंडारास १८२॥ एक होन आडिच फलम् काणीक देवून सरकार बेरीज ८१।= सवा फलम् दोनि आणा तीवेंस मोकर करून घेवून या बाबत श्री महाबळेश्वर देवस्थानाहून आमचे यजमान शाबाजी शेणवींचे नावीं मूलपट्टा लिहून दिला तेबाबत जमीन आम्ही अनभोगून येणेचे हालीं श्रीस्वामीचे संस्थानास दत्तकरून दिली आहे. सदरीं जमीनीचे चतुर्गंडी पूर्व दिशेस डोंगरावरून उतरणे पाणी लोटाचे सराद १ दक्षिण दिशेस शडाक्षर देवस्थान स्तळचे बाजूस लागून असणेचे पाणी वाहणे व्हाळीचे सराद १ पश्चिम दिशा राजमार्ग येणे जाणेचे पाणदी वरते

पागाराचे सराद १ उत्तर दिशा सदरीं धारेश्वर मठाचे स्तळांत रवळे प्रभूस मूलास लिहून दिले बागाचे आडेचे सराद १ एवं चतुर्गडी मधील स्तळास सदरी मोकरार पावलेतीवां ८१।= सवा फलम् दोनि आणां बेरिजेचे जमीनींस सरकारांत श्रीस्वामीचे नावीं वर्ग घालून घेवून सालवसाल मोकर पावले जमाबंदी ऐवज देवून जमीन संस्थानासी अनभोगून यावें. आमचे संततीस व आमचे दायवादींस देखील संमंध नाहीं या बाबत सदरीं जमीन मूलपट्टा सध्य हाजर नाहीं. ते आणून घेवून संस्थानासी देत आहे. म्हणून लिहून दिला दानपट्टा सही.

( सही ) श्रीराम.

यासी साक्षी

(सही) गोकर्णनिवासी नागप्प शानभाग याची साक्षी रुजु ( कानडीनें आहे )

(सही) भिकप्पा आरस याचे साक्षी रुजु.

(सही) वेंकटेश लक्ष्मणभट्ट सुकटाणेकर साक्षी रुजु.

(सही) पांडुरंग नारायण शेणवी पिकळे साक्षी रुजु.

(सही) नारायण शाबाजी शेणवी शेटगिरी साक्षी रुजु.

(सही) लिखीत मांगवा देवराव नाडकर्णी अंकोला.

( सध्यां या जागेची किंमत अजमासें १५००० रुपये होईल. सं. म. सारस्वत.

## ज्ञातिसमाचार·

—**कुमारी माणकबाई कोसंबी**—गोमंतकाचे सुपुत्र व आपल्या स्वतःच्या कर्तबगारीनें उच्च पदवीला चढलेले प्रो. **धर्मानंद कोसंबी** यांच्या कन्या कु. **माणकबाई** यानीं अमेरिकेंतील शिक्षणक्रमांत विलक्षण प्रगति करून घेतली असून पुढील सालाकरितां त्यांनां दोनशें डॉलरची स्कॉलरशीप मिळाली आहे. गेल्या सालीं इकडे म्यॅट्रिक पास होऊन त्या अमेरिकेला गेल्या, तेथें पूर्वी त्यांना अनियमित विद्यार्थिनी म्हणून शाळेंत दाखल केलें होतें; परंतु त्यांची तरतरी, असामान्य बुद्धिमत्ता यांच्या योगानें त्या बॉटनीमध्यें पहिल्या वर्गांत, इंग्लिशमध्यें दुसऱ्या वर्गांत व इतर विषयांत पास वर्गांत पसार झाल्या. आतां त्यांचें नांव नियमित विद्यार्थिनीच्या पटांत नोंदलें गेलें असून 'समर स्कूल' मध्यें या वर्षी त्या जात आहेत. येथें त्यांना एकंदर सोळा कोर्स करावे लागतील. त्यांनीं या वर्षी राज्यव्यवस्था ( government ) मानसशास्त्र (psychology) फ्रेंच, इंग्लिश व जर्मन या भाषा घेतल्या आहेत. कु. माणकबाई आपल्या शिक्षणक्रमांत यशसंपादन करून योग्यकालीं स्वदेशीं परत आल्यावर त्यांचें उदाहरण सारस्वत व इतर भगिनींस स्फूर्तिदायक होईल यांत संदेह नाहीं. प्राप्त यशाबद्दल या बुद्धिमान् कुमारीचें महाराष्ट्र-सारस्वत अभिनंदन करीत आहे.

—**श्रीयुत काशीनाथ रामचंद्र गुंजीकर.** सुप्रसिद्ध साहित्यसेवक ( सरस्वतीमंडळाचे कर्ते ) कै. रामभाऊ गुंजीकर यांचे चिरंजीव व कै. जयवंतराव यांचे बंधु श्री. काशीनाथपंत हे विलायतेंत बी. ए. ची परीक्षा पसार होऊन येथें आले आहेत. १९१६ सालीं सर मंगलदास स्कॉलरशिप यांस मिळाल्यावर हे विलायतेस गेले आणि तेथें केंब्रिज येथील सिडनेससेक्स कॉलेजमध्यें दाखल झाले. गणित व शास्त्रीय विषय यांत त्यांनीं प्राविण्य दाखवून परिक्षेंत बक्षिस मिळविलें. केव्हेंडिश् येथील प्रयोगशाळेंत त्यांनीं संशोधनाचें काम चालविलें. श्री. काशीनाथपंत यांस फ्रेंच व जर्मन भाषा चांगल्या अवगत आहेत. क्रिकेट व टेनिस या खेळांत ते निष्णात असून इंग्लंडांत त्यांनीं आपलें क्रीडापटुत्व दाखविलें आहे. ईश्वरकृपेनें त्यांचा आयुष्यक्रम सर्वपरीनें सुखावह होवो असें आम्ही इच्छितों.

—**श्री. मडियार गोपाळराव** एम्. ए. दोन वेळां अरणी जहागीरदार पदक मिळविलेले मद्रास इलाख्यां-

तील सुप्रसिद्ध रसायनशास्त्रविशारद पदवीधर श्रीयुत मडियार गोपाळराव या सारस्वत बंधूस त्यांच्या विद्वत्तेवरून वेडरबर्न प्राइज नावांचें बहुमानाचें पारितोषक मिळालें आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. लंडन येथील शास्त्रीय मंडळाला ( chemical society ) त्यांनीं अनेक लेख सादर केले असून त्यांवरून त्यांची तीक्ष्ण बुद्धिमत्ता दिसून येते. हिंदुस्थान देशाचें भाग्य उदयास येण्यास श्री. गोपाळराव यांसारखे शास्त्रीय ज्ञानविशारद व शोधकबुद्धीचे लोक पाहिजे आहेत, ही गोष्ट निर्विवाद होय.

**—डॉ. शिरवळकर.** मुंबई विश्वविद्यालयाची बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर श्री. शिरवळकर यानीं ग्रँट मेडिकल कॉलेजांत पहिल्या दोन परीक्षा दिल्या व त्यांत ते पहिल्या वर्गांत पसार झाले. पुढें ते विलायतेस गेले व तेथें वैद्यक शास्त्राचा अभ्यास चालवून त्यानीं F. R. C. S व M. S. या पदव्या मिळविल्या. शस्त्रविद्येंत नैपुण्य दर्शविणाऱ्या या पदव्या संपादन करणारे हे पहिलेच हिंदी गृहस्थ आहेत. डॉ. शिरवळकर हे रत्नागिरी तालुक्यांतील देवगड येथील रहिवाशी आहेत. हे दयाळू व परोपकारी असल्याबद्दल त्यांची ख्याती आहे. यांच्या ज्ञानाचा उपयोग या देशास दीर्घकाल लाभो.

**—अभिनंदन.** गोमांतकाच्या पणजी या राजधानीच्या शहरांत अल्प काळांत वैद्यकीय ज्ञानामुळें पुढें आलेल्या डॉ. आत्माराम गोविंद शेणवी बोरकर या तरुण डॉक्टराच्या वैद्यकीय व्यवसाय सुरुवातीच्या ४ थ्या वाढदिवसाप्रीत्यर्थ्य त्यांच्या मित्र मंडळीनें एक छोटेखानी समारंभ घडवून आणून त्यांस मानपत्र व चहा पार्टी दिली. या प्रसंगीं त्यांच्या चहात्या मंडळीचीं त्यांच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं; आपला व्यवसाय संभाळून फुरसतीच्या वेळांत कां होईना डॉक्टर साहेब सार्वजनिक कामाकडे आपला मोर्चा फिरवितील तर ते डॉ. शिरगांवकरांच्या मृत्यूमुळें भासत असलेली उणीव खात्रीनें भरून काढतील.

**—उपयुक्त ग्रंथमाला.** मडगांव येथील " दामोदर वाचनमंदिर " या संस्थेमार्फत " **उपयुक्त ग्रंथमाला** " निघणार असें समजतें. लोकसत्तात्मक राज्यपद्धति अनायासें लाभलेल्या गोमंतकांत ज्ञाननिष्ठ, कर्तव्यनिष्ठ, निःस्वार्थी, नीतिमान् व स्वदेशहित तत्पर अशी पिढी निर्माण करण्याच्या कामीं या ग्रंथमालेचा उपयोग होवो असें आह्मी इच्छितों.

**—आमचीं देवालयें, धर्मार्थ संस्था व फंड.** मुंबईंतील आमच्या ज्ञातीच्या देवालयांसंबंधाचा १९१९ सालचा वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध झाला असून त्यावरून पाहतां गेल्यासालीं या धार्मिक संस्थेचें उत्पन्न रु० १५४१४ व खर्च रु. ७९४० झाल्याचें दिसून येतें. ट्रस्ट फंडाची रकम रु. ९२९०० सरकारी रोखे घेऊन व्याजीं लावली आहे. या फंडाचा उपयोग कोणत्या रीतीनें करावा हें ट्रस्टींस कळत नाहीं व वेळोवेळीं ज्ञातिबंधूनीं केलेल्या सूचना त्यांस कायद्याच्या अडचणीमुळें मान्य होत नाहींत. तरी समाधानाची गोष्ट ही कीं या संस्थेस निस्पृह ट्रस्टी लाभले आहेत ह्मणून हा फंड दरसाल वाढत चालला आहे. वार्षिक सभेंत औपचारिक काम तेवढें चोख रीतीनें पार पडतें. अहवाल व हिशोब मंजूर करण्यासाठीं ता. ११ एप्रिल रोजीं लक्ष्मीबागेंत सभा भरली. सभेस सातांपैकीं ६ ट्रस्टी व सुमारें १३।१४ इतर ज्ञातिगृहस्थ हजर होते. अध्यक्षस्थान रा. रा. दिनकर सखाराम वर्दे यांस देण्यांत आलें. सालाबादप्रमाणें ठरीव ठराव पसार करण्यांत आल्यावर अध्यक्षांनी नेहमींच्या पद्धतीस अनुसरून एक दोन सूचना सभेपुढें मांडल्या. आमचीं मुंबईंतील देवस्थानें ज्या पूर्वजानीं बांधिलीं त्यांचा व त्यांच्यावेळीं या शहरीं असलेल्या आमच्या ज्ञातीचा इतिहास या देवस्थान–संस्थेशीं निगडित असून तो जुन्या कागद पत्रावरून शोधून काढणारा नव्या दृष्टीचा एकादा ट्रस्टी बोर्डमध्यें असणें हितावह होईल आणि या संस्थेचा एक धार्मिक व शास्त्रीय पुस्तकांचा संग्रह असणें अत्यंत जरूरीचें आहे. या आशयाचें अध्यक्षांचें भाषण झालें. ज्या देवस्थान संस्थेच्या मालकीचें अद्यापि एक सभागृह नाहीं, त्या संस्थेसाठीं पुस्तकांचा संग्रह केल्यास तो दप्तराबरोबर सन्मान्य चिटणीसांकडे ठेवण्याचा प्रसंग येईल आणि ही अडचण सोसण्यास चिटणीस साहेब तयार होतील कीं काय नकळे. एऱ्हवीं अध्यक्षानीं सुचविल्या प्रमाणें एक पुस्तकालय व मोफत वाचन मंदिर या धार्मिक फंडांतून चालविण्यास पावलो पावलीं अडविणारी कायद्याची अडचण पुढें येईल असें दिसत नाहीं !

**—श्री गौडसारस्वत ब्राह्मण कोऑपरेटिव** हाऊसिंग सोसायटी, लिमिटेड, ही संस्था सरकारांत रजिस्टर झाली व लवकरच शेअरचें भांडवळ जमविण्याचें व इतर काम चालू होईल असें कळतें. या संस्थेनें दादर व माटुंगा येथें दोन एकर जागा घरें बांधण्यासाठीं मिळविली असून येथील धनिक ज्ञाति बंधूनी तिच्या कार्याला तनुमनधनेंकरून प्रोत्साहन देण्याचें मनावर घेतलें आहे हें पाहून आनंद होतो. अल्पकालांत चालकांचे हेतु सफल होतील व आमच्या मध्यम स्थितींतोल लोकांची राहत्या जागेसंबंधाची गैर सोय दूर होईल अशी सुचिन्हें दिसतात.

**—श्री केनरा गौडसारस्वत कोऑपरेटिव हौसिंग** सोसायटि, लि. कारवारकडील आमच्या ज्ञाति बंधूनीं स्थापन केलेल्या या संस्थेस सरकारांतून आंधेरी जवळ असलेल्या मोगरा ग्रामीं घरें बांधण्यासाठीं दहा एकर जागा मिळाली असून घरें उभारण्यासाठीं संस्थेच्या भांडवलाच्या तिप्पट म्हणजे सुमारें दीडलाख रुपयांपर्यंत कमी व्याजानें कर्जाऊ रकम मिळण्याचा संभव आहे. येत्या दिवाळीच्या सुमारास घरें बांधण्याचें काम हातीं घेण्यांत येईल असें कळतें.

**—कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण**विद्यावृद्धि समाजास वसई येथील रा.रामचंद्र बळवंत वोंद्रे यानीं आपली सून शांताबाई हिच्या स्मरणार्थ रु. ३०० च्या प्रो. नोटा दिल्या; त्याच प्रमाणें रा. माधवराव विठ्ठल सामंत यानीं आपल्या कन्येच्या विवाह समयीं सदरहू समाजास ६१०२ रुपयांची देणगी दिली. स्तुत्य आहे.

**—मडगांव ( गोवा ) येथें श्री दामोदर विद्याभुवनांत** श्री दासनवमी उत्सव मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. उत्सवानिमित्त ह. भ. प. पांगारकर याचें पुराण व प्रवचनें झालीं.

**—संयुक्त तत्वावर विवाह.** रा. रघुनाथ कलाप्पा दलाल ( बारदेशकर ) याची कन्या कृष्णाबाई हिचा श्रीयुत श्रीपाद विष्णु कामत शिरोडकर ( साष्टीकर ) यांच्याशीं विवाह, वधुवरांच्या संपूर्ण अनुमतीनें, वेंगुर्लें येथें ता. १९ मार्च रोजीं मोठ्या थाटानें झाला असें एक बातमीदार कळवितात. लग्न समारंभास गांवांतील प्रमुख मंडळी हजर होती. ईश्वर वधुवरांचें कल्याण करो.

**—श्रीमत् पूर्णानंद सरस्वति स्वामी** मठ कवळें यांनीं श्रीक्षेत्र गोकर्ण येथें स्थापना करण्यांत येणाऱ्या दवाखान्यास ५०० रुपयांची देणगी दिली.

**—स्वयंसेवक.** फोंडा ( गोवा ) येथें रा. प्रियोळकर यांनीं स्वयंसेवक नांवाचें मासिक पुस्तक पुनः प्रसिद्ध करण्याचें मनावर घेतलें असून प्रसिद्ध झालेले २ अंक वाचून पाहतां हें मासिक गोमंतकांत उत्तम प्रकारची जाग्रति केल्यावांचून रहाणार नाहीं असें दिसतें. कज्जे दलाल व कोर्टांची पायरी झिजविणारे अदूरदर्शी लोक यानीं यांत प्रसिद्ध होणाऱ्या देमांद माहात्माचें परिशीलन करावें अशी आमची शिफारस आहे. या नियत कालिकास आमचे गोमंतकीय बंधु शक्य ती मदत देतील अशी आम्ही उमेद बाळगतों.

**—अनावरण समारंभ.** कुमठा येथील कॅनरा एज्युकेशन सोसायटीच्या गिब् हायस्कूलला जोडण्यांत आलेला श्रीमंत घेंपे हॉल, दक्षिण भागचे कमिशन मि. एल. जे. माऊंटफर्ड यांच्या हस्तें उघडण्याचा समारंभ गेल्या फेब्रुवारी ता. ९ रोजीं मोठ्या थाटानें पार पडला.

**—रा.रा. वसंत नारायण दाभोळकर** यांस मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या अध्यक्षस्थानीं निवडण्यांत आलें. ही बहुमानाची जागा लाभल्याबद्दल श्रीयुत वसंत रावजींचें आम्ही अभिमानपूर्वक अभिनंदन करतों.

**—सारस्वत विद्यार्थी सहायक मंडळी.** या संस्थेस गेल्या चार महिन्यांत ज्या बंधुभगिनीनीं तहाहयात सभासद होऊन व अन्य प्रकारें मदत केली त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत:—**१ तहाहयात सभासद.** १ रा. माधव चिंतामण देशपांडे, कोल्हापूर. २ रा. मंगेश नीळकंठ नाडगौडा, एल. सी. ई. बेळगांव. ३ रा. हरी विष्णु यादो ( वागळे ), खानापूर. ४ रा. विनायक आप्पाराव मुझुमदार, बी. ए. एल. एल. बी. बेळगांव. ५ रा. वामनराव माधवराव डुकले, मुंबई. ६ रा. लक्ष्मण अनंत पै, मुबई. ७ रा. रघुनाथ विठ्ठल रांगणेकर, वेंगुर्लें. ८ रा. दत्तात्रय श्रीधर दिवाडकर, मुंबई. ९ सौ. राधाबाई कृष्णराव वागळे, कारवार. १० सौ. सरस्वतीबाई गजाननराव खानोलकर, मुंबई.

श्रीमती पार्वतीबाई दीनानाथ धुमे बक्षीस फंडासाठीं रु. १००० प्रो. नोटा. रा. गणेश बळवंत वागळे बक्षीस फंडासाठीं रु. १००० प्रो. नोटा. रा. रामचंद्र विठ्ठल पाटील उर्फ आबा पाटकर बक्षीस फंडासाठीं रु. १०० कै. सीताराम नारायण पंडित यांच्या स्मरणार्थ त्यांच्या चिरंजीवाकडून रु. १००.

**विद्यावेतनें.** दोन होतकरू विद्यार्थि रा. एस. एम्. धुमे बी. ए. यांस लंडन स्कूल आफ इकानोमिक्स या विद्यालयांत बी. एससी. चा अभ्यास चालू करण्यासाठीं व रा. राजाराम श्रीपाद बावडेकर, बी. ए. यांस सिव्हिल सर्व्हीस परीक्षेचा अभ्यास करण्यासाठीं प्रत्येकीं दरमहा ३० रुपयांचें विद्यावेतन सा. वि. स. मंडळीकडून देण्यांत आलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ज्ञातिसभा नं.........

**—बॅरिस्टर शिवराम बळवंतराव देशपांडे.** पोर्तुगीज अमलांत पोर्तुगालांत जाऊन बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण झालेले हे पहिले हिंदू, त्यांतही सारस्वत, होत. याशिवाय यानीं "देलेगाद" व "कोंसेव्हांदोर" या दोन्ही परीक्षांत यश संपादन केलें असून लवकरच ते मातृभूमीस येऊन दाखल होतील व पोर्तुगीज सरकार त्यांच्या विद्वत्तेकडे लक्ष देऊन एखादी बहुमानाची जागा त्यांना बहाल करील असें दिसतें. डॉ. सखारामपंत लाड यांच्यानंतर पोर्तुगालांत जाण्यांत बॅ. देशपांडे यानीं चांगलेंच धाडस व्यक्त केलें आहे. सध्यांच्या गोमंतकाच्या संक्रमणावस्थेंत शिवराम पंतासारखे विद्यावंत व ज्ञानसंपन्न लोक जनतेचा पुढारीपणा पतकरण्यास पाहिजे आहेत. त्यांच्या सहवासानें तरुण पिढींत उद्योगशील व सत्कार्य-तत्पर लोकहितकर्ते निपजोत हीच इच्छा.

**—सॉलिसिटर.** श्रीयुत वामनराव शांताराम दाभोळकर, एम्. ए. एल. एल. बी. व श्रीयुत वसंतराव गणपतराव मुळगांवकर, बी. ए. एल. एल. बी. हे सॉलिसिटरच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. हे आमचे बंधु आपल्या व्यवसायांत पूर्णपणें यशस्वी होवोत आणि सार्वजनिक कार्यास तनुमनधनेंकरून चालन देण्याच्या कामीं पुढाकार घेवोत असें आम्ही इच्छितों.

**—मद्रासचे तरुण सारस्वत** रा. निरोडी, बी. ए. यांस कोकानाडा येथील सत्यलिंग नायकर ट्रस्ट फंडांतून परदेशीं जाऊन कृषिशास्त्राचा अभ्यास संपूर्ण करण्यासाठीं विद्यावेतन देण्यांत आलें असून ते लवकरच अमेरिकेस जाणार आहेत.

**—द्यूतविनोद.** गोमंतकांत धार्मिक व इतर उत्सवांच्या वेळीं पांडवांस देशोधडीस लावलेला 'द्यूत विनोद' चहूंकडे दृग्गोचर होत असून या निंद्य खेळाच्या पायीं अनेक सुखवस्तु कुटुंबांचा नाश झाला आहे. व सध्यांही कित्येक धनिक नाशाच्या मार्गास लागले आहेत. हल्लीं तरुण व जुन्या पिढीचे डोळे शिक्षणामुळें व चहूंकडे चाललेल्या चळवळीमुळें हळू हळू उघडत असून द्यूताचें बंड मोडण्यासाठीं कोणते उपाय अमलांत आणावे याबद्दल खल चालला आहे. देवस्थान कमिट्यानीं मनावर घेतल्यास या कामीं यश येण्याचा बराच संभव आहे हें श्री मंगेश देवस्थानच्या कमिटीचे अध्यक्ष रा. नारायणराव शेणवी आक्सीकर यांनीं पतकरलेल्या दिशेवरून सिद्ध होतें. रा. आक्सीकर हे जुन्या पिढींतील गृहस्थ आहेत. यांनीं बॉव-नवाबांच्या रोषास, आक्रोशास अगर भिडेस बळी व पडतां मनोधैर्य दाखवून श्रीमंगेश देवस्थानांच्या हद्दींत द्यूतास बंदी केली याबद्दल आम्ही त्यांचें कौतुक करतों. यांचा कित्ता गोमंतकांतील इतर देवस्थान कमिट्यानीं उचलल्यास तेथील अर्धे अधिक दुःख कमी होईल.

**—मंजेश्वर येथील सहस्र कुंभाभिषेक.** मंगळूरच्या नजीक असलेल्या मंजेश्वर येथें सुमारें आठशें वर्षांपूर्वी एका गौड सारस्वत ब्राह्मणानें स्थापन केलेलें श्री अनंतेश्वराचें देवालय असून दक्षिण व उत्तर कानडांतील काशी, गोकर्ण व कवळे मठांच्या अनुयायांस तें पूज्य आहे. गेल्या माघ शु १३ शो पासून पौर्णिमे पर्यंत ( फेब्रुवारी ता २-३-४ ) या देवनेसन्निध सहस्र कुंभाभिषेक नांवाचा महोत्सव काशी ( कोची ) मठाचे गुरु श्री शुकतींद्र स्वामी यांच्या हस्तें यथासांग पारपडला. समारंभास दूरप्रदेशींची सुमारें दहा हजार स्त्री पुरुष मंडळी जमली होती. मंजेश्वराची गणना क्षेत्रांत होते. मंजुळा क्षेत्र माहात्म्य या सह्याद्रीखंडांतर्गत प्रकरणांत अनंतेश्वराच्या देवालयाचा व या क्षेत्राचा जुना इतिहास दिला आहे. या देवालयास उत्पन्न हीं चांगलें असून त्याची एकंदर व्यवस्था गौड सारस्वत ब्राह्मणांच्या हातीं आहे.

**—रा. व्यंकटेश श्रीनिवास कामत** बी. ए. एल. एल बी. यांस मिरज येथें अकालीं मृत्यु प्राप्त झाल्याचें वर्तमान कळविण्यास आम्हांस वाईट वाटतें. रा. कामत हे होनावर ( उत्तरकानडा ) येथील नामांकित वकील होते. सार्वजनिक कामांत ते फार मन घालीत. ते अत्यंत परोपकारी असल्याबद्दल त्यांची ख्याति होती. अशा सद्गुणसंपन्न पुरुषास अकालीं अंतरण्याचा प्रसंग येणें हें ज्ञातीचें व जनतेचें दुर्दैव आहे.

**—All India Saraswat.** या त्रैमासिकाचे जानेवारी व एप्रिलचे अंक मागील अंकांप्रमाणेंच वाचनीय असून त्यांत आलेली भिन्नस्थळीं राहणाऱ्या सारस्वतांची माहिती इतिहासदृष्ट्या फार महत्त्वाची आहे. जानेवारी अंकांतील "शणैकों" हा लेख व एप्रिल अंकांतील भडोच व राजपुताना येथील सारस्वतांविषयींची माहिती उपयुक्त असून चालू अंकांत प्रसिद्ध झालेला मंजेश्वर येथील स्वकीय देवालयांविषयींचा लेख मनोरंजक आहे. या त्रैमासिकास उत्तरोत्तर भरपूर आश्रय मिळत जावो असें आम्ही इच्छितों.

**—अत्यंत शोचनीय मृत्यु.** श्रीमती सौ. लेडी लक्ष्मीबाई चंदावरकर यांस गेल्या जानेवारी महिन्यांत मधुमेहाच्या विकारानें देवाज्ञा झाली हें कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें. सौ. लक्ष्मीबाई या जुन्या पिढींतील असूनही त्यांनीं नव्या कालास साजेल असे सामाजिक व धार्मिक वर्तन ठेविल्यामुळें त्यांची गणना प्रागतिक पक्षांत होत असे. तथापि जुनें बालबोध वळण, निगर्वी स्वभाव, ममताळू वर्तन आणि उच्च प्रकारचे सद्गुण यांच्यामुळें त्या जुन्या व नव्या पिढींतील स्त्रीपुरुष समाजास सारख्याच वंद्य वाटत होत्या. परमेश्वरी कृपेनें त्यांस त्यांच्या भाग्यशाली पतीच्या सहवासांत श्रेष्ठ प्रकारचें वैभव लाभलें, लोकांत त्यांची मानमान्यता वाढली. परंतु या वैभवाच्या पायीं बेहोश होऊन न जातां त्या अंत कालापर्यंत अत्यंत नम्र, सत्वशील व धर्मभीरू राहिल्या. त्यांच्या निधनानें सर नारायणराव यांस वृद्धापकालीं अत्यंत प्रेमळ सहकारिणी व सहधर्मचारिणी नाहींशी झाली ही जरी दुःखाची गोष्ट आहे तरी आर्य महिलांच्या दृष्टीनें सौ. लक्ष्मीबाई या सौभाग्यलंकारानीं सुभूषित असतांना इहलोकींची यात्रा संपवून परधामास निवर्तल्या ही विशेष भाग्याची गोष्ट आहे असें गणिलें जाईल. या पुण्यशील बाईच्या आत्म्यास परमेश्वर सद्गति देवो.

**—गौ. सा. ब्राह्मण ज्ञातीचा इतिहास.** महाराष्ट्र सारस्वतांत यापूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें गौ. सा. ब्रा. मित्रमंडळ, हें पुस्तक ज्यांचें पसंत ठरेल त्यांस योग्यतेनुरूप रु. १०० किंवा अधिक बक्षीस देणार असून, लेख पाठविण्याची मुदत येत्या जून अखेरपर्यंत वाढविली असल्याचें मंडळाचे चिटणीस कळवितात.

---

# मडगांव येथील सारस्वत ब्राह्मण समाज.

मडगांव-गोवा येथील प्रागतिक विचारांच्या तरुणांच्या कर्तबगारीचें मूर्तिमंत स्मारक, अशा सारस्वत ब्राह्मण समाजाचा आठवा वाढदिवस समारंभ गेल्या चैत्र शुद्ध १ दा रविवार रोजीं मडगांव शहरीं मोठ्या थाटानें पार पडला. अध्यक्षस्थानीं पुण्याचे प्रागतिक पक्षाचे पुढारी नामदार **बाळकृष्ण सीताराम कामत** शिरोडकर यांची योजना करण्यांत आल्यानें समारंभास एकप्रकारचें अपूर्वत्व प्राप्त झालें होतें. शिवाय वार्षिकोत्सवास जोडून व्याख्यानमाला गुंफण्यांत आल्यानें व या मालेंत कैक सुगंधी पुष्पांची भर पडली असल्यानें समारंभाची शोभा द्विगुणित झाली.

समारंभाचे नियोजित अध्यक्ष नामदार कामत हे श्रीयुत वसंतराव नाईक, महाराष्ट्र सारस्वताचे संपादक श्री. वामनराव दुभाषी व गणपतराव लाड यांसह ता. १९ मार्च रोजीं मेल ट्रेननें मडगांव मुक्कामीं जाण्यास निघाले. बेळगांव व खानापूर स्टेशनवर बेळगांव शहापूर व खानापूर येथील स्वज्ञातीय पुढारी मंडळीकडून त्यांचें थाटाचें स्वागत करण्यांत येऊन उपाहार देण्यांत आला व त्यांस पुष्पहारांनीं मंडित करण्यांत आलें. त्याचप्रमाणें लोंढा व मडगांव दरम्यानच्या स्टेशनवरही प्रमुख मंडळीकडून त्यांस पुष्पहार अर्पण करण्यांत आले. खुद्द मडगांव स्टेशनवर सा. ब्रा. समाजाची पुढारी मंडळी व इतर नागरिक जन यांनीं अत्यंत उत्साहानें त्यांचें स्वागत करून तेथील सन्मान्य पुढारी श्रीयुत विष्णु रामचंद्र नायक यांनीं त्यांस पुष्पहार अर्पण केले. केवळ थाटामाटापायीं, ऐषआरामापायीं अगर भपक्यासाठीं समाजाच्या एक पैचाही विनियोग होतां नये या समाज चालकांच्या धोरणास अनुसरून व खुद्द नामदार कामत व पाहुणे मंडळी यांच्या इच्छेस मान देऊन समाज चालकांनीं व नागरिकांनीं थाटाच्या मिरवणुकीस फांटा दिला होता. स्टेशनवरून प्रमुख मंडळीसह नामदार कामत व श्री. नाईक, दुभाषी व लाड हे श्री. पंढरीनाथ हेगडे यांच्या बंगल्यांत येऊन दाखल झाले. तेथें अल्प उपाहार झाल्यावर स्वागतार्थ आलेली मंडळी आपापल्या वसति स्थानाकडे निघून गेली.

चैत्र शुद्ध १ दा रविवार ता २१ मार्च रोजीं समारंभास सुरुवात झाली. समारंभासाठीं समाजाचा प्रशस्त दिवाणखाना पुष्पमालादिकांनीं सुशोभित करण्यांत आला होता. समाजगृहांत भिंतीवर टांगण्यांत आलेल्या, गुरुवर्य भांडारकर, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, नामदार गोखले, इत्यादि पुण्य पुरुषांच्या भव्य तसबिरी राजकाजाचें व समाज सेवेचें योग्य महत्व तरुणांच्या मनावर बिंबविण्यास साह्यभूत होत होत्या. बरोबर ७ वाजतां अध्यक्ष नामदार कामत हे श्री. नाईक, दुभाषी व लाड यांसह सभास्थानीं येऊन दाखल होतांच त्यांस उत्थापन देऊन सभाजनांनीं टाळ्यांच्या प्रचंड गजरांत त्यांचें स्वागत केलें. यावेळचा सभाजनांचा उत्साह व आनंद वर्णनातीत होता तरुण व वृद्ध सूज्ञ व अज्ञ हे त्याचे सारखेच भागीदार झाले होते.

अशा रीतीच्या सभाजनांच्या मनस्थितींत श्री. पुंडलिक वामन विर्डीकरांनीं प्रेमपूर्वक सर्वांचें स्वागत केल्यावर सेक्रेटरी श्रीयुत केशव अनंत नायक यांनीं समाजाच्या गतसालच्या कामगिरीचा रिपोर्ट वाचून दाखविला व प्रामुख्यानें समाजास स्वतःच्या मालकीची

इमारत, व नमुनेदार मराठी शाळांची स्थापना यांच्या पूर्व तयारींत समाजाचे चालक असल्याचें सांगून या कार्यास तनुमनधनें साह्य करण्यास त्यांनीं सर्वांस विनंति केली.

यानंतर श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई हे अध्यक्षांची सूचना पुढें मांडण्यासाठीं उभे राहिले. ते म्हणाले:- नामदार कामत यांची ओळख मी आपणा सर्वांस करून देणें म्हणजे खद्योतानें दिनकराची माहिती देण्यांइतकेंच मूर्खपणाचें होईल. तथापि चालत आलेल्या परंपरेस अनुसरून मोजक्या शब्दांतच मीं माझें भाषण संपवितों. आजचे आपले अध्यक्ष हे मुंबई कायदेकौन्सिलचे सभासद, समाज सुधारक, हिंदू समाजांतील मागसलेल्या वर्गांच्या उन्नतीसाठीं मनोभावें झटणारे असून इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेवरील त्यांचें प्रभुत्व-वक्तृत्व-वाखाणण्याजोगें असतें हें सर्वश्रुत आहे. ज्ञातींतील परिषदेच्या अध्यक्षपदाचा अत्युच्च मान कारवार अधिवेशन प्रसंगीं ज्ञातीनें त्यांस देऊन त्यांजसंबधीची आपली पूज्यबुद्धि व्यक्त केली. कारवार परिषदेची वेळ ही परिषदेच्या इतिहासांत आणीबाणीची वेळ होती. आगंतुकीचा पण महत्वाचा असा एक प्रश्न परिषदेंत उत्पन्न झाल्यानें ही परिषद नौका कारवाऱ्च्या तुफानी दर्यांत खडकावर आपटून फुटते कीं काय अशी परिषद हितचिंतकांस चिंता उत्पन्न झाली होती. पण केवळ नामदार कामत यांच्या मुत्सद्दिपणानें व कर्णधारकत्वानें ही नौका तुफानांतून सुरक्षित पार पडून अलिबागपर्यंतचा प्रवास तिनें केला व पुढेंही कैक बंदरें ती करील. केवळ ज्ञातिकार्यांतच न गुरफटतां राष्ट्रकाजाचाही भार ना. कामत यांनीं आपल्या शिरावर घेतला असून प्रत्येक राजकीय व सामाजिक चळवळीशीं ते निगडीत आहेत. हल्लींच इग्लंदास गेलेल्या प्रागतिक पक्षाच्या डेप्युटेशनमध्यें त्यांची निवड होऊन आपलें कार्य यथायोग्य बजाऊन, ते आपल्या मातृभूमींत परत आले आहेत. एकंदरींत गतसालच्या अध्यक्षांनीं-श्री. वसंतराव नाईकांनी-रेखाटलेल्या उदात्त जीविताचा आदर्श आज आपणापुढें आहे. आज त्यांचाही वाढ दिवस व समाजाचाही वाढ दिवस हा योग अपूर्व होय. अशा या वाढ दिवशीं उभयतांचेंही कार्य वाढीस लागो व तें समाजास, ज्ञातीस व राष्ट्रास कल्याणप्रद होवो अशी त्यांनीं प्रार्थना केल्यावर व या सूचनेस सभाजनांकडून टाळ्यांच्या कडकडाटांत अनुमोदन मिळाल्यावर अध्यक्ष नामदार कामत हे भाषण करण्यास उभे राहिले.

## ना. कामत यांचें भाषण.

नामदार कामत म्हणाले:-श्रीयुत सरदेसाई यांनीं माझें रेखाटलेलें चित्र माझेंच कीं दुसऱ्या कोणाचें असा मला संशय येऊं लागला आहे. त्यांत प्रेमातिरेक आहे. स्वतः संबंधानें बोलावयाचें झालें तर मला असें वाटतें कीं सुधारणेच्या शिखरावर पोंचलेल्या इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांत प्रवास करून तेथील राजकीय सामाजिक, औद्योगिक माहिती मिळवूनही माझ्या प्रवासाची सांगता झाली नाहीं. कां कीं हा वेळपर्यंत माझ्या मातृभूमीचें, कुलदेवतांचें व तुम्हां ज्ञातिबंधूचें दर्शन मला झालें नव्हतें म्हणूनच माझ्या प्रवासांतील व माझ्या आयुष्यांतील एक मोठी उणीव भरून काढण्यासाठींच निमित्तमात्र तुमच्या प्रेमळ आमन्त्रणाचा स्वीकार करून माझ्या मातृभूमीचें, या पवित्र परशुरामक्षेत्राचें व सारस्वतांना अभिमानास्पद अशा या सारस्वतांच्या प्रिय वसतिस्थानांचें दर्शन घेण्याकरितां मीं या ठिकाणीं आलों. साधारणतः पाहतां असें आढळून येईल कीं मनुष्य कितीही सुधारक बनला तरी जगन्नियंत्या परमेश्वरावर त्याची निष्ठा असलीच पाहिजे. अर्थात् त्या परमेश्वराचीं जीं सगुण रूपें, ज्या आपल्या कुलदेवता, त्यांचें दर्शन घेण्यास कोण उत्सुक असणार नाहीं? माझ्या येण्याचा तिसरा उद्देश म्हणजे या गोमंतकांतील स्वतंत्र अशा वातावरणांत विहार करून आपले बंधु मिळालेल्या स्वराज्याचा-हस्तेबंदी स्वराज्याचा नव्हे तर पूर्ण लोकसत्तात्मक स्वराज्याच्या-कोणत्या रीतीनें उपभोग घेत आहेत हें पाहणें हा होय. आम्हां ब्रिटिश मुलुखांतील प्रजाजनांस सुधारणारूपीं स्वराज्याचा जो लाडू मिळणार आहे त्यास लागणारें सामान हस्ताहस्त्यानें म्हणजे अगोदर पीठ, नंतर साखर, तदनंतर तूप, अशा क्रमानें मिळणार असून तुम्हां पोर्तुगीज प्रजाजनांच्या हातांत तर हा लाडू पूर्ण स्वरूपांत पडलेला आहे. त्याचा आपण कसा काय उपयोग करितां हें पाहून त्यापासून योग्य तो बोध घेतां येईल तर मीं आपणास धन्य समजेन. एकंदरींत केवळ अध्यक्षस्थानीं विराजमान होण्याकरितांच मी या ठिकाणीं आलों नसून कुलदेव-

तांचें, व तुह्मां बांधवांचें दर्शन घेऊन माझ्या ज्ञानांत भर घालण्या करितांच मीं या ठिकाणीं आलों आहें.

याप्रमाणें प्रास्ताविक भाषण झाल्यावर कार्यक्रमानुसार श्री. ग. वि. लाड यांनीं समाजास अर्पण केलेल्या न्या. तेलगांच्या तसबिरीचें अनावरण करण्याविषयीं सेक्रेटरीनीं त्यांस विनंति केली. अनावरण विधि करतांना ना. कामत ह्मणाले.–"न्या. तेलगांचें चरित्र सर्वांस माहित असल्यानें तें नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं त्यांची अष्टपैलु बुद्धि, त्यांचें निरनिराळ्या भाषेवरील प्रभुत्व महाशूर आहे. त्यांचें इंग्लीश लेखन व वक्तृत्व पाहून तर इंग्लीश लोक तोंडांत बोटें घालीत. त्यांचें कायद्यावरील, विशेषतः हिंदुकायद्यावरील प्रभुत्व अप्रतिम होतें. राष्ट्रीय सभेच्या मूळ उत्पादकांपैकीं व चालकांपैकीं ते एक असून राष्ट्रीय सभेस त्यांनीं लावून दिलेली दिशा लोकांस व सरकारास सामान्य अशी होती. विद्वत्तेच्या भरांत आपल्या मतांची वाटेल त्यावेळीं वाटेल तशी फिरवा फिरव करून जनतेची दिशाभूल त्यांनीं केव्हांही केली नाहीं. त्यांचीं मतें त्याकालीं तशीं आजही सर्व मान्य अशींच आहेत. त्यांच्या सारखी अष्टपैलु बुद्धि त्याकालच्या सारस्वत किंवा इतर ज्ञातींतल्या हिंदी पुढाऱ्यांत दिसून आली नाहीं, असें ह्मणण्यांत इतर कोणाचाच अपमान करण्याचा माझा हेतु नाहीं. थोर पुरुषांसंबंधानें तुलना करणें हें जरी पाप असलें, तरी त्याकालच्या पुढाऱ्यांत बुद्धिमत्तेनें तेलगासारखे पुरुष तेलंगच असें ह्मणण्यांत तेलंगांबद्दल आपण न्यायच करीत आहोंत. ते निस्सीम मातृपितृभक्त होते व देशांतील पुढाऱ्यांचे आदर्श होते. पण हें पुष्प अकालीं गळालें व देशाची फार मोठी हानी झाली ही दुःखाची गोष्ट होय. असे खरे खुरे देशभक्त या भरतभूमींत अनेक निर्माण होवोत व तिचा उद्धार होवो" अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून न्या. तेलंगांच्या तसबीरीवरचा पडदा त्यांनीं बाजूस सारला. तसबीरीस पुष्पहार घालण्यांत आला व टाळ्यांचा कडकडाट झाला. ना. कामत यांचें या प्रसंगींचें कळकळीचें व वक्तृत्वपूर्ण असें स्फूर्तिदायक भाषण, त्या वेळचा तो गंभीर प्रसंग, तसबिरीवर दिसणारा तेलंगांचा तो प्रशांत व गंभीर चेहरा, चंद्रकिरणांचें तेज चमकत असलेले ते नयनद्वय, विद्वत्तापूर्ण मुखमंडळ यांकडे दृष्टि जातांच असा हा राष्ट्रदीप स्वज्ञातींत निर्माण झाला याबद्दल आनंद व समाधान व अकालीं मालवल्याबद्दल खेद वाटला नाहीं असा स्वजन विरळा!

यानंतर ना. कामत हे आपल्या मुख्य भाषणाकडे वळले ते म्हणाले "गोमंतकांतील सारस्वतांच्या परिस्थितीची जरी मला पूर्ण माहिती नाहीं तथापि याच पवित्र भूमतून सारस्वतांच्या उज्ज्वल परंपरेचा आरंभ झाला आहे. या ज्ञातीची पूर्वपरंपरा अत्यंत अभिमानास्पद अशीच आहे. व ही थोरांची परंपरा कायम ठेवण्यास सारस्वतसमाज गेल्या आठदहा वर्षांपासून नेटानें लागला आहे. हें त्यांतील कैक ज्ञातिसंस्था व इतर स्वोन्नतीच्या प्रयत्नांवरून दिसून येणारें आहे. आज विद्येनें, अधिकारबलानें, प्रचंड बुद्धिमत्तेनें हिंदुस्थानच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जे जे समाज पुढें आले आहेत त्यांतील कोणत्याही समाजाला कोणत्याही बाबतींत ही ज्ञात हार जाणारी नाहीं, पूर्वी गेली नाहीं, आज जाणार नाहीं, व पुढें जाईल असें मानण्यासही आधार नाहीं. तथापि जुन्या कालच्या गप्पानीं, ऐतिहासिक वैभवानें, पूर्वजांचे नुसते गुणानुवाद गाण्यानेंच चालू चढाओढीच्या कालांत आपलें भागणार नसून पूर्वजांच्या पूर्वलौकिकास साजेशी कामगिरी आज आपणांकडून होते कीं काय याचें परिशीलन आपण नेहमीं केलें पाहिजे, सावधानता ठेवली पाहिजे व आपल्यांतील सुशिक्षित व पुढारी म्हणविणाऱ्यांनीं तर गत कालाची व सद्यःस्थितीची तुलना करून जनतेला दोन्ही स्थितीची जाणीव करून दिली पाहिजे.

आमचे पूर्वज प्राचीन कालीं फार विद्वान होते. शिपाईपणांत, वाङ्मयांत, मुत्सद्देगिरींत वगैरे हरएकबाबतींत इतिहासाच्या हृत्पटलावर खोदून ठेवलेली त्यांची धवलकीर्तिध्वजा कधींही लोपली जाणार नाहीं. आपले पूर्वज रामचंद्र बाबा यांची कामगिरी अनुकरणीय न व्हती काय? या गोमांतकाचेच पुत्र वीरबाहु जिववादादा व लखबादादा यांच्या पराक्रमाची विस्मृति आपणास केव्हां तरी होईल काय? पोर्तुगीजांच्या दरबारांत आपल्या पूर्वजांनी दाखविलेली मुत्सद्देगिरी त्यांच्या वंशजास अभिमानास्पद नाहीं काय? सद्गृहस्थ हो, गतकालींच तेवढे आपण मोठे होतों असें समजूं नका. अजूनही ती पूर्वपिठिका चालली आहे, हें मी आपणास अभिमानानें सांगूं शकेन. आज दिवाणगिरीसारखीं जबाबदारीचीं कामें सारस्वत मोठ्या

कौतुकास्पद रीतीनें करून दाखवीत आहेत. ग्वाल्हेर संस्थानाच्या संस्थापनेपासून आज तागायत बहुतेक सारस्वतांनी त्या संस्थानची महत्वाचीं कामें पत्करून त्याला उन्नितावस्थेस आणलें आहे. विद्येच्या बाबतींतही आपल्या पूर्वजांचा बोज त्यांनीं राखला आहे. लेखक, कवी, वेदशास्त्रज्ञ त्यांच्यांत अनेक झाले आहेत. या पन्नास वर्षांत कीर्तिविभूषित डॉ. भांडारकरांसारखे इतिहासज्ञ व धर्मशास्त्रज्ञ, डॉ० भाऊ दाजी लाडांसारखे भिषग्वर्य, शंकर पांडुरंग पंडितासारखे खरेखर पंडीत व भाषाकोविद, न्या. चंदावरकरांसारखे कायदेपंडीत, तेलंगासारखे राजकाजकुशल लोकनायक सारस्वत ज्ञातीला भूषवीत आहेत.

विश्वविद्यालयाच्या पदवीधारणांतही सारस्वतांनीं मारलेली अघाडी अभिमानास्पद आहे. एम्. ए. पदवी पटकावणारी पहिली स्त्री—सौ. सरलाबाई नाईक—व मॅट्रिक परिक्षेंत संस्कृत प्राइज पटकावणारी पहिली बालिका—कु. आजगांवकर, ह्याही सारस्वतच होत. नुकतीच लढाईवर गेलेली सारस्वतमंडळीही आपल्या पूर्वजांच्या किर्तींत भर घालूनच परत फिरलेली आहे. तेव्हां ही ज्ञात नामशेष होणार अशी जर कोणास शंका येत असेल तर त्याला बुद्धिभ्रंश झाला आहे असें खात्रीनें म्हणतां येईल. ही झाली बाहेरच्या सारस्वत ज्ञातीची गोष्ट. आतां

## गोमंतकांतील सारस्वतांसंबंधीं

थोडा विचार करूं. कोणी ह्मणतात येथील सारस्वत सामाजिक सुधारणेंत मागसलेले आहेत. पण माझ्या थोड्याशा अनुभवांतीं तें मला खोटें वाटतें. कारण, सामाजिक सुधारणा म्हणजे आधीं काय? युरोपियन संस्कृति सर्वस्वीं आंगांत भिनविणें हीच जर सामाजिक सुधारणा असेल तर आमचे गोमंतकीय बांधव न सुधारलेलेच मला चालतील. पण लग्नाची वयोमर्यादा वाढणें, स्त्रीवर्ग सुशिक्षित होणें, खर्चाच्या अनावश्यक बाबींस आळा घालणें, हरएक साधनांनीं शिक्षणाचा प्रसार करणें वगैरे जर सुधारणेचे प्रकार असतील तर त्यांत आपलें पाऊल पुढेंच पडत आहे हें आपण सर्व जाणत आहांच.

एका विषयांत मात्र गोमंतकांतीलच केवळ नव्हे तर बाहेरच्याही सारस्वतांचें पाऊल पुढें पडत आहे कीं नाहीं यांबद्दल शंका आहे. ही बाब ह्मणजे रोटीबेटी व्यवहाराची. आपल्यांतील पोटभेद मोडत जात आहेत कीं नाहींत हाही एक प्रश्नच आहे. पण तें जरी कांही असलें तरी त्यांतही एक गोष्ट आपणास अभिमान बाळगण्यासारखी आहे ती ही कीं, ज्यावेळीं कोणत्याही ज्ञातीनें आपसांतील पोटभेद मोडण्याचा विचार केला नाहीं त्यावेळीं सारस्वत ज्ञातीनें हा प्रश्न हातीं घेतला होता. पण तो समाधानकारक रीतीनें कां सुटला नाहीं याचीं कारणें सांगण्याचा हा प्रसंग नव्हे. तथापि माझ्या अल्पानुभवावरून मी इतकें म्हणूं शकेन कीं हा प्रश्न परिषदांनीं सोडवतां येण्याजोगा नाहीं. आह्मी हा जो मार्ग घालून दिला तो इतर ज्ञातींनीं तर आक्रमण केला नाहींच पण खुद्द आह्मालाही वांछित ठिकाणास त्यानें पोंचवलें नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. ह्मणून परिषदांपेक्षां व्यक्तिशः उदाहरणानीं तो अधीक लवकर सुटेल असें माझ्या अल्पबुद्धोला वाटतें. भिन्नभिन्न पोटजातींतील वयांत आलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणीस विवाहाची इच्छा झाली असेल तर केवळ लोकापवादास भिऊन गांगरून न जातां त्यानीं तो विवाह घडवून आणला पाहिजे. आणि अशा प्रत्यक्ष उदाहरणानीं लोकमत तयार केल्यानेंच या बाबतींत प्रगति होण्याचा विशेष संभव आहे.

माझ्यासारख्या अल्पपरिचित माणसानें गोमंतकासंबंधीं बोलणें एकप्रकारें धार्ष्ट्याचेंच होईल परंतु थोड्याशा अनुभवानें माझ्या मनावर जो परिणाम झाला तो आपणापुढें ठेवणें मला योग्य वाटतें. ब्रिटिश अमलांतील, विशेषतः मुंबईतील आपले सारस्वत बंधु शिक्षणाच्या दृष्टीनें जितके पुढें गेले आहेत तितके गोमंतकांतले सारस्वत पुढारले नाहींत असें म्हणण्यामध्यें आपला अपमान करण्याची बुद्धि आहे असें आपण समजूं नका. येथील काहीं गृहकृत्यें फार उत्तम आहेत पण अनेकांत सुधारणेला अवकाश आहे. राजकीय बाबतींत तर येथील सारस्वतांकडे पाहून निराशच व्हावें लागतें. ज्या गोष्टी इंग्रजीं अमलांत शक्यतेच्या कोटींत घालणेंही अशक्य होईल त्या येथें प्रत्यक्ष घडून आलेल्या आहेत. इंग्रजी अमलांत नेटिव्ह गृहस्थ आजपर्यंत गव्हर्नरच्या जागेवर आला नाहीं पण गोमंतकांत ही गोष्ट घडून आली असल्याचें ऐकून मला फार आनंद झाला. आणि सारस्वत ज्ञातीनें प्रयत्न केल्यास एकादा

सारस्वतही गव्हर्नरच्या जागेवर

येणें अशक्य नाहीं. या बाबतींत दोन सूचनेदाखल शब्द बोलण्याची जर आपण मला परवानगी द्याल तर मी एक गोष्ट सांगेन कीं, आपल्या क्रिश्चनबंधूंच्या खांद्याशीं खांदा भिडवून त्यांच्याप्रमाणेंच अगर किंबहुना रतिभर अधिकच कामगिरी आपण करून दाखविणें सर्वस्वीं शक्य आहे मुनिसिपालटींत, कायदेकौन्सिलांत अगर पोर्तुगालच्या पार्लमेंटांत किंवा सिनेटमध्यें सभासद पाठविण्याचा आपणास हक्क आहे. तेव्हां कांहीं सारस्वतांनीं त्या जागा पटकावल्यास असल्या सार्वजनीक प्रसंगीं ही गोष्ट अभिमानानें सांगतां येईल. याला मार्ग ह्मणजे केवळ एक शिक्षणप्रसार. आपल्यापेक्षां बुद्धिमत्तेंत जरा खालींच असलेल्या लोकांनीं मोठमोठ्या जागा पटकाऊन बसावें व आपल्यांतील एकानें एकही जागा मिळऊं नये ही मोठी लांछनास्पद गोष्ट होय. तेव्हां आपल्या परिस्थितीप्रमाणें त्याकरतां प्रयत्न करण्यास आपण सदोदित तयार असलें पाहिजे. आपणास सरकारानें

## मराठी शाळा

दिल्या नाहींत. शिक्षणप्रसारार्थ सरकार पाहिजे तितक्या सढळ हातानें खर्च करीत नाहीं वगैरेसारख्या रडकथा गाऊन हांशिल नाहीं. सरकार मागून कधींही देत नसतें. त्याकरतां सनदशीर मार्गांनीं सरकारकडे एकसारखें झगडलें पाहिजे. येथें प्रयत्न करून जर साध्य होण्यासारखें नसेल तर पोर्तुगालांत प्रतिनिधी पाठवून या गोष्टीचा आपण छडा लावला पाहिजे. आळस झाडून उद्योगाची कास धरल्यास अपयश येण्याची भीति नको आहे. परंतु केवळ विद्येनेंच आपली स्थिति सुधरेल असें समजूं नका. सांपत्तिक स्थिति हलाखीची असल्यास कोणतीही सुधारणा होणें बहुतेक अशक्यच होय. तेव्हां द्रव्यसंपादनाच्या मार्गाकडेही दुर्लक्ष करून चालणार नाहीं. द्रव्यसामर्थ्य बळकावण्याचा मार्ग म्हणजे सरकारी नोकरीच्यामागें लागणें नव्हे हें लक्षांत ठेवा. सेवाधर्मनिंद्य आहे. सेवाधर्माचा हाडीमासीं खिळलेला स्वभाव टाकून देऊन स्वदेशांत अगर प्रसंगोपात परदेशांत जाऊनही व्यापार उदीमाच्या मार्गानें आपण संपत्तिमान बनलें पाहिजे. मीं एकही पारशी पाहिला नाहीं कीं जो तारमास्तराच्या २०-३० रुपये पगाराच्या जागेकरतां अर्जाचीं भेंडोळी पाठऊन देतो ! केवळ सरकारी नोकरी करण्याकरतां गोमंतकाच्या बाहेर कोणीही जाणें मला इष्ट वाटत नाहीं. पण व्यापाराकरतां अगर शिक्षणाकरतां परदेशांत जावयास कोणताही किंतु मनांत आणूं नका. आणखी एक महत्वाची गोष्ट आपणांस मीं सांगतों ती ही कीं मुलांप्रमाणेंच

## मुलींनाही शिक्षण द्या.

मीं अमेरिकेंत असतांना गोमंतकाचे सत्पुत्र प्रो. धर्मानंद कोसंबी यांनीं मला असें सांगितलें कीं बेळगांवकडे एक कन्याशाळा काढण्यास आपण स्वसंपादित इस्टेट खर्च करण्यास तयार आहें. याकामीं साह्य करण्यास त्यानीं माझी मदत मागितली असून आपणही त्यास शक्य तितकें साह्य कराल अशी मला आशा आहे. अमेरिकेंत केवळ पुस्तकी शिक्षण दिलें जात नाहीं. स्वतःचें पोट भरण्यास आवश्यक असलेल्या वस्तु बनविण्याचें शिक्षण प्रामुख्यानें देण्यांत येत असल्यानें तेथें निरुद्योगी लोक आढळतच नाहींत. शिक्षणप्रसाराचीं जीं अनेक साधनें आहेत, त्यांतच वाचनमंदिरांचाही समावेश होतो. न्यूयॉर्क, लंडन, वॉशिंग्टन, पारीस वगैरे शहरांतील लायब्रऱ्यांची या आपल्या चिमकुल्या वाचनमंदिराशीं जरी तुलना करून बोलणें फारसें फायद्याचें नसलें तरी ब्रिटिश अमलांतील मध्यमप्रतीच्या लायब्रऱ्यांच्या पंक्तीस बसण्यास सारस्वत ब्राह्मणसमाजाचें हें सुंदर वाचनालय सर्वथैव लायक होईल असा माझा समज आहे. असो. आपण दिलेल्या मानाबद्दल व माझे चार शब्द स्वस्थ चित्तानें ऐकून घेतल्याबद्दल आपले आभार मानून मी सर्वांची रजा घेतों.''

यानंतर श्री. विर्जिनकर यांनीं अध्यक्ष ना. कामत श्रीयुत लाड व इतर साह्यकारी मंडळीचे आभार मानले. अध्यक्षांना पुष्पहार घालण्यांत येऊन इतर मंडळीला पानसुपारी अत्तरगुलाब देण्यांत आला. व समारंभाचें पहिल्या दिवशींचें कार्य संपलें.

## दिवस दुसरा

या व्याख्यानमालेंतील दुसरें पुष्प महाराष्ट्र सारस्वताचे संपादक रा. दुभाषी यांनीं गुंफलें. अध्यक्षस्थानीं ना. कामत हे विराजमान झाले. व्याख्यात्यांची सभाजनांस ओळख करून देतांना अध्यक्षांनीं रा. दुभाषी यांच्या ज्ञातिविषयक ऐतिहासिक ज्ञानाचा व त्यांजकडून आज

तागायत घडलेल्या वाङ्मयसेवेचा अभिमानपुरस्सर उल्लेख केला. रा. दुभाषी ह्मणालेः—कालरोजीं आपण अत्यंत सुमधुर अशा पक्वान्नांचा आस्वाद घेतला आहे आजचें व्याख्यान हें लोणचें वजा आहे त्याज्य भाग टाका व ग्राह्यांश स्वीकारा, एवढीच हात जोडून विनंति आहे.

या दाक्षिणात्य गौडसारस्वतांच्या वसाहतींत, त्यांच्या प्राचीन कुलागारांत, प्रेमानें आमंत्रण देऊन दोन शब्द बोलण्याची आपण मला संधि दिली याबद्दल समाजचालकांचा मी आभारी आहें. ज्या बांधवांनीं बिकट परिस्थिति प्राप्त झाल्या वेळीं अत्यंत कष्टानें आमच्या कुलदेवतांचें रक्षण केलें त्यांच्या हल्लींच्या वंशजांबद्दल प्रेम व आदर केव्हांही कमी होणें शक्य नाहीं. ते कोठेंही असले, कोणत्याही परिस्थितींत असले, कोणत्याही सत्तेखालीं असले तरी त्यांना गोमंतकीय बंधुभगिनींची आठवण होत असते व त्यांच्या उत्कर्षा-पकर्षांच्या वेळीं ते त्यांच्याप्रमाणेंच सुखी किंवा दुःखी असतात. व त्याचप्रमाणें गोमतकीय सारस्वतदेखील अन्यत्र असलेल्या आपल्या ज्ञातिबंधूंबद्दल अवर्णनीय अभिमान व प्रेम बाळगतात व त्याचें प्रत्यंतर तर आज काल आमच्यापुढेंच मूर्तिमंत उभें आहे.

अनेक कारणांमुळें कैक सारस्वतांनीं गोमंतकाचा त्याग केला व ते देशी संस्थानिकांच्या व इंग्रजसरकारच्या सत्तेखालीं असलेल्या मुलुखांत जाऊन आजमितीस प्रामाणिकपणानें व प्रतिष्ठितपणानें आपला प्रपंच चालवीत आहेत. राजकीय, सामाजिक, औद्योगिक व इतर अनेक राष्ट्रहितसंवर्धक प्रश्नांची चर्चा करण्याच्या कामीं त्यांनीं आपल्या बुद्धीचा व ज्ञानाचा उपयोग केला आहे व अद्यापि करीत आहेत. एकंदरींत इंग्रजी अमलांतील प्रजाजनांच्या उन्नतीबद्दलची त्यांची धडपड रात्रंदिन चालली आहे. गोमंतकांतील आपल्या बंधूंची स्थिति अशाच रीतीनें सुधारली आहे किंवा नाहीं व सुधारली नसल्यास ती सुधारण्यासाठीं काय केलें पाहिजे या गोष्टींचा आपण विचार करून पुढील दिशा आंखण्याच्या प्रयत्नास लागलें पाहिजे. नैसर्गिकदृष्ट्या विचार करतां आपण गोमंतकीय बंधु भाग्यशाली अहां, सृष्टिदेवतेनें आपलें सौंदर्य आपल्या उपभोगाकरितां राखून ठेवल्यासारखें दिसतें व यामुळेंच आपली मनें उदार, अंतःकरणें प्रेमळ व सत्कारशील व स्वभाव गोड झाला असावा. पण या सर्व सद्गुणांबरोबर आपल्या समाजांत एक प्रकारची निष्काळजीपणाची वृत्ति संचारल्याचें दिसतें व त्यामुळेंच गोमंतकीय स्वसमाज चढावा तितका वर चढलेला दिसत नाहीं. या कर्णकटुभाषेबद्दल आपण मला क्षमा करा.

जन्मापासून मनुष्यजातीचें स्थित्यंतर होत आहे व आयुष्याच्या शेवटच्या निमिषापर्यंत मानवी समाजांत चलबिचल आणि धडपड हीं दृग्गोचर होणार. किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं जोंपर्यंत हीं अस्वस्थता दृष्टीस पडते तोंपर्यंतच मानवी समाज जिवंत आहे. अस्वस्थता, असंतुष्टता, व असमाधानवृत्ति हीं समाजाच्या जिवंतपणाचीं लक्षणें असून तीं ज्या मानानें अधिक तीव्र स्वरूपांत दिसतील त्या मानानें तो समाज अधिक जागृत, विशेष तेजयुक्त व जीवनकलहांत टिकाव धरण्यास विशेष पात्र आहे असें म्हणतां येइल. पण या सर्व चळवळींच्या बुडाशीं एका प्रमुख शक्तीचें अधिष्ठान पाहिजे. ती शक्ती म्हणजे "ब्रह्मतेजोबल" हें होय. ज्या शक्तीनें येशूख्रिस्तानें जरुसलेम येथील अनाथ, पंगु अशा लोकांना बाहूंत कवटाळून प्रेमभावानें विश्वबंधुत्वाचा पवित्र धडा जगतास घालून दिला, राजवैभवाचा त्याग करून लोककल्याणासाठीं आत्मयज्ञ करणाऱ्या शाक्य मुनीनें जो आदेश जगतीतलावर पसरविला, जो धडा सीताराम, परशुराम भगवान कृष्ण यांनीं व त्यांच्या भक्तांनीं जगदुद्धारार्थ घातला तोच ब्रह्मतेजोबलाचा धडा आपण ब्राह्मणांनीं सर्वत्र घालून आपण ब्रह्मतेजोबलाचा विकास केला पाहिजे. मानवी कुटुंबाचें कल्याण होण्यास हाच धडा जास्त गिरविला पाहिजे. ज्या ज्या वेळीं राष्ट्रांच्या नजरेपुढील खरें ध्येय चुकलें व त्यांनीं क्षत्रियबलावर भिस्त ठेवून लोकांच्या आत्म्याची व जीविताची हिंसा केली त्या त्या वेळीं अशा प्रकारचीं राष्ट्रें कमकुवत होऊन त्यांचें पारमार्थिक व प्रापंचिक वैभव लयास गेलें अशी इतिहास साक्ष देतो. तेव्हां राष्ट्रांच्या घटकावयव ज्या ज्ञाती त्यांची इच्छा आपण टिकून राहावें व राष्ट्रांत श्रेय मान मिळावा अशी असेल तर त्यांनीं आपल्या ठायीं ब्रम्हतेजोबलाचा विकास केला पाहिजे. आजकाल धुरीण म्हणविणाऱ्यांचें ध्येय चुकल्यामुळें कालाचा व शक्तीचा दुरुपयोग होत आहे सार्वजनिक बाबींत खासगी मतभेद आड येत आहेत "सहका-

रिता" हा शब्द वाङ्मयांतच शिल्लक राहत आहे. मतभेदाच्या पायीं हट्टास पेटून हातांत शस्त्रास्त्रें न धरितां अगर दारूगोळ्याचा उपयोग न करितां आपण आज क्षात्रतेज प्रगट करितों यामुळें स्वहितावरच कुऱ्हाडीचे घाव घालतों. ही स्थिति बरी नाहीं. या देशाला अवनति येण्याला मूळ हीच स्थिति कारणीभूत झाली असें इतिहास सांगतो. अशा परिस्थितींत मागील चुकांची पुनरावृत्ति आपणाकडून होतां नये. गोमांतकांतील

## जनतेचे नेते व नेत्र

यांवरची जबाबदारी तर विशेष आहे. त्यांचें आचरण अंतर्बाह्य शुद्ध पाहिजे. आपल्या प्रत्येक कृतीचा जाब परमेश्वरापाशीं दिला पाहिजे हें त्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. यापूर्वीं गोमांतकांत होऊन गेलेल्या थोर सारस्वतांची परंपरा आपण कायम ठवली पाहिजे. तुमच्या कित्येक सार्वजनिक संस्था व सार्वजनिक प्रश्नांचा खल करण्यासाठीं निर्माण केलेलीं वृत्तपत्रें अल्पकालांत लयास गेलीं त्याच्या कार्यकारण भावाचा तुह्मी विचार करा. संपत्तिमान घराणीं नामशेष झालीं, नीतिमत्ता खालावली व सारा गोमंतक देश केवळ उत्सवप्रिय व आपल्या प्रगतीबद्दल निष्काळजी बनला, नेते आपली जबाबदारी विसरले याला कारण काय याचा आपण शांत मनानें विचार कराल काय ?

प्रतिकूल परिस्थिति प्राप्त झाली असतांही स्वत्वापासून न ढळतां सत्कार्य तडीस नेण्याची दिव्य शक्ती गौड सारस्वत ब्राह्मण समाजांत आहे ही शक्ती वाढविणें, ती विशेष तेजयुक्त करणें, आणि या शक्तीच्या योगानें स्वसमाजाच्या व जनतेच्या सुखांत शक्य तितकी भर घालणें हें गोमंतकांतील पुढारी म्हणविणाऱ्या ब्राह्मण वर्गाचें काम आहे.

तुमच्या पूर्वजांनीं गांवोगांवीं स्थापिलेलीं देवस्थानें, त्यांतील उत्सव व त्या देवस्थानांत धर्म व व्यवहार, यांजमधील भयंकर फारकत, याकडे तुमचें लक्ष जाऊं द्या. अनेक रोगांस, दैन्यावस्थेस व अधःपातास कारणीभूत झालेलें हें वातावरण शुद्ध करण्याची जबाबदारी संपूर्णपणें तुम्हां ब्राह्मणांवर, विशेषतः तरुण पिढीवर आहे हें लक्षांत असू द्या. सध्यां

## नवयुगाचा आरंभ

आहे. या युगांत तुमच्या योग्यतेचें स्थान तुह्मी पटकाविलें पाहिजे. जुन्या पिढीच्या अधःपतनाचा डांगोरा पिटण्यांतच तरुणांनीं धन्यता न मानतां नव्या पिढींतील कार्यशक्ती लोक निदर्शनास आणून लोककल्याणाची दिशा पत्करिली पाहिजे. ही दिशा आंखण्यांत या समाजानें अग्रमान पटकाविला हें भूषणास्पद होय.

धीरोदात्त धुरीण-विचार उच्चार व आचार यांच्यांत सदा सर्वदा मेळ राखणारे धुरीण—आपल्या गोमनक प्रदेशीं निर्माण होण्यास परमेश्वराची करुणा भाका, प्रतिसांवत्सरिक एक दोन उत्सवांनीं हे धुरीण निर्माण होणार नाहींत केवळ दासनवमी पाळल्यानें " समर्थ " उत्पन्न होत नाहींत. समर्थ उत्पन्न होण्यास सामाजिक वातावरण पवित्र झालें पाहिजे.

गोमंतकीय हिंदु जनतेचा प्रपंच सुखावह होण्यास या प्रदेशावर पावित्र्याचें साम्राज्य स्थापन झालें पाहिजे. तुमच्या बंधुभगिनींचीं मनें पवित्र झालीं पाहिजेत. आपल्या देशाकरितां, आपल्या धर्माकरितां, इहलोकाकरितां व परलोकाकरितां आपण पूर्ण पवित्र राहिलें पाहिजे. पावित्र्यावांचून शौर्य नाहीं, पावित्र्यावांचून ऐक्य नाहीं, आणि पावित्र्यावांचून शांति नाहीं. क्षणभंगुर काल्पनिक सुखासाठीं अपवित्रतारूपी पिशाचाचें मित्रत्व संपादन करणें आणि जन्माचें मातेरें झालें तरी पुनः पुनः तीच चूक करण्यांत आनंद मानणें यासारखं दुसरें घातकी कृत्य कोणतें असेल ? अपवित्रतेच्या योगानें हृदय विदीर्ण करणाऱ्या वेदना, अस्वास्थ्य व अधोगति प्राप्त होऊन मनुष्यप्राणि मनुष्यपणासही मुकतो. गत सालीं माझे मित्र रा. वसंतराव नाईक यांनीं गोमंतकीय सारस्वतांस स्वस्वरूपाची ओळख करून देतांना सांगितलें तें हृत्पटलावर खोदून ठेवा. त्यांचे काव्यमय शब्द असे होते:—

**सर्वज्ञांचीं बाळें । न करितीं मूर्ख चाळे ।**
**आह्मी कुलीनांचीं मुलें । टाकूं जपून पाउलें ।**
**स्मरुनि संभावित स्वेष्टा । करूं नये नीच चेष्टा ।**
**आह्मी थोरांचीं लेंकरें । वागूं नित्य सदाचारें ॥**

तुमच्यांतील मतभेद विसरून जा आणि कार्यावर नजर ठेऊन कार्य कसें सिद्धीस जाईल हें पहा. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ब्रह्मतेज वाढवून ब्राह्मण व्हा.

व्याख्यात्यांच्या भाषणानंतर श्री. जनार्दन विष्णु कामत, प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर, श्री. सिताराम सांवर्डेकर इत्यादि गृहस्थांचीं भाषणें झालीं. रा. जनार्दन कामत यांनीं आमच्या देवस्थानांत होत असलेल्या जत्रा उत्सव व इतर प्रसंगीं घडत असलेले नीतिबाह्य प्रकार यांचें कळकळीनें वर्णन करून या प्रकारास आळा घालण्याची सर्वांस विनंति केली. त्यांनीं या प्रसंगीं वापरलेल्या भाषेसंबंधानें मतभेद असला तरी त्यांनीं काढलेले उद्गार अंतरींच्या तळमळीचे असल्यानें जमलेल्या मंडळींत बरीचशी जागृति उत्पन्न होऊन कांहीं काल बरीच खळबळ उडाली. कित्येकांस रा. कामत यांनीं रेखाटलेलें चित्र विशेष भडक रंगाचें वाटलें तर कित्येकांस वस्तुस्थितीचें द्योतक असें दिसलें. रा. यशवंतराव सरदेसाई यांस हें चित्र भडक रंगांचें वाटून त्यांनीं आजकाल जुन्या व नव्या पिढींत बरीचशी जागृति उत्पन्न झाल्याचें सांगितलें व नव्या पिढीच्या कार्यास जुन्या पिढींतील कैक मंडळी सहकारित्व देत असल्याचें एक दोन उदाहरणें देऊन सिद्ध केलें. रा. दत्तात्रय दलाल यांनीं रा. सरदेसाई यांच्या भाषणास आपलाही टेंकू दिला.

या व्याख्यानांचा समारोप करतांना अध्यक्ष नामदार कामत यांनीं अत्यंत सुंदर मार्मिक व समतोल विचारांनीं भरलेलें असें भाषण केलें. त्यांनीं झालेल्या सामाजिक दोषांच्या कळकळीच्या ऊहापोहाबद्दल आनंद व्यक्त केला. सामाजिक दोषांचें अशा रीतीनें आविष्करण होण्यानें व संशोधनानेंच समाज–जागृति होत असल्याचें सांगून, गोमंतकीय स्वसमाजांत झालेली ही विचारजागृति एकंदर हिंदु समाजाला इष्ट दिशेला खास नेईल अशी आशा व्यक्त केली.

तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ४॥ वाजतां पाहुणे मंडळीस एक थाटाची चहापार्टी देण्यांत आली. या प्रसंगीं ठेवण्यांत आलेली सर्व व्यवस्था व आमंत्रितांनीं वेळीं हजर राहण्यांत दाखविलेला नियमितपणा गोमंतकांत तरी अपूर्व होता, यांत शंका नाहीं.

या प्रसंगीं रा. बोंबी नाईक यांनीं ना. कामत व इतर पाहुणे मंडळी यांचें अभीष्टचिंतन केल्यावर ना. कामत यांचें उत्तरादाखल भाषण झालें. ते ह्मणालेः—या सा. ब्रा. समाजानें गोमंतकांत बरीचशी जागृति व सुधारणा करण्याचें यज्ञकंकण हातीं बांधल्याचें दिसत आहे ही संतोषाची गोष्ट होय. पाश्चात्यांच्या उत्तमोत्तम चालीरीती स्वीकारून त्याज्य त्या टाकण्याचा धडा आपण घेऊन दारूशिवाय–चहानें–अभीष्टचिंतन करतां येतें हें स्वसमाजालाच नव्हे तर ज्या समाजांत दारूशिवाय अभीष्टचिंतन होत नाहीं त्या समाजाला शिकवून आपण खरेखुरे प्रागतिक बनलां ही आनंदाची व संतोषाची गोष्ट होय. यापुढें आपणा पुरुषांप्रमाणें स्त्रियाही हरएक प्रागतिक चळवळींत आपल्या सहकारित्वानें योग्य कार्यभार वाहतील अशी आशा प्रदर्शित करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. यानंतर समयास अनुसरून श्री. वसंतराव नाईक, वामनराव दुभाषी व गणपतराव लाड यांचीं भाषणें झालीं. व हा चहापार्टीचा व्यवस्थित व परिणामकारक समारंभ आटोपला.

## दिवस तिसरा.

या दिवशीं नामदार कामत यांच्याच अध्यक्षतेखालीं श्रीयुत **वसंत नारायण नाईक** एम. ए. यांचें भाषण झालें. अध्यक्षांनीं व्याख्यात्यांची सभाजनांस ओळख करून देतांना त्यांच्या अधिकारी लेखणीबद्दल व विद्वत्तेबद्दल गौरवपूर्ण उद्गार काढल्यावर रा. नाईक यांचें "पुढील कार्य" या विषयावर सुविचारपरिप्लुत असें भाषण झालें.

रा. रा. वसंत नारायण नाईक याचें संपूर्ण व्याख्यान आम्ही पुढील अंकीं देणार आहों. करितां येथें फक्त त्यांतील काही मुद्यांचा उल्लेख करितों. रा. नाईक यांच्या व्याख्यानाचा विषय 'पुढील कार्य' असा होता. म. सा. ब्रा. स. किंवा पर्यायानें आमच्या अखिल ज्ञातीनें कोणत्या प्रकारचें कार्य करावयास हवें याची रूपरेखा त्यांनीं काढिली. समाजांत उत्तम विचारजागृति प्रथम व्हावयास पाहिजे. म्हणून हस्तपत्रकें, व्याख्यानें, संमेलनें यांच्या द्वारें जेवढा विचारविनिमय होईल तेवढा करण्यास झटणें हें कार्य प्रथम करावयास हवें. त्यासाठीं द्रव्यनिधि, लेखक वर्ग व कार्यकारी मंडळ नेमून गोमंतकांतील मडगांव सा. ब्रा. समाजानें कार्यास उद्युक्त होऊन आपल्या इतर सारस्वत बंधूंस उदाहरण घालून दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें आपल्या समाजांतील सभासदांची मानसिक व नैतिक उन्नति होण्यास ज्ञान, वादविवाद वगैरे मार्गांचें अवलंबन करावयास हवें. तो मार्ग त्यांनीं कसा आक्रमावा याबद्दल सविस्तर सूचना श्री. नाईक यांनीं

बोलत असलेला आपला अत्यंत नम्र व अननुभवी सेवक या तिघांच्या व्याखानांचा मथितार्थ अशाच प्रकारचा होता. आपल्या दोषांकडे आपण केव्हांही डोळेझांक करतां कामा नये. आपल्याला आपलें जीवित जर पावन व पुण्यमय करावयाचें असेल तर आपण स्वतःच्या दोषांकडे अनुकंपेनें पाहण्यास शिकलें पाहिजे. Life has to be conquered anew every day of our lives अशी एक इंग्रजींत म्हण आहे. त्याचें मराठींत उत्तम रूपांतर 'रात्रंदिवस आह्मा युद्धाचा प्रसंग' या तुकारामाच्या उक्तींत झालें आहे. तरी आपण आपलें अंगण स्वच्छ झाडून टाकण्यास प्रथम झटा. दुष्ट आचार विचारांची आपणांतील भुतें प्रथम गाडून टाका. आह्मा मुंबई पुण्यांतील सारस्वतांना तेथील विश्वबंधुत्वाच्या भावनेनें जें शक्य होत नाहीं तें आपल्या लहानग्या परंतु अत्यंत संलग्न व एकाच भावनेनें प्रेरित अशा समाजाच्या द्वारें करून दाखवितां येईल. याला उत्तम ऐतिहासिक उदाहरणें जगांतील धर्मोपदेशकांच्या व साधूंच्या चरित्रांतून अनेक मिळतात. महमदानें आपला महमदी धर्म त्या काळीं एका बाजूस पडलेल्या अशा रूक्ष, रानटी, खुनशी अरब लोकांत स्थापिला. त्या वेळच्या संस्कृतीनें अलंकृत अशा राष्ट्रांत त्याचें बीं पेरलें गेलें नाहीं. महमदीय धर्मानें नंतर महमदी संस्कृतीची प्रचंड व भव्य इमारत एशियांतून युरोपमध्यें थेट स्पेनपर्यंत उभारली. स्पेनमध्ये कोर्डोव्हा शहरीं मूर लोकांनीं आपली युनिव्हर्सिटी स्थापन केली. ख्रिस्तानें आपला नवा धर्म त्या वेळच्या सुधारलेल्या व चैनींत मग्न असलेल्या ग्रीक व रोमन लोकांत किंवा मोठमोठाल्या ज्यू लोकांच्या मंदिरांत स्थापिला नाहीं. तर त्यानें तो नाझेरेथसारख्या लहान खेड्यांत कोळ्यामाळ्यांसारख्या सकृद्दर्शनीं मागसलेल्या परंतु मनानें परम कोमल व शुद्ध, अत्यंत भाविक व ईश्वराचें भय बाळगणाऱ्या लोकांस उपदेशिला. पहिले ख्रिस्ती लोक आपल्या प्रार्थना जमीनीखालीं भुयारांत बसून म्हणत. तेव्हां जें पुण्यामुंबईमध्यें आमच्या अहंभावामुळें शक्य नाहीं तें आपणाला शक्य आहे. आपण इंग्लंदांतील सरदार लोकांच्या कुटुंबांत असें पाहतों कीं, वडील मुलगा जो सर्व मालमत्तेचा वारस असतो त्याच्या पेक्षां त्याचीं लहान भावंडेंच आपल्या कुळाचें नांव वर काढतात. सारस्वतांकडून जी कार्यनिष्पत्ति व्हावयाची ती आपल्या ताज्या दमामुळें, आपल्यांतील एकोप्यामुळें, आपल्यामध्यें असलेल्या उत्साहामुळें, आपल्या अंतरींच्या तळमळीमुळें, आपणाला करून दाखविणें विशेष शक्य व सोपें आहे. न्या. तेलंगांनीं एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, आपली एकाद्या घराच्या धुरांड्याला गोळी लागावी अशी इच्छा असेल तर आपण आपला नेम थेट आकाशाकडे धरला पाहिजे. यामुळें अव्यवहार्यपणाचा दोष आपणांकडे येत नाहीं.

आतां एकच गोष्ट आपणाला विशेषेंकरून सांगावयाची आहे, ती ही कीं आपण आपली ही संस्था अखिल गोमंतकातील हरएक बाबतीच्या प्रागतिक चळवळीचें केंद्रस्थान होईल असे प्रयत्न पुढील वर्षांत करा. आपल्या उपयुक्त संस्थेला होतां होईल तों लवकर कायमचें व स्वतःच्या मालकीचें प्रशस्थ, हवाशीर व सर्व उपकरणांनी युक्त असें निवासस्थान मिळेल असें करा. त्याचप्रमाणें आपल्या संस्थेनें काढलेली एक प्राथमिक शिक्षणाची नमूनेदार शाळा, व एक आठवड्याला निघणारें, मराठींत चालविलेलें वर्तमानपत्र, अशीं दोन नवीं अंगें आपल्या संस्थेला जोडा. तसेंच पुढील वर्षांत स्त्रियांचें संमेलन, मुलांचें संमेलन वगैरे भरवून त्यांच्यांत जागृती होईल असें करा. हें सर्व कार्य सुरळीत व व्यवस्थित चालविण्यास कायमचा मोठा द्रव्यनिधि सर्व गोमंतकांतील धनिक गृहस्थांपासून मिळेल अशी जारीची खटपट करा. ईश्वर या पवित्र कामांत तुम्हाला शरीराचें बल, बुद्धीचा तीव्रपणा व मनोधैर्य देवो.

# महाराष्ट्र सारस्वत.

वर्ष ४ थें ] अक्टोबर १९२०. [ अंक ४ था.

## विज्ञप्ति

"महाराष्ट्र सारस्वत" हें त्रैमासिक चालविण्यास हातांत घेतल्यापासून आज चार वर्षें लोटलीं आहेत. लवकरच या त्रैमासिकाचें पांचव्या वर्षाच्या वाटेवर पाऊल पडेल. इंदूर येथें भरलेल्या संयुक्त गौड-सारस्वत ब्राह्मण परिषदेच्या अधिवेशनांत अशा प्रकारचें मासिक आपणांत असावें असें सर्वांस वाटून त्या-बद्दल प्रथम ठराव पास करण्यांत आला. परिषदेंतील ठराव, परिषद संपून मंडळीचा उत्साह ओसरल्यानंतर व प्रत्येकजण आपापल्या घरीं परत गेल्यानंतर, तिच्या दप्तरींच रहातो किंवा काय असेंच कैकजणांना वाटूं लागलें. ठरावानुरूप चिटणीस कचेरीमार्फत त्रैमासिक निघण्याचें चिन्ह दिसेना. अशा परिस्थितींत आमच्यांतील ज्ञातिहितेच्छु उत्साही तरुणांनीं एक सभा बोलावून परिषदेनें ठरावरूपानें नियोजिलेलें कार्य आपणच कां करूं नये असा प्रश्न काढिला. मंडळीच्या अंगच्या प्रेमामुळें, त्यांनीं व तदनंतर परिषदेच्या पुढारीमंडळीनें दिलेल्या धीरानें प्रेरित होऊन व आरंभीं अल्पस्वल्प द्रव्यनिधि गोळा झाल्यामुळें उपरिनिर्दिष्ट सभेंत पास झालेल्या ठरावानुरूप अशा प्रकारचें 'वाङ्मयसेवा' व ज्ञातिविषयक हरएक व्यवसायाचा ऊहापोह, याला वाहिलेलें असें 'महाराष्ट्र-सारस्वत' हे द्व्यर्थि त्रैमासिक, "सत्य संकल्पाचा दाता भगवान सर्व करी पूर्ण मनोरथ।" हें भगवद्भक्ताचें वाक्य लक्षांत वागवून, चालविण्याचें जबाबदारीचें काम केवळ "अल्पस्वल्प स्वजनसेवा" ह्मणून आह्मी शिरावर घेतलें. या मासिकाची चालू वर्गणी आम्हीं अवघी सव्वा रुपयाच ठेविली. उद्देश एवढाच कीं महाराष्ट्रांतील प्रत्येक सारस्वत बंधूच्या गृहांत या त्यांच्या अपत्यानें प्रवेश करून आपल्या बंधूंच्या मनोभूमीची त्यानें योग्य मशागत करावी, तींत ज्ञातिहित व राष्ट्रहित, ज्ञातीचा अभिमान, राष्ट्राचा अभिमान, ज्ञातिप्रेम, राष्ट्रप्रेम, या पवित्र भावनांचें यथायोग्य बीजारोपण व्हावें, परस्पर ऐक्य, सहानुभूति, सलोखा, प्रेम, एकतानता, जूट, संघशक्ति यांचा आपणांत प्रादुर्भाव होऊन आपल्यांतील वृद्ध तरुण, श्रीमंत गरीब, शिकलेले व साधारण बुद्धीचे, स्त्रीपुरुष वगैरे सर्व समाज खडबडून जागा होऊन कार्यक्षम व्हावा, हेंच 'महाराष्ट्र सारस्वता' चें उद्दिष्ट कार्य. हेंच त्याचें ध्येय. या ध्येयाला अनुसरूनच ह्याच्या चालकांनीं आजपर्यंत त्याचें धोरण ठेविलें आहे. आपणांत नवीन नवीन लेखक निर्माण व्हावेत ह्मणून त्यांनीं आजपर्यंत अत्यंत प्रयत्न केले आहेत. दुर्दैवानें त्यांना या कार्यांत आपल्या ज्ञातिबांधवांकडून, तींतील होतकरू, सुशिक्षित, पदवीधर मंडळीकडून लेखनद्वारा प्रत्यक्ष साहाय्य जसें मिळावें तसें मिळालें नाहीं, तरी पण अशा परिस्थितींत जे पुढें आले त्यांचे फार उपकार आहेत. त्यांच्या ऋणाचें ओझें आमच्या डोक्यावर आहे.

सारस्वत ज्ञाति ही मागसलेली नव्हे; विद्यार्जन व विद्यादान, अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन यांना ती अजूनपर्यंत पारखी झाली नाहीं असें असूनही तिच्यापुढें आम्ही चालविलेल्या त्रैमासिकासारखी सोन्याची संधी असतांना ज्ञात्युन्नतीस मदत करण्याकरितां तींतील जोमदार

# महाराष्ट्र-सारस्वताविषयीं गोमंतकस्थांचे प्रयत्न.

( ले. रा. रा. यशवंत सूर्याजीराव सरदेसाई. )

आजकाल गोमंतकांत महाराष्ट्र-सारस्वत म्हणजे मराठी भाषा हिजविषयीं सर्वत्र विलक्षण उत्साह, गोडी व अभिमान जागृत झाला आहे. ठिकठिकाणीं सार्वजनिक अगर खाजगी स्वरूपाच्या जोमदार मराठी शाळा सुरू होऊन त्यांत शिक्षण घेण्याची सुलभ सोय करण्यांत येत आहे. गांवोगांव लहानमोठीं वाचनालयें स्थापन झालीं असून मराठी वाचनानें आपलें मन व बुद्धि सुसंस्कृत करण्याकडे लोकांचा कल लागलेला आहे. गोमंतकांत कोंकणी बोलीचा प्रचार असला तथापि गोषांतील स्त्रियांप्रमाणें ठराविक मर्यादेंतच ती वापरावयाची असल्यानें आणि लिपिनिविष्टतेच्या अभावीं तिचें आयुष्य क्षणभंगुरच असल्यानें सगळ्यांचा ओढा मराठीकडे लागणें स्वाभाविक आहे.

गोमंत हा प्रांत महाराष्ट्रांत मोडतो, महाराष्ट्रीयांच्या हालचालींकडे तो संलग्न होतो, मराठा म्हणवून घेण्यांत गोमंतकीय इसमाला अभिमानच वाटतो, अर्थात् महाराष्ट्राची जी भाषा, आम्हां मराठ्यांची जी मातृभाषा–मराठी–तिच्या सेवेविषयीं, तिच्या अभिवृद्धीविषयीं, व तिच्या जयजयकाराविषयीं गोमंतकांत जागृति दिसून आल्यास त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं.

गोमंतकांतील हिंदुसमाजांत आज जी थोडी फार जागृति दिसून येत आहे तिचें सर्व श्रेय मराठी भाषेला आहे. पोर्तुगीज सरकारच्या पांघरुणाखालीं अज्ञानाच्या गादीवर घोरत पडलेल्या आमच्या समाजाला तीव्र फेंकी मारण्याचें काम प्रथमतः याच भाषेनें केलें; इंग्रजी हिंदुस्थानांतील, तसेंच जगावरील ज्ञानसूर्याचा सोन्यासारखा हात आमच्या खिडकींतून घालून याच भाषेनें आम्हांला जागें केलें. आपला धर्म, आपला इतिहास, आपली पूर्वपरंपरा, आपला हिंदुस्थान याविषयीं स्वत्वाची भावना उद्दीपित करण्याचें काम याच मराठीनें केलें; आणि शेजारच्या आपल्या बंधुजनाप्रमाणें गोमंतकस्थांनीं कोणत्या दिशेस चालूं लागणें इष्ट, श्रेयस्कर व न्याय्य आहे याची शिकवणूक याच मातृमुखांतून आम्हांला मिळाली ! मातृभाषेचे हे उपकार कोण विसरेल ?

मातृभाषेस–मराठी वाङ्मयास-पारखे झालेल्या किरिस्तांव समाजाचें आपण सूक्ष्मपणें निरीक्षण केलें, तर मराठीचें कार्य ठळकपणें आपल्या नजरेंत भरतें; आणि निवळ राजभाषेस तेवढी जवळ केल्यानें जनतेच्या स्वत्वाचें कसें मातेरें होतें याचा अनुभव आपणास पदोपदीं येतो ! राजभाषेंतील प्राविण्य, सामाजिक सुधारणेची पूर्णावस्था, परदेशगमनाची मोकळीक अगर नोकरशाहींतील श्रेष्ठ दर्जा, इतक्या गोष्टी साध्य झालेल्या अशा धनकनकसंपन्न किरिस्तांवसमाजाची जर चोखाळणी केली तर स्वार्थत्यागी देशभक्ताला कसें निराश व्हावें लागतें याचा प्रत्यय कोणास नाहीं ? देशाकरतां पडेल तें काम करणें, प्रसंगीं हालअपेष्टांचीही पर्वा न करतां आपल्या उच्चतम ध्येयाला बिलगून रहाणें, अज्ञानांत असलेल्या आपल्या बांधवांना हात देऊन वर काढणें, परोपकारासाठीं आयुष्य खर्च करणें, इत्यादि गोष्टींचे प्रश्न पडले तर या समाजांतील किती लोक 'पेपर' सोडून देतील व पास माणसांचें प्रमाण कसें पडेल हें नव्यानें सांगावयास नको ! उलट, शरीरानें दुबळा, संपत्तीनें दीन, शिक्षणानें मागसलेला व अनेक बंधनांनीं पछाडलेला हिंदुसमाज, पण देशाच्या तळमळीचा पारा त्याच्या ठिकाणींच वर जाईल ! ही अतिशयोक्ति नव्हे; वस्तुस्थिति आहे. आणि ती सप्रमाण सिद्धही करून दाखवितां येईल.

इतकें सांगण्याचें कारण हेंच कीं, हिंदुसमाजांतील हें सगळें चैतन्य मराठीनें आणलेलें आहे. राजकीय सत्ताभेदामुळें गोमंतकास महाराष्ट्रांत असून निराळा संसार थाटणें भाग झालें तथापि इतर महाराष्ट्रीय बांधवांबरोबर सहविचार करण्याची पात्रता अगर बुद्धि या भाषेनें गोमंतकांत उत्पन्न केली आहे; व हिंदुस्थ

नामक आर्याकोश हें लहानसें पुस्तक आर्यागीतीवृत्तांत तयार करून तें १८९५ सालीं प्रसिद्ध केलें आहे. राघोबा प्रभु हें झांकलेलें माणिक आपल्या प्रांतांत आहे असा सत्संगकारांनीं आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. नारायण रघुनाथ देसाई यांची दत्तजन्मकथा निर्णयसागरमधून प्रसिद्ध झाली असून दत्तभक्तांना वाचनीय आहे. वर सांगितलेल्या कवींच्या काव्यांत निवळ विद्वत्ता व भाविकपणा हाच गुण प्रमुखत्वानें दिसून येत आहे. यानंतरचे दुसरे प्रयत्न 'म्हाडदोळची यात्रा' व 'गोवें प्रांतांतील १८९५ चें बंड' हे होत. हीं काव्यें वर्णनात्मक असून पहिल्याचे कर्ते माधव पांडुरंग वैद्य हे होत. दुसरा प्रयत्न रामचंद्र सावाजी परूळकर यांनीं केलेला असून त्यांत राण्याच्या बंडाची हकिकत ऐकींव माहितीवर भिस्त ठेवून त्यांनीं वर्णन केलेली आहे. एका मराठी शिक्षकानें उत्साहानें हा प्रयत्न केला आहे यावरून त्यांचें कौतुक करणें योग्य आहे. पण वर्णनशैलीच्या दृष्टीनें पाहिलें असतां वैद्यांची कविता चांगली साधली आहे. शिवाय समाजांतील दोषाविष्करण करण्याच्या निस्पृहबुद्धीनें केलेला हा प्रयत्न असल्यामुळें त्याची महति विशेष आहे. म्हाडदोळच्या जत्रेंत होणाऱ्या निरनिराळ्या अनिष्ट पकारांपैकीं जो एक मुख्य अनर्थकारक जुगार त्याचें वर्णन कवीच्या तदाकारतेमुळें केवळ फोटोसारखें उतरलें आहे! म्हाडदोळच्या जत्रेचें चित्र 'श्रीमहालसा' या लेखांत आम्हीं मागें रेखाटलें होतें व त्यांत सदरहू पुस्तकांतून एक दोन कविताही घेतल्या होत्या; हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. वैद्यांचें वर्णन विशेष अधिकृत असून त्यांत ग्राम्य दृष्टांतांची योजना केलेली असली तथापि उपयुक्त काव्य या दृष्टीनें अशा प्रयत्नांचें अभिनंदन करणें जरूर आहे. गोमंतकांतील जत्रेंतून चालणाऱ्या या अक्षक्रीडा पाहून जनतेकडून असो अगर सरकारकडून असो या प्रकाराला आळा घालण्याचा प्रयत्न अजून कसा झाला नाहीं याचें सखेदाश्चर्य वाटतें. ईश्वर करो व अलीकडे कांहीं लोकांना जुगाराविरुद्ध प्रयत्न करण्याच्या निपजलेल्या बुद्धीस यश येवो, आणि 'म्हाडदोळचीजत्रा' सदर्हू पुस्तकांतच राहून पुढील पिढीला मौजेनें वाचण्यापुरताच तिचा उपयोग होवो असें आम्हीं इच्छितों.

वर्णनात्मक कविता करण्यांत पेडणें येथील विद्वान गृहस्थ पणशीकरशास्त्री यांचाही बराच हातखंडा आहे. यांनीं, एका श्रीमंताच्या घरच्या व्रतबंधोत्सवाचें काव्यमय वर्णन त्यांच्याच खर्चानें एकदां 'चित्रमय जगत्' या मासिकांत पुरवणीदाखल प्रसिद्ध केलें होतें. याबद्दल त्यांना बिदागीही बरीच मिळाल्याचें ऐकिवांत आहे. समारंभांतील—विशेषतः पक्वान्नांचें वर्णन तर इतकें बहारीचें आहे, कीं तें वाचतांना कोणत्याही भिक्षुकाच्या तोंडास पाणी सुटल्याशिवाय रहायचें नाहीं! या काव्यांत दात्याविषयीं स्तुतीची साखर तर पेरलीच आहे, पण ठिकठिकाणीं पाघळलेल्या काव्यरसामुळें वाचकांना जिलबीही बेचव लागेल यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं! पण कोणत्याही सत्कवीनें झालें तरी आपल्या वाणीचा असा अस्थानीं विक्रय करावा, हें आह्मांला कसेंसेंच वाटतें! विद्वत्तेच्या ठिकाणीं मिंधेपणा हें लांछन असून निस्पृहता हें भूषण आहे, हें तत्व शास्त्रीबुवांना माहित असतां त्यांनीं आपली लेखणी भलत्या कामीं हातास मलम लागण्याकरतां विटाळावी हें प्राप्तविद्येचा दुरुपयोग केल्याचें लक्षण होय असें कोणीही ह्मणेल! पणशीकरबुवांनीं आणखी बऱ्याच नीतिपर व उपदेशपर कविता प्रसिद्ध केल्या असून त्यांना वृत्तपत्रांचे उत्तम अभिप्रायही मिळाले आहेत.

विद्वत्ता, काव्यप्रसाद व भक्तिप्रेम या तीनही गुणांनीं मंडित अशी कविता या आधुनिक कालांत ह्मणजे डोंगरी येथील पर. हरिभक्तिपरायण कृष्ण जगन्नाथ भट्ट बांदकर यांची होय. कृष्णजी लहानपणांपासून कविता करीत. डोंगरी येथें होणाऱ्या देवाच्या वार्षिक उत्सवाकरितां स्वतः नाटकें रचून त्यांचे प्रयोग गांवच्या मंडळीकडून ते करून दाखवीत. या उत्सवाला दूरदूरची मंडळी एकत्र होई. एकदां असल्या उत्सवाचे वेळीं रा. बळवंत पांडुरंग उर्फ अण्णा किर्लोस्कर हे तेथें आले होते. ते त्यावेळीं गोमंतकांत असून इंग्रजांतर्फे मिठाच्या कामावर आलेल्या मंडळींत एक कामदार होते. त्यांनीं डोंगरीवरील हा उत्सव पाहिला व त्यांच्या मनांत नवीनच विचार उद्भूत झाले. प्रयोग पाहून झाल्यावर त्यांनीं कृष्णभटजींची गांठ घेतली व नाट्यकला व तिचें पुनरुज्जीवन या विषयावर उभयतांचें बराच वेळ संभाषण झालें. किर्लोसकर यांना आधींच या विषयाची गोडी होती, पण त्यांना कोणी मार्गदर्शक गुरु न भेट-

त्यामुळें या विषयांत शिरण्यास त्यांना धैर्य नव्हतें. भटजींकडे त्यांचें बोलणें झाल्यावर भटजींनीं त्यांना देवळांत नेलें व देवाचा प्रसाद व नारळ त्यांच्या उपरण्यांत बांधून कवित्व व नाट्यरचना या बाबतींत आपला लौकिक होवो असा आशीर्वाद दिला. ही गोष्ट सर्वांसमक्ष घडलेली असून ती प्रत्यक्ष माहित असलेले गृहस्थ आज हयात आहेत. अण्णांनीं पुढें नाट्य सृष्टींत केवढें नांव केलें हें सर्वश्रुतच आहे. कृष्णभटजींना उतारवयांत वैराग्य प्राप्त झालें व संतदर्शनें, तीर्थयात्रा, रामभक्ति या गोष्टींच्या निदिध्यासानें तेही हळूहळू संतस्वरूप बनत चालले होते. यांची वाणी प्रासादिक, वृत्ति भाविक व कविता गोड होती. हे कीर्तन फार चांगलें करीत असें म्हणतात. यांचा 'स्वात्मतत्वामृतशतक' नांवाचा एक छोटासा ग्रंथ प्रसिद्ध झाला असून त्यांत वेदांतपर कांहीं श्लोक व स्फुट पदें मुद्रित झालीं आहेत. यांचा पदसंग्रह फार मोठा असून तो गोमंतकांतील आबाल वृद्धांच्या तोंडीं आहे. सरस चाल, सुबोध रचना, व भावनात्मक शब्दयोजना यामुळें कुठल्याही भजनांत यांचें पद निराळेंच ओळखून काढतां येतें. यांच्या मरणानें भाविक लोकांचें नुकसान झालें. त्यांना मुकुंदराव नामक एकुलते एक चिरंजीव आहेत. तेही स्वतः कवि असून कीर्तनकारही आहेत. यांनीं वडिलांची लोकांना विस्मृति न होण्याचा प्रयत्न चालविला आहे.

भक्तिरसात्मक काव्य प्रसिद्ध करण्याचे बाबतींत असोळडें येथील गृहस्थ रा. विष्णु रंगाजी शेळडेकर यांचा उद्योग अभिनंदनीय होय! रा. शेळडेकर स्वतः जुन्या संस्कारांतल्या शुद्ध वळणांत वाढल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेली काव्यशक्ति त्यांनीं भक्तिक्षेत्रांतच खर्च केली. यांनीं वेंगुर्ल्याचे प्रसिद्ध संत बाबा उसपकर यांचा 'पूर्णसार' नामक ग्रंथ, त्यांचे भक्त व डिचोली येथील भाविक गृहस्थ कै० घनश्याम सूर्यराव सरदेसाई, यांमार्फत मिळवून तो छापून काढला. नंतर स्वतः चंद्रेश्वरमहात्म्य, देवीचरितामृत, पद्यसुंदरी, वगैरे पुस्तकें प्रसिद्ध करून आपली भक्तिरसात्मक सदभिरुचि प्रगट केली. पहिलें आर्याबद्ध असून त्यांत, पारोडें–कुसमणनजीक असलेल्या श्रीचंद्रेश्वर देवाचें स्थानमाहात्म्य वर्णन केलें आहे. दुसरें ओवीवृत्तांत असून आपली कुलदेवी श्री शांतादुर्गा हिचा महिमा गाण्यांत आला आहे. तिसरें देवाचीं पद्यें होत. यांचें काव्य भक्तिरसप्रधान असून त्यांत कविहृदयाच्या प्रेमळगुणाची साक्ष पदोपदीं पटत आहे. अलिकडे मद्यपानावर कांहीं पद्यें रचून तीं यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत; व कित्येक ठिकाणीं फुकटही वांटलीं आहेत. पण या बाबतींत तें अरण्यरुदनच झालें आहे. अग्नी लागलेल्या सुक्या रानास ब्राह्मणाच्या तीर्थोदकाचा ज्याप्रमाणें उपयोग होत नाहीं, तर उलट तो अग्नी जंगल स्वाहा करतांना त्याच ब्राह्मणाला उघड्या डोळ्यांनीं हळहळत पहावें लागतें, तद्वत् मद्यपानावर नुसत्या कविता करणाऱ्या कवीची स्थिती आहे व यांनाही तिचा थोडा फार अनुभव आलाच असेल. कवि काय किंवा लेखक काय, त्यानें व्यसनावर वाङ्मय निर्माण करण्यापेक्षां व्यसनी मनुष्यांच्या संसर्गापासून अलिप्त रहाण्यांत, त्यांच्याविषयीं तिटकारा दाखविण्यांत, त्यांना बहिष्कृतासारखें वागविण्यांत नीतिधैर्य दाखविलें तरच अधिक परिणाम होण्याचा संभव आहे, यांत शंका नाहीं.

याच बाजूचे दुसरे एक कवि रा. काकोडकर हे होत. यांची कविता 'सत्संग' 'चित्ताकर्षण' वगैरे मासिकांतून प्रसिद्ध झालेली असून 'जिवबादादा बक्षी यांचें चरित्र' त्यांनीं निराळें छापून प्रसिद्ध केलें आहे. यांचीं उदारमतें व सुधारणाबुद्धि काव्यांत भरपूर पाहून घ्यावी. रा. दामोदर फटबा भांडारे यांच्या ओंव्या 'सत्संगां' तून प्रसिद्ध होत, त्यांत स्वत्व व देशाभिमान हे गुण उत्कटत्वानें दिसून येतात. न्यायमूर्ति रानडे व तेलंग यांचीं आर्याबद्ध चरित्रें त्यांनीं प्रसिद्ध केलीं असून तीं दोनही वाचनीय झालीं आहेत. पणजीचे रा. भिमाजी मुकुंदराव देशपांडे हेही चांगल्यापैकीं कवि आहेत. यांची संतापशमन नाटकाची अभिनव पद्यावलि प्रसिद्ध झाली असून 'चित्ताकर्षण' मासिकांत 'वज्रदेही' या टोपण नांवाखालीं यांच्या बऱ्याच कविता येत असत. यांची कविता म्हणजे, व्याकरणाच्या रेखींव मर्यादेबाहेर न जाणारी; वृत्त, अनुप्रास यांचा बुरखा सांभाळून जुन्या वृत्तीनें वागणारी व नटवेपणाची आवड नसणारी अशी गोषांतील साध्वीसारखी दिसते.

आधुनिक गोमंतकस्थ कवि या नात्यानें रा. रामचंद्र पांडुरंग वैद्य यांचा येथें उल्लेख करणें उचित आहे. यांच्या काव्यशक्तीला त्यांच्या तारुण्यांत बहर आला

होता व त्याचें फल 'पथ्यबोध' नामक त्यांनींच काढलेल्या मासिक पुस्तकांतून दिसत होतें. सदर मासिकाविषयींचें विवेचन पुढें येईलच. या मासिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या या कवीच्या कविता वाचनीय असत. निरनिराळ्या व्यसनांमुळें अनेक प्रकारचे रोग शरिरांत घुसून कसे ठाणें देऊन बसतात, एकाचा संसर्ग दुसऱ्यास लागून त्यामुळें एकंदर समाजाची कशी दुर्गति होते, याचें वर्णन करतांना तर या अनुभवी वैद्यकवीच्या स्फूर्तीस बहार आलेला दिसून येतो; निरनिराळ्या रोगांचें आविष्करण करून त्याचीं कारणें व त्यांवर उपाय सांगतांना कवींनीं आपला भरपूर वैद्यकीय अनुभव प्रगट केलेला असून त्या सर्व कविता तरुणांना अवश्य वाचनीय व मननीय अशा आहेत. अलिकडे 'प्राचीप्रभा' मासिकांतूनही यांच्या कविता प्रसिद्ध होत, पण अनेक व्यवसाय आरंभल्यामुळें यांच्या काव्यशक्तीला तितका अवसर मिळत नाहीं असें वाटतें. अलिकडील यांच्या कविता वृद्धपणांतील दुर्बलतेप्रमाणें खंगत चाललेल्या प्रतिभेचीच साक्ष पटवितात असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. तथापि कविता करण्याची यांची उमेद अजून नष्ट झालेली नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

पण या सर्वांहून सरस व अलिकडील कालास अनुरूप अशी कविता करण्याचे कामीं, महाशाल येथील विद्वान् गृहस्थ वे. रामचंद्र वामन नायक करंडेशास्त्री यांची प्रतिभा अत्यंत प्रशंसनीय आहे. शास्त्रीबुवांनीं स्वतंत्ररूपानें कविता प्रसिद्ध केलेली नाहीं. पण त्यांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या 'सत्संग' मासिकांत ज्या त्यांच्या कविता प्रसिद्ध होत, त्या अत्यंत वाचनीय असत. संस्कृत त्याचप्रमाणें मराठी काव्यार्णवांत अवगाहन केल्यानें त्यांच्या स्फुरणशील प्रतिभेंत जें ओज सांठवून राहिलें होतें, त्याचें प्रतिबिंब या कवितांमधून दिसून येतें. नवीन कालानुसार नवीन विचार ग्रहण करण्याची व ते ठांसून लोकमतावर बिंबित करण्याची शक्ति व धैर्य त्यांच्या गद्याप्रमाणें पद्यांतूनही दग्गोचर होत असे, हें, 'धर्माध्यक्षांस विज्ञापना,' 'रामदासस्वामीस प्रार्थना,' 'शिवाजीचे स्वर्गांतील उद्गार,' 'भजनी सप्ताहांत म्हणावयाचे अभंग,' 'टिळकाभिनंदन' वगैरे कविता वाचतांच कळून येतें. 'जपानी वीरसूचे बोल' ही त्यांची कविता वीर व करुण या दोनही रसांचे दृष्टीनें प्रशंसनीय झाली असून, 'मार्मिक नर्मोक्ति'' हिंदमातेचा पुण्यप्रकोप' इत्यादि त्यांच्या कविता जिज्ञासूंनीं अवश्य वाचून पहाव्या अशी आमची शिफारस आहे. शास्त्रीबुवांची कविता ठाकठिकीची, डौलदार, मर्मास झोंबणारी, नर्मोक्तिप्रचुर, गुंगविणारी, अशी असून यमक, श्लेष, प्रसाद, इत्यादि गुणांनीं स्तुतिप्रद आहे यांत शंका नाहीं.

सांखळीच्या बाजूस गोंदजी नाईक या नांवाचा एक कवि होऊन गेला. याच्या लावण्या तिकडे फार प्रसिद्ध असून त्या मराठेमंडळी शिमग्यांतील खेळांत म्हणतात. अलिकडे फोंडा येथें निघणाऱ्य 'स्वयंसेवक' मासिकांतून 'देमांदमाहात्म्य' नांवाचें एक ओंवीबद्ध काव्य खंडशः प्रसिद्ध होत असतें. यांत गोव्यांत होणाऱ्या व करणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या कज्जांचा इतिहास ग्रथित केला असून कविता मार्मिक, विनोदप्रचुर व सरस अशी आहे. यांत निरनिराळ्या खटल्यांची रचना करतांना कवीनें जें चातुर्य दाखविलें आहे, त्यावरून सदहू विषयांतील त्यांचें तादात्म्य दिसून येतें. तसेंच गांवठी पण यथायोग्य व पटणाऱ्या अशा उपमा जागोजाग घातल्यानें तर या काव्यास विशेष शोभा आली आहे. बाकी, शिळोप्याचे वेळीं केवळ कौतुक करण्यापलीकडे या काव्याचा परिणाम होणार नाहीं, याचा अनुभव देमांदमाहात्म्यकारांनाही आलाच असेल. आणखी फुटकळ कवि बरेच या प्रांतांत होऊन गेले; पण स्थलसंकोचास्तव त्यांचा नामनिर्देश करतां येणें शक्य नाहीं. प्रमुख कविजनांपैकीं चुकून कोणाचा उल्लेख झाला नसेल, तर त्यांनीं क्षमा करावी. मराठी कविता करणाऱ्या या सर्व कविबंधूंच्या प्रयत्नाबद्दल आदर दर्शवून ही परंपरा अशीच कायम राहो असें इच्छितों.

# कै. काशिनाथ रघुनाथ मित्र.

लेखक—रा. रा. वसंत नारायण नाईक, एम. ए.

काशिनाथ रघुनाथ मित्र यांचें नांव माहीत नाहीं असा महाराष्ट्रांत कोणी असेल असें आम्हांस वाटत नाहीं. आज सतत पंचवीस वर्षें "मासिक मनोरंजन" व "मनोरंजक ग्रंथ प्रसारक मंडळी" यांच्याद्वारें त्यांनीं जी महाराष्ट्र वाङ्मयाची अनुपम सेवा केली त्या सेवेमुळें त्यांचें नांव आबालवृद्धांच्या तोंडीं झालें असल्यास नवल नाहीं. महाराष्ट्रांत "केसरी" आणि "करमणूक" त्याचप्रमाणें "मनोरंजन" हें त्यांचें भावंड घरोघरीं झालें आहे. ललित वाङमयांत मनोरंजनानें चांगलीच भर घातली. लहान चटकदार गोष्टी, सिरियल कादंबरी, विनोदपर मार्मिक लेख, प्रचलित विषयांवर–मग ते सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक असोत–निर्भीड, भारदस्त व उदारमतवादी टीका, स्त्रीशिक्षण व स्त्रियांच्या सर्व बाबतींविषयीं सहानुभूतिपर लेख, आत्मचरित्रें, थोर पुरुषांचे character-sketches, सुभाषितें, प्रवासवर्णनें, सुलभ, सहज कळण्याजोगी ऐतिहासिक विषयांची चर्चा, निरनिराळया संस्थांची सचित्र माहिती, निरनिराळया पुढाऱ्यांचीं छायाचित्रें, वगैरे आतां संवयीनें सर्वांस सहजीच झालेलीं कोणत्याही मासिक पुस्तकांची विविधअंगें मासिकमनोरंजनाचे धाडसी, कर्तृत्ववान, हौशी व मेहनती संपादक व मालक काशिनाथ पंत मित्र यांनींच प्रथम प्रचारांत आणिलीं.

हें सर्व काशिनाथपंतानीं स्वतःच्या हिमतीनेंच केलें. आपल्या कार्यास सुरुवात करतांना त्यांना कोणच्याच प्रकारची अनुकूल परिस्थिति नव्हती. त्यांच्या आयुष्याला सुरुवात कोंकणातील मराठी शाळेवरचा दरमहा सात रुपये मिळविणारा शिक्षक अशा पेशानें झाली. काशिनाथपंत श्रीमंत घराण्यांत जन्मले नव्हते. लहानपणींच म्हणजे आपल्या वयाला सोळा वर्षें पुरीं होतात न होतात इतक्यांतच कुंटुबपोषणाची जबाबदारी त्यांच्या अंगावर पडली. शाळामास्तरकी करून ही जबाबदारी कशीबशी पार पाडीत असतांनाच त्यांच्या मनानें इंग्रजी शिकण्याचें घेतलें. रात्रीचा दिवस करून एका मित्राबरोबर त्यांनीं कोकणांत असतांनांच इंग्रजीचा अभ्यास करण्यास प्रारंभ केला. पण मास्तरगिरी,–शाळा, संभाळून हें इंग्रजी शिक्षण ठीक जुळेना. म्हणून लवकरच त्यांना तो नाद सोडून देणें भाग पडलें. एका गुजराथी वर्तमानपत्राचा अंक हातांत पडल्यामुळें आपणहि मुंबईस जाऊन हा धंदा जुळल्यास पहावें असें त्यांच्या मनानें घेतलें. व ते इ. स. १८९३ च्या सुमारास मुंबईस आले. प्रथम कांहीं दिवस त्यांनीं रिपोर्टर या नात्यानें "प्रभाकर" नांवाच्या वर्तमानपत्रावर काम केलें. नंतर स्वतंत्र धंदा करण्याचें त्यांच्या मनानें घेतलें. याच सुमारास "मासिक मौज" या नांवाच्या गुजराथी विनोदी पत्राचा अंक यांच्या हातांत आला. त्यावरून आपणहि मराठींत अशाच प्रकारचा प्रयत्न करून पहाण्याचा त्यांनीं निश्चय केला. त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या मासिक मनोरंजनचा पहिला अंक जुलै १८९५ मध्यें बाहेर काढिला. त्या वेळची मनोरंजनाची वार्षिक वर्गणी आठ आणे होती. आकार छोटा होता. वर्गणी तीनमहिन्याला दोन आणे अशा सवलतीनें वसूल करण्यांत येत असे. मळपृष्ठावर कसलें तरी कायमचें चित्र व आंतमध्यें सामाजिक विषयावर एक दोन हिंदीपंचाप्रमाणें Cartoon वजा चित्रें, एकादी गोष्ट, कांहीं सुभाषितें, एखादा छोटेखानी नीतिपर लेख, एडिटरचें टेबल, आल्या लेखांची पोंच व साभार स्वीकार वगैरे विषय पहिल्या एक दोन वर्षांत येत असत. अगदीं प्रथमपासूनच्या लेखकांपैकीं एक श्री. वामन रामचंद्र जोशी हे होत. मनोरंजनाच्या पूर्वअमदानींतच मित्रांनीं त्याची प्रत्यक्ष वाङमय सेवा करून केली. बंगाली भाषेंतून प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यांचीं रूपांतरें मराठींत करण्यास प्रथम

मित्रांनींच सुरुवात केली. त्यांपैकीं 'धाकट्या सुनबाई' ही त्यांची कादंबरी सर्वांच्या माहितीची आहे. या कार्यांत त्यांचे परम जिव्हाळ्याचे मित्र प. वा. कुळकर्णी हे होते. त्यांच्या "परिणामीं हेंच," व "सरस्वती" या गोष्टी प्रथम मनोरंजनांत प्रसिद्ध झाल्या. काशिनाथपंतांनां मनोरंजनाचा जम उत्तम बसविण्यास फारच कष्ट पडले. पैशाची अडचण म्हणून छापखान्याची अडचण; लेखकांची अडचण; वर्गणीदारांची दुर्मिळता व माणूसबळही बाकी पूज्य—यांमुळें एकट्या माणसाला अत्यंत दीर्घ व चिकाटीचे प्रयत्न करावे लागले. रात्रीचा दिवस करून लेख लिहावे, जाहिराती मिळवाव्या, छापखान्याकडे खेटें घालून प्रुफें तपासावींत, नवीन नवीन स्त्रीपुरुष लेखकांना व पदवीधरांना भेटून लेख लिहावयास विनंति करावी, आग्रह करावा, निकड लावावी, हें सर्व सुरळीत चालण्याकरितां पैशाची जमवाजमव करावी, अशा अविश्रांत श्रमांत, त्यांना पहिलीं सात आठ वर्षें काढावीं लागलीं. मराठींत मनोरंजनासारख्या मासिकाला त्यावेळीं वाचक वर्ग अत्यंत तुरळक असा होता. सुशिक्षित म्हणविणारे लोक केसरी, विविधज्ञानविस्तार, फारतर, करमणूक हींच वाचत असत. सामान्य जनसमूहांत व स्त्रीवर्गांत आतां प्रमाणें वाचनाची आवड पसरली नव्हती. काशिनाथपंतांनीं प्रथम आपल्या मासिकाची वर्गणी आठच आणे ठेवण्यांत व तीही तीन महिन्यांनीं दोन आणे अशी वसूल करण्यांत बिनचूक धोरण व कल्पकता दाखविली. कारण आपलें मासिक लोकांनां बोजा न वाटतां सहजच करमणूक म्हणून लोकांनी हौसेनें घ्यावें अशी मनोवृत्ति वाचकांत निर्माण करावयाची होती. ज्याप्रमाणें बेंजामिन फ्रँकलिन आपल्या छापखान्यांत छापलेलें स्वतःचे वर्तमानपत्र हातगाडीवर टाकून घरोघरीं स्वतः नेऊन पोहोंचवीत असे, तसाच उपक्रम मित्रांनीं आपल्या मासिकासंबंधानें पहिलीं कांहीं वर्षें केला. घ्या घ्या म्हणून आपलें मासिक पुस्तक जणूं काय महाराष्ट्रांतील मुंबई, पुणें, कोल्हापूर वगैरे मुख्य शहरीं त्यांनीं घरोनघरीं पोहोंचविलें; सर्व महाराष्ट्रभर पाठीवर बोजा मारून ते शहरोशहरीं हिंडले. वर्तमानपत्रांच्या संपादकांस भेटले. आपल्या नम्र व लाघवी स्वभावानें त्यांनीं हळुहळु सर्वांचीं अंतःकरणें आपल्या कार्याकडे वेधून घेतलीं, व अशा रीतीनें सहज भेटायाला आलेला पाहुणा ज्याप्रमाणे आपल्या गुणांनीं ओळखीचा होतो, नंतर मित्र बनतो, व पुढें तो घरांत नसला तर प्रत्यक्ष घरचें माणूस चुकलें असें वाटण्यास लावतो, अशी स्थिति मनोरंजनाची झाली. मनोरंजनाचें पुढील वाढतें कार्य म्हणजेच मित्रांच्या आयुष्यांतील पुढची कामगिरी. "मनोरंजन" म्हणजे मित्र, व मित्र म्हणजे मनोरंजन, अशी पक्की भावना आज पंधरा वर्षें महाराष्ट्राच्या हृदयांत पक्की भिनली होती. मनोरंजनचा वाढता संसार म्हणजेच मित्रांचें कार्यबाहुल्य, त्यांचा वाढता व विविध लेखक वर्ग म्हणजेच मित्रांचा वाढता दर्जा, त्यांचें कर्तृत्व व त्यांचें संपादकीय सामर्थ्य, मनोरंजनाचा वाढता वाचकवर्ग म्हणजेच मित्रावरील महाराष्ट्राचें प्रेम व त्यांच्या कामगिरीचें चीज. या मनोरंजनाच्याच निमित्तानें त्यांनीं उत्तम प्रकारची राष्ट्रसेवा केली; लोकांच्या विचारांना शुद्ध वळण लाविलें, निरनिराळ्या राजकीय, सामाजिक व धार्मिक बाबतींत लोकांना नव्या व उदार दृष्टीनें पहाण्यास शिकविलें. 'जुनें तेवढें सोनें' व नवें तेवढें त्याज्य ही भावना नाहींशी करून जुन्या नव्यांतलें आपल्या काळाला योग्य, बदलणाऱ्या परिस्थितींत खऱ्या प्रगतीला पोषक, व सार्थ सनातन जेवढें, तेवढें अनेक साधनद्वारा रमणीय स्वरूपांत वाचकांपुढें मांडून ललित वाङ्मयाच्या शर्करावगुंठित प्रकारानें त्यांनीं महाराष्ट्र देशबांधवांना देऊन त्यांचा पुढील मार्ग चोखाळला. मनोरंजनाच्याच द्वारें आपणांला जुन्या महाराष्ट्रकवींची पुन्हा ओळख करून देण्यांत आली; त्याच मासिकपुस्तकानिमित्त कर्वे, रानडे, भांडारकर, गोखले यांच्या चरित्रामृताचा बोध आपणास मिळाला आहे; रमेशचंद्र दत्तांसारखे बंगाली लेखक यांचा परिचय मनोरंजनानेंच मराठी भाषेला प्रथम करून दिला; गडकरी, केशवसुत यांची कविता; श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे विनोदी लेख, त्रोटककाव्यें, व चटक लावणाऱ्या गोष्टी मनोरंजनानेंच आम्हांला दिल्या; प्रासंगिक विचारांचीं आभरणें मासिकपुस्तकांतून प्रचलित विषयांना मित्रांनींच प्रथम घातलीं. उत्तमोत्तम वार्षिक बक्षिस पुस्तकें, दिवाळी अंक; वसंत अंक; दरबार अंक; कर्वे अंक; आगरकर अंक; वगैरे नवा उपक्रम त्यांनींच केला. महाराष्ट्रांतील स्त्री वर्ग लेखकांस त्यांनींच उत्तम प्रोत्साहन दिलें. फर्ग्युसन कॉलेजांतील अध्यापकांना आ-

पल्या व्यवसायांतील विश्रांति म्हणून भारदस्त पण सोप्या तऱ्हेनें लेख लिहिण्यास प्रथम मित्रांनींच उद्युक्त केलें. प्रत्येक प्रागतिक संस्थेला व तिच्या चालकांना रा. मित्रांची पूर्ण सहानुभूति व साहाय्य मिळत असे. नवशिक्या लेखकांची भीड चेपवून त्यांना वाङ्मयसेवेस उद्युक्त करण्यांत मित्रांचा हात खंडा असे. अनाथबालिकाश्रम, सेवासदन, फर्ग्युसन कॉलेज, सर्व्हंटस ऑफ इंडिया सोयायटी, वगैरे सामाजिक, धार्मिक, शिक्षणविषयक किंवा राजकीय संस्था यांविषयीं मित्रांना पराकाष्टेचा आपलेपणा वाटत असे. या संस्थांचें कोणचेंही काम ते मोठ्या आनंदानें, मेहेनतीनें व मनःपूर्वक करीत असत. या सर्वांना मनोरंजन हें आपल्या विचारांचें, आपल्या चळवळीचें एक उत्तम प्रचारक आहे असें वाटत असे. या सर्व वाङ्मयविषयक व्यवसायांत चूर असतांनाच त्यांनीं रा. गोविंदराव मल्लिनाथ ठेंगे यांच्या सहकारित्वानें सारस्वत ज्ञातींतील गरीब विद्यार्थ्यांना फुकट किंवा कांहीं सवलतीनें शिक्षण मिळण्याची सोय व्हावी म्हणून, आतां नांवारूपास चढलेली परंतु प्रथम अत्यंत लहान प्रमाणावर उभारलेली अशी "सारस्वत विद्यार्थि साहाय्यक मंडळी" काढिली. या मंडळीचा उगम प्रथम एकदोन गरीब विद्यार्थी आपल्या घरीं पोसण्याचा रा. ठेंगे, मित्र वगैरे शेलकी मंडळीच्या निश्चयांत झाला. राजश्री मित्र व ठेंगे यांनीं हीं संस्था नांवारूपास आणून, अखिल सारस्वत ब्राम्हण समाजाच्या सहानुभूतीस व मदतीस पात्र करण्याकरितां जे संस्थेच्या पहिल्या सात आठ वर्षांत अविश्रांत, चिकाटीचे व बिनबोभाट प्रयत्न केले त्याबद्दल ते खरोखर आपल्या ज्ञातिबांधवांच्या आदरास सर्वथैव पात्र आहेत. काशिनाथपंतांचें मनोरंजन ऑफिस हें कित्येक वर्षें या संस्थेचें कार्यालय होऊन बसलें होतें. तेथेंच या संस्थेच्या सभा भरत असत. यांच्याच छापखान्यांत संस्थेचा रिपोर्ट छापला जात असे. कार्यबाहुल्यामुळें पुढें प्रत्यक्ष सेक्रेटरीचें काम रा. मित्र यांस सोडावें लागलें तरी शेवटपर्यंत या संस्थेवरील यांचें प्रेम कायमचें होतें. सा. वि. सा. मंडळी नांवारूपास आणण्यांत, तिचीं पाळें मुळें आपल्या ज्ञातिबांधवांच्या हृदयांत खोल शिरविण्यांत, तिच्याकरितां वाटेल ती झीज सोसण्यास सदैव तयार असण्यांत, कोणचेंहि विधायक काम करण्यांत काशिनाथपंत कसे तरबेज होते, लोकांची मनें आपल्याकडे वळवून घेण्यांत ते कसे वाकबगार होते, आपला मित्रवर्ग आपल्या कार्याला कसा जुळवून घ्यावा हें त्यांना कसें बिनचुक कळत होतें, याची खात्री आपणांला पटते.

मनोरंजनाच्या वाढत्या संसाराच्या गरजा भागविण्याकरितां त्यांना पुढें स्वतःचा छापखाना काढणें अपरिहार्य झालें. हा छापखाना प्रथम केवळ मनोरंजन मासिक, वेळेवर, सुबक, आपल्या सर्वथैव मनाजोगें असें निघावें, एवढ्याचकरितां काढिला होता. परंतु छापखान्याच्या सुरुवातीपासूनच त्याचें स्वरूप अनपेक्षित तऱ्हेनें जास्तच व्यापक असें होत गेलें, हर एक प्रकारच्या, निरनिराळ्या लिपींच्या सुबक टाइपांचा, छपाईचा, फाईनआर्ट प्रोसेसचा तो एक नमुनेदार असा प्रचंड कारखानाच होऊन बसला. मुंबईत 'मनोरंजनप्रेस' म्हणजे पांचचार दक्षिणी छापखान्यांत एक नमुनेदार संस्था होऊन बसली आहे. गेलीं दहा अकरा वर्षें या छापखान्याच्या व्यवसायांतच बहुतेक गेल्यामुळें आपल्या प्रिय मासिकाकडे जेवढें लक्ष्य पोहोंचवावयास पाहिजे तेवढें देतां आलें नाहीं असें काशिनाथपंत वारंवार म्हणत असत. तरी मनोरंजन मासिकाची एकसारखी भरभराटच होत गेली. लढाईच्या पांच वर्षांत अनेक कारणांमुळें काशिनाथपंतांवर काळजीचा बोजा फार पडून त्यांच्या शरीराला व मनाला अतिशय त्रास व दगदग झाली. तरी त्यांच्या आंगच्या धैर्यानें, नेटानें व उत्साहानें हार खाली नाहीं. नेहमीं नवे बेत घोळविण्यांत, नव्या योजना योजण्यांत, आपला वाङ्मयविस्तार जास्त हितकर व व्यापक कसा होईल याविषयीं मनन, वादविवाद व मित्रसमूहाशीं हितगुज करण्यांत त्यांनीं रात्रीच्या रात्री घालवाव्यात असें नेहमीं चाललेलें असे. या सर्व व्यवसायाचें मुख्य स्थान त्यांच्या ऑफिसव्यतिरिक्त त्यांचे परम जिव्हाळ्याचे मित्र रा. ठेंगे यांचें गृह हें असे. प्रस्तुत लेखकानें अशा प्रकारचे पुष्कळ संवाद रविवारीं दोनप्रहरपासून रात्रीं नऊ वाजेपर्यंत अनेक वेळां ऐकले आहेत. व इतर वारीं रात्रीं घरीं ९ पासून १२॥ वाजेपर्यंत ऐकले आहेत. त्याच वेळीं, मित्रांच्या अंगचे मुख्य गुण जे मनमिळाऊपणा, धिम्मेपणा चिकाटी, सदैव स्थिर वृत्ति, धैर्य, दूरवर विचार करण्याची

संचय, कल्पकता, आपल्या मित्रावरील उत्कट व अढळ प्रेम, ईश्वरावरील दृढ श्रद्धा व निष्ठावंत भाव, न डगमगतां हातीं घेतलेलें काम शेवटास नेण्याची तडफ हे गुण प्रत्यक्ष प्रत्ययास आले. व विश्वविद्यालयांतून किंवा शाळांतून घेतलेल्या शिक्षणापेक्षांहि, नैसर्गिक तेज व शील यांचा प्रभाव या जगांत कसा व कां जास्त दिसून येतो हें अनुभवानें कळलें. काशिनाथपंतांचें खाजगी व सार्वजनिक व्यवहारांतलें आचरण पायाशुद्ध, निर्मळ, व प्रेमळ असेंच होतें. आपल्या अगदीं शेवटच्या विज्ञप्तींत त्यांनीं जें म्हटलें आहे तें सर्वथैव खरें आहे. ते व्यक्तिविषयक चर्चा केव्हांच करीत नसत. व्यक्तीचें मन विनाकारण त्यांनीं कधींच दुखविलें नाहीं. पण तत्वाकरितां भांडतांना त्यांनीं व्यक्तीची पर्वाही केली नाहीं. 'सत्यसंकल्पाचा दाता भगवान' या दृढ निश्चयावर व पुर्णश्रद्धेवर त्यांनीं आपल्या सर्व कार्याची उभारणी केली, तें कार्य सतत पंचवीस वर्षें गरीबींतून स्वकष्टानें बाहेर पडून, वाढत्या हौसेनें, व इभ्रतीनें चालविलें, व या एकाच पवित्र हेतूनें व ध्येयानें प्रेरित होऊन आपलें सर्वस्व त्याला वाहिलें. आपली काया झिजविली, मन झिजविलें, मेंदूचा व्यय केला. या कार्यांत दंग असतांना त्यांनीं आपल्या शरीरस्वास्थ्याकडे पाहिलें नाहीं, केवळ पैशाची केव्हांच पर्वा केली नाहीं, आपला ानी स्वभाव, व अंगिकारिलेला बाणा सोडला नाहीं, आपल्या मतांपासून च्युत झाले नाहींत. "स्वमतप्रतिपादनार्थ आपलें मासिक आहे, मासिकांच्या भरभराटीकरितां स्वमतांची अदलाबदल नव्हे, फारकत नव्हे" अशा व्रतानें ते वागले व आपल्या वयाला पन्नासी उलटण्याच्या आधींच आपली इहलोकींची यात्रा त्यांनीं संपविली. गेल्या दीड दोन वर्षांत त्यांच्यावर दुर्धर प्रसंग ओढवले. इनफ्लुएनझाच्या साथीनें ते १९१८ त आजारी पडले. तेव्हांपासूनच त्यांची प्रकृति सपशेल ढांसळली. पूर्वीप्रमाणें ती तद नंतर ताळ्यावर केव्हांच आली नाहीं. तेव्हांपासून ते जवळजवळ बिछान्याला खिळलेलेच राहिले. त्यांनीं हवाफेर केला, निरनिराळे औषधोपचार केले. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. दिवसेंदिवस ते जास्तच क्षीण होत चालले. नेहमीचा अपचनाचा रोग या त्यांच्या दुखण्यामुळें फार बळावला. अशा अस्वास्थ्याच्या स्थितींतच गेल्या सहा महिन्यांवर त्यांचें कुटुंब निवर्तलें, यामुळें ते जास्तच हवालदील झाले. आपलीं पोरें उघडीं पडलीं व आपण बिछान्याला खिळलेलों या एकाच विचारानें त्यांचें मन अत्यंत व्यग्र झालें असेल यांत संशय नाहीं. आपण या दुखण्यांतून आतां उठत नाहीं अशी त्यांच्या मनाला खात्री पटली होती. त्यांचा परिवार वाढला होता, कार्यांचा व्याप जबरदस्त होता, मनाची तयारी दांडगी होती, आत्म्याची शांती अढळ होती पण शरीरांत त्राण बिलकूल नव्हतें. येईल तो दिवस मागच्या दिवसाला बरें ह्मणवीत होता. अशा प्रसंगींही केवळ अस्तिपंजर अशा देहाच्या स्थितींत आपल्या बिछान्याजवळ पेन्सिल, कागद, व इतर पत्रांनीं भरलेली वेताची बास्केट ठेवून निजल्यानिजल्याच वर्तमानपत्रें वाचणें, इतर कामाचे कागद तपासणें, आपल्या मागें रहाणाऱ्या मंडळीच्या हातून आपलें कार्य पुढें सुरळीत चालण्यासाठीं, हरएक प्रकारच्या सूचनांचें टांचण करून ठेवणें, आलेल्या मंडळीशीं आनंदानें, हास्यविलसित मुद्रेनें बोलणें, त्यांचा शेवटचा निरोप घेणें, हा त्यांचा व्यवसाय सारखा चालला होता. यामुळें त्यांना भेटावयास जाणाऱ्या त्यांच्या मित्रांस जास्तच दुःख होत असे. असें आपल्या मित्रांचें मन खिन्न झालेलें पाहिलें म्हणजे उलट काशिनाथपंतच त्यांचें समाधान करीत असत. व आपल्या कार्याकरितां परमेश्वराकडून आशीर्वादाची व आपल्या स्नेह्यांकडून प्रेमाची व निरंतर मदतीची मागणी करीत. आपण मरणाच्या द्वारीं खास पडलों आहों, हें त्यांना कळून चुकलें होतें. पण तें मरण येवढें जवळ आलें असेल असें त्यांना ते लोणावळ्यावरून परत आल्यावर वाटलें नव्हतें. पण ऑपरेशन करण्यासारखा पोटांत रोग झाला आहे हें जेव्हां मरण्याच्या एक महिन्याआधीं त्यांना कळलें तेव्हां आतां आपण अगदीं थोडे दिवसांचे या जगाचे सोबती आहोंत असें त्यांच्या मनानें खास घेतलें. त्याप्रमाणें त्यांच्याजवळ बसा उठावयास जाणाऱ्या मित्रांचा त्यांनीं निरोप घ्यावयास सुरवात केली. त्यांचें निधन तेवीस जून रोजीं झालें. त्याच्या आधीं चारच दिवस त्यांना ऑपरेशन करतां इस्पितळांत नेलें. आपला जूनचा अंक छापलेला पाहून, जुलैच्या अंकांत लेख कोणचे घालावयाचे हें ठरवून, बक्षिस पुस्तकासंबंधानें निश्चित करून, मृत्युपत्र वगैरे व्यवस्था करून पहांटेस

ईश्वराची करुणा भाकून, सर्वांची मनःपूर्वक क्षमा मागून पूर्ण शांतचित्तानें त्यांनीं इस्पितळांत पाय टाकिला. कॅन्सरसारख्या दुष्ट रोगानें पछाडलेल्या अस्तिपंजर देहाचा जो शेवट व्हावयाचा तोच शेवट ऑपरेशननें झाला ! तेवीस जूनच्या सकाळीं दहा–साडे दहापर्यंत त्यांना बरें वाटत होतें. पुढें प्रकृति एकदम बिघडली,जीव घाबरला व दोनप्रहरीं प्राणोत्क्रमण झालें ! अशा रीतीनें पावशतकवर आपल्या नियोजित कार्याला संतत वाहिलेला त्यांचा आत्मा "पुन्हा नेमलेल्या" सेवेकरितां ईश्वराच्या पायापाशीं गेला. " सेवा करावी एवढयाचसाठीं ईश्वर आह्मांला इहलोकीं पाठवितो; माझ्या हातून जी सेवा झाली ती क्षुद्र होती तथापि माझ्या हातून ती घडली एवढयाबद्दल मृत्युशय्येवर मला समाधान वाटत आहे, आणि तो पुढें जी सेवा देईल ती करण्यास मी आतां जात आहें. " असे शेवटचे शब्द त्यांच्या लेखणींतून उतरले. त्यांचा परमेश्वरावरील दृढ विश्वास व जें कांहीं या जगांत होतें तें सर्व परमेश्वरी सूत्राप्रमाणें अतएव योग्य असेंच होतें,ही त्यांच्या मनाची भावना त्यांच्या शेवटच्या उद्गारांत व्यक्त होते. जगांत येऊन या विश्वासाचीच जोड व त्या विश्वासाला बिलगून राहिलेलें शुद्ध आचरण व मनाचा प्रांजळपणा हीं आपणांला मिळवावयाचीं असतात. हा विश्वास ज्यांच्या अंतःकरणांत बाणला, हें शुद्ध आचरण ज्यांनीं सतत बाळगिलें त्यांचें " मरणच मरोनी गेलें, " असें म्हणण्यास बिलकुल हरकत नाहीं. मृत्यु स्पष्ट दिसत असतांना ज्यांचा आत्मा ही साक्ष मनाला पटवून देतो तेच, जगाचा धन्यवाद मिळवोत किंवा न मिळवोत, ईश्वराचे इमानी नोकर गणले जातात. काशिनाथपंतांनीं आपल्याला नेमून दिलेली सेवा अत्यंत परिश्रमानें, व चोख बजाविली म्हणूनच आपण त्यांची प्रेमानें आठवण करितों नाहींतर 'असंख्यात ते जन्मले आणि मेले' अशा कोटींतच त्यांची गणना झाली असती. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो व त्यांचे कार्याला आशीर्वाद मिळून तें उत्तरोत्तर जास्तच भरभराटीस चढो अशीच महाराष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीची त्या जगन्नियंत्याकडे मनःपूर्वक प्रार्थना असली पाहिजे.

## कै. बाळ गंगाधर टिळक.

महाराष्ट्र सारस्वताच्या वाचकांना बाळ गंगाधर टिळक या लोकोत्तर व्यक्तीच्या चरित्राची पुन्हां उजळणी करून सांगण्याची आह्मांस जरूरी वाटत नाहीं. त्यांच्या निधनकालापासून ह्मणजे आगष्ट महिन्याच्या पहिल्या तारखेपासून आतांपर्यंत–म्हणजे जवळ जवळ दोन महिन्यांच्या अवधींत हिंदुस्थानांतल्या प्रत्येक वर्तमानपत्रानें व मासिकानें त्यांच्या चरित्रांतील ठोकळ गोष्टींचा व त्यांच्या अंगच्या विशेष गुणांचा पुनः पुनः उल्लेख केला आहे. त्यांचें चरित्र व चारित्र्य महाराष्ट्रीय जनतेपुढें आज चाळीस वर्षें नांदत आलें आहे. त्यांनीं ज्या पक्षाचा व ज्या राजकीय मतांचा पुरस्कार केला तो पक्ष व तीं मतें त्यांनीं देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत, खेड्यापाड्यांतून सर्वांच्या बिनचुक ओळखीचीं व आवडतीं करून दिलीं हीच त्यांची मुख्य राष्ट्रसेवा होय. सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या बाबतींत ते पुराणमतवादी होते किंवा नाहीं हा प्रश्न जरी मागें ठेविला, तरी त्या बाबतींत जनतेच्या मनोवृत्ती दुखवतील अशी एकहि गोष्ट त्यांनीं आजपर्यंत चुकून सुद्धां केली नाहीं असेंच • न्यायी माणसाला म्हणावें लागेल. सामाजिक चळवळींत त्यांनीं कोणचेंच कार्य केलें नाहीं असें नाहीं. त्यांनीं समाजसुधारकांच्या कार्याला जबरदस्त विरोध केला. हिंदुधर्माचे अभिमानी म्हणून जो त्यांचा जयजयकार करण्यांत येत असे तो, त्या हिंदुधर्माची

प्रत्यक्ष वाद करण्याला एखाद्या धर्मगुरूप्रमाणें किंवा आचार्याप्रमाणें त्यांनीं हातभार लावला ह्मणून नव्हे तर, जुनें तेवढें सोनें अशा मूकवृत्तीनें स्वतः वागून, सामाजिक व धार्मिक बाबतींत इष्ट सुधारणा घडवून आणविणाऱ्यांची त्यांच्या पत्रांतून जी वेळोवेळीं टर, निंदा व उपहास होत असे त्यांमुळे होय. 'ओरायन' व आर्कटिक होम इन धि वेदाज " हे ग्रंथ लिहिणारे विद्वान गृहस्थ,स्वामीं हंसस्वरूपांसारख्यांच्या व्याख्यानांचें पुण्यांत स्तोम माजवून, "वेद पौरुषेय आहेत" असें बुद्धिवादानें सिद्ध करणाऱ्या जिनसीवाल्यांसारख्या कर्मठ व धर्मशील ब्राम्हणाचा पाणउतारा करितात यांतील रहस्य काय? रानडे जिवंत असतांना व तदनंतर प्रत्येक सामाजिक परिषदेच्या अधिवेशना संबंधानें केसरींतून जे वस्तुविपर्यासात्मक अग्रलेख …त असे त्यांचें रहस्य काय? जो स्वतः पंडित, …नें वेदांचें उत्तम मर्म ओळखिलें, ज्यानें गीते- …ख्या थोर ग्रंथांवर भाष्य लिहीलें, स्पेन्सरसारख्या …वादी तत्वज्ञांच्या ग्रंथांचें ज्यानें आलोडन केलें, …व, केवळ भिक्षुकां करवीं आपल्या साठाव्या वाढ …निमित्त आशिर्वादाच्या अक्षता घ्यावा याचें …काय? या सर्वांना लोकांचा बुद्धिभेद न करणें, …ग्रह करणे असें त्यांचे भक्त ह्मणतात. इतरांना …ता लोकाराधना वाटल्यास नवल नाहीं. मोर्ले साहेबांच्या 'तडजोड' या ग्रंथांत त्यांनी आरंभींच 'जनतेचा मार्ग' व 'शिष्टांचा' मार्ग असा भेद बाळगणाऱ्या डेव्हिड ह्युमचे उदाहरण दिलें आहे. ह्युम साहेब स्वतः नास्तिक होते. पण ते म्हणत असत कीं, जनतेला आपल्या खुळ्या कल्पनांतच सदैव ठेवणें जास्त इष्ट आहे. धार्मिक व सामाजिक बाबतींत टिळकांची खासगी मतें काय होती यांचा येथें सध्यां विचार करणें अप्रस्तुत होईल. पण लोकांशीं वागतांना, विशेषेंकरून महाराष्ट्रांतील जनतेशीं वागतांनां,ते पुराण मताभिमानी या बाण्यानेंच वागले. आपणांला सर्वच कामें करतां येणें शक्य नाही म्हणून मी फक्त राजकीय चळवळच अंगावर घेतों असें ह्मणून जर ते वागले असते तर त्यांनां कोणीही दोष दिला नसता. पण येवढें करून ते थांबले नाहीत. सरकारच्या विरुद्ध राजकीय चळवळ करून त्याची गैर मर्जी संपादन करण्याइतकें धैर्य नसल्यामुळेंच आपल्यातील कित्येक सुशिक्षित गृहस्थ, केवळ सरकाराला खूष करण्या करितां व पाश्चात्य सुधारणेचें अंध अनुकरण म्हणून सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या बाबतींत ते पडतात असा त्यांच्या विषयींचा जेवढा गैरसमज जनतेंत होईल तेवढा करण्याच्या उद्देशानें त्यांनी केसरीचें धोरण बरेच वर्षें ठेविले असें म्हणणें भाग पडतें. रानडे, दिवाण बहादुर रघुनाथराव, प्रो. कर्वे वगैरे सर्व सुधारकाग्रणींची कोणत्याना कोणत्या प्रसंगीं केसरी वर्त. मानपत्रांत धिंड काढल्याची साक्ष केसरीचे मागचे अंक देतील. हें त्यांनी सर्व जनतेचें मन आपल्याकडे विशेषेंकरून ओढून घेण्याकरितां व आपण लोकप्रिय बनण्याकरितां केलें. ही लोकप्रियता संपादण्यांत त्यांची स्वार्थबुद्धि होती असें म्हणण्याचा उद्देश नाहीं. त्यांच्या दृष्टीनें पुढें करावयाच्या देशकार्याला अशा प्रकारच्या प्रस्तावनेची अत्यंत आवश्यकता होती. कारण तसें त्यांनीं केलें नसतें तर कदाचित आपल्या राजकीय मतांना पुष्टी देण्याकरितां जो प्रचंड सेनासमुद्र त्यांनीं निर्माण केला तो कदाचित निर्माण झाला नसता. व त्यांचें राजकीय कार्य येवढें खुलून व स्पष्ट दिसलें तितकें दिसलें नसतें. लोकप्रियतेच्या जोरावर सरकाराशीं दोन हात करणें त्यांना जड गेलें नाहीं. संकटांशी झगडतांना, तुरुंगवास सोसतांना, गीतारहस्य लिहितांना, आपली जनता आपल्या बाजूची आहे, ही खात्री त्यांच्या खंबीर हृदयाला निःसंशय होती. टिळक जर 'ज्वलत्जहाल सुधारक' असते व त्यांनीं नोकरशाहीशीं जो विरोध आरंभून जन्मभर टिकविला तसाच जर त्यांनीं केला नसता तर त्यांच्या संकटांत त्यांना जनतेनें एवढा पाठिंबा दिला असता किंवा तिनें त्यांचा इतका गौरव केला असता किंवा नाहीं ह्या गोष्टीविषयीं दुमत आहे. अशा धीरोदात्त माणसाला अशा पाठिंब्याची जरूरीच होती असें म्हणण्याचा इरादा नाहीं. पण समाज सुधारक व राजकीय पुढारी यांना आपला मार्ग चोखाळण्याला लागणाऱ्या धैर्यांत फेर असतो. एकांत ज्या लोकांमध्यें त्याला रात्रंदिवस वावरावयाचें असतें, ज्यांच्याशीं त्याचे सर्व कायिक, वाचिक व आर्थिक व्यवहार संलग्न असतात, जन्मापासून मृत्यूपर्यंत ज्यांचा व यांचा रात्रंदिवस संबंध येतो, यांच्या व त्यांच्या जन्माच्या गांठी बसलेल्या असतात, त्यांच्याशींच भांडण करावें

लागतें; हा छळ, हा त्रास ही चीज दिसण्याला सूक्ष्म, पण अत्यंत हृदयभेदी व जाचणूकीची असते. उलट राजकीय पुढारी जनतेचा प्यारा असल्यास केवळ अधिकारी वर्गाशीं भांडण्यास, त्यांनीं केलेलें शासन सोसण्यास, इतकेंच नाहीं तर अपरिहार्य झाल्यास जीव देण्यास आनंदानें तयार होतो. दोघांचाही उद्देश लोक कल्याण साधण्याचाच असतो. पण लोक कल्याणाचा पहिला मार्ग दिसावयास गौण, परिणामी अत्यंत खोल, स्वकीय जनासीं अत्यंत विरोधात्मक म्हणून खडतर असा असतो तर दुसऱ्यांत लोकांचें प्रेम, लोकांकडून होणारा गौरव होतो. नेहमीच्या लागे बांध्याला त्याला मुळींच व्यत्यय येत नाहीं व हा मार्ग जगांत दिसण्याला गंभीर व उग्रस्वरूपाचा, डोळयांत ठसणारा असा असतो. टिळकांचा मार्ग दुसऱ्या प्रकारचा होता. राजाराम मोहन रॉय, दयानंदसरस्वति, ईश्वरचंद्र विद्यासागर यांचा मार्ग पहिल्या प्रकारचा होता. दोन्ही वळणांच्या थोर पुरुषांची देशाला अत्यंत जरूर आहे. राष्ट्राची खरी प्रगति म्हणजे या दोन्ही मार्गाचें संकीर्ण स्वरूप आहे. हें टिळकांनीं आपल्या दृष्टी पुढें आंखलेल्या मार्गासंबंधानें झालें. पुढे तो मार्ग आक्रमितानां त्यांनीं जे गुण दाखविले ते अत्यंत दुर्मिळ असेच होते. समाज सुधारक काय किंवा राजकीय सुधारक काय, प्रत्येकाला आपला मार्ग आक्रमितांनां संकटें हीं यावयाचींच. व त्या संकटांतून जो पार पडून जातो, स्वमत नियोजित कर्त्तव्यापासून केव्हांही परांग्मुख होत नाहीं तोच लोकोत्तर ठरतो. इतिहासांत त्याचेंच नांव अजरामर राहतें. बाळ गंगाधर टिळक यांचें ध्येय-केवळ राजकीय म्हणून-जरी अत्यंत मर्यादित स्वरूपाचें होतें. तरी त्याचें आराधन करीत असतांना त्यांनीं आज सतत चाळीस वर्षे जी तडफ, जें धैर्य, जी चिकाटी, जी निस्पृहता, जो स्वार्थत्याग, जो करारी बाणा व जी देशभक्ति दाखविली त्यामुळें त्यांना आपल्या लोकांत जवळ जवळ दैविकपणाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. प्रथम अध्यापक, नंतर वर्तमानपत्रकार, तदनंतर एका राजकीय पक्षाचे अत्यंत जोरदार पुढारी, व सरते शेवटीं सर्व हिंदुस्थानाच्या वतीनें होमरूलची जोरानें चळवळ आरंभिलेले एक धुरंधर वीर अशी त्यांची स्मृति जनतेच्या हृत्पटलावर कायमची कोरलेली राहील. या त्यांच्या उज्ज्वल कीर्तीमध्यें त्यांच्या अंगच्या निर्मळ व शुद्ध आचरणांमुळें, त्यांच्या साध्य रहाणीनें त्यांच्या ज्ञानलालसेनें, विद्वत्तेनें व लोकोत्तर ग्रंथरचनेनें दुधांत साखर पडल्याप्रमाणें जास्तच भर पडली हें निर्विवाद होय. जनतेवर टिळकांनीं कांहीं बाबतींत अत्यंत उपकार केले आहेत. देशकार्य करणाऱ्यांमध्यें कशी तडफ, कशा प्रकारची विरक्तता, कसा कणखरपणा, कसें साधें आचरण व निर्मळ रहाणी पाहिजे हें त्यांनीं प्रत्यक्ष उदाहरण घालून शिकविलें आहे. ते आपली मतें पूर्ण ज्ञानाअंतीं बनवीत असत, त्यांच्यांत हल्लींच्या देशाभिमानी म्हणविणाऱ्या तरुणांत दिसून येणारा उथळपणा बिलकूल नव्हता. ते आपलीं मतें लोकांपासून प्रतिध्वनीसारखीं घेत नसत. त्यांचें प्रतिपादन करतांना तीं प्रस्थापित करतांना, त्यांची प्रतिपक्षावर छाप पडावी म्हणून ते अनेक युक्त्या किंवा डांवपेच योजीत असत हें निराळें. पण त्यांच्या मतांच्या मुळाशीं लेचेपेचेपणा, व ज्ञानाचा अभाव किंवा पोकळपणा हीं मुळींच नव्हती.म्हणून कोणच्याही प्रसंगीं, कोणत्याही वेळेला, शिष्ठ व विद्वानांच्या मंडळींत, सुशिक्षितांच्या समाजांत किंवा सामान्य जनतेपुढें, त्यांचें बुद्धिसामर्थ्य, त्यांच्या अंगचें तेज, त्यांचा पाणीदारपणा हीं कायमचीं टिकत असत. आकस्मिक कारणांनीं पाण्याच्या लोंढ्याबरोबर किंवा वावटळीनें वर येणाऱ्या व थैमान करणाऱ्या गवताच्या काडीप्रमाणें त्यांची देशभक्ती तात्पुरती किंवा वेगडी नव्हती. त्यांचें देशकार्य खोल, पूर्ण विचाराअंतीं स्विकारलेलें, सदैव कायम टिकणारें, हल्लींच्या लोकांच्या परिस्थितींत अत्यंत आवश्यक, भरपूर माहितीनें व अनुभवयुक्त, लोकांच्या मनोभूमींवर उभारलेलें असें होतें. केवळ तुरुंगवास भोगून ते देशभक्त झाले नव्हते. किंवा तुरुंगवासाची आंच लागतांच त्यांच्या देशभक्तीचें पर्यवसान देशत्याग किंवा निव्वळ ग्रंथलेखन यांत झालें नाहीं.बंगालच्या फाळणीनंतर पुष्कळ देशभक्त उदयास आले व विराम पावले.त्या वेळीं अनेक वर्तमान पत्रें निघालीं.अनेकांनीं जहाल लेख लिहिले, अनेकांवर खटले झाले व अनेकांनीं शिक्षाही भोगिल्या.पण टिळक व त्यांचा केसरी यांचें बळ कायमचें टिकलें, द्विगुणित झालें; त्यांचें कार्य सर्व हिंदुस्थानभर पसरलें. इतर नामशेष झाले, मेदरले, किंवा प्रसंग ओळखून वागूं

लागले. टिळक लोकप्रिय झाले, लोकमान्य झाले, लोकांनीं त्यांना आपल्या हृदयांतील ताईत म्हणून मिरविलें याचें रहस्य या निस्सीम भक्तींत, या अलोट धैर्यांत, या अलौकिक बुद्धिसामर्थ्यांत व स्वार्थत्यागांत आहे. हा स्वार्थत्याग, ही भक्ति, हें धैर्य, हा बुद्धीचा खोलपणा, विचाराचें स्थैर्य ही कार्याची एकतानता प्रत्येक तरुण हिंदवासियानें आपल्यांत आणण्यास शिकणें व यायोगें कोणत्या ना कोणत्या दिशेनें सेवा करून आपल्या मायभूमीला उत्तीर्ण करणें हेंच टिळकांचें खरें स्मारक आहे. "पाषाणाचा केला विष्णू। परि पाषाण नव्हे विष्णू" या न्यायानें केवळ टिळकांच्या मतांची री ओढणें, त्यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर भयंकर टीकास्त्र सोडलें म्हणून आपणही सोडणें, ते जहाल होते ह्मणूनच आपण जहाल होणें, त्यांनीं सामाजिक व धार्मिक सुधारणेकरितां बोटही उचललें नाहीं म्हणून तोच मार्ग उत्तम असा अनुवाद करणें, हें केव्हांहि त्यांचें खरें अनुकरण होणार नाहीं. आपल्या अंतःस्फूर्तीनें आपल्याला जो मार्ग सांपडला, त्या मार्गाचें आचरण करितांना वर सांगितलेले त्यांचे गुण आपलेसे करणें हाच त्यांचा खरा आदेश आहे. महाराष्ट्रांतील तरुण पिढी त्यांच्या गुणांचें खरोखरी चीज करोत. केवळ 'रंग बेगडीचा न्याय' असें न वागोत. हल्लीं आपल्यातील तरुणांना वर्तमानपत्रें व कादंबऱ्या यांच्या व्यतिरिक्त वाचन सुचत नाहीं, बुट पाटलून, नेकटाय कॉलर व तोंडांत सिगारेट या शिवाय विसंबत नाहीं. हॉटेलांत खाणें, खानावळींत जेवणें व शाळांतून व कॉलेजांतून उच्छृंखल वृति, गुरुजनांचा अनादर, स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय, स्वराज्य यांची वायफळ बडबड, या शिवाय करमत नाहीं, परमता विषयीं अनादर व असहिष्णुतता यां शिवाय त्यांना स्वाभिमान दाखवितांच येत नाहीं, ही स्थिति लोकमान्य टिळकांच्या चारित्र्य चिंतनानें नाहीशी होऊन जर मेंदूचा भरींवपणा, उद्योगाची हौस. सद्गुणां विषयीं चढाओढ, ज्ञानाची तळमळ व हौस खरा स्वार्थ त्याग व देश भक्ति हीं त्यांच्यांत उद्दीप्त झालीं तरच टिळकांचें खरें कार्य त्यांनीं पुढें चालविलें असें होईल. हें जों पर्यंत होणार नाहीं तों पर्यंत केवळ नामघोष करण्यानें फायदा तर कांहींच नाहीं उलट दिशाभूल होण्याचा बराच संभव आहे. कोणत्याही राष्ट्राचें भाग्य त्या राष्ट्रांतील तरुण पिढींचे, कार्य होय. दादाभाई, भाऊदाजी, भांडारकर, रानडे, मोडक, तेलंग, मेहेता, पंडित, विष्णुशास्त्री, टिळक चंदावरकर, आगरकर, गोखले, आपटे, यांचें कार्य म्हणजे महाराष्ट्राचें भाग्य व महोदय होय. तदनंतर जर तेंच कार्य पुढें चालवावयाचें असेल तर तशाच वृत्तीचे, भावनेचे, शीलाचे तरुण आपणांत निर्माण व्हावयास पाहिजेत. हल्लींचा केवळ नाटकी थाट जाऊन साधी रहाणी, उच्च विचारसरणी आणि उदरंभरणा पलिकडे कांहीं तरी पवित्र कार्य करून दाखविण्याची तळमळ हीं आपणांत आलीं पाहिजेत. तरच मागच्या पिढीनें केलेल्या कार्याचें चीज झालें असें म्हणतां येईल. वडीलानीं ठेवलेली संपत्ति दिढी दुपटीनें वाढवून, तिचा उत्तम उपयोग करून दाखविण्यांत, तिच्या सहाय्यानें आपल्या किर्तीत व कर्तबगारींत भर घालण्यांतच खरें पुत्रकार्य सांठविलेलें असतें. नुसता जयघोष कांहीं कामास येत नाहीं. त्यांमुळें पोकळ डौल, कमकुवतपणा, तोंडाची बडबड व आत्मवंचना हीं मात्र बोकाळतात. टिळकांचे दोष त्यांच्या नश्वर देहाबरोबर नष्ट झाले. त्यांचे गुण प्रकाशाप्रमाणें आपणांला मार्गदर्शक होवोत अशी ईश्वरापाशीं प्रार्थना करून, निर्घृण झालेल्या दुःखाला मागें सारून कार्याला लागण्यानेंच त्यांच्या आत्म्याला खरी शांती व समाधान प्राप्त होतील. गोखल्यांच्या मृत्युसमयीं हाच उपदेश टिळकांनीं लोकांना केला होता. तोच त्यांचा आपणांस संदेश आहे असें समजून लोकांनीं कार्यास उद्युक्त व्हावयास हवें. Death awaited all, why not then work strenuously while life lasted हे त्यांचे शब्द प्रत्येकानें हृदयावर खोदून ठेवण्यासारखे आहेत.

## कै. आत्माराम सिताराम वाघ

कोणचीही चळवळ यशस्वी, फलदायी व जोमदार व्हावयास दोन प्रकारच्या व्यक्तींची जरूरी असते. प्रथम त्या चळवळीचें धुरीणत्व ज्यांच्याकडे येतें तीं माणसें सर्वतोपरी धुरीण पदाला साजतील अशा प्रकारचीं हवींत. धुरीण कसे असावेत याचें एकाच शब्दांत एका पाश्चात्य ग्रंथकारानें वर्णन केलें आहे. तो शब्द Lightening हा होय. वीज, या शब्दांत, तेज, जबरदस्त आघात करण्याची धमक, आकर्षणशक्ति, जी योजकता कोणाच्याही लक्षांत येणार नाहीं तीवर लख्ख प्रकाश निमिषमात्रांत टाकून सर्व कार्य सोपें करून आपल्या अनुयायांतील गुप्त चैतन्य प्रकट करण्याचा प्रभाव वगैरे सर्व गुण एका या शब्दांत सांठविले आहेत. पण 'विजे' चा योग्य प्रभाव दिसण्यास ज्याप्रमाणें काष्ठांची जरूरी आहे, त्याचप्रमाणें पुढाऱ्याच्या योजकतेचें, कार्यक्षमतेचें प्रत्यक्ष फल सर्वांना मिळण्यास उत्तम अनुयायांचीही तेवढीच जरूरी असते. या दोन साधनांचा जेव्हां योग्य मिलाफ होतो तेव्हांच कोणचीही चळवळ उत्तम यशोदायिनी होते. आत्मारामपंत वाघ हे एखाद्या पवित्र कार्यास वाहिलेल्या उत्तम अनुयायांत कोणचे बिनमोल गुण असावे लागतात याचें मूर्तिमंत उदाहरण होतें. त्यांच्यांत स्वार्थत्याग उत्तम प्रकारचा होता. आत्मविश्वास व स्वीकृत कार्याविषयीं तळमळही त्याच प्रमाणे, नवा मार्ग आक्रमण्याला जें धैर्य, जो सोशिकपणा, जी शांतवृत्ति, जो प्रांजल भाव, जो दृढनिश्चय, जी उद्योगतत्परता कोणत्याही माणसांत असावी लागते, तशा प्रकारचे सर्व गुण वाघ यांच्यांत पूर्णपणें वसत होते. आपण कोणतेंही कार्य केलें म्हणजे स्वाभाविकपणें फुगून जातों, लोकांशीं फटकून वागतों, लोकांना जाणूनबुजून दोष देतों तसें वाघ यांचें नव्हतें. जें केलें त्यांत विशेष कांहीं नाहीं, असेंच त्यांना मनापासून वाटत असे. म्हणून दुर्धर रोगानें ग्रासलें असतांनां, संकटपरंपरेनें पीडिलें असतांनां, दुःखानें होरपळून गेलेल्या स्थितींतही, मृत्यु पुढें दत्त म्हणून उभा असतांनाही, त्यांचें सर्वांशीं वर्तन शांत, प्रेमळ, हंसतमुख, व आनंदी असें असे. कार्य कसेंही असो, तें आपल्या बुद्धीला व अंतःकरणाला पटल्याबरोबर तें स्वतः उरकावयाचें, व त्यांत दुसऱ्यांना मनापासून होईल ती अत्यंत कसोशीनें मदत करावयाची हें त्यांचें आमरण व्रत होतें. म्हणूनच 'समाज सेवासंघ, सोशल रीफॉर्म ॲसोसियेशन, अनाथ विधवा गृह, पतपेढीसंस्था' वगैरे प्रत्येक कार्यकारी संस्थेला त्यांच्या मृत्यूमुळें हळहळ वाटत आहे. असे निरपेक्ष सेवक जेव्हां आपल्या समाजांत निर्माण होतील तेव्हांच त्यांचें पाऊल पुढें पडेल. उत्तम योजक व उत्तम काम करणारीं माणसें हींच कोणत्याही चळवळीचा प्राण होत. तीं असलीं म्हणजे पैशाची वाण पडत नाहीं, कार्याची वाण पडत नाहीं, व यश हें हटकून ठेवलेलेंच. सामान्यजनांना, नोकरी करून काल कंठणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, मनावर घेतलें तर आपणांस काय करतां येण्यासारखें आहे हें वाघांनीं उत्तम दाखविलें आहे. व म्हणून आम्ही त्यांच्या नांवाचा अत्यंत आदरपूर्वक उल्लेख येथें केला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो व त्यांच्या पाठीं दीन झालेलीं त्यांचीं बालकें यांचें रक्षण होऊन तीं कार्यक्षम होवोत.

## कै. रा. ब. आनंदराव पाटकर.

सांगली येथील न्यायाधीश रा. ब. आनंदराव पाटकर यांचें देहावसान गेल्या २३ जून रोजीं झाल्याचें वर्तमान कळविण्यास आम्हांस वाईट वाटतें. मुंबईंत शिक्षण संपादिल्यावर हे कांहीं काल नोकरीवर राहिले व पुढें सांगलींत वकिली करूं लागले. यांची हुषारी व सच्छील वृत्ति पाहून त्यांस संस्थानाधिपतींनीं तेथील मुनसफीची जागा दिली. पुढें त्यांच्या कामाची शैली आणि न्यायप्रियता लक्षांत आणून त्यांस न्यायाधीश नेमण्यांत आलें. हें कांम त्यांनीं १५ वर्षें केलें. आपलें अत्यंत जबाबदारीचें काम सांभाळून राहिलेल्या वेळांत सांगली येथील सार्वजनिक हिताच्या कामांत त्यांनीं मन घातल्यामुळें ते फार लोकप्रिय झाले. शहरसुधारणा, स्वस्त धान्याचें दुकान, सांगली बँक, सांगली स्टेट रेलवे यासारखीं मोठमोठीं कामें त्यांच्या प्रयत्नामुळें सिद्धीस गेलीं त्यांच्या स्मशानयात्रेला सबंध गांव लोटला होता, यावरून ते नृपति व जनपद यांस सारखेच मान्य झाले होते हें सिद्ध होतें सांगली येथें त्यांचें स्मारक होणार असल्याचें कळतें

# ज्ञाति समाचार

**तिसरे आय. सी. एस**—आम्हांस कळविण्यास आनंद वाटतो कीं, श्रीयुत दत्तात्रय वामन रेगे, बी. ए. ( खानापूर ) हे गेल्या महिन्यांत झालेल्या आय्. सी. एम्.च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याची सुवार्ता येथें तारेनें नुकतीच आली आहे. श्री. रेगे हे सन १९१८ सालीं डेक्कन कॉलेजांतून बी. ए. झाले असून त्यानंतर ते तेथें एक वर्षपर्यंत सीनियर दक्षिणा फेलो होते. कॉलेजांत असतां ते चांगल्यापैकीं विद्यार्थी म्हणूनच केवळ नावाजलेले नसून कॉलेजांतील हर एक चळवळीचे एक आस्थेवाईक सभासद म्हणूनही त्यांचें नांव प्रसिद्ध होतें. डेक्कन कॉलेजांतील चांगल्या पेहलवानांत ते मोडत असून त्या कॉलेजच्या वार्षिक शर्यतींत ते पहिले येऊन त्यांनीं चांदीचा पेला बक्षीस् मिळविला होता. शिवाय ते इंडियन डिफेन्स फोर्समध्यें होते. तसेंच डेक्कन कॉलेजच्या मॅगझिनच्या इंग्रजी बाजूचे ते संपादक होते,त्यांवरून त्यांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाची कल्पना करितां येईल. विलायतेंत जाऊन एक वर्षाच्या आंतच आय. सी. एस. सारख्या अत्यंत अवघड परीक्षेंत यश मिळविलें हें त्यांच्या अत्युत्तम बुद्धिमत्तेचेंच निदर्शक होय.

श्रीयुत रेगे हे गौड सारस्वत-ब्राह्मण ज्ञातींतील वरील परीक्षेंत पास झालेले तिसरे गृहस्थ असून मि. गोविंदराव दिनानाथ माडगांवकर बी. ए. ( हल्लीं ॲडिशनल ज्युडिशिअल् कमिशनर, सिंध ) हे पहिले व गेल्या वर्षी पास झालेले श्रीयुत गणपतराव सखाराम राजाध्यक्ष बी. ए. हे दुसरे गृहस्थ होत.

श्रीयुत रेगे हे उत्तम वर्तनानें आपल्या देशबंधूंच्या आदरास पात्र होवोत असें आम्ही इच्छितों.

श्रीयुत शामराव रघुनाथ तेंडूलकर हे स्वकीय विद्यार्थी I. C. S. च्या परिक्षेसाठीं गेल्या महिन्यांत परदेशीं रवाना झाले असून त्यांच्या सन्मानार्थ रा. ब. देसाई; टोपीवाले यांच्या घरीं त्यांच्या कुडाळदेशस्थ शाखेच्या मंडळीची एक खास सभा भरून त्यांना प्रेमानें निरोप देण्यांत आला.

**तेलंगांची पुण्यतिथि**—येथील गौड सा. ब्रा. मित्र मंडळातर्फे ता. ५ सप्टेंबर रोजीं कै. न्या. तेलंगांची पुण्यतिथि प्रि. र. पु. परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी करण्यांत आली. गतसालापेक्षां चालू सालीं या पुण्यतिथीस बरीच मंडळी हजर होती. रा. रा. काणे, चिटणीस, फडणीस इत्यादिकांचीं भाषणें झालीं. प्रो. काणे यांचें भाषण व अध्यक्षांचें भाषण विशेष परिणामकारक झालें. वक्त्यांत सारस्वतांचा न झालेला समावेश, रा. ब. भांडारे यांचें आभारप्रदर्शन, श्री. शिरोळकरांची देणगी व प्रमुख सारस्वतांची गैरहजिरी, इत्यादि बाबींसंबधानें इंदुप्रकाशांतून बराच ऊहापोह झाला. स्थलाभावास्तव यासंबंधाचा विचार पुढील अंकीं करूं.

**गोवा हिंदु असोसिएशन**—या संस्थेतर्फे रा. रा. ग. वि. लाड यांच्या अध्यक्षतेखालीं गोव्याचे रा. रा. यशवंत सूर्यराव सरदेसाई यांचे " स्वकीयांशीं हितगुज " या विषयावर व्याख्यान झालें. व्याख्यात्यांनीं गोमंतकांतून निरनिराळ्या कारणांनीं ठिकठिकाणीं पसरलेल्या आपल्या हिंदु बांधवांस गोमंतकांतील स्वकीयांच्या उन्नतीसंबंधानें निरनिराळ्या बाजूनें प्रयत्न करण्याची कळकळीची विनंती केली.

याच संस्थेतर्फे रा. रा. वालावलकर यांच्या अध्यक्षतेखालीं गोव्यांतील भारत पत्राचे संपादक रा. रा. हेगडे देसाई यांचें " संघशक्ती " या विषयावर व्याख्यान झालें.

मराठी भाषेच्यासंबंधानें अनास्था दाखविणाऱ्या पोर्टुगीझ सरकारास आपल्या जबाबदारीची जाणीव देऊन गोमंतकांत ठिकठिकाणीं मराठीची सोय करण्यासंबधानें विनंती अर्ज करण्यासाठीं व हल्लीं कौंन्सिलपुढें आलेल्या शिक्षणविषयक बिलांत मराठीचा समावेश न झाल्यानें येथील गोमांतकीय हिंदुसमाजाची नापसंती दर्शविण्यासाठीं गोवा ' हिंदुअसोसिएशनतर्फे ' एक सभा हिराबागेंत रा. रा. यशवंत मंगेश लाड बी ए. यांच्या अध्यक्षतेखालीं भरून ठराव पसार करण्यांत आला व तो लगेच पोर्चुगीझ सरकाराकडे रवाना करण्यांत आला. सभेंत डॉ. कामत, बोरकर, आमोणकर, वेलींगकर, शिरवैकर, यशवंतराव सरदेसाई इत्यादि मंडळीचीं भाषणें झालीं.